

# परिवर्तनाची क्षितिजे

‘दलितमित्र’
रा. ना. चव्हाण
यांचे निवडक लेख

संपादक
डॉ. एस्. एस्. भोसले

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

परिवर्तनाची क्षितिजे

# परिवर्तनाची क्षितिजे

**'दलितमित्र' रा. ना. चव्हाण यांचे निवडक लेख**


संपादक

**डॉ. एस्. एस्. भोसले**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई


अनुक्रमणिका

**॥परिवर्तनाची क्षितिजे॥**

‘दलितमित्र’ रा० ना० चव्हाण यांचे निवडक लेख

**प्रथमावृत्ती** : १९९९

© सर्व हक्क स्वाधीन
म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०००१४

**मुखपृष्ठ :**
श्री. मन्सूर शेख

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
५१ गंगापुरी, रास्तेवाडा,
वाई (जि. सातारा) — ४१२८०३

**किंमत :**
रु. २५३-००

## अनुक्रमणिका

# महात्मा जोतीबा फुले
# यांच्या
# शूद्रातिशूद्रांस ... ...

रा. ना. चव्हाण
एस्. एस्. भोसले

## अनुक्रमणिका

## पूर्वप्रसिद्धी

१ साहित्य संस्कृती व समाजाचे जीवन
(‘साहित्य, संस्कृती आणि समाजजीवन’ या नावाने समावेश)
‘युगकर्ता’, जाने. – फेब्रु. – मार्च, १९८९.
२ नवसमाज प्रबोधनाची गरज
‘नवभारत’, एप्रिल, १९७७.
३ महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाचे स्वरूप
‘स. प्र. पत्रिका’, सप्टें-ऑक्टो., १९७३.
४ न्याय व सामाजिक समता
‘अस्मितादर्श’, दीपावली, १९८४.
५ सत्यशोधक जोतीराव फुले
(‘म. फुले – चरित्राचा सुवर्णकळस’ या मथळ्याने अंतर्भूत)
‘संत चरित्रमाला’, पुष्प ४, २९ फेब्रु., १९५२.
६ सत्यशोधक समाजाचे व्यापक ध्येय व कार्य
‘राष्ट्रवीर’, ६, १३ व २० मे, १९५५.
७ सत्यशोधक चळवळीचा परिणाम
(‘शेतकऱ्यांची आधुनिक चळवळ’ या शीर्षकाने समाविष्ट)
‘राष्ट्रवीर’, सुवर्ण महोत्सवी विशेषांक, १९७१.
८ सत्यशोधक समाज व आजची लोकशाही
(‘लोकशाहीतील सत्तेचे अभिसरण’ या मथळ्याने अंतर्भूत)
‘विजयी मराठा’, १ जुलै, १९७२.
९ म. फुले व त्यांचे यशापयश
(‘वेताळ पूर्वस्थळावर!’ या नावाने समावेश)
‘लोकमित्र, दीपावली, १९८६.
१० धर्मसुधारक अस्पृश्योद्धारक राजर्षी शाहू महाराज
(‘मराठा हृदयाचे विशालत्व’ या मथळ्याने अंतर्भूत)
‘राष्ट्रवीर’, १२ जुलै, १९६७.
११ भारतीय दलितांचा प्रश्न आणि विठ्ठल रामजी शिंदे
‘लोकराज्य’, १६ एप्रिल, १९७३.
१२ नवयुगप्रवर्तक छ. शिवाजी महाराज व बहुजनसमाज
(‘मराठा संस्कृतीची व्यापक आवृत्ती’ या शीर्षकाने समावेश)
‘राष्ट्रवीर’, १८ मे, १९५१.
१३ बहुजनसमाजाचे विद्याविषयक मागासलेपण
(सामाजिक व्याकरणातील ‘मागासलेपण’ या नावाने समाविष्ट)
‘राष्ट्रवीर’, १६ जून, १९७०.
१४ ‘दीनबंधू’ चे दिव्य दर्शन

अनुक्रमणिका

(‘।।चंदनाचे हात, पायही चंदन।।’ या मथळ्याने अंतर्भूत)
‘दीनबंधू’, दीपावली, १९७५.
१५ ग्रामीण साहित्याचे प्रयोजन व कार्य.
‘संग्राम’, १६ फेब्रु.-२३ मार्च, १९९१.
१६ डॉ. आंबेडकर आणि त्यांचे ‘भीमयान’
‘स. प्र. पत्रिका’, जुलै-ऑगस्ट, १९७९.’
१७ बुद्ध व त्याचे बौद्धदर्शन
‘अस्मितादर्श’, दीपावली, १९८१.
१८ दलित चळवळीचा एक मागोवा
(‘दलित चळवळ : काल, आज आणि उद्या’ या मथळ्याने अंतर्भूत)
‘स. प्र. पत्रिका’, नोव्हें-डिसें., १९८०.
१९ ‘दलितत्व’ व दलित साहित्याची नवी दिशा
‘संग्राम’, २७ नोव्हेंबर, १९८०.
२० कायदेनिष्णात डॉ. आंबेडकर आणि ‘देशाचे दुष्मन’ खटला
‘अस्मितादर्श’, दीपावली, १९८९.
२१ पुढारी व विवेकवंत
‘युगकर्ता’, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, १९८७.

अनुक्रमणिका

## रा. ना. चव्हाण यांचे प्रकाशित वाङ्मय

---

| | | |
|---|---|---|
| • | सुलभ लग्नसंस्कार विधी | : १९४६ |
| • | गोष्टीरूप संत चरित्र माला पं. शिवनाथ शास्त्री (पुष्प/१) व गौतम बुद्ध (पुष्प/३) | : १९५१ |
| • | सत्यशोधक जोतीराव फुले | : १९५२ |
| • | सार्वजनिक सत्यधर्मसार | : १९७४ |
| • | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या काही आठवणी | : १९७५ |
| • | रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय : संपादक : प्रा. मो. नि. ठोके | : १९८६ |
| • | रा. ना. चव्हाण : विचारदर्शन, संपादक : शरदचंद्र चव्हाण | : १९८७ |
| • | कर्मवीर भाऊराव पाटील : शोध आणि बोध,संपादक : प्रा. मो. नि. ठोके | : १९८७ |
| • | अक्षर श्रद्धांजली पुष्पमाला<br>पुष्प : १ (१९९४), 'जन जागरण' (१९९५),<br>'सेवितों हा रस वांटितों आणि कां' :<br>भाग १, २ व ३ (१९९६, ९७, ९८),<br>'प्रबोधन' (१९९९).<br>संपादिका : सौ. वैशाली चव्हाण | |

अनुक्रमणिका

## रा. ना. चव्हाण यांना मिळालेले मानसन्मान

---

- महाराष्ट्र शासनाकडून "दलितमित्र" सन्मान प्रदान : १९८३
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांजकडून "गौरववृत्ती" प्रदान : १९८९
- मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांजकडून सन्माननीय डी. लिट्. प्रदान करण्यासंबंधी ठराव पारित.

  (दलितमित्र रा. ना. चव्हाण व कविवर्य पी. सावळाराम यांना डी. लिट्. प्रदान करण्यासंबंधी ठराव पारित; इष्ट त्या कार्यवाहीची पूर्तता; मात्र प्रत्यक्षात पदवी प्रदान करण्यात आली नाही.) : १९८९

अनुक्रमणिका

# अनुक्रम

निवेदन ........ १२

संपादकीय ........ १३

॥ओळख॥ ........ १५

माझ्या लेखनामागची कळसूत्रे ........ १९

॥ प्रस्तावना॥ ........ २४

साहित्य, संस्कृती आणि समाजजीवन ........ ४२

नवसमाज प्रबोधनाची गरज ........ ५०

महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाचे स्वरूप ........ ६२

न्याय व सामाजिक समता ........ ६८

म. फुले-चरित्राचा सुवर्णकळस ........ ८१

सत्यशोधक समाजाचे व्यापक ध्येय व कार्य ........ ८६

शेतकऱ्यांची आधुनिक चळवळ ........ ९५

लोकशाहीतील सत्तेचे अभिसरण ........ १०३

वेताळ पूर्वस्थळावर! ........ १०७

–मराठा◦ हृदयाचे विशालत्व ........ ११६

भारतीय दलितांचा प्रश्न आणि विठ्ठल रामजी शिंदे ........ ११९

–मराठा◦ संस्कृतीची व्यापक आवृत्ती ........ १३१

सामाजिक व्याकरणातील –मागासलेपण◦ ........ १३५

–॥ चंदनाचे हात, पायही चंदन॥◦ ........ १३९

अनुक्रमणिका

ग्रामीण साहित्याचे प्रयोजन व कार्य ........ १४५

डॉ. आंबेडकर आणि त्यांचे –भीमयान◦ ........ १५४

बुद्ध व त्याचे बौद्धदर्शन ........ १७०

दलित चळवळ : काल, आज आणि उद्या ........ १९२

–दलितत्व◦ व दलित साहित्याची नवी दिशा ........ २०३

कायदेनिष्णात डॉ. आंबेडकर आणि –देशाचे दुष्मन◦ खटला ........ २१०

पुढारी व विवेकवंत ........ २१८

**अनुक्रमणिका**



**'दलितमित्र' रा. ना. चव्हाण**

॥जन्म : २९ ऑक्टोबर, १९१३॥

॥मृत्यु : १० एप्रिल, १९९३॥

## अनुक्रमणिका

# निवेदन

**समतोल वृत्तीचा आणि चिंतनशील व्यक्तिमत्वाचा 'दलितमित्र'**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या महाराष्ट्रात बहुजन समाजातून जी अनेक विचारवंत मंडळी पुढे आली त्यात रामचंद्र नारायण चव्हाण यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. प्रस्तावनेत डॉ. एस्. एस्. भोसले यांनी ज्या "नांगरी" परंपरेचा उल्लेख केला आहे, त्या नांगरी परंपरेतले आणि विवेकशील, चिंतनशील व्यक्तिमत्व असलेले रा. ना. चव्हाण यांनी सतत पन्नास वर्षे बहुजनसमाजाच्या किंवा ब्राह्मणतेर समाजाच्या गुणदोषांची मीमांसा करणारे लेखन सातत्याने केले. बहुजनसमाजात त्या काळात विद्याव्यासंग, शिक्षण, अभ्यास यांची वानवाच होती. शिक्षणाच्या अभावांमुळे दारिद्र्याची मुळे पक्की रुजलेली! अशा या समाजात परिवर्तनाची पहाट व्हावी आणि एकरस समाज निर्माण व्हावा, या तळमळीने रा. ना. चव्हाण यांनी सातत्याने आपली लेखणी झिजवली. सुदैवाने वाईमधील वास्तव्यात दोन मोठ्या माणसांचा सहवास त्यांना लाभला. त्यापैकी एक म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे. दुसरे म्हणजे प्रकांडपंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. या उभयतांच्या परिचयातून श्री. चव्हाण यांची वैचारिक भूमी पक्की झाली. महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनाशी आणि विचारांशी त्यांचे तादात्म्यच झाले होते. प्रस्तावनाकारानी म्हटल्याप्रमाणे "सत्संग आणि व्यासंग या बलस्थानांवर त्यांची अतूट श्रद्धा होती." "बहुजन हिताय" ही त्यांच्या लेखनामागची एकमेव प्रेरणा होती. म्हणूनच त्यांना "दलितमित्र" ही सार्थ पदवी मिळाली.

सतत पन्नास वर्षे रा. ना. चव्हाण यांनी किती विपुल आणि विविध विषयांवर मूलगामी चिंतन करणारे लेखन केले आहे हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. त्यांच्या लेखनामागील वृत्तीही समंजस, अनाग्रही सुधारकाची. लेखनात काटेकोर शब्दरचना आणि समतोल वृत्ती. कोठेही अभिनिवेश वा आक्रस्ताळेपणाचा मागमूस नाही. बहुजन समाजाने अज्ञानाची अंधारी वाट सोडून ज्ञानाचा प्रकाशमय मार्ग धरला पाहिजे, तीच खरी मुक्ती, हे त्यांच्या विचाराचे प्रमुख सूत्र. बहुजन समाजाच्या प्रबोधनाच्या इतिहासात त्यांचे स्थान अढळ राहील यात काही शंका नाही. त्यांचे हे वैचारिक संचित आजच्या नवीन पिढीला लाभावे यासाठी साहित्य-संस्कृती मंडळाने "परिवर्तनाची क्षितिजे" या शीर्षकाने त्यांच्या विविध विषयांवरील चिंतन एकत्र केले आहे. त्यांचे संपादन करून डॉ. एस्. एस्. भोसले यांनी या पुस्तकास विस्तृत आणि मूलग्राही प्रस्तावना लिहिली आहे, त्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

दिनांक

**द. मा. मिरासदार**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कती मंडळ

अनुक्रमणिका

## संपादकीय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा, १९८३-८६ या कालावधीत मी सन्माननीय सदस्य होतो. सोबतीने, इतर काही मान्यवरांबरोबरच डॉ. मा. प. मुंगडकर, डॉ. सरोजिनी बाबर, 'नवाकाळ' कर्ते निळूभाऊ खाडिलकर, डॉ. गंगाधर पानतावणे व डॉ. प्रभाकर मांडे ही जाणती मंडळी होती.

या काळात, आम्ही मंडळासमोर सातत्याने काही समाजाभिमुख प्रस्ताव विचारार्थ ठेवले. कै. पंढरीनाथ सीताराम पाटीलकृत फुलेचरित्राचे पुनर्मुद्रण, राजर्षी शाहू महाराजांच्या सटीक भाषणांचे प्रकाशन, ना. भास्करराव जाधव लिखित "रामायणावर नवा प्रकाश"चे संपादन, मराठवाड्यातील प्राचीन वाङ्मयाचे संकलन व संपादन, सत्यशोधकीय वाङ्मयाचे संपादन व प्रकाशन अशा काही प्रस्तावात, "दलितमित्र" रा. ना. चव्हाण यांच्या निवडक वैचारिक लेखांचा एक संग्रह संपादित करून घ्यावा व मंडळाने तो प्रकाशित करावा अशी विनंती करणाराही एक प्रस्ताव होता.

इतर अनेक प्रस्तावांप्रमाणेच या प्रस्तावाचे महत्त्व जाणून मंडळाने त्यास मंजुरी दिली. संपादनाचे काम डॉ. एस्. एस्. भोसले व डॉ. गंगाधर पानतावणे यांजवर सोपविले.

त्यानुसार "परिवर्तनाची क्षितिजे" हा, रा. ना. चव्हाण यांच्या निवडक वैचारिक लेखांचा संग्रह सिद्ध होत आहे.

"परिवर्तनाची क्षितिजे"च्या संपादनाचे काम मंडळाने डॉ. भोसले व डॉ. पानतावणे यांच्यावर सोपविले होते. पण निर्णयानंतर, या ना त्या कारणाने सहा/साडेसहा वर्षे हे काम रखडत/रेंगाळत राहिले. दरम्यान, डॉ. पानतावणे अन्य व्यापात गुंतून पडल्याने "सदरचे काम मी पूर्ण करावे." असे त्यांनी सूचित केले. त्यानुसार त्यांच्याशी व इतर अन्य मान्यवरांशी वेळोवेळी उपयुक्त सूचनांची देवाणघेवाण करीत लेखसंग्रहाची सिद्धता होत आहे.

गेल्या पंचावन/साठ वर्षांच्या कालावधीत रा. ना. चव्हाण यांनी विपुल वैचारीक वाङ्मय लिहिले. छोटीमोठी नियतकालिके, दैनिके, स्मरणिका/गौरव ग्रंथ, लहान लहान पुस्तिका यांमधून रा. नां. नी भरपेट लिहिले आहे. त्या साऱ्याचा शोध घेऊन, त्यामधून वेचक निवडून ते प्रातिनिधिक रूपात सुसंगतरीत्या मांडणे ही वेळखाऊ, कष्टाची आणि जिकीरीची गोष्ट होती. रा. ना. चव्हाण व मी उभयतांचे स्नेही डॉ. शिवाजीराव चव्हाण यांचे या बाबतीतले साहाय्य मोलाचे ठरले. त्यामुळे अधिक खोलवर जाऊन रा. नां. च्या वाङ्मयाचे आलोडन करण्यासाठी, वाचलेल्या ह्या वेळेचा उपयोग करणे मला शक्य झाले. संबधितांशी झालेल्या प्रत्यक्ष भेटीसाठी, वादविमर्श, पत्रव्यवहार आदींच्या ह्या संपादनातील खाणाखुणा, संबंधितांनी मला उदारपणे दिलेल्या मोकळिकीचा भाग आहे.

"परिवर्तनाची क्षितिजे" मधील लेखादी मजकुराच्या सढळ वापरास, संपादनास व प्रकाशनास लेखक रा. ना. चव्हाण व संबंधित यांनी आनंदाने परवानगी दिली, रा. नां. नी 'ओळख' व 'माझ्या लेखनामागची कळसूत्रे' ही

अनुक्रमणिका

संपादकीये डोळ्यांखालून घालून त्यास संमती दर्शविली. त्यांच्या या सर्वस्पर्शी साहाय्याबद्दल त्यांचे ऋण मनात वागविणे आनंदाचे वाटते.

"परिवर्तनाची क्षितिजे" मधील लेख रा. नां. च्या निगराणीखाली मुळाबरहुकूम परिष्कृत केले आहेत. "परिवर्तनाची क्षितिजे"ची बांधणी करताना मित्र मो. नि. ठोके संपादित "रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय" व श्री. शरच्चंद्र चव्हाण संकलित "रा. ना. चव्हाण : विचार दर्शन" या पुस्तकांचाही उपयोग झाला. त्यांचा मी आभारी आहे.

तसेच माझे ज्येष्ठ स्नेही प्राचार्य गजमल माळी, श्री. पन्नालाल सुराणा, डॉ. वसंत स. जोशी व डॉ. श्रीपाल सबनीस यांच्याशी वारंवार केलेल्या चर्चा, प्रस्तावनेची आखणी करताना मला उपयुक्त ठरल्या. ऋणाचा निर्देश त्यांना आवडणारा नाही म्हणून तो करीत नाही.

चित्रकार श्री. मन्सूर शेख यांनी "परिवर्तनाची क्षितिजे"चे वेष्टन व श्री. रा. ना. चव्हाणांचे रेखाचित्र काढून दिले. त्यांचा ऋणनिर्देश करतो. सूचींसाठी कष्ट उपसलेल्या स्नेही डॉ. चव्हाण व प्रा. वाळके यांचे ऋण शब्दातीत आहे.

माझ्याप्रमाणेच मंडळाचे तत्कालीन सन्माननीय अध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांचा, "रा. ना. चव्हाण यांचे लेखन" हा आस्थेचा विषय राहिल्याने त्यांनी वेळोवेळी विचारणा केली. अध्यक्षीय अधिकारात मित्रत्वाच्या भावनेने प्रसंगी पत्राद्वारे दटावणीही दिली. त्यांचे, उपाध्यक्ष प्रा. रतनलाल सोनाग्रा, मंडळाचे सन्माननीय सदस्य व सचिव श्री. चंद्रकान्त वडे या सर्वांचे मनापासून आभार मानतो.

सांप्रतचे मंडळाचे आदरणीय अध्यक्ष श्री. द. मा. मिरासदार यांनी रेंगाळलेले हे काम नेटाने रेटले हे नमूद करणे कर्तव्य आहे.

तसेच मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेन्द्र बारलिंगे, माजी उपाध्यक्ष डॉ. मा. प. मंगुडकर आणि निवृत्त सचिव श्री. सूर्यकान्त देशमुख व कै. पंढरीनाथ पाटील यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

औरंगाबाद **एस्. एस्. भोसले**

२१ मे, १९९९

------------------

४, शिवनेरी अपार्टमेंट्स,

लोकसेवा मंडळाजवळ,

खडकेश्वर, औरंगाबाद

४३१००२

अनुक्रमणिका

## ॥ओळख॥

## “दलितमित्र” रा. ना. चव्हाण / शब्दांकन : संपादक

---

### परंपरा

**नारायण कृष्णाजी चव्हाण,** हे रा. नां. चे पिताश्री.

जन्म १३ मार्च, १८८५ उडतरे (ता. वाई, जिल्हा सातारा) येथे आजोळी, सौ. भिकूबाई व श्री. कृष्णा नरसू चव्हाण हे जनक मातापिता, त्यांचे मूळ गाव वाई तालुक्यातील नावेची वाडी हे.

उडतरे (ता. वाई, जि. सातारा) येथे काळेश्वराच्या मंदिरात त्यांचे दत्तकविधान झाले.

दत्तक पिता श्री. गणपतराव राघोजीराव बाबर, बडोदे संस्थानात श्रीमंत लक्ष्मीबाई मल्हारराव गायकवाड यांच्याकडे जामदार खात्यात नोकरीस. राणीसाहेबांच्या बरोबर हिंदुस्थानातील बव्हंश तीर्थक्षेत्रे पाहण्याची संधी उपलब्ध. सर्वसाधारणपणे चांगले शिक्षण प्राप्त.

सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीच्या कार्यात सहभाग, वाई येथील चळवळीचे १९१९ पासून १९३३ अखेर नेतृत्व, पुढे वाई नगरपालिकेच्या अध्यक्षपदी १ एप्रिल, १९२६ रोजी निवड, म. गांधींच्या स्वातंत्र्याच्या चळवळीस शक्य तेवढा हातभार.

प्रेमळ स्वभाव, वृत्ती समाजशील, कर्तव्याची भावना, जबाबदारीची जाणीव; त्यामुळे वाई पंचक्रोशीत प्रतिष्ठित सद्‌गृहस्थ म्हणून ख्याती.

### जन्म आणि शिक्षण

शिक्षणाची आवड, बहुजनासंबंधी आस्था व सामाजिक कार्याची परंपरा असलेल्या घराण्यात “दलितमित्र” रा. ना. चव्हाण यांचा जन्म दिनांक २९ ऑक्टोबर, १९१३ रोजी. आई सौ. यशोदाबाई व वडील श्री. नारायणराव. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अनुक्रमे नगरपालिकेची प्राथमिक शाळा, वाई, द्रविड हायस्कूल, वाई व श्री. शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे येथे. तिथूनच १९३५ मध्ये मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण.

### संस्कार

पुण्यातील शिक्षणासाठीच्या वास्तव्यात, पुण्याच्या बहुस्पर्शी व्यक्तिमत्त्वाचे संस्कार रा. नां. च्या मनावर झाले. या फायद्याबरोबरीने अधिक मोलाचा फायदा म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची ओळखदेख झाली. ये-जा

अनुक्रमणिका

वाढली. वाचनाची गोडी दुणावली. लेखनाची इच्छा बळावली. त्यावेळी मुंबईतून प्रार्थना समाजाचे "सुबोध पत्रिका" हे नियतकालिक प्रकाशित होई. समाजाचे ते मुखपत्र होते. त्यामध्ये रा. नां. नी "ब्राह्मधर्म व बहुजनसमाज" हा लेख लिहिला. १९३६ साली. रा. नां. चे अक्षरांच्या राज्यातील हे पहिले पदार्पण.

रा. नां. ना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा होती, पण परिस्थिती प्रतिकूल पडली. पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजातून त्यांनी एफ. वाय. ची परीक्षा उत्तीर्ण केली, आणि घरच्या आर्थिक/प्रापंचिक अडचणीमुळे त्यांना शिक्षणाकडे पाठ फिरवावी लागली.

**वाटचाल**

परिस्थितीवर उपाय म्हणून पुणे नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत रा. नां. नी शिक्षकाची नोकरी पत्करली. पुढे नासिक जिल्ह्यातील नगरपालिकेचा "हाऊस टॅक्स कलेक्शन" विभाग, दुसऱ्या महायुद्धानंतर (१९३९) देवळाली (साऊथ) येथे निघालेले रि-एन्फोर्समेंट सेंटर, ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील 'बॉम्बे सेल फॅक्टरी' व शेवटी सातारा जिल्हा लोकल बोर्ड येथे रा. नां. ची नोकरी झाली. जिल्हा लोकल बोर्डात दीड तपाहून अधिक नोकरी केली. रा. ना. ना तिथे स्थिरता व स्वास्थ्य मिळाले. वाचन-लेखनाला गती आली. पुढे जाऊन त्यांचा तो सततचा ध्यासच बनला.

१९३७ मध्ये रा. नां. चा विवाह झाला. चिपळूणच्या माधवराव बळवंत डांगे यांच्या कन्या इंदिरा यांच्याशी. वाई येथील ब्राह्मो समाजात विवाह संपन्न झाला. या विवाहाची वैशिष्ट्ये तीन : १. त्याचे पौरोहित्य "सुबोधपत्रिके"चे संपादक श्री. दा. गो. वैद्य यांनी केले. २. नवपरिणित वधु-वरांच्या गृहप्रवेश विधीसाठी कर्मवीर वि. रा. शिंदे यांनी उपासना चालविली. तर ३. वडील नारायणराव यांनी मंगल विवाहाच्या आनंदाप्रित्यर्थ जातधर्मपंथ भेद न मानता पंचक्रोशीतल्या सर्वांना सहभोजन दिले.

परंपरेनेच लोकसेवची दीक्षा मिळालेले, जोडीला ग्रंथसंपत्तीशी साहचर्य आणि लेखनाची आवड, त्यामुळे संस्था/व्यक्ती/चळवळ यांच्याशी रा. नां. चा सतत संपर्क राहिला. वाईचे शिवाजी वाचनालय, ब्राह्मो समाजाची वाई शाखा, वाई वसंत व्याख्यानमाला, महाराष्ट्र साहित्य परिषद/वाई शाखा, लो. टिळक स्मारक संस्था अशा लहानमोठ्या संस्थांमध्ये रा. ना. सक्रिय कार्यकर्ते राहिले. समंजस दृष्टी, सांभाळून घेण्याची वृत्ती, विधायक कामाकडे ओढा व रचनात्मक बांधणीची इच्छा अशा अनेकविध गुणांनी रा. नां. ची, पडेल त्या छोट्यामोठ्या कामातील सक्रियता मंडित झालेली आहे.

रा. नां. ना कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा लाभलेला सहवास मोलाचा ठरला. त्यामुळे लेखन-वाचन-चिंतनाच्या अंगाने, वैचारिकता गाढ बनली आणि जीवनाला समृद्धता लाभली. रा. नां. नी या समृद्धतेचे मोल शब्दांकित करताना प्रा. मो. नि. ठोके संपादित "रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय" मधील "मी आणि माझे लेखन" मध्ये म्हटले आहे :

अनुक्रमणिका

*“कर्मवीर शिंदे वाई येथे ब्राह्मो समाजाच्या कार्यानिमित्त येऊ-जाऊ लागल्यानंतर सहवास लाभू लागला. त्यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी व स्त्रियांची उन्नती व्हावी, यादृष्टीने वाई व वाई तालुका येथे उदारधर्माचा प्रसार केला. हा काळ सन १९३३ व १९३७ पर्यंतचा होता. शिंदे यांनी अनेक मित्रांना येथे बोलावून त्यांची व्याख्याने प्रवचने करविली...तीन-चार वर्षे कर्मवीर शिंदे यांच्याशी, त्यांच्या घरीदारी त्यांचा सहवास प्राप्त झाला. त्यांच्यामुळे माझा पुणे व मुंबई येथील प्रार्थना समाजाशी जवळचा संबंध जोडला गेला. धर्ममताबद्दल सर्वांचे एकमत व मान्यता मिळणे अशक्य असले तरी या सर्व मंडळींचा त्याग, निष्ठा व कळकळ यांचा ठसा माझ्यावर उमटला”*

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सहवासामुळे मनोविकास व ज्ञानविकास होण्यास कशी मदत झाली त्यासंबंधी रा. ना. सांगतात :

*“मी १०-११ वर्षे शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने बाहेर काढल्यांनतर १९४५-४६ साली वाई येथे आलो. वाई येथे या वेळेस “चले जाव चळवळ” व भूमिगतांची चळवळ चालू होती. तर्कतीर्थ या काळात मानवेन्द्र रॉय यांच्या रॅडिकल पक्षाचे प्रवक्ते व त्यांच्या नवमानवतावादी विचाराकडे आकृष्ट झालेले होते. ब्राह्मो समाजात मानवतावाद असल्यामुळे पं. लक्ष्मणशास्त्री जोशी त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहात. त्यांना महात्मा जोतीबा फुले यांच्यातही नवमानवतावादाला जवळ असणारा मानवतावाद आढळला. आठ-दहा वर्षे त्यांचा व माझा संबंध वर्धमान राहिला. माझ्याजवळ जोतीराव फुलेकृत “गुलामगिरी”, “इशारा” व “सार्वजनिक सत्यधर्म” ही पुस्तके होती. पण त्यांच्या तळाशी असणारी विचारसरणी ज्ञात होणे कठीण पडे. प्रार्थना समाजाच्या सहवासाने मी त्यांच्याकडे एकेश्वरीवादाच्या दृष्टिकोणातून पाही...*
*म. फुले यांची दुसरी बाजू वाचकांपुढे यावी म्हणून तर्कतीर्थांच्या मागे चिकाटीने लागून “ज्योति निबंध” लिहून “जेधे-मोरे” यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचा समारंभ झाला. हे पुस्तक “विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतीस” अर्पण केल्यामुळे त्यांचे एक आद्य वाङ्मयीन स्मारक झाले. ह्या निबंधात तर्कतीर्थांनी चिपळूणकरांना पूर्ण साफ केले आहे. नंतर तर्कतीर्थांना “बहुजन समाजाचा इतिहास” लिहिण्याची इच्छा झाली. त्यासाठी अनेक साधने जमविली. सुमारे दोनशे पेजीस लिखाणही झाले. तर्कतीर्थांच्या बरोबर हे जे सर्व लिखाण झाले आणि त्यावेळी जी उदंड चर्चा झाली, त्यामुळे माझे एकूण गेल्या शतकातील प्रबोधनाचे ज्ञान विकास पावले. हा काळ सन १९५४-५५ पर्यंतचा होता.”*

रा. ना. चव्हाण यांनी महर्षी-तर्कतीर्थादी महोदयांचा सहवास तटस्थतेने भोगला, आणि प्रसंग पडेल तेव्हा तितक्याच अतिनम्रपणे तो अभिव्यक्तही केला.

जवळजवळ पाच तपे रा. ना. चव्हाण यांचे लेखन चालू राहिले. लेखन प्रामुख्याने वैचारिक स्वरूपाचे असले तरी त्यामधील विषयांचे वैविध्य लक्षणीय आहे. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी, प्रबोधनाच्या दिशा, म. जोतीबा फुले/राजर्षी शाहू/कर्मवीर वि. रा. शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव, त्यांचे विचार, उपक्रम, कार्य व परिणाम हे त्यांच्या चिंतनाचे विशेष विषय दिसतात. मात्र त्यावेगळ्या व्यक्ती/विचार वा कार्य त्यांना वर्ज्य नाही. त्यांचाही परामर्श ते तितक्याच आस्थेवाईकपणाने घेताना आढळतात. त्यातली मनस्वी उदार दृष्टी व मनमोकळेपणा लोभावून टाकतो. त्यानुषंगाने महाराष्ट्रातील एकोणिसावे शतक, आधुनिक

**अनुक्रमणिका**

समाजक्रांतीचे जनक, धर्मांतराची समस्या, सत्यशोधक समजा, दलित समाज, त्यांचे प्रश्न, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, त्यामधल्या जागृतीचे स्वरूप, लोकशाहीचे आधार, भारतीय संविधानाचा गाभा, मराठा नेतृत्व, शे. का. पक्ष, आर. एस्. एस्., दलित चळवळ व साहित्य अशा विविध विषयांवर रा. नां.चे चिंतन आहे. त्यांनी ते नेहमीच संयत शैलीत मांडले आहे. विनोबांनी म्हटल्याप्रमाणे एतद्विषयक रा. नां.च्या अनाग्रहातही आग्रह आहे. महाराष्ट्रातील छोटी मोठी वृत्तपत्रे/नियतकालिके, चर्चासत्रे/परिसंवाद यामधून त्यांनी लिहिलेल्या/वाचलेल्या अशा लेखांची/निबंधांची संख्या किमान १००० च्या घरात जाईल. "वाचकांचा पत्रव्यवहार"मधील पत्र आणि "कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय" (सीताराम रायकर), "केशवराव जेधे" (य. दि. फडके), 'नॉनब्रॅह्मिन मुव्हमेंट इन् सदर्न इंडिया" (डॉ. के. के. कावलेकर) किंवा "अग्निफुले : सावित्रीबाई फुले यांची कविता" यासारख्या मान्यवरांच्या मौलिक ग्रंथांची तितकीच व्यासंगपूर्ण परीक्षणे, अशी संपत्ती, गणतीसाठी वेगळीच धरावी लागते. यासंबंधात मोजदाद करायचा प्रयत्न केला तेव्हा खुद्द रा. नां.नीच "असा काही मेळ जमविणे कठीण आहे", अशा स्वाभाविक नम्रतेने असमर्थता प्रकट केली. रा. नां.चा हा सर्वस्पर्शी प्रांजळपणा त्यांच्या उभ्या लेखनाची सधनता वर्धिष्णु करतो.

एवंच, लेखन-वाचन-चिंतनाच्या द्वारे सर्वसाधारण जनतेच्या अडचणी मांडता आल्या, मनोगत मांडता आले, थोरा-मोठ्यांच्या ग्रंथांच्या/तत्त्वज्ञानाच्या तळाशी असणारी विचारसरणी जिज्ञासूसह सर्वसामान्यांना ज्ञात करून देता आली, त्यामुळे थोडीफार लोकसेवा घडली याचा रा. नां.ना विशेष आनंद व समाधान वाटे.

अनुक्रमणिका

# माझ्या लेखनामागची कळसूत्रे

**रा. ना. चव्हाण / शब्दांकन : संपादक**

....... गेल्या पन्नास-पंचावन वर्षांच्या काळात रा. ना. चव्हाण यांनी विपुल लिहिले. आजही, ऐंशीव्या वर्षातील पदार्पणातही रा. नां.चा उत्साह चढता-वाढता आहे.

....... आपल्या लेखनासंबंधी रा. नां.नी प्रसंगपरत्वे कमी-अधिक लिहिले आहे : लेखनामागच्या प्रेरणा, लेखनाचे स्वरूप, तसे ते असण्यामागील कारणे, लेखनाशी निगडित गुण-दोषांचे धावते दिग्दर्शन अशा, अनेक बाबींचा त्यामध्ये समावेश होतो. निर्मळ वृत्तीच्या रा. नां.नी समाजशील ताटस्थ्याने हे सांगितले आहे. त्यात कमालीचा पारदर्शीपणा आढळतो. त्यामधील "सत्य" निष्ठेचा ध्यास सतत प्रभावी आहे. मनावर तो गहिरे संस्कार करून जातो.

....... प्रस्तुत लेखकाशी रा. नां.च्या अशा वारंवार चर्चा झाल्या. वाद-विरोध रंगले. गेली किमान १८ वर्षे प्रस्तुत लेखकाचा रा. नां.शी सतत चर्चाविनिमय होत आला आहे.

....... या सर्वांमधून रा. नां.ची लेखनामागची कळसूत्रे समोर येतात. त्यांची समग्र भूमिका समोर येते. ती संकलित रूपाने, रा. नां.च्याच शब्दात टिपणीसह नजरेखालून घालणे इष्ट ठरेल.

श्री. रा. ना. चव्हाण सांगतात :

> *"आपला समाज, संस्कृती व धर्म यांचा स्वभाव सर्वसामान्येकरून परंपरावादी आहे. वाडवडिलार्जित चालीरीतीप्रमाणे लोकसमाज चालतो. धर्मशास्त्रापेक्षा रूढी बलवान व घट्ट असतात. गावगाड्यातील जीवन जास्ती सनातनी असते. कालगतीप्रमाणे परिवर्तन सर्वत्र होते, पण ते मंद असते. समाजात व विशेषतः खेड्यापाड्यात, घरीदारी व्यक्तिस्वातंत्र्य असतेच असे नव्हे. "महाजनो येन गतः स पंथः" म्हणजे जास्तीत जास्त लोक जसे वागतात. त्याप्रमाणे वागावे लागते. "सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता" असे धैर्य फारच थोडे दाखवितात व ह्यांचे विचार व कृती बहुलोक-समाजात परिवर्तन होण्यास कारणीभूत होत असते."*

परंपरावादी, सनातन समाजात मंदपणे परिवर्तन होत असते. कालगतीप्रमाणे ते होते. तसेच ते थोर थोर सुधारक/व्यक्तींच्या जीवनातील तत्त्वज्ञानानुसारही होते. हे नेहमी दोन्ही प्रक्रियांच्याद्वारा घडते. त्यासाठी त्यांची विभूतिपूजा, नेतृत्वाची पूजा किंवा स्तुती अगर गौरव करीत राहण्याची गरज नसते. विचारांचा परामर्श घेऊन त्यासाठी सतत चर्चा व ऊहापोह करीत राहण्याची निकड मात्र असते. केला जाणारा असा विचारप्रपंच पूर्ण नसतो. तशा भ्रामक समजुतीत राहणे लाभदायक नसते. रा. ना. चव्हाणांची ही धारणा आहे.

अनुक्रमणिका

भारतीय समाज जातिव्यवस्थाबद्ध आहे. त्यामुळे केवळ स्वजातीतील थोरांचा अहंकर बाळगून, गौरवासाठी त्यांचे दैवतीकरण केले जाते. असे दैवतीकरण करण्यातच थोरांचे थोरपण "दडलेले" आहे आणि पहिल्यांदा आपणच ते उलगडून दाखवत आहोत, अशी अहंता चिकित्सक मूल्यमापनाला मूठमाती देते. परामर्श मग शबल बनतो. मूल्यमापनातील झळझळीतपण टिकून राहणे केव्हाही इष्टच. म्हणून एखाद्या संस्थापकाला व नेत्याला सर्वस्वी प्रमाण मानून मूल्यमापनाचा सारीपाट पसरण्यामुळे निष्कर्षाचा दर्शनबिंदू नको त्या जागी स्थिर होतो. असामान्य माणसांचे पायही शेवटी मातीचेच असतात. प्रयत्न करूनच थोर माणसे असामान्य झालेली असतात. म्हणून त्यांना ईश्वरी किंवा दैवी मानण्याचे बिलकूल कारण नाही. सर्वच असामान्य माणसांना देश-काळ-वर्तमानाच्या मर्यादा असतात. म्हणून मागील-पुढीलाचा विचार करून, संदर्भ वेचून, मर्यादांसह सामर्थ्याचा शोध घेण्याची गरज असते, अशी धारणा प्रकट करताना रा. ना. सांगतात :

> *"केवढीही थोर एकच व्यक्ती सर्व काळांना सर्वथा मार्गदर्शन करू शकत नाही. म्हणून असामान्य समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचे विचार, ग्रंथ व कृती (कार्य) तपासले पाहिजे. ही जी प्रक्रिया असते, ती म्हणजे बुद्धिवाद होय."*

अनेक मार्गांनी हा बुद्धिवाद आपल्या परीने आपण जोपासला कसा त्याचे विवेचन रा. नां.नी केले आहे. स्वतःसह इतरांच्या जाणवणाऱ्या थिटेपणाची कठोर समीक्षा करण्याची निर्भय निर्ममता तसेच मतविशेषाभिमानाच्या पलीकडे जाण्याची भूमिका असावी लागते. येरागबाळाला ते जमणारे नाही. रा. नां.ची ही दृष्टी सृष्टी आहे. ती त्यांच्या विवेचनात प्रकट झाली आहे. बुद्धिवादाच्या ह्या लक्षणांबाबत रा. ना. सांगतात :

> *"आत्मपरीक्षणाची, आत्मटीकेची गरज सर्वत्र असतेच. राष्ट्रीय संदर्भात सर्वस्वी इंग्रजाला जबाबदार धरणे आणि सामाजिक-धार्मिक बाबतीत दलितांनी व ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणीधर्म व ब्राह्मण समाज यांना सर्वथा कारण मानणे, ही सर्व प्रथा स्वातंत्र्यात तपासली पाहिजे. यासाठी मी तटस्थ झालो. मी कोणत्याही पक्षाचा नव्हतो व नाही. प्रार्थना समाजात मूर्तीपूजा / विभूतीपूजा, कोणत्याही ग्रंथांचे सर्वप्रामाण्य नसते. ग्रंथ हे मनुष्यकृत मानले जातात. यामुळे बुद्धिवादाची वाट मोकळी होते. हीच तत्त्वे म. फुल्यांच्या पुस्तकांतून शोधान्ती सापडतात. या दृष्टीचा मी जोडप्रचारक बनलो."*

रा. ना. चव्हाण हे इहवादी. त्यादृष्टीने त्यांनी सतत तळमळीने "सत्या"चा "प्रचार" केला.

तसा तो करताना, रा. ना. चव्हाण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या संपर्कात आले. काही वर्षे ते त्यांच्या जीवनात वावरले. त्याचे गडद-गहन संस्कार त्यांच्या मनीमानसी मुरले. विचारदृष्टी-धारणा अशा सर्वच अंगांचा संस्कार होता. त्याचे ऋण रा. नां.नी अखंडपणे सांभाळले, विनम्रपणे जोजावले. रा. नां.च्या ठायीची कृतज्ञता दुर्मिळ म्हटली पाहिजे. स्वतःच्या लेखनावर महर्षी शिंदे यांच्या लेखनाची ध्येयधोरणे आणि छाया कशी पडली आहे ते सांगताना रा. ना. सांगतात :

**अनुक्रमणिका**

*“शाळा-कॉलेजात जे शिकावयास मिळाले नाही, ते गुरुवर्य आण्णासाहेबांच्या जवळ मिळाले. शिंदे मोठे धर्मज्ञ, भाषाशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ होते. तुलनात्मक व समन्वयक अभ्यासाची त्यांची पद्धत माझ्या अल्पकुवतीप्रमाणे वाढवीतच गेलो. ..... शिंदे पोथीबंदवादी किंवा सांप्रदायिक नव्हते. त्यांच्यात पक्षीयता नव्हती. मी त्यांची ध्येयधोरणे शिकलो. महर्षी शिंदे सन १९४४ साली वारले. त्यांचे कार्य यथाशक्ती पुढे चालविणे कर्तव्याचे वाटले. म्हणून काही थोडेफार कार्य करीत आलो आहे.”*

एकदा तर, “तू माझ्यापेक्षा चांगले लिहितोस।” अशी कर्मवीर शिंद्यांनी शाबासकी दिली आणि पुढे जाऊन “तू बहुजनसमाजाच्या बाजूने लिहीत जा।” असा आदेशच दिला, त्याप्रमाणे आपल्याकडून आजवर थोडीफार लोकसेवा घडली असे रा. नां.नी म्हटले आहे. आदेशातील लक्षणा समजावून देताना,

*“येथे बहुजन समाज म्हणजे कोणी एक बहुसंख्य मराठा समाज असा अर्थ नव्हता. विठ्ठल रामजींनी सन १९१७ साली “बहुजन पक्ष” स्थापन केला होता. या पक्षाला त्यांनी वर्गीय तत्त्वज्ञान दिले होते.”*

“शिंदे पोथीबंदवादी किंवा सांप्रदायिक नव्हते. त्यांच्यात पक्षीयता नव्हती.” असे रा. नां.नी अन्वर्थक भाष्य केले असून आपल्या लेखन-विचारात, त्यांनी ते लाजाळूच्या दक्षतेने काटेकोरपणे सांभाळले, त्याला बाधा पोहोचेल असे, हातून काहीही घडू दिले नाही. रा. नां.ची ही अनुकरणीय समन्वयकता लक्षणीय आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा सहवासही प्रबोधनाचे ज्ञान विकसित होण्याच्या कामी उपयुक्त ठरला. या थोरामोठ्यांबरोबरच आध्यात्मिक ग्रंथांची आवड असलेले वडील, मामा बाबुराव रघुनाथराव शिंदे, स्नेही बाळकृष्ण सामक, पां. मा. येवले इत्यादींचे संस्कार व ग्रहण यांनी मनाची घडण बनविली. १९२० नंतरची राष्ट्रीय जागृती, वाईतील सत्यशोधक चळवळीची लाट, अस्पृश्यता निवारण कार्यातील तिची सक्रियता, सत्यशोधक ब्राह्मणेतर परिषदा, सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते, “तेज”कार दिनकरराव जवळकर, बाबुराव यादव, केशवराव बागडे यांची वाई व परिसरातील व्याख्याने ऐकण्याची मिळालेली संधी, म. गांधी आदींची स्वातंत्र्याची राष्ट्रीय चळवळ, वाईच्या द्रविड हायस्कूलमधील हस्तलिखित मासिके चालविण्याच्या परंपरेने जोपासलेली लेखनवृत्ती, प्रार्थना समाजाच्या “सुबोध पत्रिके”तील (व इतर नियतकालिकांतील) मुक्त वाव, संयुक्त महाराष्ट्र चळवळीची तीव्रता अशी अनेकविध घटनाप्रसंगांनी भरलेली ऐतिहासिक पार्श्वभूमीही लेखनाची आवड उत्पन्न होण्यास व वाढविण्यास कारण ठरली. पूरकही अनेक बाबी होत्या. रा. ना. चव्हाण यांनी याची वेळोवेळी नोंद करून ठेवली आहे. ते सांगतात :

*“लेखनाची आवड वाचन, निरीक्षण व चिंतन यांच्यायोगे निर्माण होत असते व संस्कारही जरुरीचे ठरतात.......” क्रमाने मग “शालेय क्रमिक पुस्तकांशिवाय इतर वाचनाची मला आवड निर्माण होऊन पुढील शिक्षणातून व सर्वच जीवनाच्या काळात वर्धमानच होत राहिली.”*

**अनुक्रमणिका**

लेखन-वाचनाच्या आवडीने आपण कसे “वेडे” झालो होतो त्याचे रा. नां.नी तुकाराम, म. फुले यांच्या संदर्भातील एक उदाहरणच पुढे ठेवले आहे. रा. ना. सांगतात :

> *“पुढे तुकारामाची गाथा मी दररोज वाचू लागलो. सन १९३३ साली प्रार्थना समाजाकडे आकृष्ट होण्यास तुकाराम कारण झाला. तत्पूर्वी १९२६-२७ साली वऱ्हाडमधील प्रसिद्ध पुढारी कै. आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील (फुलेचरित्राचे लेखक) आमचे घरी आले होते. त्यांच्याकडून म. फुले चरित्राच्या प्रती वाईतील कार्यकर्त्यांना प्राप्त झाल्या. जोतीराव फुले यांचे हे चरित्र मी वारंवार वाचून उत्तरोत्तर मी त्यांच्याशी तादात्म्य पावलो. तुकाराम महाराजामध्येही सत्यशोधकी विचार व वाग्बाण आहेत याचीही जाणीव होतीच. कै. तात्यासाहेब केळकर यांच्या टिळक-चरित्रातील पहिल्या खंडामधील फुले यांच्यासंबंधीची माहिती वाचण्यात आली आणि सत्यता पडताळण्यास मदत झाली. चौदा-पंधरा वर्षांपासून जो मी “फुले वेडा” झालो, तो कायमचाच! मी आजपर्यन्त म. फुले व सत्यशोधक चळवळ यावर लिहीत आहे, बोलत आहे, आणि यात मला आनंद वाटतो.”*

रा. ना. चव्हाण यांना होणारा हा आनंद इतका असीम आहे की, तो ते :

> *“केव्हा केव्हा वाटते की, म. फुले विद्यमान असताना माझा पूर्वजन्म त्यावेळचा तर नाही ना! मागील जन्मात मी फुले यांच्या जवळचा तरी असावा.”*

अशा भावस्पर्शी शब्दात व्यक्त करतात.

या क्रमाने रा. नां.च्या व्यक्तिमत्त्वाची घडण झाली आणि विचारांची मूस बनली. अखंड असे एक वैचारिक जीवन ते जगले. कुठलाही विषय त्यांनी वर्ज्य मानला नाही. दृष्टी आणि कार्य इहवादी असल्याने सामाजिक किंवा राजकीय विषय कधी वगळले नाहीत. रा. ना. लिहितात :

> *“उत्तरोत्तर सांप्रदायिक प्रचाराच्या बाहेर पडलो... शेतकरी-कामकरी-मजूर या विषयावर पक्षीयतेला ओलांडून लिहिले. बहुजनांच्या हितासाठी लिहिले. सत्तेच्या व निवडणुकीच्या राजकारणात रस नव्हता.”*

त्यामुळे निर्मुक्त मनाने, मनसोक्त लिहिले. चिकित्सक व तटस्थ वृत्तीने लिहिले; निगर्वीपणे लिहिले; अशी रा. नां.ची धारणा आहे. व्यासंग, समतोल आणि मूल्यविवेक हा तर रा. नां.च्या उभ्या लेखनाचा गाभाच राहिला. “बहुजनांच्या हितासाठी लिहिले” असे रा. नां.नी म्हटले आहे. यामधील “बहुजन” म्हणजे “बहुजन समाज” अतएव संख्येने मोठा असा “मराठा समाज” नव्हे. रा. नां.ना असा समाज अभिप्रेत नाही, हे सूर्यप्रकाशाइतके झगझगीत आहे. रा. नां.सारख्या म. फुल्यांच्या सच्च्या सत्यशोधक “दलितमित्रा”ला असा प्रदेश आखडून टाकणारा वाटतो. एवढा संकुचित अर्थ त्यांना मानवणारा नाही. जातधर्मपंथभेदातीत दलित, उपेक्षित, काळंजलेला, वंचित असा “शूद्रातिशूद्र” रा. नां.च्या या विचारकक्षेत सामावतो. त्यादृष्टीने “बहुजनबहुहितवाद” या मंत्राची शिवरात्र रा. ना. जागवू इच्छितात.

अनुक्रमणिका

रा. ना. चव्हाण यांनी गेली जवळजवळ पाच तपे लिहिले, अहोरात्र अक्षरांचे अग्निहोत्र घातले, त्यामागील नितळ भूमिका रा. नां.नी, अहंतेचा एवढाही डौल न मिरविता नेटकेपणाने मांडली आहे. रा. ना. सांगतात :

*“राष्ट्र एकजिनसी होण्यास निरनिराळ्या समाजातील सांस्कृतिक व आर्थिक दऱ्या भरून आल्या पाहिजेत. त्यांच्यात केवळ संघर्ष पेटवून उपयोगी नाही. मागास व अतिमागास जे आहेत त्यांनी व्यक्तिशः आणि समाजशः स्वोन्नती केली पाहिजे. पुढे जे जातात, ते त्यांच्या गुणांमुळेही जातात व पुढे पात्रतेने असतात. ही दृष्टी माझ्यापुढे होती.. …. कोणत्याही चळवळीला व जागृतीला नीट वळण लागावे यासाठी विचारवंतांनी प्रयत्न करणे त्यांचे कर्तव्य आहे. सत्य शोधतो तोच सत्यशोधक. गेली पन्नास वर्षे मी विचारपूर्वक अक्षर व शब्द वापरले. साहित्यिक म्हणवून घ्यावे यासाठी हा प्रवास नव्हता व नाही. पोटासाठी तर मुळीच नव्हता. जनता-जनार्दनाची नम्रपणे यथाशक्ती सेवा करणे हा मूलभूत उद्देश होता.”*

विशेषतः लेखनमार्गे समाजप्रबोधनाच्या ज्योतीत भर घालण्याचे सातत्य ठेवले ते या मूलभूत उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी आणि यथाशक्ती पुढेही ते तसे ठेवावे लागेल असे रा. ना. चव्हाण मानतात. त्याची कारणेही ते तितक्याच तत्परतेने नोंदवितात. रा. नां.ची नोंद अशी आहे :

*“स्वातंत्र्य आल्यावर विकास झाला नाही असे नाही पण व्हावा तितका सार्वजनिक मनोविकास झालेला नाही. उलट मागील प्रबोधन म्लान होत चालली आहेत. भारत पुन्हा मागील शतकात पुच्छप्रगती करण्याची शक्यता वाढली आहे. शिकल्या-सवरलेल्या स्त्री-पुरुषांत देखील अंधश्रद्धा बळावत आहेत. धर्मांधता सर्वत्र वाढत आहे. यातून सुटका कशी होईल ? हा एक, अनेक प्रश्नांपैकी जटिल व बिकट प्रश्न आहे.”*

त्यासाठी मात्र समाजप्रबोधनाचे सातत्य राखावे लागेल अशी रा. नां.ची धारणा आहे, तशी विनंतीही आहे. व्यासंगी संशोधक विचारवंतांच्या, बहुजनांच्या ठायी असलेल्या आस्थेचे हे प्रतिकच म्हणता येईल.

श्री. रा. ना. चव्हाण यांच्या हातून जे काही लेखन घडले ते व्यासंगशीलतेमधून उदयाला आले. त्यांनी ते विचारपूर्वक मांडले/सजविले. पण म्हणून त्यात न्यून नसेलच असे नव्हे. स्वतःच्या संशोधनाच्या मर्यादेपर्यंत ते निखळ असेल, नाही असे नाही, पण त्यापुढेही काही असू शकेल, नसेल असे कसे म्हणावे ? स्वतःच्या सगळ्याच लेखनासंबंधी ते विनम्रपणे प्रार्थना करतात :

*“की, तत्संबंधीची सर्वच्या सर्व विवेचन व विधाने बिनचूक आहेत, असा प्रकार असणे शक्य नाही. म्हणून वाचकांनी मला क्षमा करून त्यांनी स्वतः विचार करावा.”*

मला वाटते, रा. नां.च्या अखंड पारदर्शी विधायक लेखनाचे या “उंची”तच सार्थक आहे.

अनुक्रमणिका

## ॥ प्रस्तावना॥

प्रामुख्याने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये, महाराष्ट्रात विचारवंतांची मांदियाळी दाटून आली, त्यात खेड्यापाड्यांतील विचारवंत मान्यवरांचा सहभाग विशेष स्वरूपाचा दिसतो. ग्रामीण भागातील विवेकवंतांचे हे उभरते पीक, प्रचलित इतिहासकार व समीक्षणकर्ते यांच्या शहरी दृष्टीला अनभिज्ञ असले तरी शेवटी वैचारिक क्षेत्रातला हंगाम, बैसाखीचा महोत्सव साजरा करणार हे नैसर्गिकच. खेड्यापाड्यांतील विवेकवंतांनी मांडलेला बाभळीच्या गाठीसारखा विचार हा, कुणी दखल घेवो वा न घेवो सहजगत्या आपले स्वयंभूषण सिद्ध करणारा आहे. विचारप्रतिपादनाचे हक्कदार आम्ही आणि त्याच्या राबवणुकीचे वारसदारही आम्हीच असे हे स्व-तंत्रपण होते. हे स्व-तंत्रपण जेवढे सत्यनिष्ठ त्याहूनही अधिक खरे हे होते की, हा विचार बव्हंश मराठी प्रदेश, मराठी माती, मराठी मन आणि मऱ्हाटी अस्मिता या साऱ्याच अंगांनी मराठी माणसाचे सर्वांगीण प्रतिनिधित्व करणारा होता. तीन-चतुर्थांश महाराष्ट्राचे हे प्रातिनिधिक रूप होते. समग्र महाराष्ट्राचा साकल्याने विचार करणारे हे दखलपात्र अस्सल गावरान रसायन होते.

आविष्कार : नागरी व नांगरी परंपरेचे

बव्हंश महाराष्ट्राचा विचार करणाऱ्या खेड्यापाड्यांतील या विवेकवंतांना विचारवंत म्हणणे प्रचलित विचारप्रणालीच्या चौकटीत बसणारे नसेलही कदाचित् पण कालमुद्रा 'विचारवंत' या बिरुदावर मोर्तब करून राहते, ते टळणारे नाही. महाराष्ट्राच्या प्रस्थापित परंपरेतील महामना विचारवंतांचा भला-बुरा, चांगला-वाईट, खरा-खोटा असा विचार जरूर झाला पण महाराष्ट्र देशाच्या तो अर्धांगाचा ठरला. अर्धांग + अर्धांग — पाहिल्याचे आणि दुसऱ्याचे — बरोबर पूर्णांग होते हे सप्तपदीत मनीमानसी बिंबविले असले तरी इथे तसे घडले नाही. स्वतःचे अर्धांग आपलेच आणि दुसऱ्याचे अर्धांगही आपलेच; वेगळे नाही, पहिल्यासारखेच दुसरे. ते मिळून होते पूर्णांग. या संकल्पनेमुळे महाराष्ट्रातल्या महानुभव विचारवंतांच्या पूर्णांगात महाराष्ट्रदेशाच्या अर्धांगाचा विचारच झाला नाही. महाराष्ट्रातल्या प्रचलित पठडीतल्या एकाक्ष विचारवंतांना महाराष्ट्रदेशाचा पूर्ण नकाशा कधी दिसलाच नाही. रेघारेघांच्या अक्षांश-रेखांशाची सूक्ष्म जाणीव हा फार दूरचा प्रवास होता. येशेल तेलाच्या तुळतुळीत पृष्ठभागाच्या तवंगावर कोळशाचा भुगा चटकन सगळीकडे पसरतो आणि सारा पृष्ठभाग व्यापून टाकतो ना, तसे महाराष्ट्रप्रदेशातल्या प्रस्थापित विचारवंतांना व्यापक काही बनता आले नाही. साहजिकच प्रचलितांचा काहीसा एकांगी, एकसुरी व एकतर्फी विचार एकमार्गी यातायातीत घुटमळला, विरमला. क्रमाने निर्बीज बनत गेला. प्रभावहीन राहिला. आपल्या कवेत अवघ्यांचे पालकत्व घ्यायला असमर्थ ठरला.

कारणे स्पष्ट होती : पहिले मौलिक कारण हे होते की, शेष एक तृतीयांशाचा विचार म्हणजे आख्ख्याच महाराष्ट्राचा विचार असे मानण्याची चूक घडली होती. क्वचित् समजले-उमजले तरी तिची पुनरार्वृत्तीही होत होती. 'भारत देश खेड्यांचा.' 'ऐंशी टक्के लोक खेड्यांतच राहतात.' 'खेड्यांचा नाश म्हणजे भारताचा विनाश' ही खेड्यापाड्यांच्या भारतदेशाची आस्थापूर्ण भलावण; खेडुतांच्या नावाने अविरत चाललेला हा जयघोष. पण फुकाची भलावण आणि हक्क-अधिकार हुकविणारा निष्क्रिय जयघोष म्हणजे ८०%खेडुत विचाराच्या बाहेर.

अनुक्रमणिका

त्याची कसली गणतीच नव्हती. म्हणजेच परिवर्तनाच्या प्रक्रियेच्या पल्याड. साहजिकच प्रचलित विचारवंतांचा विचार-गोंधळ चौफेर नव्हता. सारांशाने तारतम्याचाही नव्हता. म्हणजे लढाईचे स्वरूप विषम होते. एकदम असमान.

आपण करतो तो विचार अवघ्यांचा, अवघ्या महाराष्ट्राचा असा नागरी परंपरेतल्या विचारवंतांचा डांगोरा असला तरी तो अचूक नव्हता आणि यथार्थ तर नव्हताच नव्हता. तसे म्हणणाऱ्यांच्या नितळ पारदर्शीपणाच्या देखाव्यात आपमतलबीपणाच्या काटेरी वृक्षाचे बीज होते. असा आपमतलबीपणा किंवा आपस्वार्थ कदाचित् अजाणताही असेल पण प्रस्थापित विचारवंतांच्या विचारकक्षेतून ३/४ महाराष्ट्र अस्पर्श्य राहतो, आडमार्गालाच पडतो हे कोडे कशाचे द्योतक ते समजणे बहुतेक अवघडच जाते. स्वार्थाचे पदर चिकटले की नाठाळ गोष्टींची उपज हमखास होतेच. इथे तेच घडले.

आकलनातील अज्ञान किंवा आकलनाची खोट हे तर कालमहिम्याचे अपत्य असेही एक समर्थन, त्यासाठी उपलब्ध असणारच नाही असे नाही. आत्मभानाच्या तीव्रतेत नव्याने भान हरपलेले. जाणीव गळाठलेली, त्यामुळे परात्मभान एकदम अंधुक, फिके झालेले असेही एखादे मत असू शकेल. नांगरी संस्कृतीत सगळेच काही अडाणी, अक्षरशून्य, बे-हिशेबी नव्हते, त्यांच्यातही थोडेफार शहाणे-सुरते होतेच की; पण त्यांचेही आत्मभान परात्मभानाला भिडले नाही हे कसे ? — असाही एखाद्याचा प्रश्न राहील. म्हणजे ८०%च्या ओझ्यात, प्रस्थापित विचारवंतांबरोबर 'अडाण्यां'चाही काही भार असणार असा याचा अर्थ. मत-मतान्तरे, डावी-उजवी असे सगळे गृहित धरूनही शेवटी ८०% चे ओझे कुणाच्या खांद्यावर हा प्रश्न उरतोच. तो महत्त्वाचा आहे. कारणे व परिस्थिती कोणतीही असो, इतिहासाच्या अंगोपांगांना डावी घालून पुढे सटकणारा इतिहास, तराजूची डावी मारून मापात गुंडाळणाऱ्या देशविन्मुख व्यापाऱ्याच्या नीतीसारखा असतो. खरे पाहता सत्य, तत्त्व, निष्ठा आणि त्यानुसार लेखन या तथ्यांचा इतिहास भोक्ता असतो. महाराष्ट्रातल्या तथाकथित इतिहासकार विचारवंतांनी इतिहासाच्या ह्या अगदी साध्या प्राथमिक तत्त्वसूत्राची एवढीही बूज राखली असे दिसत नाही. त्यामुळे भूमीत नांगराचा फाळ रोवून उभा असलेला नांगरी आणि ज्ञानेश्वर माऊलीच्या पसायदानात गुंतलेला नागरी असे दोन्ही प्रवाह रेल्वेच्या समान्तर रूळासारखे जिथल्या तिथे स्थिर; दक्ष स्थितीत जैसे थे राहिले, 'या हृदयिचे त्या हृदयि घातलें' असे कधी घडले नाही.

मात्र जसजसे जागरण घडत गेले तसतसे, अगदी क्रमशः नसले तरी टप्प्याटप्प्याने नांगरी परंपरेने स्वतःचा कृतिनिष्ठ विचार ठामपणे मांडला. दाखवेगिरीचे लावण्य त्यात निश्चितच नाही पण परिवर्तनाचा वसा आहे. त्यात काहीसा रावसपणा, खरेखरेपणा आणि किंचित्सा धसमुसळेपणा जरूर आहे. मऱ्हाटी मातीचे व्यक्तित्व आणि त्यातून फुललेले कर्तृत्व यामधून साकार झालेली गुणसंपदा त्यात निश्चितच आहे असे म्हणण्यातही वावगे काही नाही. कारण सहज जरी म. फुले-भालेकर -दिनकरराव जवळकर — पालेकर - मुकुंदराव पाटील - वि. रा. शिंदे - राजर्षी शाहू महाराज - डॉ. बाबासाहेब आंबेडकर - श्रीमंत सयाजीराव महाराज - कर्मवीर भाऊराव पाटील - भाई माधवराव बागल - प्रबोधनकार ठाकरे - 'जागरूक'कार वालचंद कोठारी - डॉ. पंजाबराव देशमुख - जगदाळे मामा - कर्मवीर घोगले - पंढरीनाथ पाटील अशा नांगरी परंपरेतल्या वैभवाकडे दृष्टीक्षेप टाकला तरी इतिहास कोणत्या वाटेच्या वळणावर होता ते कळते. सूक्ष्म दृष्टीला हे कळण्यास अडचण नाही. मात्र तशी दृष्टी अजूनही बहुजनांनी, ज्ञानाच्या आसक्तीने किंवा ओढीने

अनुक्रमणिका

अंगिकारली आहे असे आढळत नाही. ग्रामीण पार्श्वभूमीचा अभाव, जनसाधारणांच्या सेवाव्रतासंबंधी अनास्था हे एकीकडे आणि ज्ञानाच्या आसक्तीची वानवा हे दुसरीकडे- त्यामुळे नागरी व नांगरी परंपरेमध्ये निकटता कधी जुळून आली नाही. समन्वय, साहचर्य, सामंजस्य आणि आमोरे-सामोरे बसून शहाणासुरता विचार कधी झाला नाही. त्यामुळे सारव भरली गेली ती इतिहासाच्या पिछाहाटीची, पराभवाची. यात वैयक्तिक पराभव किंवा पिछेहाट नगण्य; म्हणून जाणवणारी नसेलही पण वैचारिक वाङ्मयाच्या समृद्धीच्या व सखोल विकासगतीच्या अंगाने आणि रचनात्मक परिवर्तनाच्या बाजुने आधुनिक महाराष्ट्राचे कल्पनेपलिकडचे नुकसान झाले हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रकाशाच्या वाटा लवकर उजळल्या नाहीत. कळत-नकळत कसेही असो, नागरी परंपरेतील हेकट अहंता व आपस्वार्थीपणा यामुळे महाराष्ट्रातील बहुजनांसाठी एक मध्ययुग निर्माण झाले. पुढे ते टिकेल कसे ते पाहिले गेले; पोसलेही गेले. पुढे जाऊन चुकीची दुरुस्ती करण्याच्या उपद्व्यापात 'तेज'कार दिनकरराव जवळकरांसारख्या मर्दानी योद्ध्याच्या कार्यकर्तृत्वापेक्षा, त्यांच्या अंगा-खांद्यावरील इंटिमेंट सेंट अधिक दरवरळला कसा किंवा परंपरागत वर्णाश्रमधर्मी प्रतिपादनाचा शिरच्छेद करण्यापेक्षा फुले-भालेकर यांच्यामध्ये क्षुद्र स्वरूपाचे व्यक्तिगत कलहच मोठे कसे होते त्याची 'शुद्धिपत्रके'च अधिक जोडण्यात आली. ओंजळीच्या बोटातून मऊसूदपणे वाळू निसटत रहावी, शीतळ स्पर्शसुखाने थोडे बरे-बरे वाटावे तसे घडले. उभारून येणाऱ्या चित्तचक्षूचमत्कारिक ज्ञानाच्या प्रवाहात काय निसटले ते कळणेही मग अवघड झाले. महाराष्ट्राचा बहुजन समाजीय असा हा मध्ययुगीन नकाशा सहजपणे कुणालाही न्याहाळता यावा असा आहे.

त्यामुळे बव्हंश कालपरवापर्यंत सर्वच कालपरिस्थितीत नागरी पंडितांच्या चालीवर बहुजनांची पावले राहिली. मात्र बहुजनांची ही कृती, बव्हंश मातीच्या घोड्यावर बसून नदी ओलांडण्याच्या साहसासारखी होती. उभयपक्षीच संशयाऐवजी विश्वासाचा, द्वेषाऐवजी समझोत्याचा आणि पूर्वग्रहाऐवजी न्याय वागणुकीचा मार्ग चोखाळला असता तर पुढील काळात ब्राह्मणेतर चळवळीतील विखाराचे तेज मंदावले असते आणि आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण कितीतरी सुबक व सुंदर झाली असती! लांब लांब पसरत जाणाऱ्या उत्थानाच्या सावल्या माथ्यातळी आल्या असत्या आणि पायतळीचा अंगार तेवढा पेटला नसता! आधुनिक महाराष्ट्रावरील भले-बुरे ठसे गडद-फिकट होत गेले असते; कदाचित् भोग चुकलेही असते. पण एकूणच परिस्थिती अशी की तसे फार कमी, फार अल्प घडले.

रा. ना. चव्हाण : सत्यशोधक विचारवंत

सर्वसाधारणपणे या पार्श्वभूमीवर, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आलेल्या नांगरी परंपरेतील विवेकशील सत्यशोधकांच्या सत्त्वशील पिढीतील रा. ना. चव्हाण हे एक अग्रणी बहुजनसमाजीय होत. रूढ अर्थाने त्यांना ब्राह्मणेतर म्हणता येईल. जवळजवळ अखंड ५० वर्षे, रा. ना. चव्हाण यांनी बहुजन समाजाच्या (पारंपरिकदृष्ट्या ब्राह्मणेतर समाजाच्या) गुणदोषांची चिंतनशील मीमांसा, समतोल निग्रहाने केली.

दोन कारणांसाठी ती महत्त्वाची आहे :

अनुक्रमणिका

(१) बहुजन समाजात विद्याभ्यासाची अनास्था असल्याने अज्ञान-विषमता-दारिद्र्याचे जौळ माजले होते. अज्ञानाचे दशावतारी लळित, भूतबाधेने पछाडलेल्या झाडागत, बहुजनाभोवती फेर धरून घुमत होते. सतत चार तपे, रा. नां.नी बहुजनांच्या मनाची वैचारिक मशागत केली. अगदी निरलस, निगर्वी आणि ठाम वृत्तीने. ती कितपत फलीभूत झाली हा चर्चेचा अलग मुद्दा ठरतो.

(२) या लोकजागरणामध्ये, रा. नां.ना प्रामुख्याने बहुजनातील अविद्येचा आणि त्याअनुषंगाने मनीमानसी खिळलेल्या मुडदुसी स्वस्थतेचा जसा पहिला अडसर होता तसाच क्रमेकरून, ते सरकारी नोकरीत होते; हाही अडचणीचा भाग होता. निर्भय मुक्तपणे लिहिण्याच्या संदर्भात, अनेक अंगांनी डाचणारा हा अडसर कमी महत्त्वाचा नव्हे! काळा-गोऱ्यांच्या चाकरीतील सरकारी नियमांचा जाच, जाणवू नये अशा खुबीने तो व्यवहारात आणताना आडवे-तिडवे पिळे घालून माणसालाच मुरडून टाकण्याची वृत्ती, कागदावर टिपलेल्या आणि तशाच सोडलेल्या दोन ओळींमधून अदृश्य अर्थ-अनर्थ काढून तापद्रा देणारा व्यवहार, बव्हंश वाकुड्या कृतींना सुकृतीचे महाराणीपद बहाल करू पाहणारी अनैतिकता-सरकारी नोकरीतील पाटबंधाऱ्यांच्या या योजना म्हणजे संवेदनशीलतेचा चेंदामेंदा. सर्जनशीलतेला अखेरचा सलाम. मनाच्या भूमीत, भावनेच्या कुंजात किंवा बुद्धीच्या संपुटात काही रुजायला टाकायचे, काही उगवायला घालायचे तर ही परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल. निर्मितीचे मैलाचे दगड त्यामुळे मागे न पडणारे. रा. नां.ची अशी अवघड घाटाची बिकट वळणाची वाट. त्यात विद्याभ्यासाची ओढ, आस्था, अभ्यास यांची भलीमोठी वानवा असलेल्या बहुजन समाजात रा. नां.चा जन्म. म्हणजे जन्मासह शिक्षण, संस्कार, परिस्थिती-परिसर, वावर असे सर्व काही तिथलेच. उलट्या अर्थाने बहुजनांना लाभलेली ही तिरकट कवचकुंडले रा. नां.नी फोडून-तोडून टाकली. स्वतःच्या प्रयत्नातून आणि आदर्शातून पुढीलांसाठी पाऊलवाटा चोखाळल्या. त्याचे हमरस्ते व्हावेत अशी धडपड केली. भरदार पदराच्या आडोशाने, वाऱ्याच्या एवढ्याशा झुळुकीनेही विझू-मिटू न देता लामणदिवा तडीला लावावा तशा हळूवार सतर्कतेने रा. नां.नी वैचारिकतेचा लामणदिवा तेवता ठेवला. खेड्यापाड्यांतल्या दूरवरच्या विराण माळावरल्या देवळात तेवणाऱ्या तेलवातीसारखा. सात्त्विक नंदादीपासारखा. लामणदिवा, देवळीतली तेलवात आणि नंदादीप ही रा. नां.च्या विचारसृष्टीची प्रतिके म्हणता येतील.

रा. ना. चव्हाण यांच्या सभोवतालची परिस्थिती जन्मानेच मुळी संवेदनशीलतेचे/सर्जनशीलतेचे बिसतंतू कुस्करून टाकणारी होती. तरीही संस्कार आणि सहवास हे, माणसाच्या जीवनाचे सोने करणारे मूल्याधार आहेत, याचे साभिप्राय प्रात्यक्षिक खुद्द रा. ना. चव्हाण हेच आहेत. त्यामुळेच तर त्यांनी संवेदना जागृत ठेवून सगळे लेखन केले. त्यासाठी गांभीर्याने वाचले. मनन-चिंतन केले. चर्चा-विमर्शाची अग्निहोत्रे घातली. पराकोटीची वैचारिक सहिष्णुता ठेवली. सतत समन्वयाच्याच दृष्टीने सुकाणू वळविले. मुळातून सर्व ढवळून, तळागाळातील एकदम उफाळून पृष्ठभागावर आले तरच काहीतरी घडण्याची शक्यता असते. सुदैवेकरून कर्मवीर विठ्ठल रामजी उर्फ अण्णासाहेब शिंदे यांच्या तत्त्वाधिष्ठित बहुसमन्वयी परंपरेचा बहुपेडी वारसा रा. नां.ना लाभला. महर्षी शिंद्यांच्या कृतिशील शिष्यत्वात, प्रकांड पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सहवासाचा प्रेरक गंध मिसळला. साहजिकच विद्याभ्यासाची सतत ओढ, बहुजन समाजीय सामाजिक-सांस्कृतिक चळवळींचा बारकाईचा अभ्यास, मूलगामी संशोधनातील कमालीचा साक्षेप व काटेकोर शिस्त, संदर्भ-सूचीमधील पारदर्शी नेटकेपणा, तर्कशुद्ध रचनात्मक दृष्टीकोन, ताल व तोल जराही ढळू न देणारा समतोल विचार आणि कवड्या सायीसारखा परमतसहिष्णुतेचा आचार अशा कितीतरी गुणांनी रा. नां.चे

अनुक्रमणिका

वैचारिक लेखन मंडित झाले, सजले. खरे तर, रा. नां.मधील अंगभूत गुणच मुळी मंडनाचे होते. कर्मवीर शिंदे-तर्कतीर्थ जोशी यांच्या लेखनातील बदलत्या भूमिकेतल्या विसंगती/त्रुटी, तळ दाखविणाऱ्या डोहाच्या शांत निळाईने अगदी मितव्ययी शैलीत रा. नां.नी दाखविल्या. त्यामागील मर्मसूत्र रा. नां.चा प्रबोध व प्रतीतिदर्शक हा लेखनविवेकच होय. चौफेर लेखन आणि चौफेर प्रसिद्धी; मात्र भूमिका, तारतम्य आणि सारांश हे त्रिगुणायत रसायन अव्वल दर्जाचे. हा परिपाक हा, रा. नां.च्या एकूणच लेखनाचा ऐवज. सर्वस्पर्शी लेखनविवेक हे रा. नां.चे शक्तिस्थळ आहे. लहानमोठे कोणतेही वृत्तपत्र वा नियत्कालिक असो, धन/पत/प्रतिष्ठा याचे एवढेही अवडंबर न माजविता रा. नां.नी सतत लेखन केले. शब्दयज्ञाचा हा पेटता स्थंडिल, विचार व आचार यात कसलेही द्वैत येऊ न देता, रा. नां.नी धगधगता ठेवला. सत्संग आणि व्यासंग या बलस्थानांवर रा. नां.ची अतूट श्रद्धा. शुद्ध स्फटिकवत् चारित्र्य, आरस्पानी निर्मळ मन व उभारणीचीच मनःप्रवृत्ती ही रा. नां.ची गतिचक्रे; तर एखाद्या प्रश्नाचा ध्यास घेतला की बारीक बारीक पिंजण करून त्याचा साकल्याने विचार हे रा. नां.चे विचारवैभव होते. या विचारात, वाचकाचे विस्तृत परिक्षेत्र आणि त्या परिक्षेत्रातील स्वतःचे सर्वोपरी समाधान करणारे परिप्रेक्ष्य सर्वांगाने अंतर्भूत होते. संदर्भ/आठवणी/अनुभव/संस्मरणे/
पत्रव्यवहार/आप्तवाक्य/संभाव्यता-क्रांतदर्शी दृष्टीला दिसणारे नवे जग/वैयक्तिक संबंधांतील विश्वासाचे हितगुज अशी सगळ्या थरांतली माया हा रा. नां.च्या लेखनाचा माहिती-कोश होता. त्यात नुसता शब्दार्थ नव्हता तर अन्वय-अर्थासह भाष्यही होते. कारण 'बहुजनबहुहिताय' ही लेखनामागची एकमेव प्रेरणा होती. निरखून-पारखून घेणे आणि निवडले ते कितीही अवघड असले तरी सर्वसामान्यांच्या आकलनाच्या कक्षेत आणून सोडणे या लेखनप्रक्रियेवर रा. नां.चा भर होता. त्यामुळे, अनुकूल-प्रतिकूल अशा कोणत्याही अंगाने, जे जे विचार योग्य किंवा समीक्षाक्षम त्याचा तळ शोधण्याकडे कल हे रा. नां.च्या लेखनाचे ध्रुपद आहे.

साहजिकच ज्या ज्या संदर्भात आपल्यास विचार करणे आवश्यक व उचित वाटते त्या सर्व परंपरांचा मूलगामी विचार रा. ना. चव्हाण यांनी केला. आणि बहुजन समाजात समशीतोष्ण सहिष्णू प्रकृतीचा एक मोठ्ठा पण उपेक्षित विचारवंत/समीक्षक उदयास आला. अर्थात् विचारवंत मोठ्ठा असला तरी बहुजन समाजाच्या पटकुरात त्याचा जन्म हा, त्याच्यादृष्टीने काहीसा शाप ठरला. रा. नां.च्या लेखन-संपदेची-संशोधन कार्याची-तशी चहा झाली नाही. तथाकथित रहस्योद्ग्राही संशोधन करणाऱ्यांचे मान-पान, पत-प्रतिष्ठा, समित्या-मंडळे, पुरस्कार आणि धनराशी देऊन गौरव खूप झाले. मात्र रा. नां.चे गावठी कवठ इष्ट स्थळी पोहोचलेच नाही. आवर्जून कुणी तशी तसदीही घेतली नाही. स्वकिय/आप्त यांच्याकडूनच रा. नां.ची उपेक्षा झाली. रा. नां.ना त्याची खंत होती. विचारांच्या हेळसांडीबद्दल अधिकच खंत होती.

स्वाभाविकपणेच 'दलितमित्र' रा. ना. चव्हाण म्हणजे स्फुट काहीतरी लिहिणारे एक वृत्तपत्रीय लेखक अशीच सर्वत्र धारणा बाळगण्यात आली. असा स्फुट पत्रलेखक ना पक्षकार असतो, ना साहित्यिक. विचारवंत ही तर खूपच दूरची गोष्ट. रा. ना. वाचकांच्या पत्रव्यवहारात सतत पत्रे लिहीत. पुण्याच्या दैनिक 'सकाळ'मधील 'वाचकांचा पत्रव्यवहार' हा त्यांचा खास एक्का असावा असे दिसते. नगण्य वाटणाऱ्या बारीक बारीक विषयांवर त्यांची पत्रे/टिपणे असत. छोटे छोटे तसेच मोठे मोठे लेखही लिहीत. कार्डावरची बारीक अक्षरातली वैयक्तिक पत्रे तर भरगच्च मजकुराने खचून भरलेली असत. त्यास एखाद-दुसऱ्या विषयावरच्या टिपणाचेच स्वरूप असे. त्यातून विषय वेचून काढले जात आणि प्रश्न/अडचण/समस्या इ.च्या सोडवणुकीची त्यात समन्वय दृष्टी असे, सूचना व भविष्यकालीन इशारेवजा भाष्य असे. अवघड, शब्दबंबाळ असे त्यात

अनुक्रमणिका

काहीही नसे. सारे अवघड सोपे करून सांगितलेले असे. वैयक्तिक पूर्वग्रहांच्या कोळिष्टकांनी मथलेल्या दूषित दृष्टीचा त्यास स्पर्शही नसे. त्यात वैचारिक चर्चेसाठी लागणारे गांभीर्य, विचाराला दिशा व वळण देण्याचे सामर्थ्य मात्र प्रचंड होते. सामाजिक नीतिमत्तेचा आग्रह आणि आवेग हाही या लेखनसंपदेचा मूलाधार राहिला. तरीही बुद्धिनिष्ठ महाराष्ट्रातील विचारवतांच्या दृष्टीने रा. ना. चव्हाण हे स्फुट लेखन करणारे पत्रलेखकच होते. विचारवंत या बिरुदावलीच्या मक्तेदारीच्या किल्ल्या कडोसरीला लावून मिरविणाऱ्यांना सामुराईचा आदर्श अमान्य होता. खरे तर, रा. ना. चव्हाणांच्या सारखे लोकहितदक्ष विचारवंत जे जे काही लिहितात ते लोकांच्या आणि केवळ लोकांच्या कल्याणाच्या विचारानेच, त्यापलीकडे त्यांचा मुळी कसला अट्टाहासच नसतो. या भावनेचे रा. ना. हे सच्चे पाईक होते. कुणाची काही मते असतील, असणार; मात्र कालनिर्णयाचा निर्वाळा विचारवंताचा राहिला हे रा. ना. चव्हाण यांच्या गुणवत्तेने त्यांना प्रदान केलेले प्रमाणपत्र होय.

रा. ना. चव्हाण हे तन-मनाने कर्मवीर वि. रा. शिंदे यांचा वारसा जपणारे व जोपासणारे, खास मऱ्हाटी बाण्याचे अग्रणी विचारवंत आहेत. वृत्तीत प्रेमळ, वागण्यात नम्र, लेखनात समतोल रा. ना.; दुसऱ्याचे भरपूर ऐकून घेत. त्यानंतर फार कमी, अगदी मोजके असे बोलत. बोलत तेही मार्मिक. वर्म अधोरेखित करून मर्म जोखणारे. जसे बोलण्यात-संभाषणात मितव्ययी तसेच लेखनात-प्रतिपादनातही अवतरत. अंतर किंवा भेद कुठेही नव्हता. विचारप्रतिपादनात किंवा मताच्या उद्‌घाटनात असा कुठेही. वस्तुच्या मूळ गाभ्याला जराही धक्का न लागेल अशा बेताने, समन्वयासाठी शक्य तेवढेच रा. ना. मागे सरकत पण मूळ मुद्दा घट्टच असे. जास्तीत जास्त फांद्या छाटल्या तरी मूळ बुंध्याला धक्का लागणार नाही याचीही रा. ना. चव्हाण काटेकोर दक्षता घेत. नितळ प्रामाणिक वृत्ती आणि पारदर्शी प्रसन्नता याद्वारा बहुजन समाजाच्या मध्ययुगीन मानसिकतेचे परिवर्तन करण्याचा रा. ना. चव्हाणांचा ध्यास होता, व्रत होते. काही विशिष्ट सूत्रे डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी हा वसा घेतल्याचे दिसते. ही सूत्रे अशी :

(१) जातिधर्माधिष्ठित भारतासारख्या खंडप्राय देशात जातपातधर्म, गल्ली-बोळ-मोहल्ला ही प्रसंगी आश्रयाला घेऊन साहाय्यभूत ठरावीत असा प्रयत्न होतो हे खरेच पण सर्वस्वी तीच वाट खरी नव्हे. ज्ञानाची आसक्ती, ओढ, ग्रहणाची इच्छा, क्षमता आणि उपयोजनाची दृष्टी ही खरी मुक्तीची वाट. शाश्वत वाट. त्यासाठी झट्या घ्यावा लागतात. करिता ज्ञानाच्या सर्व अंगो-पांगांना भिडण्याची ऊर्जा बहुजन समाजाच्या अंगा-मनात सणाणत उसळली पाहिजे. क्षितिजे मग आपोआप फाकतात. या अभावी मात्र मुक्ती आडवाटेला लागण्याची शक्यता अधिक. म्हणून जीवाच्या आकांताने त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक. खूपच निकडीचे. ह्या कालनिर्णयावरच बहुजनभवितव्य निर्भर आहे. हे फुले-सूत्र रा. नां.नी पक्केपणाने जाणले. या जाणतेपणात रा. नां.ची प्रबोधक कृतिशीलता आहे.

(२) त्यासाठी सर्वसामान्य माणसांना वाव देणाऱ्या, त्याचा वावर असणाऱ्या विविध स्वरूपी लोकसंस्था, मोठ्या प्रमाणात संस्थापित करणे, त्यांना आकार देणे, आहेत त्या टिकविणे व वाढविणे, मरू घातलेल्या/मरगळलेल्या संस्था उर्जितावस्थेत कशा येतील ते पाहणे या प्रक्रियेकडे रा. नां.चा कटाक्ष आहे. लोकाधारित लोकनिष्ठ संस्थांच्या वाढीदीढीत लोकचळवळी असतात आणि लोकशाहीला त्या समृद्धीचे खतपाणी घालतात. म्हणून शहाण्या-सुरत्यांनी निगुतीने त्याची जोपासणे करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. स्वातंत्र्याची चळवळ लोकसंस्थांच्या अशाच सक्रिय सहभागातून वाढली, यशस्वी झाली आणि लोकशाहीही

त्यामुळेच टिकणार/वाढणार असल्याने, 'श्रीशाय जनतात्मने' असे सारे लेखन/भाषण/संभाषण सामान्य जणांना समजेल-उमजेल अशा रीती-भातीत हवे. रा. ना. चव्हाण यांचे लेखन इतके सरळसोपे का आणि रा. ना. 'वाचकांचा पत्रव्यवहार'/'पाचामुखी'/'लोकमानस'/'बहुतांची अंतरे' यासारख्या सामान्यांच्या सदरात इतके विपुल का लिहीत असत, त्याचे रहस्य लोकमानसाच्या या उद्घाटनात आहे. रा. नां.सारखा विचारवंत 'स्फुटा'मागे लागला; ते काहीतरी 'धन' निर्माण करण्यासाठी हे लक्षात हवे. म्हणजे रा. नां.चे गणगोत हे केवळ बहुजनाशीच निगडित नाही तर ते त्याला वेढून असणाऱ्या लोकशाही जीवनदृष्टीशी संदर्भित आहे. रा. ना. चव्हाणांचा हा साकल्याचा प्रदेश आहे.

'श्रीशाय जनतात्मने' : बुद्धिवाद, प्रबोधन आणि परिवर्तन

गेली पाच तपे रा. ना. चव्हाणांचा हात लिहिता होता. 'राष्ट्रवीर', 'नवभारत', 'युगकर्ता', 'अस्मितादर्श', 'समाजप्रबोधनपत्रिका', 'समस्या', 'पुरोगामी सत्यशोधक', 'मराठा जागृती', आणि विशेषेकरून प्रार्थना समाजाची 'सुबोध पत्रिका' अशी हरेक नियतकालिके व लहान-सहान-थोर वृत्तपत्रे यांमधून रा. ना. चव्हाणांचा अक्षरयज्ञ चालू होता. सातत्याने व अव्याहतपणे. शेवटच्या क्षणापर्यंत (१० एप्रिल, १९९३) त्यास खळ म्हणून कसला नव्हता. 'सुलभ संस्कार विधी' (१९४६), 'सत्यशोधक जोतीराव फुले' (१९५२), 'सार्वजनिक सत्यधर्मसार' (१९७४), 'महर्षी शिंदे यांच्या काही आठवणी' (१९७५), 'कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी' (१९८६), ही रा. ना. चव्हाणांची स्वतंत्र वाङ्मयसंपदा. जोडीला 'रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय' (प्रा. मो. नि. ठोके) व श्री. रा. ना. चव्हाण : विचार दर्शन (श्री. शरच्चंद्र चव्हाण) ही संपादित पुस्तके. पैकी प्रा. ठोके संपादित 'रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय' हा 'निवडक' म्हणण्यापेक्षा रा. नां.च्या वाङ्मयाचा बृहद्ग्रंथच म्हटला पाहिजे. (पृ. ६०४ + ५९) त्यामधील विषयांची विविधता विलक्षण वेधक आहे. त्याचा आवाका आणि विस्तार चकित करणारा आहे.

*'ओळख'मध्ये रा. नां.च्या चिंतनाच्या कक्षेत येणाऱ्या विषयांसंबंधी म्हटले आहे :*

*"महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी, प्रबोधनाच्या दिशा, म. जोतीबा फुळे/राजर्षी शाहू, कर्मवीर वि. रा. शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव. त्यांचे विचार, उपक्रम, कार्य व परिणाम हे त्यांच्या चिंतनाचे विशेष विषय दिसतात. मात्र त्यावेगळ्या व्यक्ती/विचार या कार्य त्यांना वर्ज्य नाही. त्यांचाही परामर्श ते तितक्याच आस्थेवाईकपणाने घेताना आढळतात. त्यातली मनस्वी उदार दृष्टी व मनमोकळेपणा लोभावून टाकतो. त्यानुषंगाने महाराष्ट्रातील एकोणिसावे शतक, आधुनिक समाजक्रांतीचे जनक, धर्मांतराची समस्या, सत्यशोधक समाज, दलित समाज, त्यांचे प्रश्न, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, त्यामधल्या जागृतीचे स्वरूप, लोकशाहीचे आधार, भारतीय संविधानाचा गाभा, मराठा नेतृत्व, शे. का. पक्ष, आर. एस्. एस्., दलित चळवळ व साहित्य अशा विविध विषयांवर रा. नां.चे चिंतन आहे. त्यांनी ते नेहमीच संयत शैलीत मांडले आहे. विनोबांनी म्हटल्याप्रमाणे एतद्विषयक रा. नां.च्या अनाग्रहातही आग्रह आहे. महाराष्ट्रातील छोटी-मोठी वृत्तपत्रे/नियतकालिके चर्चासत्रे/परिसंवाद यांमधून त्यांनी लिहिलेल्या/वाचलेल्या अशा लेखांची/निबंधांची संख्या किमान १००० च्या घरात जाईल. 'वाचकांचा पत्रव्यवहार' मधील पत्रे आणि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' (सीताराम रायकर), केशवराव जेधे (य. दि. फडके), 'नॉनब्रह्मि मुव्हमेंट इन् सदर्न इंडिया' (डॉ. के.*

अनुक्रमणिका

*के. कावलेकर) किंवा 'अग्निफुले : सावित्रीबाई फुले यांची कविता' यासारख्या मान्यवरांच्या मौलिक ग्रंथांची तितकीच व्यासंगपूर्ण परीक्षणे अशी संपत्ती, गणतीसाठी वेगळीच धरावी लागते. यासंबंधात मोजदाद करायचा प्रयत्न केला तेव्हा खुद्द रा. नां.नीच 'असा काही मेळ जमविणे कठीण आहे.' अशा स्वाभाविक नम्रतेने असमर्थता प्रकट केली." (पृ. १०). रा. नां.चा हा सर्वस्पर्शी प्रांजळपणा त्यांच्या उभ्या लेखनाची सधनता वर्धिष्णु करतो.*

एवढा अवाढव्य खटाटोप रा. ना. चव्हाण यांनी उभा केला तो बहुजनांच्या प्रबोधनासाठी. त्यांच्या परिवर्तनासाठी. त्यातून (भारतीय समाजव्यवस्था थोडी बाजुला ठेवली तरी) मराठी समाजव्यवस्था 'मानवी' करण्यासाठी. चातुर्वण्यावर अधिष्ठित, जातिबद्ध श्रेणीत चहूअंगांनी जखडलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशातील विकासगती अतिशय मंद असते, धिमी असते. 'लोकांचे मित्र काय ते आपणच. आपल्यासारखे हितकर्ते दुसरे कुणीच नाही.' असा बेमालूम अभिनय वठविणारे लोकशत्रू, झोपेतही कुणाला चाहूल लागू नये अशा चतुराईने परिवर्तनाची प्रगती रोखण्यासाठी स्वतःजवळील अनेकविध आयुधांचा खुबीने वापर करतात. ज्याचा केवळ प्रगतीसाठीच वापर व्हावा, त्यासाठीच ज्यांचा जन्म अशा आयुधांचा खुबीने वापर करण्याचे लोकशाही शासनप्रणालीतील हितसंबंधियांनी इथे विकसित केलेले 'शास्त्र' ही तर येथील तंत्रमंत्रज्ञानाची परमावधी म्हटली पाहिजे. सरकारचे अगर इतर कुणाचेही असोत, हितसंबंधी मडळी सारे प्रयत्न-उपक्रम फोल ठरविण्याचे महत्कार्य लोकशाहीच्या पडद्याआडूनच साधत असतात. साहजिकच लोकशाहीतील परंपरावादी समाजात परिवर्तन गोगलगायीच्या गतीने घडावे ही स्वाभाविक क्रिया बनते. आकांक्षा उंचावलेल्या आणि महत्त्वाकांक्षा फुललेल्या समाजाच्या मनात याबद्दल ऐष असतो. पण कालगतीने होणारे परिवर्तन आणि समाजक्रांतिकारकांच्या जीवन-तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर आधारित परिवर्तन याकडे पाहणे-विरोध करणे-सहभागी होणे याखेरीज निःशस्त्र लोकांच्या हाती दुसरे असते तरी काय? मात्र परिवर्तनासाठी-बदलासाठी दृढ, ठोक् आणि पक्की विचारप्रणाली, भूतकाळाची गादी न्याहाळत, वर्तमानाच्या अश्वावर आरूढ होत, भविष्याच्या अभिषेकासाठी सदैव सज्ज असावी लागते. हे ज्याला कळते-उमजते त्याला परिवर्तन केव्हा होईल? आता होईल की मग?-असे प्रश्न पडत नाहीत. कालगतीवर विसंबले तर आपततः घडणाऱ्या परिवर्तनाचा भरवसा देणे केवळ अशक्य; हा प्रश्नही तातडीने निकालात जातो. म्हणून रा. ना. चव्हाण हे अंगी जळमटे चढेपर्यंत बसून राहत नाहीत तर आवश्यक अशा तत्त्वज्ञानाची बांधणी करण्यास प्रवृत्त होतात. ते मुळातच इहवादी असल्याने सतत तळमळीने 'सत्य'चा 'प्रचार' करतात. सातत्याने विचारप्रपंच करतात निर्धारपूर्वक निश्चयाने.

या विचारप्रपंचामागील दृष्टी, भूमिका आणि व्याप-एकूणच बुद्धिवाद - रा. ना. चव्हाण प्रकट करतात तो असा :

*"त्यासाठी विभूतिपूजा, नेतृत्वाची पूजा किंवा स्तुती अगर गौरव करीत राहण्याची गरज नसते. विचारांचा परामर्श घेऊन त्यासाठी सतत चर्चा व ऊहापोह करीत राहण्याची निकड मात्र असते. केला जाणारा असा विचारप्रपंच पूर्ण नसतो. तशा भ्रामक समजुतीत राहणे लाभदायक नसते."*

भारतीय समाज जातिव्यवस्थाबद्ध असल्याने केवळ स्वजातीतील थोरांचाच अहंकार बाळगून, गौरवासाठी त्यांचे दैवतीकरण केले जाते. असे दैवतीकरण करण्यातच थोरांचे थोरपण 'दडलेले' आहे आणि पहिल्यांदा आपणच ते उलगडून दाखवत आहोत अशी अर्हता चिकित्सक मूल्यमापनाला मूठमाती देते. परामर्श

अनुक्रमणिका

मग शबल बनतो. मूल्यमापनातील झळझळीतपण टिकून राहणे केव्हाही इष्टच. म्हणून एखाद्या संस्थापकाला व नेत्याला सर्वस्वी प्रमाण मानून मूल्यमापनाचा सारीपाट पसरण्यामुळे निष्कर्षाचा दर्शनबिंदू नको त्या जागी स्थिर होतो. असामान्य माणसांचे पायही शेवटी मातीचेच असतात. प्रयत्न करूनच थोर माणसे असामान्य झालेली असतात. म्हणून त्यांना ईश्वरी किंवा दैवी मानण्याचे बिलकूल कारण नाही. सर्वच असामान्य माणसांना देश-काळ-वर्तमानाच्या मर्यादा असतात. म्हणून मागील-पुढीलाचा विचार करून, संदर्भ वेचून, मर्यादांसह सामर्थ्याचा शोध घेण्याची गरज असते. ह्या बुद्धिवादी प्रक्रियेसंबंधी रा. ना. सांगतात :

*"केवढीही थोर एकच व्यक्ती सर्व काळांना सर्वथा मार्गदर्शन करू शकत नाही. म्हणून असामान्य समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचे विचार, ग्रंथ व कृती (कार्ये) तपासले पाहिजे. ही जी प्रक्रिया असते, ती म्हणजे बुद्धिवाद होय."*

अनेक मार्गांनी हा बुद्धिवाद आपल्या परीने आपण जोपासला कसा त्याचे विवेचन रा. नां.नी जागोजागी केले आहे. स्वतःसह इतरांच्या जाणवणाऱ्या थिटेपणाची कठोर समीक्षा करण्याची निर्भय निर्भयता तसेच मतविशेषभिमानाच्या पलीकडे जाण्याची भूमिका असावी लागते. येरागबाळाला ते जमणारे नाही. रा. नां.ची ही दृष्टी-सृष्टी आहे. ती त्यांच्या विवेचनात प्रकट झाली आहे. बुद्धिवादाच्या ह्या लक्षणांबाबत रा. ना. विस्ताराने सांगतात :

*"आत्मपरीक्षणाची, आत्मटीकेची गरज सर्वत्र असतेच. राष्ट्रीय संदर्भात सर्वस्वी इंग्रजाला जबाबदार धरणे आणि सामाजिक-धार्मिक बाबतीत दलितांनी व ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणीधर्म व ब्राह्मण समाज यांना सर्वथा कारण मानणे, ही सर्व प्रथा स्वातंत्र्यात तपासली पाहिजे. यासाठी मी तटस्थ झालो. मी कोणत्याही पक्षाचा नव्हतो व नाही. प्रार्थना समाजात मूर्तीपूजा/विभूतीपूजा, कोणत्याही ग्रंथांचे सर्वप्रामान्य नसते. ग्रंथ हे मनुष्यकृत मानले जातात. यामुळे बुद्धिवादाची वाट मोकळी होते. हीच तत्त्वे म. फुल्यांच्या पुस्तकांतून शोधान्ती सापडतात. या दृष्टीचा मी जोडप्रचारक बनलो."*

जोडप्रचारक बनून रा. ना. चव्हाण यांनी निर्मुक्त मनाने लिहिले. मनसोक्त लिहिले. महर्षी अण्णासाहेब शिंदे यांचे शिष्यत्व आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींचा सहवास त्यांनी तटस्थपणे भोगला. कर्मवीर शिंदे किंवा तर्कतीर्थ-दोघेही पोथीवादी किंवा सांप्रदायिक नव्हते. उघड्या डोळ्यांवर चकाकती प्रकाशकिरणे घेऊन ती रिचविण्याची दोघांहीजवळ प्रखर विज्ञाननिष्ठा होती. त्यामुळे प्रबोधनाच्या कक्षा रुंदावल्या आणि मनोविश्वाचे आकाश विस्तारले. ते कसे झाले त्याचे आरेखन रा. नां.नी 'ओळख'मध्ये मुद्देसूदपणे केले आहे.साहजिकच धारणा इहवादी, दृष्टी कार्यवादी असल्याने एखादा विषय वगळला किंवा बाजुला टाकला असे रा. ना. चव्हाणांनी कधी केले नाही. सार्वजनिक मनोविकास आणि लोकहितबुद्धी यांची कवचकुंडले त्यांनी अंगा-खांद्यावरून कधी खाली उतरवलीच नाहीत. हातून लाखमोलाचे काम होत राहिले पण साहित्यिकपणाची मिरवणूक नाही, अहंनिष्ठ डौल नाही की संशोधकाची फुकाची मिजास नाही. ताठा म्हणून कसला नाहीच. निखळ लोकसेवाव्रती प्रबोधनाची भूमिका. रा. नां.चे लेखन अंतःकरणाच्या तारांना झणत्कारते आणि मेंदुला विचाराची पिसे लावते ते त्यामुळेच! लोकव्रती रा. ना. चव्हाणांचे, यामागील नितळ मन व विचारांतील प्रांजळपणाही मग तसाच प्रकट होतो. ते सांगतात :

अनुक्रमणिका

*“राष्ट्र एकजिनसी होण्यास निरनिराळ्या समाजातील सांस्कृतिक व आर्थिक दऱ्या भरून आल्या पाहिजेत. त्यांच्यात केवळ संघर्ष पेटवून उपयोगी नाही. मागास व अतिमागास जे आहेत त्यांनी व्यक्तिशः आणि समाजशः स्वोन्नती केली पाहिजे. पुढे जे जातात, ते त्यांच्या गुणांमुळेही जातात व पुढे पात्रतेने असतात. ही दृष्टी माझ्या पुढे होती. …कोणत्याही चळवळीला व जागृतीला नीट वळण लागावे यासाठी विचारवंतांनी प्रयत्न करणे त्यांचे कर्तव्य आहे. सत्य शोधतो तोच सत्यशोधक. गेली पन्नास वर्षे मी विचारपूर्वक अक्षर व शब्द वापरले. साहित्यिक म्हणवून घ्यावे यासाठी हा प्रवास नव्हता व नाही. पोटासाठी तर मुळीच नव्हता. जनता-जनार्दनाची नम्रपणे यथाशक्ती सेवा करणे हा मूलभूत उद्देश होता.”*

सांस्कृतिक परंपरेचे गुंतलेले धागे

रा. ना. चव्हाण यांनी, वर निर्देशित केलेल्या यथायोग्य उद्देशाची पाठराखण इतिहास, समाजशास्त्र आणि भूगोल या शास्त्रांच्या व्यासंगानेही केल्याचे दिसते. त्यांनी केवळ सामाजिक-सांस्कृतिक-वाङ्मयिक असेच प्रश्न हाताळले असे नाही तर अशा प्रश्नोपप्रश्नांचे बीज त्यांनी इतिहास-समाजशास्त्रांतही न्याहाळले. अष्टावधानी चौफेर व्यासंगशीलता ही त्यांची आधारशिला होती. त्यामुळे रा. नां.च्या लेखनाचा मांड आणि प्रत्यक्ष लेखन हे, इतिहासाला त्यापलीकडे नेणारे आहे. श्री शरच्चंद्र चव्हाण संपादित ‘रा. ना. चव्हाण : विचारदर्शन’ या पुस्तकाच्या ‘चार शब्द’ मध्ये मराठीतले एक समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी नेमकेपणाने रा. नां.च्या या ऐतिहासिक कार्याची नोंद केली आहे. ते सांगतात, ….
*“महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा मोठी असली तरी या परंपरेची तपशीलपूर्वक सर्वसमावेशक बांधणी झालेली नाही. या परंपरेतील पदर गुंफणारे लहान-मोठे तपशिल संशोधनपूर्वक पुढे आणणे आवश्यक आहे. मराठी विचारवंतांच्या परंपरेतील या उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपैकी श्री. चव्हाण हे एक आहेत.” प्रा. जाधव पुढे लिहितात, “आज-उद्याच्या सांस्कृतिक प्रश्नांत, काल-परवाच्या सांस्कृतिक परंपरेचे धागे कसे गुंतलेले आहेत, हे दाखविणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे.”*

महाराष्ट्रातील प्रस्थापित विचारवंतांच्या प्रचलित लेखनव्यवस्थेत बहुजनसमाजीय विचारवंतांचा तपशिल नाही; त्यादृष्टीने सर्वसमावेशक बांधणी आवश्यक आहे; या मुद्याकडे प्रा. जाधव यांचे विवेचन बोट करते. प्रा. जाधवांचा समीक्षकी नेमस्तपणा तसे स्पष्ट म्हणायला धजत नसला तरी रा. ना. चव्हाण यांना त्याची स्पष्ट जाणीव होती असे, प्रस्तुत लेखकाबरोबर त्यांच्या झालेल्या अनेक वेळच्या चर्चा-विनिमियातून प्रत्ययास आले आहे. *“आताचा महाराष्ट्राचा सामाजिक-सांस्कृतिक इतिहास पूर्णत्वानं लिहिला गेला आहे अशी समजूत आहे. पण ती खरी गोष्ट नाही. इतिहास अर्धाच आहे. नांगरी परंपरेचं छोटंसं बिळूक नागरी परंपरेच्या मोठ्या वर्तुळात समाविष्ट करण्यात आलं आणि ते म्हणजे हेच असं भासविण्यात आलं. यात जेत्याची भावना मूलतः होती. माझे कष्ट प्रस्थापित परंपरेच्या मोठमोठ्या खड्ड्यात भराव टाकून जमीन समतल करणारा ठरू शकतो असं वाटतं.”* - रा. नां.चे विवेचन.

“पण हा भराव कसला? मातीचा की सिमेंटचा?” माझा प्रश्न.

**अनुक्रमणिका**

रा. ना. चव्हाण त्यावर विवरण करताना म्हणाले होते, "टिकाऊ धरणांच्या मातीचा. सिमेंटाहूनही अधिक ताकदीचा. महाराष्ट्राचा पारंपरिक इतिहास वाचताना काहीतरी राहून गेलंय असं मनात वारंवार येई. शोध घेता घेता मोकळ्या जागा भरण्याचं काम होत गेलं. त्यात जाणीव होती पण नियोजन होतं असं काही मन सांगत नाही. मनात पक्क्या होत गेलेल्या सूत्रांप्रमाणे हे घडत गेलं असं मानायला हवं." आणि नेहमीच्या निर्विष मिस्किलपणाने रा. ना. चव्हाण यांनी हलकासा चिमटा काढला होता : "आता त्या क्षेत्रातली महाजन मंडळी तसं काही बिरुदच चिकटवित असतील तर ते न मानून कसं चालेल?"

रा. ना. चव्हाण यांच्या या आप्रवाक्यावरून, परंपरागत इतिहासातील पूर्ण वाक्याची आच त्यांना जाणवत असावी असे निःशंकपणे म्हणता येते. रा. ना. चव्हाण यांचा शब्द ही 'ॲथॉरिटी' होती असे डॉ बाबा आढाव यांनी निःसंदिग्धपणे म्हटलेले आहे; ('पुरोगामी सत्यशोधक : जाने-फेब्रु-मार्च, १९९३ : पृ. ३) हे लक्षात घेतले की आणखी वेगळ्या 'ॲथॉरिटी'ची गरज उरत नाही; एवढी पारदर्शकता त्यात आहे.

रा. ना. चव्हाण यांची दृष्टी अंतर्बाह्य फुलेवादी आहे. मात्र फुलेवादातही मूलतः ती सत्यनिष्ठ आहे. म. फुल्यांच्या प्रभावातही रा. ना. चव्हाण कुठे वितळत नाहीत, की हरवत नाहीत. सत्यनिष्ठेच्या अंगानेच ती सरकताना दिसते. त्यांच्या भूमिकेचा हा विशेष होय. अव्वल असे एक उदाहरणच पहा : 'निबंधमाला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे लेखन, पुरोगामी म्हणविणाऱ्या जवळपास सर्व विद्वान् पंडितांनी प्रतिगामी ठरविले आहे मात्र विष्णुशास्त्र्यांच्या भूमिकेतही काही वेगळे तथ्य असून भिन्न संदर्भातील त्या भूमिकेचे सामर्थ्य स्वीकारण्याची सत्यनिष्ठा, फुलेवादाला न्याय देऊनही श्री. चव्हाण यांच्या भूमिकेने सिद्ध केली आहे. अशी सूक्ष्म चिकित्सा करून, डोळ्याआड झालेले सूत्र नजरेसमोर आणून वाचकांना विचारप्रवण करण्यात रा. ना. चव्हाण यांना विशेष रस आहे. त्यांना ते आवडते. 'अल्प कुवतीप्रमाणे' 'तुलनात्मक व समन्वयी अभ्यासाची' श्री. चव्हाण यांची ही पद्धत त्यांच्या बुद्धीचाच एक विशेष आहे. लेखनात तिचा सर्वत्र वावर आहे.

या फुलेवादी सत्यनिष्ठेच्या शिवारामध्ये उभे राहून कुणी काय काय पेरले, किती पेरले, किती रुजले, किती उगवले आणि किती नासले-सडले ते रा. ना. चव्हाण तपासून घेतात. हरेक घटना-प्रसंग ते सूक्ष्मदर्शक यंत्राखाली टाकतात. अखंड निबंध किंवा स्फुट पत्रव्यवहार ह्याबरोबरच इतिहासावर मुद्रा खोदणाऱ्या, काळाला कलाटणी देणाऱ्या महामानवांच्या, लोकनायकांच्या जीवन-कर्तृत्वाचा वेध आणि ग्रंथपरीक्षणे हेही चव्हाणांच्या लेखनाचे विशेष विभाग म्हणता येतील. आपल्या फुलेवादी सत्यनिष्ठेच्या अटींच्या स्वाधीन राहून अत्यंत आत्मीयतेने, चव्हाण या विभागांचे सारथ्य करतात. गौतम बुद्ध, म. फुले, कार्ल मार्क्स, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, लो. टिळक, न्यायमूर्ती रानडे, राजा राममोहन रॉय, सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गुरुवर्य बाबुराव जगताप, श्री. म. ऊर्फ बापूसाहेब माटे, समाजभूषण बाबुराव गोखले, कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे अशा कित्येक भिन्नजातीय व भिन्नक्षेत्रीय महापुरुषांच्या जीवनकार्याचे मूल्यमापन श्री. चव्हाण करतात ते सत्यनिष्ठेच्या अंगाने. तर्कशुद्धपणे. व्यक्तिपूजेचा उद्देश टाळून, तत्त्वचिंतनावर भर देऊन.

असा भर रा. ना. चव्हाण देतात त्याचे महत्त्वाचे कारण, महामना कर्तृत्ववंतांच्या कार्याचे मोल तोलावे-मापावे लागते ते परिवर्तनाच्या प्रवाहातच याचे त्यांना उत्तम भान आहे, हे होय. त्यामुळेच तर म. फुले-न्याय.

अनुक्रमणिका

रानडे, डॉ. आंबेडकर-राजर्षी शाहू, मार्क्स-फुले यांचा तुलनात्मक अभ्यास करताना चव्हाणांनी ज्याचे त्याचे सामर्थ्य जोखले आहे आणि श्रेयाचा वाटा ज्याच्या-त्याच्या पदरात टाकला आहे. उगीच कुठेतरी सांडणार नाही अशा नेमकेपणाने. कुणाच्या श्रेयाला टाच नाही की अतिशयोक्तीला बाधा. इथे म. फुले किंवा कर्मवीर शिंदे यांनाही सूट नाही. रा. ना. चव्हाण सर्वत्र "फुलेवाद'- फुलेवादातील सत्यनिष्ठा-सिद्ध करण्याच्या प्रयत्नात, धडपडीत दिसतात. अगदी अनाग्रही वृत्तीने. सतत. रा. ना. चव्हाण, पैलू पाडत असलेला फुलेवाद हा नवमानवतावादाच्या निकषांच्या अधिष्ठानावर खडा आहे. फुलेवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद असे, राष्ट्ररचनेची संकल्पना पोटात वागविणारे कोणतेही वाद नवमानवतावादीच असायला हवेत, किंबहुना तसेच ते असतात ही रा. नां.ची खूणगाठ आहे. त्या अनुषंगाने या वादांमध्ये चव्हाण मग नवमतवादाचा दुवा शोधतात. कारण, तसा तो नसेल तर प्रबोधन आणि परिवर्तन विफलच होते; याची जाण रा. ना. चव्हाणांच्या लेखनात आढळते. चव्हाणांनी बहुजनांच्या हितासाठी लिहिले, पक्षियतेला ओलांडून लिहिले; त्यामागे ऐतिहासिक पार्श्वभूमीचा असा परिसर आहे.

अशा स्वरूपाच्या चर्चेत, रा. ना. चव्हाणांना प्रस्तुत लेखकाचा एक प्रश्न असा होता : "नवमानवतावादाचे अधिष्ठान असणाऱ्या अशा बहुजनसमाजीय वादांचे संयोजन करण्यात आपल्यास कितपत यश लाभलं आहे?"

"ते साद्यंतपणे अद्याप समन्वयित करता आलेलं नाही. चरण नामदेव पायरीपाशीच आहेत; सोपान पायऱ्या पायाखाली आलेल्या नाहीत." श्री. चव्हाणांचे मोजके उत्तर.

"नांगरी परंपरेतील विचारवंतांना याचं लवकर भान आलं नाही, प्रयत्नांची गती वाढली नाही तर बिघडणाऱ्या चित्राचं स्वरूप कसं असेल?"—प्रस्तुत लेखकाचा प्रतिप्रश्न.

"आपले विचारवंत फार लवकर कुणा ना कुणाचे तरी अंकित होतात. मालक व हितसंबंधी यांच्यामध्ये दास बनून राहतात. आजच्या भाषेत ते संपर्क अधिकारी तर जुन्या रीतीत ते दलाल असतात. मग साहाय्याचे नाटक लोकांसाठी तर लोकांच्याच नावावर सल्लामसलतीचे मुनाफे मालकाला असं चालत. बहुजनातील विचारवंत तरी त्यास अपवाद कसे ठरतील? बहुजनांना हरप्रकारे भुरळ घालून, त्यांच्या नैसर्गिक शक्तींचा कौशल्याने वापर करून त्यांना पिळणारा नवा भांडवली शोषक वर्ग निर्माण होईल. ग्रामीण समाज दरिद्रीच राहील. आणि एक दारिद्र्य सर्वत्रच नडतं; स्वातंत्र्य स्वाहा करतं; हा धोका आहे."-रा. नां.चे विवेचन.

"चौदा-पंधरा वर्षांपासून जो मी 'फुले-वेडा' झालो तो कायमचाच! .......केव्हा केव्हा वाटते की, म. फुले विद्यमान असताना माझा पूर्वजन्म त्यावेळचा तर नाही ना! मागील जन्मात मी फुले यांच्या जवळचा तरी असावा!" (उनि : 'मी आणि माझे लेखन', पृ. ५०) असा साक्षात्कार झालेले रा. ना. चव्हाण आपल्या मर्यादांची जाणीव ठेवतात. त्यातल्या खारीच्या वाट्याचे भान राखतात. विवेचन, विश्लेषण किंवा संश्लेषणामध्ये कुठेही सत्यनिष्ठा सोडत नाहीत. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या मूल्यमापनाकडे त्यादृष्टीने लक्ष वेधता येईल. राजर्षी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाला संस्थानिक (आणि सरंजामदार म्हणूनही) म्हणून पडलेल्या मर्यादांचे अनुचित भांडवल करून, काही ना काही ऐप लावून त्यांचे विधायक योगदानही नाकारण्याचा करंटेपणा "काही

खोडील वृत्तीची तथाकथित बुद्धिवादी मंडळी” करतात. खालमानेचे झिलकरी नंदी रीऽऽ ओढतात म्हणून लोकनायक शाहू राजांच्या एकूण कर्तृत्वाच्या लोकतत्त्वीय ऐतिहासिकत्वावर रा. ना. चव्हाण भर देऊन त्यांचे 'संस्थानिकपण' 'लोकगंगे'त विरघळून गेल्याचे नेटकेपणाने सांगतात. खोडील बुद्धीवाद्यांच्या खतखोडी अंगावर येतील का याची जरासुद्धा फिकीर रा. ना. चव्हाण करीत नाहीत. कारण खोडील बुद्धीवाद्यांकडे नसलेली परिपक्कता आणि प्रगल्भता त्यांच्याकडे मात्र भरून पावण्याइतकी आहे.

मांजरीच्या दाताने प्रश्नांची उचल करताना रा. ना. चव्हाण नेमक्या वर्मावर बोट ठेवतात. बहुजनांचा कर्मठपणा वेशीवर टांगतात. बहुजनांच्या स्वतःच्या वर्चस्ववादी 'मराठपणा'मुळे महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्या मानवतावादाचे रहस्य समजू शकेल नाही अशी नोंद ते निर्भयपणे करतात. “बहुजन समाजाला महर्षी शिंद्यांच्या मानवतावादी धर्माचे रहस्य कळू शकले नाही.” हा, रा. ना. चव्हाण यांचा अभिप्राय बहुजनांना अंतर्मुख करतो आणि कर्मवीर शिंद्यांचे न पचलेले दुर्लक्षित महात्मेपण हळूहळू मनात उतरू लागते. या संदर्भात रा. ना. चव्हाण यांनी प्रामुख्याने म. फुले आणि सत्यशोधक चळवळ, ग्रामीण आणि दलित चळवळ, दलित किंवा ब्राह्मणेतर नेतृत्व इत्यादीविषयी केलेल्या विवेचनाकडे आवर्जून लक्ष वेधता येईल. म. फुल्यांचे सत्यशोधक चळवळ हा बहुजनांच्या अस्मितेचा अंगभूत भाग असल्याने रा. ना. चा तो सदैवच आस्थेचा विषय आहे. म्हणून ते या विषयाचे साद्यन्त चिंतन व विवेचन करतात. दलित चळवळी आणि दलित वाङ्मय यांचा परामर्श घेताना डॉ. आंबेडकरांनी स्वीकारलेल्या बैद्धधर्माच्या 'भीमयान' अभियानाचे (हा अन्वर्थक मतळाही रा. ना. चव्हाणांचाच.) स्वरूप २२ कलमांतून ते विशद करतात. बहुजनसमाजाच्या – ब्राह्मणेतर – नेतृत्वाचीही चिरफाड करतात. बहुजनसमाजाने स्वीकारले – नाकारले, स्वीकारणे आवश्यक व इष्ट असूनही त्याकडे पाठ फिरविल्यामुळे भुले-बुरे काय झाले, त्याचा निःपक्षपातीपणाने त्यांनी ताळेबंद सादर केला आहे. सम्यक् संदर्भाने, दलितांच्या चळवळींचा आढावा घेताना, होणाऱ्या टीपा-टिप्पणीबाबत मराठा समाजाने जबाबदारीने बोलले / वागले पाहिजे असा रा. नां. चा आग्रह आहे. नागरी नेतृत्व सनातनी खरे मात्र शैक्षणिक संस्थांपासून प्रशासकीय नोकरीपर्यंत आणि उद्योग-धंद्यांपासून पत्रकारितेपर्यंतचा, आधुनिक तंत्र-मंत्राचा स्वीकार करणारा त्यांचा प्रवेश हा, त्यांच्या समाजासाठी उपकारक कसा ठरला त्यावर रा. ना. चव्हाण यांनी नेमके बोट ठेवले आहे. असे विचारप्रदर्शन ही एक चळवळ आहे, एक अभियान आहे ही चव्हाणांची धारणा आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे विवेचन-विश्लेषण करताना शक्यतो शत्रूंची संख्या कमी करणे व मित्रांची वाढविणे या चळवळीतल्या सूत्राची ते उत्तम जाण ठेवतात. यामधून साधल्या जाणाऱ्या फलिताचा उपसंहार रा. ना. चव्हाण असा करतात :

*“राष्ट्र एकजिनसी होण्यास निरनिराळ्या समाजातील सांस्कृतिक व आर्थिक दऱ्या भरून आल्या पाहिजेत. त्यांच्यात केवळ संघर्ष पेटवून उपयोगी नाही. मागास व अतिमागास जे आहेत त्यांनी व्यक्तिशः आणि समाजज्ञ : स्वोन्नती केली पाहिजे. पुढे जे जातात, ते त्यांच्या गुणांमुळेही जातात व पुढे पात्रतेने असतात.... कोणत्याही चळवळीला व जागृतीला नीट वळण लागावे यासाठी विचारवंतांनी प्रयत्न करणे त्यांचे कर्तव्य आहे. सत्य शोधतो तोच सत्यशोधक. गेली पन्नास वर्षे मी विचारपूर्वक अक्षरे व शब्द वापरले.”* (रा. ना. चव्हाण : निवडक वाङ्मय/संपा. मो. नि. ठोके/'मी व माझे लेखन'/पृ. १८) महत्त्वाचा असल्याने उपसंहार इथे आवर्जून पुनरुक्त केला आहे.

**अनुक्रमणिका**

रा. ना. चव्हाण यांनी लेखनाचा उपयोग स्वतःचे सामाजिक-शैक्षणिक-सांस्कृतिक विचार प्रसृत करण्याचे एक साधन म्हणून केला. साधन हाताळताना ते किती मोठे, किती लहान असा विचार रा. नां. च्या मनात उपजलेला नाही. विचार शब्दबद्ध होणे महत्त्वाचे. तो मग कुठेही पडला तरी रुजतो, वाढतो, फोफावतो आणि पुढे त्याचा डेरेदार वृक्ष बनतो. म्हणून रा. नां. च्या बाबतीत साधनांचे लहान-मोठेपण जसे गौण तशा त्यास सीमा किंवा मर्यादाही नव्हत्या. विचारांचे बीज सफल, साधनांचा वापर विशाल असे रा. नां. चे गणित होते. विचारांचे प्रक्षेपण अतीव महत्त्वाचे म्हणून साधने आखडती घ्यायची नाहीत; प्रचलित पद्धतीत ती प्रतिष्ठित—अप्रतिष्ठित अशी मानली जात असली तरी तोच विचार प्रमुख मानायचा नाही अशी चव्हाणांची सरळ भूमिका होती. विचार पेरणे, प्रबोधन रुजविणे आणि कार्य उभारणे ही रा. ना. चव्हाणांच्या स्थिर दृष्टीतील विकासाची प्रक्रिया असल्याने लेखक गौण होता. लेखक म्हणून किंवा लेखक व्हायचे म्हणून लेखन केले असे नाही तर लेखनामागून लेखकपणच धावत आले. प्राथम्याची भूमिका राहिली ती जनताजनार्दनाच्या सेवेची. या सेवाव्रती भूमिकेने लेखकपण दिले, पुढे ते पुरतेपणी अंगात भिनले आणि नंतर मग लोकसेवक व लेखक या भूमिका अभिन्नच झाल्या. त्या वेगळ्या करणे मग अशक्यच बनले. लेखकाचा आब आणि लोकसेवकाचा वसा एकमय झाला आणि लोकसेवकाचे निशाण लेखकाच्या लेखणीने कधी खाली पडूच दिले नाही. हातात हात घालून, एकलग सामंजस्य साधत लोकसेवक रा. ना. चव्हाण आणि लेखक रा. ना. चव्हाण तटस्थतेने चालले. ब्राह्मोसमाजी प्रचारकाची भूमिका निभावताना पुनरुक्ती व आभरण हे लेखनातील दोष (त्याला तसा पर्यायच नव्हता.) तसेच ठेवून रा. नां. नी इहवादी दृष्टीकोनाचे अभिसरण कसे होत राहील हे पाहिले. “तू माझ्यापेक्षा चांगले लिहितोस!” असा गौरव करणाऱ्या गुरुवर्य अण्णासाहेब शिंद्यांनी “तू बहुजनसमाजाच्या बाजूने लिहित जा!” असा एकदा आदेशच दिला. ‘अल्पकुवतीप्रमाणे’ ‘तुलनात्मक व समन्वय अभ्यासपद्धतीने’ रा. नां.नी मग साऱ्या लेखनाचा मांड घातला. रा. ना. चव्हाण सांगतात : *“गेली पन्नास वर्षे मी विचारपूर्वक अक्षरे व शब्द वापरले. साहित्यिक म्हणवून घ्यावे यासाठी हा प्रवास नव्हता व नाही. पोटासाठी तर मुळीच नव्हता. जनता-जनार्दनाची यथाशक्ती सेवा”* हीच मुळातली आच होती. (उनि : पृ. १८) ती मनसोक्त केली आणि तिचा भरपेट आनंदही भोगला. बहुजनांना जागृतीचे सामर्थ्यही दिले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ‘तत्त्वचिंतक, साधक आणि उपासक’ असे रा. ना. चव्हाणांचे वर्णन केले आहे; ते सार्थच आहे. म. फुले यांनी बहुजनांच्या मानसिकतेत पालट घडविला. अविद्येच्या खतखोडीबरोबरच विद्येची प्रकाशाची तळी खुली केली; तर फुलेनिष्ठ रा. ना. चव्हाण यांनी ज्ञानाच्या सर्व अंगांना बहुजन कसा भिडेल, विद्येच्या प्रकाशाच्या तळ्यात बुड्यावर बुड्या कसा मारील याची चिंता वाहिली. विरोध केला की शत्रुत्व येते, जीवावर बेतते असल्या वांझ हाकाट्या पिटणाऱ्यांचे मतलबी डावपेच निर्धारपूर्वक बाजूला फेकून देऊन, मोठ्या जिम्मेदारीने चव्हाण यांनी बहुजनांच्या मानसिक परिवर्तनाबाबत अविरत लेखनकामासाठी केली. रा. ना. चव्हाण यांचे हे कार्य खूप मोलाचे आहेच. पण त्याबरोबर त्याला दुसरी एक बाजूही आहे. ती आहे, बहुजनात अधिकाधिक संशोधनवृत्ती विकसित होण्याची. संशोधकांना जन्म मिळण्याची. सुरुवात झाली आहे; पण वाढीदीढीचा हंगाम कधी व कसा घेता येईल (आता हाती फारसा वेळच नसल्याने शक्य तितक्या तातडीने उजवणी झाली पाहिजे. शेळवणावर गुजराण म्हणजे आणखी किमान शंभर वर्षे पिछाडीवर पडणे होय.) याचे संकल्पचित्र सिद्ध करण्यात रा. ना. चव्हाणांच्या एतद्विषयक अनिवार तळमळीचे चीज आहे.

**अनुक्रमणिका**

रामचंद्र नारायणीय वाण

सर्वप्रकारे सत्य जाणून घेणे ही रा. ना. चव्हाण यांच्या विचार-लेखनामागील मूलगामी दृष्टी आहे. या दृष्टीचे प्रकटीकरण रा. ना. करतात ते, आपल्या मनातील भाव पराकोटीच्या पारदर्शक पद्धतीने व्यक्त करणाऱ्या सूक्ष्मातिसूक्ष्म शब्दांच्या वापरातून. माणूस व मत यांचा विचार ते मतभेद बाजूला ठेवून करतात. भिन्न संदर्भातील त्या त्या भूमिकेचे-दृष्टिकोनाचे-सामर्थ्य स्वीकारण्याचे आणि उणिवा दाखवून देण्याचे दुर्मिळ लेखनवैशिष्ट्य चव्हाणांच्या ठायी आहे. 'विवेक व विवेकवंत' मध्ये विकाऊ विद्वानांची चव्हाणांनी केलेली चर्चा, त्या दृष्टीने डोळ्यांखालून घालायला हरकत नाही. अवघ्या महाराष्ट्रातल्या तमाम विचारवंतांच्या मालिकेत, रा. ना. चव्हाण यांचे लेखनवैशिष्ट्य सर्वस्वी निराळी जातकुळी प्रकट करणारे आहे. रामचंद्र नारायणीय असा हा वाण आहे. साधारणपणे शासकीय भाषेच्या मोडणीत मोडावा असा. मुद्देसूद व आटीव अशा ऐटीचा. प्रभावी परिणामाचा.

काही नमुने पहा :

*..."परिसंवादाचा विस्तृत विषय याप्रमाणे व्यक्त करता येतो." (उनि : पृ. ३९)*

*... "व आजही हे त्यांचे स्थान ध्रुव आहे." (उनि : ३४६)*

*..."विरोध करते झाले." (उनि : पृ. २१)*
*..."आता थोडक्यातच निषेदावयाचे झाल्यास असे ध्वनित करता येते की..." (उनि : पृ. २३)*

*..."यांच्या वर्चस्ववादाविरुद्ध उठावाचा हा मार्ग प्रायः होता." (उनि : पृ. ३८)*

*..."ही उच्चभ्रूंची म्हणून सहमत तिच्याशी म. फुले झाले नाहीत." (उनि : पृ. ६)*

*..."म्हणून परिणाम पुढे लांबवर पोहोचत गेला." (उनि : पृ. ३४)*

त्याचबरोबर 'टाकिली', 'बाळगिली', 'उच्चाटण', 'घटना', 'गणिला पाहिजे', 'लोक अमान्यता', 'आखिल', 'व' व 'आणि'चा वापर, 'कायमचे तूर्ततरी', 'प्रायः', अशी वाक्यांची व शब्दसंहतींची धाटणी ही खास रामचंद्र नारायणीय आहे. 'प्रायः' आणि 'कायमचे-तूर्ततरी' या शब्दसंहतींचे उपयोजन रा. ना. चव्हाणच करू जाणोत! त्यांच्या वापरातली ऐट, लकब, बाज आणि डौल हे इतर कुणाला साधणारे सूत्र नाही. रा. ना. चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वंकष सार इथे एकवटून येते. त्यातून अखंड रा. ना. चव्हाण समोर उभे राहतात.

रा. ना. चव्हाणांचे समतोल विवेचन अनेक संदर्भान्वित असते. बारीकसारीक संदर्भकणांनी परिप्लुत असते. वरवर पाहता, इतके अणु-रेणुसारखे वस्तुस्थितीनिदर्शक तपशिल रा. नां.च्या लेखनात विखुरलेले असतात की, हा पसारा कशाला? काय कामाचा? असे सहज वाटून जावे. वास्तविकपणे काहीसे कंटाळवाणे

अनुक्रमणिका

वाटून, मधल्या मधल्या ओळीवरून उडी मारून वाचकाने पुढे झेपावण्यास सहजी आतूर असावे. पण तसे घडत नाही. तपशील 'ग्रीप' मध्ये ठोकलेल्या खिळ्यासारखा इतका जाम की वाचक हलू शकत नाही आणि सूक्ष्म तपशिलाच्या ओझ्याने रा. नां.चे लेखन मुडपत किंवा दबत नाही. लेखनाची खोली आणि विश्वासार्हता मात्र वाढताना दिसते. तपशिलाचा वास्तवदर्शीपणा, मुद्देसूदपणा, हवे तेवढे म्हणजे अगदी हवे तेवढेच नेमके उद्धरण व सरळ मांडामांड अशी काही या विश्वासार्हतेची मुळे आहेत. त्यामुळे रा. नां.ची नवीन विचारसूत्रेही आपोआपच विश्वासार्ह बनून येतात आणि त्यांना त्यांची म्हणून एक क्रियाशिलता प्राप्त होते. प्रायः रूढ समजुतींना धक्का देणारी ही विचारसूत्रे असतात. उदा. 'शाहू-टिळक विग्रह का झाला?' या प्रश्नाच्या उत्तरात 'परकियांच्या कारवाईमुळे' ही रूढ समजूत रा. ना. चव्हाण नाकारतात. मात्र समाजशास्त्रीय विश्‍लेषणातून हा प्रश्न सुटू शकतो, असे ते सिद्ध करून दाखवितात. (उनि : पृ. २३३) विचारपूर्वक ठरविलेल्या भूमिकेवर कुठल्याही परिस्थितीत ठाम असणारे रा. ना. चव्हाण परिवर्तनाचा प्रवाह समजून घेण्यासाठी, कुणा एका दैवतावर त्यांचा बुद्धिवाद गहाण ठेवत नाहीत. स्वतःच्याच बुद्धीवर निर्भर राहतात. म. फुल्यांचे कर्तृत्व जोखताना त्यांना उपलब्ध असलेले साधन-साहित्य, ब्रिटिश राजवटीतील वाङ्मयीन परंपरांचे विशेष, हिंदू रूढी-परंपरांची प्रतिकूलता इत्यादी घटकांची चव्हाण नोंद करतात. सत्यार्थबोध करून घेताना एकाच घटनेच्या विविध पैलूंना स्पर्श करण्याची रा. नां.ची पद्धत सूक्ष्मदर्शक यंत्रासारखी आहे. असे पहा की, म. फुले यांच्या कर्तृत्वाचा ताळेबंद मांडताना लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि ब्रिटिश राजवट अशा अनेकस्तरीय केन्द्रातून रा. ना. चव्हाण त्याची मांडणी करतात. याला रा. स्व. संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजीही अपवाद नाहीत. वैचारिक मतभेद आहेत म्हणून कुणाला टाळावे किंवा मनात आकस ठेवून वागावे अशी रा. ना. चव्हाणांची वृत्ती नाही. त्यांची विवेकवादी दृष्टी गोळवकर गुरुजींसह सर्वांचे प्रयत्न समजून घेऊन त्यांचे मूल्य ठरवू इच्छिते. स्वीकारलेल्या बांधिलकीनुसार मूल्याचे वजन चढते-उतरते राहणार, सर्वांचे मूल्य निश्चितच सारखे नसणार हे खोटे नाही. मात्र असा लेखा-जोखा करताना विवेकाचा समतोलपणा व लेखणीचा समंजसपणा, तत्काली तरी रा. ना. चव्हाणांच्या एवढा इतर कुणात आढळत नाही. मित्र-मैत्रिणींसाठीच निरनिराळ्या सदावर्तांच्या पंक्ती टाकणाऱ्या तथाकथित विचारवंतांची, साध्या उल्लेखानेही होणारी भगभग पाहिली की, रा. ना. चव्हाणांच्या भल्या पहाटेच्या शुभ्र, नितळ मानसिकतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच ठरते. उभा समाज खिरवून टाकणाऱ्या अस्पृश्यतेच्या उच्चाटनाच्या मार्गासंबंधी रा. ना. चव्हाण यांचा समाजपोषक विवेकच पहा ना : म. गांधी, म. फुले, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. आंबेडकर, बापूसाहेब माटे, स्वातंत्र्यवीर सावरकर, गोळवलकर गुरुजी यांची अस्पृश्योद्धारासंबंधी मते भिन्न होती आणि मार्गही वेगवेगळे होते. रा. ना. चव्हाण यांना, त्यातली काही मते आणि मार्ग मुळीसुद्धा न रुचणारे. ते त्याचे कट्टर विरोधक. मात्र सर्वांच्या या संदर्भातील हेतूंबद्दल श्री. चव्हाणांनी कसलीही शंका घेतलेली नाही. त्यांच्या मनातच ती गोष्ट नाही. अस्पृश्यतेची समस्या लवकरात लवकर नष्ट व्हावी असाच या सर्वांमागील हेतु होता असा श्री. चव्हाणांनी त्यांच्यावर गाढ विश्वास व्यक्त केला आहे. ते सांगतात : "कोणताही उपाय हा अपायकारक मार्ग नसावा. एकमेकांनी एकमेकांचा विश्वास जिंकावा." (उनि : पृ. ३८२). रा. ना. चव्हाणांचे असे प्रतिपादन अनुभवसमृद्ध बहुश्रुततेने सजून येते तेव्हा सत्याशी-राष्ट्रीय एकात्मतेशी ते खूपच संवाद साधते.

रा. ना. चव्हाण हे अज्ञात इतिहासावर प्रकाशझोत टाकणारे संशोधकही आहेत ही त्यांच्या व्यासंगाची एक समृद्ध बाजू आहे. साधारणपणे असे घडते की, महामनांच्या कर्तृत्वाखाली अनेक वेळा इतिहास दबला, दाबला किंवा दडपला जातो. काही मोजक्या महापुरुषांनाच परिवर्तनाच्या इतिहासात नोंदीचे भाग्य लाभते.

अनुक्रमणिका

बाकी उपेक्षेच्या जौळात गाडले तरी जातात किंवा भस्म तरी होतात. सामान्य माणसांची आठवण इतकी जबर की, विस्मरणाच्या खाईत गडप होणाऱ्यांचा त्यांना मागमूसही नसतो. मात्र रा. ना. चव्हाण अशा 'महामनां'चे उद्धारकर्ते बनतात. संशोधनाच्या बारीक बारीक कप्प्यात घुसताना श्री. चव्हाणाच्या हाती अशी रत्ने लागतात. डॉ. भांडारकर, नारायण मेघाजी लोखंडे, राजारामशास्त्री भागवत, बा. लिं. बिर्जे, 'शिवचरित्र'कार केळूस्कर, ना. भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, केशवराव जेधे किंवा ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, शे. का. पक्ष, सत्यशोधक समाज अशा कितीतरी ज्ञात-अज्ञात, सामान्य-असामान्य व्यक्ती-संस्थांच्या उपेक्षित कर्तृत्वाची ओळख संशोधक रा. ना. चव्हाण करून देतात. ही नुसती ओळख नसते तर सत्यशोधक चव्हाणकृत मूल्यमापनच असते. मन मोठे असल्याखेरीज हातून उदारमनस्क अशी कृती घडत नसते. याबरोबरीनेच रा. ना. चव्हाणांचा आणखीही एक विशेष आहे : प्राचीन दार्शनिक प्रवाहापासून अत्याधुनिक समाजवाद, लोकशाही, निधर्मीवाद इत्यादी नवमूल्याधिष्ठित विचारप्रणालीपर्यंत सर्वत्र रा. ना. चव्हाण समर्थपणे मुक्त संचार करतात. त्यामुळे रा. नां.ची मुळची विचारप्रवर्तकता अधिकच गहिरी होऊन येते; आणि चौफेर विवेचनाला अर्थपूर्णता प्राप्त होते. उदा. "फुले-आंबेडकर यांच्यामध्ये शिंदे नसते तर पोकळीच राहिली असती." (उनि : पृ. १२५) असे रा. ना. चव्हाण लिहून जातात तेव्हा अशा अर्थपूर्णतेचा सहज प्रत्यय मिळतो.

वैचारिक सामाजिक नेतृत्वाची अपेक्षा

कुणालाही श्रद्धापूर्वक आदर वाटाला असे रा. ना. चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व होते. मितभाषी पण नेमके व मोकळे बोलणे हा त्यांचा स्वभाव होता; लीन व्हाव्या अशा विनम्रतेने अखंड कार्यशीलता त्यांनी जोपासली होती. अंतःकरणातील मार्दव, सौजन्य व ऋजुता ही त्यांच्या धमन्यांतून वाहत होती. आढ्यता गावीच नव्हती. अभिजात सुसंस्कृतपण रा. नां.च्या शब्दांतून अभिव्यक्त होई, तसे त्यांचे वागणेही होते. अनुभवसमृद्ध, अभिजात, सुसंस्कृत, मितव्ययी, संयमशील व नवतेचा स्वीकार करणारे ताजे टवटवीत मन ही रा. ना. चव्हाणांची दौलत त्यांच्या लेखनसंभारातही सजून-धजून अवतरली आहे. आपल्या लेखनासंबंधी, "...की, तत्संबंधीची सर्वच्या सर्व विवेचने व विधाने बिनचूक आहेत, असा प्रकार असणे शक्य नाही. म्हणून वाचकांनी मला क्षमा करून त्यांनी स्वतः विचार करावा." अशी रा. ना. चव्हाणांची विनम्र प्रार्थना आहे.

या प्रार्थनेत अभिप्रेत असणारा विचार कोणत्या मुद्यांवर व्हावा याचेही दिशादर्शन रा. ना. चव्हाण अधिकारवाणीने करतात. 'भारतीय दलितांचा प्रश्न आणि विठ्ठल रामजी शिंदे' या लेखात रा. ना. सांगतात, *".....यापुढील प्रगती विद्यमान लोकशाही, मूल्यांचा विकास, निधर्मी धोरण, शिक्षण, पंचवार्षिक योजना या स्वातंत्र्योत्तर नव्या विचारमूल्यांतून होणार आहे. ......मागील इतिहास कोणत्याही प्रश्नांवर काही मर्यादित अनुभव सूचित करील पण क्रांतिकारक बदलासाठी नवे क्रांतिकारक पवित्रे, आर्थिक व विकासात्मक योजनेतून घ्यावे लागतील. भारतीय सर्वच समाज एकरस होण्यासाठी व स्वातंत्र्यातून एक नवराष्ट्र निर्मितीसाठी शिक्षण व लोकशाही या मूल्यांतून क्रांतिकारक बदल होण्याचे मार्ग पत्करले पाहिजेत. या मार्गातून गेल्या शतकात झालेल्या नवप्रबोधनाला यश मिळवून देता येईल. तळातील विविध दलितांची 'गरिबी हटली' तर राष्ट्रीय दारिद्र्याचा व दलितांचाही प्रश्न संपत आला, असे समीकरण सिद्ध होईल."* (उनि : पृ. १०६) वैचारिक सामाजिक नेतृत्वाच्या बांधणीची अपेक्षा बाळगणाऱ्या रा. ना. चव्हाणांच्या 'परिवर्तनाची क्षितिजे'चे हे 'नवदर्शन' आहे.

अनुक्रमणिका

औरंगाबाद एस्. एस्. भोसले

## अनुक्रमणिका

१.

## साहित्य, संस्कृती आणि समाजजीवन

भारतीय संस्कृती व समाज यांना एक सार्वजनिक स्वभाव आहे. तो जाणावा लागतो. भारतात जात-धर्म-पंथ-संप्रदाय-वर्ण-वर्ग या संबंधाने करावा एवढा विचार-विवेक थोडाच असतो. आज हजारो वर्षे तो चालू आहे, पुढेही सतत चालू राहणार, म्हणून हे सर्व विषय कमी महत्त्वाचे कधीच ठरत नाहीत. जुन्यांची जागा नवे घेते. पण नव्यातही जुन्यांचा अंशभाग राहतोच. जुन्या नव्यांचा संगम-समन्वय होऊन भारतीय संस्कृतीचा प्रवाह वाहत आला. भारतीय जीवनात संपूर्णपणे भूतकाळाशी म्हणजे जुन्याशी विग्रह घेता येत नाही. त्याचप्रमाणे साहित्य, संस्कृती, समाज व त्याचे समाजशास्त्र व एकूण प्रत्यक्ष जीवन यांच्यावरही नवी नवी आवरणे घालून विचार करता येतो. साहित्यिक गप्पा, असा एक प्रकार आहे, व ह्या गप्पांचा कार्यक्रम होतो. हा एक मुक्त चर्चेचा प्रकार आहे. यात औपचारिक प्रकार नसतो. तरी मुख्य अधिकारी असा, सूत्रधार असतोच. पण सर्वांना मते-आशय मांडता येतात. खंडन-मंडन चालू राहाते. साहित्यिक गप्पांचा फायदाही होतो पण ह्या बैठकी हलक्या फुलक्या, स्वरूपात भरतात. म्हणजे ललित प्रकाराला कादंबरी-नाट्य वगैरेंच्या चर्चेला प्राधान्य असते. साहित्य-संस्कृती व समाज यामागे तत्त्वज्ञान असते. याची खोल उकल करण्याचा फार थोडा प्रयत्न होत असतो यासाठी वैचारिक वाङ्मय प्रकाराची कास धरावी लागते. समाज सामूहिकपणे जीवन जगतो. त्यामागे काही सूत्रे-तत्त्वे असू शकतात. याची जाणीव झाल्यास खरे समाजविज्ञान सापडू शकते. भारतीय धर्म व संस्कृती यामधील मूर्तीपूजा, अवतारवाद, ग्रंथप्रामाण्य, वर्ण-जात, स्पृश्या-स्पृशता, उंचनीचभाव, विषमता, मठ-मंदीर संस्था, जत्रा-यात्रा वगैरे जीवनात प्रत्यक्ष अस्तित्वात असलेले रूढ प्रकार व पद्धती यांचा अभ्यास व संशोधन करावे लागते. जे नाकारावे लागते ते अस्तित्वात का आहे? याचा शोध घ्यावा लागतो. पुस्तकाच्या बाहेर जग आहे व असते. अनुभव, निरीक्षण व परीक्षण यांच्याद्वारे आपणास खरे ज्ञान होऊन वस्तुस्थिती व वास्तव प्रगट करिता येते. पुस्तकी विद्या संकटकाळात उपयोगी पडत नाही. परहस्तगत धन वेळेवर मिळत नाही. युद्धशास्त्रावरील पुस्तके युद्धांना मार्गदर्शक होऊ शकतात हे खरे, पण प्रत्यक्ष युद्धात रणांगणात प्रसंगावधानच जास्ती लागते, व परिस्थिती पाहून निर्णय घेतले जातात. तरी पुस्तके मग कोणत्याही विषयावरची असोत मर्यादित अर्थाने का होईना, ती उपयोगी पडतातच. एवढे मात्र खरे की, 'पुस्तकी जगत्' व प्रत्यक्ष व्यवहार यात अंतर पडते. तत्त्वज्ञानाप्रमाणे कोणत्याच धर्माचे वर्तन असत नाही. तरी धर्माच्या मागचे पायाभूत तत्त्वज्ञान कळण्यासाठी तत्त्वज्ञानाची पुस्तके व त्यांचा अभ्यास जरूर आहेच. कागदावर साखर हा शब्द लिहिलेला वाचला म्हणजे साखरेची गोडी प्रत्यक्ष चाखली असे नव्हे. शब्द व त्याची प्रचिती यात अंतर असते. साहित्य जीवनाबरोबर जाते तरी प्रत्यक्ष जीवन व साहित्य (पुस्तकातील विचार) यात फरक पडतो. पुस्तक (ग्रंथ) याप्रमाणेच हुबेहूब जीवन कोठेच असू शकत नाही. वेद वेदानुयायी, बायबल व त्याला प्रमाण मानणारे, कुराण व ह्यांना सर्वांशी प्रमाण मानणारे म्हणजे जगातील धर्म व त्यांचे अनुयायी यात तफावत पडते. जात-धर्म-वर्ण-पंथ स्पृश्यास्पृश्यता ही सारी भारतात जन्मप्राप्त व वाडवडिलार्जित परंपरेने चालत आलेली असतात. म्हणून ती मिळविण्यासाठी मुद्दाम विशेष प्रयत्न येथे करावा लागत नाही. जणूकाही ती नैसर्गिक आहेत. समाजजीवनातील वरील चालू बाबी यांना सर्वांना पुस्तकांचा धर्मग्रंथाचा आधार असतोच, असे नव्हे. म्हणून धर्म पुस्तकांच्या-ग्रंथांच्या-बाहेरच्या बाबी समाजात असू शकतात. सगळ्यांनाच आधार-ग्रंथाधार-असतोच असे नव्हे. जाती-भेदावरील विचारापेक्षा वर्णाश्रमर्धावर धर्मेतिहासात जास्ती विवेक झालेला आढळतो.

अनुक्रमणिका

अलिकडे मात्र जातीसंस्थांचा अभ्यास पाश्चात्य पंडित येथे येऊन करीत असतात. प्रत्येक जातीचा असा पृथक धर्माचार असतो, पण पुष्कळशा जाती निरक्षर होत्या, व अद्यापही आहेत, म्हणून त्यांच्या धर्माचारासंबंधी ग्रंथ स्वतंत्रपणे निर्मित झालेला आढळत नाही. ग्रंथ-प्रविष्ट किंवा पुस्तकातून समावेशित झाले नाही. असे बरेच काही प्रत्यक्ष समाजजीवनात आढळू शकते. जणू काही 'समाज' हाच जिवंत ग्रंथ चालता-बोलता आहे, असे निरीक्षण व प्रत्यक्ष परीक्षण आणि स्वानुभवांती आढळते. समाजस्वरूपी ग्रंथ वाचण्याचे प्रयत्न होतात काय? प्रत्यक्ष काही अनुभव परीक्षणांती सापडतो का? समाज व साहित्य यात तफावत असते का? साहित्याने निकोप समाज निर्माण करावा अशी अपेक्षा त्याच्याकडून केली जावी. असा प्रयत्न करणारे कोण कोण झाले?

**प्रवास : निरीक्षण व स्वानुभव**

भूगोलाची पुस्तके माणसास भौगोलिक ज्ञान देतात हे खरे पण जगभर प्रवास करणे, स्वतः पाहाणे यामुळे जास्ती ज्ञान मिळते. पण अशी संधी फार थोड्यांना प्राप्त होऊ शकते. प्रवास-निरीक्षण व स्वानुभव यांचा लाभ होऊन ज्यांनी ज्यांनी साहित्य लिहिले त्यात सखोलता आढळू शकते. उदा. महर्षी शिंदे यांना प्रवास निरीक्षण व कार्यानुभव फार मोठा प्राप्त होता. कोणत्याही कार्यास सुरुवात करण्यापूर्वी त्या कार्याचा ते सखोल अभ्यास करीत. भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नावर त्यांचा ग्रंथ व पुढे मागे त्यांनी लिहिलेले लेख केवळ पुस्तकी ज्ञानावर आधारित नव्हते. पूर्वास्पृश्यातील अनेक प्रांतांतील जाती, जमाती, त्यांची राहणी, उद्योगधंदा, धर्म, आचारविचार यांचा भारतभर प्रवास करून नंतर त्यांचे साहित्य साकार झाले. असाच त्यांचा बौद्ध धर्मावरील अभ्यास हा जिवंत वाटतो. त्यांच्या लिखाणात विद्वत्तेची जडता नाही. उलट त्यांची जन्मभाषा कानडी असून त्यांनी मराठी सहज सोपी व सुलभतेने लिहिली आहे. जग पाहिले, ऐकील्यानंतर वेगळाच अनुभव येतो. जन्मभर अस्पृश्यतेच्या प्रश्नास प्रत्यक्ष वाहून घेतल्यामुळे त्यांचा कार्यानुभव व अधिकार मोठा समजला गेला व जातो. येथे जे विवेचन हाती घेतले आहे. व साहित्य संस्कृती व जीवन या संबंधाने सारासार विचार व्यक्त करण्याचे ठरविले आहे, त्याला महर्षी शिंदे यांचे जीवनानुभवातून व्यक्त झालेले साहित्य मार्गदर्शक ठरणारे आहे. समाज जीवनाचा म्हणजे समाजशास्त्राचा अभ्यास होय.

**पुस्तकाच्या बाहेरचे साहित्य व जीवन**

निरनिराळ्या सृष्टी कल्पिल्या जातात. वृत्तपत्र सृष्टी, पुस्तक विश्व, 'कामगार जगत्' वगैरे शब्दयोजना करून मर्यादित अर्थ व्यक्त केला जातो. विश्वाला अमर्याद अर्थ असतो, पण 'महिला विश्व' वगैरे तत्सम शब्दप्रयोग केले जातात. उदा. 'साहित्य विश्व' वगैरे वगैरे, सृष्टी किंवा विश्व यांना विशेषण जोडल्यास व्यापक अर्थाला मर्यादा पडते. पुस्तकी जगताच्या बाहेर विश्वाची व्याप्ती मोठी असते.

साहित्य हे पुस्तकाच्याद्वारे उपलब्ध होत असते. पण सर्वच साहित्य पुस्तकातून सामावलेले असते, असे नव्हे. लोकांतील व समाजातील सर्वच संकल्पना व जाणीवा पुस्तकांतून शब्दबद्ध केल्याच जातात असे नव्हे. ज्ञान-विज्ञान पुस्तकांच्या बाहेरही उरते व राहाते. लोकात मौखिकरीत्या असलेले साहित्य, ज्याला लोकसाहित्य म्हणतात ते सर्व पुस्तकबद्ध किंवा लिखित झालेले असते, असे नव्हे. पुष्कळ मौखिक साहित्य बुडते. अलिकडे मराठी भाषेमध्ये पुस्तकांची निर्मिती वाढली आहे. यामुळे पुष्कळसे ज्ञान व विचार पुस्तकांतून सामाविलेले गेले

आहे हे खरे पण पुष्कळ थोरामोठ्यांच्या आठवणी प्रत्यक्ष सहवासातून लिहिणे जाणे जरुर होते. पण त्यांची वाण आहे. चरित्रे व आत्मचरित्रे इंग्रजीत जशी दर्जेदार अनेक आहेत, तशी मराठीत नाहीत.

**लोकसाहित्य**

जनतेत व लोकांत नानाविध समाज थर होते व आहेत. पूर्वी मूठभर पांढरपेशांनी शहरी गद्य व पद्य स्वरूपात असलेले साहित्य प्रायः उपलब्ध केले. शिक्षणाच्या प्रसाराचा प्रांत व परीघ खेड्यापाड्यांपर्यंत पसरू लागल्यावर. त्यांच्यातून शिकलेल्या विचारी लोकांना वाटू लागले की, लोकांचे साहित्य जे अमाप आहे, त्याचे प्रतिबिंब एकूण उपलब्ध साहित्यात उमटलेले नाही. या नव्या जाणिवेतून लोकसाहित्य निघू लागले. लोकसाहित्याचा प्रकार जास्तीत जास्त ग्रामीण होता व असू शकतो. भारत खेड्यापाड्यांचा देश आहे. म्हणून जास्तीत जास्तपणे लोकसाहित्य हे ग्रामीण साहित्य असू शकते. लोकम्हणी जास्तीत जास्तपणे खेड्यापाड्यात लोकांत वापरल्या जाणाऱ्या असतात. लोकसाहित्य हे उच्चभ्रू पांढरपेशांच्या साहित्यापेक्षा वेगळेच वाटते. नागरी साहित्य व नांगरी साहित्य ह्या परिभाषेत हा भेद व्यक्त करीत येतो. म्हणी ह्या लोकांच्या भाषेतील बहुतेक असतात. त्यांना फारच अर्थ असतो. ह्या वास्तवाचा बोध करतात.

तुकारामाच्या अभंगाच्या ओळी म्हणी स्वरूपात वापरल्या जातात. निरक्षर व खेड्यापाड्यांतील लोकांत तुकाराम प्रवेश करीता झाला. हे लोकसाहित्य साधारणतः पाठांतरामुळे प्रसृत झाले. निरक्षर व ग्रामीण पुरुषांना व स्त्रियांनादेखील बुद्धी असते. म्हणून स्मरणशक्ती देखील असते. यामुळे निरक्षर बायाबापड्या व कित्येक पुरुषही अभंग पाठ करून लक्षात ठेवितात. ज्ञानेश्वरीच्या अवघड ओव्यादेखील निरक्षर जनतेतील काही लोकांना पाठ असतात.

पूर्वी वाचनापेक्षा श्रवणाने ज्ञान प्रसृत होईल. आता साक्षरता व शिक्षण वाढते आहे, म्हणून पुस्तकांची वाढ होत आहे. वाचक वर्ग वाढत आहे. त्यांची गरज असते म्हणून पुस्तके प्रकाशित होत असतात. छापण्याची कला निघाल्यानंतर पाठांतराची गरज दिवसेंदिवस कमी होत आली.

**ब्राह्मणांचे कार्य**

ब्राह्मण समाजाने वेद पाठ करून जतन केले. पाठ केलेले वेद ब्राह्मण पिढ्यानपिढ्या तोंडाने म्हणत व लोक ऐकत. म्हणून वेदांना 'श्रुती' म्हटले गेले. आज वेदग्रंथ छापील स्वरूपात मिळतात, म्हणून तोंडपाठ करून ज्ञान जतन करण्याची जुनी पद्धत मागे पडली, व वेदांची भाषांतरे करून ते वेद जगाला उपलब्ध करून दिले गेले. पूर्वी (व आताही) वेद लोकाप्रत गेलेले नसतात, म्हणूनही त्यांना लोकसाहित्य म्हणून म्हटले जात नाही. तुकारामाचे साहित्य अभंग स्वरूपात जनतेपर्यंत गेले व जाऊ शकते, म्हणून तुकारामाच्या अभंगांना 'पाचवा वेद' म्हणून संबोधितात. संस्कृतात लोकसाहित्य नाही.

अनुक्रमणिका

**संस्कृत बोलभाषा होती किंवा नव्हती?**

लोकसाहित्य जास्तीत जास्तपणे प्राकृतात असते. म्हणून सर्वच प्राकृताला लोकसाहित्य म्हणता येते व लोकसाहित्य प्राकृतातच छापले जाते, म्हणजे संस्कृतात छापले जात नाही. संस्कृतात छापण्याची गरज पडत नाही, म्हणूनही संस्कृत भाषा मर्यादित राहिली, व तिची वाढ व प्रसार थांबला. तिची जागा प्रत्यक्ष व्यवहारात प्राकृताने घेतली. प्राकृत चालू भाषा आता वर्धमान होऊन राहिल्या आहेत. भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर प्राकृत भाषांचे ज्ञानभांडार वाढत आहे. संस्कृत भाषा कोणत्याही प्रांताची राजभाषा होऊ शकली नाही, मग अखिल भारताची ती राजभाषा झाली नाही; यात नवल नव्हे, म्हणूनही संस्कृत भाषा ही लोकभाषा नाही. संस्कृताला विपुल लोकसाहित्य आहे असे म्हणता येत नाही. वेद व संस्कृत शिकण्यास कोणाची हल्ली बंदी, अडथळा व प्रत्यय नसतो. तरी फार मोठ्या प्रमाणात म्हणजे खेड्यापाड्यांपर्यंत संस्कृत व वेद यांचा प्रचार व प्रसार झालेला नाही. लोकसाहित्य हे संस्कृत पुस्तकांच्या बाहेरचे साहित्य ठरते; यावरून पुस्तकाबाहेरचे साहित्य असू शकते व होते. संस्कृत प्रधानकाळात प्राकृत भाषा प्रगत झाल्या नाहीत. ज्ञानाची भाषा म्हणजे संस्कृत भाषा असा अर्थ होता व आहे. साधुसंतांनी लोकोद्धारार्थ संस्कृतचे ज्ञान प्राकृतात आणिले. त्यामुळेही संस्कृताची गरज संपली. संतांचा छळ झाला; व त्यांनी ज्ञानप्रसारार्थ तो सोसला. आता बहुतेक संस्कृत ग्रंथांची भाषांतरे प्राकृत भाषेत उपलब्ध आहेत. म्हणून फारसे नडत नाही, यामुळे प्राकृत भाषांचे भवितव्य वाढले; त्या समृद्ध होत चालल्या. याचे श्रेय साधुसंतांकडे जाते, त्यापूर्वीच्या जैन-बुद्ध व महानुभाव यांच्याकडे जाते. आता तर भाषावार प्रांतरचना झाल्यामुळे प्राकृत भाषांना अधिक चांगले दिवस यावेत अशी आशा बाळगली जाते.

**ग्रंथ व पुस्तक**

सर्वसाधारणपणे धार्मिक पुस्तकांना ग्रंथ म्हणतात. संतांच्या गाथा या गठ्ठा स्वरूप असतात. गाथा म्हणजे गठ्ठा, यांना ग्रंथ म्हणतात. ज्ञानेश्वरी वगैरेंना ग्रंथ म्हणतात. धर्मग्रंथ प्रत्येक धर्मात असतात. धर्मग्रंथाशिवाय धर्म अस्तित्वात राहू शकत नाही. धर्म हा ग्रंथाधिष्ठित असतो व त्यांना म्हणजे धर्मग्रंथांना पूज्य व पवित्र मानतात. तसे जी पुस्तके धर्माखेरीज इतर विषयांवरची असतात त्यांना ग्रंथ म्हणत नाहीत. जी पुस्तके निंदाप्रचूर व हलकट विचाराने भरलेली असतात, त्यांना चोपडी-चोपडे म्हणतात. म्हणजे त्यांना पुस्तक म्हणण्यासही लाज वाटते, व ती निंद्य समजली जातात. अश्लिलता फारशी श्रेष्ठ समजली जात नाही.

प्राकृतातही धर्मग्रंथांची निर्मिती शक्य आहे. हे जैन-बुद्ध, शिख, वारकरी, महानुभाव यांनी सिद्ध केले. प्राकृताने सर्वसामान्य जनतेची पारमार्थिक भूक भागविली व भूक भागविते देखील. प्राकृत भाषा सजीव असतात. जगाच्याच साहित्यात धार्मिक व तात्त्विक साहित्याचा प्रथम मोठा भाग निर्माण झाला.

**धर्म व धर्मशास्त्र**

व्यवस्थितपणे ज्ञान व (विज्ञान) लिहिले गेले ते 'वेल अरेंज्ड' (Well Arranged) असले म्हणजे त्याला शास्त्र म्हणतात. वेदांना स्मृतींना शास्त्र म्हणतात. सहा शास्त्रे (षड्दर्शने) आहेत. हिंदूखेरीज इतर मुख्य मुख्य धर्मांना एकच ग्रंथ असतो. एकच प्रमाण असा हिंदूंना ग्रंथ नाही. अध्याय, खंड, समास वगैरेंच्या साहाय्याने ज्ञान

अनुक्रमणिका

प्रकरणवार, पोटविषयवार ग्रंथबद्ध केले असले म्हणजे त्यास शास्त्रीय स्वरूप येते. हिंदूत निरीश्वरवादी, पाखांडी व नास्तिक दर्शनांना देखील शास्त्र म्हणतात. वेद जे मानित नाहीत त्यांना 'नास्तिक' म्हणतात. पण जे धर्म वेदबाह्य आहेत, वेद मानित नाहीत अशा नास्तिक धर्मांनाही धर्मग्रंथ व धर्मशास्त्र असू शकते. चार्वाकांच्या ग्रंथांना असा मान आहे व तत्त्वज्ञानाच्या इतिहासात स्थान आहे.

पूर्वी ग्रंथकर्ते आपले नाव ग्रंथात नोंदवित नसत व ग्रंथारंभ कोणत्या तारखेस केला व ग्रंथांचे लेखन केव्हा संपविले वगैरे माहिती लिहिली जात नव्हती. म्हणूनही ग्रंथ हे ईश्वरकृत आहेत, अशी समजूत करून देण्यास मोठा वाव मिळाला. एकाच ग्रंथाचे अनेक कर्ते देखील होते. म्हणून एकाच ग्रंथकर्त्याचे त्यावर नाव नसते. म्हणूनही त्याला 'डिव्हाईन' म्हटले गेले. अद्याप धर्मग्रंथाचे कर्तृत्व ईश्वराकडे दिले जाते; व धर्मग्रंथ जे ईश्वरी आहेत, अपौरुषेय आहेत असा समज बळाविला गेला. पण असे होण्याचा व करण्याचा काळ आता राहिला नाही. वेद वगैरे सर्वच धर्मांचे धर्मग्रंथ मनुष्यकृत आहेत, हे सिद्ध झाले आहे. धर्मग्रंथ व धर्मशास्त्रे ही ईश्वरनिर्मित आहेत म्हणून ती अपरिवर्तनीय, शाश्वत व सर्वांशी प्रमाण आहेत, असा विचार विषमता व गुलामगिरी टिकवावी म्हणून उपयोगात आणिला गेला व लोकांनी तो मानला. म्हणून मानणारे गुलामगिरीत राहिले व त्यांनी पिढ्यानपिढ्या विषमता भोगली. धर्मग्रंथांत प्राक्षिप्त व मागाहून घुसडला गेलेला भागही असतो. म्हणून त्याची छाननी करणे अवघडच असते.

**अभंग व अखंड**

म. फुले यांनी धर्मग्रंथांचे ईश्वरीपण काढून घेतले व पवित्र मानिलेल्या धर्मग्रंथात सामाजिक अन्याय, भेदाभेद व विषमता आहे म्हणून असले ग्रंथ सर्वांशी प्रमाण नाहीत, ह्यावर म. फुले यांनी फार जोर दिला. धर्मग्रंथांची गुलामगिरी व दास्यत्व झिडकारून द्यावे लागले व लागते. आधुनिक काळी श्रीमान केशवचंद्र सेन व म. फुले यांनी वेदांचे प्रामाण्य झिडकारून दिले, यामुळे धर्मक्रांती शक्य झाली व होऊ शकते. बुद्धिवादाची वाट मोकळी होते.

'सार्वजनिक धर्म' पुस्तकाला त्यांनी धर्मग्रंथ म्हणून म्हटले नाही. पुस्तक (Book) म्हणून म्हणा असा त्यांनी आग्रह धरिला. कारण धर्मग्रंथ हे पिळवणुकीचे साधन होऊ शकतात. ग्रंथात खरे काय आहे व असत्य कोणते हे शोधण्यासाठी सत्यसंशोधन जरूर असते. यासाठी साक्षात्काराचा अवलंब करिता येत नाही. मनुष्य हा परमेश्वर असू शकत नाही व परमेश्वर हा माणूस नसते. निरवय व निराकार परमेश्वराला हात असू शकत नाही. म्हणून तो ग्रंथ लिहू शकत नाही हे एक. म. फुल्यांच्या विचाराचे आधारभूत सूत्र होते. सर्व भाषेतील लिखित वाङ्मय मनुष्यकृतच आहे व सर्वधर्म मनुष्यनिर्मित गुणदोषात्मकच आहेत. धर्म (सत्य) व अधर्म (असत्य) यांचा शोध करून माणसाने कोणत्याही धर्मातील व देशातील भाषेमधून सत्य घ्यावे. एवढ्यासाठी हेच सांगावे म्हणून म. फुले यांनी त्यांची पुस्तके लिहिली. डॉ. आंबेडकरांनी एकूण संशोधनात विद्वत्तापूर्ण भर घातली व इंग्रजीत विचार व्यक्त केल्यामुळे ते जगभर गेले व जाऊ शकतात.

अनुक्रमणिका

**परमेश्वर प्राप्तीचा मार्ग**

या जगात अस्तित्ववादी बहुसंख्येने असू शकतात व त्यापैकी पुष्कळांना परमेश्वराप्रत जाण्याची प्रामाणिक इच्छाही असते, परमेश्वर प्राप्ती हे ध्येय त्यांचे असते. धर्मग्रंथ मार्गदर्शन करितात, साहाय्यभूत होतात. पण नामस्मरण. जप, प्रार्थना, चिंतन वगैरे जे मानसिक (आध्यात्मिक) भक्तीचे प्रकार आहेत व पद्धती आहेत, त्यांचा अवलंब करिताना कोणत्याही धर्मग्रंथाची जरूरी नसते. वरील मानसिक साधनाने ईश्वराशी तादात्म्य पावता येते. अंध माणूस, निरक्षर स्त्रिया व पुरुष हेही वरील साधनांच्याद्वारे परमार्थाचा अधिकारी होतो. साक्षर-निरीक्षर असा भेद अध्यात्मात नाही. कोणत्याही धर्मग्रंथाची मध्यस्थीची जरुरी नाही. भाव हाच परमेश्वर. संतांनी धर्मशास्त्रांची गुलामगिरी याप्रकारे दूर केली व परमार्थ खुला केला. पुस्तके-ग्रंथ वाचता येत नाही तरी तीर्थयात्रा, तुळशीपूजन, हरिपाठ (म्हणजे अभंग पाठ म्हणणे), नामस्मरण, जप ही सोपी धर्मसाधने संतांनी बहुजनसमाजास दिली. वारकरी पंथाचा फायदा इतरेजनास म्हणजे दलितांसह सर्व निरक्षर समाजास झाला व अजूनही होत असतो. परमार्थात स्वानुभव मोठा गणिला जातो. अंतःप्रेरणा, 'आतला आवाज' (Inner Voice) यांचा पुरस्कार गांधींनी केला.

**धर्मशास्त्र व रूढी**

रूढीने समाज चालतो. धर्माच्या शास्त्राज्ञा बाजूसच राहतात. धर्म म्हणजे कायदा असा अर्थ घेतल्यास वहिवाट-रूढी-परंपरा ह्या धर्मशास्त्र ग्रंथापेक्षा व 'स्मृति' ग्रंथापेक्षा बळकट असतात. धर्मग्रंथात ज्या रूढींना आधार नसतो, अशाही रूढी कोणत्याही धर्मसमाजात प्रभावी असतात, यावरून धर्मशास्त्र ग्रंथापेक्षाही प्रत्यक्ष रूढीने चालणारे जग वेगळे असते. कोणत्याच धर्मातील सर्वच्या सर्व लोक त्यांच्या धर्माप्रमाणे व धर्मशास्त्राप्रमाणे वागत नाहीत. शास्त्रातील वांगी शास्त्रातच राहतात, इतर जे 'सेक्युलर' कायदे आहेत त्यांच्याही बाबतीत वहिवाट, रूढी, प्रत्यक्ष कबजा यांचा आधार महत्त्वाचा मानला जातो. यावरून पुस्तकाबाहेर- कायद्याच्या बाहेर-देखील जीवन असते. रूढी बऱ्या-वाईट असतात. पण त्या नित्य जीवनास आधार असतात. कायदे व नियम पुस्तकातच राहतात.

**आधार-संदर्भ-टीपा**

ज्यांना शास्त्राधार नाही, अशा रूढी चालू होत्या; तरी जीवनास पूर्वी धर्मशास्त्रांचा आधार असे. धर्मशास्त्री हे आधार काढून दाखवित; व शास्त्री-पंडितांच्या सभा भरवून त्यातून निर्णय दिला जाई. राज्यकर्ते मग ते कोणत्याही धर्माचे असोत ते ते त्या त्या धर्मातील विद्वानांचे सल्ले घेत; व ज्या त्या धर्माच्या लोकांना त्याच्या त्यांच्या धर्मशास्त्रानुसार न्याय दिला जाई. राजा सर्व धर्मांचा असे. म्हणजे त्यांचा स्वतःचा हिंदू, मुस्लिम व ख्रिस्ती धर्म जरी असला तरी दुसऱ्या धर्मातील लोकांना त्यांच्या धर्मातील लोकांना त्यांच्या धर्मातील आधारानुसार न्याय दिला जाई. समान नागरी कायदा नव्हता. भारत अनेकधर्मी (म्हणजे निधर्मी) सर्व धर्मी प्रत्यक्षात राष्ट्र होते व पुढेही राहणार, नाईलाज आहे.

अनुक्रमणिका

## नवे आधुनिक साहित्य

साहित्यात हल्ली निबंध-प्रबंधांना टीपा व संदर्भ शेवटी जोडण्याची पद्धत वाढत आहे. साधार विवेचन करावे लागते. पूर्वी अग्रलेख व निबंध वाङ्‌मय लिहिताना साधुसंतांची वचने व संस्कृत श्लोकांचे आधार घेतले जात. इंग्रजी आल्यावर मान्यवर इंग्रजी ग्रंथातील उतारे घेऊन आधारभूत विवेचन केले जाई व जाते. संशोधनालाही आधार लागतो. ग्रंथ, पुस्तके व जीवन यांचा संयोग असतो. पूर्व पुस्तकांच्या आधारे पुढील वाङ्‌मयाची निर्मिती होते. म्हणूनही जीवनाबरोबर जे जाते-वाहते ते साहित्य अशी साहित्याची व्याख्या केली जाते. कालानुसार साहित्याची स्वरूपे बदलतात. पण साहित्याशिवाय जीवनप्रवाह-विचारप्रवाह-अशक्य असतो. पूर्वी व्यक्त झाला नाही असा संपूर्ण नवा विचार असणे सांगणे फार अवघड असते.

## ग्राम्यभाषा

पूर्वी श्लील व अश्लील यांचा आचार-विचार होतच होता. ग्राम्यभाषेला अश्लिल भाषेचे स्वरूप असे व अद्यापही असते. म्हणून गावंढळ-गावठी वगैरे शब्द निर्माण झाले. तमाशात ग्राम्यभाषा जास्ती वापरली जाई, व तमाशे हे शृंगार रस गावकऱ्यांना पुरवीत, व पुरवतात देखील, तमाशे हे तामस असत. जत्रेत यांचा आविष्कार होई, लावणी ह्या छंदाच्याद्वारे शृंगार रस ओतप्रोत निर्माण केला जाई. लावणी हा छंद नागरी-गावठी-प्राकृत लोकांचा होता; परंतु पेशवाईत तो प्रतिष्ठित शहरी झाला; व वीररसप्रधान पोवाडे मागे पडले. ग्राम्यभाषा असंस्कृतांची पण पुणेरी संस्कृतीत ती रुळली गेली. जत्रेत तमाशे होत व होतात पण कुस्त्यांचाही फड भरविला जातो; व बाजारही भरतो. दुकाने थाटली जातात. अश्लिलता हाच एक ग्रामीण जावनाचा पैलू नव्हे. पुष्कळ अंगोपांगे असतात. ग्रामीण साहित्य, ग्रामीण संस्कृती व ग्रामीण शेतकरीधर्म अत्यंत जुना व गावे वसली तेव्हापासून चालत आला. ग्रामीण साहित्य हे पूर्वी होते व आजही आहे. ब्राह्मणाची लेखणी व महारांचे गाणी हा प्रकार व भेद होता. आंबेडकरी दलित साहित्यात कवितेचा हल्ली पूर वाहत असतो. याचे कारण गाणी गाण्याची व कविता करण्याची परंपरा होती. 'कलगी-तुरा' या पद्धतीने वेदांताचा प्रसार केला जाई. पण आता हा प्रकार दुर्मिळपणे आढळतो. 'कलगी-तुरा' ग्रामीण भागात लोकप्रिय होता. हा लोकसाहित्याचाच भाग होता.

## तमाशे-जलशे

सत्यशोधक चळवळीचा प्रसार व प्रचार १९०६-०७ नंतर तमाशांच्याद्वारे/लावण्यांच्याद्वारे करण्याची प्रथा लोखंडे-महामुनींच्या काळापासून चालू झाली. पूर्वी फुले-भालेकर यांनी काव्य, पोवाडे वगैरे प्रकार वापरला होताच. पण तमाशे व जलशे यांचा संचार शाहू महाराजांच्या काळात चालू झाल्यामुळे सत्यशोधक चळवळ भासमान झाली. दिसू व ऐकू येऊ लागली. ग्रामपद व ग्रामस्वरूप पावली. पण त्याबरोबरच ती अश्लिल आहे, असाही अपभ्रंश व समज निर्माण झाला; पण १९३० नंतर सत्यशोधक तमाशांची-जलशांची-गरज संपली. गरजेतूनच साहित्यप्रकार निर्माण होतात. गरज संपल्यानंतर अस्तित्वात आलेले प्रकार आपोआप मावळतात. भूतकाळाचे होतात. समाजाची स्मरणशक्ती अल्प असते. विसर चटकन् तयार होतो. 'शिव्या' हा भाषाप्रकार प्रत्येक भाषेत व सर्व जगात आहे. संस्कृत ही व्याकरणबद्ध शास्त्रीय भाषा कधीच जानपद नव्हती म्हणून तिच्यामध्ये शिव्या नसाव्यात, पण मूर्ख, यवन, राक्षस वगैरे निंदा करण्यास जरूर असलेले शब्द आहेतच.

संस्कृतात शृंगार ओतप्रोत आहे. चावट भाग आहेच. शिव्या दिल्याखेरीज निंदा-टीका अपूर्ण राहिल्यासारखी वाटते. तुकाराम परखड, सरळ व सडेतोड होता म्हणून त्याच्यात शिव्या आढळतात व ग्राम्यभाषा आढळते. ग्रामीण लोकांना समजेल असे काव्य त्याने केले. लोकसाहित्याचा तो एक जनकच म्हणावा लागेल. पुष्कळांचे साहित्य-पुस्तके-कपाटातच राहतात, साधुसंत याप्रमाणे फक्त कपाटातच राहिले नाहीत. समाजाचे जीवन सुधारण्यास त्यांनी यश मिळविले. समाजच जास्ती धार्मिक आहे. म्हणून धार्मिक वाङ्मय जास्ती खपते.

**निष्कर्ष**

समाजाच्या जीवनाचा अभ्यास करणे झाल्यास समाजानुभव घेतला पाहिजे. वास्तव पाहिले पाहिजे. संस्कृती विकृती निर्माण होऊ शकते. उदा., देवदासी पद्धत निर्माण झाली तेव्हा, तिच्यामागे उदात्त हेतू नव्हताच असे म्हणता येत नाही. विकृती नाहीशी करून संस्कृती शुद्ध करणे, हा देखिल साहित्याचा उद्देश असावा. जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते, पण साहित्य हे जीवनाला नीट वळण लावू लागले म्हणजे खऱ्या प्रबोधनास व पुढे परिवर्तनास सुरुवात होऊ शकते. पुस्तकांचे-ग्रंथांचे महत्त्व व महिमा कमी करावा, हा ह्या लेखाचा उद्देश नाही. परंतु वेगवेगळी पुस्तके वाचून त्यांचे आधार घेऊन शोधनिबंध प्रायः तयार होतात. व आधारभूत ग्रंथांची यादी वाढते. शाधनिबंध लिहिणाऱ्याने त्याचे मत, त्याचा स्वानुभव, त्याचा स्वतःचा विवेक, त्यात व्यक्त केल्यास अधिक ठीक. साहित्य हे नुसते खटाटोपीचे होऊ नये. समाजाच्या जीवनात उत्तरोत्तर सुधारणा-प्रगती-विकास होत आहे किंवा नाही? साहित्य वाचले जाते किंवा नाही? लोकाप्रत ते किती पोहचते? हे साहित्य निर्मित करणाऱ्याने तपासले पाहिजे. उदा., राष्ट्रीय एकात्मकतेसंबंधी आज बराच विचार होत असतो. पण आपल्या सर्वांचे व सर्व प्रांतातील लोकांचे प्रत्यक्ष जीवन एकात्मकतेकडे चालले आहे का? एकूण भारतीय समाज जीवन कुठे चालले आहे? हे साहित्य-संस्कृतीच्या संदर्भात वारंवार पडताळून घेतले पाहिजे.

अनुक्रमणिका

२.

## नवसमाज प्रबोधनाची गरज

कोणत्याही काळात झालेले समाजप्रबोधन पुढील काळात सर्वथैव उपयोगी होत नाही. मागील प्रबोधन, भारत पारतंत्र्यात असताना झाले; म्हणून त्याला त्या काळाच्या मर्यादा पडल्या. 'नवसमाज-प्रबोधनाची गरज' म्हणजे झालेल्या प्रबोधानाची समीक्षा करून नव्या गरजा लक्षात घेण्याचा प्रयत्न करणे हा उद्देश आहे.

आधुनिकतेची वाढ, इंग्रजी राज्याचे आगमन, मिशनऱ्यांचे आगमन व त्यांचा आक्रमक धर्मप्रचार, इंग्रजी शिक्षण व नवे पाश्चात्य विज्ञान वगैरे जी अनेक कारणे झाली, त्यामुळे गेल्या शतकातील समाजप्रबोधन आविष्कारित झाले. हे सामाजिक प्रबोधन राममोहन यांच्या काळापासून म्हणजे सन १८५७ च्या उठावापूर्वीपासूनच अवतरत होते. इंग्लंडचे भारतातील व्हाइसराय लॉर्ड रिपन यांनी भारतात उदार व प्रागतिक धोरण स्वीकारल्यामुळे जागृतीची लाट वाढू लागली. लोकात नव्या आकांक्षा निर्माण होऊ लागल्या. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व औद्योगिक उन्नतीसाठी नव्या चळवळी निघाल्या. परिषदा भरू लागल्या. कित्येक विश्वविद्यालये निघाली. विद्याप्रसार वाढू लागला. दुष्काळ व दारिद्र्य यांचे अनुभव येऊ लागल्यामुळे पुढे जहाल राजकारणाचा उदय झाला. स्वराज्य शब्दाचा उच्चार होऊन मागणीला जोर आला. दहा दहा वर्षांनी देऊ केलेले हक्काचे हप्ते हिंदी जनतेस असमाधानकारक वाटू लागले. म. गांधींच्या नेतृत्वाखाली सर्वच भारतीय जनतेने आपआपसातील भेद विसरून स्वातंत्र्यच प्राप्त करून घेतले. दुसऱ्या महायुद्धानंतर जो जागतिक पालट झाला, त्यामुळे इंग्रजदेखील राहू शकला नाही; गेला! विशेषतः राजकीय जागृतीमुळे ही क्रांती झाली. इंग्रज जाताना भारत द्विखंड झाला. एकोणिसाव्या शतकातील सन १९४७ सालापर्यंतचा जमाना आता सर्वथैव पालटला. साम्राज्य टिकविण्यासाठी बनविलेली गोरी नोकरशाही व तिला साहाय्यक होणारे देशी नेमस्त राजकारण संपले. इंग्लंडमध्ये सत्ताधारी जो पक्ष होई, त्याच्या धोरणानुसार भारतात इंग्रजांचा बरावाईट कारभार चाले. पूर्ण स्वातंत्र्य एकपरी अचानक आल्याने, साम्राज्यवाद्यांची नीती संपली व आपण आपले मुखयार झालो. सर्व संस्थाने गेली. परावलंबन गेले व आता जनता लोकशाहीच्या द्वारे राज्यकर्ती झाली आहे. फाळणीमुळे अंतर्गत हिंदू-मुसलमान पूर्वीइतका प्रभावी होईलसे वाटत नाही. इतर पुष्कळशा वादांना इंग्रजांची फूस होती, ती देखील संपली. स्वराज्याचे सुराज्य करण्याची जबाबदारी आता भारतीयांवर आहे. राष्ट्रीय एकात्मकता व संरक्षणाची जबाबदारी देखील भारत यांची आहे. आता उन्नतीस व अवनतीस आपण स्वतःच जबाबदार आहोत. इंग्रजी राज्यातील पिढ्यांना त्या काळच्या मर्यादा पडल्या; अनुकरणाचा तसा कसलाच प्रकार आता नाही. पुष्कळ प्रकारे स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर क्रांती झालेली आहे; व सर्वांगीण विकास देखील होत आहे. नव्या प्रेरणा, नवी स्फूर्ती आता भारतीय समाजातूनच स्वावलंबनाने निर्माण झाली पाहिजे.

### नवी विचारमूल्ये व नवी दृष्टी

समाजवादी लाकशाही, निधर्मीवाद व विकेंद्रीकरण वगैरे मुद्दे नवे आहेत. पंचायत राज्याचे स्वरूप व अस्तित्व वेदकाळाच्याही मागील काळात होते; तरी आजचे सार्वजनिक पंचायत राज्य नव्या लोकशाही विकेंद्रीकरणावर अधिष्ठित आहे. स्वातंत्र्य येण्यापूर्वी सामाजिक व राजकीय सुधारणांची वाटचाल टप्प्याटप्प्यातून चालली होती.

अनुक्रमणिका

आता तो प्रकार मुळीच नाही. उत्पादनवाढ, लोकसंख्येचे नियोजन, औद्योगिक प्रगती वगैरे दृष्टीने नवी वाटचाल चालू आहे. ह्यासाठी योजना आखल्या जातात. जी प्रगती व्हावयाची आहे ती पंचवार्षिक योजनांतून होणेची आहे. योजनांच्या यशावर भविष्यकाळ अवलंबून आहे. स्वातंत्र्यपूर्वीचा इतिहास आता सर्वथैव मार्गदर्शक ठरणारा नाही. पारतंत्र्याच्या काळात झालेले प्रबोधनाचे तेच स्वरूप आता सर्वप्रकारे उपयोगी ठरणारे नाही. होऊन गेलेले प्रबोधन प्राश्चात्य राज्य, संस्कृती, साहित्य व धर्म यांची व भारतातील परिस्थितीची गाठ पडली म्हणून निष्पन्न झाले होते. स्वातंत्र्यातील नवप्रबोधनाची तीच कारणे राहणार नाहीत. नवी घटना, आचार-विचार स्वातंत्र्य प्राप्त आहे, म्हणूनही गेल्या शतकात व्यक्त झालेले विचार पुनः तपासले पाहिजेत. स्वातंत्र्यात जे उपयोगी आहेत तेवढेच राखले पाहिजेत. नव्या व ताज्या दृष्टीची गरज आहे. विचारवंतांना आता इतिहासातच रुतून राहून चालणार नाही. कारण नवा भारत हा गेल्या शतकाप्रमाणेच राहणार नाही. चालू विसावे शतकही संपत आले आहे, बारा आणे तर संपून गेले, मागील संदर्भ सर्वच उपयोगाचे नाहीत. नव्या व आगामी काळाचा अन्वय/अर्थ नवा असणारा लोकहितवादी, फुले व आगरकर यांच्या काळातील समाजसुधारणांना विरोध राहिला नाही; आजच्या सामाजिक गरजा नव्या आहेत.

**मागील प्रबोधने**

जैन, बुद्ध, भागवत वगैरेंच्याद्वारे ज्या विरोधी-प्रॉटेस्टंट-धर्मचळवळी फार मागे झाल्या, त्या प्रायः आध्यात्मिक व धार्मिक होत्या. त्यावेळी परकीय आक्रमणे नव्हती. काही झाले तरी आक्रमक येथे राहिले नाहीत. पूर्वीचे आर्य येथे राहिले ते स्थायिक झाले. आता आर्य-आर्येतर भेद नाही. मुसलमानी बादशहा व दक्षिणेतील सुलतानी राजे येथेच राहिले. त्यांना तोंड देणारी लहानमोठी राजकीय व धार्मिक प्रबोधने झाली. पण त्यांचेही कारण धर्मरक्षण करणे हेच होते. शिवाजीच्या राज्याचे कारणही मुख्यतः धर्मरक्षणाचे होते. संस्कृती टिकविण्यासाठीच धर्मप्रधान लहानमोठी प्रबोधने झाली. १९५७ च्या उठावाला देखील धार्मिक कारणे झाली. बहुतेक प्रबोधक धार्मिक पुरुष होते. भारतावरील अध्यात्माची छाप व त्याचा सनातन धर्मपिंड नाहीसा झाला नाही, होत नाही व संपूर्ण होणार नाही. भारत व अध्यात्म याचा विग्रह होणे अशक्य. पाश्चात्य व युरोपीय नवी संस्कृती येथे अवतरल्यावर ब्राह्मो समाज निघाला. महाराष्ट्रात परमहंससभा, प्रार्थना समाज व नंतर सत्यशोधक समाज स्थापिले गेले. हे काळाने नवयुगधर्म होते तरी त्यांचे मूळ स्वरूप आध्यात्मिक व धार्मिकच होते. धर्मनिरपेक्ष-इहवादी-असे संपूर्ण प्रबोधन एकही झाले नाही. अशा प्रकारचा हा नवा विचार, स्वातंत्र्य आल्यावर जोराने उगम पावलेला आहे. नाहीतर राममोहन, दयानंद, केशवचंद्र सेन, जोतिबा, गांधी, राधाकृष्णन्, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रानडे-भांडारकर व डॉ. आंबेडकर वगैरे सर्व प्रबोधक अध्यात्म व धर्म ह्याचाच पाया मंजूर करणारे झाले. हल्लीचे विनोबा व सर्वोदयवादी नेते धर्म व अध्यात्मप्रधानच आहेत.

मार्क्सवादी पक्ष व त्याचे विचार दुसऱ्या महायुद्धानंतर जास्ती इकडे आले, पण त्यांनाही जडवादी व विज्ञानवादी दृष्टिकोण निर्माण करता आला नाही. सर्वसामान्यतः त्यांनी आर्थिक व राजकीय विचारप्रपंच केला. अज्ञाननिवारणाचे फार मोठे सांस्कृतिक कार्य त्यांनी हातातच घेतले नाही; व खेड्यापाड्यांना त्यांचे नवविचार शिवले देखील नाहीत. समाजवादी पक्षाची हीच गती झाली व होत राहिली. विज्ञानवादी दृष्टिकोण फार मोठ्या प्रमाणात कोणीच निर्माण करू शकले नाही, व यापुढे तो मुख्यतः करावयाचा आहे.

अनुक्रमणिका

राममोहनच्याद्वारे जे नवप्रबोधन अवतरले ते भारतीय सनातन मूळ धर्माला व नव्या काळाला जवळ असूनही, ते खेड्यापाड्यांत उतरले नाही व पोहोचलेही नाही. मागील कोणतेही प्रबोधन संपूर्णपणे यशस्वी झाले नाही. जैनबुद्धांच्या उलट वेगळ्या जाती झाल्या. त्यांच्यात उपजाती धर्मभेदावरून पडल्या; चार वेदांमुळेही भेद पडून उपजाती झाल्या, असेही नव्हे. भागवतधर्माची फक्त वेगळी जात झाली नाही. वारकरी व प्रार्थना समाज-नवा भागवतधर्म-ह्यांची मात्र वेगळी जात नाही. जैन-बुद्धात पुष्कळ साम्य असूनही अलगच ते राहिले. जैन व बुद्धाची येथे लहानमोठी राज्ये झाली. अशोकाचे तर साम्राज्यच होते, म्हणजे धर्मसुधारणा वाद्यांनाही राजकारणे करावी लागली. हल्ली तर राजकारण अटळ झाले आहे. सर्व प्रबोधने ही उत्थाने (uprising) होती. धर्मसुधारणा व स्वधर्मशुद्धी हा त्याचा प्रधान हेतू होताच. धर्मांतरे रोखली गेली. आर्य समाजामधूनच प्रत्यक्षाप्रत्यक्ष हिंदू महासभा हा राजकीय पक्ष निघाला होता. शिक्षणप्रसाराच्या, जागृतीच्या बाबतीत नवयुग समाजाना यश येत गेले. ह्यांनी समाजकल्याणात्मक कार्याचा पाया घातला. राजकारण जरी ह्या नवसमाजानी पारतंत्र्याच्या इंग्रजी काळात, वर्ज्य मानले होते तरी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीच्या पुढे १९३३ पर्यंत तरी वेगळा राजकीय पक्ष झाला. प्रार्थना समाजी बहुतेक (महर्षी शिंदे वगळून) नेमस्त व राजकारणात मवाळ होते. ही प्रागतिक व उदार राजकारणे स्वातंत्र्यात संपली. ख्रिस्ती राज्य गेल्यामुळे ख्रिस्तीकरणाला इंग्रजांचे असलेले प्रत्यक्षाप्रत्यक्ष साह्य संपले. भारतात व सत्ताधारी काँग्रेसमध्ये हिंदूच पुष्कळ म्हणजे बहुसंख्यांक आहेत. बहुजनसमाज हिंदूंचाच आहे. हिंदूंनी कोणत्याही अल्पसंख्याकांचे भय आता धरणे, हे त्याचे दौर्बल्य ठरेल. म्हणून जातीधर्माधिष्ठित (विघटित) समाज प्रबोधनाची पूर्वगरज संपली. निधर्मी घटनेमुळे अल्पसंख्यांकांना संरक्षण व अभय प्राप्त झाले आहे-व ते राष्ट्रीय प्रवाहाशी पुढील काळात अधिकाअधिक एकरूप होऊन जातील. कारण राखीव जागा व खास सवलतींची गरज उत्तरोत्तर राहणार नाही. पुढे ही गरज संपणार आहे. गरज राहील तोपर्यंत दलितांचा प्रश्न वेगळा असा शिल्लक राहील.

**समाजाची आगेकूच**

स्वातंत्र्यात सर्वच समाजाची आगेकूच चालली आहे. अतिमागासलेले व मागासलेले ह्यांच्यासाठी खास व राखीव प्रयत्न व सवलती वाढल्या आहेत. समाजसुधारणा म्हणजे आता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सबल करणे, अशी नवी व्याख्या करणे क्रमप्राप्त झाली आहे. चालू काळ अर्थप्रधानतेचा आहे. केवळ परलोकवादी धर्माचा काळ राहिला नाही. म्हणून परमार्थशिवाय इतर विज्ञाने व ऐहिक शास्त्रे याचा विचार-आचार उत्तरोत्तर अधिक वाढत आहे. प्रांताप्रांतात तरी समाज बाह्यतः तरी ऐनजिनशी व पुष्कळसा एकसारखा बनत आहे. मागील शतकात व ह्या शतकातील पहिल्या काळात इंग्रजी परकीय राज्य असल्यामुळे धार्मिक व सामाजिक विचार व सुधारणांचा जास्ती विचार झाला. आधी सामाजिक का आधी राजकीय? ह्या वितंडवादामुळे का होईना, धर्म व समाज ह्यासंबंधी गेल्या शतकात पुष्कळ विचार झाला. विरोधी दृष्टीतून महाराष्ट्रात चिपळूणकर-टिळक यांनीही पुष्कळ विचार व्यक्त केले, म्हणून उभय बाजूने विचारविनिमय झाला. ह्या वादांच्या आड इंग्रज येत नसे. हिंदी पुढाऱ्यांच्या राजकीय हालचालीवर त्यांची उघडी व गुप्त देखरेख असे, पण सामाजिक, धार्मिक चळवळी व सुधारणांना अनेक कायदे करून परकीय सरकारने पाठिंबा दिला. म्हणूनही मागील समाजप्रबोधन अखिल भारतीय झाले. तत्पूर्वी देश विविध राजांच्या राज्यात विभागला गेला होता. म्हणून सलगता नव्हतीच, ह्यामुळे अखिल भारतीय चळवळी व विचारविनिमय आणि त्यासाठी सामाजिक, राजकीय, औद्योगिक परिषदा होतच नसत. अखिल भारतीयत्व व दृष्टी प्राप्त झाल्यामुळेही भारतीय समाजाची आगेकूच झाली. मिशनऱ्यांनी

सर्वप्रकारच्या क्षेत्रातील सुधारणांचा धर्मप्रसाराच्या मोहाने अवलंब केला, तरी पुढे हिंदी नेते त्यातून जागृत झाले; व स्वावलंबी प्रयत्न करू लागले, ह्यामुळेही समाजाची आगेकूच झाली. शतकभर जातिभेद, पार्थिव पूजा व अस्पृश्यता ह्या राष्ट्रीय त्रिदोषांविरुद्ध वैचारिक खूप प्रचार झाला. म्हणून ह्याचा उघडा पुरस्कार व प्रचार फारसा कोणी करीत नाही! राष्ट्रीय, भावनिक ऐक्य व एकात्मकता ह्यांना, ही विविधता व अलगपणा पोषक नाही; ह्यांचा दुष्परिणामाधिक्यामुळे हे सिद्ध झाले आहे. निधर्मी लोकशाहीचे नवे विचार ह्या त्रिदोषांना पूरक नाहीत. समाज इहवादी उत्तरोत्तर होत आहे. धर्माचार व कर्मकाण्ड दुय्यम, गौण व प्रासंगिक झाले आहे. इंग्रजांच्या काळापेक्षा किंवा पूर्वीच्या धर्मवेड्या राजवटींच्यापेक्षा चालू काळ निधर्मीवादास पूरक झाला आहे, साजेसा आहे. धर्माची-पथाची लडथड व लुडबूड आता व्यर्थ व अस्थानी ठरत चालली आहे.

परधर्मीय राजे राज्य करीत होते तेव्हा त्यांच्या धर्माचे प्रजा अनुकरण करीत असे. 'यथा राजा (आता घटना व राज्यकारभार) तथा प्रजा' ह्या न्यायाने निधर्मीवादी प्रजादेखील उत्तरोत्तर होणार, होत आहे. समाजाचे नवे प्रबोधन व नवजागरण होण्यास नवा स्वातंत्र्याचा काळ पूरक व प्रोत्साहनकारक खास आहे. म्हणूनही नवप्रबोधनाचे स्वरूप व प्रयोजन लक्षात आणले पाहिजे. यासाठी पुनः नवधर्मसंस्थापना करण्याची जरुरी नाही. ह्यामुळे नवपंथ निर्माण होऊन त्यांचीही नवी जात होते.

**धर्मनिरपेक्ष सामाजिक दृष्टी**

मागील समाजप्रबोधने धर्माधिष्ठित होती. आता संपूर्ण सामाजिक प्रबोधने अवतरण्यास हरकत राहिली नाही. धर्म म्हणजे येथे हिंदू-मुसलमान ख्रिस्ती वगैरे जातीचे धर्म असाही अर्थ घेणे अटळ आहे. ह्या सांप्रदायिक व वाडवडिलार्जितपणे प्राप्त होणाऱ्या धर्मपंथांच्या पलिकडे जाऊन सर्वच भारतीय समाजाच्या सुधारणेविषयी-विकासाविषयी आपण मुक्त विचार व आचार करण्यास स्वतंत्र आहोत. धर्मांचे तरी प्रयोजन कोणते होते व असू शकते? समाजधारणा हेच प्रयोजन असू शकते. म्हणजे धर्म समाजासाठी असतो. वारंवार झालेली परिवर्तने समाजधारणेसाठी झाली व होतात.

न्या. रानडे यांना विशेषाने धर्मप्रबोधनाची गरज भासली; कारण असे होते की, अव्वल इंग्रजीतील नव्या शिक्षणामुळे नवशिक्षित नास्तिक होऊ लागले होते; रानडे यांनी समाजाची म्हणजे अखिल भारतीय समाजाची सामाजिक सुधारणा व्हावी म्हणून स्वतंत्र अ. भा. सामाजिक परिषद भरविण्याचा नवा उपक्रम चालू केला होता. ही परिषद तत्त्वतः सर्वधर्मीयांची होती; सर्व धर्मांसाठी होती. म्हणजे धर्मनिरपेक्ष होती. पण रानड्यांची ही सर्वांगीण भारतीय दृष्टी फारशी कोणी लक्षात घेतली नाही. रानड्यांचा नेमस्तपणा आडवा आला असेल. आजही सामाजिक परिषदेचे तत्कालीन ठराव पाहिल्यास ते धर्मातीत होते, असे समजू शकते. आता तर समाजशास्त्रावर स्वतंत्र साहित्यही उत्तरोत्तर उपलब्ध होत आहे. सामाजिक असा सर्व हिंदी-भारतीय-लोकांसाठी नवा विचार उदय पावत आहे. परिभाषा देखील बदलत आहे. प्रश्न नवे आहेत; गरजा नव्या आहेत.

गेल्या शतकातील काही काही उपक्रम दूरदृष्टीचे होते, पण त्यांचा पराभव झाल्याने देशाची हानीच झाली. कारण विविध धर्मपंथांत विखुरलेला भारतीय समाज एकसंघ झाला नाही. राष्ट्रीय सभेने देखील स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय विविध धर्म व भिन्न जाती यांचे ऐक्य पुरस्कारिले. अस्पृश्यतता निवारण हा प्रायः

अनुक्रमणिका

सामाजिक परिवर्तनाचा व समाजसुधारणेचा विषय होता. तरी तो राष्ट्रसभेने पत्करून कार्यक्रमात गोविला. ह्यावेळी अखिल भारतीय सामाजिक परिषद मोडली होती. राजकीय, आर्थिक व सामाजिक असा भिन्नभिन्न स्वतंत्र प्रांत कधीच करता येत नाही; ह्याची एक साक्ष ठरली. नवे प्रबोधन देखील एकांगित असणार नाही, म्हणजे ते 'डॉग्मॅटिक' व साचेबंद राहाणार नाही.

**राष्ट्रीय एकात्मकतेचा विचार**

रानड्यांच्या सामाजिक परिषदेच्या मागे एकात्मकतेचा विचार होता. ही एकात्मता आता राष्ट्रीय व अखिल भारतीय पातळीवरून पुनः विचारा-आचारात घेण्याची नवी गरज निर्माण झाली आहे. निधर्मी, समाजवादी लोकशाहीतून व विशेषतः शिक्षणक्रमातून एकात्मकता व भावनिक ऐक्य निर्माण करण्याची गरज आहेच; व एकात्मकता टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी सतत प्रयत्न चालू ठेवण्याची जरुरी आहेच. राष्ट्रीय एकात्मकता साधण्याचे माध्यम 'धर्म' हे होऊ शकत नाही. धर्म व तत्त्वज्ञाने ह्यांच्यावर सर्वांचे एकमत होऊ शकत नाही, असा गतेतिहासाने निर्वाळा दिला आहे. आर्य समाज व ब्राह्मो समाज ह्या समकालीन चळवळी होत्या व तत्वतः पुष्कळ साम्य असूनही त्यांच्या एकीकरणाचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. नवयुगधर्मसमाजामध्ये उपपंथ (मतभेद) निर्माण झाल्यामुळे देखील ते पुढे फारसे यशस्वी झाले नाहीत. आर्य समाज व इतर हिंदू यांचाही मिलाफ झाला नाही. बॅ. सावरकर यांना हिंदुत्वाची व्याख्या भौगोलिक (राष्ट्रीय) करावी लागली. म्हणून ती निधर्मी (जातीधर्मपंथ भेदातीत-संप्रदायातीत) म्हणावी लागते. सावरकरांच्या व्याख्येपेक्षा अधिक व्यापक व्याख्या पुढे आली नाही. आर्य समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज ह्यांनी ख्रिस्ती आक्रमणाची म्हणजे धर्मांतराची लाट पुष्कळ अंशी परतविली; व हिंदुधर्माचे परमोच्च स्वरूप व्यक्त केले. तरी परंपरावाद्यांना त्यांच्या हिंदुत्ववादी राष्ट्रीय कामगिरीचे स्वरूप समजलेच नाही. अद्यापही त्यांना वेगळे समजले जाते! ह्यांचे कार्य स्वातंत्र्य आल्यावर मंदावले आहे. ह्यांनीही आता आत्मपरीक्षणपूर्वक नवी दृष्टी घ्यावी.

स्वातंत्र्य आल्यानंतर नव धर्मसंस्थापना करून त्याच्या द्वारे एकात्मकता साधण्याचा पूर्वविचार म्हणजे, मागील प्रबोधनाच्या सुरुवातीचा विचार मागे पडला. आता तो काळ बराच कालबाह्य वाटतो. राष्ट्रीय एकात्मकतेसाठी इंग्रज आल्यानंतर हिंदु-मुसलमान व ख्रिस्ती ह्या तिघांनी एकेश्वरवादी धर्मांच्याद्वारे एक होऊन पुनः देशोद्धारार्थ एकीने प्रयत्न करावा, हा राममोहन यांचा विचार खुद्द त्यांच्या ब्राह्म समाजाच्याद्वारे यशस्वी झाला नाही. ख्रिस्ती व महंमदी धर्मांतील पोथीप्रामाण्य व एकाच ठराविक प्रेषितासंबंधीचा कडवा अहंकार उल्लंघता आला नाही, येत नाही. हे एक कारण घडले व हे नेहमीचे असते. राष्ट्रीय प्रवाहाशी एकस्वरूपता अजूनही पूर्ण साधली गेली नाही. जातीधर्म राजनैतिक ऐक्याच्या आड वारंवार आले व येतही असतात.

असा आधुनिक भारताच्या इतिहासाचा काही उलटा अनुभव आल्यामुळे देखील 'निधर्मीवाद' उदयास आला. निराग्रही व सहिष्णू जीवनपद्धती आणि आग्रही व जयिष्णू जीवनपद्धती यांचा समन्वय होणे कठीण ठरते. राममोहन नंतर महात्मा मोहनदास गांधी ह्यांनीही प्रयत्न केला. पण यश आले नाही. तरी त्यांचा ध्येयवाद प्रामाणिक होता असेच म्हणावे लागते. कोणताही आदर्शवाद अवघडच असतो. असामान्य माणसे तरी त्यांच्यासाठी यशापयशाचा विचार न करता प्रयत्न व महाप्रयत्नांचा सक्रीय पुरस्कार करीत राहतात. लो. टिळकांनी देखील लखनौ कराराच्याद्वारे स्वराज्य संपादनार्थ असे एकात्मकतेचे प्रयत्न मागे केलेच. राष्ट्रीय

प्रवाह एकस्वरूप राखण्याची गरज नेहमीच राहाते. भारतात सांस्कृतिक पिंडच ध्येयवादी आहे. विश्वात्मक दृष्टीला व मानवतावादी मनोरचनेला पूरक होणारी अशी भारतीय संस्कृती आहे व तिचे आदर्श संकुचित मुळातच नव्हते. म्हणूनही भारताचा भविष्यकाळ उज्वल राहील. मात्र अखंडत्वासाठी भारताला विविधतेतील एकविधता महत्त्वाची मानावी लागेल.

### लो. टिळक व म. गांधी यांचे विचार

निधर्मीवादाचा मागोवा मागील पुढाऱ्यांत घेता येतो. लो. टिळक व म. गांधी यांनी जे स्वराज्याचे स्वप्न पाहिले, ते देखील सर्वधर्मीयसमानत्वाचेच होते.

"हिंदुधर्मात अनेक मते असली तरी त्या सर्वांत एकसारखी सापडणारी अशी काही तत्त्वे आहेत. या तत्त्वामुळे एवढ्या मोठ्या विस्तीर्ण देशातील भिन्न भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांत एक प्रकारचा धर्मैक्यभाव राहिलेला आहे." ह्याही पुढे जाऊन लो. टिळकांनी अनेकवार राष्ट्रीय नवविचार व्यक्त केलेले आढळतात. ते सांगतात, "प्रत्येकाने जातीकडे व धर्मांकडे न पहाता सर्व राष्ट्राकरिता प्रयत्न केला पाहिजे." ('लो. टिळक यांची गेली आठ वर्षे : पा. ४१८ व ३६०). म. गांधी, राममोहन व रानडे यांच्या धोरणाला पाठिंबा देणारे असे उद्‌गार लो. टिळक यांच्यातही मिळतात. विश्वधर्माच्या पायावर हिंदुधर्मांचे परमोच्च स्वरूप दिग्दर्शित करण्याची ऐतिहासिक गरज होती. पाश्चात्य विद्वान व मिशनरी यांच्यातही हे परमोच्च स्वरूप दिसू शकले, दयानंदांचाही असाच उद्देश होता; व त्यामुळे हिंदुत्वाचा कसलाच तोटा झाला नाही.

म. गांधींनीही त्यांचे धोरण मोठ्या आत्मविश्वासाने मांडले आहे. 'निधर्मी' शब्द बाह्यतः 'निगेटिव्ह' (अकरणात्मक) वाटतो. पण ह्या धोरणाची वाटचाल राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासूनच दृश्य होऊ लागली. राष्ट्रीय सभेचे-(काँग्रेसचे) धोरण आरंभापासून सर्व धर्म व सर्व जाती यांच्यासाठी आहे, काँग्रेस निधर्मीच होती व आहे म. गांधी ह्यांनी देखील धर्म हा खाजगी व वैयक्तिक विषय आहे असे म्हटले आहे :

"If I were a dictator, relision and state would be separate, I swear be me religion, I will die for it. But it is my personal affair the state has nothing to do with it. The state would look after secular, welfare, health, communications, foreign relations currency and soon, but not your or my religion, that is everybody's personal concern." (Life and thoughts of Mahatma Gandhi. p. 79.)

निधर्मी शब्दाचे अर्थ अनेक केले जातात. 'सेक्युलर' (इहवादी) ह्या अर्थाने म. गांधी ह्यांनी पूर्वीचे त्यांचे धोरण स्पष्ट केले होते. येणारे व जे मिळवावयाचे ते स्वराज्य कोणत्या धोरणाचे राहील, ह्याबद्दलचे विवरण व स्पष्टीकरण म. गांधी यांनी खूप आधी केले होते. म्हणूनच त्यांना सर्वजाती व सर्वधर्म ह्यांचा प्रचंड पाठिंबा मिळाला. सर्व भारताचा विश्वास म. गांधी ह्यांनी जिंकला म्हणूनच सर्व भारताने गांधी यांचा प्रांत, भाषा वा जन्मप्राप्त जात वगैरे दृष्टीने म. गांधी यांच्याकडे मुळीच पाहिले नाही. एवढेच नव्हे तर सारे जग म. गांधी ह्यांना जागतिक महापुरुष म्हणून मानत होते व आजही हे त्यांचे स्थान ध्रुव आहे. मा. गांधी यांची सेक्युलर स्टेट ह्याची व्याख्या आजच्या मंत्र्यांनी व शासनाने सक्रीय लक्षात घ्यावी; व स्वतःला वाटणारा इष्ट देवधर्म व पूजाअर्चा वगैरे

अनुक्रमणिका

ही खाजगी बाब जाणावी. भारताचे एकात्मकत्व व प्रगती ह्या दृष्टीने म. गांधी यांचे विचार मौलिक आहेत. म. गांधी सामाजिक नेते देखील झाले.

निधर्मी दृष्टीचा 'सर्वधर्मसमभाव' म्हणजे जातीधर्मपंथसंप्रदायातीत दृष्टी असाही होतो. व तोही रचनात्मक व एकात्मकतेला आणि भावनिक ऐक्याला पूरक आहेच. भारतीय स्टेट जरी सेक्युलर, घटनेने ठरविले आहे तरी भारतीय नागरिक-रयत-प्रजा हिचा व्यवहार व खाजगी वर्तन 'सेक्युलर' पूर्णपणे व्हावे असा आग्रह लादला गेला नाही. धर्मस्वातंत्र्य, प्रचार-स्वातंत्र्य आहेच. मात्र धर्मांतराच्या खटाटोपीत काळाबाजार जो होत आला व स्वातंत्र्यातही चालू असतो, तो कायद्याने घालविला पाहिजे. राष्ट्रपिता गांधी ह्यांना धर्मांतरे मान्य नव्हती, निधर्मी होणे किंवा निधर्मीवादाचे आचरण करणे म्हणजे धर्मांतर करणे किंवा अधर्मी होणे नव्हे. निधर्मी हा शब्द निगेटिव्ह नाही; व मूळ 'सेक्युलर' हा शब्दच भारतीय वेगवेगळ्या भाषिकांनी वापरला तरी तो कालांतराने पूर्ण स्वदेशी देखील होईल.

'सेक्युलर स्टेट'ची आधुनिक पद्धत जगातील पुष्कळ राष्ट्रांतून अवलंबिली जाते. व ही कोणासही राज्यकारभार चालविताना अटळ आहे. भारतात म. गांधी यांच्यानंतर पं. नेहरूंनी हा विचार वाढविला व तो आता घटनेतही प्रवेश केला आहे. आता भारताला पुनः मागे जाता येणार नाही.

डॉ. आंबेडकर खूप आधी बुद्धधर्माचे चहाते होते व शेवटी बुद्धदीक्षा त्यांनी सामुदायिकपणे घेतली तरी भारतीय घटना बुद्धधर्माचीच असावी असा दुराग्रह त्यांनी मुळीच केला नाही. घटनेचे शिल्पकार ह्या दृष्टीनेही त्यांची ही संप्रदायातीत दृष्टी चिंत्य व आदर्श आहे. म. गांधी यांची आध्यात्मिकतेची व्याख्यादेखील व्यापक आहे. ती धर्मपंथनिरपेक्ष आहे. 'Spirituality is not a matter of knowing scriptures and engaging in philosophical discussions. It is a matter of heart culture of Unmeasurable Strength. Fearlessness is the first reguisite of spirituality. Cowards can never be moral' (Life and thoughts of Mahatma Gandhi : P. 78). म. गांधी ह्यांचे हे निर्भय विचार आजही सर्व भारतीयांनाच काय पण सर्व जगाला उपयुक्त आहेत. म. गांधी स्वतः पोथी प्रामाण्यवादी किंवा अवतार-विभूती प्रामाण्यवादी म्हणजे आग्रही नव्हते. सत्यासंबंधी त्यांचा आग्रह होता; निधर्मीवाद म्हणजे सत्य व अहिंसेचा अभाव नव्हे. निधर्मीवाद म्हणजे नीतिविहीनता नव्हे. भारतीय स्टेट 'सेक्युलर' आहे म्हणजे सेक्युलॅरिझम (इहवाद) भारतीय सरकारला आचरणीय ठरेल. पण भारतीय सर्व प्रजा (रयत लोक) त्याच्या व्यवहारात पूर्ण सेक्युलर होणार नाहीत. रशियात किंवा जगात असे कोठेही नाही.

**सांप्रदायिक ऐक्य व म. गांधी**

म. गांधी यांनी स्वतः निराळा संप्रदाय तयार केला नाही. गांधी सेवक संघ, सावली येथे झालेल्या ३-३-३६ रोजीच्या भाषणात म. गांधी म्हणाले, "गांधीवाद अशी काही गोष्ट माझ्या डोक्यातच नाही. मी काही संप्रदाय-प्रवर्तक नाही. तत्त्वज्ञानी होण्याचा मी कधी आग्रहही धरला नाही. माझा तो प्रयत्नही नाही..." "जर गांधीवाद हे संप्रदायाचे दुसरे नाव असले, तर तो संपणे हेच योग्य होय..." राष्ट्रीय एकात्मकतेची म. गांधी यांची दृष्टी फार व्यापक होती. सांप्रदायिक ऐक्य या संबंधाने म. गांधी यांचे उद्गार उपलब्ध आहेत. ते म्हणतात, "...या ऐक्याचा अर्थ केवळ राजनैतिक एकता असा नाही. कारण राजनैतिक एकता जबरदस्तीने लादली जाणे शक्य आहे.

**अनुक्रमणिका**

सांप्रदायिक एकतेचा अर्थ हृदयाची एकता, की जी तोडूनही तुटणार नाही, …दुसऱ्या परधर्मियांच्या बरोबर व्यक्तिगत मित्रता कायम केली पाहिजे आणि वाढविली पाहिजे. त्याने दुसऱ्यांच्या धर्माविषयी स्वतःच्या धर्माइतकाच आदर बाळगला पाहिजे…" ('गांधी तत्त्वज्ञान' : पा. १३९).

सर्वधर्मसमभाव हा गांधीजींचा प्राणभूत विवेक होता व स्वातंत्र्यानंतरच्या समाजप्रबोधनातही ह्या दृष्टीला महत्त्व आहेच. म. गांधी फार मोठे समाजप्रबोधक ठरतात. भारतात फार प्राचीन काळापासून जो धर्मविचार होत आला आहे तो मनुष्यजीवनाला उद्देशून आहे. अलीकडची, भारतात धर्माला लावावी लागणारी हिंदू-मुसलमान-ख्रिस्ती वगैरे जातीय विशेषणे मुळीच उपयोगात नव्हती. 'धर्म' ही सर्वसाधारण संज्ञा वापरून म. गांधींनी त्यांचे आध्यात्मिक विचार प्रगट केले होते. 'सत्य व अहिंसा' म्हणजेच धर्म व ईश्वर देखील होय, असा त्यांचा मुख्य आशय होता. स्वातंत्र्यानंतरच्या काळात म. गांधी यांचे व्यापक विचार जास्ती उपयोगाचे आहेत. "राजकारणापेक्षा समाजसुधारणेचे कार्य जास्त कठीण आहे" असे म. गांधींनी त्यांच्या अनुभवातून स्वच्छ म्हटले आहे. आजही समाजप्रबोधनासंबंधी फारच थोडा आचार-विचार होत असतो. "आपल्या अभागी देशात सांप्रदायिक ऐक्य जरूर होईल. ही उमेद मी सोडणार नाही…" सांप्रदायिक ऐक्यासंबंधी म. गांधी ह्यांचे वारंवार विचार व्यक्त झाले होते. निधर्मी दृष्टी हे जे स्वातंत्र्यातील अपूर्व म्हणजे पुष्कळपणे नवे ताजे राष्ट्रीय धोरण आहे. त्यासाठी ऐक्यासंबंधीचे म. गांधी यांचे विचार आज फार चिंत्य आहेत. त्याखेरीज निधर्मी दृष्टी उत्पन्नच होऊ शकणार नाही. नैतिक बळ हेच राष्ट्राचे परमोच्च सामर्थ्य असू शकते असा संदेश म. गांधी यांच्या चरित्राचे द्वारे मिळतो.

सुक्याबरोबर ओले नाहीसे करणे हा निधर्मीवादाचा उद्देश नाही. राष्ट्रीय एकात्मकतेचा, नव्या प्रबोधनात सांप्रदायिक ऐक्याचा समावेश होतो. राममोहनपासून निर्माण झालेल्या समाजप्रबोधनात हा विचार होता. सांप्रदायातीत राहून पुढे म. गांधी यांनी तो प्राणपणाने वाढविला. निधर्मिकतेच्या नावाखाली कोणालाही हे मागील प्रयत्न यशस्वी झाले नाहीत म्हणून, स्वातंत्र्याच्या नव्या काळात ते गौण व दुय्यम ठरविता येणार नाहीत. पण हा अशासकीय ठरणारा कार्यक्रम फारच थोड्यांनी हाती घेतला व पुढेही घेतील, असे दिसते. पण तो पुढेही अटळ राहील. नव्या समाजप्रबोधनाचा नवा वेध घेताना राममोहनपासून म. गांधी यांच्या अखेरपर्यंत जे प्रबोधन झाले त्याकडे संपूर्ण पाठ करता देखील येणार नाही. समाजप्रबोधनाचे भावी स्वरूप मागील व वर्तमानकाळाचे स्वरूप पाहून ठरवावे लागेल. म. गांधी यांचे विचार म्हणजे आपणा सर्वांना फार नजिकचे ठरतात. त्यांचे सर्वच विचार इतरांनी सर्वप्रमाण मानावेत असा त्यांचा आग्रह नव्हता. लो. टिळकांच्यापेक्षा म. गांधी यांचे व्यापक विचार भारतीय सेक्युलरवादाला जवळचे ठरतात. त्यांच्यानंतर नवसमाजप्रबोधन ह्याप्रमाणे अवतरले देखील आहे व सेक्युलर दृष्टी हा त्याचा एक पैलू व कणा असल्यामुळे एवढा विचारप्रपंच केला आहे. धर्मग्रंथासंबंधीचे अलिप्तपणाचे धोरण अजून प्रत्यक्षतः अंगवळणी मात्र पडावयाचे आहे. ते पूर्ण मुरले नाही. रुजवायचे आहे.

**लोकशाही कर्तव्य व नवे प्रबोधन**

लोकशाही ही भारतीय राज्यपद्धती आहे. 'सेक्युलर' स्टेट' असणे हा लोकशाहीने मान्य केलेला विवेक आहे, तत्त्व आहे. जातिवर्णभेद, अस्पृश्यता वगैरे उच्चनीच भाव व सामाजिक, आर्थिक विषमता ही लोकशाहीने अमान्य

अनुक्रमणिका

केली आहे. 'शुद्ध धर्म' ह्या माध्यमातूनच ती शिकवून मान्य केली जावी असेच केवळ नव्हे तर भारतीय लोकशाही समाजवादाला व निधर्मी दृष्टीला विषमता विरुद्ध ठरते, ह्या नव्या राष्ट्रीय व राजकीय दृष्टीतून तिचे वैयर्थ्यत्त्व जाणले गेले पाहिजे. कोणत्याही सुधारणेला मागील धर्मांचा आधार असो नसो, नव्या लोकशाहीत व भारतीय घटनेत जातिवर्णभेद, अस्पृश्यता पूर्णपणे नामंजूर केली आहे. जातीयता व राहिलेली अस्पृश्यता निधर्मी धोरणातून यापुढे घालवावयाची आहे. कोणत्याच जाती-धर्माधिष्ठित राजकीय पक्षाला भवितव्य नाही.

**सामाजिक विविधता व विषमता भूषणावह नव्हे!**

कुटुंबनियोजन हे देखील राष्ट्रीय कर्तव्य झाले आहे. धर्मांची त्याला मान्यता आहे किंवा नाही, हा प्रश्नच नाही, ते अटळ आहे. कारण चालू काळ अर्थप्रधान बनला आहे; व कोणत्याही प्रश्नांचा विवेक अर्थकारणातून मुख्यतः करावा लागतो; समाजकारणात अर्थकारण देखील येतेच. 'राष्ट्रधर्म' ह्याचा अर्थ राष्ट्रीय कर्तव्ये असाच करावा लागणार आहे. कर्तव्य अटळ असते. नागरिकांची कर्तव्ये नव्याने घटनेत बदल करताना ठरविली आहेतच. ती महत्त्वाची आहेत व त्यांच्यासंबंधी तरी मतभेद होण्याचे कारण नाही. नवी राष्ट्रीय आचारसंहिता पाहिजे होतीच.

ही जी कर्तव्ये मांडली जाऊन ठरविली गेली आहेत ती म्हणजे नवे समाज-प्रबोधनच होय व हे नवे समाजप्रबोधन सर्व नागरिकापर्यंत-खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले पाहिजे. हक्काची जाणीव झालेली दिसते, पण कर्तव्यासंबंधीचे ज्ञान देखील व्हावयाचे आहे. देशावर आक्रमण आले असतानाच देश मागीलप्रमाणे जागा व्हावा, असेच केवळ नव्हे. जागृती नेहमीच पाहिजे.

जो काही यापुढे बदल होण्याचा अभिप्रेत आहे व नव्याने लोकशाहीतून ठरविण्याचा आहे. तो पालट-शिक्षणातून, लोकशाहीतून, शासनाच्या व शासनाच्याद्वारे आणि राजकीय पक्षाच्याद्वारे (म्हणजे जो कोणताही राजकीय पक्ष लोकशाहीद्वारे सत्तेवर येतो त्याचेद्वारे) घडवून आणावयाचा आहे. कोणालाही आत्मपरीक्षणाला अग्रस्थान द्यावे लागेल, म्हणून प्रबोधनाचे स्वरूप नवे आहे; विधायकता हा नवप्रबोधनाचा विशेष आहे. विरोधासाठी विरोध ही वृत्ती देशाभिमानाची ठरणार नाही.

समाज व राष्ट्रप्रबोधनाचे कार्य राजकीय सर्व पक्षांनी केले पाहिजे. जरूर त्या समाजपरिवर्तनाचे कार्य राजकीय पक्षांचे देखील लोकशाही कर्तव्यच ठरते. कारण ही नवी राष्ट्रीय कर्तव्ये नव्या-जुन्या पंथांच्याद्वारे व संप्रदायांच्याद्वारे पार पडणार नाहीत. म्हणून नवीन माध्यमे योजली पाहिजेत. सामाजिक न्याय व अन्याय कोणता असू शकतो तो समाजाच्या प्रत्यक्ष अवस्थेतून दिसू शकतो. ह्यासाठी कोणत्याही धर्मग्रंथाचा आधार घेण्याची जरूरी राहिली नाही.

नवसमाजप्रबोधन धार्मिक प्रबोधनातूनच यापुढे मागीलप्रमाणे व्हावे, अशी नितांत गरज नव्या निधर्मी काळात जरुरीची राहिली नाही. माणसाला सत्असत्, विवेकशक्ती व बुद्धी निसर्गतः प्राप्त आहे व ह्याद्वारे योग्यायोग्य त्याला ठरविता येतेच. असे करण्यास नवा जुना पंथ पाहिजे असेच नव्हे, नवी प्राप्त विचारमूल्ये कोणती व कालबाह्य आचारविचार कोणता हे बुद्धीच्याद्वारे देखील जाणता येते, व जाणले गेले पाहिजे. या दृष्टीने

आगरकर पुढेही मार्गदर्शक म्हणून महत्त्वाचे राहतील. आगरकरांनी धर्मसुधारणेला विरोध केला नाही; व कोणताही नवा-जुना पंथ पुरस्कारला नाही.

धर्म व पंथ आणि संप्रदाय यांच्या जाती-पोटजाती सर्व धर्मांतूनच झाल्या आहेत. लोकशाहीत होणाऱ्या निवडणुकांतून जातीयतेचे नाणे जोपर्यंत प्रभावी असेल तोपर्यंत खरी लोकशाही आली आहे, असे म्हणता यावयाचे नाही; ही परिस्थिती केव्हा पालटणार?

जे ह्या लेखातील विवेचनाला नवसमाज-प्रबोधन असे संबोधिले आहे. येथे 'समाज' म्हणजे भारतीय लोक व अखिल भारतीय नागरिक असा व्यापक अर्थ आहे व समाजप्रबोधन यापुढे केवळ धर्मस्वरूपीच असून भागणार नाही, तर ते सामाजिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक वगैरे जीवनाच्या अंगोपांगात प्रगट होणे अगत्याचे आहे. म्हणजे परिवर्तन प्रत्येक क्षेत्रात हवे आहे. प्रत्येक थरात व वर्गात हवे. यासंबंधात नियतकालिके व साहित्यसेवक यांच्यावर जबाबदारी येते.

भारतीय विविध भाषेतील साहित्याने म्हणजे त्याच्या स्वरूपाने नवा जन्म घेतला पाहिजे. कारण लोकशाही कर्तव्ये नवी आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्य म्हणजे परतंत्र-मागील काळातील साहित्य-सर्वथैव नवे मार्गदर्शन करू शकणार नाही. नव्या प्रबोधनासाठी नवे साहित्य लागणारच. साहित्याने असलेले जीवन प्रतिबिंबितच करावे म्हणजे जीवनाबरोबर जात असावे असेच केवळ नव्हे. जिवंत साहित्याने इष्ट ते नवे परिवर्तन केले पाहिजे. साधन हे जुने दुरुस्त करण्यासाठीच केवळ नसावे; तर त्याने नवे घडवावे. नव्या जाणीवा द्याव्यात. नवा व ताजा वर्तमान विचार करावा व दूरदृष्टी देखील द्यावी. साहित्य म्हणजे केवळ कला किंवा कसब नव्हे. साहित्यसाधनेदेखील जुनी व कालबाह्य होतात. म्हणून नवे साहित्य निर्माण होत असते. नव्या साहित्याने नवी परिभाषा घेतली पाहिजे. निधर्मी धोरणाचे साहित्य देखील वाढले पाहिजे.

**शेवटी**

मागील समाजप्रबोधन धार्मिक-सामाजिक (Socio-Religious) होते. बुद्ध व संत ह्यांचे प्रबोधन प्रमुखतः आध्यात्मिक व पारमार्थिक होते. समाजरचना बदलण्याचा, प्रत्यक्ष उपक्रमाचा प्रचार एकोणिसाव्या शतकातील सामाजिक आधुनिक चळवळींनी केला. तो जरी यशस्वी ठरला नाही तरी अभिप्रेत समाजरचना होऊ शकते, हे अमान्य करता येत नाही. समाजरचना बदलण्याची नवी नवी निकड निर्माण होत असते व झाली आहे.

कोणतेही मागील समाजप्रबोधन संपूर्ण यशस्वी किंवा पूर्णतः अयशस्वी झाले असे म्हणता येत नाही. हुंडाबंदीची बाब मागील सुधारकांनी मांडली होती. तरी पण हुंडापद्धती जारी असल्याने माजी पंतप्रधानांनादेखील ह्या विषयावर बोलावे लागले. आंदोलने अशाच मागील प्रबोधनात व्यक्त झालेल्या सामाजिक विषयावर वारंवार स्वातंत्र्यात देखील करावी लागतात. रूढी अद्याप बलवत्तर आहेत. अनिष्ट रूढींचा त्याग झालेला नाही. विकृत्या वाढत्या आहेत. आक्रमण झाल्यावर मागे भारत वेळोवेळी जागा झाला. आता जनजागरण नेहमीच झाले पाहिजे, पूर्ण स्वातंत्र्यातील काळात वाटचाल करीत असताना नव्या समाजप्रबोधनाची गरज जास्ती भासतेच. भ्रष्टाचार रोखण्याचा महत्त्वाचा मुद्दा, म्हणजे देखील त्यावर प्रबोधन होणे जरूर आहे. कन्याविक्रय व

अनुक्रमणिका

सतीची चाल नाहीशी झाली. स्त्रियांना व विद्येत मागासलेल्यांना शिक्षण खुले झाले. होऊन गेलेल्या आधुनिक समाजप्रबोधनाचे बरेच यश देखील सांगता येते; पण ते अपुरे आहे.

बुद्ध-जैनांच्या नीतिप्रधान प्रबोधनाने हिंसाप्रधान यज्ञयाग संपले. भारतीय समाज जागा होता, असे प्रत्येक काळ दाखवितो. नीतिप्रधान समाजप्रबोधनाची आजही गरज आहे. राष्ट्राला नैतिक प्रेरणा मिळालीच पाहिजे; तरच संभाव्य अधोगती टळेल. स्वातंत्र्याच्या आगमनापूर्वी 'Public life must be spiritualised' असे म. गांधींचे गुरू गोखले म्हणत असत. रानड्यांचाही नैतिकमूल्यांवर भर होता. खाजगी व सार्वजनिक जीवनात म. गांधींनी जीवनाचे अध्यात्मीकरण म्हणजे सदाचारी वर्तनाचा आदर्श, स्वचारित्र्याद्वारे देशापुढे उभा केला आहे. ह्या बाबतीत चालू काळ पाहाता म. गांधी यांचे समाजप्रबोधन व त्यांचा आदर्श दृष्टिआड होत आहे, असे म्हणावे लागते. प्रत्येक व्यक्ती स्वतः सुधारली पाहिजे.

म्हणून नैतिक प्रेरणा देणारे अखिल भारतीय नवे प्रबोधन मुख्यतः आविष्कारित होण्याची जास्तीत जास्त गरज आहे. शिक्षणातून, लोकशाहीतून व राजकीय पक्षांच्याहीद्वारे आणि सत्तेच्याहीद्वारे ही प्रेरणा व शक्ती राष्ट्राला प्राप्त होणे अगत्याचे आहे. भारतातील विविध धर्मांनी आणि सामाजिक संस्थांनी देखील नैतिक प्रेरणा स्वतः वाढविल्या पाहिजेत. आध्यात्मिक, पारमार्थिक व धर्मपर विचार, नैतिक प्रेरणा वाढविण्यासाठीच असू शकतात. नवसमाज-प्रबोधनाचा विचार करताना मागील प्रबोधनामधील हा प्राणभूत मुद्दा नव्या स्वातंत्र्य काळात महत्त्वाचा व अग्रेसर गणावा लागतो. नैतिक चाड निर्माण झाल्याखेरीज स्वराज्याचे सुराज्य होणार नाही. विकास योजनांना व लोकशाही विकेंद्रीकरणाला यश यावयाच्या दृष्टीनेही अशा प्रबोधनाची नव्याने गरज आहे. कोणीतरी अवतार घेऊन हे नैतिक प्रबोधनाचे कार्य पुरे करील असे मात्र समजता येणार नाही. पूर्ववत अचिंत्य व अतर्क्य गूढ शक्तीवर अवलंबून राहून चालणार नाही. समाजप्रबोधन कोणी पुढे येणारा प्रेषित करील; हा भविष्यवाद विज्ञानयुगात टिकणार नाही. पुढील प्रेषिताच्या आगमनासंबंधी मागील धर्मग्रंथातून भविष्यवाणी आढळते; काळही निर्देशिलेला असतो पण असे परावलंबन नव्या जगात अप्रस्तुत ठरते. लोकशाहीत जास्तीत जास्त समाज बदलावयाचा असतो किंवा बदलून जाणे जरूर असते. जग वेगाने बदलत आहे. ज्ञान व विज्ञान यांच्या विकासाचा वेग पूर्वीपेक्षा मोठा आहे. समाज अशासकीयरीत्या जितका बदलतो तितका शासकीयरीत्या कायद्याने-पालटत नाही. संतांनी नैतिक प्रेरणा निर्माण केल्या, हे नाकारता येत नाही. संतांच्याजवळ किंवा गेल्या शतकातील प्रबोधकांच्याजवळ सत्ता नव्हती.

म. गांधीकाळात हे दिसून आले. म. गांधींनी अर्वाचीन काळात, त्यांच्या मागे जे भारतीय मोठे पुरुष होऊन गेले, त्यांना एकपरी झाकळून टाकले व उलटपक्षी राममोहन यांच्यापासून जे धर्म व समाजसुधारक झाले, त्यांना अपूर्व यश आणून दिले. अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीत म्हणावयाचे झाल्यास त्यांनी म. फुले-शिंदे ह्यासारख्या दलितोद्धारकांच्या प्रारंभिक कार्यास अखिल भारतात सामर्थ्य व नवे चैतन्य मिळवून दिले. राजकीय प्रबोधनाच्या बाबतीत देखील हाच अपूर्व अनुभव आला. स्वातंत्र्य आल्यावर कोणत्या प्रकारचे राजकीय व आर्थिक प्रबोधन असावे. ह्यासंबंधीचे काहीचे महत्त्वाचे विचार म. गांधी यांच्यात पहावयास मिळतात.

अनुक्रमणिका

स्वातंत्र्य आल्यानंतर जरूर तो बदल घडवून आणण्यासाठी त्यांच्यासारखे सामर्थ्यशील 'दुसरे गांधी' आपणास प्राप्त होतील, अशी 'वाट' पाहाण्याची ही वेळ नव्हे. भ्रष्टाचाराच्या वाढत्या प्रकारामुळे ग्लानी आली आहे. सर्व भारतातील समाजाने त्याचा त्यानेच कायापालट करून घेतला पाहिजे.

इंग्रज होता तेपर्यंत त्याने धर्मात व पूर्वापार सामाजिक पद्धतीत हात घालू नये असे म्हणता येत होते. पण तसे आता म्हणता येणार नाही. स्वातंत्र्यातील कोणत्याही पक्षाचे सरकार स्वकीय असते. म्हणून विरोधासाठी विरोध करणे म्हणजे देशाभिमान नव्हे. प्रबोधन सतत सर्वांगीण राहील व त्याचे प्रवर्तन व कार्यवाही शासनाला व जनतेलाही करावी लागेल. परिवर्तनाचे माध्यम धर्माच्याद्वारे लोकांची मने सुधारणे हे जसे होऊ शकते, तसे हे कार्य राजकीय पक्षांच्याद्वारे देखील घडले पाहिजे.

आतापर्यंतची जगातील कोणतीच प्रबोधने सर्वथा निरर्थक, हल्लीच्या व पुढील काळात ठरणारी आहेत, असे म्हणावयाचे नाही. बुद्ध-जैन-ख्रिस्त फार मागे झाले तरी जग त्यांना विसरू शकत नाही. म. गांधी यांचा विसर पडल्यासारखा वाटतो. कारण त्यांची नैतिकप्रधानता दिसत नाही. म. गांधी यांच्याकडे पाठ करता येणार नाही. पाकिस्तान व बांगला देश ह्यांनाही त्यांना आठवावे लागेल. मागील प्रबोधनात जे थोर थोर पुरुष होऊन गेले त्यांची पुनः नवी गरज देखील निर्माण होत असते. ख्रिस्तापूर्वी बुद्ध हे फार मोठे नैतिक प्रेरणा करणारे संत झाले. डॉ. आंबेडकरांना दलितोद्धाराच्या दृष्टीने त्यांची पुनः गरज लागली. प्रत्येक प्रबोधनाचा अभ्यास करून पुढील मार्ग चोखाळावयाचा असतो. मार्क्स देखील महत्त्वाचा समाजप्रबोधक ठरतो. तोही सर्वथा कालबाह्य होणारा नाही.

गेल्या शतकात भारतभर महत्त्वाचे प्रबोधक झाले. त्यांच्या शताब्द्या झाल्या; म्हणजे स्मरण प्राप्त झाले. ह्यामुळे त्यांच्या समाजप्रबोधनावर फेरविचार झाला. पण शताब्दी पुरतेच स्मरण मर्यादित राहू नये. मागील काळातील जे टिकण्यास पात्र असते, ते टिकते. जे टिकते व जरूरीचे होते, ते महत्त्वाचे ठरते. मागील काळातील विविध प्रबोधनातील 'रहस्य' देखील सापडते. ही शिदोरी घेऊन मागील सर्वच प्रबोधक पुढील वाटचाल करीत आले. नव्या समाजप्रबोधनासाठी वारंवार उजळणी-मीमांसा व समीक्षा करून पुढे चालावे लागेल. वैचारिक जागृती व न्याय विचार-आचार स्वातंत्र्य हा तर प्राणभूत मुद्दा मानावाच लागतो.

अनुक्रमणिका

३.

## महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाचे स्वरूप

पाश्चिमात्य धर्म व संस्कृती आणि विशेषतः भाषा व विज्ञान यांच्या आगमनामुळे, अठराव्या व एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजप्रबोधनाचा उद्‌गम व विकास झाला. हे जे नवे समाजप्रबोधन त्या काळी अवतरले, त्याचे नेतृत्व राजा राममोहन राय यांनाच द्यावे लागते. त्यांच्या समाजप्रबोधनाचा पाया 'मानवी विश्वधर्म' हा होता. त्याबरोबरच स्वदेशाची सर्वांगीण प्रगती व क्रमप्राप्त समाजसुधारणा यांचा पुरस्कार व प्रचार त्यांनी केला. त्यांनी इंग्रजी व आधुनिक शास्त्रे यांच्या शिक्षणाचा पुरस्कार मोठ्या दूरदर्शित्वामुळे केला. ह्याला तरी पुढे 'निबंधमाला'कारांचा विरोध नव्हता. उलट 'वाघिणीचे दूध' म्हणून त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा गौरवच केला. वाघिणीचे दूध प्याल्यामुळे राजकीय स्वातंत्र्यविषयक अनेकविध उद्योग व प्रयत्न येथे चालू झाले, म्हणून सर्व बाजूंनी या सामाजिक प्रबोधनाचे महत्त्व सर्वांनाच मान्य करावे लागते. वाढते दळणवळण, औद्योगिक बदल व एकूण नवयुगाचा झालेला प्रारंभ यामुळेही समाजप्रबोधन व समाजसुधारणा यशस्वी होण्यास मोठी मदत झाली. संतांच्या चळवळीत नवसमाजप्रबोधनाची बीजे होती; तरी तो काल मध्ययुगीन असल्यामुळे, प्रत्यक्ष व्यवहारात नवी समता त्यांना आणणे शक्य नव्हते. हा त्यांचा दोष नव्हता. त्यांच्या आध्यात्मिक प्रबोधनाला तत्कालाने मर्यादा घातल्या, तशाच मर्यादा नवयुग समाजप्रबोधनालाही पडल्या! काळ इंग्रजी राज्याचा म्हणजे परकीय सत्तेचा होता व ख्रिस्ती आक्रमणही वाढते होते. मुसलमानी आक्रमण थोपविण्यास मदत होणारे वातावरण संतांनी निर्माण केले. तसेच ख्रिस्ती आक्रमण थोपवण्याचा विशेष प्रयत्न धर्मसुधारकांनी व समाजसुधारकांनी केला.

समाजप्रबोधनाचे पहिले पाऊल म्हणजे सन १८२८ साली झालेली ब्राह्म समाजाची स्थापना होय.कलकत्ता राजधानीत निर्माण झालेल्या ह्या नवसमाजाचा परिणाम बाकीच्या भारतावर झाला. देव समाज, आर्या समाज, प्रार्थना समाज व तत्पूर्वीची परमहंस सभा हे सर्व प्रयत्न प्रत्यक्षाप्रत्यक्ष ब्राह्मसमाजातून पुढे आले. महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजदेखील परमहंस सभेतून निर्माण झाला. ह्याचे संस्थापक जोतिराव फुले परमहंस मंडळीत होते. म्हणजे त्यांच्या प्रथमच्या सर्व चळवळींना परमहंस मंडळीतील सुधारकांनी व प्रार्थना समाजाच्या सुशिक्षित, पहिल्या पांढरपेशा, कर्त्या पुढारी मंडळींनी साह्य व सहकार्य केले. राम बाळकृष्ण, तुकाराम तात्या, मोरो विठ्ठल वाळवेकर, गोवंडे, परांजपे, विनायकराव भांडारकर, मामा परमानंद, जगन्नाथ सदाशिवजी, लालशंकर उमियाशंकर, लोकहितवादी वगैरे लहानथोर धर्म व समाजसुधारकांची व जोतिबांची दृढ व घरोब्याची मैत्री होती. वरील सर्व नवसमाजाची गणना, खुद्द या समाजांचे एक पहिले मोठे टीकाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'एकाच माळेचे मणी' म्हणून केली आहे. नव्या पिढीचे नंतरचे सत्यशोधक, फुल्यांच्या पाठीमागची नव्या समाजप्रबोधनाची पार्श्वभूमी व इतिहास जाणीत नाहीत. परंतु राममोहन व फुले, ब्राह्म समाज, प्रार्थना समाज व सत्य समाज यांचा तौलनिक अभ्यास केल्यास, या दोन पुरुषांच्या आचारविचारांमध्ये फार साम्य आढळते. केशवचंद्र व फुले यांच्यातही साम्यस्थळे खूप आढळतात. ही सर्व सुधारक मंडळी मुख्यतः धर्मसुधारक होती व फुल्यांच्यासह वरील सर्व अध्यात्मवादी आणि प्रार्थनामार्गी होते. फुले यांच्या निधनानंतर प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज यांच्यात पडत गेलेले अंतर जास्त विकास पावले. पुढल्या पिढ्यांना तर एकमेकांत फार दूरच वाटतात. ब्राह्म समाजाशी असलेले सत्यशोधक समाजाचे मूळचे

अनुसंधान तुटले. 'म. फुले व महर्षी शिंदे' हा समाज पुढे ठरतो. पण हा समन्वय आता तरी नष्ट झालेला दिसतो. कारण बहुजनी नव्या नेतृत्वाने फक्त राजकारणी-सत्तावादी स्वरूप घेतल्यामुळे त्याचा व म. फुले-शिंदे ह्यांचा नामोच्चारापुरताच संबंध उरला व ह्यामुळेच अस्पृश्यांसंबंधीचा खेड्यापाड्यातील जनतेचा दृष्टिकोण विरोधी व पुराणमतवादी म्हणजे जुनाच राहिला. समाजप्रबोधन तळात जाऊनही, तेथे रूजलेच नाही. हरिजन, बौद्धांची सर्व क्षेत्रांत व सत्तेच्या दालनात उपेक्षाच आहे!

बंगाली ब्राह्म समाजी मंडळी प्रायः बडी जमीनदार, गर्भश्रीमंत, सुशिक्षित व उच्चभ्रू होती. केशवचंद्र सेन हेच पहिले ब्राह्मणेतर ब्राह्मो पुढारी झाले. तेही सुशिक्षित श्रीमंत होतेच. पण फुले-लोखंडे-भालेकर ही जनसमाजाचे प्रतिनिधित्व करणारी शेतकरी मंडळी सर्वसामान्य गरीब जनतेतील होती. ही अनुभवी मंडळी फार मोठी विद्वान-पंडित अर्थातच नव्हती. तरी तळातील शूद्रातिशूद्र जनतेची स्थिती, गरजा, दुःखे व मागण्या त्यांना समजू शकल्या, त्या त्यांना बोचत होत्या, त्या त्यांनी मांडल्या. "जिस तन लागे। वह तन जाने। बिचमे क्या जाने गव्हारारे॥" असा सवाल, फुले रानड्यांना करीत होते. १८७७ सालच्या दुष्काळामुळे व मुंबईतील गिरणा मजुरांच्या अवस्थेमुळे सत्यशोधक चळवळीला नंतर शेतकरी व मजूर चळवळीचे स्वरूप येत गेले. शेतकऱ्यांची दुःखे फुले यांनी मांडली व गिरणी कामगारांची दुःखे नारायणराव मेधाजी लोखंडे या धीट, करारी पुरुषाने मांडली. प्रार्थना समाजाशी यांचा संबंध जवळून आला, तरी प्रार्थना समाज अलगपणे परमार्थवादी, धर्मसुधारक म्हणून तुटकच राहिला. कोणत्याही गुलामगिरीशी मुकाबला निर्माण करण्याचे व लढाऊ संघटना निर्माण करण्याचे सामर्थ्य, इच्छा असूनही, प्रार्थना समाजात नव्हते; म्हणून त्याचे स्थान प्रायः वरतीच राहिले व जनतेच्या इहवादी ज्वलन्त प्रश्नोपप्रश्नांशी त्याचा संबंध वाढू शकला नाही. फक्त चिपळूणकरपंथीयांप्रमाणे बहुजन समाजाच्या चळवळींना त्याने विरोध केला नाही. पण कोणत्याच सामाजिक/राजकीय लढ्यात जोरकसपणे प्रार्थना समाजी उतरले नाहीत. ब्राह्मणेतर राजकीय पक्ष व प्रार्थना समाजी यांचा नेमस्त राजकीय पक्ष यांचीही नांदवणूक पुढे वेगवेगळी झाली. ज्या वरिष्ठ थरांतून प्रार्थना समाजाने थोडासा का होईना वरती काय रोवला होता, त्या थरांतील परंपरा, हितसंबंध यांच्या मर्यादा त्याला पडल्या व आता तर रानडे-भांडारकर वगैरे पुढाऱ्यांच्या वरिष्ठ सामाजिक थराने प्रार्थना समाजाकडे संपूर्ण पाठ फिरविली आहे. बहुजनता धर्मभोळी म्हणून दूर राहिली. रानड्यांच्या पिढीत अनेक न्यायाधीश, वकील वगैरे प्रबुद्ध वरिष्ठ मंडळींचे लक्ष प्रार्थना समाजाकडे वेधले होते. पण ही परंपरा पुढे खुंटली. म्हणजे आता समाजातील सुशिक्षित व वरिष्ठ थर रानडे यांना अनुसरत नाही, म्हणूनही समाजप्रबोधन खुंटले! गुलामगिरीच्या बेड्या तोडणारा लढाऊ, कृतीशील करारी नेता प्रार्थना समाजास लाभला नाही. अनेक कारणांमुळे फुले यांनी व त्यांच्या सर्वांगीण विचार प्रवाहाने, वरिष्ठ थरात निर्माण झालेल्या समाजप्रबोधनाबरोबर क्रमप्राप्त विग्रह घेतला. तरी फुले यांनी परमहंस सभेच्या मूळ तत्त्वाशी व कार्यक्रमाशी विग्रह घेतला नाही. उलट त्यांच्याएवढा मोठा धडाडीचा परमहंस-म्हणजे सत्यासत्य वेगळे करणारा पुढारी-परमहंस सभेला त्यांच्यानंतर लाभला नाही. "मी कोणाचेही अन्न ग्रहण करीन" अशी उघड घोषणा व कृती करण्याचे धाडस नसल्यामुळेही बोलक्या परमहंस सुधारकांपासून फुले वेगळे झाले. त्यांच्याइतके प्रखर अनुष्ठान-आचरण-करणारा एकेश्वरवादी पुढारी दुसरा दाखविता येणे अशक्य आहे. म्हणूनच रानडे-भांडारकर-चंदावरकर यांसारख्या विचक्षण विद्वानांना ओलांडून प्राकृत जोतिबांनी साऱ्याच जनतेच्या थरांचे हृदय काबीज केले. त्यांच्या विचारांच्या लाटा जनसागरावर येत जात असतात. फुल्यांचे विचार पक्के होते व त्यांनी मजबुती व प्रचार एकसारखा चालविला, विग्रह घ्यावा लागला तरी तात्त्विक

अनुक्रमणिका

व व्यावहारिक कृतज्ञता त्यांनी टाकली नाही. डॉ. आंबेडकरांनी सर्वच धर्म व समाजसुधारकांना डावलून फुल्यांनाच गुरू केल्यामुळे त्यांची अपूर्वाई व असामान्यत्व सिद्ध झाले व सत्यशोधक आणि बुद्ध यांचा मेळ झाला.

ब्राह्म समाजाच्या दूरगामी परिणामांचा इतिहास फार मोठा आहे. तरी कलकत्त्याकडे त्यांच्यात जी फाटाफूट झाली व ब्राह्म समाजाशी आर्य समाजाचे संपूर्णतः जमले नाही म्हणूनही राममोहननंतरच्या समाज व धर्मसुधारकांत पोटपंथभेद वाढले व संघटना विभागली गेली. विवेकानंद ब्राह्म समाजापासून वेगळे झाले! अपयशाचे हे कारण दाखविता येते. जोतिबांनी दयानंद पाहिले ऐकले होते, तरी वेदांतील विषम भागामुळे जोतिबा व वेद यांचे नाते विळ्याभोपळ्याचे ठरले. आर्य समाजातही दोन तट पडले; असे तट सत्यशोधक समाजात प्रत्यक्षतः पडले नाहीत तरी एकवाक्यतेचा विकास झाला नाही व फुले यांच्याइतका किंवा त्यांच्यापेक्षा मोठा पुढारी खुद्द सत्यशोधकांत झाला नाही. डॉ. आंबेडकरांनी मात्र फुल्यांच्या आचारा-विचारात विलक्षण भर घातली. अस्पृश्यता व मुख्यतः जातिभेद यामुळे समाजप्रबोधन एकजिनसी व प्रभावीपणे संघटित झाले नाही. सत्यशोधक समाजाला अखिल भारतीय स्वरूप येऊ शकले नाही. प्रार्थना समाजाला राजाश्रय मिळाला नाही तरी थोड्या संख्येच्या बळावर त्याने शिक्षण संस्था, बालकाश्रम वगैरे समाज कल्याणाची कार्ये चालविली आहेत. त्याने फुले याना जसे साह्य केले, तसेच विठ्ठल रामजी शिंदे यांनीही मौलिक साह्य केले. हल्ली या चळवळी लोकसमाजापुढे फारशा नाहीत. तरी महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाचा इतिहास लिहिताना परमहंस सभेचे ज्येष्ठत्व कबूल करावेच लागते. मूर्तीपूजेचे प्राबल्य जनतेमध्ये आजही आहे. म्हणून वरील सर्व चळवळी (आर्य समाजासह सत्यशोधक समाजही) या दृष्टीने पराभूत आहेत. हिंदुत्ववादीदेखील या दृष्टीने आर्य समाजाशी पूर्ण समरस झाले नाहीत. धर्मनिर्णय मंडळ सर्वथैव आर्य समाजाशी एकस्वरूप झाले नाही. त्यांची वेगळी जरूरी राहिली! रानडे म्हणत असत की, प्रार्थना समाज व आर्य समाज यांच्यात फक्त नावापुरताच भेद आहे. रानडे यांना त्यांच्या समन्वयक दृष्टीमुळे सत्यशोधक समाजाचा अर्थ व त्याचा विद्याप्रसारक पवित्रा सक्रीयपणे जास्त समजला. पूर्वग्रह टाकण्याची त्यांच्यातील ताकद मोठी अनुकरणीय ठरते. लोकहितवादीनी प्रार्थना समाज व आणि आर्य समाज ह्यांच्याशी समानपणे संबंध राखला; ती प्रार्थना समाजी मंडळी लोकहितवादीना आपले एक वरिष्ठ नेते असा क्रमप्राप्त मान देत नाहीत. रानड्यांनी मात्र लोकहितवादीना सर्वप्रथमचा मान दिला. लोकहितवादी व फुले ह्यांचे शिक्षण एकाच इंग्रजी शाळेत झाले असावे. दोघेही एकमेकांना जाणत होते. गोपाळ हरी देशमुख यांची टीका फुले यांच्यापेक्षा मोठी तीव्र व जहाल असूनही लोकहितवादीनी सत्यशोधक समाजात अग्रेसरत्वाने भाग घेतला नाही. रानड्यांनी ही उणीव भरून काढली. दादोबा पांडुरंग हे आपल्याकडील मराठी समाजप्रबोधनाचे आद्य जनक ठरतात व त्यांचे ‘धर्मविवेचन’ व जोतिबाचे ‘सार्वजनिक सत्यधर्म’ ह्या पुस्तकांतून समान मुद्दे पुष्कळ सापडतात. समाजप्रबोधनाचे धागेदोरे व परस्परांशी साम्य व भेद समजावा, म्हणून असे निष्कारण येथे केले आहे. हे सर्व राममोहन यांच्याच परंपरेतील धर्मसुधारक ठरतात. तौलनिक व समन्वय अभ्यासाची गरज आहे.

समाजप्रबोधनाचा करता येईल तितका विपर्यास ‘निबंधमाला’कारांनी केलेला दिसतो. तरी त्यांची व टिळकांची टीका खास चिंतनीय वाटण्याजोगी आहे. ‘विद्याप्रसार’ हा जो फुले यांचा प्राणभूत मुद्दा होता तो चिचळूणकरांनी शेवटी उदार अंतःकरणाने मान्य केला व काही चिंत्य सूचना दिल्या. फुले यांनीदेखील ज्या पौराणिक भागावर चिपळूणकरांनी टीका केली होती तो भाग पुढील पुस्तकातून वगळला व मूलभूत उद्देश वाढवीत गेले. फुले यांचे विचार वर उल्लेखिलेल्या सर्व सुधारकांत होते म्हणून ते सार्वजनिकपणे लोकांच्या गरजेचे ठरले. विवेकानंदांनी

पुरोहितशाहीसंबंधी फुले यांच्याहीपेक्षा कडक उद्‌गार काढले आहेत. असा तौलनिक विचार व सर्व पाहणी केल्यावर फुले यांच्या स्फोटक उद्‌गाराविषयी नवल मानण्याचे कारण नाही. उलट त्यांनी फारच काळजीने, जपून लिहिले आहे व वस्तुस्थिती मांडली आहे. शिक्षणामुळे अंधश्रद्धा जाईल असा विश्वास राममोहन रायपासून फुले यांच्यापर्यंतच्या सर्व सुधारकांना वाटत होता. पण शिक्षणक्रमात हा भाग नसल्यामुळे, त्यांची आशा फोल ठरली. समाजप्रबोधनाला मर्यादित यश आले याचे कारण त्याला अनुकूल व साथ देणारे शिक्षण नव्हते व नाही. ते असते तर मुसलमान व ख्रिस्ती यांच्याही पिढ्या जास्त प्रागतिक व उदार बनल्या असत्या. चिपळूणकराना आणि टिळकांना धर्म व समाजसुधारणेत रस नव्हता. तरी आधुनिकता, औद्योगिक सुधारणा, छापखाना वगैरे यांत्रिकीकरण त्यांनी स्वागतार्ह ठरविले. विवेकानंदानीही विरोध दर्शविला नाही. राममोहन, केशवचंद्र सेन, दादोबा पांडुरंग, फुले या सर्वांवरच तत्कालीन मिशनऱ्यांच्या विचाराआचारांची छाप पडली होती. त्यांच्या आत्मनिवेदनपर कित्येक उद्‌गारांवरूनच हे स्पष्ट होते. कालक्रमप्राप्त हा परिणाम खुद्द त्यांच्यावर आणि त्यांच्या अनुयायांवर पुढे राहिला नाही. 'निबंधमाले'तील उपहास सोडला तर नवयुग समाज व त्या वेळचे पुढारी यांचे स्वरूपदेखील समजते. पुष्कळ लोक असे समजतात की, मराठीतील या टीकेमुळे समाजप्रबोधन थोपविले गेले. पण समाजप्रबोधनाचे स्वरूप अखिल भारतीय होते. हल्लीदेखील आर्य समाज, ब्राह्म समाज, प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज त्यांच्या त्यांच्या शक्तीनुसार लोकसेवा व जागृती करीत असतात. समाजप्रबोधन संपूर्ण यशस्वी झाले नाही. याचे एक प्रमुख कारण त्यांच्यातील अंतर्गत उणीवा हे होते.

राजा राममोहन यांच्या प्रबोधनाला सर्वथैव यश आले नाही हे खरे. नवभक्ती संप्रदाय व मूर्तीरहित मंदिर संस्था या योजनांना अखिल भारतीय म्हणजे प्रत्येक प्रांतात प्रतिसाद थोडा मिळाला. प्रत्येक प्रांतात (सिंध व पूर्व-पश्चिम बंगाल धरूनही) ब्राह्म समाजाची चांगली मंदिरे, वास्तू, इमारती व कित्येक लोककल्याणक संस्था आजही आहेत. सत्यशोधक समाज फक्त महाराष्ट्रातच आहे. तो अखिल भारतातील नाही व नव्हता. परंतु राजा राममोहन राय, प्रबोधनाचे स्वरूप व परिणाम अखिल भारतीय ठरतो. एवढेच नव्हे तर त्यांचे चरित्र व ब्राह्म समाजाचे कार्य व इतिहास यांचे पडसाद भारताबाहेर उमटलेले आढळतात. ख्रिस्ती व महमंदी आणि इतर धर्मांनाही 'ब्राह्म समाज' जवळचा व आपलासा वाटला; पण पुढे फक्त हिंदुधर्माचे सुधारलेले स्वरूपच ब्राह्म समाजाच्याद्वारे फक्त झाल्यामुळे महंमदी व ख्रिस्ती धर्मातून त्याला अनुयायी मिळाले नाहीत. फक्त एकेश्वरीपूजा पद्धतीचाच प्रसार म्हणजे ब्राह्मधर्मांचा प्रसार अशी संकुचित व्याख्या त्याने न ठेवल्यास व फक्त विश्वधर्मांच्या प्रचारावर जोर दिल्यास, त्याचा प्रभाव यापुढेही वाढेल. कारण ब्राह्म समाजपुरस्कृत (हिंदू) उपासनापद्धती इतर धर्मांना (एकश्वरी असूनही) मान्य होईल असे वाटत नाही; हिंदुधर्माचा मूर्तीपूजा हा प्रत्यक्षात व लोकव्यवहारात जिवंत धर्मस्वभाव असल्याने हिंदुधर्मातील लोकांनाही ब्राह्म समाज आवडला नाही. वास्तविक 'ब्रह्म' ही राजा राममोहन राय यांनी परमविवेकानंतर पत्करलेली वेदातील व वेदान्तातील-उपनिषदांतील संज्ञा होय. ज्ञानविज्ञानात्मक परब्रह्माच्या पलीकडचे ज्ञान मानवास ठाऊक असणे अशक्य आहे. गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध व सर्व श्रेष्ठतम् संतांचे ग्रंथ ब्रह्मप्रतिपादक आहेत. म्हणून राजा राममोहन राय यांनी भारतीय धर्माला ब्राह्मधर्म-ब्राह्म समाज हे सार्थ व मूळ नाव दिले व ब्रह्म होण्याचा वेदाधिकार यच्चयावत सर्व मनुष्यजातीला खुला केला. राजा राममोहन राय यांच्या परंपरेत देशभर अनेक प्रांतांत त्यागी सुधारक व देशसेवक झाले. सर्वच समाजसुधारणेचा सुसंगत व कालक्रमानुसार स्वतंत्र इतिहास लिहिला जाणे जरुरीचे आहे. राममोहन राय यांचे अपयश म्हणजे उपनिषदे व अनासक्त भक्ती शिकविणाऱ्या भगवत्‌गीतेचा पराभव होय.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रात सनातनी विचारांचे प्रतिनिधित्व चिपळूणकर-टिळकांकडे जाते. तरी ह्यांच्यातील, वर्तमानपत्रे काढणे, शाळा व कॉलेज काढणे, इंग्रजी वाघिणीच्या दुधाचे कौतुक करणे वगैरे अनेक विचार-आचार पाहिल्यास यांना आधुनिकता अटळ ठरली असे म्हणावे लागते. आगरकरांच्या मार्गाला लोकमान्यांनी व्यर्थ विरोध केला. 'गीतारहस्या'मध्ये टिळकांनी गीतेला 'नवा करार' म्हटले आहे. यावरूनही त्यांना सुधारणा व कालप्राप्त परिवर्तन मान्य होते; हे सिद्धच होते. सर्वसामान्य माणूसदेखील सनातनी सुधारक असतो. म्हणूनच बोलके सुधारक व कर्ते सुधारक असे दोन भेद पडतात. सुधारणाप्रियता व प्रत्यक्ष सुधारणा-कृतीत, यात फरक पडतो. ज्योतिबा फुले यांना धाडसाने व साहसाने हे अंतरच तोडले, म्हणून मी मी म्हणणाऱ्या विद्वान, सुशिक्षित सुधारकांवर त्यांनी विलक्षण मात करून, स्वतः प्रत्यक्ष व हयातीनंतर फार मोठी शर्यत जिंकली व महाराष्ट्राच्या विचारसिंहासनावर ते, इतरांना मागे टाकून विराजमान झाले. सध्या तरी ही परिस्थिती दिसते. पुष्कळच स्वावलंबी विचार व स्वतंत्र लढाऊ कार्यक्रम त्यांनी महाराष्ट्राला दिला. 'बुद्धिवाद व मानवता' हा त्यांच्या विचारांचा कणा ठरतो.

टिळक-आगरकर यांच्या झगड्यातून तात्यासाहेब केळकर पुढे आले व त्यांनी आचार विषयक क्रांतीत मध्यबिंदू पत्करला. टोके टाकली! राजकीय सुधारणा आधी का धार्मिक, का सामाजिक सुधारणा आधी? हा पुष्कळ, निष्कारण वादग्रस्त केलेला सोपा प्रश्न केळकर यांनी सोडविला व अधिक सोपा केला. राजकीय भक्तिमार्गाला-विभूतिपूजेला-आळा घातला व सारासारविवेक पुष्कळ वाढविला आणि स्व-संप्रदायाला व्यापक स्वरूप देत गेले. फुले, ब्राह्मणेतर चळवळ व शाहूमहाराज या सर्वांसंबंधी जास्त उदार माहिती केळकर साहित्यात आढळते. केळकरांना सांप्रदायिक मर्यादा सांभाळणे भाग होते. तरी त्यांनी त्या खूप ओलांडल्या! केळकर यांनी पुष्कळ वादग्रस्त विषयांवर खुले व निर्भीड मतप्रतिपादन केलेले दिसू शकते. ब्राह्मणेतर चळवळीवर देखील थोडा जास्त उदार विचार केळकरांत-चिपळूणकर-टिळकांपेक्षा-तुलनेने वाचावयास मिळतो. केळकरांनी धर्मनिर्णय मंडळातही पुढे भाग घेतला.

एकूण समाजप्रबोधनाच्या इतिहासात केवलानंद-तर्कतीर्थ यांनी पुढे पुष्कळच कामगिरी बजावली. ब्राह्म समाज-आर्य समाज वगैरेंनी हिंदुधर्मांच्या बाहेरचे वाटणारे मार्ग पत्कारले. संतांनी व मागे ऋषींनी समाजातच राहून परिवर्तन केले व हाच तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी पक्ष केवलानंद ह्यांनी स्वीकारला. धर्मनिर्णय मंडळाची नव-घटना करून, सामाजिक सर्व सुधारणांना आधार शास्त्रातून शोधून दाखविले. सामाजिक सुधारणांना मान्यता व पाठिंबा दिला. अस्पृश्यतानिवारणालाही पाठिंबा दिला. शंकराचार्यपीठांना जो धर्मनिर्णयाचा अधिकार होता; तो परिवर्तनवादी पंडितांनी स्वतःच घेतला व सनातनी जुन्या पंडितांना वादात जिंकून त्यांना बौद्धिक पातळीवर नामोहरम केले! धर्मपरिवर्तनाच्या इतिहासातील हा एक मोठा टप्पा ठरतो. तर्कतीर्थांनी त्यांच्या 'हिंदुधर्माची मीमांसा'नामक ग्रंथातून गुलामगिरीचे जे स्वरूप मांडले आहे, ते जास्त विदारक आहे. गुलामगिरीचे मूलभूत स्वरूप, जे महात्मा फुल्यांनी त्यांच्या 'गुलामगिरी' पुस्तकात मांडले आहे, त्याहीपेक्षा तर्कतीर्थांना ते पंडित व शास्त्रनिपुण असल्यामुळे, जास्त सोपपत्तिक व सोदाहरण व्यक्त करता आले. धर्मनिर्णय मंडळाच्या उपाययोजनेमुळे सनातनशाहीचा किल्ला ढासळण्यास कारणीभूत होणारे अनेक पुरोगामी पंडित पुढे असल्यामुळे आता स्वतः 'सनातनी' (म्हणजे पुराणमतवादी-परंपरावादी-कर्मठ) आहोत, असा दावा सहसा पुढे

येतच नाही व तो विरोधाचा कालही संपला! स्वतः सनातन्यांची मुलेबाळे पूर्वीच्या सुधारकांपेक्षा फारच पुढे गेली! सनातनीपणाचा दावा सांगणारी मंडळी राहिलीच नाही!

राममोहन ते फुले आणि फुले ते केवलानंद-तर्कतीर्थ यांच्यापर्यंत केवढा जमीनअस्मानाचा फरक पडत गेला, तो पाहिल्यास कालमहिम्याचे महदाश्चर्य वाटते. येथील परंपरागतपणा, पुराणप्रियता एवढी मोठी आहे की, संपूर्ण विजय कोणासही मिळाला नाही. सर्व परिवर्तनवादी व सुधारक धार्मिक आंदोलने ही संपूर्ण पराभूतही नाहीत. सावरकर यांनी ब्राह्म समाज, प्रार्थना समाज व आर्य समाज यांना हिंदूच म्हटले आहे, तरी धर्मनिर्णय मंडळाने ह्या सर्वांचा म्हणावा तितका गौरव केला नाही. धर्मनिर्णय मंडळाने घेतलेल्या कित्येक निर्णयांचे स्वरूप पाहिल्यास, त्यातील कित्येक धर्मनिर्णयांचा व शास्त्रवचनांचा ब्राह्म समाजाने मागेच पुरस्कार केलेला दिसून येतो. उदाहरणार्थ, अस्पृश्यतानिवारणाच्या प्रयत्नाचे जनकत्व ब्राह्म समाजाकडे व आपल्याकडील फुले व त्यांच्या सत्यशोधक समाजाकडे जाते. अजूनही प्रगत व व्यापक दृष्टिकोन घेऊन धर्मनिर्णय मंडळाचा विकास झाला तर तो एकूण संस्कृतीची व साहित्याची सुधारणा करण्यात कारणीभूत होईल. मुख्यतः 'जात' ही उपाधी वैचारिक व मानसिक क्षेत्रात तरी अजिबात बाजूला टाकून, साहित्य, इतिहास व राजकारण यासंबंधी विवेकवंतांनी जातिधर्मनिरपेक्ष व निःपक्षपाती विचार करण्याचा पायंडा नव्याने घालून दिला पाहिजे व सत्यशोधक व नवबौद्ध यांनीही निकोप विचार जास्त केला पाहिजे.

अनुक्रमणिका

४.

## न्याय व सामाजिक समता

सामाजिक समता प्रस्थापित होण्यास समाजात सामाजिक न्याय प्रत्यक्ष कार्यवाहीत आला पाहिजे. सामाजिक समतेसाठी 'न्याय' ह्या विषयावर विचारप्रपंच करणे झाल्यास न्याय म्हणजे सामाजिक न्याय असा सरळ अर्थ करणे भाग आहे. मानवता व मानवी हक्क, सामाजिक समतेचे नवे मोठे आधार होऊ शकतात.

फ्रेंच क्रांतीतून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही तत्त्वे पुढे आली. मानवी हक्कांचा विचार होऊ लागला. गेल्या शतकात जगातील प्रगत राष्ट्रांत व भारतातही समाजप्रबोधन झाले. त्यांना वरील विचारांनी मुख्यतः प्रेरणा दिली होती. युरोपात वैज्ञानिक जागृती तुलनेने मोठी होती. नवे यंत्रयुग व औद्योगिक क्रांती यांचे आगमन झाले होते. आपल्या देशात बुद्धापासून झालेली प्रबोधने व परिवर्तने ही प्रधानतः धर्मप्रबोधने होती. धर्म व समाज यांचा येथे अविभाज्य संबंध होता व अजून आहे. भौतिकवादी विचारांपेक्षा अध्यात्मवादी विचार येथे प्रभावी असतात. प्रारंभी भारतीय तत्त्वज्ञांच्या विचारात जडवादाचा अंतर्भाव होता. बौद्ध व जैनांनी निरीश्वरवादाचा पुरस्कार केला होता. पण त्यांना पुढे धर्मांचेच स्वरूप प्राप्त झाले व यांच्या संस्थापकांना अनुयायांच्या धर्माचरणात ईश्वरासारखेच पूजनीय व उपासनीय स्वरूप प्राप्त झाले. तत्पूर्वीचा चार्वाकाचा जडवाद व निरीश्वरवाद विकास पावला नाही. अंधश्रद्धा जनतेत प्रभावी राहात असल्यामुळे जनतेचा धर्म हा येथे सुधारण्याची सतत गरज राहाते. जडवादी व बुद्धिप्रामाण्यवादी म्हणविणाऱ्यांची संख्या नेहमीच अल्प असते. परंपरावाद्यांची संख्या व रूढींची शक्ती परिवर्तनाना गिळून टाकतात. प्रत्येक समाजात परंपरावाद्यांची संख्या मोठी होती व असते. त्याना रूढींचा जास्ती आधार असतो.

राममोहन ते फुल्यांच्या अखेरपर्यंत झालेले प्रबोधन मुख्यतः धर्मप्रबोधन होते. पाश्चात्य विचारांचा ह्यावर प्रभाव पडला होताच. विविध सामाजिक सुधारणांची नव्या काळात येथे नवी गरज निर्माण झाली व सामाजिक सुधारणांना अनुकूल असे तत्त्वज्ञान व धर्मांचे स्वरूप नव्याने मांडण्यात आले. सुधारणांना पाठिंबा देणारे कायदेही झाले. भारतीय घटनेने तर समतेचे तत्त्व सर्वथा मान्य केले आहे. अस्पृश्यता निवारणासाठी कायदा झाला. पण वरील सर्व प्रयत्नांच्या मागचे विचार व समतावादी दृष्टी खेड्यापाड्यांत जवळजवळ जाऊन पोहोचली नाही. शिक्षणाच्या प्रसारामुळे जरूर ते समाजप्रबोधन व परिवर्तन होईल अशी आशा सर्वच सुधारकांनी बाळगिली होती. पण शिक्षणात त्यांना अभिप्रेत असलेल्या समतेचा आशय नसल्यामुळे शिक्षितांचीही मने व आचार अंधश्रद्धामूलक राहिलेले सर्वत्र आढळतात. मुसलमान व ख्रिस्ती समाजातून वरीलसारखी धर्म व समाजप्रबोधने झालीच नाहीत, त्यांच्यात पोथीबद्धता वाढली व विविध भेदाभेद त्यांच्यातही राहिले आहेतच. मुस्लिम बांधवांचा कुटुंबनियोजनाला पाठिंबा मिळत नाही व समान नागरी कायद्यालाही त्यांचा विरोध आहे. खुद्द हिंदूपुरते बोलावयाचे झाल्यास, बहुजनसमाज जो न्याय वरील वर्गाकडून मागीत होता, तो तळागाळातील लोकांना देण्यास तयार नाही. या सर्व वस्तुस्थितीमुळे स्वातंत्र्य येऊन तीस-पस्तीस वर्षे झाली, तरी समान न्याय व सामाजिक समता दृष्टिपथातही आली नाही. म्हणून हा विषय महत्त्वाचा आहे. न्यायाचे तत्त्व बहुजनसमाजाच्या गळी उतरले नाही. येथील संस्कृती ही मूलतः कृषी संस्कृती आहे व सर्वच खेडोपाडी जमिनी पिकविण्यासाठी बसली. अन्न, वस्त्र व पाणी उपलब्ध झाले, तेथे तेथे शेतकरी समाज खेडी व वाड्या करून

राहिला. शेतीला लागणारे तेवढेच धंदे करणारे बलुते लोक खेड्यात तयार झाले, त्यांना त्यांच्या कामाबद्दलचा मोबदला धान्य रूपाने दिला जाई. काही काही कामे उदा., चांभार, ढोर यांची कामे आणि महारांची, मेलेली गुरे ओढणे यासारखी कामे यांचा संबंध दुर्गंधी व अस्वच्छतेशी आला. हे लोक अस्पृश्य ठरले. व्यवसाय- धंदे परंपरेने चालणारी पद्धत पडल्यामुळे अस्पृश्यताही परंपरेची व जन्मजात झाली. सामाजिक अभिसरण बंद होऊन प्रत्येक 'जाती' वेगळी झाली. बेटीव्यवहार स्वजातीतच पुढे मर्यादित झाला व जन्मप्राप्त जातीभेद निर्माण झाला. वर्ण गेले, आश्रमधर्म गेला व असंख्य जाती व पोटजाती मात्र घट्ट राहिल्या. ह्या विषमता दाखवितात. नाही म्हटले तरी अजून कित्येक खेडेगावात बलुतेदारी चालू आहे. या देशात थोडेफार परिवर्तन होते. पण आमूलाग्र क्रांती होऊ शकत नाही. खुद्द बलुतेदारांना त्यांची बलुतेदारी परंपरेने चालत आलेली प्रत्यक्ष व्यवहारात हवी असते. पर्याय नसतो!

बलुत्याच्याद्वारे मिळणारे उत्पन्न निकृष्ट असल्यामुळे सर्वच बलुतेदार गरीब राहिले. जोशी व गुरव साधारणतः धार्मिकदृष्ट्या पवित्र होते तरी त्यांचे उत्पन्नही कमीच होते. भू-मालक व शेतकरी समाज तुलनेने गावगाड्यात आर्थिकदृष्ट्या बलुतेदारांच्याएवढा कनिष्ठ राहिला नव्हता व कनिष्ठ आता तर नाही. गावगाड्यातील सामाजिक व आर्थिक विषमतेचा एक उगम व तिचे स्वरूप वरीलप्रमाणे सांगता येते. 'बळी तो कान पिळी' व मनगटशाही गावगाड्यात चालत आलेली आहे. गावगुंडी चालते. विधवा व दुर्बलांच्या माना मुरगळल्या जातात. डॉ. आंबेडकर यांनीही गावगाड्याला अस्पृश्यतेबद्दल जबाबदार धरले आहे व पूर्वास्पृश्यांनी शहरात जावे, असेही मत व्यक्त केले होते. पण प्रत्यक्षात हे शक्य नाही. हल्ली खेड्यात श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी असा भेद नव्याने निर्माण झालेला आहे. पण पूर्वीचा वरील जातीय स्वरूपाचा जन्मजात वर्णीयभेद देखील कायम आहे. नवा समतावादी गावगाडा अस्तित्वात आला नाही. पुष्कळ जुने व काही थोडेच नवे जीवनात चालू असते.

सामाजिक समता नसल्यामुळे सामाजिक न्याय देखील नसतो, यात नवल नव्हे. विषमता व जिला फुले-आंबेडकरांनी भारतीय संदर्भात 'सामाजिक-धार्मिक गुलामगिरी' (Socio-Religious) म्हणून नव्याने संबोधिले आहे, ती अद्यापि प्रत्यक्ष आहेच. काल पुष्कळ पालटला आहे असे बाह्यता वाटते, म्हणजे पोषाखी वरचा बदल झाला आहे. परंपरेने स्वजातीचा व्यवसायधंदे करणारे अद्याप पुष्कळ आहेत. घराणेशाही, सरंजामदारी वृत्ती व स्वतःस उच्च समजून दुसऱ्यांना हीन समजण्याची प्रथा सामाजिक मनात सर्वत्र दडून असते. मानसिकदृष्ट्या देखील सामाजिक समता फार मोठ्या प्रमाणात आढळत नाही. स्त्रियांवरील अन्याय वाढत आहे. काळ नवा आला आहे, हे खरे. भौतिक विकास होत आहे, पण मनाचा विकास होत नाही. सामाजिक समतेला पूरक अशी मने तयार झाल्याशिवाय सामाजिक न्यायाचे प्रत्यंतर समाजात दिसणार नाही. स्वयंभूषणे समाजरचनेची घडण-जडण होत आली व ती बदलून नवी सामाजिक समतेवर आधारलेली समाजाची रचना प्रत्यक्षात यावयाची आहे. नवी आधुनिक भारतीय लोकशाही देखील हे कार्य पूर्ण करू शकली नाही.

### जात व वर्ण आणि न्याय

आदिवासीयात व आर्येतरांतही जातिभेद आढळतो. आर्य व आर्येतर यांचा मिलाफ झाल्यावर प्रत्यक्ष समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी विभागणी त्यांच्या त्यांच्या व्यवसायावरून झालेली दिसते. स्वाभाविकपणे झालेली चार वर्णांची रचना प्रत्यक्ष पाहून धर्मग्रंथातून त्यांचे स्वरूप, कर्तव्ये व धर्म यांची मांडणी झाली. चारी

अनुक्रमणिका

वर्ण हे जातिभेद निर्मितीस कारणीभूत झाले, असा समाजात समज आढळतो. साहित्यातही ही कल्पना रूढ आहे. चार वर्णांच्या नंतर त्यातूनही पुढे जाती-पोटजाती असंख्य वाढल्या, हे खरे आहे. वर्ण म्हणजे वंश नव्हे. जातिसंकर व वर्णसंकर प्रत्येक काळात होत असतो. ह्या संकरामुळेही येथे जाती वाढल्या. प्रतिलोम विवाहातूनही जाती झाल्या. हिंदू समाजातून मुसलमान व ख्रिस्ती झालेल्यांतही जातिभेद राहिला व आजही आढळतो. ब्राह्मण ही जातही आहे व वर्णही आहे. क्षत्रिय, वैश्य व शूद्र यामध्ये मात्र अनेक जाती होत्या व सामावू शकल्या. क्षत्रिय, वैश्य व शूद्र म्हणून प्रत्येक एक जात नाही.

जोतीबांनी 'शूद्रातिशूद्र' असा प्रयोग केला. अतिशूद्र म्हणजे अस्पृश्य, अस्पृश्यांतही अनेक जाती आहेत. कलियुगात क्षत्रिय नाहीत म्हणून ह्या वर्णाचा लोप झाला; असा युक्तिवाद पुढे आला. ऋग्वेद, यजुर्वेद इत्यादी वेदभेदामुळे ब्राह्मणात उपजाती झाल्या. ह्या प्रकारे हिंदूसमाज म्हणजे जातिभेद, अवतारवाद, मूर्तिपूजा व स्पृश्यास्पृश्यता पाळणारा समाज, हेच प्रत्यक्ष दिसणारे हिंदू धर्माचे स्वरूप होय. ही एक जिवंत व्याख्या होऊ शकते. पुरुषसूक्ताने ब्राह्मणास मुख, वैश्यास मांड्या व शूद्रात पायाच्या ठिकाणी कल्पून विराट पुरुषाची कल्पाना उभी केली. 'मनुस्मृती' व तस्तम ग्रंथांनी पुढे समाजात प्रत्यक्ष निर्माण झालेल्या विषमतेस कायद्याचे व धर्मशास्त्राचे स्वरूप देऊन हिंदू कायदा तयार झाला. राज्यकर्त्यांनी व सर्वच समाजाने तो प्रमाण मानिला. इंग्रजी राज्यातही 'मनुस्मृती', 'मिताक्षरी' वगैरे ग्रंथ न्यायालयात प्रमाण मानले. मुस्लिमांच्या बाबतीत कुराणानुसार असलेला कायदा प्रमाण मानिला. क्रिमिनल प्रोसिजर कोड व सिव्हील प्रोसिजर काड हे सर्वांना सारखे केले; पण 'समान नागरी कायदा' स्वतंत्र भारतालाही अंमलात आणता येत नाही. कायद्याच्या क्षेत्रातील हे अपयश ठरल्यामुळे न्याय व सामाजिक समता अद्याप अशक्यच राहिली. डॉ. आंबेडकर यांचे हिंदू कोड बीलही सर्वथा व एकमुखी पास होऊ शकले नाही. समान नागरी कायद्यापुढे सर्व सारखे झाले असते व सामाजिक समता प्रस्थापित होण्यास पाया तयार झाला असता. सामाजिक समता समान न्यायावर, समान कायद्यावर व समान धर्मावर अवलंबून असते. स्वातंत्र्यात अद्याप हे होऊ शकत नाही, म्हणून न्याय व समता निर्माण झाली नाही.

**न्याय, तत्त्वज्ञान व धर्म**

एकपरी येथील तत्त्वज्ञाने विषमतेवर आधारलेली आहेत, असे देखील म्हणता येत नाही, उलटपक्षी परमार्थवादी व आध्यात्मिक तत्त्वज्ञानांच्या आधारे धर्मात व समाजात समता आणण्याची वारंवार पराकाष्ठा झाली. सर्व संत याचसाठी झाले. निदान आध्यात्मिक समता प्रस्थापित व्हावी म्हणून जनतेच्या प्राकृत भाषांचा त्यांनी छळ सोसून प्रचार केला व बरेच यश मिळविले. हिंदू धर्मग्रंथांचा 'मनुस्मृती' व तत्सम अस्पृश्यतेला पाठिंबा आहे. मूळ अद्वैत तत्त्वज्ञाचा मुळीच नाही. जात व अस्पृश्यता यांना कोणत्याही इतर तत्त्वज्ञानाचा आधार नाही. रूढी हाच धर्म झाल्याने रूढ धर्मात ह्या बाबी चालू आहेत. तत्त्वज्ञान म्हणजे जीव-जगत्-जगदीश्वर यांचा विचार व परस्पर संबंधाचा विवेक. तो करताना ज्ञानांच्या क्षेत्रात समताच असते. तत्त्वज्ञानाचा धर्म झाल्यावर मूळचे समान तत्त्वज्ञान लोपते. 'विषाने पक्वान्ने गोड कडू झाली' ह्या तुकोक्तीनुसार श्रुति-स्मृती पुराणोक्त हिंदूधर्मात विषमतेचे विष भिनले. धर्मरचना व समाजरचना न्यायाधिष्ठित राहिली नाही. म. फुले-आंबेडकर यांना सामाजिक विषमता जास्तीत जास्त सोसावी लागली म्हणून त्यांनी हिंदूधर्माचे खंडणच अधिक केले. राममोहन राय-रानडे वगैरे, वरील थरांतील समाजामधील सुधारकांनी विषमता नाकारली तरी त्याबरोबर हिंदू धर्मातील उच्चतम मूळ भागही लोकांपुढे मांडला. धर्म, नीती, कायदा, संस्कारधर्म, विधी सर्वांना सारखे

अनुक्रमणिका

असावेत. 'धर्म, राज्य, भेद मानवात नसावेत' या समानदृष्टीतून जोतीरावांनी सार्वजनिक सार्वभौम सत्यधर्म सांगितला. स्त्री-पुरुष व एकूण मानवात भेद व विषमता नसावी. ही जोतीबांची दृष्टी व मानवतावादी मागणी होती. समान धर्माचा हा विचार व समान नागरी कायद्याचा उद्देश एकसारखाच वाटेल. कारण धर्म म्हणजे नियम (कायदा) हा सर्वांना सारखा लागू असावा. जो अन्याय ठरणार नाही तो 'न्याय', विषमतेचा अभाव असणे म्हणजे 'समता' ईश्वर (निर्मिक) 'परम न्यायी' आहे. त्याच्या परमन्यायित्वाला 'बट्टा लागेल' असा धर्म नसावा. अशी विषम समाजरचना असू नये. सर्व मनुष्ये एका परमेश्वराची जर लेकरे आहेत, तर त्यांना समान हक्क, समान संधी व समान कायदा असणे क्रमप्राप्त आहे, हे ईश्वराच्या संबंधाने व नात्याने 'न्याय्य' होय असे जोतीबा वारंवार म्हणतात. समान न्याय व समान संधी प्राप्त करून घेण्यासाठी संघर्षाची, लढ्याची व विद्रोहाची सक्रीय कास त्यांना धरावी लागली. पुढे डॉ. आंबेडकरांनी त्यांनाच गुरू मानिले. संघर्ष व विद्रोह यांनी बाबासाहेबांचे जीवन व्यापिले आहे. न्याय व प्रत्यक्ष सामाजिक समता स्थापण्यासाठी नव्या काळात संघर्ष व विद्रोह यांची गरज पडते. स्वतःचे गैरवाजवी व अन्यायी महत्त्व व वर्चस्व स्वतःच नाहीसे करून सामाजिक न्याय हृदय परिवर्तनाने स्थापित होतो, असा अनुभव येथे नाही. सुखासुखी कोणीच वर्चस्व सोडत नाही. अजूनही एक समाज दुसऱ्या समाजाला खालचा समजतो. विषमतेची अशी शिडी कैक हजार वर्षे अस्तित्वात आहे. उदा., बहुजन समाज पूर्वास्पृश्यांना बरोबरीचा व समान समजत नाही. विषमतेलाही इतिहास आहे. पण जणू काय ती स्वयंभू आहे असे वाटते. म्हणजे ती जन्मप्राप्त झाल्याने नैसर्गिक झाली. नैसर्गिक स्वभाव समाजाचा समाजालाच बदलून टाकणे-अवघड जात आहे.

**समाजप्रबोधन व सामाजिक समता**

धर्मसमीक्षा ही इतर सर्व समीक्षेची सुरुवात असते. धर्माला ग्लानी आली की धर्म विषम बनतो व धार्मिक गुलामगिरी निर्माण होते. धर्मांच्या अशा स्वरूपातून सामाजिक समता निर्माण होत नाही. सामाजिक न्याय लोपतो. बुद्ध आणि शंकराचार्य यांच्या काळात धर्मपरीक्षण, मीमांसा व समन्वय या दृष्टीने भारत जागृत होता. नंतर भागवत धर्म देखील प्रॉटिस्टंट चळवळ होती. पण पुढे मुसलमानी आक्रमणाची उशिरा जाणीव झाली. नंतर इंग्रजांनी सर्व देशच जिंकला. हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे सर्वच जे त्यांच्याकडून जित झाले; यामुळे राममोहनपासून आत्मपरीक्षण व उत्थानाच्या चळवळी झाल्या. राजकीय सुधारणा मिळाव्यात म्हणून इ. स १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेस सुरू झाली. ह्या कामी रानडे, आनंदमोहन बोस वगैरे धर्म व समाज सुधारकांचा मोठा वाटा होता. ह्या सर्व वरील धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जागृतीच्या गेल्या शतकाला समाजप्रबोधनाचे शतक म्हणून संबोधिले जाते. इंग्रजांकडून जिंकले जाण्याचे एक कारण म्हणजे भारतीयातील जातिभेद होय. प्रत्यक्षतः सर्वच धर्मांच्या वेगळ्या जाती झाल्यामुळे धर्मभेदांना जातिभेदच म्हणणे जास्ती खरे होय. अस्पृश्यता ही जन्मजातीवरच अवलंबून असल्यामुळे जातिभेद व अस्पृश्यता एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात. इंग्रजाला घालविण्यासाठी या भारतीय सामाजिक विषमतेविरुद्ध आघाडी उघडली गेली. मूळ तत्त्वज्ञानाचा, खऱ्या धर्मांचा व एकूण देशाचा जातिधर्मभेद हा 'शत्रू' आहे, त्यावर एकमत होऊन हा घालविण्यासाठी ब्राह्मो समाज, आर्य समाज, परमहंस सभा व सत्यशोधक समाज निघाले. यांना सामाजिक समतेच्या चळवळी म्हणता येते. जे जनजागरण झाले त्याने जातीधर्मभेद हा शत्रू आहे असे ठरविले. सर्वच इतर धर्मांचे व वेदादी ग्रंथ मनुष्यकृत आहेत म्हणून त्यात सर्वत्र सारखी समता व सामाजिक न्याय नाही. यासाठी धर्मग्रंथांचे सर्वथा प्रामाण्य जे मानिले जाते ते झुगारून देण्यात आले. एकेश्वरवादाचा पुरस्कार केला गेला.

मागील तत्त्वज्ञान, धर्म व भारतीय समाज यांचा मध्ययुगानंतर, अर्वाचीन काळात असा फेरविचार झाला. ह्या नवदृष्टीकोणाचा प्रभाव राममोहन नंतर जे. म. गांधी-आंबेडकर अखेरपर्यंत जे राष्ट्रीय पुढारी झाले त्यांच्यावरही पडला. समाजसुधारणेसाठी व समतेच्या प्रस्थापनेसाठी कायद्यांचा आश्रय घेण्यात आला. ग्रंथ व शब्दप्रामाण्य सोडल्याशिवाय मनुष्य 'निधर्मी' होत नाही. भारतीय घटनेने कोणत्याच धर्माच्या ग्रंथाचे प्रामाण्य स्वीकारले नाही. शासन व धर्म हे विभक्त मानले. याशिवाय येथे समान न्याय व सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही. ही नवी जाणीव होय. पण प्रत्यक्षात ही दृष्टी समानपणे सर्वांनीच आत्मसात केलेली नाही. खुद्द निधर्मीवादी सरकारला व्यवहारात निधर्मी स्वतः होता येत नाही.

कायद्याचा, घटनेचा व न्याय आणि सामाजिक समता यांचा परस्पर व अन्योन्य संबंध आहे. होऊन गेलेले सामाजिक-धार्मिक (Socio-Religious) प्रबोधन व सामाजिक न्याय व सामाजिक समता यांचा संदर्भ आपण तपासला. भारतीय घटना जी समताधिष्ठित झाली तिची पाळेमुळे स्वातंत्र्यपूर्व काळात होऊन गेलेल्या प्रबोधनात सापडतात. म्हणजे राममोहनचे राष्ट्रबांधणीचे नवे विचार म. गांधी-नेहरूत विकास पावले. पण हे सर्व झालेले प्रबोधन सामाजिक व पुढे राजकीय प्रायः होते. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भांडवलशाहीचा आश्रय घ्यावा लागला. समतेचा मानवतावाद हा जो आधार असतो त्याला उत्कटतेने वाव मिळाला नाही. जोतीबात उत्कटतेने धार्मिक गुलामगिरीच्या विरुद्ध कडवे विचार पेशवाईनंतरच्या काळात आढळतात. इंग्रज सरकारवरही कडक टीका आहे. आर्थिक समतेविषयीचे विवरण आहे. पिळवणूक करणारे व पिळले जाणारे असे दोन वर्ग आहेत. ही जाणीव त्यांना जास्ती झाली. मार्क्सच्या समतावादाशी येथे साम्य आहे. भांडवलशाहीत न्याय व सामाजिक समता यांचा अभाव असतो हे नाकारून चालणार नाही.

**जात व वर्ग**

जातिरहित समाजव्यवस्था व वर्गविहीन समाज निर्माण होईपर्यंत अन्याय व विषमता राहाणारच. समाज एका पातळीवर येण्याची गरज आहे. पूर्वीच्या धार्मिक-सामाजिक विषम समाजरचनेत आर्थिक विषमता व गरीब-श्रीमंत भेद याची उत्तरोत्तर वाढती भर पडत आहे. विद्येत मागासलेले, विद्येत पुढारलेले अशी विषमता होती व अद्यापि आहे. स्वातंत्र्य आल्यानंतर पुढारलेले जास्ती पुढारले. श्रीमंत अधिक श्रीमंत झाले. यामुळे सामाजिक अन्याय व सामाजिक विषमता वाढत आहे. दारिद्र्य रेषेखाली जगणारे बहुसंख्य आहेत. म्हणून आर्थिक पुनर्रचना करून आर्थिक समता स्थापित करण्याची अधिक जरूरी आहे. यासाठी जाती नष्ट होईपर्यंत थांबण्याचे कारण नाही. नष्ट होण्यास फारच दीर्घकाळ लागेल. आर्थिक समता हा सामाजिक समतेचा पाया असतो. ह्याचा अभाव आहे. आर्थिक विषमता नष्ट करणारे सरकार भारतात निवडून येईल. तर त्याच्याकडून आर्थिक समता येऊ शकेल.

'समाजसुधारणा समतेसाठी आधी का सत्तेसाठी राजकीय हक्क व सुधारणा अगोदर' हा वाद महाराष्ट्रात फार गाजला. आज कोणी स्वतःला सनातनी म्हणून घेत नाही व समाजसुधारणा कायदेशीर झाल्याने त्यांना विरोध राहिला नाही. होऊन गेलेले समाजप्रबोधन संपूर्णतः विजयी नसले तरी त्याने यशाचा बराच टप्पा गाठला आहे. आता स्वातंत्र्यात सामाजिक न्याय व समता स्थापन झाली नाही, तर स्वातंत्र्य व्यर्थ ठरेल.

अनुक्रमणिका

शिक्षणप्रसार हे गेल्या शतकातील भारतीय प्रबोधनाचे एक फल आहे व शिक्षणात सामाजिक समता व न्याय याबद्दलच्या जाणिवा वाढविणारा अभ्यासक्रम असल्यास शिक्षणातून ह्या बाबी वाढविता येतील. सांप्रदायिकता व संप्रदाय यांमधून समता व न्याय प्रस्थापित होणार नाही किंवा नवा धर्म व संप्रदाय स्थापूनही हे होणे नाही. कारण परिस्थिती व नवे जीवन दिवसेंदिवस 'सेक्यूलर' होत आहे. निधर्मीवादाला समता व न्याय स्थापन करण्यात यश आले पाहिजे. लोकशाहीतील सर्व पक्षांनी न्याय व सामाजिक समता हा एक त्यांचा कार्यक्रम करावा. सामाजिक क्षेत्रात परिवर्तन व पुरोगामित्व अपेक्षिणाऱ्यात एकमत असणे हे देखील जरूरीचे आहे. नवकालप्राप्त मुद्यावर शक्ती संघटित झाली नाही, तर पूर्ववतच सर्व समाज पुढेही मागे राहील.

जातीयता, जातीयद्वेष, उंचनीच भावना असे विघटन जातिभेद करितो. अव्वल इंग्रजीत १९१९ सालापर्यंत सार्वजनिक कार्ये सर्व जातीजमाती व सर्व धर्म मिळून प्रारंभी करीत. राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद वगैरे उपक्रमात जातीधर्म प्रारंभी भेद नव्हते. लखनौ करारापासून मुसलमानांची पृथक्ता वाढत गेली. स्वराज्याची चळवळ वाढत चालली, हे पाहून 'फोडा व झोडा' ही इंग्रजी नीती वाढत गेली. जातीधर्मभेदप्रधान विघटित समाज व्यवस्था इंग्रजाला उपकारक झाली. ज्या त्या जातीला नोकऱ्या, प्रतिनिधित्व, वगैरे सत्तास्थानात स्वतंत्र हिस्सा असावा असे उत्तरोत्तर वाटू लागले. आपल्या जातीचा मंत्री असेल तरच तो आपला, असा पृथक्भाव राजकारणात वाढत गेला. वाढत्या अशा सत्तेच्या राजकारणामुळे न्याय व सामाजिक समता या क्षेत्रातील समता जी सुरुवातीस वाढत होती, तिचाही लोप झाला. आता तर फार मोठ्या प्रमाणात पुच्छ प्रगती चालली आहे व देश पुन्हा मध्ययुगात जाईल अशी साधार भीती वाटण्याचा विषम काळ येत आहे. चिंता वाढत आहे.

सर्वच जाती-जमाती, शैक्षणिकदृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या एकाच पातळीवर नव्हत्या व अद्याप नाहीत. विद्येत जे मागासले होते त्यांच्यासाठी खास प्रयत्न त्यांना पुढे आणण्यासाठी करावे लागले. पूर्वास्पृश्यांसाठी करावे लागले व लागतात. ब्राह्मो व प्रार्थना समाज असतानाही म. जोतिबाना शूद्रातिशूद्रासाठी खास प्रयत्न करावे लागले. राजर्षी शाहू महाराजांना मागास जाती-जमातींची बोर्डिंग जातवारीने काढावी लागली. सयाजीराव गायकवाड यांनी मराठा शिक्षण परिषद व मराठा स्कॉलरशिपस् यासाठी सर्वाधिक खास प्रयत्न केले. कर्मवीर शिंदे यांना पूर्वास्पृश्यांसाठी खास मिशनच चालवावे लागले. डॉ. आंबेडकरांना असले प्रयत्न चालू असतानाही स्वावलंबनाने स्वतंत्र पक्ष व चळवळ, त्यांच्या समाजासाठी करावी लागली. वरील सर्व समतावादी समाजप्रबोधकांना व ज्यांना जाती तत्त्वतः मान्य नव्हत्या, त्यांनाही प्रत्यक्ष जाती मागास व अतिमागास आहेत, म्हणून त्यांना पुढारलेल्या बरोबर करण्यासाठी जातवारीने खास जातिशः प्रयत्न करावे लागले व केले गेले नसते तर दऱ्या भरून आल्या नसत्या व समाजाची वाटचाल समपातळीकडे व समानतेकडे झाली नसती. याप्रमाणे शिक्षण, नोकऱ्या वगैरेंबाबत मागासलेलेल्या जातींची आगेकूच झाली. सरकारलाही आदिवासी, भटक्या जमाती, पूर्वास्पृश्य वगैरे मागास व अतिमागासासाठी खास प्रयत्न करावे लागले व स्वातंत्र्यातही करावे लागतात. म्हणजे वरील सर्वांना जातिभेद तत्त्वतः व ध्येयतः मान्य आहेत असे म्हणणे चूक आहे. पृथक्भाव, राजकीय सवता सुभा, स्वतंत्र राष्ट्र वगैरेपर्यंत शिख, मुसलमान, तामीळी वगैरे मजल गाठतात; ती मात्र देशद्रोही म्हणावी लागते. देशाची एकात्मकता व विकास यांच्याआड जातिधर्मभेद येऊ नयेत एवढे जरी पथ्य सर्वच पाळू लागले व सर्वांना असा सराव, अभ्यास व वळण प्राप्त झाले तरी प्रगती व समता यांच्या बाबतीत मोठा टप्पा गाठता येईल.

अनुक्रमणिका

समाजसुधारणा, दारू, दारिद्र्य, घातक चालीरीती, पडदा, हुंडा वगैरेबाबत शिक्षण; नोकऱ्या, राजकारण, सत्ता या बाबतीत जाती संस्थांनी व जाती परिषदांनी स्पर्धा केली तशी वरीलसारखे खास सामाजिक परिवर्तनाचे प्रयत्न झाले असते तर सामाजिक न्याय सर्वत्र प्रस्थापित झालाही असता. श्रमविभाग वरील बाबतीत होऊनही स्त्रिया मागे राहिल्या नसत्या. जाती संस्थांनी फक्त पुरुष विद्यार्थ्यांना विद्यावेतने दिली, स्वजातीसाठी वसतीगृहे काढली. मुलींच्यासाठी असा प्रयत्न झाला नाही. बहुतेक प्रयत्न व उपक्रम पुरुषी होतात. म्हणजे पुरुषांसाठी प्रथम केले जातात. स्त्रीस अतिशूद्रांची दाद व आठवण नसते. फार काय हिंदू या व्यापक नावाखाली निघणाऱ्या चळवळी, संस्था व परिषदा फक्त ब्राह्मणी राहतात. जवळकरांनी टिळकांच्या प्रतिगामीत्वावर तीक्ष्ण व कठोर हल्ले केले. पण 'मूकनायकां'च्या पहिल्या अंकात डॉ. आंबेडकरांनी तेच मुद्दे प्रसन्न व भारदस्तपणे मांडले होते. परंतु 'ब्राह्मणेतर' या नावाखाली जे प्रयत्न झाले ते मराठा व फार फार तत्समांच्या पलिकडे गेले नाहीत, म्हणून आंबेडकरांनी १९१९ साली ब्राह्मणेतर व दलित यांच्यातील तफावत 'साऊथबरो कमिशन'पुढे निवेदिली. ब्राह्मणेतर हे विद्येत मागे होते; पण अस्पृश्य नव्हते. त्यांची आर्थिक अवस्था दलिताएवढी दुर्धर नव्हती व नाही. काँग्रेसने या काळात फक्त उठाव केला. इंग्रजाने मुसलमानांसाठी जेवढे केले तेवढे दलितांसाठी केले नाही. 'पण जे व्हावयास पाहिजे ते होत नाही, झाले नाही म्हणून 'न्याय व सामाजिक समता' हा प्रश्न ज्वलन्त राहिला आहे. 'अखिल भारतीय सामाजिक परिषदे'पेक्षा ज्या त्या जातीने आपआपल्या जातीची सुधारणा केल्यास सामाजिक परिषदेचा अखिल भारतीय उद्देश जास्ती कार्यवाहीत येईल असे लो. टिळकांनीही म्हटले होते ('लो. टिळक यांची गेली आठ वर्षे', १९०९, पृ. १९१). अ. भा. सामाजिक परिषदेत फक्त हिंदू समाजाचा विचार झाला, मुस्लिम व ख्रिस्ती देशबांधवांचा राष्ट्रीय काँग्रेसप्रमाणे सामाजिक परिषदेत समावेश झाला नव्हता व तेही स्वतः दूर राहिले आणि त्यांनी त्यांच्या समाजाच्या व धर्माच्या परिषदा हिंदूंच्याप्रमाणे भरवूर समाजप्रबोधन केले नाही. त्यांच्यात धर्मशोधन व सर्वांगीण सत्यशोधन झाले नाही व आत्मपरीक्षणाचा उदय झाला नाही. उलट अल्पसंख्य समजून स्वतः बहुसंख्यांकापासून मनाने व राजकारणाने दूर राहिले व स्वतःदेखील न्याय व समता प्रस्थापित करू शकले नाहीत!

धर्म व जातिभेद समतेच्या आड येतात. एकभाव एकमन व परस्परावरील विश्वास, देशप्रेम व राष्ट्रभक्ती यांना प्राधान्य न देण्याची प्रथा या देशात बळावली आहे व एकूण राष्ट्रात सर्वत्र व सर्वांमध्ये सामाजिक न्याय व समता कशी निर्माण होई याचे चिंतन व चिंता यापुढे तरी वर्धमान झाली पाहिजे. तुम्ही कोणत्याही मार्गाने जा, त्यामध्ये जातिभेद आडवा येईलच, हा आबेडकरांचा अनुभव राष्ट्रव्यापी म्हणावा लागेल. कामगार चळवळ व वर्गलढे जरी घेतले तरी त्यांचा इतिहास हेच दाखवितो. कोणत्याही राजकीय पक्षाला निवडणुकीत जाती व धर्म यांचा विचार करावा लागतो. अनुभवान्ती 'जी जात नाही ती जात' अशी व्याख्या एक विद्वान करितात. पण न्याय व सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी 'जी जाते ती जात' अशी आशावादी व्याख्या, निराशा सोडून करणे भाग आहे. साहित्याला म्हणजे वैचारिक प्रांतालाही जातीय मर्यादा पडतात. इतिहास संशोधनालाही जात्याभिमान आडवा येतो व 'रामदास-शिवाजी' वगैरे अनेक वादविवाद उपस्थित केले जातात!

### राखीव जागा व सवलती

राखीव जागा व सवलती यांना विरोध करण्यास सर्व त्रैवर्णिकांचा जातीय स्वार्थच उघडा होतो. न्याय व सामाजिक समता ह्यावर विचार करिताना हा ज्वलन्त विषय वगळता येत नाही. मागास व अतिमागास वर्गांना

अनुक्रमणिका

शिक्षण, प्रातिनिधीक संस्था व नोकऱ्या वगैरेंच्या क्षेत्रांत राखीव जागा असणे पूर्ण न्यायाचे आहे. तत्त्व म्हणून मान्यता देणे न्यायशील विचारवंताचे कर्तव्य आहे. घरातील दुर्बल व आजारी माणसाने बरे व्हावे, म्हणून इतरांनी त्याग करूनही त्याला सकस आहार दिला पाहिजे. या संबंधाने राजर्षी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांची ठोस विचारसरणी सवलतीविरुद्ध तक्रार व सतत कुरकूर करणाऱ्यांनी अभ्यासावी. सामाजिक समता व न्याय प्रस्थापित व्हावा म्हणूनच घटनेत राखीव जागा व सवलतींचे तत्त्व व धोरण गोविले आहे व लोकसभेने आणखी दहा वर्षे मुदत वाढविली आहेच. न्याय प्रस्थापित होण्यासाठी व सामाजिक समता निर्माण व्हावी म्हणून शासनाला करता येणे शक्य आहे असा हा अनुभवशीर व यशस्वी उपाय आहे. दलितांमध्ये जी आज प्रगती दिसते ती सवलती नसत्या तर झाली नसती. दरी भरत भरत जाईल व असा काळ येईल की, सवलतींची जरूरी राहणार नाही, असे उभयपक्षी वाटेल. पण असा काळ फार दूर वाटतो.

प्रत्येक प्रांतात भाषावार प्रांतरचना झाल्यावर तेथील स्थानिक बहुजनसमाज हा राजकारणात पुढारी समाज बनला. तत्पूर्वी प्रत्येक प्रांतात, विद्येत व संस्कृतीत एक एक स्थानिक अल्पसंख्य समाज परंपरेने व संस्काराने पुढे होता. त्याची संख्या एकूण भारतात साडेतीन टक्के आहे. पण सर्वच भारतात ह्याने चाळीस पन्नास टक्के जागा व्यापल्या आहेत. पुढारी बहुजनसमाज, जे प्रांतात आहेत, त्यांच्याकडे देशातील जमिनींची मालकी जास्तीपणे आहे. जमिनीचे 'राष्ट्रीयीकरण' करण्याचे ठरल्यास प्रत्येक प्रांतातील बहुजनसमाज खवळून उठतील, ज्याने त्याने यासाठी आत्मपरीक्षण करावे हे अधिक चांगले. सवलतींच्या प्रश्नावर महाराष्ट्राचा गुजरात झाला नाही किंवा करता आला नाही, येत नाही; याचे श्रेय महाराष्ट्रात जे सर्व वर्गात व थरात लहान-मोठे समाजसुधारक-अस्पृश्योद्धारक झाले त्यांच्याकडे जाते. मागे त्रैवर्णिकांनी सवलती उपभोगिल्या. मराठा समाजास इंग्रजी राज्यात राखीव जागा होत्या, मिडल क्लास स्कॉलरशिपस् होत्या. त्यांच्यात अनेक मराठे संस्थानिक होते. त्यांनी शैक्षणिक सोयी व सवलती आणि प्रोत्साहन उपलब्ध केले होते. यामुळे हा बहुजनसमाज सत्वर पुढे आला. या प्रकारे ज्यांनी सवलती उपभोगिल्या त्यांनीच दलितांच्या सवलतींना विरोध करू नये. हे न्यायाचे ठरेल. दलितांच्या सवलतीसंबंधी तपशील, कार्यवाही वगैरेबाबत आज खूप चर्चा चालू आहे. सवलतीपासून फायदेतोटे सांगितले जातात. पण राखीव जागा व सवलती आताच बंद केल्या तर दलित समाज मागे राहील. या दृष्टीने राखीव जागा व सवलती, त्यांचे उपयोग व परिणाम पाहून समर्थनास प्राप्त ठरतात. केवळ आर्थिक निकष व गुणवत्ता हे निकष ठरविल्यास न्याय व सामाजिक समता याचा लोप होईल व विषमतेची भरून येत चाललेली दरी आहे तशीच राहील. सुपरिणामापेक्षा प्रत्यक्षात दुष्परिणामच अधिक होतील. तपशील पुष्कळ पुढे येणे शक्य आहे, पण 'न्याय व सामाजिक समता' यासाठी मंडल आयोगाची नामांतराच्या प्रश्नासारखी बोळवण होऊ नये. सवलती व राखीव जागा कायमपणे असाव्यात असे बाबासाहेबांचेही मत नव्हते. सवलती व राखीव जागा ह्या दलितांतील खऱ्या गरजूंना मिळाव्यात. असे यापुढे तरी न होईल तर ह्याला दुसरा अन्याय म्हणणे क्रमप्राप्त होईल. जे पुढे आले आहेत त्यांनी दुसऱ्यांना पुढे येऊ देणे व आणणे हे त्यांचे कर्तव्य होय.

**दलित साहित्य आणि सामाजिक समता**

वेगळ्या राखीव जागा व सवलतींचा न्याय्यपणा दर्शविल्यावर दलित साहित्याचा तोच स्वतंत्र उद्देश सांगणे भाग आहे. दलित साहित्य हे दलितत्त्वाइतके प्राचीन व जुने आहे. डॉ. आंबेडकरांच्या वेळी व पूर्वी देखील दलित साहित्य प्रकाशनास सुरुवात झाली होती. ह्या प्रकाशनापूर्वी दलित साहित्य लिखित नव्हते. ते तोंडी होते.

दलित संतांच्या वाणीतून ते बाहेर पडले. गेली तीसपस्तीस वर्षे दलित साहित्य असा प्रयोग स्वतंत्र होऊ लागल्यानंतर उत्तरोत्तर सर्वांना ज्ञात व भासमान झाले. जोतीरावांच्या शाळेतील एका अतिशूद्र मुलीने पूर्वास्पृश्यांवर होणारा अन्याय आधुनिक काळी लिहून प्रसिद्ध केला. जुलूम व गुलामगिरीचे स्वरूप मांडले. अतिशूद्रांच्या गळ्यात पेशवाईत गाडगी बांधली होती. याला कागदी पुरावा कोणता? असे महामहोपाध्याय पोतदार यानी मला त्यांच्या वाईतील वास्तव्यात विचारला होता. 'पुणे वर्णन'कार कै. ना. वि. जोशी यांनी हा जुलूम त्यांच्या 'पुणे वर्णन' पुस्तकात शेवटी नमूद केला आहे. किल्ल्याच्या पायात व मोठमोठ्या बांधकामाच्या पायात मांगमहारांना पुरत होते. ज्यानी गुलामगिरी लादली त्यांच्याच कागदपत्रांत जुलूम कसा व कोण नोंदणार? दलित साहित्य आताचे चालू वर्तमान अन्याय व विषमता मांडते. सामाजिक न्याय व सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी दलित साहित्याचा उगम व विकास झाला व होणे अगत्याचे आहे. देशात दलितत्त्व असेपावेतो दलित साहित्याचे वेगळे अस्तित्व राहील व ज्यावेळी ह्या दलित साहित्याची वेगळी गरज संपेल त्यावेळी सामाजिक न्याय व समता निर्माण झाली व दरी भरून आली, असे खात्रीने मानता येईल. एक गाव एक पाणवठा होऊन फक्त चालणार नाही. उभय वस्त्या पूर्णपणे मिश्रित होऊन संपूर्ण गाव एक होईल तेव्हा इतर देशाप्रमाणे एकमय समाज निर्माण झाला, असे सिद्ध होईल. पण असा काळ आणखी किती दूर आहे?

**न्याय व सामाजिक समतेच्या प्राप्तीचे मार्ग**

न्याय द्यावा लागतो. सामाजिक न्याय मिळू शकत नाही म्हणून जैन व बुद्ध वेगळे झाले. आक्रमक आल्यावर येथील अतिशूद्रातील बरेच लोक मुसलमान झाले. ख्रिस्ती मिशनरी आल्यावर पुष्कळ ख्रिस्ती झाले. येथील धर्मेतिहास तपासता न्याय व सामाजिक समता प्राप्त होण्यासाठी 'धर्मांतर' हा एक मार्ग होता, असू शकतो व अजूनही धर्मांतरे होतात. इतर कारणे असतील देखील. पण व्यवसायस्वातंत्र्य वगैरे फायदे मिळू शकले. धर्मांतराला हिंदू धर्मातील विषमता हे मुख्य एक कारण म्हणून मान्य करावे लागते. ज्यांना धर्मांतर नको असते, अशांनी हिंदू धर्मसुधारणेचा मार्ग पत्करिला. राममोहन, रानडे, दयानंद, जोतीबा फुले वगैरे धर्मसुधारकांनी स्वधर्मात राहूनच धर्मसुधारणेचे प्रयत्न केले. पण ह्यांना खेड्यापाड्यांपर्यंत सर्वत्र सर्वांगी यश यावयाचे आहे, ते आता स्वातंत्र्यात यावे. असे दोन मार्ग सामाजिक विषमतेकडून समतेकडे जाण्याचे इतिहासात उपलब्ध आहेत. हिंदूधर्मातील विषमता व इतर धर्मातील सामाजिक समता यांचे तौलनिक निरीक्षण/परीक्षण करून सामाजिक समतेसाठी धर्मांतराची तरफदारी केलेली जोतीबात आढळते. म्हणूनही प्रारंभी जोतीराव अप्रिय होते. खरी वस्तुस्थिती सांगणारा व प्रतिपादणारा लोकमान्य होऊ शकत नाही.

सारासारविवेक केल्यावर व वरील हजारो वर्षांचा इतिहास तपासल्यावर समतेसाठी व न्यायासाठी आंबेडकर यानी बुद्धधर्मात प्रवेश करून धर्मदीक्षा घेतली, हा एक धर्मेतिहासाला धरून उपायच झाला. न्याय, नीती व समतेचा हा एक स्वतंत्र भारतीयच मार्ग आंबेडकरांनी उपलब्ध पुन्हा केला. पण हा देखील सार्वत्रिक व्हावयाचा आहे. न्यायाची जरूरी व सामाजिक समतेची भूक व आवश्यकता दलितांच्या दृष्टीने या देशात अधिक आहे. म्हणून वरील मुद्दे विचारात घ्यावे लागतात. सामाजिक न्याय व समता यावी म्हणून फुले-बुद्ध-आंबेडकर व मार्कस् यांचा अभ्यास अटळ आहे. आणखी एक मुद्दा नमूद करावा लागतो. तो म्हणजे वेदांचे ऐतिहासिक व साहित्यिक महत्त्व मोठे असले तरी न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी वेदबाह्य व्हावे लागते. वेदांचे सर्व

अनुक्रमणिका

प्रामाण्य सोडूनच आतापर्यंत बुद्धापासून पुढील धर्म व समाजसुधारणांचे प्रयत्न झाले. जोतीराव तर म्हणतात की सर्व धर्मांच्या ग्रंथांनी स्त्रियांना सामाजिक न्याय दिला नाही.

**न्याय व समतेचा मार्ग**

हजारो वर्षे अध्यात्मप्रधान तत्त्वज्ञाने न्याय व सामाजिक समता स्थापू शकली नाहीत. गेल्या शतकातील समाजप्रबोधने प्रधानतः आध्यात्मिक होती. राममोहन, रामतीर्थ, विवेकानंद, दयानंद, रानडे-गांधी वगैरे सर्व प्रबोधक अध्यात्मप्रधान होते. यापुढे आपल्या भोवतालचे जे प्रत्यक्ष जग आहे व त्यातील माणसांचे जे दृष्टिकोण आहेत, प्रत्यक्ष विकासाचे जे इहवादी भौतिक नियम आहेत त्यांचे शोधन व आकलन म्हणजे तत्त्वज्ञान होय अशी व्याख्या करणे भाग आहे. धार्मिक कल्पनावादानेच समता व न्याय स्थापित होणार नाही. उदा., अद्वैत तत्त्वज्ञान मूलतः समतावादी आहे. हजारो वर्षे हे तत्त्वज्ञान जगात व भारतातही मूळचे उपलब्ध असूनही समता निर्माण न होता, हजारो वर्षे विषमता नांदत आहे. अलिकडील जगात एकेश्वरीवादी चळवळी निघाल्या पण त्यांनाही एक धर्म व एक मनुष्यजाती बनविता येत नाही, याचे कारण मनुष्य समाजात एकच समान हितसंबंध असू शकत नाहीत. श्रीमंती व गरीबी यातील तफावत व पिळणूक सर्वच ऐतिहासिक धर्म नाहीसा करू शकण्यास असमर्थ ठरतात. आध्यात्मिक तत्त्वज्ञान शाश्वत असते, त्याला गती व विकास अत्यल्प असतो. परमार्थात तत्त्वज्ञानाचे महत्त्व मान्य करूनही ते विषमता (ऐहिक) घालवू शकत नाही. कारण त्यात मुख्यतः पारलौकिक विचार असतात. खाजगी मालमत्तेचे दुष्परिणाम अध्यात्मवादी समता संपवू शकत नाही. गुलामी व मालकशाही विषमतेला जन्म देते. कृषिप्रधान आपल्या देशात सरंजामदार-इनामदार, धनदांडगे होते. अजून त्यांचा पीळ तसाच कायम आहे. शेतीसंबंधाने जमीनमालक व मजूर यांचे आर्थिक प्रश्न नवे नवे निर्माण होत आहेत. जातीयतेबरोबर वर्गभेद वाढत आहेत. अवाढव्य सतत वाढती लोकसंख्या या खंडप्राय देशाचे विविधतासंपन्न विराट स्वरूप पाहता येथे पात्र व समर्थ शासन प्राप्त झाल्याखेरीज ह्या मंद परिवर्तनवादी देशात न्याय व समता स्थापन होणे दुष्कर आहे. जास्तीत जास्त स्त्रिया निरक्षर असल्याने व विशेषतः खेड्यापाड्यांतील शेतकरी स्त्रियांत पूर्वास्पृश्यांबद्दल अजून तिरस्कार व मनात घृणा आहे. परंपरावाद व अंधश्रद्धा बळकट आहेत. हरित क्रांती झाली आहे असे म्हटले जाते, पण हृदयपरिवर्तन झालेले नाही. यामुळे सामाजिक-धार्मिक (Socio-Religious) विषमता खेड्यापाड्यांत जास्त आहे आणि आर्थिक विषमतेच्या प्रश्नाने ह्यात मनस्वी भर घातली आहे.

समता व न्याय काही व्यक्तींच्या पुरोगामी मनात उदय पावून फक्त चालत नाही. सगळा समाजच न्याय व समता यांचा क्रियाशील भोक्ता बनला पाहिजे. तरच अस्पृश्यतेसारखे सामाजिक दोष संपून जातील. हे दोष मूलतः पूर्णतः नाहीसे झाले हा एक भ्रम आहे.

डॉ. आंबेडकरात 'सामाजिक नीती' हा एक महत्त्वाचा विचार आढळतो. सामाजिक समता ही सर्वांगणी असणे उपयुक्त आहे. उदा., लोक त्यांच्या श्रमातून संपत्ती निर्माण करतात. नफ्याचे मालक मात्र भांडवलदार-कारखानदार वगैरे तत्सम धनाधिपती होतात. श्रमिक देखील नफ्याचे वाटेकरी झाले पाहिजेत. मजूर व दलित यांना आर्थिक समता प्राप्त झाली पाहिजे. केवळ पारमार्थिक, धार्मिक व सामाजिक समता भांडवलदारी अर्थव्यवस्थेत अपूर्ण ठरते. दलितांचा प्रश्न हा असा नव्याने आर्थिकही आहे. खाजगी मालकी निदान मर्यादित

केल्याशिवाय न्याय अशक्य आहे व सामाजिक समता हे अशा अवस्थेत स्वप्न होय. फसवणूक व पिळवणूक असता कामा नये. सामाजिक शिवताशिवत संपली म्हणजे आर्थिक दलितत्त्व खलास झाले असे नव्हे. समाज दर्जा, समान संधी, समान हक्क ज्या समाजात सर्वांना सारखे मिळू शकतात तो समसमाज होय. सरंजामी व भांडवलदारी समाजव्यवस्थेत समान न्याय व समान समता अशक्य होय. केवळ साम्राज्यशाही जाणून राजकीय स्वदेशी स्वतंत्र लोकशाही स्थापन झाली म्हणजे न्याय प्रस्थापित झाला असे नव्हे. खाजगी मालमत्ता व विशेषतः जमिनीची मालकी ही येथे जीवापेक्षा प्यारी असल्यामुळे सहकारी शेती देखील वाढली नाही. सहकारी तत्त्व व चळवळ मर्यादितपणे का होईना भांडवलशाहीच्या दुष्परिणामांना आळा घालते. पण जास्तीतजास्त उत्पादनाचा विषय असलेल्या ह्या शेतीक्षेत्रात सहकारी वृत्ती व प्रवृत्ती मुळीच मूळ धरू शकली नाही. देश औद्योगिक आहे असे अजून म्हणता येत नाही. देश हा शेतीप्रधान व शेतकऱ्यांचा आहे. कामगारांचे प्रश्न जी थोडी मोठमोठी शहरे आहेत, तेथेच आहे. जास्तीतजास्त लोक खेड्यापाड्यांत राहतात व ह्या गावगाड्याचे स्वरूप हल्ली आहे तसेच ठेवून सामाजिक समता येणार नाही. धार्मिक प्रश्न व धर्म गौण व दुय्यम होत जात आहे. म्हणून सामाजिक समता हिची व्याख्या आर्थिक समता व तत्संबंधीचा न्याय असा करावा लागतो. पिळल्या जाणाऱ्यांत फक्त पूर्वास्पृश्य दलितच सामावतात असे नव्हे, दलितत्वची आर्थिक व्याख्या जन्मजातीवर आधारित करून यापुढे सतत चालणार नाही. जातीय विषमतेविरुद्ध लढा जसा येथे जरूर आहे तसा वर्गलढा देखील अटळ होत जाणार. समाजरचना यापुढे वर्णविग्रहीच फक्त मुळीच राहणार नाही. वर्गविग्रही समाजरचना येथे आहेच. वर्ण गुळगुळीत व बोथट झाले आहेत. पण जातीभावना वाढत आहेत. आश्रमधर्म राहिला नाही. येथील धर्म व तत्त्वज्ञान प्रायः मायावादी व निवृत्तीप्रधान असूनही भ्रष्टाचार वाढत आहे. शोषण कोणत्याही प्रकारचे असणार नाही तेव्हा न्याय व खेड्यांचा विकास यामध्ये मोठी दरी दिसते. भांडवलदारी लोकशाहीऐवजी समाजवादी लोकशाही निदान भारतात अपेक्षित ठरते. यासाठी 'सामाजिक जाणीव' वाढली पाहिजे. अन्न, वस्त्र, औषध व शिक्षण आणि काम सर्वांना मिळाले पाहिजे. बेकारी व दारिद्र्य नष्ट केले पाहिजे.

न्याय व सामाजिक समतेसाठी त्यावर विचार करिताना जीवनाचे कोणतेच अंग वगळता येत नाही. शासन, न्यायखाते, कायदा, नीतिमत्ता, कला, धर्म, साहित्य, तत्त्वज्ञान व विज्ञान वगैरे अंगोपांगे संबंधित होतात. फक्त एकाच क्षेत्रात न्याय व समता असून चालत नाही. शासनाचे व राज्यकर्त्यांचे दडपण न्यायसंस्थेवर असेल तरीही अन्याय वाढतो. भारतीयांचा पिंड सामाजिकदृष्ट्या व व्यक्तिशः अध्यात्मवादी व धर्मवादी म्हणजे रूढीवादी आहे. मानसिक पालट ह्या क्षेत्रात प्रथम होण्याची गरज आहे. धर्मशास्त्रापेक्षा जीवन हे रूढीने चालते. म्हणून अनिष्ट रूढीशी लढा द्यावा लागतो. ब्राह्मण (=विषमता) जी आहे ती सर्वच दलितांसह ब्राह्मणेतरांना व्यवहारात जरूरीची वाटते. म्हणून ब्राह्मणीधर्म ब्राह्मणेतरांच्या कडूनच टिकविला जातो ही खरी सामाजिक शोकांतिका आहे.

वर्णलढा व वर्गलढा असे दोन मार्ग न्याय व समतेच्या प्रस्थापनेसाठी सांगितले जातात. वर्णाश्रमांचा लोप होऊन समाजाच्या सर्व वर्गांत जातीयता व तत्संबंधाने निर्माण होणारी विषमता प्रत्यक्ष जारी असते, म्हणून जातीयतेविरुद्ध लढा व वर्गलढा हे समतेचे मार्ग होऊ शकतात. दलितांतही धर्मजातीभेद व वर्गभेद आहेत म्हणून इतराप्रमाणे देखील त्यांनाही हे दोन लढे जरूर आहेत. जातीसंस्था व जातीभेद चुटकीसरशी संपणार नाहीत, हेही खरे! पण जातीद्वेष, मत्सर सर्वांना सोडिता येईल व जातीय सलोखा निर्माण करिता येईल.

अनुक्रमणिका

सर्वांनी एकसारखा प्रयत्न करणे, हे सर्वांचे राष्ट्रीय कर्तव्य होय. वर्णलढा म्हणजे जाती व्यवस्थेविरुद्ध लढा होय. चार-वर्ण म्हणजे देखील चार जन्मप्राप्त जातीच (Four Castes) ठरतात.

समाजात अनेक थर आहेत. ह्या थराथरांत परस्परांबद्दल 'सामाजिक विश्वास' असणे व वाढणे जरूर आहे. शेजारधर्म हा पुष्कळ अंशी सेक्युलर' असतो. विविधतेतही हा प्रेमभाव टिकवून धरतो. सामाजिक समतेसाठी हा प्रेमधर्म देखील उपयोगी पडतो. सहकार्य वाढवितो. Just म्हणजे Fair हा एक न्यायाचा अर्थ होतोच.

न्यायालयात दावे-फिर्यादी दाखल झाल्यावर दोन्हीही पक्षाला असे वाटले पाहिजे की, जो न्याय दिला गेला तो योग्य आहे. आरोपीच्या बाबतीत 'प्रॉसिक्यूशन' जरूर असते, पण कायद्याचा उपयोग 'परसिक्यूशन' म्हणून छळासाठी होऊ नये. दिवाणी व फौजदारी न्याय असा अर्थ घेऊन कायदा व न्याय याचा येथे विचार करावयाचा नव्हता. हा विषय असा येथे मांडला नाही. तरी 'सामाजिक न्याय' (Social Justice) यासंबंधाने कोर्टात दावे होतात. त्यावेळी दुर्बलांना न्याय मिळणे सामाजिक बाबतीत, समतेच्या दृष्टीने जरूर आहे. उदा., अस्पृश्यता निवारक कायदा.

या देशात पारमार्थिक व आध्यात्मिक समतेचे प्रयत्न बुद्धापासूनच्या सर्व संतांनी केले, म्हणून जीवाचा द्वेष येथे नव्हता. बाह्यतः अस्पृश्यता, जातिभेद आजच्या पेक्षा रूढ होते, तरी ते हजारो वर्षे असूनही सह्य झाले. आता व यापुढे मात्र हेच विषमतेचे कारण ठरतात. म्हणून त्यांचे समर्थन करणे, हा देखील अन्याय होय. सामाजिक अन्याय व सामाजिक विषमता यांचे अस्तित्व व लोकशाही खऱ्या अर्थाने इथे एकत्र नांदू शकणार नाहीत.

## गुलामगिरी व सामाजिक स्वातंत्र्य

धार्मिक व सामाजिक गुलामगिरी होतीच. निग्रो गुलामगिरी व आपल्याकडील गुलामगिरी यात साम्य आढळते. पण भेदही तपासला पाहिजे. पुरोहितवर्गाने धर्मग्रंथ ईश्वरप्रणित व देवदूत आहेत, म्हणून ते अपरिवर्तनीय आहेत; या प्रकारचे धर्मग्रंथांचे सर्वांशी प्रामाण्य निर्माण केले व विषमता व अन्याय यांना शास्त्राधार दिला. बौद्ध, जैन, भागवत, ब्राह्मो समाज व सत्यशोधक समाज यांनी धर्मग्रंथ ईश्वरप्रणित नसून मनुष्यकृत आहेत असा निर्वाळा दिला व बुद्धिस्वातंत्र्याचा मार्ग मोकळा केला. तथापि मुसलमानी व ख्रिस्ती धर्मात पोथीप्रामाण्य जारी आहे. म्हणून त्यांचा निधर्मी 'सेक्युलर' विचारआचाराला विरोध आहे व त्यांच्यातीलही विषमता व भेद ते टाळू शकत नाहीत. मुसलमानी धर्मात धर्माधारे स्त्रियांवर अन्याय होतो. सर्वांनीच निधर्मीवादाची कास धरली तर न्याय व सामाजिक समतेच्या वाटा खुल्या होतील. न्याय व सामाजिक समता यांचा विचारआचार फक्त हिंदू पुरताच होऊन उपयोगी नाही. धर्मस्वातंत्र्य म्हणजे पोथीनिर्मित गुलामगिरीतून मुक्तता. ही मुक्तता झाली म्हणजे समान नागरी कायद्याची वाट मोकळी होते. पण भारतासारख्या धर्मश्रद्ध देशात हे अवघड ठरत आहे. ज्यांचा समान नागरी कायद्याला विरोध आहे, त्यांना प्रत्यक्ष त्याच देशाचे नागरिक म्हणून राहावे लागते व राहावे लागेल.

युरोपिअन पुरोहितशाही व विशेषतः हिंदू धर्मातील पुरोहितशाही एक स्वरूप समजून विचार करण्यात आला. गेल्या शतकात होऊन गेलेल्या प्रबोधकांनी युरोपमधून आलेले विचार पुढे ठेवून न्याय व सामाजिक-धार्मिक

समतेचा विचार केला. आता भारतीय घटना जी समतेवर आधारली आहे, तिची तत्त्वे मूलभूत धरून न्याय व समतेचा, स्वातंत्र्यात विचारआचार केला पाहिजे. यासाठी, नवे व नवीन प्रश्नांसमोर जाणारे नवे प्रबोधन हवे. डॉ. आंबेडकरांनी समाजातील Like mindedness व विशेषतः Human Rights आणि Civil Rights यांची महती 'साऊथबरो कमिशन'पुढील साक्षीत निवेदिली होती व Material well being ची देखील मागणी केली होती. आता सर्वांच्या संबंधाने हे मुद्दे व्यापकपणे लक्षात घेण्याची नवी गरज आहे.

न्याय-नीतीचा उगम व विकास समाजात झाला पाहिजे व न्यायाचा व सामाजिक समतेचा अनुभव व्यक्तीलाही आला पाहिजे. दुर्बल घटकांना सबल घटकाकडून अन्याय होत नाही अशी प्रचीती आली पाहिजे. लोकशाही ही विकेंद्रित प्रत्यक्ष नसेल, तर सत्तेवर येणारा पक्ष-समूहगट-अन्याय व दडपशाही करू शकतो. ज्या लोकशाहीत विरोधी पक्ष संघटित व समर्थ नसतो, तेथे सत्तेचा गैरवापर होऊ शकतो. लोकशाही, सामाजिक समता निर्मिण्यास व संवर्धण्यास समर्थ ठरली पाहिजे. जाती व धर्म यावर आधारलेले राजकीय पक्ष बेकायदेशीर ठरविण्याची अत्यंत गरज आहे.

भारतात जन्मजातीवरून व जन्मप्राप्त धर्मावरून अल्पसंख्य व बहुसंख्य असे विघटन आहे. ह्या विघटनाची मूलतः गरजच राहाणार नाही. तेव्हा सामाजिक न्याय आणि सामाजिक समता प्रसिद्ध झाली असे समजण्याचा काळ प्राप्त झाला, असे सर्वांना अनुभवाने वाटेल. न्याय व सामाजिक समता यासाठी अविरत प्रयत्न आपण सर्वांनीच केले पाहिजेत. एवढे तरी सर्वमान्य आहे.

अनुक्रमणिका

५.

# म. फुले-चरित्राचा सुवर्णकळस

विद्येत मागासलेल्या लोकांसाठी इ. स. १८५२ चे सुमारास फुल्यांनी एक वाचनालय ("the first Native Library for these castes") उघडले. आतापर्यंत स्त्री-शूद्रादिकांच्या शिक्षणार्थ त्यांनी जे अद्वितीय प्रयत्न केले याबद्दल फुले म्हणाले; He said and he acted in "Conformity with the dictates of canscience, and above all the will of God" ('बोर्ड ऑफ एज्युकेशन'चा रिपोर्ट, १८५६ पा. १७) ह्या उच्च ध्येयानुसार सहासात वर्षे ह्या शाळा त्यागपूर्वक चालवीत असताना येथील समाजस्थितीचा फुल्यांना अनुभव आला व त्यातील महत्त्वाच्या पुढील दोषांचे त्यांना दर्शन झाले :

१. स्त्री-शूद्रादिकांवरील दास्य.
२. अस्पृश्यता.
३. जातिभेद व वर्णाश्रमानिर्मित विषमता आणि वर्चस्व.
४. समाज एक जिनसी नाही. उलटपक्षी वरिष्ठ वर्गीयांचे हितसंबंध भिन्न असून ते बहुजनसमाजाला बाधक आहेत.
५. पुरोहित वर्गाची गुलामगिरी अस्तित्वात आहे.

यासाठी प्रथम मुख्यतः बहुजनसमाजाला गुलामगिरीची जाणीव करून दिली पाहिजे व त्यास खरे शिक्षण म्हणजे सत्यासत्य ओळखण्याची पात्रता आणून दिली पाहिजे. हे सत्कार्य करण्याची हिंमत, धैर्य व त्याग तत्कालीन सुधारकांत नाही; असा पडताळा फुल्यांना स्वानुभवाने आला. म्हणून शाळांचा संबंध सोडून त्या दुसऱ्यांच्या हवाली केल्या व जीवितातील प्रधान कार्याकडे वळण्यासाठी ते पूर्ण मोकळे झाले. ह्या विचारांच्या संग्रामात असतानाच, यावेळी त्यांचे वडील (इ. स. १८६४ साली) निवर्तले. यानंतर फुल्यांना बरीच दैन्यावस्था आली. त्यावेळेचे परोपकारी व प्रसिद्ध मिशनरी मरी मिचेल ह्यांनी फुल्यांची शिक्षण देण्याची हातोटी पाहून त्यांना मिशनच्या मुलींच्या शाळेवर शिक्षक म्हणून नेमले. मिशनऱ्यांच्या सहवासात त्यांनी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास केला. सर जोन्स व प्रो. विल्सन यांची हिंदूधर्मावरील टीका त्यांनी वाचली. वाचनाची व संशोधनाची त्यांची मूळची वृत्ती वृद्धिंगत होत गेली. मिशनऱ्यांपासून त्यांनी लोकसेवेची वृत्ती अधिकच आत्मसात केली. पण संशोधकवृत्तीच्या जोतिबाला मिशनऱ्यांना आत्मसात करता आले नाही. राजा राममोहन रॉय यांच्याप्रमाणेच फुल्यांचा मार्ग स्वतंत्र झाला. इ. स. १८५७ च्या बंडानंतर जोतिबांचे युरोपियन मित्र त्यांच्याकडेही सांशकतेने पाहू लागले!! फुले प्रतिकूल परिस्थितीला न जुमानता जीवनध्येयाकडे वळले. मध्यंतरी स्त्रीदास्य निरसनार्थ फुल्यांनी दोन महत्त्वाच्या कार्याचा पाया घातला :
१. ता. ८ मार्च १८६० रोजी पुण्यास गोखल्यांच्या बागेत पहिला पुनर्विवाह घडवून आणला.
२. इ. स. १८६४ साली पहिले प्रसूतिगृह व आद्य अनाथ बालकाश्रम उघडला.
तथापि सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करणे त्यांना भागच पडले.

अनुक्रमणिका

**'सत्य असत्याशी मन केले ग्वाही'**

आतापर्यंतचे फुल्यांचे चाळीस वर्षांचे आयुष्य म्हणजे त्यांच्या कार्याची प्रस्तावना किंवा पूर्वार्ध होता.

१. सुधारकांत राहून कार्य करणे.

२. वासुदेव बळवंत फडके इत्यादी देशाभिमानी क्रान्तिकारकांत मिसळून राज्यक्रान्ती करण.

३. बाबा पदमनजी व रे. शेषाद्री यांच्याप्रमाणे ख्रिस्ती धर्मात विलीन होऊन जाणे.

असे मुख्यतः तीन मार्ग फुल्यांच्या पुढे होते. पण हे तिन्ही मार्ग त्यांनी धैर्याने सोडले व स्वतःचा असा स्वतंत्र सत्यसंशोधनाचा मार्ग काढला. आयुष्याचा सर्व उत्तरार्ध त्या मार्गांच्या प्रसारासाठी खर्ची घातला. जातीभेद नष्ट व्हावा म्हणून 'मी कोणत्याही हातचे अन्न ग्रहण करीन' असे त्यांनी जाहीर केले व याप्रमाणे तेव्हापासूनच वर्तनास प्रारंभ केला. त्यांनी स्वतःचा स्वतंत्र मार्ग काढला, तरी वरील मार्गातील मित्रांचे सहकार्य व मैत्री त्यांनी सोडली नाही. कात्रजच्या घाटात वासुदेव बळवंतांचे सैन्य दबा धरून राहिले होते त्यावेळी जोतिबांनी सैन्याला भाकरी पुरविल्या; व बर्वे प्रकरणात लोकमान्य टिळकांना वीस हजार रुपयांचा जामिन मिळवून दिला. टिळक-आगरकरांच्या तुरुंगवासानंतर जाहीर सत्कार केला. इ. स. १८७३ सालच्या आरंभी त्यांनी 'गुलामगिरी' नामक एक संवादात्मक पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. यापूर्वी अमेरिकेतील लोकांनी निग्रो लोकांना गुलामगिरीतून मुक्त केले. जोतिबा स्वातंत्र्याचे भोक्ते असल्याने त्यांना ही घटना आकर्षक वाटली. या देशात अनार्थ, आदिवासी, शूद्रातिशूद्र इत्यादीकांवर आर्यकाळापासून धर्मग्रंथाधारे 'गुलामगिरी' पुरोहितांनी लादली आहे; ही गोष्ट त्यांनी जनतेच्या व सरकाराच्या नजरेस आणली. अवतारपद्धती, अवतारवाद, पौराणिक विसंगती, जातिभेद, अस्पृश्यता, मनुस्मृतिप्रणित सामाजिक विषमता धर्मग्रंथांचे ईश्वरप्रणितत्त्व इत्यादी पवित्र समजल्या जाणाऱ्या धर्मकल्पनांवर व रूढींवर जोतिरावांनी 'न भूतो न भविष्यति' असा हल्ला चढविला. अव्वल इंग्रजीतही असलेली सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील विषमता व पक्षपात जोतिरावांनी उघडकीस आणला. सरकारची कानउघाडणी केली. आतापर्यंतचे आत्मचरित्रही त्यांनी लोकांपुढे मांडले. धार्मिक गुलामगिरी नष्ट करून धार्मिक स्वराज्य स्थापण्याचा निर्णय त्यांनी घेतला. नंतर हे कार्य एकट्याच्या हातून कधीच व्हावयाचे नाही म्हणून एक बळकट लढा व संघटना निर्माण करण्यासाठी त्यांनी त्यांच्या अनेक सहकारी मित्रांना जाहीर पाचारण केले. खेड्यापाड्यांपर्यंत सागराप्रमाणे पसरलेल्या बहुजनसमाजात चैतन्य व स्वाभिमान निर्माण व्हावा म्हणून इ. स. १८७३ साली सप्टेंबरच्या चोविसाव्या तारखेस पुणे येथे सत्यशोधक समाजाची संस्थापना फुल्यांनी केली. पुरोहिताचे वर्चस्व व मध्यस्थी झुगारून देणे व विद्याप्रसाराचे द्वारे जनतेला मानवी समाज हक्कांची जाणीव करून देणे; हे दोन मुख्य उद्देश समाजाच्या संस्थापनेचे वेळी जाहीर करण्यात आले. जोतिरावानी स्वतःच्या संदेशाचे सार पुढील अभंगात गाईले आहे :

**'जोतिबाचा सार'**

*रडूं लागे शेजाऱ्याशीं। आसूं नाहीं डोळे पुशी॥ १॥*
*मोल घेई रडूं लागे। बहुरुपी आणि सोंगें॥ २॥*
*सर्वं साक्ष जगत्पती। त्याला नकोच मध्यस्थी॥ ३॥*
*विटाळसा तोडी ताल। करी पूजा घेई मोल॥ ४॥*
*मूढा देऊनीया थापा। पापी करितो बा जपा॥ ५॥*
*वकीलाची चाड नाही। कर्ता आमुचा सर्व न्यायी॥ ६॥*

अनुक्रमणिका

*त्राता सर्वांला सारखा। नाहीं कोणाला पारखा॥ ७॥*
*ऐका जोतीबाचा सार। घाला देवाजीवर भार॥ ८॥*

त्याचप्रमाणे विद्याप्रसाराबद्दल फुले म्हणतात :

*"आता तरी तुम्ही मागें घेऊं नका। धिःकारूनी टाका मनुमत॥*
*विद्या शिकताच पावाल तें सुख। घ्यावा माझा लेख जोती म्हणे॥"*

फुल्यांनी स्थापन केलेल्या समाजास 'सत्यशोधक समाज' हे समर्पक नाव योजिल्यामुळे समाजास व्यापकपणा, सर्वसंग्राहकता, विकास, विचारस्वातंत्र्य, संशोधनस्वातंत्र्य इत्यादी अनेक गुणांची जोड मिळाली, तो संप्रदाय होऊ शकत नाही. सत्य व नीती यांचा महिमा फुल्यांनी वाखाणिला व सारासार विचाराला सर्वांत जास्त महत्त्व दिले. उदाहरणार्थ :

*"खरी नीति हाची मानवांचा बाकीचे धर्म। अधर्म ज्योति म्हणे॥*
*सत्याचियें द्वारी। मोक्ष केर भरी॥ भाव नमस्कारी जोति म्हणे॥"*

**सत्यशोधक समाजाचा प्रचार**

समाजाची स्थापना केल्यावर पुढील राहिलेली सतरा वर्षे समाजाचा प्रसार करण्याचे कामी त्यांनी खर्च केली. पुणे प्रांतातून मुंबई, ठाणे व बडोदे इत्यादी ठिकाणी दौरे काढून त्यांनी व्याख्याने दिली व समाजामार्फत गरीब विद्यार्थ्यांना विद्यावेतने देऊन शिक्षणप्रसाराचे कार्य चालू ठेवले. एकेश्वरी पद्धतीचा मराठी लग्नविधी व मंगलाष्टके तयार करून त्यांनी प्रथम स्वतः लग्नांमधून पौरोहित्य करण्यास सुरुवात केली. यामुळे समाजाचा प्रसार वाढला. विरोधही बळावला. इ. स. १८७७ साली प. वा. श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी जोतिबांवर व समाजावरही 'निबंधमाले'च्या द्वारे प्रतिकार व्यक्त केला! तथापि ही चळवळ पुढे अधिक फोफावली. जोतिरावांनी दक्षिणेचा दावा हायकोर्टापर्यंत लढवून विधीस्वातंत्र्य व पौरोहित्याचे स्वातंत्र्य सिद्ध केले. "स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा॥" अशी शपथ मंगलाष्टकाचे द्वारे वराकडून या वरील लग्नविधीत घेतली जाते. "वृद्धा, पंगु सहाय द्या मुलीमुला, विद्या तशी शिकवा॥" असा समाजाचा संदेश शेवटी व्यक्त केला जातो. लग्नादी धर्मविधीत अनाठायी खर्च न करता तो शिक्षणकार्यार्थ करा असा उपदेश करणे समाजाचे काम आहे. पुढे या समाजाच्या तत्त्वांची घटना करण्यात आली. सत्यसंशोधन हे समाजाचे शाश्वत ध्येय आहे व भोळाभाव नाहीसा करणे हे मुख्य कार्य आहे. या समाजाच्या आतापर्यंत सोळा धर्मपरिषदा भरल्या; पहिल्या व शेवटच्या परिषदेतून पुढील तत्त्वांना मान्यता देण्यात आली :

**सत्यशोधक समाजाची तत्त्वे**

१. ईश्वर एक असून तो सत्यस्वरूप आहे. सर्व मनुष्यप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

अनुक्रमणिका

२. त्याची भक्ती करण्यास प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईबापांस संतुष्ट करण्यास त्रयस्थाची व मध्यस्थाची गरज नाही. त्याचप्रमाणे ईश्वर व भक्त यांच्यामध्ये दलालाची जरूरी नाही.
३. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नाही; तो गुणाने ठरतो.
४. कोणताही ग्रंथ सर्वांशी प्रमाण व ईश्वरप्रणित नाही.
५. परमेश्वर सावयवरूपाने अवतार घेत नाही.

इत्यादी विचार व मते ब्राह्मधर्मांप्रमाणेच आहेत व ती बीजरूप स्वरूपात फुल्यांच्या विचारात विखुरली होती. फुल्यांच्या इतर सर्व विचारांचे परीक्षण करता असे आढळते की, त्यांना महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीने, शेतकरी व कामकरी किंवा जुन्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास ब्राह्मणेतर चळवळीस, जन्म द्यावा लागला. ह्या वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीचे व तत्कालीन परिस्थितीचे हृद्‌गत त्यांच्या पुस्तकांतून व्यक्त झाले आहे. तुकारामांप्रमाणे त्यांचे खंडण जोरदार असे. फुल्यांना ह्या भूमीत पुढे सद्विचारांचे पीक यावे म्हणून जमीन नांगरावी लागली. ब्राह्मणी धर्मा विरुद्ध समतेच्या विचारांचा फाळ त्यांच्या विचारसमूहांतून फिरविला जात असलेला प्रथम नजरेस येतो.

**'सार्वजनिक सत्यधर्म'**

आतापर्यंत विविध पुस्तके, संवाद, प्रश्नोत्तरे यांच्याद्वारे व्यक्त केलेल्या मतांचे संकलन 'सार्वजनिक सत्यधर्म' या शेवटच्या पुस्तकात फुल्यांनी केले आहे व 'सर्व लोकांच्या हितासाठी' आयुष्याच्या शेवटी हे पुस्तक अर्धांगवायूच्या आजाराने उजवा हात गेला तरी डाव्या हाताने लिहून पुरे केले. सत्यशोधक समाजाचा 'सत्यधर्म' स्पष्ट केला. फुल्यांना लोकांवर स्वतःचे विचार लादावयाचे नव्हते, समाजाचे ते संस्थापक होते; तरी गुरू म्हणून नव्हते. तथापि त्यांची सेवा व उपकारकार्य पाहून त्यांच्या अनुयायांनी त्यांना ११ मे १८८८ रोजी मुंबईस 'महात्मा' पदवी आदरपूर्वक समर्पण केली. स्तुतीने ते भाळले नाहीत किंवा निंदेने खचले नाहीत. "...व्यंगे दिसून येतील त्याविषयी क्षमा करून गुणलेशाचा स्वीकार करावा." अशी त्यांची विनंती होती. फुले बुद्धीवादाचे पुरस्कर्ते व विचारआचार स्वातंत्र्याचे भोक्ते होते. तरी ते प्रार्थनाशील व अंतःकरणातून ईश्वरीप्रेमाने व स्फूर्तीने ओथंबलेले असत. म्हणून जीवनात त्यांना महाकार्ये प्रथम प्रत्यक्षतः करता आली. फुलेवादाला 'एकेश्वरी समाजवाद' म्हणता येईल. त्यांच्या सत्यधर्माच्या प्रतिपादनाचा इत्यर्थ, पुढील त्यांच्याच शब्दांत कळू शकतो :

> *"ज्याचा मुळमुद्दा सर्वांचा निर्मीक। सत्य आहे एक नसे दुजा॥"*
> *"आपसुखासाठी त्यानें केलें सर्व। बाहू नको गर्व पूजमध्ये॥"*
> *"स्त्री पुरुषांमध्ये निवड नसावी। गुणें आदराची सर्वकाळ॥"*

'बोले तैसा चाले' ह्या तुकारामांच्या उक्तीचा मूर्तिमंत साक्षात्कार त्यांच्या सर्व चरित्रात होतो. इ. स. १८८५ साली गुढीपाडव्यास सत्यशोधक समाजाच्या झेंड्याची मिरवणूक काढण्यात आली. त्यावेळी न्यायमूर्ती रानडेही सामील झाले व नंतर त्यानीही व्याख्यान दिले.

**सत्यवर्तन**

अनुक्रमणिका

धर्ममार्गात मूर्तिपूजा मुख्यतः भोळाभाव निर्माण करू शकते. मूर्तिपूजेमुळे मंदिर संस्था निर्माण होते. मंदिरसंस्थेमुळे साहजिकच उपाध्याय व पुरोहित संस्था निर्मावी लागते. मूर्तिपूजेचा त्याग केल्याशिवाय मूलगामी धर्मशुद्धी होऊ शकत नाही; त्यामुळे भोळाभाव व गुलामगिरी नष्ट होत नाही. "धातू-दगडाच्या मूर्तीस निर्मिकाच्या ऐवजी मान देत नसल्यास त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत." असा स्पष्ट इषारा फुल्यांनी दिला आहे. मूर्तिपूजा सोडल्याशिवाय पुरोहित संस्था नष्ट होणार नाही. एकपत्नीव्रताचा पुरस्कार, अमली व मादक पदार्थांचा निषेध, उद्यम स्वातंत्र्याचा पुरस्कार, नशिबवादाचा निषेध इत्यादी अनेक विधायक चळवळींना साह्यभूत होणाऱ्या तत्त्वांचा फुल्यांच्या जीवनात व त्यांच्या संभाषणयुक्त वाङ्यात समावेश झाला आहे. राममोहन व केशवचंद्र सेन ह्यांच्या चरित्रांशी व विचारांबरोबर फुल्यांचे अनेक विचार जुळते आहेत व त्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'ब्राह्मधर्म' तत्त्वतः दोन नाहीत. सत्य व ब्रह्म दोन असू शकत नाहीत. फक्त परिस्थितीने भिन्न इतिहास तयार केले. जोतिरावांनी मानवधर्म व मानवतावाद यांचा पुरस्कार करून त्यासाठी प्रत्यक्ष सामाजिक लढा चालू केला व 'शिक्षण' हा एकमेव उपाय सांगितला.

## शिकवण व शेवट

इ. स. १८९० साली पुन्हा जोतिरावांचा आजार बळावत चालला. शेवट जवळ येत चालला होता याची त्यांना जाणीव होती. देह थकत होता तरी त्यांच्या आत्म्याची ज्योत आनंदीच होती. जन्मास येऊन करावयाचे ते सर्व कार्य केले व आपल्या मागे हे सत्कार्य चालविणारी मंडळी आहेत म्हणून त्यांना आनंद होत होता. त्यांचे खाजगी, वैयक्तिक व कौटुंबिक जीवन समाजसेवेतच विलीन झाले होते. त्याला निराळे अस्तित्वच उरले नव्हते. पत्नी सावित्रीबाई व अनाथ बालकाश्रमातून लहानाचा मोठा झालेला दत्तकपुत्र यशवंतराव यांनी जोतिरावांची फार सेवा केली. त्यामुळे त्यांना परम संतोष होत असे. 'अनेक संकटे आली तरी सत्यप्रसाराचे कार्य सोडून नका' असा धीराचा संदेश, शेवटी जवळ जमलेल्या अनुयायांना व मित्रांना त्यांनी दिला व चित्त परमेश्वराच्या प्रार्थनेत मग्न ठेवले. ता. २७ नोव्हेंबर १८९०, गुरुवार रोजी रात्रीचे दोन वाजून वीस मिनिटांनी ह्या सत्यशोधक पुरुषोत्तमाने मर्त्य देह ठेवला व तत्पूर्वी शाश्वत विचारांचा अमोल ठेवा मागे ठेवला. आपण सर्वांना, विशेषतः त्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांना, ह्या बोधामृताप्रमाणे वर्तण्याची बुद्धी व शक्ती प्राप्त होवो, तरच जोतिरावांचा जयजयकार होईल व जोतिरावांच्या चरित्राचे सार्थक होईल. आतापर्यंत फुल्यांच्या विचारचरित्राचे संकलन आपण केले. (१) ब्राह्मणेतर, दलित स्त्रिया व अस्पृश्य म्हणून मानिल्या गेलेल्या वर्गांची बाजू त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म.' पुस्तकातही पुन्हा आवेशाने मांडली आहे. हे कार्य त्यांच्या नजरेआड आमरण होऊ शकले नाही. (२) एकेश्वरी धर्मविचार त्यांच्या पुस्तकांतून आढळतात व शेवटी त्यांचा विकास व परिपोष 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात झालेला आढळतो.

त्यांच्या विचार-संग्रामाचे हे दोन मुख्यतः स्पष्ट दिसणारे प्रवाह आहेत. पहिल्या विचारसंग्रामाचे अधिष्ठान दुसऱ्या विचार-प्रवाहावरच आधारलेले आहे. त्यांची पुढील शिकवण सर्वांनी आत्मसात करण्याचा प्रयत्न करणे हीच त्यांची खरी स्मृती व खरे स्मारक होय. आता मुख्यतः हेच त्यांचे बिकट व विधायक कार्य इतःपर सर्वांपुढे ठेवणे युक्त होईल. पुढील त्यांचे प्रबुद्ध व विकसित विचार म्हणजे त्यांच्या चरित्राचा सुवर्णकळस होय.

अनुक्रमणिका

६.

## सत्यशोधक समाजाचे व्यापक ध्येय व कार्य

म. जोतिबा फुले यांनी त्यांच्या कळकळीच्या मित्रांच्या साह्याने ता. २४ सप्टेंबर, सन १८७३ साली सत्यशोधक समाजाची संस्थापना केली. म. फुले यांच्याही अगोदर सत्यसंशोधन चालू होते व त्याच्यानंतरही सत्यसंशोधनाची गरज ही राहाणारच; कारण सत्याच्या प्रकाशाकडे, अज्ञानातून निघून नेहमीच यावयाचे असते. 'असतो मा. सद्गमय' ही शाश्वत प्रार्थना आहे. सत्य कोणत्याही काळात प्रकाशित झाले पाहिजे. सत्याची गरज नेहमीच असते.

अज्ञ समाजाला धार्मिक गुलामगिरीची जाणीव करून देऊन त्यास विद्येच्याद्वारे मानवी अधिकार समजावून सांगणे व मिळवून देणे या सत्कार्याप्रित्यर्थ म. जोतिराव यांचे जीवन होते व सत्यशोधक समाज या कार्यासाठी साहजिकच निघाला. ह्या समाजाचा सन १८७७ सालचा रिपोर्ट पाहिल्यास असे आढळते की, हा समाज विद्याप्रसारार्थ विद्यार्थ्यांना बक्षिसे, विद्यावेतने इत्यादी साह्य देत असे. डेक्कन मराठा असोसिएशन, पुणे ही संस्था हे काम १८८५ सालानंतर करू लागली. पुणे येथे बोर्डिंग काढावे असाही या मंडळींचा उद्देश होता. संस्थापक पिढीच्या हातून सर्वच कार्य पार पडत नसते. म. फुले यांच्या पश्चात सत्यशोधक समाजाचे कार्यास पुष्कळांनी चालना आणली. तथापि सत्यशोधक समाज अद्याप संस्थारूप झाला नाही. ही एक चळवळ आहे.

### सत्यशोधक परिषद

इ. स. १९१० साली सत्यशोधक परिषद स्थापन झाली व पुढे या परिषदेची फक्त सोळा अखिल भारतीय अधिवेशने भरली. सत्यशोधक समाजाची तत्त्वे निश्चित करण्यात आली तरी राजकीय कामांच्याकडेच बहुतेकांचा ओढा असल्याने सत्यशोधक समाजाचे कार्य व्हावे तसे झालेले नाही. राममोहन, दयानंद इत्यादी सुधारकांना विद्वान, त्यागी व कर्त्या मंडळींची परंपरा लाभली. तशी महाराष्ट्र सत्यशोधक समाजाला लाभली नाही. आता स्वातंत्र्य मिळाले आहे व राजकारणात सर्वांनीच भाऊगर्दी करण्याचे प्रयोजन उरले नाही. निवडणुका व सत्ता आणि जाहिराती स्वरूपाची कीर्ती यांचा मोहन आवरून, सामाजिक सुधारणांच्या कार्याकडे कळकळीच्या कार्यकर्त्यांनी वळले पाहिजे. शिक्षण स्वस्त स्वरूपात कसे वाढेल व सर्वांना मिळेल, याबद्दल सक्रिय विचार केला पाहिजे.

### श्री. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

या दृष्टीने कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे चरित्र व कार्य आज जनतेला फार आदर्श आहे. मिशनरी जीवनाचा हिंदी नमुना म्हणून कर्मवीर शिंदे-चरित्र अत्यंत स्फूर्तिप्रद आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर बाबुराव जगताप ह्यांचीही चरित्रे व कार्य सर्वांना समक्ष दिसत आहेत. कार्यांस वाहिलेले समाजसेवक मिशनरी किंवा भिक्षूभाव जरूर आहेत.

अनुक्रमणिका

**शुद्ध सत्य व निर्मळ गंगा**

नदीच्या पाण्याला महापूर आला म्हणजे नदीचे पाणी गढूळ व भयप्रद वाटते. त्याप्रमाणे मराठी प्रांतातून सत्यशोधक चळवळीला एक प्रकारे पूर येऊन गेला. आता हा पूर ओसरला आहे. नदीच्या स्वच्छ व छान पाण्याचे ध्येय सर्वांनाच उपलब्ध आहे. सत्यशोधक समाज हा मानवतावाद आहे. तो सर्व मानवांसाठी आहे. ही चळवळ प्रांतीय व जातीय वाटते, पण भोवतालच्या सामाजिक वातावरणाच्या व परिस्थितीच्या ठेवणीचा हा दोष आहे. जसजशी समाजात एकजिनशी अवस्था येत जाईल तसतशी ही अनिष्ट घडण नाहीशी होईल. सत्यशोधक चळवळ फक्त धार्मिक चळवळ नाही. म. फुले व त्यांचा सत्यशोधक समाज 'एकेश्वरवादी' होता. हे खरे ब्राह्मो समाज व सत्यशोधक समाज तत्त्वतः दोन नाहीत, फक्त प्रांत व इतिहास दोन झाले. तथापि सत्यशोधक समाजाने जास्ती व्यापक नाव धारण केल्यामुळे, त्यास व्यापकता अधिक येते. प्रार्थना किंवा ब्राह्मो समाजाप्रमाणे तो फक्त 'भक्तिवादी' नाही. त्याचे स्वरूप अधिकाधिकपणे सामाजिक आहे. समाजक्रांती तो करू शकतो. राजकारण, अर्थकारण व शिक्षण इत्यादी सर्व जीवनाची विविध क्षेत्रे व त्यातील विचार यांचा सत्यशोधक समाजात समावेश होतो. सत्यशोधक समाजाचे धर्मास 'सार्वजनिक सत्यधर्म' हे नाव आहे. हा सत्यधर्म फक्त धार्मिक विचारांपुरताच नाही. राजकारण, आर्थिक समानता व नवे नवे विचार यांचा समावेश सत्यधर्मांत होतो. सत्यशोधक समाजाला, ठराविक गुरू अवतार किंवा एकच पैगंबर, एकच ख्रिस्तदेव किंवा 'मध्यस्थ' नाही. शब्दप्रामाण्य नाही. एकच ठराविक धर्मग्रंथ किंवा ठराविक बायबल किंवा एकच कुराण नाही. एकच कोणतेही पुस्तक त्याला सर्वप्रमाण नाही. त्याच्या शोधाला बाध व अनिष्ट बंधन नाही. येथे विचारस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य आहे. संप्रदाय नाही. ठराविक गुरुमंत्र नाही किंवा वारकरी पंथासारखी माळ, बुक्का इत्यादी बाह्य चिन्हे नाहीत, सत्यशोधक समाज म्हणजे जात नाही. सत्यशोधक समाज म्हणजे वेगळा धर्म नाही. सर्व धर्म त्याचे आहेत. सत्य सर्वत्र असते. सत्य सर्वव्यापी आहे. धर्मभोळेपण जोडणे व सोडावयास लावणे, हे त्याचे कार्य आहे. धर्मभोळेपणाच्या विरुद्ध तो आहे. सत्य, समता व स्वातंत्र्य ही त्याची त्रयी आहे. 'बुद्धिवाद' हा त्याचा प्राण आहे. चिकित्सा, मीमांसा, टीका आणि बौद्धिक विवरण करणे हे त्याचे कार्य आहे. तो विज्ञानाच्या किंवा विविध आधुनिक शास्त्रांच्या विरुद्ध नाही.

परमेश्वर सत्य आहे. त्याचा शोध करणारा तो सत्यशोधक असा मूलार्थ आहे, हे खरे. सत्याकडे जाण्यास मध्यस्थ-दलाल-नको हे त्याचे प्रधान तत्त्व आहे. माणसाची योग्यता जन्मजातीवरून नाही, ती गुणकर्मावर आहे. गुणांमुळे माणसाची योग्यता वाढते. तो थोरवीस चढतो. समाजात गुणोत्कर्ष झाला पाहिजे. गुणांना प्राधान्य मिळाल्यास, गुणांचे चीज झाल्यास माणूस प्रगत होत जातो. मानवी उत्कर्ष जवळ येतो. गुण व गुणांची माणसे सर्वत्र असतात. अमूक एकाच जातीची माणसे सर्वथा वाईट किंवा सर्वथा चांगली व निर्दोष असे व्यवहारात म्हणता यावयाचे नाही. म्हणून सत्यशोधक समाज जातिवर्णभेदाविरुद्ध आहे. उद्यमस्वातंत्र्य त्यास मान्य आहे व कोणताही धंदा व व्यवसाय आणि जात अपवित्र नाही. श्रेष्ठ-कनिष्ठ उच्च-नीच भाव नाही.

परमेश्वर निराकार व सत्यस्वरूप आहे, म्हणून त्यास ठराविक मूर्ती, अवयव किंवा आकार नाही. परमेश्वर अमूर्त व अदृश्य असल्याने कित्येक सोईसाठी त्याची मूर्ती करून, त्या मूर्तीच्या ठायी परमेश्वरी गुण व शक्ती कल्पून, त्या मूर्तीची परब्रह्म म्हणून पूजा व भक्ती करतात. 'विठ्ठल हे परब्रह्म आहे' असे तुकोबाही म्हणत. तथापि क्षुद्र दैवते वेताळे-फेताळे, शेंदरी दैवते, मांसभक्षक देव व जत्राचार यांचा तुकोबांनी निषेध केला आहे व

अनुक्रमणिका

एकोपासनेची वाढ केली आहे. मूर्तीमुळे पुरोहित संस्था निर्मावी लागते व पुरोहित स्वतःचे उदरभरणार्थ नाना उपाय अवलंबून भक्तीचे विडंबन करतात. मूर्तिपूजेमुळे दलाली वाढते व धर्म, देव आणि भक्ती यांचा धंदा होतो.

**मध्यस्थ नको**

ही दलाली व हा बाजार नको म्हणून सत्यशोधक समाज मूर्तिपूजा व तत्सम मंदिरसंस्था मानीत नाही. मूर्तिपूजाप्रवृत्ती कमी करणे, नष्ट करणे हे समाजाचे कार्य आहे. मध्यस्थ नको म्हणजे स्वावलंबन पाहिजे, सहकार्य पाहिजे. 'मध्यस्थ नको' हा संदेश फक्त धर्मकार्यापुरता किंवा धार्मिक क्षेत्रापुरता नाही. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण इत्यादी क्षेत्रांतही दलाली नको. स्वावलंबन पाहिजे. भोळा-भाव नको, असा समाजाचा पवित्रा आहे. भांडवल व नफा यांच्या दरम्यानही दलाल नको. सहकार्याने संपत्तीचा विनियोग, वापर व लाभ सर्वांना झाला पाहिजे.

**सर्व परवशं दुःखं !**

सत्यशोधक समाज एकेश्वरी आहे. भागवत धर्म हाच त्याचा प्राण आहे. परंतु मध्यस्थ ईश्वर किंवा गुरू यांच्यावर सर्वस्वी अवलंबून राहून मानवाची खरी उन्नती होत नाही. मनुष्य स्वतःच्या बळावर नराचा नारायण होऊ शकतो (उद्धरे दात्मनात्यानम्). स्वतःचा उद्धार आत्मपरीक्षणाने मानवाने केला पाहिजे. हा सत्यशोधक समाजाचा संदेश आहे. कल्पनावादी विचारसरणी, परलोक वाद, दैववाद, नशीबवाद व हताशवृत्ती समाजास अमान्य आहे. कर्तव्यार्थ झगडा देण्याची हौस तो वाढवितो. समाज आशावादी आहे. परावलंबन व निष्क्रिय निवृत्ती सत्यशोधक समाजास अमान्य आहे. तो ज्ञानाचा-ब्रह्मज्ञानाचा भोक्ता आहे. पण बुवाशाही त्यास अमान्य आहे. पुरोहितशाही व बुवाबाजी हा रोग आहे. हा रोग खऱ्या धर्मालाही ग्रासतो.

**'निरीश्वरवाद'**

सत्यशोधक समाज मूर्तिपूजा व भोळाभाव टाकून शुद्ध एकेश्वरवाद अवलंबितो हे मागे निवेदिले आहेच. तथापि प्रामाणिक निरीश्वरवाद्यांना सत्यशोधक समाजात स्थान आहेच. बुद्ध हा आद्य सत्यशोधक व बहुजनसमाजवादी नेता होऊन गेला. बुद्धधर्म हा आद्य सत्यशोधक धर्मच आहे. मनुष्यास बुद्धी ही अमोल देणगी आहे व या देणगीचा वापर करणे मनुष्याचे कर्तव्य आहे. बुद्धी निद्रिस्त ठेवणे हा माणूसधर्म नाही. प्रत्येक माणूस हा खरोखर बुद्धिवादी बुद्ध व्हावयास हवा.

चार्वाक, बुद्ध, महावीर, एकनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादी तत्सम महान संत त्या त्या काळातील सत्यशोधक झाले. राममोहन, केशवचंद सेन, देवेंद्र, रवींद्र, जोतिबा फुले, आगरकर, रानडे-भांडारकर, विठ्ठल रामजी शिंदे, दयानंद इत्यादी आधुनिक काळातील सत्यशोधक झाले. सत्यशोधक एकाच देशात होतात असे नाही. सर्वस्थळी व काळी सत्यशोधक होतात. देशकाल व वर्तमान यांची मर्यादा त्यांना नाही. मोठ्या पुरुषांना सत्यशोधक समाज अवतार, विभूती किंवा देव मानीत नाही. त्या त्या काळातील असामान्य थोर पुरुष म्हणून या सर्व सत्यशोधकांना व संतांना सत्यशोधक समाज समान मान देतो. पुढेही सत्यशोधन व्हावयाचे आहे. ज्ञान

अनुक्रमणिका

अपार आहे. सत्य अनंत आहे. सत्यामध्ये विज्ञानही येते. भावी काळात सत्यशोधक होतीलच व सत्यात भरही पडेल.

### सत्यशोधक विद्यार्थी संघ

या नावाने ठिकठिकाणी काही अल्प कार्य चाललेले आढळते. या कामास भक्कम घटना व निश्चित धोरण प्राप्त झाले पाहिजे. जोतिबा फुले मरेपर्यंत 'विद्यार्थी' होते. वाचन, संवाद, अभ्यास, चर्चा, शोधन त्यांचे चालूच होते, त्यांच्यापरीने त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. तेवढेच वाङ्मय म्हणजे सत्यशोधक समाजाचे अखिल विचार नाहीत. संस्थापकांच्या कार्यात व विचारात पुढील पिढीने भर घातली पाहिजे. अभ्यास मंडळ, परिषदा यांतून अभ्यास व चिकित्सा वाढेल पण बौद्धिक अभ्यासाला आर्. एस्. एस्. (R. S. S.) प्रमाणे शारीरिक कवाईत व शिस्तीचे प्राथमिक नागरी सैनिकी शिक्षण यांची जोड मिळाल्यास सत्यशोधक विद्यार्थी संघ वाढत राहील. कार्यात दोष असले, कोणत्याही पक्षात मतमतांचा व्यक्तिवैचित्र्यामुळे गलबला असला, तात्त्विक व आर्थिक स्वार्थी मतभेद असले तरी संस्थेचा हेतू व चळवळीचा उद्देश पाहून तिचे मूल्यमापन करावे लागते. जो सत्य शोधेल तोच फक्त सत्यशोधक. येथे जाती-धर्मांचे काम नाही.

### बहुजनसमाजाची वर्तमानपत्रे

सत्यशोधक समाजाचा पुरस्कार करणारी अनेक नियतकालिके व वर्तमानपत्रे आजवर निघाली. परंतु 'दीनबंधू' (१८७७) हे पहिले वृत्तपत्रे होते. या पत्राचे नावावरून गरिबांचा कैवार घ्यावयाचा होता असा स्पष्ट उद्देश कळून येतो. 'दीनबंधू' हे परमेश्वराचेही नाव आहे किंवा परमेश्वराचा तो गुण आहे.

सत्यशोधक समाजाचा प्रसार 'दीनबंधू' प्रमाणे पुढे 'विजयी मराठा', 'दीनमित्र', 'जागृति', 'राष्ट्रवीर' इत्यादी अनेक पत्रांनी केला. 'तमाशा' हा प्रचारप्रकार श्री. शाहूमहाराजांचे काळात व नंतरचा जास्ती गाजला. पण हा प्रकार प्रगत झाला नाही. कालांतराने हे प्रभावी साधन पूर्ण मागे पडले. सत्यशोधक समाजाचा प्रसार वर्तमानपत्रांनी अधिकाधिक केला. काही पुस्तकेही याला साहाय्यभूत झाली. म. जोतिरावकृत 'गुलामगिरी' या पुस्तकाच्या पाच सहा आवृत्त्या निघाल्या. 'कुलकर्णी लीलामृत', 'शेटजी प्रताप' इत्यादी पुस्तकांची नावे नमूद करण्यासारखी आहेत. वाङ्मयाची जोड समाजास मिळाली पाहिजे. विद्वत्तेची जोड भेटल्याशिवाय हे व्हावयाचे नाही आणि चांगल्या वाङ्मयाशिवाय सत्यशोधक समाज प्रगत व्हावयाचा नाही. श्रेष्ठ विचारांची संपत्ती वाढली पाहिजे. निश्चित दृष्टी कायम झाली पाहिजे व ती रुळली पाहिजे.

सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर पक्ष यांचा संयोग जुळला होता तरी सत्यशोधक समाज म्हणजे केवळ ब्राह्मणेतर पक्ष किंवा चळवळ नव्हे. पुढे ब्राह्मणेतर पक्ष त्यांचे काम संपल्यावर म्हणा किंवा स्वतंत्र पक्ष म्हणून चालविण्याजोगे पात्र व्यक्तित्त्व व नेतेपणा उरला नाही म्हणा, तो पक्ष काँग्रसमध्ये सामील झाला! तरी 'राष्ट्रवीर', 'जागृति', 'दीनमित्र' इत्यादी पत्र चालुच राहिली व आज चालूच आहेत.(त्यातील 'जागृति', 'सारथी', 'शिवनेर' इत्यादी नवी पत्रे निघाली आहेत.) सांगण्याचा उद्देश एवढाच की, बहुजन समाजाची पत्रे आपले ध्येय तेवत ठेवीत आहेत व आपापल्या शक्तीनुसार ती चालली आहेत. बहुजनवादी म्हणूनच ती

अनुक्रमणिका

ओळखली जातात. चळवळ जिवंत आहे, याची साक्ष ही पत्रे आहेत. म्हणून यांचे संपादक कर्मवीर आहेत. कर्म त्यांनी टाकले नाही. कर्तव्याच्या ज्योतीत ही पत्रे भर घालीत आहेत. ब्राह्मणेतर पक्षानंतर 'बहुजन समाजवादी', 'शेतकरी कामकरी पक्ष' अशा आवृत्त्या निघाल्या. तथापि बेदिली आणि बिनहिशेबीपणा, शिस्तीचा अभाव, पक्षप्रेमाचा अभाव इत्यादी कारणाने वरील पक्ष संघटित झाले नाहीत. शे. का. प.मधील बरेच लोक काँग्रेसमध्ये गेले तरी बहुजनसमाजाची पत्रे चालूच आहेत. तत्त्वे बरखास्त होत नाहीत, सत्यशोधक समाज शाश्वत आहे. तो उत्तरोत्तर स्पष्टतम होत जाईल. अनुयायांनी तो सोडला म्हणून तत्त्वे, समाजधर्म आणि दृष्टिकोण नष्ट होत नाही. म्हणून यापुढेही सत्यशोधक समाजाच्या नव्या तात्त्विक भूमिकेवरून पत्रे व संस्था चालविल्या जाव्यात! राजकारण अस्थिर असते म्हणून पक्ष निघतात! मोडतात! पुन्हा निघतात. पण सत्यशोधक समाज प्रत्येक पिढीचा आहे. प्रत्येक काळाचा आहे. सत्य मोडणार नाही. पात्र व सुज्ञ अनुयायी मिळताच त्यास व्यवहारात योग्य आकार येतोच. यापुढे चांगल्या विधायक मार्गाने सत्यशोधक चळवळ वाढविण्याचा प्रयत्न जरूर आहे. सत्यशोधक समाज कोणत्याच पक्षाला नसतो, म्हणजे तो पक्षपाती नसतो. या दृष्टीने व नव्या आणि प्रगत भूमिकेवरून बहुजनसमाजातील नियतकालिके चालविली जातील तर पूर्वीच्या अभिनंदनीय इतिहासात अधिक चांगली भर पडेल. नव्या सत्यशोधक लेखकांनीही नवी दृष्टी आत्मसात केली पाहिजे. प्रांतीयतेचे आणि जातीयतेचे दिवस आज गेले. विचारांना जातीय पाया किंवा मूल्य देता उपयोगी नाही. तरच जातीयता जाईल व खरे सत्यशोधक विचार व आधार निर्माण होतील.

**सारांश**

या लेखात सत्यशोधक समाजाचे ध्येय, धोरण व कार्य यांचा प्राथमिक परामर्ष घेतला आहे. हल्ली सांप्रदायिकपणे 'ब्राह्म समाज', 'प्रार्थना समाज' व 'आर्य समाज'ही वाढत नाहीत. वाढले नाहीत. त्यांच्या जास्त सुपात्र अनुयायांना देखील त्यांच्या भवितव्याची काळजी वाटते. मग सत्यशोधक समाजाची वाट काय? परंतु सत्यशोधक समाज ही संस्थाही झाली नाही. फंड, शाखा, उपशाखा, कचेरी इत्यादी रेखीव, जरूर व आवश्यक ती प्रचार साधने त्याच्याजवळ नाहीत. ही एक चळवळ आहे. जनतेची चळवळ म्हणून ही ओळखली गेली व हा अंकुर अद्याप कायम आहे. सत्यशोधक म्हणून वेगळा धर्म, जात किंवा स्वतंत्र समाज येथे निर्माण झाला नाही. हे एकापरी बरे झाले. कारण आणखी एक जात म्हणून पूर्वीच्या जातिभेदात भरच झाली असती. कलकत्त्याकडे ब्राह्मो समाजाचे असेच झाले. प्रार्थना समाज महाराष्ट्रात फारसा वाढला नाही.

सत्यशोधक चळवळ आहे, सत्यशोधक ही दृष्टी आहे, सत्यशोधक ही विचारपद्धती आहे; एक तत्त्वज्ञान आहे. आर्य समाजाप्रमाणे तो प्रमाणवादी व ग्रंथबद्ध नाही. त्याला अमर्याद दृष्टी आहे. आकुंचितता नाही. तो आरसा आहे. सत्यशोधक धर्म हे एक दर्शन आहे. मार्क्स् इत्यादी सत्यशोधक व त्यांचे संशोधन त्यास वावडे नाही. मात्र तो कोणाचा अंधानुयायी नाही. मार्क्स्ला तो पैगंबर मानणार मार्क्स्मधला सत्यांश, ग्राह्यांश व सारासार विचारच त्याचा आहे. तो व्यक्तिपूजक नाही. बौद्धिक गुलामगिरी त्यास संपूर्ण अमान्य आहे. त्यास संस्थापकांनी व्यापक नामाभिधान दिले आहे. त्याचे नावच त्याचे कार्य, धोरण व ध्येय प्रकाशित करते. पुरेसा बोध देते. म्हणून सत्यशोधक समाजास भवितव्य आहे. विद्यार्थी, संशोधक, चिकित्सक, मीमांसक व बुद्धिवादी अनुयायी त्यास लाभोत. कारण 'बुद्धिवाद' हा सत्यशोधक समाजाचा कणा आहे. पिळवणूक व लुबाडणूक या धर्मव्यवहार आणि सर्वप्रकारच्या प्रपंचातून नष्ट झाल्या पाहिजेत. मानवास, त्याचे स्वातंत्र्य अनुभविता आले पाहिजे. त्यास

अन्नवस्त्राच्छादनादी जीवनसाधने मिळाली पाहिजेत. मनुष्य म्हणून त्याचे मानव्य विकसित झाले पाहिजे. खरी लोकशाही त्यास अनुभविण्यास मिळाली पाहिजे. असे लोकशाहीस पूरक तत्त्वज्ञान व दृष्टी सत्यशोध धर्म शिकवितो. आध्यात्मिक व भौतिक आणि ऐहिक सुखाची वृद्धी होण्यास सत्यशोधक समाजाचा विचारप्रवाह साहाय्यक आहे. 'अवघा संसार सुखाचा' करण्यास तो कारणीभूत होणार आहे. स्वावलंबन, स्वातंत्र्य, समता व सत्य यांची वाढ सत्यशोधक समाजतत्त्वे करू शकतात. ही तत्त्वे म्हणजे 'प्रकाश' आहे; ज्ञान आहे. नव्या पिढीने याचा अभ्यास जरूर करावा. म्हणून त्याचे व्यापक व सांप्रदायातीत स्वरूप येथे मांडले आहे. म. फुले हे मार्गदर्शक आहेतच. पण त्यांच्यासारखे अनेक फुले यापुढे निर्माण होवोत. त्यांची जनसमाजास जरूरी आहे आणि अशा सुवासिक फुलांचा एक पुष्पहार तयार होवो. पुष्पमालिका बनो. एकाचे हे काम नव्हे. अनेक त्यागी कर्मवीरांच्या आहुत्या सत्ययज्ञासाठी लागतात. म्हणजे सत्यशोधक समाजाचा तारा अधिक प्रकाशित व मार्गदर्शक होईल. विरोधकांना आणि निंदकांनाही तो प्रकाश देईल. कारण तो स्वयंप्रकाशित आहे. परिस्थितीचे व वादाचे ढग बाजूस जात चालले आहेत. नव्या काळात त्याचे नवदर्शन घेतले पाहिजे.

**आक्षेप खंडण**

आता राजकीय स्वातंत्र्य आले व पूर्वीचा सर्वच मामला बदलला आहे. नव्या काळात सत्यशोधक समाजावरील आक्षेप व गैरसमज दूर होत आहेत, त्याप्रमाणे म. जोतिबा फुले यांच्या चरित्रावरील आक्षेपही नाहीसे होत आहेत. शिवाजी, एकनाथ, तुकाराम यांच्या चरित्राप्रमाणे फुले चरित्रही मराठी जनतेचे, आबालवृद्धापर्यंत आवडते होत आहे व फुलेचरित्रास एकप्रकारचा शास्त्रीय व रेखीव आकार येत आहे.

म. फुले ख्रिस्ती होते असा एक आक्षेप. मागे टिळक-चिपळूणकर पक्षाने व पंथीयांनी आणला होता व तो फोल ठरला! दुसरा आक्षेप, 'फुले जोतिराव हे ब्राह्मणद्वेष्टे होते' असा केला जात असे. पण हा आक्षेप हल्ली पुढारलेले व पुरोगामी विद्वान व पंडितच खोडून काढीत आहेत. श्री. प्रल्हादराव अत्रे यांनी म. फुले बोलपट तयार करण्यात सुयश मिळविले आहे. श्री. अत्रेमहाशय अभिनंदनास पात्र आहेत. लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्या 'शतपत्रा'बरोबर तुलना केल्यास म. जोतिरावांचा ब्राह्मणविरोध त्या मानाने फारच कमी भरतो. लोकहितवादीच जास्त तिखट, बोचक, फटकळ व स्पष्ट आहेत. म. फुल्यांच्या मानाने तेच जास्ती विध्वंसक झाले. त्यांच्या ब्राह्मणनिंदेच्या ओळी अधिक आहेत. तिसरा आरोप, म. फुले यांना राजकीय स्वातंत्र्याची जाणीव नव्हती. ते राज्यकर्त्यांची बाजू घेणारे होते. हा आरोप देखील बुद्धिवादास न पटणारा ठरतो. म. फुले ह्यांनी समाज व धर्मसुधारणेला मूलभूत म्हणून जास्ती मूल्य दिलेले आहे. टिळक, आगरकर, वासुदेव बळवंत फडके, गोवंडे इत्यादी देशभक्तांना त्यांनी साह्य महत्त्वाचे वेळी दिले आहे.

म. फुले, त्यांच्या अनुयायांनी, धार्मिक व सामाजिक प्रश्नांची तीव्रता कमी होत गेल्यावर म. गांधी यांच्या हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यात फार जोरदार भाग घेतला होता. कर्मवीर शिंदे, केशवराव जेधे, नाना पाटील, जवळकर इत्यादी मोठमोठ्या सत्यशोधक पुढाऱ्यांपासून ते लहानसहान कार्यकर्त्यांपर्यंत हजारोंनी या लढ्यात प्रत्यक्ष भाग घेतला होता व त्यांनी अधिक अंशांनी ब्राह्मणेतर पक्षच काँग्रेसमध्ये विलीन केला. याच्या उलट चिपळूणकरांचे अनुयायी लोकशाही स्वराज्य पक्ष, हिंदू महासभा, जनसंघ, आर. एस. एस. इत्यादी नावे-उपनावे धारण करून फार मोठ्या प्रमाणात म. गांधी व काँग्रेस यांना विरोध करते झाले. म. गांधी याच

अनुक्रमणिका

विरोधाच्या वावटळीत नाहीसे झाले. भावी इतिहासकार याबद्दल जास्ती चिकित्सा करण्यास समर्थ होतील व ही घटना भावी हिंदी इतिहासावर व भारतीय जीवनावर परिणाम करीत राहील! पुन्हा बहुजन समाजवादी काँग्रेसमध्ये होते ते आता बाहेर आले! प्रांतोप्रांतीचे विरोधी पक्ष वितळत चालले. बहुजन समाजवाद्यांचा शे. का. पक्ष देखील संख्याबाहुल्याने काँग्रेसमध्ये शिरला आहे व त्याचे मताधिक्य मराठी प्रांतापुरते तरी आता काँग्रेसमध्ये जास्तीच आहे. कारण पूर्वी ना. हिरे आदीकरून अनेक बहुजन समाजातील पुढारी मंडळी काँग्रेसमध्ये होतीच. सांगण्याचे तात्पर्य हे की, म. फुले यांच्या अनुयायांनी काँग्रेस व पं. नेहरू यांनाच पाठिंबा दिलेला आहे. यावरून राजकीय स्वातंत्र्याविरुद्ध सत्यशोधक चळवळ आहे, असे प्रत्यक्ष व्यवहाराची तपासणी करताना आढळत नाही. सत्य, समता व स्वातंत्र्य यासाठीच सत्यशोधक समाज आहे. मराठी साहित्याच्या किल्ल्या व सरस्वतीचे दालन यद्यपि पुढारलेल्यांच्याच कबज्यात आहे व या कबज्याच्या जोरावर आणि बुद्धिचापल्याच्या साहाय्याने वरील जो आक्षेप घेतला जातो तो निरर्थक व म. फुले कार्यास गौण स्वरूप देण्याच्या प्रतिगामी इराद्याचा द्योतक आहे, असे काळ ठरवील. कारण काळ निःपक्षपाती असतो. सामाजिक सुधारणा, सामाजिक नीतिमत्तेची वाढ, धार्मिक सुधारणांची गरज आज आवश्यक आहे असे सर्व जाणते म्हणतात आणि सामाजिक परिषदेची पुन्हा झालेली स्थापना, हेच दाखविते. सुधारक आगरकर व फुले यांचा सिद्धांत खरा होण्याच्या मार्गास लागला आहे. टिळक-चिपळूणकर पंथीय आजही काँग्रेस विरोधक आहेत. त्यांचे हिंदुत्व प्रेम व समता-धर्मावर अधिष्ठित नाही. म्हणून जनता त्यांचे मागे नाही.

म. फुले व पर्यायाने सत्यशोधक समाज यांच्यावर केलेले वरील आक्षेप याप्रमाणे निरर्थक आहेत. सर्व प्रकारचे स्वातंत्र्य, समता व प्रगती सत्यशोधक समाजास हवी असते.

**स्वकर्तव्य**

बहुजन समाजाने सत्यशोधक समाजाची उपेक्षा व आबाळ करता कामा नये. त्याची शक्य तो वाढ केली पाहिजे कारण सत्य हे कामधेनुप्रमाणे असते. राजकीय व आर्थिक प्रश्नांना आज फार महत्त्व आहे, तरी बहुजनता धार्मिक भोळ्याभावातून व अंधश्रद्धा व अंधपूजा यापासून मुळीच दूर नाही. राजकीय व आर्थिक क्षेत्रातही भोळाभाव म्हणजे वेळोवेळी तयार होणारी बुवाबाजी, गटबाजी व पक्षबाजी आणि आर्थिक क्षेत्रातील विषमता सत्यशोधक समाजास अमान्य आहे.

बहुजनता खरोखरच प्रगत व प्रबुद्ध व्हावयाची झाल्यास, हिने ब्राह्मणीधर्म व पुराणधर्म टाकला पाहिजे. सनातनी व पुराणमतवादी सर्वत्र व सर्वच समाजात असतात. त्यामुळे वरील कार्य घडून येत नाही. समाजसुधारकांचे प्रयत्न यशस्वी ठरत नाहीत व पुनःपुन्हा पुराणधर्म व रूढीधर्म डोके वर काढून सर्वांच्याच मानगुटीवर बसलेला आढळतो. डॉ. आंबेडकर यांनी बुद्धधर्मप्रवेशाचा जो पवित्रा धारण केलेला आहे, याचे मूळ कारणही त्यांना ब्राह्मणीधर्म अमान्य आहे, हेच होय.

ब्राह्मणी धर्माच्या उच्चाटनाचे सामर्थ्य सत्यशोधक तत्त्वात आहे. फरक एवढाच आहे की, बुद्धासारखे त्यागी प्रवर्तक व प्रचारक आणि डॉ. आंबेडकर यांच्यासारखे विद्वान पंडित, सत्यशोधक समाजास पाहिजेत तितके लाभले नाहीत.

अनुक्रमणिका

**परिवर्तन**

म. जोतिबा फुले ह्यांनी सत्यशोधक समाजास स्वतःच कसलाही बांध किंवा मर्यादा घातली नाही. 'गुणलेशाचा स्वीकार करा' असे 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात म. फुले म्हणतात. ठराविक धर्ममते व पंथ ते लोकांवर लादू इच्छित नाहीत. म्हणून सत्यसंशोधन व सत्यशोधक समाज ही दोन नाहीत. सत्यसंशोधन हेच समाजाचे एकमेव ध्येय आहे व ते ध्येय गाठणारे शोधक या पुढेही होतील. सत्यास संकुचितता आणण्याचे काहीच कारण नाही. समता देखील सर्व क्षेत्रांतील पाहिजे. कोणत्याच जीवनाच्या क्षेत्रात विषमता व गुलामगिरी नको. स्वातत्र्य देखील सर्व क्षेत्रात पाहिजे. सत्यापुढे कोणाचीच कदर म. फुले यांनी बाळगिली नव्हती.

सार्वजनिक व सार्वभौम सत्य त्यांनी प्रतिपादिले. म. फुले यांनी जी ज्योत प्रज्ज्वलित केली आहे, त्यात सर्वांनी पूरण-भरण घातले पाहिजे. अधिकाधिकपणे ज्योत प्रकाशित केली पाहिजे. ज्ञानप्रकाश वाढविला पाहिजे. यासाठी जरूर तो अभ्यास, उदारता, सहिष्णुता, तौलनिकता, समन्वय दृष्टी यांची साधना केली पाहिजे. स्तुती किंवा निंदा या दोहोंचाही उपयोग सत्यशोधनाच्या किंवा आत्मोद्धारांच्या मार्गात होत नसतो. आत्मटीका व आत्मपरीक्षण याचाच उपयोग जास्ती होतो. म्हणून ऐतिहासिक स्वदोष टाकले पाहिजेत. जरूर तो स्वभाव व त्याप्रमाणे भाषेत बदल केला पाहिजे. म्हणजे सर्वांगीण कायापालट होऊ शकतो. कालमानानुसार जीवनात पालट, परिवर्तन व सुधारणा करून नवे निर्णय घ्यावे लागतात. नव्या भाषेत तत्त्वे मांडावी लागतात. नवा पेहराव घ्यावा लागतो व या प्रकारचा वाव सत्यशोधक समाजाच्या ठेवणीत, घटनेत असू शकतो. राजकारण देखील त्याच्या क्षेत्रात येते. असे सर्वांगीण, सर्वसंग्राहक, हंसक्षीरन्याय व सर्वव्यापक स्वरूप सत्यशोधक समाजाला आहे. विचाराने त्याचे नवदर्शन घेणारे पाहिजेत. विकाराने त्याचे दर्शन होणार नाही. दृष्टिदोषाचा येथे उपयोग नाही. साफ, स्पष्ट व निःपक्षपात दृष्टिकोण येथे पाहिजे. सत्यशोधक (खरे) समाजात थोडेच राहणार! लोकअमान्यता पत्करूनही सत्य सांगणारे व ऐकणारेही थोडेच असतात. ब्रह्मज्ञान ज्याप्रमाणे 'लेकुराच्या गोष्टी' नव्हेत, त्याप्रमाणे सत्याचा शोध व संशोधन याही बाबी लेकुरांच्या नाहीत. येथे पोटी ज्ञानलालसा पाहिजे. कोणत्याच स्वार्थाने सत्यास मर्यादा येता उपयोगी नाही किंवा स्वतःला अगर एखाद्या जमातीला तिच्या स्वार्थासाठी कायदा, सत्य किंवा न्याय आणि नीती यांचा वापर करता येऊ नये. पुरोहितशाही व मध्यस्थ-दलाल व शंकराचार्य स्वजातीचा असला तरी घातकच आहे. स्वावलंबन व आत्मप्रगती तो बुडवितो. तो धर्माचा धंदा करतो, काळाबाजार करतो. म्हणून सर्व मानवांस समान हक्कांचे व समतेचे 'सार्वजनिक सत्य' म. फुले यांनी सांगितले आहे. येथे लटपट किंवा 'घटपट' नाही. निर्भीड व चोख मार्ग म. फुले यांनी सांगितला आहे. स्वार्थपरायणता व धर्मांधता, रूढीची गुलामगिरी, पूर्वग्रह आणि दृष्टिदोष यामुळे कित्येकांना तो परवडला नाही किंवा परवडत नाही. त्यास इलाज नाही. पण सत्याची साधना करून कोणीच वाया जाणार नाही. सत्य वर्तनाने कोणीही तरेलच. सत्यशोधक समाज ही भवनदी तरून नेणारी नाव आहे. संसार व प्रपंच सुखाचा करण्याचा राजमार्ग आहे. कारण सत्य हेच ब्रह्म असते आणि ब्रह्म म्हणजे जे प्रगट होते ते सत्य विकसित झाले पाहिजे. प्रगट झाले पाहिजे. प्रकाशित झाले पाहिजे. असत्य व अज्ञान आणि अविद्या यांचा विनाश घडला पाहिजे. ज्ञानमार्ग वाढला पाहिजे.

अनुक्रमणिका

आता थोडक्यातच निवेदावयाचे झाल्यास असे ध्वनित करता येते की, सत्यशोधक समाज अखिल मानवासाठी आहे. एखाद्या सामाजिक वादाचा व त्याचा जो इतिहासात संबंध आला तो कारणापुरता होता. ती उपाधी तत्कालीन होती. सर्व काळाचे त्याचे स्वरूप स्वच्छ व व्यापक आहे. त्याचे दर्शन सर्वांना आवश्यक आहे.

**अनुक्रमणिका**

७.

# शेतकऱ्यांची आधुनिक चळवळ

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय जीवनावर ज्यांचा परिणाम झाला अशा अनेकविध चळवळी महाराष्ट्रात गेल्या शतकात झाल्या. त्यापैकी सत्यशोधक चळवळ ही प्रमुख ठरते. सामाजिक सुधारकांत दोन वर्ग पडू शकतात : एक, ज्ञेयवादी सुधारकांचा व दुसरा, अज्ञेयवाद्यांचा. आगरकर अज्ञेयवादी सुधारकांचे एक प्रमुख नेते झाले. रानडे, भांडारकर वगैरे प्रार्थना समाजी ज्ञेयवादी सुधारक झाले. दोघांनाही धार्मिक सुधारणा हव्या होत्या. म्हणजे आगरकरांना देखील धार्मिक, वाईट व घातक चालीरीती नाहीशा झाल्या पाहिजेत असे तीव्रतेने वाटत होते. या सर्वांच्या अगोदर सन १८४० साली प्रथम मुंबई येथे 'परमहंस सभा' निघाली. तिचा उद्देश जातिभेद मोडणे व शिक्षणप्रसार करणे हा होता. पण प्रत्यक्ष तिचे यश दिसले नाही. तरी प्रत्यक्षाप्रत्यक्ष परमहंस सभेनंतरच सर्व सामाजिक, धार्मिक सुधारणा यांचा विकास व विस्तार होत गेला; पण खेड्यापाड्यापर्यंत जनतेच्या तळातील थरापर्यंत सत्यशोधक चळवळच फक्त जाऊन भिडली. वरच्या सर्व चळवळी पुरोगामी व उदार होत्या. तरी त्या प्रस्तावनेप्रमाणे प्रारंभिक ठरल्या. सारा महाराष्ट्र ढवळून काढणारी, हलवून सोडणारी, विविध व व्यापक स्वरूपाची जागृती आणि प्रगती करणारी अशी एकच मोठी सामाजिक चळवळ झाली व ती म्हणजे महात्मा फुल्यांनी जन्म दिलेल्या सत्यशोधक समाजाची चळवळ होय. हा उठाव होता, हे आंदोलन होते, हे लोकांना पाहिजे होते म्हणूनच झाले. जरूरीतून सार्वजनिक चळवळी निर्माण होतात. ही प्रतिक्रिया होती. प्रतिक्रियेत विरोध व विध्वंसक यांचा साहजिकच समावेश होऊ शकतो; होतो. उदाहरणार्थ, गौतमबुद्ध मोठ्यात मोठा पहिला सत्यशोधक झाला व त्याने सकाम व हिंसाप्रधान यज्ञयागांचा नायनाट करणारी विरोधी चळवळ निर्माण केली. निदान याबाबतीत तरी तो मोठ्या प्रमाणात यशवंत ठरला. मध्यंतरी पुष्कळ शतके गेल्यावर शंकराचार्यांच्या नंतर पुन्हा पुरोहितशाहीचे महत्त्व उत्तरोत्तर वाढू लागले. भागवत धर्मामुळे हिंसक यज्ञयाग रोखले गेले, तरी देवधर्म-मंदिरसंस्था वगैरेंचा पुरस्कार करणारा भागवतधर्म असल्यामुळे त्याने एकपरी व्यवहारात प्रत्यक्ष पुरोहितशाही जतन केली. तरी परमार्थात व अध्यात्मात वर्णधर्मभेद बोथट केले. यादवकाळात व शिवाजी काळात, पुरोहितशाही काही अपवादप्रसंगी पीडादायक असे. कारण तिच्या हातात राज्य नव्हते; पण विशेषतः उत्तर पेशवाईत पुरोहितशाही समाजाचे राज्य झाले. दिवाण राजाचा व राज्याचाही मालक बनला. रयतेच्या पैशातून दक्षिणा वाटण्याची प्रतिवार्षिक चाल निघाली. कर्मकांडाला महत्त्व आले, देवळे वाढली, त्यांची इनामे वाढली, पुरोहितशाही जोपासणारी सनातनी संस्थानेही महाराष्ट्रात झाली. उत्तरोत्तर सामान्य प्रजेचा कारभारावरील ताबा सुटला व शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय दास्य निर्माण झाले. ह्या सर्वांना धर्मग्रंथाचा व शास्त्रांचा आधार धरण्यात आला. प्रतिक्रिया कोण करणार? वारकरी व भागवत धर्मात हे सामर्थ्य उरलेले नव्हते; त्यांच्यात सामर्थ्य आजही साहजिक नाही आणि जनता त्यावेळी तरी निदान निरक्षर व दारिद्र्याने पीडली होती. निश्चल होती. उत्तर पेशवाईत विविध सरदारांचा पायपोस कोणाच्याही एकट्याच्या ताब्यात नव्हता. जेत्यांचे विविध सामर्थ्य काळाप्रमाणे प्रभावी झाले. जेत्यांबरोबर येथील धर्माला आव्हान देणारे मिशनरी देखील आले!

**पाश्चात्त्य धर्म व राज्य यांचा संबंध**

अनुक्रमणिका

उत्तरेकडून राज्ये जिंकीत जिंकीत इंग्रज दक्षिणेकडे आणि शेवटी महाराष्ट्राकडे आले व 'फोडा व झोडा' या नीतीच्या आधारावर प्रथम पेशवाई व नंतर छत्रपतींचे राज्य त्यांनी घेतले आणि प्रजा राजकीय दृष्टीने गुलाम झाली. सातारचे राज्य बुडण्यात स्वकीय विविध फितुरांचा हात होता. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये सुप्त असंतोष राहिला. इंग्रजांनी आपल्याबरोबर पाश्चात्त्य सुधारणा, शिक्षण वगैरे आधुनिक विज्ञानात्मक सुखसोयी आणल्या. देशी राज्ये स्वदेशी होती; पण त्यांची व नव्या इंग्रजी राज्याची सर्वसामान्य प्रजा तुलना करू लागली. सामान्य संसारिकांना इंग्रजी सुव्यवस्थेत सामाजिक आल्हाद प्रथम वाटला. राणीचे राज्य सर्व साम्राज्यभर शांततेचे व प्रगतीचे सर्वांनाच वाटले. इंग्रजी राज्य आले तरी 'पेशवाई' ही कारभारात व सरकारी चौकटीत कायम राहिली. ज्यांच्याजवळील 'बुद्धिबळ' असते ते राज्यक्रांत्या जरी झाल्या तरी परिवर्तनशील बुद्धीमुळे नवा-नवा अवतार-पक्ष घेऊन जगू शकतात! नव्या शिक्षणाचा फायदा घेऊन पुरोहितशाही, नोकरशाहीच्या नव्या स्वरूपात राज्यावर राहिली व कायद्याचे राज्य झाले. कायदा सरंजामदार, इनामदार, सावकार-मारवाडीशेट व नवी नोकरशाही यांच्या बाजूचा होता; त्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष संरक्षण मिळाले. शेतकरी लोकांचा सैनिकी व शेती असा द्विविध व्यवसाय होता. त्यापैकी सैनिकी पेशा जवळजवळ पूर्ण संपला, शेतीवर भार पडला व हा शेतकरी, सामान्य वर्ग अन्नवस्त्राला महाग झाला, परिस्थितीतून मार्ग काढणारा नवा सत्यशोधक हवाच होता व धर्मशुद्धीची नवी गरज होती.

### जोतिराव फुले यांचा उदय

वरील सर्व इतिहासाचा अर्थ जाणणारी व समकालीन परिस्थिती न्याहाळणारी अशी मोठी चौकस व स्वतंत्र बुद्धीची एक असामान्य व्यक्ती, इंग्रजी शिक्षण घेऊन प्रथम पुढे आली ती म्हणजे जोतिराव फुले ही एकच-एकमेव-होय. पुरोहितशाहीचे वर्चस्व हरएक धर्मात असते. पण 'मिशनरी व देशी भिक्षुकशाही' आणि 'स्वदेशी राज्ये व नवे आलेले एकसंघ विदेशी राज्य' आणि 'जुने शिक्षण व नवे शिक्षण' या सर्व जुन्या-नव्यात तुलना करणारी व तारतम्यबुद्धी वापरणारी अशी असामान्य जोतिराव ही उठाव करणारी व्यक्ती होती. तिने प्रथमतः वैचारिक व क्रियात्मकही नेतृत्व केले. विद्येच्या द्वारे सर्वांगीण प्रगती शक्य होईल हे द्रष्टेपण तिला प्राप्त झाले व धार्मिक बाबतीत पुरोहितशाहीचे वर्चस्व-मध्यस्थी झुगारून देण्यामुळे जनतेला खरे सामाजिक व मानसिक स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकेल अशी अनुभूती जोतिरावांच्या जीवनक्रमातून त्यांना प्रामुख्याने प्राप्त झाली व या दुहेरी हेतूंच्या सिद्धीसाठी सर्वसामान्य जनतेतील ठिकठिकाणच्या नव्या शिक्षित लोकांना पुण्यास त्यांच्याकडे बोलविले. जो सत्याचा शोध त्यांना प्राप्त झाला व जो मार्ग नव्या परिस्थितीत काढणे प्राप्त होते यासाठी ता. २४ सप्टेंबर १८७३ रोजी लोकशाही पद्धतीने व सर्व सूज्ञ मित्रमंडळी व साहाय्यक यांचा सल्ला घेऊन पहिला सत्यशोधक समाज प्रस्थापित केला. सर्वांगीण परिणाम दिग्दर्शित करण्यापूर्वी 'उद्गम' जाणून घेणे जरूरीचे ठरते. यापूर्वी कै. लोकहितवादी देशमुख यांनी काही विचार मांडले होते. तरी बंडाचे सामर्थ्य व प्रत्यक्ष मार्ग सत्यशोधक चळवळीनेच फक्त काढला.

वरील सत्यशोधक चळवळ शिक्षणप्रसारार्थ प्रामुख्याने प्रस्थापित झाली. सरकार जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देतच नव्हते. "The educational system was closely connected with religion. The higher education of the Hindus was in the hands of the Brahmins and mainly intended for them." अशी प्राचीन काळापासून परिस्थिती चालत आली होती. सन १८१८ सालात इंग्रजांनी मुंबई इलाखा नव्याने

बनविला. लॉर्ड एल्फिन्स्टन यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोण बराच व्यापक होता. पुढे सर आर्स्किन पेरी ह्यांनी "Filtration Theory" चा जोरदार पुरस्कार केला :

"He held that the Board of Education should encourage English schools. He therefore, advised the Board to leave the education of the means to the indirect influence of the downward filtration theory. He believed that even morality would spread from the higher classes to the lower ones." (History of Primary Education : From 1815 to 1940 by B. N. Vidhya, B. A., Page 15) अशा निबिड अंधारमय परिस्थितीतून सत्यशोधक मंडळींना पहिली वाट काढावी लागली व त्यांनी स्वावलंबी नि बिनसरकारी प्रयत्न चालू केले. सन १८७० सालापासून जमीन महसुलाबरोबर लोकल फंड सेस वसूल करण्यास प्रारंभ झाला. तरीपण ही नवी करपट्टी-लोकल फंड-वरिष्ठ थरातील लोकांच्याच शिक्षणासाठी शहरांतूनच प्रथम खर्ची पडे. जनतेची म्हणजे शेतकऱ्यांची मानसिक परिस्थिती पाहिली तर 'शिक्षण घेणे' हे आपल्या जातिवर्णधर्मांच्या विरुद्ध आहे. हा आपला स्वधर्मच नव्हे! अशी त्यांची धारणा होती. शूद्रांच्या शिक्षणाकडे कोणी लक्ष देत नव्हते व अतिशूद्रांची मुले प्राथमिक शाळेत बरोबरीने कशी घ्यावी हा मोठा पेच परकीय मिशनरी व सरकारपुढे होता. ह्यातून स्वतः पुढे येण्यासाठी विद्याप्रसारक असा कार्यक्रम पुस्तके, व्याख्याने व दौरे वगैरेंच्या द्वारे पहिल्या सत्यशोधकांनी चालू केला. पुढे विद्यावेतने, शिक्षण परिषदा, वसतिगृहे वगैरे चालू केली. बडोदा व नंतर कोल्हापूर वगैरे संस्थानिकांचे साह्य घेतले. विद्याजागृती केली व मागासलेल्या वर्गातील शिकूनसवरून पुढे आलेल्या लोकाना नोकऱ्यांत जागा मिळाव्यात म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळवून घेतल्या. शिक्षण प्रसार वाढतच गेला. सन १८७३ ते पुढे जवळजवळ पन्नास वर्षे बिनसरकरी स्वावलंबी शिक्षणप्रसारक चळवळी, सभा, सर्वत्र परिषदा वगैरे घेतल्या. खेडेगावातून तमाशाच्याद्वारे, लग्नाच्या मंगलाष्टकांतून, भोजनांच्या पंक्तीतून श्लोक म्हणून अनेक प्रकारे विद्याजागृती केली. लोकल बोर्डस् स्थापन झाल्यावर बहुजनसमाजातील शिक्षक नेमण्याचा प्रघात वाढविला व ही प्रारंभिक शिक्षणप्रसारक चळवळ यशस्वी झाल्यावर दुय्यम शिक्षणाच्या व महाविद्यालयीन शिक्षणाच्या क्षेत्रात बहुजनसमाजाने मोठी घोडदौड केली व आता 'शिक्षण घ्या, शिक्षण घ्या' असे कानीकपाळी सांगावे लागत नाही. ज्याला त्याला समजते. मुली व हरिजन देखील याच चळवळीच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणामामुळे शिकू लागले. अंगठेबहाद्दूरपणा गेला; तिसरा शिक्षणाचा डोळा आला. अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध त्यागी व कळकळीच्या पहिल्या सत्यशोधकांनी जिवाचे – या शैक्षणिक क्रांतीसाठी-रान केले. जी 'फिल्टर डाऊन थियरी' यशस्वी होत नव्हती ती सत्यशोधक चळवळीमुळे, स्वावलंबी व जनतेतील नेतृत्वाकडून यशस्वी झाली. आजच्या नव्या पिढीचा नवा महाराष्ट्र हा वरील विद्याप्रसारक चळवळीचा परिणाम आहे. पायातील दगड दिसत नाहीत; त्याप्रमाणे वरील प्रकारचा प्रयत्न करणारी पहिली मंडळी स्मृतिभ्रम झाली; पण त्यांचे यश काळाने सिद्ध केले आहे. सत्यशोधक चळवळीच्या विधायक कार्याच्या जमेच्या बाजूला हा मोठा विद्याप्रसारक इतिहासाचा स्तंभ उभा आहे. जी पहिली मंडळी शिकली त्यांनी ब्राह्मणेतर राजकीय पक्ष बनविला व त्या काळाच्या अर्थात मर्यादेत राहून पुष्कळ कार्य केले. एकूण शिक्षणप्रसाराला मोठी गती देण्यात आली. इतके विस्तृत व पार खेड्यापाड्यापर्यंतच्या शिक्षणाचे कार्य करण्याचा विचार डेक्कन एज्युकेशन सोसायटी वगैरेसारख्या तत्सम पांढरपेशा शहरी शिक्षण संस्थांच्या डोक्यात आला नाही. तो विचार स्वतः पायावर उभे राहून व जनतेचे साह्य घेऊन बहुजनसमाजातील अनेक कर्मवीरांनी व शिक्षण महर्षींनी सर्वत्र प्रत्यक्षात आणला. शिक्षणाचा 'वटवृक्ष' एकसारखा वर्धमान राहिला आहे. प्रथम 'बी' होते. डेक्कन मराठा असोसिएशन, पुणे (१८८५) या सर्वांना प्रथम विद्यावेतने देणाऱ्या संस्थेचा जन्म सत्यशोधक चळवळीतून झाला. न्या. मू. रानडे हे

अनुक्रमणिका

देखील हिचे एक संस्थापक व प्रेरक होते. या सर्व शैक्षणिक चळवळीचा फायदा पुढील व चालू पिढीला मिळाला आहे. कर्मवीर शिंदे यांच्याप्रमाणे माननीय यशवंतराव चव्हाण उघडपणे म. फुल्यांचे कार्य चालविण्यास, नव्या भारतीय राजकीय कारणामुळे धजत नाहीत; तरी आजची जी नवकाँग्रेसची मगरमिठ्ठी महाराष्ट्रावर त्यांनी बसवून व बाळगून ठेविली आहे, त्याचेही प्रत्यक्षाप्रत्यक्ष व अंतस्थ श्रेय होऊन गेलेल्या सत्यशोधक सामाजिक चळवळीकडे जाते. त्यांना व इतर सर्वांना हे मान्य करावे लागते; म्हणून परिणाम पुढे लांबवर पोहोचत गेला.

**सामाजिक परिणाम**

सत्यशोधक चळवळ ही शेतकऱ्यांच्यासाठीच, शेतकरी पुढाऱ्यांनीच स्वतः मुळातच चालू केलेली आधुनिक चळवळ होती. ही चळवळ प्रसारित पावावी म्हणून अगदी पाहिले नियतकालिक 'दीनबंधू' नावाचे सन १८७७ साली चालू झाले. 'भालेकर-लोखंडे-बिर्जे' हे अगदी पहिले जनतेतील संपादक झाले. 'दीनबंधू' म्हणजे जे गरीब बांधव आहेत असे लोक. त्यांची गाऱ्हाणी, संकटे, अडीअडचणी या पत्राने प्रथम मांडल्या. 'राष्ट्रवीर'ने देखील पुढे पन्नास वर्षे हेच सत्कार्य उत्तम प्रकारे बजविण्यात असामान्य यश मिळविले. जनतेचे प्रतिनिधी प्रातिनिधिक संस्थांतून निवडून जाऊ लागले. तालुका, जिल्हा लोकल बोर्ड जनतेच्या ताब्यात आली. आता पुढे पंचायत राज्ये व जिल्हा परिषदांच्यावर ताबा आला. हा सगळा परिणाम शिक्षणजागृतीच्याच पहिल्या, वरील मूळ व आता पायात राहिलेल्या प्रयत्नांचा होय. नाहीतर या सर्व परिस्थितीचा संपूर्ण अभाव होता व सत्ता, मत्ता व सर्व प्रकारचे नेतृत्व मूठभर शहरी पांढरपेशांच्या ताब्यात होते. मध्यस्थ-एजंट-आडत्या नको हे सत्यशोधक चळवळीचे कणाभूत, प्राणभूत तत्त्व होते. त्यामुळे परिस्थिती पालटली. त्यासाठी प्रथम धर्मसुधारणेचा मूलभूत प्रयत्न करावा लागला. देवधर्म मान्य अशा पुरोहितशाहीला विलक्षण धक्का द्यावा लागला. पहिले सत्यशोधक अपूर्वपणे मोठे व्यवहारी होते. जनतेच्या चालीने ते चालले. तिला समजणारी भाषा त्यांनी वापरली. तिला पाहिजेत व झेपतील अशी तत्त्वे मांडली. साधने वापरली. पहिली जागृती घडवून आणली. हे सर्व चिपळूणकरी 'निबंधमाले'च्या संप्रदायाला अर्थात आवडले नाही. ही जनतेची चळवळ रोखण्यासाठी सत्यशोधक चळवळ हीच परधर्म व परकियांच्यापासून उत्स्फूर्त आहे असा डाव त्यांनी टाकला. पण सत्यशोधक खंदे वीर होते. झुंजार होते. शेकडो पटींनी, प्रतिक्रिया बरीवाईट व्यक्त करून, चिपळूणकरी संप्रदायाचा बालेकिल्ला जमीनदोस्त करण्यात आला.

ब्राह्मणी पुरोहितांचा हात विविध धर्मसंस्कारविधीत असतो. बुद्धीने श्रमण निर्माण केले. पुढे जंगम व गुरव निर्माण झाले. त्याप्रमाणे म. फुले, शाहू महाराज यांनी स्वयंपुरोहित निर्माण करणारी बिनचूक अशी नवी चळवळ, आधुनिक काळी पुन्हा हातात घेतली. धार्मिक-सामाजिक-राजकीय क्षेत्रांतून पुढारलेल्या वर्गाला बहिष्कृत करून वगळण्याचे जालिम पवित्रे घेण्यात आल्यामुळे त्यांचे विविध महत्त्व कमी झाले व त्यांच्या जागा, वतनदाऱ्या मोकळ्या झाल्या व मागासलेल्यांना पुढारण्यास बऱ्याच प्रमाणात पहिली गती नि अवसर मिळाला. सत्यशोधक चळवळीच्या काळात प्रथम अब्राह्मण पुरोहितांकडून लावलेली लग्ने बेकायदेशीर आहेत; दक्षिणा वसूल होण्यासाठी वगैरे तत्सम प्रकारचे वर्चस्व राहावे म्हणून म. फुल्यांच्या वेळेपासून ते थेट भास्करराव जाधवांच्या काळापर्यंत अनेक दावे, फिर्यादी इंग्रज सरकारच्या कोर्टात दाखल केल्या गेल्या. पण म. फुले यांनी सन १८८५ साली हायकोर्टात दावा जिंकला व शेवटी सन १९२६ नंतर मुंबई कौन्सिलमध्ये 'जोशी बिल' मंजूर होऊन पुरोहित होण्याचे व पौरोहित्यांचे स्वातंत्र्य कायद्याने प्रस्थापित झाले. विविध परिणाम काय झाले हे

पाहण्यासाठी चळवळीच्या इतिहासातून कालक्रमणानुसार पुढे जावे लागते. सत्यशोधक चळवळीचा आविष्कार 'जातीय' माध्यमातून झाल्यासारखा वाटतो. पण त्या काळाच्या मर्यादेत व माध्यमात राहून तिला वस्तुस्थितीजन्य असे व्यावहारिक पवित्रे घ्यावे लागले. हे ठीकच झाले.

सर्व ब्राह्मणेतरांमधील जातीजमातींच्या शैक्षणिक संस्था, परिषदा व चळवळी ह्या सर्वांना सत्यशोधक चळवळीने जन्म दिला. राजर्षी शाहू महाराजांनी विद्याप्रसारक चळवळींना मोठ्यात मोठा आर्थिक हातभार लावला. त्यामुळे म. फुल्यांची स्वप्ने व्यवहारात मोठ्या प्रमाणात आली. म. जोतिराव फुले व राजर्षी शाहूमहाराज हे मोठ्यात मोठे पुढारी झाले. यांच्याही निधनानंतर ही सर्वांगीण प्रगती व परिणाम करणारी चळवळ टिकली व पुढेही हिला वेगळा भविष्यकाळ असेल. कारण सत्य हे शाश्वत व विकासात्मक असते. प्रकाशित होतच असते. वेदोक्त प्रकरणापर्यंत (१९०१-०६) एक प्राथमिक कालखंड खलास होतो. संपतो! "Prior to 1856 the Shastrys in the Poona Sanskrit College taught brahima students only and refused to teach the sacred Law to except a Brahmin." [A Review of Education in Bombay State, (1855-1955) Government Publication : P. 492] बहुजनसमाजाला विद्येची दारे बंद होती असे म्हणणे केवळ कादंबरीप्रमाणे काल्पनिक नव्हते! शूद्र म्हणजे दास गुलाम. अति शूद्र म्हणजे तर अस्पृश्य असूनही बंदा गुलाम! शिवाजीच्या मराठी काळानंतर मराठे लोकांना शूद्र समजण्याची वहिवाट वाढली. वेदांचा संस्कृतचा अधिकार स्त्रियांशूद्रांस नाही; प्राकृतांना नाही अशी ओरड प्रामुख्याने तुकारामादी संतांनी केली. समान दर्जा, समान हक्क, समान संधी यासाठी मूळ सत्यशोधक प्रवाह निर्माण झाला होता. मालकाला, यजमानाला शूद्र समजून त्याला नीच, अस्पृश्य मानण्याचा प्रघात उत्तर पेशवाईत वाढला! दक्षिणा, दान-देणगी मात्र शूद्र नव्हती. शिंदे-गायकवाड-भोसले वगैरे राजे सर्व शूद्र! क्षत्रिय कोणी नाही! संस्कार लोप होऊन चुकला! राजर्षी शाहूमहाराजांनी श्री. शिवाजी-प्रतापसिंह यांच्यापासून चाललेल्या वेदोक्त प्रकरणाचा शेवट एकदाचा केला. "क्षात्रजगत् गुरू" नामक नवे पुरोगामी पीठ तयार केले. लो. टिळक-विजापूरकर-भाऊशास्त्री लेले वगैरेंनी कडवा विरोध केला. श्री. शाहूमहाराज यांनी नाईलाजाने यात लक्ष घातले. आर्य समाजाला कोल्हापूरात चांगले स्थान दिले. कारण श्री. दयानंदांनी यच्चयावत मनुष्यप्राण्यांना वेदाचा अधिकर खुला केला. इंग्रजी राज्यात मॅक्समुल्लर, विल्सन, जोन्स वगैरे आंग्ल पाश्चात्त्य पंडितांना वेद व संस्कृत शिकविण्यासाठी पोटार्थी वैदिक पंडित जात असत. त्यांची भाषांतरे जर्मन व इंग्रजी भाषेत झाली. पण राजर्षी शाहूमहाराज व त्या अगोदर सयाजी महाराज त्यांचे वेदोक्त संस्कार हक्क नाकारण्यात आले. यामुळे चळवळ भडकली व वणव्याप्रमाणे पसरली. ह्याच काळातील चळवळीच्या स्वरूपावर प्रामुख्यतः आक्षेप घेतले जातात; पण ह्याच घणाघाती काळाच्या समयात सत्यशोधक चळवळीचे प्रमुख उद्देश तडीस गेले. ब्राह्मण-अब्राह्मण-हरिजन वगैरे सर्व महाराष्ट्रीय समाजथरावर या चळवळींचा धार्मिक-सामाजिक-राजकीय-शैक्षणिक वगैरे दृष्टींनी सर्वांगीण परिणाम होऊन चुकला. चळवळीच्या तात्त्विक यशाचे पुढे प्रत्यक्षात आलेले यश, धर्मनिर्णय मंडळाने पुढील प्रसारित केलेल्या प्रमुख ठरावात आढळते. डॉ. आंबेडकर, म. फुले व शाहूमहाराज यांनी जी Shock Treatment दिली. त्यामुळे सनातनी पंडित कायमचे-तूर्त तरी-मागे पडले. जुन्या व सनातनी विचारांचे आता मण्डन कोणी करीत नाही. शास्त्री-पंडितांतच सुधारक व परिवर्तनशील प्राज्ञ नवे पंडित तयार झाले. गोळवलकर गुरुजींनी वर्णधर्माचे नाव काढताच सर्वच वर्गातील विचारवंतांनी त्यांना प्रत्याघात केला! विविध शंकराचार्य निर्माल्यवत् व निष्प्रभ असे नामधारी आहेत.

अनुक्रमणिका

**यशस्वी परिणाम**

ब्राह्मणेतर चळवळ व सत्यशोधक चळवळ पुढे एकच भासणार नाही. कारण कोठल्याही समाजात, देशात व धर्मात सनातनी पुराणमतवादी आणि सुधारणावादी असे दोन पक्ष वेगवेगळ्या काळातही असतात. राजकारण, अर्थकारण वगैरे क्षेत्रात असा झगडा, संघर्ष आढळतो. सत्यशोधक चळवळीचा विचार करताना जातीय व पक्षीय किंवा एकतर्फी विचार करून चालणार नाही. सत्य सापडणार नाही. जो सत्य शोधतो तोच सत्यशोधक. लोकहितवादी, राजारामशास्त्री भागवत, अच्युतराव कोल्हटकर वगैरे विचारवंतांनी सत्यशोधक चळवळीस साह्य केले. गोखल्यांनी सक्तीच्या शिक्षणासाठी जिवाचे रान केले. पुढे सत्यशोधक प्रवृत्ती मानवात सतत राहणार; ती नैसर्गिक आहे. बौद्धिक आहे. या दृष्टीने पुढे धर्मनिर्णय मंडळाने जे निर्णय घेऊन नवे परिवर्तन केले; त्याच मागण्या प्रथमपासून सत्यशोधक चळवळीच्या खास मागण्या व भाग होता. प्रत्यक्ष लढा होता, तो धर्मनिर्णय मंडळींच्या परिभाषेतही थोडाफार स्पष्ट करता येतो.

खालील धर्मनिर्णय चिंत्य आहेत :
१. कोणतीही जात जन्मतः श्रेष्ठ अथवा कनिष्ठ समजू नये.
२. कलियुगात क्षत्रिय, वैश्य नाहीत असे काही विद्वान घोषित करतात ते अयथार्थ आहे.
३. स्त्रियांचे धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रांतील अधिकार पुरुषांच्या बरोबरीचे आहेत. हे धर्मनिर्णय मंडळास मान्य आहे.
४. द्विजत्वसिद्ध्यर्थ वैदिक पद्धतीने संस्कार प्रत्येक तज्ज्ञांच्या साह्याने करावा. (पौरोहित्याचा व वेदांचा सर्वांचा समान हक्क धर्मनिर्णय मंडळाने मान्य केला आहे.)
५. बुद्धीच धर्माचे प्रमाण होय.
६. उच्चतम कल्याण हे मानवाचे ध्येय आहे व त्या ध्येयाचे जे साधन तो धर्म होय.
७. समाजामध्ये काही जातींची रूढ असलेली जन्मजात अस्पृश्यता यापुढे मानू नये. (धर्म निर्णय मंडळाचा रौप्यमहोत्सवी वृत्तान्त).

हिंदूमहासभेतही ठराव होऊन वेदोक्ताचे अधिकार सर्वांचे आहेत असे यापूर्वी जाहीर झाले आहे. म्हणजे सत्यशोधक चळवळीतून पुढे ज्यासाठी वादसंघर्ष निर्माण झाले ते संघर्षाचे मुद्दे सर्व थरातील विचारवंतांस मान्य झाले आहेत. डॉ. आंबेडकर यांनी आधुनिक बुद्धधर्माची दीक्षा घेताना पुढील दंडक घातले आहेत :
१. कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाचे हातून करवून घेणार नाही.
२. सर्व मनुष्यमात्र समान आहेत.
३. मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
४. देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.

डॉ. आंबेडकर व महात्मा फुले यांच्या विचारातील साम्य याप्रमाणे दिसते. सामाजिक परिणामाच्या दृष्टीने शेवटी असे म्हणणे क्रमप्राप्त आहे की, सर्व थरातील विविध विचारवंतांच्या विचारात पुष्कळ फरक घडला, परिवर्तन झाले तरी सर्वसामान्य स्त्रिया व विशेषतः ग्रामीण बहुजनसमाज आणि सर्वच हरिजन समाज धर्मभोळा झाला आहे; पण गेल्या शतकात जागृती व प्रगती देखील कित्येक बाबीत झाली आहे. सर्वच सत्यशोधक चळवळ

कोणता सामाजिक परिणाम अपेक्षिते त्याचा वरील एक आराखडा आहे व हा आलेख [त्यानुसार वरच्या व खालच्या थरावर (ब्राह्मणेतर)] सत्यशोधक चळवळीचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम दर्शवितो.

**आर्थिक व राजकीय परिणाम**

सत्यशोधक समाज निघाल्यानंतर १८७७ सालात मोठे दुष्काळ पडले. त्याची पुनरावृत्ती देखील झाली. शेतकऱ्यांची स्थिती भयाण झाली. महाराष्ट्रात ठिकठिकाणी शेतकऱ्यांचे दंगे झाले व या काळात शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी वरिष्ठवर्गीय सावकार-इनामदार यांच्या ताब्यात गेल्या. जे भटभिक्षुक, जोशी-कुलकर्णी, वतनदार-पुरोहित होते ते देखील सावकारी करीत असत व शेतकऱ्याला पिळीत! कुलकर्णी हा तर ग्रामराक्षस होता. त्याला सत्यशोधक चळवळीने खलास केले! शेटजी (भांडवलवाले) भटजी (पाद्री-मुल्ला वगैरे) यांच्या वर्चस्ववादाविरुद्ध उठावाचा हा मार्ग प्रायः होता. म. फुले-लोखंडे-भालेकर 'दीनमित्र'कर्ते पाटील यांचे लेखन पाहिल्यास शेतकरी-मजूर-कामगार व हरिजन यांची दुःखे व दारिद्र्य त्यात सांगितले आहे. 'गरीबी हटाव' ही यांचीच पहिली चळवळ. सावकारशाहीचा जुलूम नजरेस यांनीच आणला. या सर्वांतून डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट (सन १८७९) मंजूर झाला व अव्वल इंग्रजीत शेतकऱ्यांना थोडा प्राथमिक दिलासा दिला! सत्यशोधक चळवळ, विद्याप्रसारक चळवळ मूलतः जशी होती तशी ती शेतकरी-कामकरी व मजूर चळवळ होती.

शेतकरी-कामकरी ही एक दृष्टी आहे. तत्त्वज्ञान आहे. विचार आहे. या प्रवाहाची बीजे सत्यशोधक चळवळीत दिसतात. 'दीनबंधू' सार्वजनिक सभा, शेतकरी सभा, गिरणी कामगार, मजूर संघ यांच्याद्वारे आर्थिक समतेच्या पहिल्या चळवळी करण्यात आल्या. कै. लोखंडे यांच्या साक्षीप्रमाणे पहिल्या फॅक्टरी ॲक्टमध्ये गिरणी कामगारांच्या प्राथमिक मागण्या मंजूर झाल्या. पुढे सक्तीच्या शिक्षणाची मागणी मंजूर झाली. नोकरीत प्रमाण मिळाले. राखीव जागा कौन्सिलात मिळाल्या. आता वटवृक्षवत् झालेली विविध सहकारी चळवळ सत्यशोधक पुढाऱ्यांनी प्रथम वाढविली. परिणामांच्या दृष्टीने शेवटी संकलन करावयाचे झाल्यास ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शब्दात करता येते : "बहुजनसमाजावर हिंदूंच्या ब्राह्मणी परंपरेने जे युगानुयुगे वर्चस्व गाजविले आणि खालच्या समाजाला अज्ञान, दारिद्र्य, भोळेपणा, मागासलेपणा, अस्वच्छता, मालिन्य, मनोदौर्बल्य आणि हताश वृत्ती यांचेच भागीदार राहू दिले; तिच्याविरुद्ध बंड करणारी प्रवृत्ती सत्यशोधक समाजाच्या रूपाने जागी झाली. शेतकऱ्यांचे, कारागीर वर्गाचे आणि कामगार वर्गाचे दीर्घकालीन आर्थिक शोषण हीही गोष्ट या असंतोषाच्या मुळाशी होती. हिंदूधर्माच्या परंपरेवर बौद्धिक आक्रमण करणारी वैचारिक जाणीव या चळवळीत होती.... सत्यशोधक समाजामुळे शेतकरी-कामकरी यांच्या जीवनविषयक लढ्याला आकार प्राप्त झाला. अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराच्या चळवळीला दक्षिण हिंदुस्थानात ब्राह्मणेतर चळवळीमुळेच काही बळ चढले.... सरकार संस्थेतील ब्राह्मणी वर्चस्व आणि समाजातील सर्व महत्त्वाच्या व्यवहारातील ब्राह्मणी नेतृत्व या गोष्टींच्या विरुद्ध एक प्रकारचा वर्गविग्रहच या चळवळीने निर्माण केला." ('वैदिक संस्कृतीचा विकास' : पृ. २३५-२३६) परिसंवादाचा विस्तृत विषय याप्रमाणे व्यक्त करता येतो. पिळवणूक व वर्चस्ववाद आणि वतनदारी कोणाचीही असो, ती नाहीशी करणे हे खऱ्या सत्यशोधकांचे कर्तव्य राहील.

अनुक्रमणिका

**उपसंहार**

परिणाम याप्रमाणे, विविध कालखंडांतून विविध प्रकारे होत आहे. ब्राह्मो समाज व राजा राममोहन राय यांचीच मानवतावादी तत्त्वे मूळ सत्यशोधक समाजाची होती व आहेत. तरी पण परिणामाने सत्यशोधक समाज फार भिन्न, सर्वांगीण, व्यापक व जानपद ठरला. सत्यशोधक समाज केवळ पारमार्थिक व शुष्कपणे तात्त्विक नाही. तो जास्तीत जास्त 'सेक्युलर' आहे व होता. म. गांधींच्या आगमनानंतर राष्ट्रीय सभेत मोठी वैचारिक क्रांती झाली व तत्पूर्वीचे जहाल-मवाळ हे दोघेही म. गांधींच्या दृष्टीने नमेस्तच ठरले. म. गांधी व त्यांची सार्वजनिक काँग्रेस महाराष्ट्रीय सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीला जास्ती जवळची वाटली. 'सामाजिक सुधारणा आधी का राजकीय सुधारणा आधी?' हा शुष्कवाद लोकमान्यादी जाणती पुढारी मंडळी खेळत होती! म. गांधींनी सामाजिक सुधारणा, हिंदू मुसलमान ऐक्य, अस्पृश्यता निवारण व असहकारितेच्या मार्गाने सर्वांसाठी स्वराज्याचा व नंतर पूर्ण स्वातंत्र्याचा लढा चालू केला व महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर-सत्यशोधक-मंडळींना बोलावून, त्यांच्याशी चर्चा करून, त्यांना विश्वासात घेऊन योग्य ती नवी पावले टाकली. म. गांधी, शाहूमहाराज, म. फुले व कर्मवीर शिंदे यांचे कार्य ओळखीत होते. सत्यशोधक चळवळीने, जी स्वतंत्र व स्वावलंबी विचारांची नवी दृष्टी दिली, धार्मिक आणि सामाजिक स्वातंत्र्यार्थ लढा देण्याचे शिक्षण दिले; त्यातून जे नवे नेतृत्व पुढे आले, त्याने म. गांधींच्या लढ्यात अग्रेसर भाग घेतला. नाना पाटीलांच्यापासून, जेधे व कर्मवीर शिंदे वगैरे पुढारी व सत्यशोधक वीर स्वपक्ष बाजूस ठेवूनही म. गांधी यांच्या स्वातंत्र्य मिळविणाऱ्या लढ्यात प्राणपणाने पडले व लढले. स्वातंत्र्य आले. याच्या उलट केसरी-लो. टिळक संप्रदायाची अवस्था झाली व तो प्रायः म. गांधींच्या लढ्यापासून दूरच व लांब राहिला. सत्यशोधक चळवळ म्हणजे केवळ 'इंग्रजनिष्ठ' वगैरे, तत्सम चळवळ रोखण्यासाठी पुढे केलेले आरोप खोटे पडले. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यासाठी व समतेसाठी सत्यशोधकाला समकाळानुसार व प्रसंगानुसार लढावे लागते. सत्य, समता व स्वातंत्र्य, स्वावलंबन, वैज्ञानिक दृष्टी, मानवी समान हक्क, समान दर्जा, मानवी धर्म, बुद्धिस्वातंत्र्य, निधर्मी दृष्टी (धर्म-पंथ भेदविरहित समभाव), लोकशाही, समाजवाद ही विचारमूल्ये सत्यशोधक चळवळीत बीजरूपाने सापडतात. 'शेतकरी कामकरी' हा पक्ष म्हणजे विचारांची बाजू, दृष्टी, तत्त्वज्ञान यांचेही बीज (seeds) सत्यशोधक चळवळीत आढळतात. पहिल्यापासून, ज्या ज्या वेळेस काँग्रेस प्रतिगामी होते, जनताविन्मुख होते, त्या त्या वेळी तिला जनताहितार्थ विरोध करावा लागतो व लागला आणि लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत वरील शेतकरी कामकरी पक्ष सर्वांत प्रमुख व मोठा होता. महाराष्ट्र मिळाला. याप्रमाणे सत्यशोधक चळवळ सर्वांगीण विविध परिणाम घडवीत आली. केवळ नेहमीचा छिद्रान्वेषीपणा टाकून सहानुभूतीने तत्त्वमूलक विचार-आचार यापुढे सर्वांनी करावा.

अनुक्रमणिका

८.

## लोकशाहीतील सत्तेचे अभिसरण

मानवी इतिहासात व सर्व धर्मांत व सर्व देशातून एक प्रकारची वतनदारी, मक्तेदारी निर्माण होत आली आहे व होत असते. शेतकरी शेतातील गवतहरळी वगैरे नको असलेले घातकी तण दरसाल नांगरट वगैरे करून काढून टाकीत असतो. पुन्हा हरळी कुंदा उगवतो! पुन्हा कोळपणी करावी लागते. नाहीतर गवत माजून पिके बुडतात. जगातील कुठल्याही देशाधर्मातील सत्यशोधकाला देखील असत्य शोधून, निरनिराळी असत्ये उपटून टाकावी लागतात. गुलामगिरी विमोचन, स्त्री-स्वातंत्र्य, समान हक्क, विविध भेद व अस्पृश्यता, अज्ञान, भोळाभाव वगैरे तत्सम घातक बाबीतून सुटका होण्यासाठी, सत्यशोधक विचार हा 'विवेक' असतो. मक्तेदारी वंशपरंपरा म्हणजे वतनदारी असा अर्थ येथे घेतला आहे. श्री. शिवाजी छत्रपती यांना देखील वंशपरंपरागत वतनदारी-अमान्य होती. म्हणूनच अष्टप्रधानात्मक लोकराज्य त्यांनी स्थापिले. दुर्दैवाने पेशवाईत हे लोकशाही धोरण लोपले! सत्यशोधक विचारसरणीची गरज वेळोवेळी मानवांना भासते. उदाहरणार्थ, भारतीय मुसलमानी समाजात व धर्मात मुल्लामौलवी यांच्यामुळे पडदा, अज्ञान स्त्रीदास्य वगैरे वाईट चालीरीती आजही जारी आहेत. खऱ्या संतांचा छळ करून विविध धर्मातील पुरोहितशाही हे अज्ञान टिकवून धरते. असत्य व अज्ञान यातून मुक्तता व सुटका होण्यासाठी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' चालू होऊन आता मुस्लिम सत्यशोधक महिला परिषदादेखील भरू लागल्या आहेत. चांगले चिन्ह आहे. पुरोगामी ख्रिस्त्यांनी किंवा इतर कोणत्याही धर्मातील लोकांनी पुरोहितशाही पासून सुटका करून घेण्यासाठी सत्यशोधक विचारसरणीचा आपआपल्या समाजात व स्वधर्मात जरूर अवलंब करावा. कारण सत्यामृत जे असते त्यावर कोणाचीही ठराविक मक्तेदारी अगर वतनदारी असू शकत नाही आणि सार्वभौम सत्याला देशकालवर्तमान वगैरे मर्यादा नसतात. संशोधन मर्यादित नसते. सत्यशोधक चळवळ अशा प्रकारे अवतार घेत असते. तिला कारणपरत्वे आवृत्त करून तिची सुधारलेली नवी आवृत्ती काढणे भाग आहे.

काळ बदलतो. चालू व आगामी काळ राजकारणांचा व अर्थकारणांचा आहे. जो बदल व जी क्रांती घडवावयाची असते ती, राजकीय पक्षांच्या द्वारे व लोकशाही सत्तेच्या सदुपयोगातून व निकोप लोकशिक्षणातूनच होऊ शकेल. यासाठी सत्यशोधक नवी दृष्टी कारणपरत्वे घेत असतो. तरी ता ठोकळेबाज व अगदीच ठरीव अशी विचारसरणी किंवा पोथीबद्ध व फॉर्मवजा जीवितसरणी नाही. सत्य आणि सत्याची प्राप्ती-साधना-यांच्या दरम्यान भाडोत्री मध्यस्थ-एजंट-दलाल नसावा हे सत्यशोधक समाजाचे मुख्य सूत्र. जगाच्या कोणत्याही देशातील व धर्मातील लोकांना एकसारखे हितप्रद असू शकते. मुस्लिम-सत्यशोधक-मंडळींनी म्हणूनच ह्या विद्यमान व उपलब्ध सत्यशोधक दृष्टीचा जाहीर अवलंब केला. इतिहासात वाईट व घातकी चालीरीती याविरुद्ध शतकानुशतके लढा अनेकांनी दिला, म्हणून सकाम व हिंसाप्रधान यज्ञयागी 'सकाम धर्म' कायमचा मागे पडला. सतीची चाल बंद झाली. बालविवाह, विधवावपन वगैरे स्त्रियांवरील अन्यायी बंधने, एकसारख्या प्रयत्नामुळे कायमच्या स्वरूपात, आता नाहीशी होत आलेली आहेत. नव्हे! नाहीशी झाली आहेत. सत्यशोधक मानवातील प्रवृत्तींचा हा विजय आहे. सत्याचा आविष्कार वारंवार होत असतो. श्री. राममोहनपासून ते डॉ. आंबेडकरांपर्यंत जे जे विविध सत्यशोधक सुधारक झाले; त्यांनी त्यांचे नवसत्यसंशोधन मांडले व सत्यासाठी आग्रह केला. झगडा केला. गौतमपासून राजर्षी शाहूपर्यंतच्या अनेक सत्यशोधकांना सर्वथैव व संपूर्ण यश आले

नाही, तरी बरेच यश आले व पुढे यावयाचे आहे, येईल असा सक्रीय आशावाद सर्वांनी जरूर बाळगला पाहिजे. पोकळ भक्तीपेक्षा सदाचार-सत्यवर्तन-चांगले. देवाला कोरडी स्तुती नको. हा विचार 'म. गौतम-फुले' यांच्यात सापडतो व मुख्य बाब म्हणजे विषमता व पक्षपातप्रधान व स्वार्थी चातुर्वर्ण्याविरुद्ध बंड करणे हा सर्व धर्मसुधारकांचा आत्मा व प्राण होता. 'वर्णाधर्म' यातून आश्रमधर्म मागेच गेला! कारण गीतेतही चार आश्रमावर फारसा विचारप्रपंच आढळत नाही! जी अवघड बाब आहे, ती कोणी पाळीत नाही. ब्रह्मचर्य व शेवटी संन्यास-निवृत्ती-संसारात कोणी सहसा सार्वजनिकपणे कधीच पाळली नाही व कधीच पाळत नाही. शेवटपर्यंत मरेपर्यंत सर्वसामान्यांना स्वार्थ सुटत नाही! मतलबापुरता फक्त चार वर्णांचा उंचनीच विचार शिल्लक राहिला व हाही जाईल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे 'जी जात नाही ती जात' अशी जातीची व्याख्या करतात. पण ही निराशेची व निष्क्रियतेची व्याख्या आहे. भेदभाव उत्तरोत्तर जात आहे. कारण 'निधर्मी लोकशाही व समाजवाद ह्या नव्या त्रिसूत्रीत जन्मजात वर्णकल्पना मुळीच बसत नाही. जी जात नाही ती जात (CASTE) अशी व्याख्या निराशेतून न करता जी जाते (Which Goes; Vanishes) ती जात' अशी व्याख्या सर्वांनीच निर्धाराने केली पाहिजे व निदान तात्त्विक तडजोड तरी करता कामा नये! सुधारकांनी व सत्यशोधकांनी व मानवतावाद्यांनी त्यांचे निदान विचार तरी ठाम करावेत! म. फुले यांचे विचार ठाम पक्के होते व त्या पक्के व ठाम विचारांची, ते एकसारखी मजबुती करीत होते. वतनदारी म्हणजे मक्तेदारी सर्व क्षेत्रातील त्यांना नको होती. निरक्षर जवळजवळ 'ठोंब्या पाटलांचे' परावलंबन, त्यांनी आसूडाच्या निबंधात दाखविले आहेत. कुलकर्णी-अष्टाधिकारी यांचे प्राबल्य नंतर संपले!! भिक्षुकीपुरोहितांच्या मनोवृत्तीत फरक बराच झाला आहे. यजमानालाच पिळणारा पुरोहित पाहिजे असतो. पुरोहितवर्ग आता निकृष्ट दशेस पावला आहे. तो इतरांना शूद्र व नीच समजत नाही; हीन समजत नाही. लोकांच्या सामाजिक प्रतिष्ठेवर घाव घालून तो आता आपली प्रतिष्ठा पूर्ववत सांभाळत नाही. सांभाळू शकत नाही. जगातील सर्वच धर्मात प्रॉटेस्टंट सत्यशोधक चळवळींना पुष्कळ यश या प्रकारे आले आहे व विज्ञानात्मक दृष्टिकोणामुळे देवाधर्माचा देखील अडथळा दूर होत आहे. आपल्य येथे, असा खरा मूलभूत प्रश्न आहे की, परंपराबद्ध, पुराणप्रिय लोकसमाजाला विशिष्ट-ब्राह्मण-जातीचा पुरोहित हा पाहिजेच असतो. पुरोहितशाहीचे अस्तित्व व संगोपण याप्रमाणे यजमान वर्गाकडून म्हणजे बहुजनसमाजाकडूनच होत असते. म्हणून पुरोहितालाच दोष देण्याची परंपरा यापुढे तरी खोटा, बोथट ठरते. ब्राह्मण उपाध्यायाची गरज लोकांना लागते. त्याच्याशिवाय त्याचे धार्मिक समाधान होतच नाही. सारासार विचारान्ती हे खरे! हे सत्य आहे! देवस्थान ट्रस्ट कायदे, कूळकायदा या अनेक नवीन कारणांमुळे व श्रद्धेच्या उत्तरोत्तर उच्चाटनामुळे आणि सर्वच लोकजीवन, जास्ती जास्ती धर्मपंथ निरपेक्ष झाल्याने देवस्थानच्या उत्पन्नात घट पडली व देवस्थाने निष्प्रभ झाली. लोकांचा देवधर्मावरील 'भाव' कमीकमी होत आहे व निधर्मी राज्यघटनेचा देवाधर्माला फारसा आधार नाही. असला तर 'तो असणे' घटनाबाह्य आहे. जातिधर्मनिरपेक्ष भारत बनवावयाचा आहे.

### राजकीय सत्ता आणि मक्तेदारी

हल्ली जी मक्तेदारी आहे, ती राजकीय सत्तेत व भांडवलशाही क्षेत्रात व स्वरूपात विशेषतः आढळते. राजकीय मक्तेदारी-वतनदारी, पारिवारिकता, स्वार्थाने खुर्ची टिकविण्याचा हव्यास लोकांच्या नजरेस येत आहे व त्याविरुद्ध बंडे उठली, उठत आहेत व उठतील! कारण तरुण रक्त आता सुशिक्षित, होतकरू व उत्साही होत

अनुक्रमणिका

चालले आहे. लोकशाहीत सर्वांना संधी पाहिजे. व संधी व न्याय्य अवसर रोखला तर नवकाँग्रेसमध्येही बंड उठतात! सहकारी क्षेत्रातील व जिल्हा परिषदेतील, मराठी वाङ्मय व साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील मक्तेदाऱ्या देखील लवकरच संपुष्टात येतील! एखादा मोठा इसम एखाद्या कोणत्याही संस्थेचा अनेक वर्षे सतत अध्यक्ष राहतो म्हणजे लोकशाही नव्या विकेंद्रीकरणाच्या युगात ही बाब मोठी शोचनीय व चिंता निर्माण करणारी आहे. वतनदारीची असली उदाहरणे, लोकांची लोकशाहीतील अपात्रता व असमर्थता दर्शवितात, व एकाचढीत एक लायक व एकापेक्षा अधिक सुपात्र विद्वान माणसे असू नयेत, हे देशाचे मोठ्यातले मोठे अभागी दुर्दैव आहे! या लोकशाहीत एकाच जागेवर अनेक वर्षे सतत राहणाऱ्या महात्म्यांची देखील कीव केली पाहिजे! तत्त्वतः व मूलतः सत्यशोधक समाज हा निधर्मी, लोकशाही, समाजवादी व विकेंद्रीत लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे, म्हणून त्याने म्हणजे जे खरे सत्यसंशोधन करतात त्यांनी, कोणत्याही क्षेत्रातील आर्थिक विषमता व वतनदारी, मक्तेदारी, सरंजामदारी, असल्या लोकशाहीला राखणाऱ्या बाबीविरुद्ध जरूर आवाज उठविला पाहिजे. या योगेच देशसेवा घडू शकते. मक्तेदारी म्हणजे सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण होय. सत्यशोधक विचार व आचार जागतिक असतो.

### अन्यायाविरुद्ध झगडा व न्यायाची प्रस्थापना

निधर्मी-निरीश्वरवाद व विज्ञान याकडे सत्यशोधकांचा कल वाढला आहे. अध्यात्म जरी समजा मानले नाही, तरी न्याय, सत्य, समता, शांती-प्रगती, समानता, समान संधी व हक्क-मानवी स्वातंत्र्य- वगैरे तत्त्वावर कोणाही सत्यशोधकाला तात्त्विक श्रद्धा ही ठेवावी लागणारच! कार्ल मार्कस्ने देखील ह्या जीवनमूल्याचे खंडन केलेले नाही. वतनदारी, मक्तेदारी आणि सरंजामदारी, समाजात श्रेष्ठ, कनिष्ठ भाव व उंचनीच भाव आणि विषमता निर्माण करते. ह्या अन्यायी बाबी आहेत. हे सार्वजनिक न्यायाच्या आड येतात. संस्थानिकांचे तनखे गेले, तशा त्या बाबी नाहीशा झाल्या पाहिजेत. नवे संस्थानिक निर्माण करू नयेत. ह्या खेरीज खऱ्या सहकारी न्यायाची प्रस्थापना होणार नाही. अन्यायाविरुद्ध झगडा देणे व न्याय प्रस्थापित करणे या शब्दात व वाक्यात सत्यशोधक समाजाचे ध्येय व कार्य यांचे दर्शन लोकांना देता येते. म्हणून त्याचे स्वरूप लढावू दिसते व अन्याय वाढल्यास जास्तीपणे ते दिसू शकते. वर्णधर्मदेखील मक्तेदारी व जन्मजात वतनदारी निर्माण करू लागला म्हणून भगवान् बुद्धापासून ते डॉ. आंबेडकर ह्या आधुनिक नवबौद्धापर्यंत जन्मजात वर्णधर्माविरुद्ध बंडे झाली. शॉक ट्रीटमेंटस (SHOCK TREATMENTS) द्याव्या लागत. बंडाच्या कारणांचे आधिक्य झाले की बंडे अटळ होतात. कोणत्याही पक्षात व धर्मात मक्तेदारी-वतनदारी व तत्सम सत्तावाद व सत्तांधता निर्माण होऊ शकते. अशा वेळेस खुद्द पक्षातीलच विचारवंतांना सत्तांधतेला विरोध करावा लागतो. नाहीतर बंडे आणि उठाव अटळपणे जनतेतून निर्माण होतातच!

निवडणुकीच्या लोकशाही पद्धतीत अनुभवी, त्यागी व सुपात्र आणि ज्यांची पुनः जरुरी आहे, असे लोक पुनः निवडून दिले जातात. त्यांची जरुरी मतदारांना कळते व कोणालाही पुनःपुन्हा निवडणुकीस उभा राहता येते.

अनुक्रमणिका

**सत्य व सत्ताशुद्धी**

सत्य व सत्ताशुद्धी यांची गरज सर्व पक्षांना पडतेच! सत्तत अशुद्धी निर्माण होत असते; मग कोणत्याही पक्षाचे राज्य होवो, त्याला सत्तेतून निर्माण होणारे दोष संपूर्ण टाळता येणे शक्य नसते. विरोधात असताना, सत्ताधारी पक्षावर कडाडून हल्ला चढविता येतो, पण तोच विरोधीपक्ष सत्तेवर आला, की त्याच चुका होऊ शकतात. अशा अवस्थेत सत्ताशुद्धीचे व शासनशुद्धीचे प्रयत्न जागरूक राहून सतत करावे लागतात. सत्ता कित्येक वेळा पिळवणुकीसाठी वापरली जाते व सत्तेच्या जोरावर अन्याय देखील घडवून आणले जातात. पक्षशुद्धी, संप्रदायशुद्धी व सत्ताशुद्धी आणि कोणत्याही संस्थेतील अशी शुद्धीकरणे यांची वारंवार जरूर पडते. सत्यदेखील शुद्ध करून तपासून, पारखून घ्यावे लागते. कारण या द्वंद्वप्रधान आणि व्यंगपुराणात्मक जगात सत्यावर असत्याचे आणि अज्ञानाचे पटल आवरण येत असते. म्हणून शुद्ध मते तपासावी लागतात. मक्तेदारी व लोकशाही (खरी) एकत्र नांदू शकणार नाहीत. मक्तेदारी-बुवाशाही गाजविणारे समाजकंटक सर्व जातीधर्मात, सर्व देशांतून आढळतात. लोकशाहीत कोठेही सत्तेचे अभिसरण चालू असले पाहिजे. लोकसेवा-देशाची सेवा करण्यासाठी-सर्वांना वाव आहे; असला पाहिजे, पण कोणाही सत्ता-संपत्ती केंद्रात, कोणाही व्यक्तीची दीर्घकाल हुकमी मक्तेदारी निर्माण होणे लोकशाही हिताचे नाही. पिळवणूक थांबवावयाची झाल्यास अन्यायमूलक व स्वार्थी मक्तेदारी घालवावी लागते. यासाठीच लोकशाहीत ठराविक मुदतीनंतर अटळपणे निवडणुका घ्याव्या लागतात.

अनुक्रमणिका

## ९.

# वेताळ पूर्वस्थळावर!

जगातील सर्वच थोर थोर पुरुषांना यशापयश असते. कोणीच महान पुरुष पूर्ण नसतो. मनुष्यच सात असतो. फुले याच्यासंबंधी समकालीन वृत्तपत्रांतून फारच थोडी माहिती उपलब्ध झाली आहे. 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'च्या रिपोर्टस्वरून मुलींच्या शाळेची बरीच माहिती धनंजय कीर वगैरेसारख्या परिश्रमी चरित्रकारांना मिळू शकली. 'पुणे वर्णन' (कै. ना. वि. जोशीकृत) या पुस्तकातूनही मुलींच्या शाळेची हकीकत बरीच मिळते. पण तत्पूर्वी १८४८ साली जोतीरावांनी मराठे लोकांसाठी शाळा काढली होती, असे उल्लेख मिळतात. पण ही शाळा पुढे किती दिवस चालली? वगैरे माहिती कोणासच मिळालेली दिसली नाही. अति शूद्रांच्या व मुलींच्या शाळा १८५७ च्या बंडाच्या आधी होत्या. पण बंडानंतर बंद पडल्या. वगैरे माहिती जोतीराव यांच्या 'गुलामगिरी' पुस्तकातून मिळते. त्यांचे १८७३ पर्यंतचे आत्मचरित्रपर उल्लेख 'गुलामगिरी'त आहेत व मुलींच्या शाळांशी असलेला संबंध त्यांनी का सोडला हेही त्यांनी लिहिले आहे. ग्रंथातील व समाजातील विषमतेचा प्रत्यक्ष स्वानुभव यातून त्यांना स्वतःला जाग येत चालली व मग ते इतरांना जागे करू लागले.

१८५७ च्या उठावापूर्वीच्या स्त्रीशूद्रातिशूद्रांसाठी शाळा चालविण्याच्या प्रयत्नामुळे जोतीरावाना पुण्यात प्रसिद्धी मिळाली. पण या सर्व शाळा पुणे म्युनिसिपाल्टी स्थापन झाल्यावर तिच्यामार्फत स्वतंत्र मुलामुलींच्या शाळा चालू झाल्यावर, जोतीराव व त्यांच्या सुधारक मित्रांनी काढलेल्या शाळांची स्वतंत्र गरज राहिली नाही. गरजेतून संस्था चालतात. जोतीरावांनी काढलेल्या शाळांना कार्यकारी मंडळ होते. कै. मोरो विठ्ठल वाळवेकर हे शेवटपर्यंत टिकलेले मित्र होते. अतिशूद्रांच्या शाळांचे चिटणीस होते. यांनी शाळा चालविताना आलेला सामाजिक विपरीत अनुभव अस्पृश्यांच्या शाळांच्या हकीकतीत नमूद केला आहे. वाळवेकर व जोतीबा यांच्या काळात मुलांना पाणी मिळणे देखील कठीण होते. असल्या अडचणी जाणूनच जोतीरावांनी अस्पृश्य मानलेल्या लोकांसाठी घराच्या पुढील विहीर खुली केली. त्यांच्या ठायी 'करूणा' हा मोठा गुण होता. १८५७ च्या पूर्वी वरील सर्व प्रयत्न आरंभिले होते, हे सर्व अपूर्व होते, हे खरे. मुलींची शाळा चालविण्यात ब्राह्मण समाजातील अनेक उदार गृहस्थांचे साह्य व सहभाग होता. पम जोतीराव व त्यांचे मित्र यांना या सर्व शाळांना संस्था स्वरूप देता आले नाही. हे यश म्हणता यावयाचे नाही. हे यशापयश परिस्थितीअनुकूलता, प्रतिकूलता यावर अवलंबून असते. काळही फार अवघड होता. १८५७ च्या उठावामुळे स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शाळात विक्षेप आला व युरोपियनांची मदत बंद झाली व जोतीराव आणि त्यांची पत्नी सावित्रीबाई यांना गोविंदराव फुले यांनी घरातून घालवूनही दिले व नाईलाजास्तव जोतीरावानी स्कॉटीश मिशनऱ्यांच्या बोर्डिंग स्कूलमध्ये नंतर नऊ वर्षे नोकरी केली. नात्र सरकारची कायमची नोकरी मिळण्यास सोपे असतानाही पुढेमागे त्यांनी ब्रिटीश राज्यात नोकरी मुळीच धरली नाही. पुढील यश त्यांना यामुळेच मिळाले. मुलींच्या शाळा चालविण्यात दाखविलेला त्याग, सेवा व तत्परता यामुळे फुले यांचा इंग्रज सरकारने सत्कार केला. शालजोडी दिली. पण यावेळी त्यांच्या मदतनीस शिक्षिका सावित्रीबाई या पत्नीचाही उल्लेख सत्कार समारंभात आढळतो का? फक्त जोतीरावांचाच मुख्यतः सत्कार केला. ब्राह्मणेतराला पूर्वी ब्राह्मणी राज्यात शालजोडी, पोषाख वगैरे देऊन सन्मान करण्याची चाल नव्हती, पण अव्वल इंग्रजीत जोतीबांनी हा मान मिळविला. हे एक परिवर्तनीय सामाजिक यश होते. पुनर्विवाहास चालना, केशवपन रूढीविरुद्ध प्रचार, विधवांकडून होणारी बालहत्त्या वगैरे प्रयत्न मुलामुलींच्या

अनुक्रमणिका

शाळांचे नगरपालिकांच्याकडे हस्तांतर झाल्यावर फुल्यांनी केले. जोतीराव धडपडे होते. म्हणूनच एकापाठीमागे एक एक उपक्रम त्यांनी हातात घेतले. बालहत्त्या प्रतिबंधकगृह-बालसंगोपन हे कार्य त्यांनी हातात घेऊन चालविले. पण फारच थोडी मुले जगली. शांताराम नामक एक मुलगा त्यांनी दत्तक घेतला होता. तो जगला नाही म्हणून यशवंत हा दुसरा मुलगा सांभाळून त्यास शिक्षण दिले. याला पुढे स्वतः दत्तक घेऊन इस्टेटीचाही वारस केला. असे करण्यात बरेच गैरसमज होणे शक्य झाले. पण ही एक कौटुंबिक क्रांती होती. ज्या माळी समाजात जोतीबा जन्मले होते त्यांनाही हे आवडले नाही. पत्नी सावित्रीबाई यांनी पाठिंबा दिला. यशवंतरावांनी व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी आजारपणात जोतीरावांची व पुढे सावित्रीबाई यांनी सेवा केली. भाऊबंद दुरावले. साह्यकारी मित्रांपैकी सर्वांनाच ही योजना पसंत पडली नाही. बालकाश्रमाचे संचालन बंद पडले तरी मर्यादित यश मिळाले. पुढे १८७७ सालात मोठा दुष्काळ पडला तेव्हा फिरून 'व्हिक्टोरिया बालकाश्रम' काढून अन्नवस्त्रास महाग झालेल्या बालकांना-मुलांना त्यांनी सांभाळले. समाज कल्याणपर कार्ये चालविणे हा एक जोतीरावांच्या जीवनाचा उद्देश होता. जोतीरावांचे बालकाश्रम पाहून पंढरपूरच्या प्रसिद्ध बालकाश्रमाचे संस्थापक लालशंकर उमियाशंकर यांनी बालकाश्रम काढून चालविला व अद्याप तो चालला आहे. प्रार्थना समाज लहानगा राहिला, तरी त्याच्या लोकसेवक संस्था चालू आहेत. आर्य समाजामार्फतही देशात शिक्षण, समाजकल्याण वगैरे क्षेत्रात कार्य चालू आहे. कलकत्त्याकडे ब्राह्मो समाजाच्या संस्था आहेत.

अस्पृश्यता निवारण हे जोतीबांचे प्रथमपासून एक मुख्य अंग होते. पण ह्या अतिशूद्रांची उन्नती करणारे शूद्रातून यावेत तसेच कार्यकर्ते पुढे आले नाहीत. कारण शूद्र (अब्राह्मण) फारच मागास होते. तरी शूद्रातिशूद्रांच्या-दोघांच्या-शिक्षणार्थ जोतीबांनी पहिले प्रयत्न केले. नंतर प्रार्थना समाजी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितोद्धाराचा प्रश्न अखिल भारतीय पातळीवरून सोडविण्यास घेतला. म्हणजे ज्या ज्या समाजसुधारणांची गरज होती, त्या त्या बाबतीत जोतीरावाना प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुसरणारे कार्यकर्ते, सुधारक, पुढारी पुढे आलेच. सर्वांत जास्ती, शिक्षणप्रसारक कर्मवीर एकाचढीत एक झाले.

उच्चभ्रूमधील विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न सोडविण्यास व स्त्रियांच्या शिक्षणार्थ प्रयत्न करणारे रानडे-आगरकर-कर्वे वगैरे पुढे झालेच. एक एका प्रश्नासंबंधी स्वतंत्र संस्था निघाल्या. समाजसुधारणांची सार्वजनिक गरज होती. हा प्रश्न मूठभर सुधारकापुरता वैयक्तिक मर्यादित नव्हता. रानड्याना पुन्हा विधवेशी लग्न करणे अशक्य झाले किंवा कित्येक सुधारक पुढाऱ्यांनी माघार घेऊन कच खाल्ली. कारण सामाजिक बहिष्कार टाकण्याची पद्धत होती. सनातन्यांची संख्या सर्व जातीधर्मात मोठी होती. समाजपरिवर्तनाला घरीदारी फारच अल्प पाठिंबा मिळे. जोतीराव बोले तैसा चाले ह्या वर्गातील होते हे खरे, पण त्यांनाही मर्यादा पडल्या. आगरकरानी संघटना बांधली नाही. जोतीबांनी सत्यशोधकांचा संघ बनविला. म्हणजे संघटित, सतत संस्थात्मक कार्य करणेस लायक माणसे येऊन मिळावी लागतात. कर्वे ज्या समाजातून पुढे आले त्यांना उच्चभ्रू समाजातून सेवातत्पर मंडळी मिळू शकली. त्यांची संस्था वर्धमान राहिली आहे. जोतीरावांना व पुढील कर्मवीर शिंदे यांना एकाचढीत एक मिशनरी वृत्तीची समर्पित मंडळी भेटली नाहीत. काही मित्रमंडळी भेटली पण बरीच या नाही त्या कारणामुळे दूरही झाली. भारत सेवक समाज या गोखल्यांच्या संस्थेस पुढे कार्यकर्ते मिळाले. तशा प्रकारचे संस्थात्मक अनुसरण फुले-शिंदे व पुढील डॉ. आंबेडकर यांच्याही बाबतीत झाले नाही. निष्ठावंतांची वाणच त्यांच्या देखत व मागेही पडली. विद्येत मागास व अतिमागासलेल्यांचे उपक्रम नियतकालिके, पुढारलेल्या वर्गाएवढे यशस्वी झाले नाहीत. हे आतमपरीक्षांती मान्य करावे लागते. दलितांसह इतर अब्राह्मण समाज

अद्याप पुढारलेला नाही, पुष्कळ क्षेत्रात मागास आहे, याची वस्तूस्थितीने जाणीव होऊन पुन्हा प्रबोधन व्हावे म्हणूनही हा विषय घेऊन येथे हाताळत आहोत. शाहूमहाराज-भाऊराव पाटील-पंजाबराव देशमुख-बाबुराव जगताप-बापूजी साळुंखे वगैरे कित्येक मोठमोठे प्राप्त झाले. पण तरीही सर्व कार्यभार उरकला नाही. पुढारलेल्यांच्याही प्रत्येक प्रभावी क्षेत्रात व जीवनाच्या अंगोपांगात जोतीरावांचा शूद्रातिशूद्र बहुलोकसमाज पुढारलेल्यांच्याही इतका पुढारला नाही, मग त्यांच्याहीपेक्षा त्यांच्यावर मात करून पुढे आलो नाही हे तर जास्ती खरे! अशी महत्त्वाकांक्षा व विधायक अस्मिता निर्माण झाली नाही हे मान्य केले पाहिजे. जोतीरावांना मर्यादित व थिटे यश हे कसे व का आले? ह्या प्रश्नाला कठोर आत्मपरीक्षणाने उत्तर देण्याची गरज आहे. जोतीरावांचे ठिकठिकाणी उभे राहिलेले पुतळे हे कार्य करणार नाहीत. केवळ जोतीरावांच्या दैवतीकरणामुळे सर्वच भाग उरकणार नाही. मनुष्यबळ मागेपुढे मिळाले होते हे खरे. पण हे सामर्थ्य एकजीव झाले नाही. जोतीरावांना त्यांच्या काळानुसार ज्या मर्यादा पडल्या, फंडस अपुरे पडले, ख्रिस्ती व परकीय इंग्रजांचे साह्या घेण्याशिवय प्रथम गती नव्हती व तेही त्याज्य समजून त्यांनी साह्य घेतले नसते, तरी प्रगती व हल्ली झाली आहे तेवढी शूद्रातिशूद्रांची उन्नती झाली नसती. शाहू महाराजानी टिळकांचीच राजकीय जहाल भूमिका व समाजसुधारणांच्या क्षेत्रात प्रतिगामी भूमिका त्यांच्याप्रमाणेच घेतली असती व टिळकानुयायी झाले असते, तर आजची सामाजिक, राजकीय प्रगती मुळीच झाली नसती. व्यवहार्य वास्तववादी भूमिका घेणे हे एक सत्यशोधक चळवळीचे वैशिष्ट्य होते. स्वराज्य-स्वातंत्र्य जे आले ते दुसऱ्या महायुद्धात इंग्रजी साम्राज्य कमकुवत झाले व त्यांनी वेगवेगळ्या अनेक अंकित देशातील त्यांची सत्ता त्यांनीच सर्वत्र सोडून दिली. हे सर्वांत मुख्य कारण झाले. स्वातंत्र्य आले तरी सामाजिक न्याय, आर्थिक समता प्राप्त होऊन भांडवलशाहीचा शेवट झाला नाही. कोणत्याच महापुरुषांना सर्व यश येत नाही. मग फुले यांच्यासारख्या नेत्याला त्यांच्यादेखत किंवा मागे अद्याप यश यावयाचे राहिले आहे, यात नवल नाही. म. गांधी वगैरे मागील पुढील संत बरेच पराभूत आहेत. स्वातंत्र्य आल्यावर इंग्रज असताना होते ते प्रश्न पूर्णपणे मिटले नाहीत. उलट त्या अपूर्ण राहिलेल्या प्रश्नात नव्या ज्वलन्त प्रश्नांची भूमितीश्रेणीने भर पडली व पडत आहे. आशा ही आहे की, मागील राममोहनपासून फुले-आंबेडकरांपर्यंत जे महत्त्वाचे समाजप्रबोधक होऊन गेले, त्यांच्याविषयी शाळा-कॉलेजात (अकॅडमिक) का होईना शिक्षणक्रमात स्थान मिळाले आहे. प्रत्यक्ष समाजात तरीही प्रबोधन दृश्य होत नाही. मग परिवर्तनाची बाजू (कृतीची) दूरच राहाते. खंडप्राय देश गजगतीने जातो. अविकसित सर्वच भारत आहे. गरिबी वाढत आहे. म. फुले यांना गरिबी नको होती.

**शोषित व शोषक**

म. फुले यांच्या विचार-आचारांना समजावून घेणे झाल्यास एकूण विषय वर्गीय परिभाषेत मांडल्यास शास्त्रीय व सैद्धांतिक अर्थबोध जास्ती समजू शकतो. शूद्रातिशूद्रांचे नेते व द्रष्टे यांनी त्यांची बाजू वास्तववादातून व जातीय वस्तुस्थितीने मांडली. भारतात असे करणे व होणे अटळ होते. शूद्रातिशूद्र समपातळीवर प्रायः होते. त्यांच्यावरील सामाजिक व धार्मिक गुलामगिरीचे स्वरूप सर्वसाधारणतः सारखेच होते. ज्या धार्मिक (मनुस्मृती इ. इ.) ग्रंथांचा गुलामगिरीला पाठिंबा होता ते ग्रंथ एकाच हिंदू ब्राह्मणी धर्माचे समान दोघांनाही होते. नुकतेच आलेले इंग्रजी अव्वल राज्य व त्याची पिळवणूक बरीच प्राथमिक अवस्थेत होती. म्हणून लोकहितवादी/फुल्यांना ती फारशी जाणवली नाही. इंग्रजी सत्तेच्या पूर्वीचा यादवीचा व आपापसातील कलहाचा काळ मागे पडला होता. शांतता आली होती. इंग्रजांनी आपल्याला जिंकले याचे भान जोतीरावांना

अनुक्रमणिका

होते व त्याची कारणे देखील त्यांच्या परीने त्यांनी दिली होती. टिळक-चिपळूणकर-वासुदेव बळवंत फडके यांच्यापुडे फक्त पेशवाई गेल्यामुळे राजकीय स्वातंत्र्य-स्वराज्य पुन्हा मिळविणे एवढाच प्रश्न होता. सुधारकांच्या पुढे उच्चभ्रू मध्यमवर्गाला लागणाऱ्या कौटुंबिक सुधारणा कशा होतील, हा प्रश्न होता व हे त्यांच्यातील सनातनी असलेल्या मंडळीशी भांडत होते. सनातन्यांची बाजू घेऊन लोकमान्य टिळक व तत्सम समाजसुधारणावाद रोखीत होते.

जनतेचे (शेतकरी-मजूर व एकूण श्रमिक यांचे) दारिद्र्य व निरक्षरता मोठी होती. त्यांना उच्चभ्रूंकडून शूद्र-हलके-समजण्यात येईल. सरकार लोकल फंड शेतकऱ्यांकडून शिक्षणार्थ वसूल करी पण, या फंडातून शहरी उच्चभ्रू लोकांचे उच्च शिक्षण चालू होते. नगरपालिका, सार्वजनिक सभा, राष्ट्रीय सभा व एकूण नोकरशाही यामध्ये ब्राह्मणाशिवाय फारसे इतर कोणीच नव्हते. अंग्लाईत पेशवाई होती. गोरे नोकर देखील लोकांना पिळीत व ते येथील ब्राह्मणी नोकरशाहीच्या कलाने वागत. काळी-गोरी नोकरशाही शेतकऱ्यांकडून लाच घेऊन, धार्मिक बाबतीत धर्मशास्त्राधाराचा आधार घेऊन, गरीब शेतकऱ्यांची पिळवणूक चालू होती. वरचेवर पडणारे दुष्काळ, सतत होणारी रोगराई यामुळे शेतकरी अन्न-वस्त्रास महाग झाला होता. ग्रामजोशी व गाव कुलकर्णी हे देखील शोषण करीत. वगैरे वगैरे दुःस्थितीतून शिक्षण प्रसाराच्याद्वारे व त्यांचे वास्तविक मानवी अधिकार समजावून देऊन त्यांच्यात स्वावलंबन, स्वाभिमान निर्माण करण्यासाठी जोतीराव व त्यांच्या सुज्ञ मित्रांनी सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ साली केली. धर्ममार्तंडांची जी सामाजिक-धार्मिक गुलामगिरी होती, ती धार्मिक ग्रंथांवर-श्रुती-स्मृतींच्यावर-आधारित होती. शास्त्राधारे परिवर्तन रोखण्याचा सनातन्यांचा मोठा प्रयत्न होता. उदा., क्षत्रियांचे अस्तित्व कलियुगात नाही, असे शास्त्रवचन पुढे करून क्षत्रियांच्या वर्णाचा लोप झाला, असे प्रतिपादिले जाई व मग शिवाजी छत्रपती, शेवटचे प्रतापसिंह भोसले यांचे वेदोक्त हक्क ग्रंथवचनांच्याद्वारे डावलले जात. हा मोठा संघर्ष झाला. संस्कृत व इतर विद्या स्त्रिशूद्रातिशूद्रांना नाकारल्या जात. अव्वल इंग्रजीतही पुणे संस्कृत कॉलेजात अब्राह्मणांना प्रतिबंध होता. मग अतिशूद्रांची अवस्था जास्ती अंधारी (Dark) होती; ह्यात नवल नाही.

खुद्द सत्यशोधक समाज मंडळ जे होते त्यात फुले व त्यांचे मित्र माळी-साळी-कोळी-धनगर-सोनार-कुंभार वगैरेंनी पुढाकार घेतला होता. मराठा तत्समच पुढारी जास्ती प्रथमच होते. भालेकर-लोखंडे हे दोन माळी फार महत्त्वाचे झाले. त्यांनी जागृतीचा बगीचा फुलविला. मतभेद फुले-लोखंडे-भालेकर-घोले यांच्या दरम्यान झाले जोतीरावांना कार्यकर्ते येऊन मिळाले तसे वेगळेही झाले. पण चळवळीची गरज होती म्हणून मतभेद दुय्यम ठरले. शाहू महाराजांच्या काळात मराठा मंडळी व सुशिक्षित पुढारी-जाधव, लठ्ठे, डोंगरे, कदम, बागल वगैरे येऊन मिळाले. त्यांनी समाज जागृत केला, हे खरे. पण जोतीरावांच्या काळात साधीसुधी माणसे कार्यकर्ती फार होती. जेथे जवळकरानंतर शाहूच्या पश्चात ही चळवळ संपली. एकपरी प्रोत्साहन देणारा इंग्रज गेला! साम्राज्यशाहीचा नाश होऊन स्वातंत्र्य आले आहे.

**आज महात्मा फुले असते तर!**

म. फुले यांचे निर्वाण होऊन १९९० साली म्हणजे आणखी चार वर्षांनी शंभर वर्षे पूर्ण होतील. महाराष्ट्रात तरी त्यांची शतसांवत्सरिक पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी होईल. दिल्लीचे मध्यवर्ती केंद्र हा महोत्सव हाती घेईल काय?

आज महात्मा फुले एका शतकानंतर प्रत्यक्ष येणार नाहीत. पण ते जर असते/आले समजा तर पुष्कळ बाबतीत त्यांना विसंगती आढळून येईल.
१. सारा समाज (स्त्री-पुरुषांचा सर्व) साक्षर व्हावा, प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे व्हावे, ही मागणी त्यांनी जन्मभर प्राणपणाने केली. पण स्वातंत्र्य येऊन ३०-४० वर्षे होत आली तरी महाराष्ट्रात फक्त ३९ टक्के लोक साक्षर आहेत; यामध्ये स्त्रियांचे प्रमाण अर्थात मोठे असणार. सक्तीचे शिक्षण झाले नाही.
२. ब्राह्मण शिक्षक अब्राह्मण विद्यार्थ्यांना तुच्छ समजून त्यांना मुक्त मनाने शिक्षण देत नाहीत, हा अनुभव त्यांच्या काळातील होता. आज कोणी कोणाला शाळेत (व बाहेरही) उच्चनीच मानित नाहीत व अब्राह्मण शिक्षक, प्राध्यापक व प्राचार्य यांचे प्रमाण आज खूप आहे, तरी अब्राह्मण शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शिकविताना करावे एवढे श्रम करीत नाहीत. म्हणून ग्रामीण भागातील निकाल सर्वसाधारणतः उच्च नसतात. गुणवत्तेत ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांएवढे चमकत नाहीत. जोतीबाना जीवनाच्या हरएक बाबतीत ब्राह्मण कमी होऊन, त्यांच्या जागा अब्राह्मणांनी व दलितांनी घेतल्या आहेत, असे स्वप्न प्रत्यक्षात यावे, असे वाटत होते. उदा., ब्राह्मण वतनी व वंशपरंपरागत कुलकर्णी गेले. पुढे नानाविध जातींचे ब्राह्मणेतर तलाठी आले, आता ग्रामसेवक तर शेतकऱ्यांतील आहेत. पण हेही शेतकऱ्यांकडून लाच घेतात, आपले उखळ पांढरे करीतात!
३. सावसावकारकी, इनामदारकी वगैरे तत्सम बाबी फुल्यांच्या काळाप्रमाणे आज नाहीत. सहकारी सोसायट्या निघाल्या आहेत, यामधून भ्रष्टाचार मोठा आहे. हरएक क्षेत्रात म. फुल्यांच्या काळाएवढे ब्राह्मणी महत्त्व राहिले नाही, हे खरे. पण ब्राह्मणेतर अधिकारी व नोकरशाही सर्वांचीच पिळवणूक करते. दलित अधिकारी दलितांकडूनही लाच घेण्यास कमी करीत नाही. Old order change the yielding place to new one. पिळवणुकीचे स्वरूप बदलले व पिळवणुकदार फक्त ब्राह्मण राहिले नाहीत. हा अनुभव सर्व क्षेत्रांत येतो. पिळवणुकदारांची जात पालटली असेल; पण स्वकीय ग्रामीण भागातून निवडून गेलेले प्रतिनिधी शेतकऱ्यांचे हितास जागत नाहीत. हरित क्रांती झाली आहे. शेतीस यंत्रे जास्ती वापरली जातात. पण विज्ञानात्मक दृष्टिकोण तयार झाला नाही. शेतकरी वगैरे तत्सम अंधश्रद्धा आहेत, स्त्रिया जास्ती भोळ्या राहिल्या आहेत. जोतीबा आले तर त्यांना वरील सर्व बाबतीत दुःखच होईल व कष्टी होतील. मुलामुलींना शाळेत पाठवा हा जोतीराव व त्यांच्या शिष्यांचा फार मोठा कटाक्ष होता. आता असा उपदेश करावा लागत नाही म्हणून त्यांना आनंद वाटेल हे खासपणे म्हणता येईल.

**ब्राह्मणांची जागृती**

सत्यशोधक समाजामुळे ब्राह्मणेतर जाती-जमाती जागृत होऊ लागल्या, तसे ब्राह्मणही जागे झाले व विधी संस्कार व गृहकर्मे करण्यास बोलाविल्याशिवाय ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांच्या घरी जाऊ नये, असे ठराव ब्राह्मण परिषदांच्या सभेत झालेले आढळतात. ब्राह्मण परिषदांची अधिवेशने भरू लागली, अद्याप होतात. यांच्यातील

अनुक्रमणिका

निर्णय पाहिल्यास सत्यशोधक चळवळीचा परिणाम व्यक्त होतो. 'ब्राह्मण समाज जागा होऊन आत्मपरीक्षण करू लागला व तोही आमच्या चळवळीमुळे पुढे गेला.' असा स्वानुभाव कर्मवीर भाऊराव पाटील यांनी, माझे वडील व मी आणि स्वतः कर्मवीर भाऊराव पाटील खाजगी चर्चा करीत असताना स्वतः त्यांनी व्यक्त केला. भाऊरावांचा समाजानुभव व शिक्षणानुभव फार मोठा होता. सत्यशोधक चळवळीस जोतीरावांच्या काळापेक्षा त्यांच्या पश्चात् ब्राह्मणविरोध वाढू लागला.

**ब्राह्मणेतर प्रतिनिधित्व**

महाराष्ट्रात ब्राह्मणेतर (व दलितही) प्रतिनिधी त्यांच्या संख्येच्या प्रमाणात निवडून यावयाचे झाल्यास ब्राह्मणांचे प्रस्थ-महत्त्व-नाहीसे झाले पाहिजे. हा विचार-आचार बळावला. या स्वरूपाच्या घणाघाती प्रचारामुळे ब्राह्मणेतर समाज ब्राह्मणाच्या प्रातिनिधिक संस्थांवर निवडणुकांमधून मते देईनासा झाला. ही राजकीय अस्मिता व स्वाभिमान ब्राह्मणेतर चळवळ म. गांधी यांच्या काळापासून काँग्रेसमध्ये स्वातंत्र्य लढ्यात प्रवेशित झाली. तरीही काँग्रेसचे ब्राह्मणेतरीकरण होऊन, ब्राह्मणेतर प्रतिनिधी अधिकाधिक निवडून जाऊ लागले. हा प्रचार कै. यशवंतराव चव्हाणांना महाराष्ट्र काँग्रेस काबीज करण्याच्या कामी देखील उपयोगी झाला. खेर मंत्रिमंडळाच्या काळात ब्राह्मणेतर समाज दुखावला गेला. यशवंतरावानी शे. का. प. मधील पुढारी काँग्रेसमध्ये पुन्हा घेऊन ग्रामीण नेतृत्वाच्या अमलाखाली सारा महाराष्ट्र आणिला. ब्राह्मणावर धर्मविधीत व निडणुकीतून प्रतिनिधी निवडताना व सर्वच जीवनात बहिष्कार टाकावा, असा विचार प्रत्यक्षाप्रत्यक्ष मांडला होता. राजकीय बाबतीत, सहकारी चळवळीत वगैरे अनेक राजकीय क्षेत्रात यशस्वी झालेला आहे. शाहू महाराजांच्या प्रयत्नानंतर व आता स्वातंत्र्य चळवळीनंतर व स्वातंत्र्यात ब्राह्मणेतर प्रतिनिधी जास्तीत जास्तपणे काँग्रेसमार्फत देखील निवडून येतात, असा अनुभव सूर्यप्रकाशासारखा स्वच्छ दिसतो. राखीव जागांची व नॉमिनेशन पद्धतीची पूर्वीची जरूर लागत नाही. म. फुले-शाहू यांचे हे यश आहे. त्यांना श्रेय द्यावेच लागते. प्रत्यक्ष चळवळ दिसत नाही. कारणे जशी होती तशीच ती राहिली नाहीत. निदान मराठा समाजात राखीव जागा व सवलती आता दलितांच्या प्रमाणे जरूरीच्या वाटत नाहीत.

जोतीबांनी सक्तीच्या शिक्षणासाठी आकाशपाताळ एक केले. पुढेही ही सक्ती शिक्षणाची चळवळ व मागणी चालू राहिली. इंग्रज सरकार आहे तोपर्यंत उठाउठी करून सामाजिक समतेसाठी ब्राह्मणतेरांनी (व दलितांनी देखील) इंग्रजी राज्याचा फायदा घ्यावा. ही म. फुले (व शाहू) यांची दृष्टी-विचार आचारसरणी-होती. फुले यांचा (डॉ. आंबेडकर यांचा देखील) दारू व व्यसनी पदार्थांना विरोध होता. गरीबी असली तरी गरीबात दारूचे व्यसन वाढलेले आढळते. यामुळे गरीब जास्ती गरीब होतात. श्रीमंत पुन्हा गरीब होतात व धुळीचे दिवे होता.

**दारूबंदीची चळवळ व 'सत्यशोधक नियमावली'**

मूळ सत्यशोधक समाजाने त्याचे नियम छापले होते. घटना केली होती. सत्यशोधक समाजाच्या मूळ नियमात दारूबंदी व प्रत्येक सभासदाने दारू वगैरे अमली पदार्थांचे व्यसन सोडावे. स्वतः हिंसा करू नये. एका ईश्वराशिवाय दुसऱ्यास ईश्वराएवढा मान देऊ नये. समाजात जे दुर्बल असतील असे असमर्थ त्यांना साह्य करावे, अशी रचनात्मक दृष्टी होती. पण हे सर्व नियम पाळणारे अनुस्थानिक सभासद व अनुयायी यांनी संपन्न

अनुक्रमणिका

असे कार्यकारी मंडळ १८७६ नंतर प्राप्त झाले नाही व पुढे अहवाल वगैरे निघालेले फारच कमी सापडतात. निष्कर्ष काढता येतो की, सत्यशोधक समाज (खुद्द म. फुले यांनी स्थापलेला संस्थास्वरूप झाला नाही. मात्र त्यांची चळवळ होत गेली.) वेगवेगळे आविष्कार झाले. त्यात संगती व विसंगती देखील दिसून येते.

लो. टिळकांच्याही पूर्वी जोतीरावांनी दारूबंदीवर भर दिला होता. आज दारूचे व्यसन फार फैलावत आहे. म्हणून हा अपयशाचा मुद्दा म्हणावा लागतो.

**जोतीरावांचे यश**

रायगडावरील शिवसमाधीचा जीर्णोद्धार ह्या कामी लो. टिळकांच्याही पूर्वी जोतीबांचे व 'दीनबंधू' पत्राचे लक्ष गेले होते. हे कार्य पुरे करण्यासाठी पुढे टिळकांनी प्रयत्न केले व आता रायगडावर नवे विश्व निर्माण झाले आहे. शिवरायांच्या बद्दल आस्था हा एक मुद्दा ब्राह्मणेतर चळवळीतही होता.

समाजात वक्ते तयार व्हावेत, तरुणांना निबंध लिहिता यावेत, समाजाचे मुखपत्र असावे, विद्यार्थ्यांना विद्यावेतने द्यावीत, शेतकी सुधारणेचा प्रयत्न करावा वगैरे कार्यक्रम आद्यसत्यशोधकांनी हाती घेतले होते. त्यांचा पुरस्कार व वृद्धी जोतीरावांच्या देखत झाली व पुढे राजर्षी शाहू, सयाजीराव वगैरे संस्थानिकांच्या साहाय्याने हा विकास वर्धमान झाला. शहरात शिकावयास येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, राहाण्या जेवण्याची सोय असली पाहिजे. हा उपक्रम पुढे कित्येक व्यक्तींनी हातात घेतला पण खुद्द मूळ सत्यशोधक समाज या संस्थमार्फत हे नवे आधुनिक उपक्रम वाढले नाहीत. मराठा-माळी वगैरे जातीनी आपआपल्या जातीस शिक्षणप्रसारक संस्था काढल्या. विभागून जातीवारीने विद्यवृद्धीचे प्रयत्न झाले. जातीजातींची बोर्डिंगे निघाली. सत्यशोधक समाजाचा मूळ हेतू 'जातीभेद दूर ठेवणे' हा होता. पण मूळ दृष्टीकोणाला यश न येता, जातीभेद प्रत्यक्ष जीवनात बळकट असल्याने विद्यावृद्धीचे प्रयत्न पुढे मराठा शिक्षण परिषदा, माळी परिषदा वगैरे जातीजातींच्या परिषदांनी करण्यात बरेच यश मिळविले. हा उलटा आविष्कार होय. ब्राह्मण-सारस्वत वगैरे जातींनी देखील आपआपल्या जातींच्या शिक्षणप्रसारक संस्था महाराष्ट्रात काढल्या. ब्राह्मण समाजास सत्यशोधक चळवळीचा विरोध होऊ लागला व ब्राह्मण समाजही यामुळे जागृत झाला व त्यांनी मुंबईस 'ब्राह्मण सभा' चालू केली. ही संस्था अद्याप आहे. लोकहितवादींच्या स्वसमाजाला जागृत करणाऱ्या 'शतपत्रा'मुळे जी ब्राह्मणात जागृती झाली नाही, तेवढी सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे जे आघात होऊ लागले, त्यामुळे होऊ लागली. हे यश आहे. ब्राह्मणी पत्रांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याकडे प्रथम दुर्लक्ष केले, उपेक्षा केली, पण पुढे त्यांना विरोधी भूमिका घेऊन का होईना उल्लेख करावे लागले. प्रतिक्रिया करावी लागली. यामुळेच चळवळ व सत्यशोधक समाज ज्ञात होऊ लागला. ब्राह्मणांच्या विरोधाला तशी खास कारणे होती. लो. टिळकांचा विरोध, ब्राह्मणेतरांच्या सभेत हमखास पहिला 'राजनिष्ठेचा ठराव' होई म्हणूनही होता.

**इंग्रज सरकारच्या निष्ठेचा स्वीकार व त्याग**

प्रथमची इंग्रजी परकीय सत्तेबद्दलची समजूत सामाजिक हिताची होती. पुढे धूर्त आणि 'फोडा' व 'झोडा' ही नीती चालविणाऱ्या इंग्रज सरकारने ह्या राजनिष्ठ धोरणाचा काही काळ फायदा घेतला व स्वराज्यविषयक

अनुक्रमणिका

जहाल चळवळींना रोखणासाठी उपयोग करून घेतला, हे खरे, पण टिळकांनंतरच्या गांधीकाळात ब्राह्मणेतर समाजात राष्ट्रीय जागृती विलक्षण झाली व हा बहुजनसमाज काँग्रेसमध्ये गेला. त्यामुळे पुढे इंग्रजांची निराशा झाली. जोतीबांच्या काळात कित्येक धूर्त मिशनरी सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीकडे व खुद्द म. फुले यांच्याकडे आशाळभूत वृत्तीने म्हणजे ख्रिस्ती स्वार्थाने पाहात होते, पण म. फुले व त्यांची चळवळ ही हिंदूधर्म सुधारण्यासाठीच सुरू झाल्याने मिशनऱ्यांच्या आशा व्यर्थ ठरल्या. टीकाकारांनी व समीक्षावाद्यांनी दोन्ही पक्ष बाजू लक्षात घ्याव्यात व पुढील परिणाम पाहावा म्हणजे त्यांचीच विधाने न्यायशील ठरतील. आता पाश्चात्यांचा अनुनय व इंग्रजनिष्ठा, जहाल-मवाळ भेद वगैरे स्वातंत्र्यपूर्वकाळातील प्रश्न संपले. पुढे काय?

**सक्तीचे शिक्षण**

इंग्रजांनी अपुऱ्या उत्पन्नाची सबब पुढे करून सक्तीचे प्राथमिक शिक्षण प्रत्यक्षात आणले नाही. उलट निराशा केली. अद्याप स्वातंत्र्यात सक्तीचे प्राथमिक गरजेपुरते तरी (Three Rs.चे) मिळत नाही. स्वातंत्र्यानेही फुल्यांची निराशा केली. ब्राह्मणेतर (व दलितांचेही) प्रतिनिधित्व सरकारात असूनही सक्तीचे शिक्षण व दारूबंदी वगैरे उपक्रम कार्यवाहीत आले नाहीत. हे प्रतिनिधी त्यांचा स्वतःचा व फार तर गोतावळ्याचा स्वार्थ पाहातात. सामाजिक सुधारणांना त्यांचा विरोध नाही, पण सक्रीय पाठिंबाही नाही. प्राथमिक शिक्षणाची खेड्यापाड्यांतील अवस्था पाहता समाधानकारक आहे असे ठरविणे कठीण होईल. जिल्हा परिषदा बहुजन समाजाच्या ताब्यात असूनही प्राथमिक शिक्षणाची अवस्था ठीक नाही. यात दुसऱ्या कोणाचा दोष नाही.

**म. फुल्यांचा एकेश्वरवादी मानवतावाद**

सर्व माणसे एका परमेश्वराची लेकरे आहेत तर त्यांना समान संधी, समान हक्क, समान नागरी कायदा व सम-धर्म (विषमतारहित) असा सिद्धांत मांडला. पूर्वीच्या धर्मसुधारकांनी व संतांनी फक्त परमार्थात, मोक्षमार्गात व भक्तीमार्गात समानता व समान संधी मागितली व त्यासाठी नेमस्त का होईना संघर्ष केला होता. जोतीरावांनी हा संघर्ष जहालपणे इहवादी (सेक्युलर) स्वरूपात व्यक्त केला. यासाठी विभूतीपूजा-ग्रंथप्रामाण्य-अवतारवाद-मूर्तिपूजा त्याज्य ठरविली व बुद्धिवादाचा आणि मानवी समतेचा मार्ग खुला केला. परंतु, ज्या बाबी, ज्या धर्मसमजुती जोतिबानी बहुजनांच्या उद्धारार्थ अस्वीकारार्ह ठरवून त्यावर घणाघात घातले त्या आता स्वातंत्र्यात (व मागे देखील) बहुजन समाजास हव्या आहेत. जे ब्राह्मण म. फुले यांना कटाक्षाने नको होते, ते आता ब्राह्मणेतरानाच हवे आहे! बुवाबाजी, बाबाबाजी (धर्मकारणात व राजकारणातही) वाढत आहे. खेडेगावातून देवऋषी ह्या ब्राह्मणेतर दलालांचे प्रस्थ माजत आहे. सत्यशोधक प्रबोधन गिळून टाकीत आहे. प्रबोधन मागेच मावळले. परिवर्तनाला मुळच्या पुनरुज्जीवन प्रवृत्त्या, रुढींची बळकटी, परंपरावाद रोखीत आहेत. वाडवडिलांची चाकोरी सोडण्याचे धैर्य जनतेत नाही. म्हणून 'वेताळ' पूर्वस्थळावर आला आहे. जैसे थे होत आहे. वारकरी भागवतधर्मांचा लोकांवर जास्ती पगडा आहे.

अनुक्रमणिका

**पुरोगामी विचारांची पिछेहाट**

घरात एखादा दुसरा पुरोगामी असला तर कुटुंबातील सनातनी स्त्रियांपुढे त्यांचे चालत नाही. सनातन्यांची संख्या ब्राह्मणेतरांत मोठी आहे. बहुसंख्य ब्राह्मणेतरांना ब्राह्मणीधर्म-आचार विचार पाहिजे आहेत. म्हणून थोडेसे असलेले पुरोगामी पराभवीत झाले. गणपती उत्सवात आता ब्राह्मणेतर जनताच पुढे असते. अमाप खर्च होतो. शिवाय जगाचार, वाऱ्या वगैरे मध्ययुगीन पुन्हा जारी होत आहे, वाढते आहे. वाढते शिक्षण हे सर्व रोखू शकत नाही. आधुनिकता वाढत आहे. आधुनिकतेला धर्माशिवाय इतर क्षेत्रात लोकांचा विरोध नाही. पोषाख, फर्निचर, यंत्रांचा उपयोग वगैरे सर्व लोकांनी घेतले. इंग्रज गेला तरी इंग्रजी सर्वांना हवीच आहे. धर्माच्या बाबतीत जातीभेद व स्त्रियांचे हक्क वा समता वर क्षेत्रात जोतीराव व मागील सर्व धर्मसुधारकांनी जो प्रयत्न केला त्याचा अर्थ पालथ्या घागरीवर पाणी पडल्यासारखा होऊन पुच्छप्रगती घडत आहे. स्त्रिया व दुर्बल घटकांवर अन्याय वाढत आहेत. सर्वच राजा राममोहनराय पासूनची एकेश्वरवादी उदार धर्मविषयक चळवळ आता पराभूत झाली. हिंदूसभावाले-हिंदू एकतावाले-R. S. S. यांना कसलेच परिवर्तन नको आहे. फक्त त्यांचा लढा आहे तो ख्रिस्त्यांशी व मुसलमानांशी! बाकी हिंदुत्ववादी व हिंदूराष्ट्रवादी यांना चारी वर्णव्यवस्था-मूर्तिपूजा/जातीव्यवस्था-हवी आहेच. भारतीय जनता पक्षाच्याद्वारे ब्राह्मणरक्षक राज्य पुन्हा व्हावे, लोकांनी गोब्राह्मणप्रतिपालक पुन्हा व्हावे असा प्रयत्न आहे. ब्राह्मणेतरांतील बहुसंख्य सनातनी असल्यामुळे हिंदुत्ववाद त्यांना आकर्षक वाटतो व म. फुल्यांनी म्हटल्याप्रमाणे हिंदू-मुस्लिम दंग्यात ब्राह्मणेतरच मारले जातात. बुद्धिजीवी धूर्त सहीसलामत राहतात. ब्राह्मण समाजाचे काळानुसार परिवर्तन लवकर होते व हा बुद्धिवंत समाज त्याच्या हितार्थ आतून जागृत असतो.

अनुक्रमणिका

१०.

# ‘मराठा’ हृदयाचे विशालत्व

माणूस व धर्म यांचा परस्परसंबंध, मनुष्यजातीच्या सुरुवातीपासूनचा आहे. हल्ली देखील धर्माचा पगडा सर्वसामान्य माणसावर, कमीजास्त स्वरूपात असतोच. रशियन जीवनातही हा परिणाम विद्यमान आहेच. धर्म धारण करतो. धर्म म्हणजे कर्तव्य. धर्म म्हणजे आत्मा व परमात्मा यांच्या ऐक्याचे मंदीर दाखविणारी वाट; असे परमोच्च धर्माचे स्वरूप असू शकते. पण धर्म म्हणजे ठराविक आचारकांड, विधी, सकामयज्ञादी कर्मकांडे, पौराणिक विभूतींच्या मूर्तीपूजा इत्यादी प्रत्यक्षात व्याख्या होतात. पुरोहितशाहीच्या, ऐहिक जीवनाचा; आचारप्रधान धर्म हा एक मार्ग बनतो. पुरोहित नाना जातीचे व सर्व धर्मांचे असतात. म्हणून हा विशिष्ट जातीतून बोधक शब्द आहे. बुवा व बुवाबाजी करणारे सर्व जातीजमातीतून आढळतात. तसा हा मानसिक सामाजिक-धार्मिक रोग असून तो जागतिक आहे. म्हणूनच मुख्यतः कार्ल मार्कस् आदिकरून बुद्धिवंतांनी, त्यास ‘अफू’ म्हटले. या अफूचा अंमल दूर व्हावा, म्हणून गौतमादी पुरुष राजर्षी व धर्मसुधारक झाले; महावीर झाले. त्यांच्याच थोर परंपरेतले आपले श्री. शाहूमहाराज त्यांचे पुण्यस्मरण श्वासोच्छवासाइतके महत्त्वाचे आहे, कर्तव्याचे आहे.

### विद्याप्रसार

म. जोतिरावांनी सर्वसामान्य समाजाचे निरीक्षण केले. पाहणी केली. संशोधन चालविले. त्यांचा विचारचक्षू फार तीव्र व प्रखर होता. संपूर्ण बुवाबाजी भस्मसात करण्याचे सामर्थ्य जोतिरावांच्या विचारात आहे. पण सर्वच कार्याचा सारा भार एकच थोर असामान्य व्यक्ती उचलू शकत नाही. महात्मा जोतिराव यांच्या देहावसानंतर कर्मवीर लोखंडे-भालेकर, महामुनी वगैरेंनी, ती ज्योत जिवंत ठेवली. या ज्योतीला प्रत्यक्ष राजर्षी शाहूमहाराज प्राप्त होताच साऱ्या दख्खनेत ती प्रखरपणे प्रज्वलित झाली. म. फुले यांनी सामाजिक रोगाचे निदान अचूक केले. त्यांची नाडीपरीक्षा चुकली नाही. बहुजनसमाजात विद्येचा अभाव आहे; निरक्षरता आहे हे त्यांनी जाणले; व राजकीय स्वातंत्र्यापेक्षा त्यांना विद्याप्रसार प्रथमतः महत्त्वाचा वाटला व तो झाल्यावर स्वातंत्र्य येते व टिकते. सत्यशोधक समाजाचे स्वरूप विद्याप्रसारक होते.

### सर्वांगीण प्रगती हे मुख्य ध्येय

श्री. शाहूमहाराजांचे पाठबळ सुरू होताच, सत्यशोधक समाजाची शक्ती व्यापकपणे अमर्याद झाली. प. वा. भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, मुकुंदराव पाटील, जेधे-जवळकर-मोरे वगैरे असंख्य लहानमोठ्या कर्मवीरांना शाहूसूर्याने प्रकाश दिला. असंख्य कार्यकर्ते झिजले. पायात व जागृतिरूपी मंदिराच्या खाली सुप्त लौकिकाने आहेत. ‘शाहूप्रभा’ सत्यशोधक समाजाच्या इतिहासात अलौकिक, असामान्य व अमूल्य ठरली. म. जोतिराव महाभाग्यवान ठरले. कारण त्यांना अत्यंत पोलादी असा मागून शिष्य प्राप्त झाला. सत्यशोधक समाजाच्या धार्मिक मतासंबंधी मतमतांतरे असतील, होतील; पण विद्याप्रसार, विद्याजागृती, शैक्षणिक नवी

लालसा निर्माण करणे व त्याद्वारे सर्वांगीण प्रगती साधणे, हा जो सत्यशोधक समाजाचा प्राणभूत भाग त्यासंबंधी दोन मते व भिन्न पक्ष होण्याचे कारण नव्हते व नाही.

**लोकगंगेत पावन झालेला महापुरुष**

विद्याप्रसाराच्या कामगिरीत शाहूमहाराजांचे नाव सुवर्णअक्षराने लिहावे लागते. शाहूमहाराज म्हणजे जनतेचे हृदय. डॉ. आंबेडकरांदी अनेक कर्मवीरांना त्यांचा वरदहस्त प्राप्त झाला. वास्तविक पाहता त्यांचे संस्थानिक जीवन हे लोककार्यांत विलीन झाले होते. म्हणून जनतेच्या सामान्य जीवनाचे ते पुरस्कर्ते होते. लोकनायक, लोकसंग्राहक, लोकसेवक, दीनबंदू, विद्येचा प्रसारक, धर्मांचा सुधारक ह्या दृष्टिकोणातून कोणीही आता यापुढे शाहूचरित्राचे मूल्यमापन करील. साऱ्या बहुजनसमाजाचे व ग्रामीण जनतेचे जीर्ण जीवन ज्यांनी बदलून नवे केले, त्यांना आता संस्थानिक राजा म्हणून वर्णन करण्यात फारच थोडा अर्थ उरला. लोकोद्धारार्थ लोकगंगेत पावन झालेला हा महापुरुष होय.

विद्या सुधारली, ज्ञान वाढले की, धर्मही सुधारतो. भोळाभाव राहात नाही. बुद्धी जागृत होते. ही विद्या क्रांती शाहूमहाराजाने मुख्यतः केली. अनेक संस्था जोपासल्या. शाहूमहाराजांच्या उपलब्ध कामगिरीमुळे सर्वश्री यशवंतराव-बाळासाहेब यांना त्यांच्याच पायावर उभे राहून चालता आले. सगळा समाज लंगडा होता. अज्ञानापायी अंध होता. पुरोहितशाहीच्या कबज्यात होता. ही धर्मवेडी शाहूराजाने तोडली. सत्यशोधक समाज, आर्यसमाज यांना जवळ केले, वाढविले. प्रचाराची व प्रचारकांची सोय केली. वृत्तपत्रे काढविली. कौन्सिलात प्रतिनिधी जावेत असा यशस्वी प्रयत्न केला. धर्मसुधारणेच्या बाबतची आद्य छत्रपतींची इच्छा व शेवटच्या छत्रपतींची-प्रतापसिंह महाराजांची-मनीषा पूर्णत्वास नेली. वैदिक प्रकरण गाजविले; म्हणून सत्यशोधक समाज पुनः जागृत होऊन सर्वांच्या नजरेत भरला. नाहीतर त्याची स्मृती पुसली गेली असती. शाहूमहाराजानी त्याला अमरत्व दिले. व राजकीय ब्राह्मणेत्तर पक्षालाही यशस्वी केले. बहुजनसमाजाच्या इतिहासातून शाहूमहाराजांना अग्रेसरत्वाचे स्थान द्यावे लागते. शाहूमहाराज हे बहुजनसमाजाचे एक उदार अंतःकरण होते. अस्पृश्योद्धारक राजर्षी म्हणून त्यांची ख्याती आहे. हा भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न म. गांधींच्याही अगोदर त्यांनी हाताळून मराठा हृदयाचे विशालत्व सिद्ध केले. मराठ्यांना चांगला नेता मिळाला की ते पुढे येतात. जरूर ते नेतृत्व शाहू महाराजांनी मराठा तत्सम बहुजनसमाजास पुरविले.

**शाहू महाराजांचा वारसा**

शाहूमहाराजाना अकाली मरण प्राप्त झाले. तरी त्यांनी त्यांच्या गुणाधिक्यामुळे फार मोठा वारसा पुढील पिढीसाठी ठेवला आहे. त्यांच्या पश्चात शिक्षण कार्ये, परिषदा इत्यादींची काही वाढ झाली. पण म. जोतीराव व श्री. शाहूमहाराज यांच्या पश्चात सत्यशोधक समाजाची जोपासना व तात्त्विक वाढ व्हावी तशी झाली नाही. शाहूराय राजकारणी होते. तरी राजकारण म्हणजेच सर्वस्व ते मानीत नव्हते. जनतेच्या उद्धाराचा कोणताही प्रश्न असो, ते त्याला साह्य करीत. धर्माच्या बाबतीत त्यांच्या पश्चात डॉ. आंबेडकर यांनी राजर्षी-बुद्ध याचा नीतिप्रधान धर्म पत्करून बरीच धर्मक्रांती केली. त्या मानाने सत्यशोधक समाज आज उपेक्षित आहे. नव्या युगाच्या दृष्टीने, नवी मांडणी करून, त्या संबंधीचे कर्तव्य पार पाडण्याची मनिषा आज आढळत नाही. धार्मिक

अनुक्रमणिका

स्वावलंबन, व स्वयंपुरोहित ही शाहूमहाराजांनी पुरस्कारलेली कार्ये आज उपेक्षित आहेत. या कार्यांना पुनः चालना मिळावी म्हणून श्री. शाहूरायांचे स्मरण जरूर आहे. स्वतःचा उद्धार स्वतः करावा या प्रयत्नास जातीय म्हणता यावयाचे नाही. त्या दृष्टीने ठिकठिकाणचे विद्याप्रसारक समाज आज मागे पडले आहेत. काँग्रेसच्याद्वारे सर्व सुधारणा होऊ शकतील असा गंड तयार झाला आहे. श्री. शाहूमहाराजांच्या संदर्भात विचार केल्यास काही क्षेत्रात उपेक्षा व काही क्षेत्रात प्रगती आढळते. समाजासंबंधी त्याग करणे, व्यक्तिहित, स्वार्थ दुय्यम समजणे म्हणजे समाजवाद. ही समाजवादी मनोवृत्ती शाहूचरित्रात आढळते. धर्मसंबंधीची गुलामगिरी, बुवाबाजी, खोटे जोतिष, क्षुद्र देवतांची पूजा, अंगात आणणे, देव घालणे, वगैरे देवाधर्मांच्या नावाखाली चालणारा गोंधळ आज खेड्यापाड्यात दबा धरून आहे.

शाहूरायांचे कार्य अपुरे आहे. सुधारलेले-वैदिक-संस्कार देखील प्रसार पावले नाहीत. विज्ञानात्मक दृष्टिकोण तयार झाला नाही. श्री. शाहूपुण्यस्मरणार्थ अशा प्रकारचा आढावा मार्गदर्शक ठरेल असे वाटते. अस्पृश्योद्धाराचा प्रश्न सर्वथैव पूर्णपणे सुटला नाही. बुद्ध धर्मासंबंधी सहिष्णुता बहुसंख्याक समाजातून निर्माण झाली नाही. ही आपुलकी निर्माण झाल्याशिवाय अस्पृश्यतेचा प्रश्न सुटला असे म्हणता यावयाचे नाही. बहुजनसमाजावर मोठी सामाजिक जबाबदारी आहे.

**कुलदीपक व समाजभूषण**

शिवाजी महाराजानंतर भोसले कुळाच्या कीर्तीस श्री. शाहूमहाराजानी फार मोठी भर घातली आहे. मराठा ही आकुंचित जात किंवा धंदावाचक संज्ञा नव्हे; किंवा वर्ण नव्हे. अथवा ठराविक धर्मसंप्रदाय नव्हे जो गुलाम न राहाता स्वराज्य चालवितो व जो सर्वसंग्राहकपणे विशाल मनोवृत्तीने नेतृत्व करतो, तो मराठा, 'विशाल मराठा' म्हणून श्री. शाहूनृप श्रीदर्श होत. त्यांची कामगिरी व दृष्टी सार्वजनिक होती. शाहू ही एक विचारसंस्था झाली. केवळ ती व्यक्ती आहे. देहात्मक बुद्धीने त्यांचे कार्यमोल समजणार नाही. सर्वांच्या संबंधीचे अद्वैत, कळवळा, दया लोकोपकार इत्यादी गुणांनी मंडित असे शाहूराय झाले. धर्मरक्षण, धर्मशुद्धी, ज्ञानाचा प्रसार करणारा हा महात्मा प्रगटला. ज्याचे हृदय महान् व ज्यांचे कार्य व्यापक तो महान् आत्मा होय. जो सार्वजनिक महान प्रश्न सोडवू शकतो तो महात्मा संसारातील सुखदुःखे यांचे तडाखे छत्रपती शाहू महाराज यांनाही बसले. शेवटी ते विरागी झाले. म्हणजे संन्यासी नव्हे. राज्यव्यवहार, प्रपंच यांच्यामधील मन काढून त्यांनी लोकोपकारात देहधारणा धरली. व्यक्ती, नेते, मुत्सद्दी या तिन्हीही दृष्टींनी त्यांचे चरित्र अधिकाधिक अभ्यासनीय आहे. कोत्या कुलाभिमानाच्या परंपरागत कल्पना व त्यांचे बंध त्यांनी सक्रियपणे तोडून टाकले.

संस्थानात व संस्थानाबाहेर श्री. शाहूमहाराज यांच्या दातृत्वाने निर्माण झालेल्या व संबंधित झालेल्या अनेक विविध संस्था आहेत. या त्यांच्या थोरवीची साक्ष देतात. त्यांचे कार्यक्षेत्र सर्वांगीण व विशाल होते.

महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहूमहाराज यांच्यापासून निर्माण झालेले नवचैतन्य व नवीन सागृती यांची जोपासना करणे, हे नव्या तरुण पिढीचे काम व कर्तव्य आहे. कृतज्ञतेतून सामाजिक उत्कर्ष होत असतो; म्हणून श्री. शाहूमहाराज यांच्या कार्यात यथाशक्ती भर घालण्याचे सामर्थ्य सर्व नव्या कार्यकर्त्यांना होवो, अशी शेवटी प्रार्थना.

अनुक्रमणिका

## ११.

# भारतीय दलितांचा प्रश्न आणि विठ्ठल रामजी शिंदे

दलितांचा प्रश्न स्वातंत्र्यातील वर्तमानकाळातही ज्वलन्त आहे; हरिजन-बौद्धांवर, विशेषतः खेड्यापाड्यांत अनेक प्रांतात अन्याय होत असल्याच्या अनेक बातम्या वृत्तपत्रात हल्ली हरहमेश येत असतात. ह्या अल्पसंख्यांकांचा प्रश्न फारच जुना आहे; व तो अखिल भारतीय आहे. राममोहन ते मनमोहन गांधींपासून थेट डॉ. आंबेडकर यांच्यापर्यंतच्या धर्मसुधारकांनी आणि गौतमबुद्धापासून ते एकनाथानापर्यंतच्या संतांनी पूर्वी, आध्यात्मिक समतेचे प्रयत्न करूनही, ही देशव्यापी समस्या अजून भेडसावीत आहे. हे येथील संस्कृतीतील मोठे न्यून आहे. म. गांधींचाच शब्द जर वापरावयाचा झाला तर 'कलंक' आहे.

अस्पृश्यतेच्या उद्‌गमाची अनेक कारणे होती. त्यांच्याशी व गतेतिहासाशी, आता फारसे कर्तव्य नाही. कारण हा प्रश्न आर्थिक समानतेतूनही सुटला पाहिजे. भूमिहीन हरिजनांना व बौद्धांना जमीनही वाटून दिली जावी. गाव तेथे अलग महारवाडा असला तरी गावात हजिन वस्तीत स्थान द्यावे येथपर्यंत विचार प्रगट झाले आहेत. जिल्हा पंचायतींनी त्यांच्या अर्थसंकल्पात ठराविक टक्के रक्कम हरिजन-बौद्ध यांच्या विकासार्थ खर्च करावेत, असाही अभिनंदनीय प्रयत्न महाराष्ट्र सरकारने पुढे आणला आहे. मुंबईसारख्या मोठ्या संख्येच्या कॉस्मापॉलिटन शहरांतून, हरिजन-बौद्धासंबंधी प्रश्न तितकेसे उग्र नाहीत; खेड्यात आहेत. तालुक्याच्या व मोठमोठ्या शहरातील नगरपालिकांच्या हद्दीतील हरिजन वस्त्यांची पहाणी केली तर, या नगरपालिकांनी देखील त्यांच्या अर्थसंकल्पात ठराविक रक्कम हरिजन वस्तीच्या सुधारणेसाठी राखून ठेवावी असा दंडक करणे जरूर वाटतो. शिवताशिवत यांच्यासंबंधी सार्वजनिक ठिकाणी आता फारसा प्रश्न नसतो. तसा कायदाही झाला आहे. अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला इतिहास आहे. प्रगती आहे व अजून पुष्कळ पुढे जावयाचे आहे, अशा अवस्थेत ज्यांनी ह्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी म्हणून मानवधर्मातून पद्धतशीर प्रयत्न केले, या प्रश्नाला वाहून घेतले, अशा एका उपेक्षित कर्मवीराचा या जटिल प्रश्नासंबंधीचा दृष्टिकोन जनतेपुढे येणे जरूर वाटतो. विठ्ठल रामजी यांना 'उपेक्षित' अशा अर्थाने संबोधण्याची गरज वाटली की, बहुजनसमाज कै. शिंद्यांना 'बहुजनसमाजाचे कर्मवीर' मानतो, परंतु हा प्रश्न बहुजनसमाजाकडूनच उपेक्षित राहिला गेला आहे. निदान आता अस्पृश्यतेच्या जन्मजात रूढीचे व परंपरेचे समर्थन करण्यास कोणी धजत नाही. म्हणजे विचारातून तरी प्राथमिक क्रांती होऊन चुकली; पण या प्राथमिक परिवर्तनाचा देखील खेड्यापाड्यांत अभाव दिसतो. बहुजनसमाज म्हणजे ग्रामीण शेतकरी समाज होय व या शेतकरी मराठी वर्गाच्या या प्रश्नासंबंधीच्या रूढ मनोवृत्तीत मात्र दुर्दैवेकरून आचारात्मक क्रांती झाल्याचा साक्षात्कार प्रत्यक्ष व्यवहारात व राजकारणातही होत नाही. नैतिक सुधारणा म्हणजे समाजसुधारणा व मूलभूत विकास, असा अर्थ अभिप्रेत धरून यापुढे जाणे क्रमप्राप्त होय. धर्म व शिंदे सतत एकच होते.

### कर्मवीर शिंद्यांचा मार्ग

आगरकरांचा 'सुधारक' वाचनात येऊ लागला व कर्मवीर शिंदे यांची मते सुधारक पक्षाकडे वळली. कै. शिंद्यांचे आई-वडील, आजी-आजोबा पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त होते. घरात भागवतधर्मीय परंपरा होती. 'स्त्रीशुद्रांचा'

कैवार हा एक भागवत धर्माचा भाग होता. असे परंपरागत भक्तिवादी मन असल्यामुळे, गुरुवर्य कै. शिंदे प्रार्थना समाजाकडे म्हणजे सुधारलेल्या 'प्रॉटेस्टंट भागवतधर्मा'कडे सहज वळले. ब्राह्मो समाजाच्या प्रचारार्थ भारतभर प्रवास झाल्याने त्यांची दृष्टी भारतीय झाली. देशातील डिप्रेस्ड क्लास म्हणजे निराश्रित लोकांची अवस्था त्यांना प्रत्यक्ष दिसून आली. धर्माधिष्ठित मानवी समता जर व्यवहारात आणावयाची झाली तर या निराश्रित. लोकांना म्हणजे तळातील लोकांना सक्रिय, उन्नत करून त्यांना घरीदारी, समाजात आणि धर्मात व राजकारणात बरोबरीने वागविले पाहिजे, या हेतूने सन १९०६ साली शिंद्यांनी 'अखिल भारतीय निराश्रित साह्यकारी संस्था' स्थापिली. मानीव अस्पृश्यांचे प्रांतवार लोकसंख्येचे आकडे त्यांनीच प्रथम उपलब्ध करून बहिष्कृत भारताचे स्वरूप, जनता सरकार व राष्ट्रीय सभेपुढे मांडले. काँग्रेसच्या अधिवेशनात डॉ. ॲनी बेझंट व म. गांधी यांच्या सहाय्याने काँग्रेसमध्ये अस्पृश्यता निवारणाचा प्रथमचा ठराव पास करविला. सरकारातून त्यांच्यासाठी राखीव जागा व अनेक सवलती मिळविल्या. देशात निराश्रित साह्यकारी मंडळाच्या शाखा ठिकठिकाणी काढल्या. मराठी शाळा, बोर्डिंगे वगैरे चालविली. स्वतःच्या कुटुंबियांसह सर्व जीवन या प्रश्नाला समर्पित केले. पुण्यास अहिल्या आश्रम बांधून त्यांच्या वस्तीत सहकुटुंब जाऊन राहिले. हिंदी मिशनरी पद्धतीने एवढा मोठा संघटित, पद्धतशीर व शिस्तशीर देशव्यापी प्रयत्न त्याच्या अगोदर नव्हता. या कामगिरीचा समग्र वृत्तांत थोडक्यात कोणासही देता येणार नाही.

### फुले-शिंदे फरक व सारखेपणा

शिंद्यांच्या या देशव्यापी प्रयत्नाने फुल्यांनी ज्या कार्याची ज्योत पुण्यास प्रज्वलित केली होती, त्या ज्योतीत एकसारखे आभरण घालून मध्यंतरी प्रकाशमान ठेविली. गांधी, काँग्रेस व आंबेडकरांच्या हातात ही जोतिरावांची ज्योत ताब्यात देऊन, शिंद्यांनी शेवटी यातून संन्यास घेतला. शिंदे जसे कर्मवीर होते तसे ते धर्मज्ञ, समाजशास्त्रज्ञ, इतिहास संशोधक, अनेक भाषा व विविध धर्म यांचा विलायतेत जाऊन अभ्यास करून आलेले क्रियाशील पंडित होते. मुंबई विश्वविद्यालयाची बी. ए. ही पदवी त्यांनी घेतलेली होती. जोतिरावाना एवढा मोठा शिक्षणाचा व दीर्घ प्रवासाचा व सर्वगामी पांडित्याचा लाभ होणे अशक्य होते. जोतिरावानी शिंद्यांच्या प्रमाणे प्रार्थना समाजी समाज सुधारकांच्या सहाय्याची मदत घेतली, पण फुले हे एकेश्वरवादी होते, तरी प्रार्थना समाजी झाले नाहीत. प्रार्थना समाजी मंडळी राजकारणात मवाळ, नेमस्त व प्रागतिक होती. शिंदे धर्म व राजकारणात कर्ते, राष्ट्रीय-जहाल व स्वतंत्र वृत्तीचे होते. सरकारी पदवी व इंग्रजांची आणि त्यांच्या मांडलिक संस्थानातील बडी नोकरी तात्काळ मिळण्याची संधी असूनही ती सुद्धा शिंद्यांनी घेतली नाही. पे-प्रमोशन-पेन्शन असा सामान्य मार्ग त्यांचा झाला नाही! फार काय फर्स्ट एल. एल. बी.चे एक वर्ष पास होऊनही वकिलीचा मार्ग सोडून, ते धर्मशिक्षणार्थ मॅन्चेस्टर कॉलेजमध्ये गेले. फुल्यांचा त्याग शिंद्यांच्यामध्ये दिसून आला. ध्येय, निश्चय, करारीवृत्ती, निर्भीडपणा हे मोठे गुण दोघातही होते. राममोहन, फुले यांच्या काळातील सुधारक पाश्चिमात्य धर्म व संस्कृतीकडे साहजिकच कलले होते व इंग्रजी राज्य हे दैवी वरदान होय असे रानडेही समजत! पण शिंद्यांच्यात स्वातंत्र्याचा मार्ग व्यक्त होई. राजकारण दोघांचाही विषय नव्हता. धर्म व समाजसुधारणा यांच्यासंबंधी 'फुले-शिंदे' यांच्यात ऐक्य आढळते. शिंदे यांनी त्यांचे विचार प्रसन्न मराठी भाषेत व्यक्त केलेले आहेत. रानडे-भांडारकर-चंदावरकर वगैरे विद्वानांशी त्यांचा प्रत्यक्ष परिचय होता, शिंद्यांच्या इतका तात्त्विक, तौलनिक व समन्वयक लिहिणारा-बोलणारा विवेकवंत विद्वान अद्याप तरी बहुजनात (म्हणजे शेतकीर मराठी थरातून) पुढे कोणीच आलेला नाही. विद्यमान समाजाला त्यांचे फारच थोडे भान आहे! फुले (काहीसे)

कळण्यास त्यांच्यानंतर सत्तर वर्षे लागली. याचप्रमाणे एका शतकानंतर प्रगत महाराष्ट्राला शिंदे कदाचित समजतील! शिंदे, फुले व आंबेडकर देखील पचण्यास फार अवघड आहेत; म्हणूनच अस्पृश्यांवरील अन्याय वाढते आहेत. फुल्यांच्या काळात कोणी महारवाड्यात जात नव्हते किंवा हरिजन मंडळी गावाशी संबंधित नव्हती. आता बाह्य शिवता-शिवत गेली. पण निवडणुकी (ग्रामपंचायतीच्या वगैरे) व पक्षभेद या कारणामुळे व इतरही कारणामुळे हरिजनाना मारहाण वगैरे करण्यास जुनी शिवता-शिवत आडवी येत नाही. राजरोस त्यांच्या अंगावर चालून जाताहेत! शिंदे-फुले यांच्या काळात अस्पृश्यता कडक होती. खेड्यापाड्यात व गावगाड्यात जातिभेद होता तरी तेथे लोक गोडीगुलाबीने रहात आले. हल्लीइतकी वाढती लोकसंख्या नव्हती. महारवाडे लहान होते. आता सर्वत्र झालेल्या संख्यावाढीने हरिजनवस्तीही वाढली आहे जे धंदे अस्वच्छ असतात, सर्वांचाच त्यांच्याशी तेथे संबंध राहिला नाही. उत्तरोउत्तर पुष्कळच फरक पडत आहे. राजकारणाला महत्त्व येत आहे. पूर्वी निवडणुकांच्यामुळे पडणारे तट नव्हते, पक्षीयता नव्हती. विकेंद्रीत नव्या राजकीय सत्तेचा व वशिल्याचा एवढा मद नव्हता. शेतकरी तुलनेने सर्वच प्रायः गरीब होते. आता ऐहिक श्रेष्ठत्वाची व संख्याबलाची खेड्यात धुंदी जास्ती चढलेली आढळते. फुले, शिंदे यांचे दुर्दैव! पराभव! व तोही बहुजनसमाजाकडूनच! या संदर्भात येथे मीमांसा व्यक्त करावयाची आहे; थोड्या मागील घटना तपासावयाच्या आहेत.

**धर्मांतराचा प्रश्न व मार्ग**

शुद्रातिशूद्रांची आधुनिक काळातील जागृतीची व समान हक्क आणि समान सामाजिक-राजकीय दर्जा मिळविण्यासाठी कारणपरत्वे व जरुरीमुळे निर्माण झालेल्या पहिल्या चळवळीला, सत्यशोधक समाज म्हणून संबोधिले गेले व संबोधण्यात येते. या आद्य सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे वैचारिक संस्थापक (म्हणजे महत्त्वाचे धर्म व समाजसुधारक) म्हणून पहिला मान जोतिरावांच्याकडे जातो त्यांच्या समग्र साहित्यात. 'ब्राह्मणेतर' हा नवीन शब्द जवळ जवळ मुळीच आढळत नाही. जोतिरावानी शुद्रातिशूद्रांची दुःखे व्यथा, उणीवा, अडचणी, मागण्या, म्हणणे (कैफियती) शेवटपर्यंत वारंवार मांडल्या आहेत. चळवळीचा व स्वतंत्र संघटनेचा मंत्र ज्यानी दिला, त्या जोतिरावांच्या पुढे धर्मांतराचा प्रश्न होताच! जोतिरावांचा विचाराचा डोळा उघडण्यास, पुण्यातील त्यावेळचे पहिले त्यांचे अगदी प्रारंभीचे-मुसलमान मित्र काहीसे कारण झाले. त्यांच्या घराभोवतालची व त्या विभागाची त्यावेळची स्थिती लक्षात घ्यावी; त्यानंतर स्कॉटिश मिशनरी रे. मरे मिचेल विशेषतः कारणीभूत झाले. त्या प्रॉटेस्टंट स्कॉच मिशनऱ्यांच्या सहवासात जोतिराव बायबल चांगले शिकले. विठ्ठल रामजी शिंदे व जोतिराव फुले यांची प्रेरणामूल्ये अगदीच भिन्न ठरतात. श्रीमान फुले यांनी प्रेरणा व जागृती यांची स्थळे व संदर्भ स्वतःच नमूद करून ठेवले असल्यामुळे वादाचा व मतभेदाचा प्रश्नच येत नाही. ('महात्मा फुले समग्र वाङ्मय' : सरकारी प्रकाशन, पा. २६४ व २६५) परंतु राममोहन राय यांच्या प्रमाणेच मिशनऱ्यांच्या पंजातून म. फुले सुटले! शिवाजी, जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस् पेन, अब्राहम लिंकन ह्या स्वातंत्र्यवादी थोर पुरुषांची चरित्रे वाचावयास मिळाल्यामुळे जोतिरावात स्वदेशाभिमानाचे वारे होते. सार्वजनिक सभेचे व स्वदेशी राष्ट्रीय चळवळीचे पहिले एक पुरस्कर्ते सदाशिवराव गोवंडे हे जोतिरावांच्या शाळेतील एक जीवश्चकठश्च मित्र होते. शिवाय वासुदेव बळवंत फडके यांच्याबरोबर, लहुजीबुवा यांच्या आखाड्यात फुल्यानी जोरबैठका काढल्या होत्या. इंग्रज सरकारला पालथे घालण्यासाठी फुले लष्करी विद्या देखील शिकले होते. ('गुलामगिरी पा. १६२) ते चांगले पहिलवान व वस्ताद कुस्तीगीर असल्यामुळे इंग्रजांचे व मिशनऱ्यांचे डावपेच त्यांनी बिनचूक ओळखले. चांगल्या सूज्ञ व विचारी, शिक्षित मित्रांची त्यांनी सभा घेतली, चर्चा केली,

सल्लामसलत मिळवली व धर्मांतराचा व्यक्त केलेला मार्ग (म. फुलेकृत 'गुलामगिरी' पा. १८९) झिडकारला व धर्मशुद्धीसाठी व समाजसुधारणेसाठी राममोहन राय यांच्या ब्राह्मो समाजाच्या धर्तीवर दक्षिणेत 'सत्यशोधक समाज' स्वतंत्रपणे व वेगळा प्रस्थापिला; व शूद्रांना मिशनरी डावपेचातून राममोहन राय यांच्याप्रमाणेच सोडविणे. एवढेच नव्हे तर स्त्रीशूद्रातिशूद्रासाठी पुणे येथे स्वदेशी लोकांनीच चालविलेल्या देशी शाळा चालविण्यात अग्रेसरत्वाचा सहकुटुंब भाग घेतला. (कै. जोशीकृत 'पुणे वर्णन') पण अस्पृश्य व अतिशूद्र यांच्याबाबतीत काय करावे? असा जोतिरावांच्यापुढे प्रश्नच होता. जोतिराव उपलब्ध मित्र व सहकारी यांच्याबरोबर प्रश्नोत्तरीसंवाद एकसारखे करीत होते; व त्यातून त्यांनी आपली मते घासून पुसून घेण्याचा पुष्कळसा शक्य तो प्रयत्न केला. वाचन-चिंतन-मनन, अखंड आमरण चालू होते. स्वतः विद्यार्थीच राहिले.

ता. २४ सप्टेंबर १८७३ रोजी शूद्रांची पहिली सभा झाली. नंतर पुणे सत्यशोधक समाजाचा निबंध व वक्तृत्व भाषण समारंभ जून, १८७७ मध्ये जोतिरावांनी घडविला. यासाठी बक्षीस लावून निबंधस्पर्धा त्यांनी घेतली. या प्रतिवार्षिक निबंध स्पर्धेसाठी पुढील सविस्तर निबंध विषय त्यांनी जाहीर केला होता. त्यात "हिंदू (रूढ) धर्मात राहिल्यापासून कोणती दुःखे सोसावी लागली, लागतात व लागतील" हे विषयाचे मुख्य सूत्र होते तरी, जोतिरावांनी ते मोठ्या नाट्यपर भाषेत पुढील प्रमाणे विचार मांडले आहेत : 'परमार्थ' मार्गातील अस्पृश्यता घालविण्याचा प्रयत्न संतांचा होता. एकनाथ महाराजांच्या वेळचा 'अत्यंज किंवा नवा 'अस्पृश्य' हा संस्कृत शब्द म. फुले यांच्या विवेचनात दिसून येत नाही. कर्मवीर शिंद्यांच्याही पूर्वीची अस्पृश्यतेच्या प्रश्नांची सामाजिक अवस्था अभ्यासण्याच्या दृष्टीने पुढील एक प्रातिनिधीक उतारा सर्वांनाच चिंत्य व मनोवेधक वाटेल. मूळ पत्र 'ज्ञानप्रकाश' ता. १२ एप्रिल, १८७७ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यातील सविस्तर निबंध विषय.

*"हिंदुस्थानची एम्प्रेस महाराणी व्हिक्टोरिया साहेब जसे काय हिंदुस्थानात प्रवास करीत आहेत, आणि एका गावातील मांग महारवाड्याजवळ आपली गाडी एकाएकी उभी करून तेथील झोपड्यांचा देखावा त्या गाडीखाली उतरून, उभ्या राहून पहात आहेत, इतक्यात लाकडाच्या मोळ्या घेऊन आलेल्या पैकी एक मांग व दुसरा महार असे दोन मोळके तेथे येऊन दाखल झाले आणि ते आपल्या मोळ्या खाली ठेवून आपले लोक हिंदू धर्मात राहिल्यामुळे व शुद्र राज्यात कोणकोणते जुलुम, अडचणी व दुःख सोसावी लागली व हल्ली सोसावी लागतात, त्याचप्रमाणे त्यास प्रस्तुतकाली इंग्रज राज्यात कोणती दुःखे सोसावी लागतील याविषयी कच्ची हकीकत ते राणी सरकारास कळवीत आहेत."*

एवढ्या विस्तृतपणे जोतिरावानी मांडलेल्या वरील विषयात त्यांचे स्वतःचे मनोगत व्यक्त होते व हा जुलूमाचा प्रकार विशेषतः पूर्वी शूद्र राजे असताना देखील व इंग्रजी राज्य आल्यावर देखील चालूच होता व आता स्वातंत्र्यातही चालू आहे एवढे समजते. मांगा-महारांनी हिंदूधर्मात रहावे किंवा न रहावे अशी म. फुले यांच्यापुढे धर्मांतराची समस्या होती! पुढे विसाव्या शतकात; कर्मवीर शिंद्यांच्या काळात त्यांच्यापुढे अशा तऱ्हेची समस्या नव्हती. प्रस्तुत लेखकाचा व शिंद्यांच्या घरोब्याचा व निकटवर्ती संबंध आला. शिंद्यांनी मला एकदा एक चमत्कारिक हकिकत सांगितली. शिंद्यांचाही मिशनऱ्यांशी सहवास म्हणजे मैत्री असे. जोतिराव व विठ्ठलराव शिंदे यांनीही बायबलाचे चांगले ज्ञान कमाविले होते. जोतिराव येशूला यशवंत महापुरुष म्हणून संबोधित असत. गुरुवर्य शिंदे प्रतिवर्षी नाताळात ख्रिस्तजयंतीनिमित्त स्त्रीपुरुषांचे प्रार्थना मेळावे भरवीत होते. एका प्रसंगी व अनेक वेळा शिंद्यांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांना सांगून पाहिले की, "मला (म्हणजे शिंद्यांना) ख्रिस्ती करा! पण उत्तर

अनुक्रमणिका

असे : तुम्हाला ख्रिस्ती करून कसे चालेल? कोणीच मिशनरी शिंद्यांना बाप्तिस्मा देतो म्हणून तोंडाने वरवर देखील 'होकार' देण्यास तयार होत नसत! शिंद्यांनी असा त्यांचा चिंतनीय अनुभव सांगितला. शिंद्यांच्या लिहिण्या-बोलण्यात मेख असे! पूर्वी राममोहन व फुले यांना ख्रिस्ती करण्यात अपयश आले म्हणून विद्वान ख्रिस्ती मिशनऱ्यांनी नक्राश्रू ढाळले! उद्यमस्वातंत्र्य, स्पृश्यता वगैरे व्यावहारिक लाभ होऊ शकतात. म्हणून पुष्कळ अतिशूद्र मुसलमान झाले; व शेवटी स्वदेशी 'पाकिस्तान' झाले. ख्रिस्त्यांना जर मुसलमानाइतकेच यश येईल तर देशाचा 'तिरपगडा' होईल असे शिंद्यांचे मत 'माझ्या आठवणी' ह्या हृद्य ग्रंथात नमूद केले आहे. हा तिरपगडा टाळावा म्हणून राममोहन-फुले-शिंदे या तिघांनाही विषमधर्म बाजूला काढून, सार्वजनिक सत्यधर्माचा म्हणजे मूलभूत विश्वधर्माचा एकसारखा प्रचार चालविला होता. या कामी स्पृश्य त्रैवर्णिक म्हणविणाऱ्यांनी देशभर चांगली साथ दिली नाही. आणि म्हणून आजची दलितांची समस्या कायम राहिली, किंबहुना वाढत आहे. खेड्यापाड्यातला स्पृश्यसमाजाचा दृष्टिकोण समताप्रधान झाला नाही व पूर्वीच्या साधुसंतांनी जो नैतिक आणि आध्यात्मिक समतेची मूल्ये वाढवली, तीही नष्ट झाल्यासारखीच आहेत. शिंदे सांगत असत की, अस्पृश्यता अंतःकरणातून गेली पाहिजे. अस्पृश्यता खेड्यापाड्यांच्या लोकात व विशेषतः स्त्रियांच्या हृदयात दडून आहे. स्त्रियांचे मतांत्तर झाले पाहिजे असे शिंदे यांनी आवर्जून सांगितले आहे. शिंदे-फुले दोघेही कृतिसुधारक! फार काय? मी-मी म्हणणाऱ्या सुशिक्षित सुधारकांनी जेथे हार खाल्ली, ती-ती कामे फुले-शिंदे, या छातीच्या धर्मसुधारकांनी प्रत्यक्ष केली. सुधारणेची खरी व्याख्या व स्वरूप फुले व शिंदे यांच्या प्रत्यक्ष कार्यस्वरूपी आरशात शाब्दिक सुधारकांना पाहाण्याची वेळ आली, प्रसंग आला. त्याग व कृती यामुळे दोघांच्या शिकवणुकीला किंमत चढली.

**मराठा महार** ?

महाराष्ट्रातील विविध समाजातील लोक वंशशास्त्रदृष्ट्या भिन्न नाहीत, ही फुल्यांची देखील धारणा आढळते. 'शिंदे-फुले' असा येथे विचार केला आहे. याचे कारण शिंद्यांनी म. फुले यांच्याशी तात्त्विक अनुसंधान सोडले नाही. मानवतावादाला धरून दोघांना दृष्टिकोण एकच होता. निर्माणकर्त्यांच्या संबंधाने ब्राह्मण आपले बंधू असे म. फुले यांनी 'त्रिवार' त्यांच्या साहित्यात नमूद केलेले आढळते. मानवतावादी दृष्टीची एवढी मोठी, मराठी सुधारकांची कर्तीचरित्रे होऊन हा मराठी प्राकृत शेतकरी, सनातनी व कर्मठच राहिला गुरुवर्य शिंदे हरिजनात एवढे एकरूप झाले की, त्यांना महारच समजण्यात येऊ लागले! पूर्वी पंढरीच्या विठ्ठलाने विठू महाराचे रूप धारण केल्याची कथा सांगतात. राजर्षी शाहू महाराज शिंद्यांच्या समकालातीलच, दोघेही कर्ते अस्पृश्योद्धारक, खुद्द मराठी बहुजनसमाजात झाले. तरी मराठा बहुसंख्यांक व विशाल ग्रामीण बहुजन समाजाच्या दृष्टिकोनात फारसा फरक पडला नाही. या प्रश्नावर भर देणारे सयाजीराव गायकवाड, भास्करराव जाधव यांच्यासारखे मोठे व कित्येक लहान, क्रियाशील इतर विचारवंतही झाले. तरी प्रबोधन वाया गेल्यासारखे वाटते, कारणे कोणती? वरील सगळ्यांची मदत व सहाय्य डॉ. आंबेडकरांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष झाले हे खरे. जोतिरावांना सन १८७३ नंतर अतिशूद्रांच्या प्रश्नाकडे प्रत्यक्ष लक्ष घालण्यास फारसा अवसर मिळाला नाही. त्याचे कारण सन १८७७ नंतर सालोसाल मोठे दुष्काळ पडू लागले. त्यामुळे शूद्र शेतकऱ्यांचा आर्थिक प्रश्न जास्ती दारुण झाला, व त्यांनी शेतकरी प्रश्नावर नाईलाजाने भर दिला; तरी सक्तीचे शिक्षण त्यांनी शेवटपर्यंत सर्वांसाठी सांगितले. ह्या सर्व चळवळी प्रमुखतः शिक्षणप्रसारक चळवळी होत्या.

[अनुक्रमणिका](#)

शेतकरी वर्गाला शूद्र समजले जाई. मुळातच शिक्षणाची परंपरा नव्हती. गोडी नव्हती. शिक्षण आपला धर्मच नव्हे, अशी शूद्रातिशूद्रांची स्वतःमध्ये घट्ट धार्मिक श्रद्धा होती. श्रमाला प्रतिष्ठा नव्हती. मांग-महार वगैरे सर्व शूद्र असूनही अतिशूद्र ठरत गेले. शूद्र=क्षूद्र-चिरडणे, दलित असा अर्थ. तथापि, 'अतिशूद्रांना' शूद्रदेखील चिरडू लागले. व सर्वांचीच तळातील व गावाबाहेर राहणारी उपेक्षित जनता ही, 'अतिशूद्र' अशी वाडवडलार्जित समज होती व आहे. जोतिराव शेतकऱ्यांना उद्देशून शूद्र शब्द योजीत व मानीव अस्पृश्यांसाठी त्यांना अस्पृश्य न संबोधिता 'अतिशूद्र' म्हणून संबोधित असत. या देशांतील पहिल्या प्राथमिक शाळा ख्रिस्ती मिशनऱ्यांनी (स्वार्थासाठी का होईल) घातल्या. ही गोष्ट शिक्षणप्रसाराच्या आधुनिक निःपक्षपात इतिहासाला मान्य करावे हे लागणारच. या पहिल्या मिशनऱ्यांपुढे व इंग्रज सरकारने काढलेल्या प्राथमिक शाळांच्याही पुढे स्पृश्य व अस्पृश्य मुले मराठी शाळेत, शहरातही एकत्र कशी बसवावीत, हा प्रश्न होता! आता हा प्रश्न खेड्यातही राहिला नाही. एकाच शाळेत मिश्रपणे खेड्यातही मुले शिकतात. सरकारी कायद्याचे साह्य व जनतेमधील शैक्षणिक जागृती, यामुळे शिवताशिवतीचे प्रश्न फारसे राहिले नाहीत; व ख्रिस्ती शाळा विद्याखात्याच्या वाढीमुळे पुढे फार मोठ्या प्रमाणात बंद होत गेल्या व आता स्वातंत्र्यात त्यांची आठवणही फार थोडी राहिलेली आढळते. तात्पर्य हे की, शतक-दीडशतकाच्या वरील विविधांच्या प्रयत्नानंतर दलितांच्या जटिल प्रश्नांच्या क्षेत्रात बिलकुल यश आलेच नाही, असे मुळीच नव्हे.

**धर्मांतरामुळे पुनः दुरावा वाढला!**

ख्रिस्ती मिशनरी, ब्राह्म प्रार्थना समाज, आर्य समाज. म. फुले, महर्षी शिंदे, म. गांधी आणि काँग्रेस, माटे-सावरकर, भाऊराव पाटील वगैरेंच्या विविध प्रयत्नामुळे प्रगती झाली. म. गांधींनी तर हरिजनांना वेगळा मतदार संघ नको म्हणून, प्राणांतिक उपोषण केले. गांधी-आंबेडकर महत्त्वाचा करार झाला. या प्रसंगाने या विषयासंबंधी देशभर जागृती झाली. कर्मवीर शिंद्यांच्या पर्यंतचे प्रयत्न हे स्पृश्यांचे प्रयत्न होते. शिंद्यांनी बहिष्कृत व निराश्रित भारतातील मानीव अस्पृश्याना 'डिप्रेस्ड्' म्हणजे अन्यायाने दाबलेले 'पददलित' अशी नवी संज्ञा दिली; या राष्ट्रीय निराश्रित मिशनची पूर्तता व्हावी म्हणून सर्वांनाच पाचारण करून मोठमोठ्या अभूतपूर्व अ. भा. परिषदा पार पाडल्या. स्वतः सत्तेच्या राजकारणापासून संपूर्ण अलिप्त होते. कै. गवई वगैरे सारखे प्रांतोप्रांती लहानसहान पण महत्त्वाचे पहिले हरिजन कार्यकर्ते झाले. पण डॉ. आंबेडकर यांचा या क्षेत्रात महत्त्वाच्या अशा 'महार' ह्या शूर समाजामधून उदय झाला. नेतृत्वाचे सर्व गुण त्यांच्या ठायी होते. शेवटी त्यांनी 'शॉक ट्रीटमेंट'ला हात घातला. महाडचा सत्याग्रह, नाशिकचा सत्याग्रह, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना, 'जनता' पत्राद्वारे जागृती वगैरे वगैरे खूप प्रकारे स्वावलंबी व अखिल भारतीय प्रयत्न केले. म. फुले यांनी अगोदर अशा अर्थाचे भाष्य करून ठेवले होते की, माझ्यानंतर एक महापंडित येईल व तो 'विषम धर्मांच्या' चिंध्या चिंध्या करील. ('गुलामगिरी' आवृत्ती ४ थी, पा. १७९) ह्या भविष्यवाणीप्रमाणे डॉ. आंबेडकर यांनी 'मनुस्मृति' जाळली; व हिंदूधर्मग्रंथावर म्हणजे विषमतेवर म. फुले यांना करता आले नाहीत, एवढे मोठे वज्रप्रहार केले. डॉ. आंबेडकर यांचा म. फुल्यांच्याप्रमाणे त्रैवर्णिकातील सुधारकांवर देखील विश्वास नव्हता. 'रानडे-शिंदे', 'गांधी-गोखले' व पहिले आद्य राममोहन वगैरे सुधारकांना डावलून डॉ. आंबेडकरांनी म. फुले यांनाच गुरू मानले. ह्यामुळे म. फुल्यांचे महत्त्व भूमितीश्रेणीने प्रत्ययास येत गेले. कर्मवीर शिंदे यांनी त्यापूर्वीच म. फुले यांना आद्य अस्पृश्योद्धारक म्हणून सक्रिय वंदन केले होते. डॉ. आंबेडकरांच्या उदयामुळे अर्थात शिंदे वगैरेंच्या प्रयत्नांची जरुरी उरली नाही. मात्र ग्रॅज्युएटस् तरुण पुढे आले व शिंद्यांच्या प्रयत्नामुळे यावेळी हरिजनात बरीच नवी

शिक्षित मंडळी व कार्यकर्ते निर्माण झाले. पुण्याचा बांधलेला स्वतंत्र 'अहिल्याश्रम' व 'डिप्रेस्ड क्लास मिशन संस्था' हरिजनांच्या हवाली करून सन १९२३ नंतर कर्मवीर शिंदे जयापजयाचा वगैरे विचार सोडून पूर्णपणे निवृत्त झाले! ज्या ठिकाणी म. फुले यांनी नाना पेठेत हरिजनासाठी पहिली शाळा घातली होती, तीच सात एकर जागा कर्मवीर शिंद्यांनी मोठ्या खटपटीने संपादन केली. डॉ. आंबेडकर पुण्यात आले म्हणजे येथेच उतरत.

हरिजन चळवळ म्हणजे म. फुल्यांच्या पासून सुरू झालेली चळवळ, डॉ. आंबेडकरांच्यामुळे स्वावलंबी झाली व मानवी हक्कांसाठी लढा देण्यास स्वतःच्याच पायावर शिंद्यांच्यानंतर उभी राहिली. हा टप्पा म्हणजे या चळवळीच्या इतिहासातील 'महान क्रांती' होय. अर्थात ही क्रांती व हे यश डोळ्यांनी पाहून शिंद्यांना समाधान झाले. पण या प्रश्नातही उत्तरोत्तर राजकारण शिरू लागले! सर्वच स्वरूप बदलत चालले! निवृत्त झाल्यावरही 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' नामक विद्वत्ताप्रचुर ग्रंथ त्यांनी लिहिलेला उपलब्ध आहे. शिंद्यांना डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा मार्ग पसंत नव्हता. शिंदे यांच्या पश्चात डॉ. आंबेडकर यांनी बुद्धधर्मदीक्षा घेतली. पण सन १९३५ सालाच्या सुमारापासून डॉक्टर मजुकरांचा धर्मांतरांचा विचार व घोषणा चालू झाल्या होत्या! पण निश्चित धर्मांतर कोणत्या धर्मांत करणार हे ठरले नव्हते! सन १९३५ साली उन्हाळ्यात डॉ. आंबेडकर सिंहगडावरील एका बंगल्यात उतरले होते. त्यावेळी प्रस्तुत लेखकाची व त्यांची योगायोगाने भेट घडली. कोंडाणा हे नाव ज्या कौंडिण्य ऋषीमुळे पडले होते तो ऋषी बुद्ध होता, ही माहिती आपण होऊन डॉ. बाबासाहेबांनी सांगितली. यावेळी बाबासाहेब तरुण, तेजःपुंज, पाणीदार व आत्मविश्वाससंपन्न चेहऱ्याचे असे मी पाहिले. यावेळीदेखील बुद्धधर्मांकडे त्यांचे लक्ष होते, ही बाब त्यांच्या बुद्धदीक्षतेनंतर माझ्या चांगली ध्यानात आली. त्याचवेळी धर्मांतर का अंतधर्म (सर्वधर्मांतर्गत धर्म म्हणजे सर्वधर्मरहस्य) या विषयावर शिंद्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या घोषणांच्या निमित्ताने जाहीर भाषण केले. व स्वतःची बाजू व धर्मशुद्धीपर विचार मांडले. शिख, मुसलमान व ख्रिस्ती वगैरे धर्मातील मुखंड डॉ. आंबेडकरांना पाचारण करून स्वागत करण्यास तयार होते. डॉ. आंबेडकर व शिंदे यांच्यात अनेक मुद्यांवर मतभेद होते, त्यापैकी शिंद्यांना धर्मांतराचा मार्ग म. फुल्यांच्याच संदर्भात मान्य नव्हता; हा महत्त्वाचा मुद्दा होय. 'हरिजन' नाव बदलणे, शास्त्राधार पाहाणे इत्यादी म. गांधी यांचेही काही मुद्दे कर्मवीर शिंद्यांना अमान्य होते. कारण ह्या मलमपट्ट्याच ठरणाऱ्या होत्या व आता ठरल्याही! शेवटी शिंदे-गांधी यांच्या पश्चात् डॉ. आंबेडकर यांनी बुद्धधर्मदीक्षा घेतली. ह्यालाच सर्व धर्मांतर समजतात. वास्तविक राममोहन, फुले, शिंदे, गांधी ते थेट कै. न. चिं. केळकर यांच्यासारख्यापर्यंत अनेक लहानथोर व्यक्तींनी 'गौतमबुद्ध व त्याचा धर्म' यासंबंधी आदर, प्रेम व्यक्त केलेले आढळते. गौतमाला अवतार मानले आहे. स्वतः शिंदे जागतिक व बुद्धधर्मपरिषदेसाठी ब्रह्मदेशात गेले होते. पाली-पाकृत भाषा त्यांना चांगली अवगत होती. स्वतःला 'बुद्धिस्ट' म्हणवीत होते. धर्मानंद कौसंबी नामक बुद्धधर्माच्या अभ्यासकाशी त्यांचा दृढ परिचय होता. बुद्ध पौर्णिमेबद्दल व बुद्धाच्या धर्मप्रचारक दृष्टीविषयी व बुद्धसंघाविषयी गुरुवर्य शिंदे यांचा उलट आदरभाव अत्यंत दृढ परिचयानेही मी अनुभविला आहे व तो जाहीरही होता. पण त्यांना हरिजनांचे धर्मांतर हे (मग ते कोणत्याही धर्मात घडो) दुरावा निर्माण करील अशी भीती अनुभवाने वाटत होती, व आज ती खरी वाटते. एकपरी ही 'शॉक ट्रीटमेंट' झाली! कारण मागील धर्म व समाजसुधारक हे सर्व 'सनातनी सुधारक' किंवा परिवर्तनवादीच ठरतात. यादृष्टीने 'बुद्धधर्म-प्रवेश' ही धर्मक्रांती ठरते.

अनुक्रमणिका

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या अनुयायांना नीतिप्रधान धर्म दिला. ध्येयवाद दिला; व रूढीबद्ध उपलब्ध धर्मातून सुटका व्हावयाची झाल्यास हाच एकमेव उपलब्ध व जवळचा सर्वोत्कृष्ट मार्ग होय. हे सर्व खरे. अर्थात त्यांनी बुद्धधर्माची तत्कालीन जुनी संन्यासपर व निवृत्तिपर बाजू नवबुद्धधर्म घटनेतून वगळली. आद्य शंकराचार्यांना येथे 'प्रच्छन्न बुद्ध' म्हणून म्हणतात तेथेच कित्येक शतकानंतर डॉ. आंबेडकर दीक्षावान असे प्रबुद्ध ठरले तर नवल नाही. सारा भारतच एकेकाळी बुद्धधर्ममय होता; पण खेड्यापाड्यांतील लोकांना 'बुद्ध व त्याचा धर्म' या संबंधात काहीही माहिती नव्हती व नाही. त्यांना या अपूर्व बदलाविषयी आत्मीयता वाटली नाही. वाटत नाही. 'हे बुद्ध'? म्हणजे परधर्मीय-परके अशी स्पृश्यांची दृष्टी अधिकच वाढली. या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे खेड्यात पाहिले जाते; व आपण इतर 'बुद्ध' नव्हेत अशी नवी जाणीव खेड्यात निर्माण झाली. म. गांधी अखेरपर्यंतच्या स्पृश्य-अस्पृश्योधारक सुधारकांना व स्वतः म. गांधींना मानीव अस्पृश्यांचे कसल्याही प्रकारचे धर्मांतर पूर्णपणे अमान्य होते. परंतु डॉ. आंबेडकरांना विशेषतः त्यांनाच आवडणारा धर्मांतराचा मार्ग इतरानी धरला, म्हणून आणखी वेगळ्याच दृष्टीने खेड्यातील जनता त्यांच्याकडे पाहू लागली व एकतरी धार्मिक आणखी एक नवा दुरावा व अलगता दुर्दैवाने निर्माण झाली. खेड्यात हिंदू व बुद्ध असा विभिन्न भाव पुनः निर्माण झाला. अस्तित्वात असलेल्या भावनिक ऐक्याला एकतरी तडा गेला. कारण महार जमातीशिवाय इतर हरिजन जमातींनी धर्मांतर केले नाही व आता ही 'शॉक ट्रीटमेंट' केवळ तत्कालीन ठरली; व उत्तरोत्तर ठरणारी आहे. दलितांच्या आर्थिक व योजनाविकासातून होणारा सर्वांगीण विकास हा प्रमुख विकास ठरू शकेल. आता हा प्रश्न आर्थिक समतेचा वाटतो. कारण हरिजन हे प्रायः खेड्यात शेतमजूर व इतर काम करणारे भूमिहीन कामकरी आहेत. मुंबईस गिरणीत मजूर आहेत. ब्राह्मण मराठ्यादी वर्गाप्रमाणे हरिजनातही पांढरपेशा व शहरी विभागात राहणारा उत्तरोत्तर पांढरपेशा मध्यमवर्गही शैक्षणिक व इतर सवलतीमुळे तयार झाला आहे. पदवीधर, वकील-बॅरिस्टर-आमदार-नामदार त्यांच्यात आहेत. स्वतंत्र रिपब्लिकन पक्षांचे राजकीय तत्त्वज्ञान देखील डॉ. आंबेडकरांनी त्यांना देऊन ठेवले आहे; व राज्यकर्ती जमात तयार होऊन स्वतःच सर्व प्रकारची मुक्ती व ऐहिक उन्नत दशा त्यांनी मिळवावी, असे डॉ. आंबेडकरांनी अनेक विस्तृत व विद्वत्तासंपन्न विचारधन मागे ठेवले आहे. जे फुले-शिंदे यांना करता आले नाही, असे स्वतंत्र स्वावलंबी व अभिप्रेत असे डॉ. आंबेडकरांनी जास्ती जिद्दीने केले; व विक्रम केला. शेतकरी बहुजनसमाजाच्या बुद्धधर्म प्रवेशाचा त्यांचा हेतू चांगला समजल्यास वरील वाढलेला दुरावा नाहीसा होण्यास पुष्कळच मदत होईल. धर्मांतराचा धक्का देऊन डॉ. आंबेडकरांचे अकाली निर्वाण घडले. तरी शेवटी त्यांनी जी भारताची घटना तयार केली ती निधर्मी (म्हणजे धर्मपंथनिरपेक्ष) दृष्टीवर आधारली आहे. डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा परिणाम हरिजन समाजावर सर्वांपेक्षा साहजिकपणे फारच झाला. एवढे मोठे नेतृत्व त्यांना पुनः केव्हा मिळणार?

**महर्षी शिंदे व बहुजनसमाजाचा अपेक्षित पालट**

बहुजनसमाजाला मात्र महर्षी शिंद्यांच्या मानवतावादी धर्माचे रहस्य कळू शकले नाही. फार मोठे सांस्कृतिक आंदोलन घडलेच नाही. या यद्यपी बहुजनसमाजाच्या कर्मठपणामुळे जवळजवळ अवघड वाटते! शिंदे खेड्यात गेले म्हणजे महारवाड्यातून जाऊन आल्याखेरीज राहात नसत. घरीदारी अस्पृश्यता गेली पाहिजे. कोणताही सार्वजनिक कार्यक्रम झाला, सार्वजनिक भोजन झाले तर त्यात हरिजन बांधवांचा कटाक्षाने समावेश झालाच पाहिजे. 'जेथे ते नाहीत तेथे मी नाही' असा कडक दंडक! स्वतःचा वर्चस्ववादी 'मराठापणा' बाजूस ठेवण्यास, आजचे मराठे पुढारी त्यांच्या इतके आतून तत्पर नाहीत! खेड्यात ब्राह्मण तर उरलचे नाहीत! सर्व ग्रामीण

अनुक्रमणिका

जबाबदारी विकेंद्रीकरणामुळे मराठा बहुसंख्यांक मध्यवर्ती व केंद्रीय बहुजनसमाजाची आहे. ह्या सांस्कृतिक जबाबदारीची जाणीव सुशिक्षित व पांढरपेशा मराठा पुढारी मंडळीत नाही तर शेतकरी भोळ्या मराठी समाजात कोठून येणार? हरिजनांची वेगळी राजकीय हक्काची चळवळ निर्माण झाल्यानंतर म. फुल्यांच्या ब्राह्मणेतर चळवळीचा व अस्पृश्यांच्या प्रश्नांचा उत्तरोत्तर विग्रह वाढतच गेला! जोतिरावांचा 'शुद्रातिशुद्र' हा समास व समन्वय मागे इतिहासात राहिला! स्वतंत्र महाराष्ट्रातील बनावामुळे संख्याबळावर काही मराठे राज्यकर्ते म्हणून बरेचसे पुढारले. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्ष म. गांधींच्या काँग्रेसमध्ये विलीन झाला. व काँग्रेसच्या हातात सत्ता गेली. अर्थात अटळपणे राष्ट्रीय धोरणामुळे बहुजनसमाज नव्या नेतृत्वामुळे पुढे सरकलेला आढळतो, पण शिंदे व फुले यांच्या ध्येयधोरणाप्रमाणे समाजक्रांती करणारे, खुद्द स्पृश्य बहुजनसमाजात, तात्त्विक कार्यकर्ते स्वातंत्र्याच्या काळात पुढे फारसे आले नाहीत. त्यागाचे स्थान भोग व परिवारिक स्वाथ यांनी घेतले. परिवारिक दृष्टी वाढली व सामाजिक/सार्वजनिक हितांची कळकळ लोपली. समाजसुधारकात बोलके व कर्ते असे दोन विभाग होते, तरी एकूण दोघांच्या प्रयत्नामुळे निदान स्पृश्यांचा दृष्टिकोण पुष्कळ बदलला. इतःपर हरिजनासह बहुजनसमाज स्वतः त्यांना बरोबरीने सर्वत्र घेऊन पुढे जाईल तर आगामी 'आपत्ती' टळतील. केवळ कोणाचेही संख्याबळ हे सर्वबळ व मूलगामी बळ फार दिवस ठरणार नाही! सांस्कृतिक एकता झेपली पाहिजे.

'मराठा म्हणजे बिनहिशेबी' अशी एक मराठ्यांची व्याख्या शिंदे नेहमी करीत. महाराष्ट्रातील मराठ्यांचे राष्ट्रीय महत्त्व आधुनिक काळी रानडे-भांडारकर व लोकमान्य यांनाही मान्य होते; कारण विशेषतः शिवाजीसारखा शूर द्रष्टा पुरुष मराठ्यांमध्ये होऊन गेला व त्यांचेमधील शौर्य, धाडस, देशाभिमान, कर्तृत्व म्हणून त्यांना अनन्यसाधारण राष्ट्रीय महत्त्व आहे! हे गुण टिकविले तर ते पुढेही राहातील; असे उद्गार खुद्द लोकमान्यांनी 'केसरी' ता. २९ ऑक्टोबर, १९०१ मध्ये व्यक्त केलेले आहेत. कोणत्याही बहुजनसमाजावर व कोणत्याही देशातील बहुसंख्यांक समाजावर जबाबदारी मोठी असते व ती सार्वजनिक असते. शिंद्यांच्या सारख्या जिव्हाळ्याने व आत्मीयतेने बहुजनसमाजास हे शिकविणे व सांगणे सर्वांचेच एक सामाजिक कर्तव्य ठरते. कारण मूलतः व शेवटी सर्वच मराठी भाषिक हे सारेच मराठे आहेत. स्वतः शिंद्यांनी सर्वप्रथम 'राष्ट्रीय मराठा संघ' सन १९१३ साली काढला होता व शेवटी ब्राह्मणेतर पक्ष बरखास्त करून टाका, असा शिंद्यांनी सल्ला दिला. म. गांधींच्या लढ्यात स्वतः कर्मवीर शिंदे वृद्धावस्थेतही पडले; तुरुंगवास पत्करला. पण त्यांनी सामाजिक पुरोगामी धोरण बरखास्त करा, असे कधीच सांगितले नाही. उलट सत्यशोधक समाज सुधारावा म्हणून त्यांनी अनेक व्याख्याने शेवटी दिली. तौलनिक अभ्यास व समन्वयक चिंतन हा शिंद्यांचा स्थायी भाव होता. जातीयता व अंध पक्षीयतेपेक्षा मानवी बंधुत्वावर त्यांचे विचार आधारित होते. धर्मनिरपेक्षता (निधर्मी-दृष्टी) सर्वधर्मसमभावातूनच निर्माण होऊ शकते. सर्वधर्मऐक्य हे जरी बिकट ध्येय ठरले, तरी 'सर्वधर्मसमभाव' हा शिंदे यांनी पुरस्कारलेला सार्वजनिक धर्ममार्ग भारताच्या राष्ट्रीय व भावनिक ऐक्यास व फेर अखंडत्वास जरूर आहे. या मुद्यावर म. गांधी व बहुतेक अलीकडचे धर्मसुधारक यांच्यात मतैक्य आहे. या दृष्टीने सत्यशोधक समाजास ब्राह्म समाजाचे पुन्हा प्रगट स्वरूप द्यावे म्हणून कर्मवीर शिंद्यांनी प्रयत्न केले; सत्यशोधक समाजाचे जातिभेदातील तात्त्विक दर्शन घडावे व त्यातील अनेक कालप्राप्त विकृत्या दूर व्हाव्यात, म्हणून सक्रिय मार्गदर्शन शिंद्यांनी केले. पुढील पिढीने त्यांचा संदेश ध्यानी घ्यावा व हरिजनांवरील अन्याय दूर करण्याच्या कर्तव्यास अग्रस्थान द्यावे; यासाठीच कर्मवीर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ऊर्फ आण्णासाहेब शिंदे यांचे येथे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

अनुक्रमणिका

अति प्राचीन जित व जेते ह्या संबंधामुळे म्हणा किंवा अन्य कारणामुळे म्हणा, पुढे गावगाड्यात, हरिजनांना दाससेवक म्हणजे गुलाम मानण्याची रूढ मनोवृत्ती आहेच व ग्रामीण शेतकरी मोठ्या विभागात हरिजनांना प्रत्यक्ष गुलाम सेवक म्हणून समजण्याची परंपरागत समजूत चालत आलेली आहे; ती मराठी शेतकऱ्यात खोलपणे आढळते व अन्यायाच्या बुडाशी हा खेड्यातील श्रेष्ठ गंड असण्याचा अधिक संभव असतो व प्रत्यक्ष आहेच. वाढत्या गावगुंडी तिढ्याचा व तत्सम गुंडगिरीचा हरिजन गरीबांना उपद्रव होऊ नये, अशी खबरदारी, (वशिला व दहशत यांना न जुमानता) शासनानेही घेतली पाहिजे. जे ग्रामीण विद्यमान लोकशाहीत, विकेंद्रित पंचायत राज्ये व जिल्हा परिषदा चालवितात, त्या पुढाऱ्यांना ह्या कर्तव्याची प्रथम सक्रिय जाणीव झाली व त्यांनी लक्ष घालून खबरदारी घेतली तर पुष्कळ विकृती टळेल! कारण खेड्यापाड्यांतून प्रत्यक्ष राहाणारे नवे पुढारी स्थानिक, तेथील खरी वस्तुस्थिती जाणू शकतात व तेच उपाय काढू शकतील व त्यांच्यातच वरील वैचारिक क्रांती प्रथम घडणे सर्वथैव युक्त आहे. सामाजिक दोषांची व उणिवांची प्रथम जाणीव पाहिजे. तरच सार्वजनिक प्रगती शक्य होईल. शिंदे व फुले यांच्या दलितोद्धाराचा परिघ फार विस्तृत होता. गुरुवर्य शिंदे यांनी देवदासी व मुरळ्या यांच्या विमोचनाचा प्रश्न हाती घेतला होता. पण त्यांना या प्रश्नाला अधिक वेळ देता आला नाही. त्यांना वेश्यांच्या उद्धाराबद्दल देखील काही करता आले नाही व दास्यविमोचन क्षेत्रातील व माणुसकीच्या उद्धाराचा त्यांचा मनोदय अपुराच राहिला, असे गुरुवर्य शिंदे शेवटी सांगत असत.

**दलित व दलितमित्र**

विविध दलित हे प्रायः उपेक्षित व त्या दृष्टीने निराश्रित आहेत. त्यांच्यातही जातिभेद-व्यवसायभिन्नत्व आहे. हरिजन-बुद्ध हा शब्द रुळलेला आढळतो, पण महाराष्ट्रीय हरिजनात 'महार' हे बहुसंख्य असून ग्रामीण भागात शेतकरी मराठ्यांच्या खालोखाल त्यांची मोठी संख्या आहे. डॉ. आंबेडकरांच्यामुळे ते जास्ती जागृत आहेत. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांचा, विचारांचा मिलाफ झाल्यास महाराष्ट्रात दलित-जनता व दलितमित्र त्यांच्यात समन्वय घडू शकेल. जिल्हा परिषदांच्या मधील जे 'समाज कल्याण' खाते आहे ते जास्ती कार्यकारी झाल्यास सामाजिक व सांस्कृतिक मिलाफ शक्य आहे. देव-देवके, कुल-दैवते (खंडोबा, बहिरव व जोतीबा वगैरे प्रमुख) व ग्रामदैवते, वार्षिक जत्रा वगैरे बाबतीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मूलभूत ऐक्य आहे. फार काय मराठ्यांची अनेक नामवंत आडनावे 'क्षत्रिय महार' समाजात आढळतात. मराठी राज्याच्या संस्थापनकाळात व नंतर सतत या समाजाचे शौर्य-प्रामाणिकपणा वगैरे गुण प्रत्ययास आले; महाराष्ट्राच्या प्राचीन काळात हे राज्यकर्ते होते. जोतिरावानी ह्या अतिशूद्रांचे राष्ट्रीय व प्राचीन महत्त्व निदर्शनास आणले आहे, एवढेच नव्हे तर त्याही खाली तळातील अनार्य, भिल्ल, संताळ, गोण्ड, आदि-द्रविड वगैरे तत्सम भारतीय आदिसमाज यांच्या संबंधीही विचारविनिमय केलेला आढळतो. फुले यांच्या भाषेचे बाह्यावरण दूर करून आधुनिक दलितमित्रांनी त्यांचे वैचारिक दर्शन मिळवून व्यापक कृतीचा मार्ग धरला पाहिजे. समाज कल्याण म्हणजे सर्व दलितांचा सर्वांगीण आर्थिक विकास होय. वरिष्ठातील पुनर्विवाह, बालहत्याप्रबंधन, केशवपन वगैरे पांढरपेशी सुधारणांसंबंधी आगरकरांच्याही अगोदर कृतिशील विचार महात्मा फुले यांनी केलाच व शूद्रातिशूद्रापेक्षा खाली व मागे जाऊन आदिवासी यांचीही बाजू त्यांनी घेतली; म्हणून महात्मा फुले सर्वांगीण आणि सर्वस्पर्शी 'दलितमित्र' म्हणून ठरतात.

अनुक्रमणिका

**क्रांतिकारक सामाजिक विचारांचा अभाव**

शेतकरी व त्यांच्यातून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या, दलितांच्या प्रश्नासंबंधीचा दृष्टिकोण आत्मीयता व दलितांची त्याच्यावरच प्रामुख्याने असलेली जबाबदारी या सर्वांची जाणीव ग्रामीण समाज थरात वाढावी व ती वाढल्यामुळेच हा प्रश्न पुष्कळ सुकर होईल, हा एक वैचारिक निष्कर्ष ठरतो. ह्या भारतीय प्रश्नाचा महाराष्ट्रापुरता जरी विचार केला तरी असे आढळते की, पहिल्यापासून महाराष्ट्रीय समाज एकजिनसी व भावनिक ऐक्याने संपन्न असावा तितका नाही, असा इतिहास व त्यातील महाराष्ट्रीय समाजाचे, एकूण एका गेल्या शतकाचे, सार्वजनिक जीवन पाहिले तरी, ही बाब समजल्याशिवाय रहात नाही. जोतिरावानी निर्माण केलेल्या त्यांच्या शेतकरी चळवळीत व तिच्या मूळ तत्त्वज्ञानात हा प्रश्न प्रामुख्याने त्यांनी गोविला होता. पण 'शूद्रातिशूद्र' ही त्यांची अभेद्य बिरुदावली त्यांच्या पश्चात लवकरच दुर्दैवाने लोपली व फक्त 'ब्राह्मणेतर' ह्यामध्ये असलेल्या बहुजनांच्या चळवळीचे स्वरूप आले व यांचे जे नेतृत्व आले ते अतिशूद्राविषयी उदासीनच राहिले. सगळ्या शेतकरी समाजाला जोतिरावांची प्रगत मते झेपणारी नव्हती व जी चांगली वाईट चळवळ झाली, ती ब्राह्मणेतरांची विद्याप्रसाराची व त्या द्वारा नेमस्तपणाने राजकीय हक्क व नोकऱ्या मिळविणारी ठरली. अठराशे सत्तावनच्या उठावानंतर 'समाजवादी' इंग्रज अनुभवाने शहाणा झाला. तो विघटना निर्माण होण्यास आतून प्रोत्साहनही देऊ लागला व हप्त्याहप्त्याने देऊ केलेल्या हप्त्यांचा स्वीकार डॉ. आंबेडकरांसह सर्व पक्ष करू लागले. म. गांधी यांच्या राष्ट्रवादी चळवळीमुळे या सर्वांनाच हादरा बसला. कर्मवीर शिंदे प्रथमपासूनच खादीधारी, गांधींच्या असहकाराकडे आकृष्ट झालेले होते. सर्वांचेच लक्ष राजकीय स्वातंत्र्याकडे जास्तीतजास्त वेधले. समाजपरिवर्तनाचा विभाग मूलभूतपणे व तुलनेने उपेक्षित राहिला व त्याला इतक्या पुढच्या आताच्या नंतरच्या स्वातंत्र्याच्या काळातही हात घालणे जरूरीचे राहिले!

शिंद्यांचा एक अनुभव या सर्व संदर्भात मोठा चिंत्य ठरेल. सन १९१६ साली निपाणी येथे विद्येत मागासलेल्या समाजाची मोठी परिषद झाली. परिषद बोलविल्यामुळे, अस्पृश्यता निवारण मंडळींचे चिटणीस वि. रा. शिंदे या परिषदेला उपस्थित राहिले. जोतिबांचे अनुयायी म्हणविणारी अशी जवळजवळ दोन हजार मंडळी जमली होती. माळी, तेली, जैन व लिंगायत वगैरे अब्राह्मण समाज जमला होता. कै. भास्करराव जाधव यांच्याकडे या अगदी पहिल्या परिषदेचे नेतृत्व होते. मराठा तत्सम मागासलेल्या लोकांत, शिक्षणाचा प्रसार कसा जारीने करावा व त्यांच्या राजकीय हक्कांचे संरक्षण कसे करावे, हा परिषदेचा हेतू होता. ठरावदेखील तसेच झाले. या परिषदेला 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'चे प्रमुख कै. नारायणराव जोशी देखील शिंद्यांच्याप्रमाणे उपस्थित होते. परिषदेत स्वसमाजातील पुरोहिताकडून संस्कारविधी करावेत वगैरे ठराव पास झाले. पण अस्पृश्यता निवारणाचा ठराव विषयांच्या यादीत नव्हता! किंवा त्यांच्या प्रश्नाविषयीचा विचारही तेथे आला नाही व या चळवळीची जवळजवळ पूर्तता होऊन जरूरी संपेपर्यंतदेखील दलितांचा प्रश्न व त्यांची स्वजनातील तीव्रता, या विचारांची फारशी दखल घेण्यात आली नाही. फक्त कर्मवीर भाऊराव पाटील यांनी यांच्या शिक्षणप्रसारक 'रयत शिक्षण संस्थे'त या प्रश्नाला मोठे स्थान देऊन गुरुवर्य शिंदे व फुले यांच्या कार्यात विशेष भर घातलेली आढळते. डॉ. आंबेडकर यांनाही स्वतंत्र चळवळ पुढे करावी लागली. याचेही कारण ह्या स्पृश्य बहुजनसमाजाची उदासीनता हे एक होय. कै. शिंदे वरील परिषदेवरून आल्यानंतर कै. सर नारायण चंदावरकर यांना भेटले. या उभयतात संभाषण झाले. ते वैद्यकृत नारायण गेणेश चंदावरकर यांच्या विस्तृत व विवेचक चरित्रात उपलब्ध आहे. (पृ. ५२३, ५२४). पण "ह्या लोकांना (म्हणजे वरील परिषदेच्या)

अस्पृश्यसंबंधाने काही सहानुभूतीतरी वाटते काय?” असा सर नारायण यांनी शिंद्यांना नेमका प्रश्न विचारला! शिंद्यांचे उत्तर देखील अधिक चिंत्य आजही आहे. “त्यांना काही सहानुभूती वाटते असे मला वाटत नाही. माझा तर अनुभव असा आहे की, मागासलेले म्हणून आपल्याला म्हणविणाऱ्या लोकांपेक्षा अस्पृश्यांच्या उद्धाराविषयी ब्राह्मणांनाच अधिक कळकळ वाटत असून त्यांचीच ह्या कार्या अधिक सहानुभूती आहे!” यावर दक्षिणाप्रांती चंदावरकर गेले होते तेव्हा तिकडीलही प्रांतात स्थानिक बहुजन समाजाची दलितांच्या प्रश्नासंबंधी उदासीनता त्यांनाही आढळली. म्हणून हा केवळ एका प्रांताचाही मर्यादित प्रश्न नाही व हल्ली जे सर्व प्रांतात हरिजन व बौद्ध जनांच्यावर अत्याचार होतात, त्यांची तशी आणखी वैयक्तिक व स्थानिक , कौटुंबिक, खाजगी इतर कारणेही असू शकतील. मध्यवर्ती सरकारही या प्रश्नात आता जास्ती लक्ष घालीत आहे. कारण ‘फोडा व झोडा ’ ह्या इंग्रजांच्या नीतीचा परिणाम म्हणून सर्वत्र सामाजिक व धार्मिक संघर्ष उत्पन्न होत होते, असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून त्यांची पूर्वी  बोळवण झाली. आता साम्राज्य गेले, ती भेदक नीती गेली! प्रांतोप्रांतीच्या स्पृश्य बहुजन समाजाचा भारतभर ह्या प्रश्नावरील दृष्टिकोण फारसा प्रगत झाला नाही. हे आज प्रत्ययास येत आहे. रिपब्लिकन आणि नवकाँग्रेस यांची केवळ निवडणूकप्रधान युती होऊन चालणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या प्रश्नात त्यांच्यासारखी जिद्द धरून त्याच्या अनुयायांनी स्वप्रयत्न करून संघटित प्रयन्तही केले पाहिजेत. त्यांच्यासारखे पांडित्य व चौकस बुद्धी कमाविली पाहिजे. फुल्यांचे नाव घेऊन फक्त इकडे राजकीय सत्ताप्रधान युती घडवून आणली म्हणजे बहुजनसमाजाच्या आधुनिक नेतृत्वाचा कार्यभाग संपला व यशस्वी झाला, हा देखील भ्रम होय. हे दर्शविण्यासाठीच येथे ‘कर्मवीर शिंदे व दलितांचा प्रश्न’ असा जोड विषय घेणे जरूर वाटले व त्यांचा त्याग, कामगिरी व व्यापक दृष्टी यांच्या अनुषंगाने व संदर्भाने विचारप्रंपच केला आहे. स्वसमाजाचे त्यांनी नेतृत्व घेतले असते तर त्या काळात त्यांना मंत्रीपदे अशक्य नव्हती. सरकारने देऊ केलेले किताबही त्यांनी परत केले. त्यांचे उदाहरण, त्यांची स्मृती मागे पडली; म्हणजे दलितांचा प्रश्न मागे पडला. सांस्कृतिक ऐक्यासंबंधी अखिल भारतीय विचार होण्याची आज स्वातंत्र्यात गरज आहे. चालू इतर राजकीय ज्वलन्त व वर्तमान प्रश्नांची तीव्रता वाढत आहे, तरी गतकाळाप्रमाणे हा प्रश्न उपेक्षित राहिल तर आणखी बरेवाईट परिणाम पुढे होतीलच, म्हणून राष्ट्रीय व आर्थिक समानतेच्या विचारातून आगेकूच झाली पाहिजे.

### ह्या प्रश्नाची प्रगती व यश

यापुढील प्रगती, विद्यमान, लोकशाही मूल्यांचा विकास, निधर्मी धोरण (म्हणजे सर्वधर्मसमभावी  धोरण), शिक्षण, पंचवार्षिक योजना या सर्व स्वातंत्र्योत्तर नव्या विचारमूल्यांतून होणार आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजना आखताना त्यातून दलित व आदिवासी आणि भटके वर्ग यांच्या विकासाचा मोठ्या प्रमाणात योजनाबद्ध अंतर्भाव झाला पाहिजे. मागील इतिहास कोणत्याही प्रश्नांवर काही मर्यादित अनुभव सूचित करील, पण क्रांतिकारक बदलासाठी नवे क्रांतिकारक पवित्रे, आर्थिक व विकासात्मक योजनेतून घ्यावे लागतील. भारतीय सर्वच समाज एकरस होण्यासाठी व स्वातंत्र्यातून एक नवराष्ट्र निर्मितीसाठी शिक्षण व लोकशाही या मूल्यातून क्रांतिकारक बदल होण्याचे मार्ग पत्करले पाहिजेत. या मार्गातून गेल्या शतकात झालेल्या नव प्रबोधनाला यश मिळवून देता येईल. तळातील विविध दलितांची ‘गरीबी हटली’ तर राष्ट्रीय दारिद्र्याची व दलितांचाही प्रश्न संपत आला, असे समीकरण सिद्ध होईल.

अनुक्रमणिका

## १२.

# 'मराठा' संस्कृतीची व्यापक आवृत्ती

या विषयावर मराठी वृत्तपत्रसृष्टीत बहुत टीका येऊन गेली आहे. 'जो जो निंदा। तो तो शक्ति वाढे बळ।' या न्यायाने श्री. शिवरायांचा कीर्तीसूर्य अधिकाधिक तेजस्वी होऊन त्याचा प्रकाश लांबवर उत्तरोत्तर मार्गक्रमशा करीत आहे. महाराष्ट्र म्हणजे शिवाजी महाराज. शिवप्रताप वगळला तर मराठ्यांचा इतिहासच उरत नाही. मराठ्यांची कीर्ती, इभ्रत व दरारा या सर्वांचा पाया शिवाजी चरित्रातच आढळतो. संतांच्या समतावादी थोर तपस्येला आलेले सुंदर फळ म्हणजे छत्रपती शिवाजी ही विभूती होय. शिवाजीची थोरवी वाखाणावी तितकी थोडी आहे. उपकार व ऋण यांचे जेवढे स्मरण कृतज्ञतेने करावे तितके सर्व अपुरे होय. खुद्द रामदासांनी शिवरायाची मुक्तकंठाने स्तुती साहजिकपणाने केली आहे. उत्तम पुरुष किंवा पुरुषोत्तम या पदवीने श्री. शिवरायांची आरती किंवा स्तुती रामदासांनी केली आहे.

परकीय आक्रमणाच्या लाटेतून ब्राह्मण उरले . देवळे तीर्थक्षेत्रे सहीसलामत राहिली.  ब्राह्मण निर्भय राहिले. त्यांना संरक्षण मिळाले व एकूण सर्व बाबतीत नवयुग नवप्रभात जन्मास आली. 'म्हणून हर्षभरे श्री रामदास या आनंदवनभुवनात काव्य व संचार करिते झाले. त्यांचेच विविध उद्‌गार नवयुगप्रभात झाली म्हणून ग्वाही देत राहिले आहेत.

### सुराज्य आले!

श्री. शिवरायांच्या प्रभावामुळे फक्त नामधारी स्वतंत्र्य किंवा स्वराज्यच आले नाही तर सुराज्य आले. जनता आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक व धार्मिकदृष्ट्या अधिक निर्भय, अधिक आत्मविश्वासी व आनंदी झाली. सर्व बाबतीत रंकापासून रावांपर्यंत, ब्राह्मणांपासून शूद्रातीशूद्रांपर्यंत, समाजाच्या सर्व थरांना स्वास्थ्य लाभले. भाग्याची व अभिमानाची प्रचीती श्री. शिवरायांनी आणून दिली. मुसलमानादी यवन समजले गेलेले लोकही आनंदाने नांदू लागले. खऱ्या निधर्मी सुराज्याची प्रचीती आली. आणखी कसले नवयुग यावयाचे राहिले होते?

### श्री. टिळकांची स्फूर्तिदेवता

शिवकालात शिवाजी ही व्यक्ती प्रभावी होती. एवढेचे नव्हे तर त्यानंतरच्या काळातही शिवाजी-चरित्र अखिल महाराष्ट्राला स्फूर्ती देण्याचे महत्त्वाचे कार्य करीत असते. लोकमान्य टिळकांना शिवचरित्रापासून स्फूर्ती मिळाली. शिवरायाचे स्मरण स्वराज्यसंपादन मार्गात उत्साहजनक ठरेल. म्हणूनच त्यांनी 'श्री. शिवाजी उत्सव' व 'रायगड स्मारक योजना' इत्यादी कार्यांना चांगली चालना दिली. न्यायमूर्ती रानडे यानीही मराठ्यांच्या उदयावर इंग्रजीत सर्वोत्कृष्ट ग्रंथ तयार केला. 'मराठ्यांच्या विषयी चार शब्द' नामक पुस्तकात श्री. राजारामशास्त्री भागवत यांनीही मराठ्यांच्या विषयी आदर व्यक्त केला. प. वा. श्री. टिळक स्वतःला मराठे समजत व 'मराठा' नावाचे एक इंग्रजी पत्र त्यांनी चालू केले.

अनुक्रमणिका

**फुले-फडके**

जोतीराव फुले यांनाही शिवचरित्रापासून स्फूर्ती मिळाली. इंग्रजांना हाकलून लावण्याच्या इराद्याने त्यांनी दांडपट्टा-गोळीबार इत्यादी लष्करी शिक्षण वासुदेव बळवंत फडके यांचेबरोबर लहुजी मांगाच्या आखाड्यात घेतले. फुले-फडके यांच्या लष्करी खेळात व मर्दानी सांघिक सामन्यात कधीकधी टिळकही तरुणपणी जात येत असत! रायगडावरील शिवसमाधीचा शोध व जीर्णोद्धार ह्या स्वाभिमानी खेळातूनच प्रथम उगम पावला. शिवाजीने मावळे जमवून राज्य मिळविले. तसेच आपण रामोशी लोकांचा संघ तयार करून राज्य परत मिळवू शकू, असा कयास फडके यांनी बांधला होता. फुल्यांना हा मार्ग नापसंत होता. ते मोठे धोरणी व दूरदर्शी होते. टिळक व फडके यांचे मार्ग त्यांना आवडत नव्हते. तरी मित्रत्वाचे साह्य त्यांनी त्यांना केले. "स्वराज्य हा माझ्या जन्मसिद्ध हक्क आहे." अशी धीर घोषणा टिळक शिवाजीपासून स्फूर्ती घेऊनच, या कणखर महाराष्ट्रात उच्चारू शकले. शिवाजी म्हणजे महाराष्ट्राचे हृदय, शिवाजी म्हणजे मराठा संस्कृतीचा प्राण. अशा थोर पुरुषाचा परिचय व्हावा म्हणून जोतीरावांनी इ. स. १८६९ साली शिवाजीचा आठ चौकी सुंदर व स्वतंत्र पोवाडा करून प्रथम प्रसिद्ध केला. सांगण्याचे तात्पर्य हे की शिवाजीचे चरित्र त्याच्यानंतर होऊन गेलेल्या विविध श्रेष्ठ पुरुषांना आदर्श म्हणून उपयोगी पडले व पडेल.

**परकीयांकडून गौरव**

शिवचरित्र महाराष्ट्राचे मानकेंद्र आहे. एवढेच नव्हे तर अनेक परकीयांनी या महापुरुषाची योग्यता मुक्त कंठाने मान्य केली आहे. उदारता, सर्वसंग्राहकता, धर्मसमन्वय, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, मुत्सद्दीपणा व शौर्य इत्यादी मौलिक गुणांची शिवरायाच्या अतुल कामगिरीमुळे महाराष्ट्र संस्कृतीत भर पडली. कोणीही महाराष्ट्रीयास, कोणत्याही फालतूक कारणामुळे श्री. शिवरायास शिरसावंद्य मानण्यास लज्जा वाटावी, हे त्या दुर्दैवी महाराष्ट्रीयांचे अभाग्य होय. त्याचे ते संपूर्ण करंटेपण होय! असा कोणीही इसम लोकोपवादास कारणीभूत झाला तर त्यात आश्चर्यच नाही; कारण महाराष्ट्र जात्याच बुद्धिवादी व स्वाभिमानी आहे.

**मराठा संस्कृतीची व्यापक आवृत्ती**

महाराष्ट्रात मराठा नामक जात आहे. नव्हे, तो एक बहुजनसमाज आहे. स्वतंत्र भाषा, भागवतधर्माची स्वतंत्र परंपरा व सह्याद्रीचे नैसर्गिक वेष्टन यामुळे महाराष्ट्र निसर्गतः धन्य व रमणीय झाला आहे. शिवरायांच्या जीवनकार्यामुळे मराठेतरही मराठे म्हणून घेऊ लागले. महाराष्ट्रात कोणत्याही जातीच्या माणसात प्रांताबाहेरचे 'मराठा' म्हणून ओळखतात. पानिपतावर मराठे म्हणूनच लढले. 'मराठे' या व्यापक संज्ञेत मराठी भाषा बोलणाऱ्या अनेक जाती-उपजातींचा व तत्समांचा समावेश होतो. 'मराठे लोकांची जी भाषा ती मराठी भाषा' अशी एक मराठी भाषेची बालबोध व स्पष्ट व्याख्या होऊ शकते! अठरापगड साधुसंतांच्या अभंग वाङ्मयामुळे या भाषेच्या कणखर साहित्याचा पाया घातला गेला. श्री. रामदास यांचे उपास्य व त्यांचा पंथ स्वतंत्र होता. हा अलगपणा येथील सामाजिक तुसडेपणाने निर्माण झाला होता व वेळोवेळी होतो. याच कारणामुळे महाराष्ट्र दुभंगतो, ऐनजिनशी राहात नाही. तथापि रामदासांचे व संतादिकांचे तत्त्वज्ञान एकच होते. हे सर्वच प्रवाह महाराष्ट्राचे आनंदवनभुवन व्हावे म्हणून कमीअधिक प्रमाणे साह्यभूत झाले व मराठी इतिहास यांची घडण

घडली. शिवराय या सर्व प्रयत्नांचा पुढचा कळस होय. कारण दूरगामी परिणाम घडवत राहणारी ती महान व्यक्ती झाली. तिच्याचमुळे अखिल मराठा समाजास राष्ट्रीय इभ्रत प्राप्त झाली व सामाजिक मध्यवर्ती असा महत्त्वाचा दर्जा प्राप्त झाला, भविष्यकाळाची आशा करण्यास जागा झाली. कोणत्याही समाजाचा अगर राष्ट्राचा भाग्योदय व्हावयाचा झाल्यास त्या समाजात अथवा एकूण राष्ट्रात थोर पुरुष निपजणे क्रमप्राप्त असते. योग्य नेते न लाभल्यास अधःपातच होतो. नवयुगप्रवर्तक पुरुष व संत निर्माण व्हावे लागतात.

**शेतकरी कामकरी राज्य**

नाना पक्षोपपक्ष शेतकरी कामकरी राज्याची भाषा बरळतात! पण नांगऱ्या लोकांना सैनिक, शिलेदार, सुभेदार, सेनापती इत्यादी बनवून शिवरायांनी प्रत्यक्ष 'शेतकरी कामकरी राज्य' प्रत्यक्षात आणले. केवळ स्वप्न म्हणून तो भास नव्हता. जमिनीचे मालक म्हणजे कसणारे क्षेत्रपती (क्षेत्र-शेत) यांच्या ताब्यात सत्ता आली, इडापीडा टळली व बळीराज्य आले. हे वैशिष्ट्य भारताच्या चालू स्वराज्याला वरीलप्रमाणे शेतकरी कामकरी राज्य म्हणता येईल काय?

**श्रीशिवबाचा 'बहुजनसमाज'**

आजचा बहुजनसमाज प्रभावी नेतृत्वाचे अभावामुळे असंघटित, अज्ञानपंकात रुतलेला दिसून येतो. दूरदर्शी दृष्टीचे नेतृत्व त्यास प्राप्त झालेले नाही. शिवरायाचे स्मरण मार्गदर्शन करील. मात्र चालू काळानुसार शिवरायाच्या गुणांचे मनन झाले पाहिजे. केवळ बाह्य मूर्तीपूजा किंवा अवतारवाद अथवा विभूतीवाद यांना कवटाळण्यात अर्थ नाही. शिवबाचे स्मरण करण्यात प्रांतीयतेचे पाप कोणत्याच प्रकारे घडत नाही. जातीयतेच्या पापाचा येथे तर संबंधच येत नाही. ब्राह्मणापासून ते थेट अगदी खोलापर्यंत म्हणा, शिवबा सर्वांना सारखा आवडता आहे. हिंदुत्वाची जागती ज्योत, ब्राह्मण-ब्राह्मणेतर ऐक्यास साह्यभूत होणारी दृष्टी, परधर्मसहिष्णुता इत्यादी मौलिक गुणांचा शिवचरित्रात समुच्चय झाला आहे. महाराष्ट्राचे संयुक्ततेस सतत स्फूर्ती पुरविण्याची शक्ती शिवचरित्रात खास आहे. बहुजनसमाजाने आपल्या मागासलेपणाचा जबाबदारी दुसऱ्यावर न लादता, आत्मपरीक्षणाने व स्वावलंबनाने वर्तमान व भविष्यकाळ आता घडविला पाहिजे. पुष्कळ वेळा हरिजन वर्गात संघटित आघाडी दिसून येते तशी संघटना व जागृती मध्यम बहुजनसमाजात आढळत नाही. भाऊबंदकी, परस्पर बेबनाव, वैयक्तिक ईर्षा व महत्त्वाकांक्षा, राष्ट्रीय व सांघिक दृष्टीचा परंपरागत अभाव, विधायक कार्ये, संस्था व पक्ष सतत चालवण्याची कुवत नसणे इत्यादी अनेक दोष आहेत. त्यामुळे कालमानानुसार बदलणाऱ्या व संधी जाणणाऱ्या लहानलहान बुद्धिशाली जमातीचे अधिराज्य बहुजनसमाजाच्या मानगुटीवर हरएक काळात कायमच असते, बहुजनसमाज हे एक खेळणे होते. गुलामी निर्माण होते. म्हणून शिवरायाच्या अनेक गुणांचे चिंतन योग्य आहे. सहिष्णुवृत्तीच्या बरोबर जयिष्णुवृत्ती शिवबाचे चरित्रात एकवटली आहे. पराक्रम पूर्ण धर्माभिमानाबरोबर सर्व-धर्म-प्रेम व सर्व-संत-समभाव शिवरायाच्या स्वभावात दिसून येतो. हिंदुत्वाचे रक्षण व वाढ, शिवरायाच्या वरील पावित्र्याचे अनुकरण केल्यासच होईल. आकुंचित जातिभाव व सांप्रदायिकदृष्टी सोडण्यातच शिवबाचे खरे स्मरण आहे व खरा हिंदुत्ववादाचा पुरस्कार आहे.

अनुक्रमणिका

## नवयुगनिर्माते पुरुष

बहुजनसमाजाचे उन्नतीचा इतिहास अवलोकिल्यास भगवान बुद्ध, महावीर, तुकाराम, शिवाजी व जोतिबा फुले नवयुगनिर्माते पुरुष होऊन गेले. बुद्धानंतर मौर्य व अशोकादी राजांची थोर साम्राज्ये झाली. ऐहिक भरभराट, कलाकौशल्य व सुबत्ता यांची या काळात रेलचेल झाली, हाच काळ म्हणजे सुवर्णयुग होय. याच वेळी भरतभूमी म्हणून गौरविली गेली. बुद्धावर व संतांवर अनेक आक्षेप आणण्यात येतात. पण ते निष्फळ आहेत. तुकारामाचे वेळी मराठी राज्य आले व वाढले. जोतिबा फुले यांच्यानंतर बहुजनसमाजास धार्मिक व सामाजिक विषमतेविरुद्ध सामाजिक लढा देण्यास स्फूर्ती व सामर्थ्य आले. या सर्व चळवळीमुळे बहुजनसमाज प्रगत झाला व त्यास पुढे पाऊल टाकण्यास इतिहासाचा आधार मिळाला. या युगप्रवर्तकांचे कार्य नेटास लावणारी पिढी अद्याप निपजावयाची आहे.

## नवयुग व क्रांती

नवयुग किंवा क्रांती म्हणजे शब्दच फक्त नव्हेत. प्रत्यक्ष परिचय किंवा व्यवहारात दाखला आला पाहिजे. एक सरकार बदलून केवळ दुसरे कोणतेही सरकार आले म्हणजे नवयुग आले नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, तिचे गोडवे गाण्यास फार थोडा अवसर मिळेल. विधायकता, एकता व राष्ट्रीय उन्नतीच्या व्यावहारिक योजना केवळ दृष्टीतही नाहीत. प्रत्येक व्यक्तीच्या व पक्षोपपक्षांचा व सार्वजनिक सक्रिय हातभार लागला पाहिजे. परस्पर व अंतर्गत शुष्क दोषाविष्करण, यादवी, लाथाळी, छिद्रान्वेषी धोरण, सत्ताभिलाषा इत्यादी प्रचलित सार्वत्रिक दोष नवयुग येण्याच्या मार्गात पर्वताप्रमाणे उभे आहेत. म. गांधींनतर नवयुग म्हणजे स्वप्न ठरले आहे हे दुर्दैव होय.

## शिवरायाचा आदर्श

अशा वरील विपरीत परिस्थितीत कोणत्याही सरकारास शिवरायाचे खंबीर धोरण, निश्चित पवित्रा, लोकशाही निधर्मी दृष्टी इत्यादी सद्गुण आदर्श म्हणूनच उपयोगी ठरतील व कोणाही व्यक्तीस ते मार्गदर्शन करू शकतील. म्हणूनच या शककर्त्याचे स्मरण कर्तव्याचे ठरते.

अनुक्रमणिका

१३.

## सामाजिक व्याकरणातील 'मागासलेपण'

शालान्त परीक्षेतील वरच्या क्रमांकाची नावे अनेकांनी वाचली आहेत. त्यातून एक बाब स्पष्ट होते की, जरी बहुजनसमाजात शिक्षणाचा थोडाफार प्रसार एका शतकानंतर वाढला आहे, तरी स्पर्धात्मक व उच्च क्रमांकात ग्रामीण व बहुजनसमाजातील विद्यार्थी आढळत नाहीत. आढळले तरी ते फारच अपवादात्मक होत. या परिस्थितीचा विचार केला पाहिजे असे वाटते. या विषयावर विचार प्रदर्शित करताना जातीयतेचा आरोपही सहन करणे क्रमप्राप्त आहे; अटळ आहे. कारण प्रत्यक्ष लोकव्यवहारात विषमतामूलक जातिसंस्था व सामाजिक रचना अस्तित्वात आहे. जातिवर्ण जाऊन वर्गात्मक समाजरचना येथे फारशी नाही. विद्याक्षेत्रात विद्यमान बहुजन समाज मागेच आहे व आता त्याने आपली फार प्रगती होऊन चुकली आहे अशा खोट्या भ्रमात राहणे भयावह ठरेल, हे येथे प्रामुख्याने सांगावयाचे आहे.

### ग्रामीण विद्यार्थ्यांची अनुपस्थिती

म. फुले ते डॉ. आंबेडकर यांच्या अखेरपर्यंत पुष्कळांनी विषमतेतून निसटून विद्या व सुधर्म यांच्याद्वारे आपला सामाजिक विकास व समान दर्जा प्राप्त करून घ्यावा म्हणून फार प्रयत्न केले. इतके स्वार्थत्यागी आणि बिनसरकारी प्रयत्न होऊनही विद्येत बहुजनसमाज मागे आहे, असे निरीक्षणपूर्वक पाहिल्यास दिसेल. सामाजिक प्रगतीची आस्था असणाऱ्यांना त्यामुळे अचंबा व खेदही वाटेल. मूठभर बुद्धिजीवी व त्यांच्या परंपरागत संस्कारांच्या प्रभावामुळेच काळजीपूर्वक प्रत्येक परीक्षेत पुढे असतात व बहुजनसमाजातील ग्रामीण विभागातले विद्यार्थी यांची अनुपस्थिती जाणवते; म्हणून या मागासलेपणाची जाणीव करून देणे जरूर होय.

आज बहुजनसमाजाचे राज्य झाले आहे. सत्ता त्यांच्या हातात आहे. सहकारी चळवळ व जमिनीची मालकी त्यांच्याकडे आली आहे. मग आता राहिले काय? सर्व झाले. प्रगती झाली. होऊन चुकली. असे दिवास्वप्न पाहणारे लोक शहरी पांढरपेशात अधिक आहेत. बहुजनसमाजातील विचारवंत तर आत्मोद्धार स्वात्मभाव, आत्मपरीक्षण, प्रगतीचा आढावा या दृष्टीने विचारआचार करणे म्हणजे 'जातीयता' असा भाव-भोळी श्रद्धा-बाळगून आहेत. वस्तुस्थिती त्यांना ठाऊक आहे. उमजते, जाणवते, कळते व समजतेही. पण आपणास अराष्ट्रीय व जातीय म्हणतील आणि स्वतःच्या सत्तास्थानाला ते परवडणार नाही, असे त्यांना जाणून घेऊन वागावे लागते. ते याप्रमाणे यशस्वीपणे वागतातही! पण दहावीस लोक मंत्री झाले, कित्येक उपमंत्री झाले म्हणजे सत्ता हाती आलीच असे नव्हे. नोकरशाही आर. एस. एस.च्या भावनेची व नोकरशाहीतील बरेच वरचे-खालचे, या नाही त्या कारणाने आतून विरोधी तटस्थ असल्याने सत्ताधाऱ्यांची सत्ता व नोकरशाहीची चौकट यांची सुसंगती आढळणे कठीण जाते. या सर्व वस्तुस्थितीमुळे छत्रपतींचे-मराठा तत्समांचे-राज्य झाले आहे; हा भ्रम आहे. राज्य होऊनही (वरीलप्रमाणे मंत्रिपदे मिळवूनही) शेतकरी, कामकरी, हरीजन, बौद्ध वगैरेंनी तयार होणारा स्त्रियांचा जनसमूह व बहुजनसमाज विद्याक्षेत्रात, तांत्रिक व उच्च महाविद्यालयीन शिक्षणात वैद्यकीय व कायदे वगैरेंच्या क्षेत्रात मागे आहे. हे वरील मंत्रिपदे वाहणाऱ्याना व निरीक्षकाना सहज दिसेल. बाराशे रुपयांच्या उत्पन्नाची सवलत व रयत शिक्षण संस्थेसारख्या अनेक लहानमोठ्या शिक्षण संस्थांमुळे शिक्षणप्रसार

अनुक्रमणिका

वाढला आहे. काहीच प्रगती झाली नाही; म. फुल्यांचा काळ होता तोच आताही राहिला आहे; असे मात्र येथे मुळीच म्हणावयाचे नाही. झालेली प्रगती थिटी, अपुरी व लोकसंख्येच्या मानाने असमाधानकारक आहे; एवढेच मुख्यतः सांगावयाचे आहे; व वचारिक जागृती तरी व्हावी असा मनोदय आहे. पालक जागृत झाले पाहिजेत.

**दर्जेदार यशाची गरज**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विकेंद्रित पंचायत परिषदांच्या ताब्यात आहे. म्हणजे बहुजन समाजाच्या शिक्षणासंबंधी ग्रामीण शिक्षणावर हल्ली परिषदांचा ताबा आहे. शिक्षण, शेती आणि सहकार यांच्या बाबतीत जरी विशुद्ध योजनाबद्ध प्रयत्न झाले तरी प्रगतीची पुष्कळ वाटचाल करता येईल. जिल्हा परिषदांनी, ग्रामीण विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या परीक्षांतून उत्तम रीतीने उत्तीर्ण व्हावे, दर्जेदार यश मिळवावे, त्यासाठी विविध प्रकारची विद्यावेतने पारितोषिके आणि रोख बक्षिसे यांची योजना आखावी. गावकऱ्यांनी देखील जत्रा-देवस्थाने वगैरेंसंबंधी गावकऱ्यांची जी रक्कम गोळा होते त्यातून वरील प्रकारचा मर्यादित का होईना प्रयत्न करावा; गुणवत्ता वाढवावी.

देव-देवऋषी, बुवा, ज्योतिष, अंगात आणणे, देव घालणे, नवस-सायास, जत्राचार, करणी व मूठ, मंत्र, तंत्र इ. भोळाभावसंवर्धक विचारसरणी खेड्यापाड्यांत दबून राहिली आहे. त्यामुळे धर्मसंबंधात भोळ्या प्रकारे फार खर्च येतो. लोक बुडतात. या बाबतीत गेल्या पिढीच्या सत्यशोधकानी बरीच वैचारिक जागृती केली. पण ती थांबली म्हणून दुर्दैवाने भोळाभाव तसाच राहिला आहे. कारण त्याला परंपरावादाचा, रूढीचा, सामान्य लोकव्यवहाराचा व वाडवडिलांच्या चालीरीतीचा घट्ट पाठिंबा आहे. राजकीय सत्ता ग्रहण करूनही हा भोळाभाव व हे दारुण अज्ञान सामान्यजन समाजाला सोडता येत नाही. हा पराभव बहुजनसमाजातील जबाबदार व लोकप्रतिनिधींना मान्य करावा लागेल. विज्ञानात्मक दृष्टिकोण वाढेल आणि दैववाद बळावला जाणार नाही; असे खास बिनसराकारी उत्स्फूर्त प्रयत्न जनतेतून झाले पाहिजेत. सत्तेतून राजकारणातूनच सर्व साधणारे नाही. विद्येतील मागासलेपण व विज्ञानविन्मुखता ही जी दिसून येतात त्याचे कारण वरील अंतर्गत सनातनी प्रकारची विलक्षण छाप होय. खेड्यातील दृश्य अस्पृश्यता देखील बहुजनसमाजातील सनातनीपणामुळे शिल्लक आहे. विद्याप्रसार, प्रगत आणि प्रबुद्ध धर्माद्वारे विकास शक्य आहे असे विचार मांडून हा द्विविध मार्ग डॉ. आंबेडकर, म. फुले यांनी दाखवून ठेवला आहे. त्या मार्गाने सर्वच ग्रामीण जनतेला गेल्याशिवाय गती व प्रगती नाही. सर्व मानवाना निसर्गतः बुद्धीची देणगी मिळाली आहे. तिचा विकास मात्र त्यांनी केला पाहिजे. वृद्धावस्थेही भोळाभाव नाहीसा व्हावा म्हणून श्री. माधवराव बागलासारखी माणसे विचारप्रवर्तन करताना आढळतात. कारण याप्रकारचे शिक्षण जनसमाजाला आजही गरजेचे आहे व याप्रकारचे ज्ञानविषयक शिक्षण नष्टविण्यासाठी पाहिजे आहे. विद्या व ज्ञानविषयक मागासलेपण हे सर्वच मागासलेपणाला जन्म देते. सत्यशोधनाचा विकास झाला पाहिजे.

अनुक्रमणिका

**श्रम-शिक्षण यांचा विग्रह नको**

कर्मवीर शिंदे, भास्करराव जाधव, डॉ. आंबेडकर, श्री. सी. रा. तावडे, कविवर्य वि. द. घाटे, डॉ. पी. सी. पाटील, श्री. बाबूराव जगताप इत्यादींनी ज्ञानसाधना करून ते आदर्श विद्यार्थी झाले. त्यांची चरित्रे नव्या पिढीने पाहिली पाहिजेत. राजकारण म्हणजेच सर्व विकास व सर्वांगीण प्रगती नव्हे.

उच्च प्रतीच्या शिक्षणाचा अभाव असल्यामुळे साहित्यात व नियतकालिकसृष्टीत ग्रामीण समाज मागे आहे. विद्वत्तेचे क्षेत्र, पांडित्य यांना बहुसंख्याक समाज अजून पारखा आहे. खेड्यापाड्यातील शिक्षणामधून संस्कृत शिक्षणाचाही प्रसार झाला पाहिजे. इंग्रजी, गणित स्वभावेबरोबर चांगले होणे जरूर आहे.

जनतेचे शिक्षण, ग्रामीण शिक्षण संस्थांच्या अडीअडचणी, उच्च विद्यालयीन शिक्षण क्षेत्रात त्यांच्यासाठी राखीव जागा व सुलभ प्रवेश वगैरे दृष्टीने शिक्षणाच्या क्षेत्रात आजही विचार व परिषदा यांची गरज वाटते. ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांच्या शेतीविषयक शिक्षणाची सोय अपुरी आहे. श्रम व शिक्षण यांचा विग्रह होता कामा नये. कष्टाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळले पाहिजे. ग्रामीण भागात काही खास अडचणी व वेगळ्या गरजा असतात. त्या शहरी लोकांना फारशा उमजत नाहीत. शाळा बहुधा देवळात, चावडीत व अपुऱ्या जागेत भरतात. क्रीडांगणे नसतात. वगैरे कितीतरी अडचणी असतात. ऐतिहासिक व सामाजिक वादविवाद व पूर्वग्रह दूर ठेवून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या विकासासाठी खास प्रयत्नांची गरज आहे व त्या दृष्टीने विशेष वाटचाल करणे क्रमप्राप्त आहे. विविध परीक्षांचे निकाल व त्यातील बहुसंख्याक वर्गाची उच्च श्रेणीतील गैरहजेरी पाहता, एवढे तरी मान्य करणे कोणासही भाग होईल. उच्च श्रेणी, उच्चांक व दर्जेदार यश यात ग्रामीण विद्यार्थी मागासलेला राहू नये. जर त्याचे स्थान सामान्य व सर्वसामान्य मामुली यशात राहील तर तो प्रशासन व्यवस्थेत व सरकारी यंत्रणेतही मागासलेला राहील. याप्रकारचे विचारचालन आता कित्येक बहुजनसमाजातील जाणते म्हणविणाऱ्यांनाही कालबाह्य व अस्थानी वाटण्यासारखे असते. मागील व गेल्या पिढीने स्थापन केलेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन व मराठा शिक्षण परिषद व ठिकठिकाणचे तत्सम विद्याप्रसारक समाज यांच्या अभिवृद्धीसाठी लोकसंख्येच्या मानाने समर्पित कार्यकर्ते यावेत, तसे पुढे आले नाहीत. वयोमानानुसार हे विद्याप्रसारक यत्न तसे वाढविलेले आढळत नाही. कोणत्याही परिषदांचे वार्षिक अधिवेशन झाले नाही. म्हणजे या उपक्रमात थंडाई आहे असा निष्कर्ष निघतो. या शिक्षण परिषदेला अजून पुष्कळ विचार करता येईल.

**बहुजन समाजाची व्याप्ती**

पुण्यामुंबईच्या वृत्तपत्रांतून व प्रतिष्ठित नियतकालिकांतून महाराष्ट्र मागे का आहे याची सांगोपांग चर्चा चालते. सर्वसामान्य समाज व ग्रामीण विभागातील जनता मागे आहे म्हणून ओघानेच महाराष्ट्र मागे आहे, अशा प्रकारचा सिद्धांत उभयपक्षी मान्य करावा लागतो. बहुजनसमाज विद्येत पुढारलेला आहे किंवा तो पुढारलेल्यांचाही पुढे चालला आहे असे म्हणता यावयाचे नाही. किंवा त्यांच्या हातात सत्ता आली आहे म्हणून त्याला पुढारलेला होण्याचा मार्ग सापडला आहे; असेही केवळ नव्हे! सत्तेशिवाय शहाणपण नाही खरे. फार काय सत्तेशिवाय सत्यालाही व्यावहारिक प्रतिष्ठा नाही हे देखील अनुभविक सत्य होय. सत्तास्पर्धा व सत्ता टिकविण्यातच सर्व शक्ती खर्च झाली तर मग उपयोग थोडाच! अशा स्थितीत प्रगती थोडी होत असते. बहुजनसमाजाची

अनुक्रमणिका

विद्याविषयक अवस्था अशी तर मग आदिवासी व वन्य जमाती वगैरेपर्यंत शिक्षण गेले नाही यात नवल काय? म. फुले यांच्या बहुजनसमाजाची व्याप्ती अगदी गोरगरीब, हीनदीन व पिळले जाणारे सर्वच लोक यांना समावेशून घेणारी होती. बहुजनसमाजातील विद्याविभूषित साहित्यक म्हणून स्त्रिया देखील फारच थोड्या! प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला, समानसंधी मिळाली, बाराशे रुपयांच्या उत्पन्नाची सवलत मिळाली; म्हणजे दर्जा व समान दर्जा प्राप्त झाला असे नव्हे. अजून कित्येक खात्यांतून वरिष्ठ म्हणविणाऱ्यांचे प्रमाण फार आहे. आर्थिक क्षेत्रात श्रीमंत श्रीमंतच झाले व गरीब अधिक गरीब होत चालले. हीच अवस्था शिक्षणक्षेत्रात साहजिकच आढळते. साहित्यातील त्यांचा प्रपंच वाढला. पुढारलेल्यांचे विचार, साहित्य त्यांच्याच जीवनाची प्रतिबिंबे म्हणजे मराठी भाषा व साहित्य अशी व्याख्या आणि सामाजिक व्याकरण होऊन चुकले आहे.

**आवश्यक प्रयत्न करणे क्रमप्राप्त**

मागासलेपणाबद्दल व अंतर्गत यादवी यासंबंधात इंग्रजाला जबाबदार धरण्याची चाल होती. याप्रमाणेच मागासलेपणाबद्दल सर्वथैव पुढारलेल्यांना जबाबदार धरण्याची चालरीत येथे पुढे चालविण्याचा इरादा नाही. किंवा बहुजनसमाजातील विविध जातीजमाती वर्गातील मंत्री झाले म्हणजे सर्वसामान्य गरीब जनता सुधारली असेही म्हणायचे नाही. केवळ राष्ट्रवादातून सर्व प्रश्न सुटणार नाहीत. सर्वच प्रांतात समान परिस्थिती नाही.

सामाजिक एकरसता निर्माण होईपर्यंत वेगवेगळ्या सामाजिक थरानी सामाजिक सुधारणा व पुढारलेले होण्यासाठी स्वजबाबदारीवर सरकारद्वारे, स्वावलंबनेही जरूर प्रयत्न करणे क्रमप्राप्त ठरते. उदाहरणार्थ 'श्वेतापत्रिका' ही शिक्षणविषयक 'कृष्णपत्रिका' आहे असा आवाज उठवावा लागलाच. ह्या तथाकथित श्वेतपत्रिकेचे पुढे काय झाले ते कळले नाही. जनतेच्या प्रतिनिधींना स्वालंबनाने बहुजनता शिक्षणक्षेत्रात पुढे येईल व ग्रामीण शिक्षणाचा दर्जा वाढेल अशी समानसंधीयुक्त खरी श्वेतपत्रिका मांडली पाहिजे.

अनुक्रमणिका

१४.

## '॥ चंदनाचे हात, पायही चंदन॥'

निराश्रितांचा कैवार घेणारे संपादक धन्य होत.

**आद्य संपादक**

कै. कृष्णराव पांडुरंग भालेकर (जन्म १८५०- मृत्यू ७ मे १९१०) यांच्याकडे बहुजनवादी साप्ताहिक सर्वप्रथम प्रत्यक्ष चालू करण्याचा मान जातो. यांचे वडील पांडुरंगराव डिस्ट्रिक्ट कोर्टात सरकारी नोकर होते. कृष्णरावांच्या कवितामध्ये ठिकठिकाणी ईश्वरस्तवन आहे, त्यात एकमेव परमेश्वराला अनेक ठिकाणी 'दीनबंधू' म्हणून प्रार्थिले आहे. म. फुले ह्यांना जे महत्त्व होते व आहे आणि पुढेही राहील, त्याचे कारण त्यांनी सत्यशोधक हे व्यापक नाव ठेवून 'नवसमाज' संस्थापिला. ही घटना व ही मंडळी लोकशाही पद्धतीची होती. या मंडळाला 'निबंधमाला'कार यांनी 'सत्यार्थी मंडळी' म्हणून स्वतःच संबोधिले आहे. विद्याप्रसाराचा उद्देश तर त्यांना फारच आवडला. त्यांची सर्वच टीका सर्वथा त्याज्य नाही. सर्वांशी अप्रमाण नाही.

कृष्णरावांचे शिक्षण पुणे रविवार पेठेतील मिशन स्कूलमध्ये झाले. यांचे शिक्षण इंग्रजी सहावी पर्यंतच झाले होते. म. जोतिबा यांनी बायबल व ख्रिस्तीधर्म यांचे सखोल व व्यापक अध्ययन केले होते. कृष्णरावांची अनेक पुस्तके व कविता उपलब्ध आहेत. पण कृष्णरावावर ख्रिस्तीधर्माचा पगडा पडला नाही. याचे कारण वडिलांची वारकरी परंपरा. तरी १८७४ साली ते पुणे सत्यशोधक समाजात दाखल झाले. मुंबई कामाठीपुऱ्यातील तेलगू श्रीमंत व कळकळीच्या पुढाऱ्यानी, पुणे सत्यशोधक समाजाकडे अदमासे १,८०० रुपयांचा छापखाना इ. स. १८७५ साली पाठविला. म्हणून हा मूळ प्रारंभ. पत्र काढावे म्हणून पुणे येथे रास्ता पेठेत कै. रा. ब. विरजंगमय्या यांच्या दिवाणखान्यात सत्यशोधक बंधूची सभा भरली. स्वभावभेदामुळे मतभेद वाढले व पुढील वर्षी मुंबईकराचा प्रेस परत केला. शंभर वर्षांतील २७ वर्षे रास्त्यांच्याच पेठेत दीनबंधु प्रेस व कार्यालय होते व पुणे येथील रास्ता पेठेतच हल्ली आहे. हा योगायोग कै. डॉ. वि. मा. नवले यांच्यामुळेच आला. प्रथम भालेकर यांनी कै. मुक्ताजी अप्पाजी यांच्या साह्याने शिळाप्रेस विकत घेतला. सन १८७५ सालातील जानेवारीपासून पुढे सहा महिने पुण्यास 'दीनबंधू' शिळा प्रेसवर निघाला. पुढे कै. जाया काराडी लिंगू यांच्या मदतीने टाइपावर 'दीनबंधू' निघू लागला. सन १८७५ ते १८७७ अखेरपर्यंत 'दीनबंधू'ची शताब्दी पाळण्यास असा लेखी सबळ पुरावा भेटतो. आरंभी १३, पुढे ८२, १८७८ साली १९२, १८७९ साली २६० व १८८० च्या सुमारास ३८० वर्गणीदार होते. 'दीनबंधू' गरीबांचा, गरीबांसाठी व गरीबांनी चालविलेला होता. भालेकरानी मोठ्या बिकट ठिकाणी-पुण्यास-व बिकट दुष्काळी भयंकर काळात चार वर्षे 'दीनबंधू' चालविला. पुढे मुंबई सत्यशोधक समाज मंडळींनी त्याला मुंबईस नेले. सत्तेचाळीस वर्षांनंतर तो पुन्हा जागच्या जागी पुण्यास परत आला आहे! व सतत चालू आहे. ही परमानंदाची बाब आहे. त्याचे श्रेय कै. डॉ. वि. मा तथा आण्णासाहेब नवले ह्यांनाच देणे क्रमप्राप्त ठरते. 'दीनबंधू'चा पूर्वेतिहास दीनबंधूतूनच देण्यात आनंद वाटतो. भालेकर १८९४ च्या पूर्वी 'दीनमित्र' (संपादक कै. ग. स. पाटील) व 'शेतकऱ्यांचा कैवारी' ह्यांनाही लेख पुरवीत. म्हणून 'दीनबंधू'च्या पोटातीलच ही अनेक पत्रे एकपरी एकच होती व त्यांच्या संज्ञाना-नावांना-एकसारखा अर्थ होता. 'कैवारी' हे नाव पत्करून कै.

दिनकरराव जवळकर यांनी मुंबईस काही वर्षे एक मोठे साप्ताहिक चालविले होते. वरील पत्रांची परंपरा ह्या नाही त्या स्वरूपात व तत्सम नावाने चालू ठेविण्याचा 'दीनबंधू'च्या मागील इतिहासाचा स्वभाव आहे. विद्येत व आर्थिकदृष्ट्याही मागासलेल्या लोकांची त्या वेळची स्थिती, गरजा, उणिवा, मागण्या, दुःखे यांचे प्रतिबिंब वरील पत्रातून पडले. मराठी साहित्यात बहुजनवादी पत्रांचा इतिहास व कामगिरी स्वतंत्र आणि स्वावलंबी होती. समग्र इतिहास ग्रंथ पुढे कोणी परम प्रयत्नाने व न्याय देणाऱ्या बुद्धीने काढील, त्यावेळी हे लेखन उपयोगी पडावे म्हणून ते सटीकपणे लिहिले आहे.

जुन्या 'दीनबंधू'चे भालेकर-लोखंडे व बिर्जे यांची लेखणी व कामगिरी पायाभूत व महत्त्वाची आहे, प्रेरणा देणारी आहे. ही मागील शक्ती आहे. 'दीनबंधू'चे सत्यशोधक समाज सर्वांना ज्ञात केला. हे संपादक होऊन गेले म्हणून पुढे कोठारी, शिंदे, देसाई, लाड, जवळकर, बागडे, 'दीनमित्र'कर्ते पाटील, कै. शामराव भोसले, प्रबोधनकार ठाकरे, भुजंगराव दळवी, 'हंटर'कर्ते पितापुत्र बागल वगैरे अनेक नामवंत कार्यकर्ते संपादक व लेखणीबहाद्दर झाले. म. फुले यांच्या मनात सन १८७५ साली स्वतः साप्ताहिक काढावे असे होते. पण त्यांना स्वतःचा व दुसऱ्यांचाही भरवसा नव्हता व दुसऱ्या कोणी चालविले तरी ते कठीण वाटत असावे. तरी पुढे 'सत्सार' नावाचे मासिक म. फुले ह्यांनी काढले. याचे फक्त दोनच अंक निघाले. पण बहुजनांचे व सर्वसामान्य लोकांचे हेच पहिले मासिक होय. म. फुले त्याचे संपादक व एकमेव लेखक होते. हे दोनच अंक निघाले पण ते असामान्य शक्तीचे आहेत. राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून पुढे जेवढी मदत मिळत असे, तेवढा राजाश्रय सन १९१० सालापूर्वी ज्यांनी ज्यांनी पत्राद्वारे जनजागृतीचे कार्य केले, त्यांना मिळाला नव्हता. समाजोद्धाराची कळकळ, समर्पित बुद्धी, चिकाटी, त्याग, धाडस व संग्राम करण्याची लढावू वृत्ती हे सर्व गुण फुले, लोखंडे, भालेकर, बिर्जे वगैरे पहिले संपादक-लेखक-व प्रकाशक यांच्या ठायी उत्कटतेने होते.

'दीनबंधू' एकखांबी नव्हता. विविध जाती-समाजातील संपादकांनी व लोकांनी त्याच्या प्रगटीकरणाला साह्य केले. अस्पृश्योद्धार व दलितोद्धार या क्षेत्रातही वरील सर्व कार्यकर्ते मागे नव्हते. ह्या प्रकारे 'दीनबंधू' सर्वांचा व गरीब असे सर्वांसाठी होता व आहे. 'दीनबंधू' चळवळ व पक्ष केवळ म. फुले व राजर्षी शाहू महाराज यासारख्या असामान्यांच्या' अनेकांच्या सहाय्यामुळे चालली व निघाली, टिकली व वाढली. असेच नव्हे तर सर्वसामान्यांच्या, अनेकांच्या सहाय्यामुळे तो संवर्धला गेला. मधूनमधून बंद पडला तरी वारंवार त्याचे उत्थान झाले व आता कै. वि. मा. नवले व त्यांचे चिरंजीव यांच्या प्रयत्नाने तो पुन्हा चालू झाला व चालला आहे. याप्रमाणे तो केवळ वैयक्तिक अवतारनिष्ठ व विभूतिनिष्ठ नाही. लोखंडे, आवटे (नवले पितापुत्र) ह्यांनी प्रार्थना समाजाचे सदस्यत्व स्वीकारले. कारण तत्त्वतः हे दोन समाज एकच आहेत. याप्रमाणे 'दीनबंधू' हा एक गुरूवादी नाही. विभूतिपूजक नाही किंवा केवळ प्रतिक्रियावादी नव्हे. 'दीनबंधू' अनेक झाले व होतील. कारण इतिहास मागे उभा आहे, परंपरा आहे. ती महाराष्ट्र वृत्तपत्राच्या इतिहासात असाधारण आहे.

'दीनबंधू' हे शतकभर सतत चाललेले एकमेव पहिले पत्र होय. कै. विष्णू कृष्ण चिपळूणकर यांच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास हे 'शूद्र मंडळींचे' मुखपत्र होते. नामदेवादी तुकाराम, चोखा, सावता वगैरे संतांनी त्यांच्या काळात 'शूद्र' ही संज्ञा वापरून भागवत धर्माच्या द्वारे क्रांती केली. म. ज्योतिबा यांनीही 'शूद्रातिशूद्र' ही संज्ञा वापरली व ह्यांची व स्त्रियांची कैफियत मांडली. सर्व स्त्रिया ह्या शूद्र गणिल्या जात. संतात व 'दीनबंधू' मंडळीत वर्ण-जातीवाचक अहंकार दर्प व गर्व नव्हता॥ सत्यमेव जयते॥ हे ब्रीदवाक्य होते. सत्य, समता व स्वातंत्र्य हे

अनुक्रमणिका

ध्येय व 'जे का रंजिले गांजिले। त्यासि म्हणे जो आपुले'॥ ही कै. वि. मा. नवले यांनी ब्रीदवाक्ये पत्करिली. ती पूर्व परंपरेला धरूनच होती. तुकोबांच्या शब्दातही 'दीनबंधू' विवेक पक्ष मांडला गेला व मांडिता येतो. तत्त्वे टिकतात व विकास पावतात.

**कै. माधवराव रोकडे पायाने लंगडे पण लेखणीने पोलादी!**

माधवराव राघूजी रोकडे यांचा मराठी व इंग्रजीचा अभ्यास मोठा होता. चटकदार लेखक बहुश्रुत, प्रतिपक्षाचे मुद्दे खोडणारे वक्ते. वडाच्या गादीवर खाजगी शाळा काढली. हजारोंचे शिक्षण केले. यंदे यांच्या साह्याने 'शेतकऱ्यांचा कैवारी' साप्ताहिक चालविले. सुशिक्षित यांची कन्या कै. जनाबाई रोकडे यांनी शाळा वर्धमान केली. 'चंदनाचे हात, पायही चंदन' अशी ही मंडळी होती. माधवराव रोकडे हे 'दीनबंधू'चे खंदे लेखक झाले. 'दीनबंधू'त संपादकीय मजुकराशिवाय अनेक नामवंत लेखकांना पहिल्यापासून जास्ती जागा दिली जाई व जाते. हे वैशिष्ट्य आहे. आजही अग्रलेखांची जागा दिली जाते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वादाची जुनी लक्तरे धुणे हे विद्यमान 'दीनबंधू'चे ध्येय नाही. स्वातंत्र्य आले आहे. काळ बदलला आहे. नवे प्रश्न, आर्थिक व राजकीय जास्तीपणे आहेत. यादृष्टीने जुना विषय नव्याने चालू परिभाषेत मांडिला आहे.

म. फुले-भालेकर-लोखंडे-'आवटे-यंदे यांचे आपसात' पटले नाही; कधीकधी कार्यहानी देखील झाली. १ जानेवारी १८७७ सालापासून 'दीनबंधू' भालेकरांनी चालू केला. याकामात त्यांना कर्ज झाले. पुढे लोखंडे यांनाही चट्टा बसला. यंदे-लोखंडे यांच्या कारकीर्दीत 'दीनबंधू', भरभराटीत राहिला. लोखंड्यांच्या 'अँग्लो व्हर्न्याक्यूलर' 'दीनबंधू'त एक चटकदार अग्रलेख, स्फूट लेख असे. लोखंड्यानी गिरणीतील नोकरी सोडून, आमरण 'दीनबंधू'चे स्वतःच्या मालकीचा प्रेस करून, संपादन केले. एका मोठ्या ऑफिसातील विद्वान व हुद्देदार लेखक इंग्रजी लेख लिहीत. 'वर्तमानसार', 'मुंबई वृत्त' हा भाग कामगारांचे आद्य भारतीय नेते लोखंडे स्वतः लिहीत. 'दीनबंधू'ला मी आद्य-आदी पत्र-म्हटले आहे. याचे कारण हे की पुष्कळ देश व लोकहिताच्या व्यापक बाबींचा पुरस्कार करण्यात तो 'केसरी' व तत्सम पत्रांच्याही पुढे होता. 'दीनबंधू'त अग्रलेख स्फूट लेख विविध लेखक लिहीत. (व लिहीतात.) याप्रमाणे तत्कालीन बहुजनवादी-लोकहितवादी लेखकांचा 'दीनबंधू' साधन, माध्यम व आसरा होता. 'दीनबंधू'च्या वर्गणीदारांनी व हितचिंतकांनी ह्या काळात, लोखंड्यांनी चालविलेल्या साप्ताहिकासाठी चार हजारांचा फंड पुरा केला व कर्ज फेडी केली. कै. नरसू सायबू, रामय्या व्यंकय्या, जाया कराडी लिंगू वगैरे मुंबईकर कामाठीबंधूंचे फार साह्य होते. या काळविभागात दीनबंधूचे स्वरूप संग्रामशील व संघर्षशील होते. कामगारांना सवलती मिळवून दिल्यामुळे तर 'दीनबंधू' फार लोकमान्य झाला. राष्ट्रीय सभा पुढील जानपद झालेल्या महात्मा गांधींच्या काळातील काँग्रेसप्रमाणे लोकाभिमुख व ग्रामीण जनतेची प्रथम मुळीच नव्हती. ह्यामुळे लोखंड्यांचा 'दीनबंधू' राष्ट्रीय सभेवर घणाचे घाव घाली. शेवटी सक्तीचे शिक्षणाचा ठराव काँग्रेसने पास केला.

बर्वे कोल्हापूर प्रकरणात, फुले ह्यांनी जामीन गुळवेशेट यांजकडून टिळकांसाठी भरविला व सुटका झाल्यावर लोखंडे-यंदे यांनी टिळक आगरकरांची दाढी करण्यासाठी मुंबई येथे डोंगरी तुरुंगाजवळ न्हावी नेला. पुणे-मुंबई येथे वाजतगाजत मिरवणुका काढल्या. शेला पागोटे, हारतुरे, पानसुपारी केली. शिवाजी प्रेमी हे सर्व दीनबंधू अग्रेसर होते. कै. विठ्ठल कृ. बंडेकर व सीताराम के. बोले लोखंड्यांचे मुंबईस उजवे हात होते. या

सर्वांना जनहिताची अत्यंत कळकळ होती. याकाळात 'दीनबंधू' मुंबईस निघत असे. हा फार प्रभावी व कार्यकारी असे. पुण्यास सन १८८७ साली कै. बंडोबा तरवडे, हरिश्चंद्र नारायण नवलकर, शाईवाले घोरपडे यांनी 'दीनबंधू सार्वजनिक सभा' स्थापिली. विद्यावृद्धी, दारु वगैरे व्यसनांचा त्याग, स्वदेशी जिन्नस वापरण्याचा प्रचार, हा राष्ट्रीय कार्यक्रम होता, सत्यशोधक समाजात धार्मिक प्रश्नावर अंतर्गत व बहिःर्गत वाद-संवाद-प्रश्नोत्तरी होई. पण 'दीनबंधू' सभेत धार्मिक बाबीवर चर्चेला बंदी होती. निधर्मी वृत्तीचा हा पायाच होय. शाईवाले घोरपडे यांचा प्रेस वगैरे, पुढे कै. श्रीपतराव शिंदे यांना १९१८ नंतर 'विजयी मराठा' काढताना उपयोगी पडले. सन १९१० ते १९२७ पर्यंत 'दीनबंधू' बंद होता. पण त्याचा पाया व जनजागरण राजर्षी शाहू व सर्व बहुजनवादी पत्रांना व नानाविध चळवळींना व संस्थांना-परिषदांना उपयोगी पडला हे, सर्वमान्य आहे. सर्वच 'दीनबंधू'च्या पायाजवळ नतमस्तक झाले व होतात. 'दीनबंधू' ही एक जनतेप्रत जाणारी वाट होती.

**कै. राजारामशास्त्री भागवत**

कै. भास्करराव जाधव शाहू महाराजांचे सल्लागार व साह्यक होते. ते रामय्या व्यंकय्या अय्यावारू व राजाराम शास्त्री भागवत (१८५१-१९०८) याच्या तालमीत तयार झाले. 'दीनबंधू'च्या चळवळीशी राजारामशास्त्री भागवत निगडीत होते. ह्यांनी 'मराठ्यांच्या संबंधाने चार शब्द' (१८८७) नामक ग्रंथ लिहिला. त्यांच्या मते 'कुळवाडी' ही आर्य व द्रविड यांच्यापासून झालेली एकच जात महाराष्ट्रात होती. यांच्याही अगोदर आद्य 'दीनबंधू' जोतिराव फुले यांनी त्यांच्या राजे छत्रपती शिवाजीवरील पोवाड्यात शिवाजी महाराजांना 'कुळवाडी-भूषण' या विशेषणाने संबोधिले आहे. राजारामशास्त्री यांनी ऐतिहासिक गंजिफा (१९०३-१९०८) 'दीनबंधू'त प्रसिद्ध केला. 'दीनबंधू'साठी त्यांनी अनेक दुसरेही लेख लिहिले. क्षात्रजगत गुरु प्रकरणी व मागील वेदोक्त प्रकरणी भागवत यांनी राजर्षी शाहू महाराजांना चांगलीच बौद्धिक मदत केली. शाहू महाराजांनी रावभट तयार केले त्याचेही पुराव्यांसह मंडन राजारामशास्त्री यांनी केले. पूर्व संस्कृत ग्रंथांतील अनेक आधार दिले. क्षत्रियांच्या अस्तित्वावर लेख लिहिले. ह्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीचे त्याकाळात सामर्थ्य वाढले. सन १९०३ ते १९०८ च्या दरम्यान व मध्ये 'दीनबंधू' कै. वासुदेवराव लिंगोजीराव बिर्जे हे संपादन करीत असत. साहित्यिक, इतिहास संशोधक म्हणून ते प्रसिद्ध होते. ह्यांचे मराठी व इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व होते.

'दीनबंधू' ही गादी होती व आहे. अनेक संपादक या गादीवर बसले. 'दीनबंधू' हे एक व्यासपीठ होते व आहे.

'दीनबंधू' संबंधित कार्यकर्ते मोठे चळवळे होते. सन १८८४-८५ नंतर म. फुले तीनचार वर्षे अंथरूणावरच घरी मरेपर्यंत आजारी राहिले. त्यांच्यापासून स्फूर्ती घेतलेली मंडळी चिकाटीच्या बाबत कमी नव्हती. निरनिराळ्या व सर्वांगीण बाजूने त्यांनी वर्गकलह चालू ठेविला. सन १८८४ साली कै. सयाजीराव महाराज गायकवाड बडोद्याचे गादीवर आले. 'शेतकऱ्यांचा कैवारी' या पत्राकडे त्यांचे लक्ष होते. (मुद्रक : श्री. रामजी संतुजी आवटे). यंदे-आवटे जोडीने 'बडोदा वत्सल' चालू केले. मुद्रणालयावरून ही जोडी फुटली. यातून 'सयाजी विजय' साप्ताहिक निघाले. बडोदा सोडून यंदे मुंबईस आले. आश्चर्यकारक प्रकाशक-ग्रंथसंपादक म्हणून प्रसिद्ध होते व आहेत. आवट्यांचाही 'इंदिरा प्रेस' होता. मराठी साहित्याचे मुद्रण-प्रकाशन वगैरे तत्सम क्षेत्रात 'दीनबंधू'ची प्रथम निगडित असणारी मंडळी पुढे प्रख्यात झाली. न्यायमूर्ती रानडे व यंदे यांचा स्नेह होता. यंदे 'इंदुप्रकाश' संपादन करीत. लो. टिळक यांच्या निधनानंतर त्यांनी लो. टिळक खास संग्राह्य अंक काढला. कै.

तुकाराम तात्या पडवळ (मृत्यू-३-६-१८९८) हेही ‘दीनबंधू’ महात्मा फुले व सत्यशोधक समाज यांचे परम मित्र होते. ह्यांच्या तत्त्वविवेचक छापखान्यातून अनेक मराठी ग्रंथ छापून उपलब्ध झाले. टाइप पुरवणारे ‘दीनबंधू’चे हिंतचिंतक “जावजी दादाजी” हे लोखंडे वगैरेंना सांगीत की, दुफळीने दुसऱ्याचे फावते व बंधूभावाची जरूरी सांगीत. “तुम्ही सत्यशोधे आहात, तुमच्याशी वाद कोणी घालावा?” असे ते उलट म्हणत. म्हस्के, चौधरी-आवटे हे नेमस्त सत्यशोधक प्रवृत्तीचे होते. फुले लोखंडे फार जहाल! ‘दीनबंधू’चे लोखंडे यांना जावजी दादाजी यांच्यासंबंधी फार सख्य असल्यामुळे माहिती होती. जावजी दादाजी यांच्यावरील ‘दीनबंधू’तील मृत्यूलेख महत्त्वाचा होता. जावजी दादाजी ता. ५-४-१८९२ रोजी निजधामास गेले. ‘दीनबंधू’चे फार नुकसान झाले.

**साधन सामुग्रीचा सारासारविवेक**

‘दीनबंधू’त १८९२ साली ‘रा. रा. गां.’ ह्यांनी श्रीमंत जावजी दादाजी यांच्या मृत्यूला उद्देशून

*“हे भूमी जे तिथेला उचित खरे। नाम मृत्यूभूमि अस।*
*परिणाम मरण यास्तव घे। आपणास मर्त्य असे॥”*

अशी आर्या रचिली होती. ‘दीनबंधू’चे मागील अंक हाताच्या बोटावर मोजता येतील, एवढेच मला पाहण्यास मिळाले. पण ‘दीनबंधू’तील उतारे, पडसाद ‘केसरी’, ‘विविधज्ञानविस्तार’, ‘सुधारक’ वगैरेमध्ये पडले-आढळले व ह्या साधनावर अवलंबून मला राहावे लागले. उदा., न्हाव्यांच्या संपाची सूचना ‘दीनबंधू’ने केली व आगरकरांनी त्यांची पाठ थोपटली. ज्योतिबा फुले युरोपिअन मित्रांच्याबरोबर रायगडला प्रथम गेले असावेत व नंतर ‘दीनबंधू’त ‘केसरी’च्याही बरेच अगोदर रायगड शिवसमाधीच्या जीर्णोद्धाराचा ऊहापोह झाला. बर्वेप्रकरणात दीनबंधूसंबंधित समाजसेवकांनी टिळक आगरकरानी केलेल्या मदतीचा उल्लेख इतर कित्येक पत्रात आला. ह्यांचे अग्रेसरत्व कै. तात्यासाहेब केळकर, साहित्यसम्राट यांनीही मान्य केले. सिद्धांत ठरतो की, टिळकर आगरकर देखील ‘दीनबंधू’चे ऋणी झाले. शिवाजी महाराजांकडून घेतलेली देशभक्ती व स्वातंत्र्यमूलक प्रेम हा या सर्वांत सारखा मुद्दा होता; व जे जे मुद्दे समान होते त्यात महाराष्ट्रीय या सर्व नेत्यांत मतभेद बाजूस ठेवून सहकार्य झाले. कै. सीताराम रघुनाथ तारकुंडे, हडपसर हे तेथे पोष्ट मास्तर होते व हे खुद्द फुले-लोखंडे-भालेकर यांचे समकालीन मित्र होते. त्यांनी प्रसिद्ध केलेला ‘ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास’ फार साधार व विश्वसनीय आहे.

कै. डॉ. नवले यांनी ‘दीनबंधू’ला १९२७ मध्ये स्थैर्य आणिले व श्री. प्रतापराव यांनी तो चालू ठेविला; म्हणून मला तरी जागा प्राप्त झाली. पूर्वी साहित्यसम्राट केळकर यांनी सन १९२२ साली प्रसिद्ध झालेल्या कै. तारकुंडे यांच्या इतिहासावरून लो. टिळक चरित्रासाठी पहिल्या खण्डात माहिती संग्रहित केली. कै. ‘दीनमित्र’कार पाटील यांनी त्यांच्या वडिलांचे चरित्र वारंवार उपलब्ध केले आहे. तर्कतीर्थ जोशी यांच्याकडे मी ‘बहुजन समाजाचा इतिहास’ लिहिण्यास जात होतो. (सन १९४८ ते ५३ दरम्यान) त्यांनाही ही माहिती विश्वसनीय वाटली. तर्कतीर्थांनी त्यांच्या व माझ्या विचाराने २०० कागद लिहिले होते. पण त्यांनी कॉंग्रेस प्रवेश केल्यानंतर मते पालटली! मी त्यांना अनेक दुर्मिळ साधने दिली. शेवटी लिहिलेला मजकूर गहाळ झाला, असे त्यांनी शेवटी सांगितले व दगा दिला! बरीच साधने आठ-दहा वर्षांनंतर परत केली ! मी मात्र नाऊमेद झालो नाही. ‘दीनबंधू’चे विद्यमान संपादक श्री. प्रतापराव विठ्ठलराव नवले, बी. ए. यांनी कदर केली. त्यांना ‘दीनबंधू’च्या

परंपरेचा जिव्हाळा आहे. कै. डॉ. विठ्ठलराव नवले यांनाही होता. म्हणून त्यांनी एकट्यानेच फक्त, बंद पडलेला 'दीनबंधू' चालू केला. 'दीनबंधू'चा सारा इतिहास म्हणजे बहुजनवादी-लोकायत-चळवळीचा पूर्वेतिहास होय. कै. सीताराम रघुनाथ तारकुंडे 'दीनबंधू'चे लेखक होते. निःपक्षपाती व सुबोध अशी त्यांची लेखणी होती. रॅडिकल व मानवतावादी पक्षाचे ज्या वेळी तर्कतीर्थ लक्ष्मणराव जोशी होते, त्यावेळी त्यांनी 'ज्योति निबंध' (१९४७) प्रसिद्ध केला. तोही आम्हा दोघांच्या चर्चेतून व सहकार्यातून निघाला. त्यांनी वारंवार ऋण जाहीर सभेतही व्यक्त केले. पण हे सर्व प्रयत्न अद्याप अपुरे आहेत. साम्यवादी व रशियावादी विद्वानांचे अलिकडे 'दीनबंधू' लोखंड्यांच्याकडे व म. फुल्यांच्याकडे लक्ष जाऊ लागले आहे. नाहीतर कॉ. डांगे जुने पुढारी असूनही त्यांनी दुर्लक्ष केले! मात्र कै. निबंधमालाकार यांच्याप्रमाणे ह्या सर्व चळवळी म्हणजे विद्याप्रसारक चळवळी होत, एवढाच अर्थ घेतला! म्हणूनही चिपळूणकर, डांगे यांना बहुजनतेचा पाठिंबा महाराष्ट्रात तरी मिळावा तसा भेटला नाही.

कै. मुकुंदराव पाटील त्यांच्या जनक वडिलांचे चरित्र लिहिणार होते. त्यांनी तर्कतीर्थांच्या अश्वासित इतिहासासाठी साधनसामुग्री पाठविली. तर्कतीर्थांनी बेत रहित केला! मी ती कागदपत्रे परत केली! कै. मुकुंदराव तर्कतीर्थांच्यानंतर लिहिणार होते. पण हे सर्व बेत कालाधीन झाले. मी नोटस् ठेविल्या होत्या. हा लेख म्हणजे दीनबंधू व त्याचे कार्य, संपादक वगैरेंचा वर्धमान अभ्यास आहे. तो इतरांना प्रेरक ठरो. 'दीनबंधू'ची गाथा लहानगी नव्हे. पराक्रम, शौर्य व धैर्य मोठे ठरते. तत्त्वज्ञानाचे दर्शन महत्त्वाचे व मूलगामी असते.

**उपसंहार**

'दीनबंधू'ची कामगिरी मात्र उपलब्ध आहे. काळाने व तो परमन्यायी असल्याने त्यानेच जतन केली आहे. सत्य बुडत नसते. काळ ही चाळण असते. स्वातंत्र्य आल्यामुळे एकदम अभ्यासाचा दृष्टिकोण व परिस्थिती बदलते. 'दीनबंधू' इंग्रजांचा अनुनयकर्ता व ब्रह्मद्वेष्टा असा समज होता. पण तो काळ कालाधीन झाला. आर्थिकदृष्ट्या पिळलेल्या जनतेचे व रयत समाजातून थोडे फार शिकलेल्या संपादकांनी चालविलेले हे पत्र होते. पिळवणूक धार्मिक व सामाजिक होती; आता जास्तीपणे आर्थिक आहे. 'दीनबंधू'ने कामगार व शेतकरी यांच्या समस्यांना जन्म दिला. ह्या समस्या अद्याप जिवंत आहेत. 'दीनबंधू' दलितांचा देखील 'दलित बंधू' होता व असतो. 'दीनबंधू'चे जे मिशन होते व असू शकते, त्याचे हे दर्शन होय.

१५.

# ग्रामीण साहित्याचे प्रयोजन व कार्य

शिक्षणाच्या प्रसारामुळे साहित्य वाढत आहे हे खरे, पण त्याच्या संबंधाने सारासारविवेक केला पाहिजे.

'ग्रामीण' साहित्य, 'दलित' साहित्य अशा संज्ञा मराठी वाङ्मयात भिन्नपणे वापरल्या जातात. नागरी व नांगरी अशा दोन जीवनपद्धती आहेत. म्हणजे शहरी राहाटी व खेडेगावातील जीवनमान एकच असू शकत नाही. शहरी व ग्रामीण असा भेद-फरक करून लिहू-बोलू नये, असे कित्येक ऐक्यवादी म्हणतात. पण नैसर्गिकभेद दोन्हीही जीवनात व विभागात आहे, ह्याला काय करावे? ही तफावत केव्हा संपणार?

दलितांपैकी जास्तीत जास्त खेडेगावात राहतात. म्हणजे दलित साहित्य हे ग्रामीण साहित्य नव्हे काय? दलित प्रश्न (भारतीय अस्पृश्य मानलेल्यांचा) हा प्रधानतः ग्रामीण प्रश्न आहे; व ग्रामीण साहित्य हे कधीही शहरी मध्यम-पांढरपेशा वर्गाचे असू नये! दलित साहित्याचे लेखक हे दोन्ही प्रायः आता शहरी व पांढरपेशी झाले आहेत. त्यांचे अनुभव व विश्व ग्रामीण राहिले नाही! फारच थोड्यांचे ग्रामीण विश्व हे अनुभवी-विश्व म्हणून विकास पावू शकते. सुशिक्षित स्त्रीपुरुष कोणत्याही समाजथरांतील व वर्गातील असो, तो बहुतेक करून शहरी पांढरपेशे व बुद्धिजीवी जीवन पत्करित असतो. ह्याला अपवाद म्हणून शोधून सापडणे अवघड होईल. म्हणून दलित कथालेखक व ग्रामीण कथालेखक हे ब्राह्मणादी शहरी लोकांचे साहित्य आदर्श म्हणून मानतात. त्यांच्यापुढे जास्तीत जास्त ग्रामीण विश्व व त्यांचा अनुभव, सुखदुःखे व व्यथा ह्या चित्रित करण्याची उत्तरोत्तर शक्ती राहात नाही; पण राहिली पाहिजे; त्यांनी ग्रामीण भागाशी व दलित विभागाशी जवळून संपर्क वाढविला पाहिजे. तेथील जीवन जवळून पाहिले पाहिजे. समाज अभ्यासला पाहिजे. उदा., महर्षी शिंदे दलित प्रश्नांनी एवढे एकरूप झाले होते की, त्यांनी जेवढा दलितप्रश्नांचा शोधबोध व अनुभव प्रत्यक्ष त्यांच्यात राहून जवळून सतत घेतला होता, तितकाही घेणारे व त्यांच्याप्रमाणे फकीर होऊन देशभर भ्रमंती-प्रवास-करणारे, दलितात जन्म पावलेले दलित लेखकही आज दुर्मिळ वाटतात! नवबौद्धांनी लंका, ब्रह्मदेश, चीन-जपान वगैरे मधील बौद्धधर्माची अवस्था पाहून त्यांना काय वाटते, ते चित्रित करावे. निग्रो प्रश्न व भारतीय दलित प्रश्न यांच्यात साम्यापेक्षा रंगवर्णवंश ह्या दृष्टीने विलक्षण तफावत कशी आहे, ती अभ्यासली पाहिजे. येथे ग्रामीण साहित्यसेवक म्हणविणाऱ्यांच्या दृष्टीने जास्त विवेक करावयाचा आहे. दलित साहित्य हे ग्रामीण साहित्यच असल्याने थोडा त्याचाही विवेक करावा लागेल.

### ग्रामीण साहित्य म्हणजे 'बहुजनसाहित्य'

वास्तविक आधुनिक दलित व ग्रामीण साहित्याला म. फुले यांच्यापासून सुरुवात झाली. 'शूद्रातिशूद्र' ह्यात शेतकरी-मजूर व दलित यांचा सर्वांचा समावेश करून म. फुले यांनी पोवाडे, कविता व निबंधही लिहिले. याप्रमाणे दलित साहित्य व ग्रामीण साहित्य यांचे उद्‌घाटन व प्रारंभ एकत्र असल्यामुळे दलित व ग्रामीण साहित्यात पुढे विग्रह करणे अयोग्य होय. दलित साहित्यिकांनी ग्रामीण साहित्य निर्माण करावे व ग्रामीण साहित्यिकांनीही दलित साहित्यात सक्रिय गतिमान असावे. पण हल्ली दलित साहित्याचे अस्तित्व व निर्मिती

जास्त उमटून दिसते. दलित साहित्य परिषदा भरू लागल्यानंतर ग्रामीण साहित्याच्या काही परिषदा झाल्या; पण पुढे ह्यांची सामसूम फार दिसते! भविष्यकाळात खेडी व ग्रामीण समाज (गावकरी) असणारच.

**अस्पृश्यतेला भवितव्य नाही!**

अस्पृश्य व परंपरागत दूर (बहिष्कृत) मानले गेल्यांकडून जे साहित्य निर्मिले जाते व त्यांची साहित्यविषयक जी चळवळ चालू असते, ह्या प्रयत्नाला दलित साहित्य म्हटले जाते. दळणवळणामुळे अस्पृश्यता उत्तरोत्तर कमीच होऊन कालांतराने नाहीशी होणार; हे सूर्यप्रकाशाएवढे स्वच्छ आहे व यामुळे अस्पृश्य मानलेल्याचे पृथक्करण, अलगपण व स्वतंत्रपणे पुढे राहणार नाही (राहू नये) हे देखील उघड आहे. पुनरुक्तीने व एकसूरी पद्धतीने दलित साहित्य त्यांच्या व्यथा, वेदना, आशा-आकांक्षा मांडीत आहे. पण ह्या वेदना व ही दुःखे सतत खेड्यापाड्यांतही राहणार नाहीत. जो शेतकरी भारतीय बहुजनसमाज खेड्यापाड्यांत अस्पृश्याना शेजारी घेऊन, हजारो वर्षे राहत आला, तो शेतकरी त्यांच्या बाबतीत आधुनिक काळानुसार राहिले पाहिजे. दलित साहित्याचा अंत असा फार लांब नाही म्हणजे शतकानुशतके यापुढे पूर्ववत अस्पृश्यता व तद्नुसारचे परंपरागत 'दलितत्व' ही आता शाश्वत व सनातन (कायम राहणारी) बाब मुळीच नव्हे. असा विचार मांडल्यावर फक्त बहुजन साहित्यासंबंधी काही मुद्दे नव्याने वाचकांपुढे ठेवित आहे. बहुजनसाहित्याला मात्र भवितव्य राहील. परंतु त्याने जातीवर्णभेदाच्या पलीकडे जाऊन वर्तमानातील प्रश्न मांडले पाहिजेत.

**ग्रामीण साहत्याचे प्रयोजन**

मराठी साहित्य! मराठी साहित्य!! ज्याला म्हणतात ते साहित्य मूठभर शहरी व पांढरपेशे लोक तयार करतात. त्यांचे अनुभवविश्व वेगळे पडते. चालू पिढीला महाराष्ट्रात ब्राह्मण व ब्राह्मणेतरात पुष्कळ सत्ता निर्माण झाली आहे. वरील मूठभर बुद्धिजीवी वर्गाचे इंग्रजी राज्य आल्यानंतर जे शिक्षण घेतले, तेच पुढे बहुजनसमाजांनी व दलितानी घेतले. त्यामुळे दलितांत व बहुजनसमाजात नवब्राह्मण व नोकरपेशांचा एक शहरी पांढरपेशा वर्ग शिक्षणाच्या वाढत्या प्रसाराबरोबर वाढत आहे! पण हाही उत्तरोत्तर आत्मकेंद्रित होत आहे.

शहरातील मुलांची जी पाठ्यपुस्तके व धडे (निदान प्राथमिक शाळेत) असतात, ती व शहरातील मुलांची पाठ्यपुस्तके एकच असतात. शिक्षणक्रम सर्व एकच होता व आहे. याला 'सार्वजनिक शिक्षण' म्हणतात. स्वतःला उच्चवर्णीय व श्रेष्ठ जातीय म्हणविणाऱ्यांनी इंग्रजी राज्यात जे सार्वजनिक शिक्षण घेतले, तेच दलितानी व बहुजनसमाजाने तसेच घेतले. म्हणूनच शिक्षण व नोकऱ्या या क्षेत्रातील मूठभर लोकांची मक्तेदारी कमी झाली. हा अनुभव आता सिद्ध झाला. दलितानाही सर्व क्षेत्रात राखीव जागा आहेत, म्हणून देखील मक्तेदारी कमी होत आहे.

वरील मूठभर लोक ज्या प्रकारचे मनोरंजक-करमणूकपर व फारकरून सेक्स्प्रधान साहित्य निर्माण करतात तसेच साहित्य, दलितातील व बहुजनसमाजातील नवसाहित्य वाङ्मयसेवकांनी निर्माण करू नये. श्रमजीवी ग्रामीण व दुर्बल घटक आणि दलित स्त्रिया यांची दुःखे, व्यथा, उणिवा, दोष, मागण्या नवब्राह्मणांनी मांडाव्यात.

अनुक्रमणिका

('ब्राह्मण' या शब्दाचा येथे बुद्धिजीवी व सावलीत काम करणारा असा अर्थ आहे.) ब्राह्मण म्हणजे एक जातच नव्हे!

ग्रामीण साहित्यसेवकानी शेतकरी, ग्रामीण स्त्रीपुरुष यांचा दलितविषयक दृष्टिकोण व वर्तन न्यायशील व सहिष्णु कसे होईल ह्या प्रकारचे प्रबोधन ग्रामीण साहित्याच्याद्वारे करावे. बहुजनसमाज व दलितसमाज या दोन समाजात सामाजिक एकरसता व भावनिक ऐक्य निर्माण अद्याप झाले नसल्यामुळे 'दलित साहित्य' असा वेगळा व सवता सुभा जरूर झाला; व दलित साहित्याच्याद्वारे पाटील, देशमुख व स्वतःला शहाण्णव कुळीचे उच्च म्हणविणाऱ्यांना श्रीमंत शेतकऱ्यावर-मराठ्यांवर-टीका केली जाते. ह्याचा अर्थ सर्व मराठा समाजाने लक्षात घेतला पाहिजे. सामाजिक तुसडेपणा व अंकुचित दृष्टी राजकारणातही नडते. बहुजनसमाजाने सर्वांना घेऊन धरून, चालून, सहकार्याने, न्यायाने जरूर ती स्थाने तत्समांनाही देऊन चालले पाहिजे. नाहीतर 'फोडा व झोडा' ही नीती महाराष्ट्रातही यापुढे जरुरी व प्रभावी होईल. ग्रामीण साहित्याने लोकहितवादींच्याप्रमाणे बहुजनसमाजाला जागे केले पाहिजे. म्हणजे लोकहितवादींनी त्यांच्या ब्राह्मण समाजाला त्यांचे दोष उघडपणे दाखवून दिले तसेच ग्रामीण साहित्यसेवकांनी स्वदोषांचे विवेचन केले पाहिजे. स्वदोष टिकवून व जोपासून किंवा त्यावर पांघरुण घालून, दडवून ठेवून कोणासच वर किंवा पुढे येता येणार नाही. अंधश्रद्धा नष्ट होऊन भौतिक व इहवादाकडे म्हणजे विज्ञानाकडे लोकांचे लक्ष वळविले पाहिजे. बुद्धिवाद वाढविला पाहिजे. ग्रामीण साहित्याचे म्हणजे बहुजन साहित्याचे वेगळे प्रयोजन व त्यापुढे पडलेली अफाट कार्याची थोडक्यात दिशा दाखववायची होती. साहित्याने वाचकांच्या मनाचा योग्य तो विकास केला पाहिजे. लेखकाला पोट व संसार असतो. पण पोटच ध्येय होता कामा नये.

**कार्यपद्धती**

शेतकरी व कामकरी लोकांचा कैवार घेणारी जी नियतकालिके हल्ली थोडीच निघतात ती टिकून संवर्धिली जाणे युक्त आहे. चालू पिढीत ग्रामीण विभागातदेखील महाविद्यालये आहेत. त्यांची नियतकालिके निघतात. त्यांचा साचा शहरी महाविद्यालयांच्या नियतकालिकांप्रमाणेच नसावा. ग्रामीण विभागात जी माध्यमिक व महाविद्यालये आहेत, त्यांच्यावर तेथील समाजशिक्षणाची जबाबदारी आहे, तसेच समाजपरिवर्तनाची जबाबदारी आहे. शिवाजी विद्यापीठ व मराठवाडा विद्यापीठ यांनी शिक्षणसंबंधीचा दृष्टिकोण पुणे व मुंबई येथील विद्यापीठाप्रमाणे फक्त शहरी व नागरी ठेवू नये कोल्हापूर व औरंगाबाद येथील विद्यापीठांपुढे अविकसित विभागांचा मनोविकास करण्याची खास व वेगळी जबाबदारी आहे. ह्या दृष्टीचीच वेगळी जबाबदारी ग्रामीण व दलित साहित्यवर आहे वेगळी जबाबदारी नसती व वेगळे प्रयोजनच नसते, तर ग्रामीण व दलित साहित्य असे शब्दप्रयोगही अस्तित्वात आले नसते. पुणे व मुंबई येथील विश्वविद्यालये, अविकसित सांस्कृतिकदृष्ट्या मागास समाजाच्या उद्धारार्थ समर्थ असती तर शिवाजी युनिव्हर्सिटीची गरज नव्हती. समाज दिवसेंदिवस एकरस होत जाईल, तसतशी ह्या सर्व विश्वविद्यापीठांची गुणवत्ता समान पातळीवर येईल. शिवाजी विद्यापीठ स्वतंत्र निघाल्यावर त्याच्या गुणवत्तेबद्दल गैरसमज पसरविला गेला व अद्याप जातो! अविकसितांनी विकसितांवर व प्रस्थापितांवर मात केली पाहिजे; तरच शिक्षण व साहित्य क्षेत्रातील मक्तेदारी व अहंगंड इतिहासजमा होईल. आज तरी दलित साहित्य व ग्रामीण साहित्य बरेच मागे आहे.

अनुक्रमणिका

पण ग्रामीण साहित्यापेक्षा दलित साहित्य संघर्षशील व साजिवंत आता तरी आहे. म्हणून दोघांनी सहकार्याने विकासार्थ प्रयत्न केले पाहिजेत. असा विशेष प्रयत्न करीत असता मराठी साहित्य संमेलन व साहित्य परिषदा वगैरे जुन्या आहेत, त्यांच्यात दलित साहित्याच्या व ग्रामीण साहित्याच्या सेवकांनी जरूर भाग घेतला पाहिजेच. आपण होऊनच कोणी (अस्पृश्य) दूर व तुसडे राहू नये. मात्र बहुजनातून विशेषतः शेतकरी-कामकरी समाजातून शिकून पुढे नियतकालिके जे काही थोडेच चालवितात, त्यांची संपादन धर्ती-कार्यपद्धती-पांढरपेशीय मध्यमवर्गीय शहरी अल्पसंख्यांकांच्या संपादनासारखीच समान असण्यात अर्थ नाही. ग्रामीण विभागातील जी अनेक कॉलेजेस आहेत व जी नियतकालिके प्रतिवर्षी काढतात, त्यांनी ग्रामीण भागातील समाजाचे व स्थानिक संस्कृतीचे जास्तीत जास्त भान ठेवावे. उगाच कोणाच्या साहित्याचे अनुकरण करू नये. भाषा साध्वी व जानपद वापरावी. संस्कृतमधील शब्द निष्कारण वापरू नयेत. मराठीचे बालबोधपण टिकवावे. ग्रामीण व दलित साहित्यावर ही जबाबदारी मोठी आहे.

## मुन्शी प्रेमचंद यांचे विचार

आजवर जे मी प्रतिपादन येथे केले, त्याला आधारभूत विचार प्रेमचंद यांच्यामध्ये सापडले. त्यांनी पिळवणूक करणाऱ्या आणि पिळल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या जीवनसंघर्षाचे चित्रण केले. मराठी साहित्यात आज 'निबंधमाला'कार, गोळे, राजवाडे, भावे यांचा काळ राहिला नाही. बहुजनांच्या व दलितांच्या चळवळीकडे आत्मीयवृत्तीने पाहून त्या जानपद चळवळीचे नवे दर्शन करून देणारे संशोधक बरेच पुढे येत आहेत. मार्क्सवादी साहित्यिक व विवेकवंत यांचाही दृष्टिकोण टिळक-चिपळूणकरांच्यासारखा व वेळचा राहिला नाही, हे खरे. तरीपण प्रेमचंद यांचे ध्येयधोरण लक्षात घ्यावे :

"ज्या देशातील ऐंशी टक्के माणसे खेड्यात राहात असतील, त्यांच्या साहित्यात ग्रामीण जीवनच प्रामुख्याने चित्रित झाले पाहिजे. त्यांचे (खेडुतांचे) सुख म्हणजेच (त्या) राष्ट्राचे सुख आणि त्यांचे दुःख तेच राष्ट्राचे दुःख; तद्वतच त्यांच्या ज्या समस्या त्याच राष्ट्राच्या समस्या होत."

प्रेमचंद हे परिवर्तनवादी साहित्यिक झाले. तसेच मराठीत फारच थोडे झाले. प्रेमचंदांनी पुरोहितशाहीवर व त्यांच्या बुवाबाजीवर खूप कोरडे ओढलेले आढळतात. पण पुरोहितशाही ही फार जुनाट व हरळी-कुंदा ह्या गवताप्रमाणे पुनः पुन्हा उगवून वाढणारी आहे. पुरोहितशाही सर्व जगातील सर्व राष्ट्रात व हरएक धर्मात व पंथात व जातीत आहे. म्हणून समाजप्रबोधनाचे व समाजपरिवर्तनाचे कार्य सतत चालवावे लागते. धर्म सतत सुधारावा लागतो. मुन्शी प्रेमचंद यांचे उदाहरण ग्रामीण साहित्यसेवकांना मार्गदर्शक होणारे आहे, पण आता स्वातंत्र्यात काळ झपाट्याने बदलत आहे. आर्थिक व राजकीय प्रश्न जास्तीत जास्त महत्त्वाचे झाले आहेत. पुरोगामी साहित्य व प्रतिगामी साहित्य असे शब्दप्रयोग केले जातात, असे भेद असू शकतात. पण पुरोगामित्व वरचेवर तपासले पाहिजे; परिणाम पाहिले पाहिजे.

अनुक्रमणिका

**समाज आणि साहित्य**

साहित्यात इतिहास संशोधन देखील येते. भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे ही संस्था स्थापन झाल्यानंतर संशोधनाला वेग आला. खोरे ज्याप्रमाणे आपल्याकडे माती ओढते, त्याप्रमाणे राजवाडे-भावे-गोळे वगैरे अनेक मान्यवर संशोधकांनी ब्राह्मणीवृत्तीने पक्षपात करून अन्याय केला आहे. महर्षी शिंदे हे प्रत्यक्ष सत्यशोधक समाजयीन नव्हते. तरी त्यांना तटस्थपणे उच्चभ्रू साहित्यिक व संशोधक यांची कित्येक मते खंडन करावी लागली व त्यांनी साधार व भारदस्त भाषेत खंडित केली. डॉ. आंबेडकर यांनीही हेच काम केले. त्या दोघांची विद्वत्ता सर्वांनी मान्य केली. महाराष्ट्रात जो स्वातंत्र्यपूर्व काळात टिळकांच्या वेळी सामाजिक वाद चालविला होता, त्याचे एक कारण पक्षपाती ब्राह्मण लेखन हेच होय. आजही राजवाडे यांच्यासारखी, अनेक एकवल्ली विधाने प्रस्तुत करण्यासाठी झटणारी काही मंडळी आहेत. उदा., नुकतीच रामदास स्वामी महाराज यांचे शतसांवत्सरिक निर्वाण तिथीवर्ष साजरे झाले. यासारख्या उत्सवातून शिवाजी व तुकाराम यांना निष्कारण गौणत्व देण्याचाही पूर्ववत काही प्रयत्न होत असताना दिसतो. 'घाशीराम कोतवाल' नाटकाला व्यर्थ विरोध झाला. इतिहास म्हणजे इतिहास. ह्यात जातीय अभिमानाने कोणीच अपभ्रंश करू नये. ग्रामीण साहित्याने व दलित साहित्याने अशा पक्षपाती प्रयत्नांचे साधार खंडन करण्याचे कार्य करणे अटळ आहे. ह्यासाठी वैचारिक साहित्याची जास्त गरज असते. परंतु विचारक्रांतीसाठी झटणारे फारच थोडे असतात. ललित लेखक विचारक्रांतीसाठी लिहितात काय? मराठीतील साहित्यिक बहुधा जास्तीतजास्त उच्चभ्रू शहरी व बुद्धिजीवी वर्गातील आहेत. ज्ञानाची व ज्ञानसाधनाची ज्यांची परंपरा पिढ्यानपिढ्या होती व आहे, हीच मंडळी ग्रंथकार व साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात पुढे आहेत. आकाशवाणी, टी.व्ही. वगैरे ज्ञानाच्या क्षेत्रात उच्चभ्रू व मूठभर समाजातील मंडळी व कंपू पुढे आहेत. इतरांना संधी सढळपणे दिली जाते असे त्यांच्यानेही म्हणविणार नाही! दलित साहित्य व ग्रामीण साहित्य हे प्रकार नव्याने निघाले ह्यात काही वावगे व अनुचित नाही. जे व्हावयास हवे होते तेच झाले. सर्व इतर वर्गात व्यासंगी लेखक कसे निर्माण होतील?

युनिव्हर्सिटीज व कॉलेजीस यांच्यामध्ये शेतकरी-श्रमिक व बलुतेदार वर्गातील प्रोफेसर्स नवी मंडळी वाढत आहेत. मराठवाड्यातही वाढत आहेत. ह्यांनी बाकीच्या अविकसित ग्रामीण बहुजनांची आठवण ठेवावी, भान ठेवावे व त्यांचे प्रश्न साहित्याचाद्वारे मांडावेत. निरनिराळ्या नियतकालिकांमधून विचारविनिमय करावा हे ह्या नव्या पिढीला उत्कटतेने सक्रीय सहकार्य करावे. हल्ली मुळीच असा प्रयत्न होत नाही, असे नव्हे. पण त्याचा दर्जा, उंची व खोली वाढली पाहिजे. म. गांधी यांनी ग्रामराज्याविषयी व ग्रामोद्धाराविषयी पुष्कळ लिहिले आहे. ते ललित नाही; पण ग्रामीण आहे ग्रामाभिमुख आहे.

**संशोधन**

दलित साहित्याने व ग्रामीण साहित्याने संशोधनही केले पाहिजे. संशोधनाचे एकच क्षेत्र असते असे नव्हे. अनेकविध क्षेत्रे असू शकतात. फुले-शिंदे-आंबेडकर हे संशोधक झाले. इतिहास संशोधनाच्या बाबतीत मराठीत फार प्रदूषण आढळते. उदा., तुकाराम महाराज हे शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळी देहूत हयात नव्हते. तरी 'छत्रपती' ही पदवी लावून शिवाजीला तुकाराम सांगताहेत की तुम्ही रामदासांच्याकडे जा. 'राया छत्रपती ऐकावे वचन' असा एक अभंग तुकोबांच्या गाथेत सापडतो. 'छत्रपती' पदवी घेण्यापूर्वीच तुकोबांच्या अभंगात

शिवाजीचा उल्लेख ‘छत्रपती’ म्हणून कसा येईल? इतिहासाला गढूळ करण्याचे अनेक प्रयत्न मराठीत झाले व होतात. बहुजनातून आता पीएच्. डी. होणारे बरेच आहेत. डॉक्टरेट मिळविण्यापुरते संशोधन नसावे. महर्षी शिंदे, भास्करराव जाधव हे विद्वान एपीच्. डी. नव्हते तर त्यांनी विद्वत्तापूर्ण प्रतिवाद करून खूप संशोधन केले. शिंदे, विठ्ठलराव यांनी तर लोकमान्य टिळक, ज्ञानकोशकार केतकर वगैरे अथिरथी महारथींच्या बरोबर बौद्धिक झुंज दिली. प्रस्तुत सर्वसामान्य लेखकाने महर्षी शिंदे यांच्यापासून त्यांच्या सहवासातून प्रेरणा घेतल्या. सांगण्याचे तात्पर्य हे की, दलित साहित्याने व ग्रामीण साहित्याने ललित वाङ्मय प्रकारातच मशगुल राहू नये. त्याबरोबरच विचारप्रवर्तनार्थ लिहावे. मासिके चालवावीत. जी सुरू असतात यातून लिहावे. ग्रामीण जनतेचा ताबा विचारप्रवर्तक साधने व विचारप्रवर्तक चळवळीवर पूर्णपणे शाबीत झाल्याशिवाय ग्रामराज्य झाले असे म्हणता येत नाही. खेडेगावात (मोठ्या) प्रेस फारसे निघाले नाहीत. अजून निरक्षरता शहरापेक्षा खेड्यापाड्यांत मोठी आहे. ग्रामीण जीवनाभिमुख लेखक थोडे आहेत. सांस्कृतिक क्रांती महाराष्ट्रात तरी व्हावयाची आहे. सांस्कृतिक दरी मोठी आहे. ‘फुले-आंबेडकर’ झाले म्हणून काही महत्त्वाकांक्षा निर्माण झाल्या. जागृती झाली. निद्रा गेली, पण पुनः येते हे खरे, पण जागृती टिकवून धरण्याचे कार्य ग्रामीण व दलित साहित्याने केले पाहिजे.

शाहूमहाराजांनी वृत्तपत्रसृष्टी बहुजनसमाजात चालू केली होती. त्यांच्या आर्थिक साहाय्याने काही नियतकालिके निघाली. पण शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्याकडे पाठ करण्यात आली. वेगळा-वेगळा काळ येत असतो. परिवर्तन करावे लागते. पण ते ‘तत्त्वनिष्ठ’ असावे. उदा., स्वातंत्र्यानंतर वेगळा काळ आला आहे. म. फुले-शाहू यांच्या चळवळीसारखी चळवळ हल्ली गरजेची नाही. पण त्याचा जनताभिमुख व ग्रामाभिमुख दृष्टिकोण बरखास्त करण्यात आत्महत्या आहे. आंबेडकरांच्या मागे देखील त्यांचा दृष्टिकोण नाहीसा होणे अयोग्य आहे. लायकी वाढवून, गुणात्मक स्पर्धा करून दलित व ग्रामीण साहित्यिकांनी पुढे आले पाहिजे. ह्या कामी द्वेष व मत्सर उपयोगी होणारा नाही. सत्य तेवढे घेऊन असत्य टाकले पाहिजे. गुण घेतले पाहिजेत. केवळ पिळवणूक होते, केली जाते असे म्हणत बसण्यात अर्थ नाही, ज्यांची पिळवणूक होत आहे व ज्यांची फसवणूक होत असते, त्यांनी ती कशी होऊ नये, याची स्वतःही काळजी घेतली पाहिजे. यापुढे स्वतःच्या ‘अविकसित्वा’ची जबाबदारी लोकांवर टाकून भागणार नाही. स्वातंत्र्यपूर्वकाळातील भूतकालीन थोर पुरुष देखील त्यांच्यानंतर येणाऱ्या सर्व वेगवेगळ्या काळाला मार्गदर्शक होणार नाहीत. स्वावलंबन हेच महत्त्वाचे असते. बुद्धाने विभूतीपूजा एवढ्यासाठीच नाकारली होती. ग्रामीण (व दलितही) साहित्यांचे प्रयोजन, ध्येय, धोरण व कार्य यांच्या नव्या दिशा कालपरत्वे शोधल्या पाहिजेत व वाङ्मयीन चळवळीला कृतीचीही जोड दिली पाहिजे. म्हणजे चळवळही जरूर असतेच. संग्राम-झगडा असतो तो प्रतिगाम्यांच्या विरुद्ध पुरोगाम्यांचा असावा लागतो.

**ग्रामीण साहित्य म्हणजे ‘लोकसाहित्य’**

सुशिक्षित लोकच साहित्य निर्माण करीत होते, असे नव्हे. निरक्षर देखील करीत होते. श्रवण, पाठांतर, गायन (ऐकणे व गाणे) वगैरे साधनांच्याद्वारे लोकसाहित्य निर्माण होई. म्हणी म्हणजे लोकांचा अनुभव. ह्या लोकम्हणी म्हणजे देखील साहित्य होय. शहरी विभागापेक्षा ग्रामीण विभागात काही वेगळ्या म्हणी असतात. लोकगीते व ग्रामीण गीते यांचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. हे खरे निरक्षर लोकही पोवाडे, अभंग रचित होते व रचतात. प्रतिभा व अनुभव केवळ शहरी व सुशिक्षितापुरता मर्यादित नव्हता व नाही. तमाशे व लोकनाट्य, कलगीतुरा

अनुक्रमणिका

वगैरे वाङ्मयप्रकार निरक्षर लोकांनी वर्धमान ठेवले होते. निरक्षर जनता ही समंजस व समजुतदार नसते, हा भ्रम आहे. दलित स्त्रिया व पुरुष व ग्रामीण बलुतेदारवर्ग ह्यातूनही कवी, शाहीर व लोकनाट्यकार झाले व आहेत. यांची सर्वांची दखल घेतली गेली नाही. उपेक्षित आहेत.

सत्यशोधक वाङ्मय हे लोकसाहित्य होते. त्याची सूची तयार झाली नाही. काळ पलटला तरी त्यातील विचार लोकोपयोगी असतील. पुनर्मुद्रित झाले नाहीत. ह्या सर्व ग्रामीण साहित्याकडे म्हणजे लोकसाहित्याकडे ग्रामीण भागात जे प्राचार्य, प्राध्यापक व अध्यापक आहेत, त्यांनी इकडे लक्ष द्यावे. सहानुभूती व आवड पाहिजे. स्वतःचा संसार म्हणजे अखिल संसार नव्हे! पारिवारीकता थोडीफार ओलांडल्याशिवाय 'समाजवाद' येणार नाही.

**लोकशिक्षण हे ध्येय**

साहित्याचे ध्येय लोकशिक्षण व लोकसुधारणा हे असावे. वारकरी कीर्तनकारांनी त्यांच्या काळानुसार लोकशिक्षण केले. कित्येक दलित अभंगकर्ते व कीर्तनकार झाले. एकतारी कीर्तन व भजन लोकप्रिय होते. साहित्यात जीवन प्रतिबिंबित होते. साहित्य हे लोकप्रातिनिधिक असावे. भारत म्हणजे प्रायः ग्रामीण भारत ह्या दृष्टीने ह्या बहुजनसमाजाच्या साहित्याची वाढ व्हावी. साहित्याने समाज जागृत करून पुढे आणला पाहिजे. शाहूमहाराजांनी असे पत्रकार व साहित्यिक बनविले. त्यांना देणग्या दिल्या.

कै. श्री. वा. लिं. बिर्जे, केळूस्कर (शिवचरित्रकार), भास्करराव जाधव, लट्ठे, डोंगरे वगैरेंच्या कृती बदलत्या काळातही संपूर्ण कालबाह्य झाल्या नाहीत. विठ्ठल रामजी शिंदे यांचे नाव देखील दलित साहित्यात मोठे महत्त्वाचे आहे. ज्यांनी जात (Caste) हा त्यांचा लेखनाचा व दृष्टीचा पाया केला नाही; त्यांचे लेखन त्या काळातील देखील इंग्रजी राज्य गेल्यानंतरही स्वातंत्र्यात अभ्यसनीय आहे. फुले-आंबेडकर-शिंदे हे वाचक, आजन्म विद्यार्थी व समाजहितचिंतक होते. त्यांचा वारसा (अर्थात चालू व पुढील काळाच्या दृष्टीने) ग्रामीण व दलित साहित्यिकांनी जरूर घ्यावा. आत्मकेंद्रित राहण्यापेक्षा समाजहितकेंद्रित राहावे. खेड्यातील जीवन पंचांग (कॅलेंडर) व रूढ्या (चाकोऱ्या) यांच्यामागे जास्तीकरून परंपरागतपणे बहुधा चालते.

**मार्क्सवादी साहित्य**

मार्क्सची रशियन विचारसरणी, पहिल्या महायुद्धानंतर येथे आल्यापासून मार्क्सवादी लेखक व लेखन मराठीत वाढत आहे. पण रशियन आर्थिक साहाय्याने शहरी पांढरपेशेच जास्ती मार्क्सवादी लेखक झाले आहेत. ग्रामीण विभागातील फारच थोडे झाले आहेत. समाजात जातिभेद असल्याने, कोणाच्याही विचारांना मर्यादा पडतात. वर्गलढ्याबरोबर वर्णविषमतेविरुद्ध लढा देणे जरूर आहे, याची जाणीव मार्क्सवादी विचारवंतांना आता कोठे होऊ लागली आहे हे, त्यांचे सुदैव होय. कारण फुले-आंबेडकर यांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा दिला तसाच लढा भारतीय मार्क्सवाद्यांना भारतात द्यावा लागेल ह्याचे भान वाढले पाहिजे. स्वातंत्र्य आल्यानंतर अंधश्रद्धा, जातीय लढे वाढत आहेत.

अनुक्रमणिका

पण एक बाब मान्य केली पाहिजे, ती ही की, मार्क्सवादी पांढरपेशा शहरी बुद्धिजिवी लेखकांनी हिंदूधर्मांची व वैदिकधर्माची पुष्कळ अशी निःपक्षपात चिकित्सा केली आहे. साम्यवादी व समाजवादी लेखक-विचारवंत वर्णजातीचा अहंकार दूर ठेवण्यात पुष्कळ यशस्वी झाले आहेत. पण मार्क्सवादी हिंदी (Indian) साहित्य ग्रामीण साहित्याखाली येते का? मार्क्सवादी व समाजवादी पक्षांचे साहित्य पारिभाषिक व शास्त्रीय जास्ती आहे. एवढे मात्र म्हणावेसे वाटते की, ग्रामीण व दलित साहित्याने मार्क्सवादाचा अभ्यास करावा व मार्क्सवादी आणि समाजवादी साहित्याने ग्रामीण व दलित साहित्याचे भारतातील प्रयोजन व कार्य समजून घ्यावे. साहित्यात दलित, ग्रामीण, मार्क्सवादी (साम्यवादी-समाजवादी) व बौद्धसाहित्य वगैरे विशेषणे साहित्य प्रकाराला लावली जातात पण हे सर्व एकूण साहित्यातील दृष्टिकोणच मानावे लागतात. जरूरीप्रमाणे विभाग पडून विभागीय विचारआचार होत असतो. आर्थिकदृष्ट्या सर्व समाज एकवर्गीय व सांस्कृतिक दृष्टीने एकवर्णीय व एकजातीय नाही. हितसंबंध भिन्न भिन्न आहेत. म्हणून साहित्यालाही भिन्न भिन्न अंगे निर्माण होतात. एक मन व एकजिनशी समाज झाल्यावर साहित्य देखील एकात्म होईल.

**शे. का. पक्ष व साहित्य**

आता मराठीत मार्क्सवादी विचारांचे वाङ्मय विपुल आहे. दलित साहित्याचीही वाढ होत आहे. कोणताही पक्ष वाढावयाचा झाल्यास त्याला तत्त्वज्ञान-दृष्टी हवी असते व ती वर्धमान ठेवावी लागते. मार्क्सवादी पक्षानी कामगारांचा जास्ती आचारविचार केला. शेतकरी-कामगार पक्षाने कामगार ह्या संज्ञेपूर्वी शेतकरी ह्या वर्गीय संज्ञेला महत्त्व दिले, कारण शेती व शेतकरी हा भारतात अत्यंत व्यापक लोकसंख्येचा प्रधान विषय व व्यवसाय (जगण्याचा मार्ग) आहे. कामगार हे बहुतेकपणे शहरातून असतात. अजून खेड्यापाड्यांचे औद्योगिकीकरण व यांत्रिकीकरण झाले नाही. झाले तरी भारतात शेतकरी हा प्रमुख वर्ग राहणार व तो जास्तीत जास्त खेड्यापाड्यांत राहाणार, खेडीपाडी, वाड्या, वस्त्या असल्याशिवाय सर्वत्र देशात जी शेती आहे व फार मोठे लागवडीखाली क्षेत्र आहे, ते लागवडीस येणार नाही. म्हणून खेड्यापाड्यांचे अर्थशास्त्र व शहरी अर्थशास्त्र ह्यात तफावत राहणार. खेड्यांसाठी पंचवार्षिक योजनांतून स्वतंत्र व समर्थ विभाग असल्याशिवाय भारत पुढे येणार नाही.

ग्रामीण साहित्य व दलित साहित्य हे शे. का. प.ला जवळचे व पूरक आहे. बौद्ध साहित्य देखील ग्रामीण साहित्य म्हणून संबोधावे लागते. पूर्वीच्या बुद्धगुहा जास्तीत जास्त ग्रामीण भागात आहेत व नवबौद्धही जास्तीतजास्त ग्रामीण भागात राहातात. ग्रामीण साहित्याच्या कक्षा अशा एकरूप आहेत; जवळजवळच्या आहेत. ग्रामीण साहित्य म्हणजे खेडेगावातील जीवनासंबंधीचे साहित्य; ह्यात ग्रामीण भागातील चित्रे, व्यक्तिरेखा, सामाजिक जीवन उमटले जाते. गुणदोषचर्चा व आत्मपरीक्षण जास्तीपणे उत्तरोत्तर झाले पाहिजे. अंधश्रद्धा जावून विज्ञानात्मक दृष्टिकोण खेड्यात कसा व केव्हा निर्माण होईल, हा बिकट प्रश्न आहे.

शे. का. प.लाही साहित्य पाहिजे. नियतकालिके पाहिजेत. शेतकरी-कामकरी व एकूण श्रमिकांची बाजू पुढे आणण्यासाठी ही साधने हवी असतात. हल्ली ही बलवत्तर आहेत, असे म्हणता येईल काय? आजकालच्या जगात प्रचाराच्या साधनांना अत्यंत महत्त्व आहे; व कोणत्याही पक्षाचा प्रचार साहित्यसाधनांनी करू शकतात. सारासारविचार वाढवू शकतात. आज 'सिनेमा' निरक्षर व श्रमिक लोकही पाहातात! पण सिनेमा वैचारिक क्रांती

अनुक्रमणिका

करू शकत नाहीत. उलट वाईट प्रवृत्ती वाढवितात. सिनेमांनी 'लोकशिक्षण' किती केले व करताहेत, हा प्रश्नच आहे. हे एक मनोरंजनाचे साधन आहे. तीनचार तास प्रेक्षकांची चित्ते बांधून ठेवली जातात! पुढे काय? सिनेमात ग्रामीण जीवन प्रतिबिंबित होते असे नाही. गर्भश्रीमंत, शहरी, उच्चभ्रू, पांढरपेशे यांचे जीवन दाखविले जाते! सिनेमांनी नाट्यसृष्टी मागे टाकली, ह्या विविध साहित्यप्रकारात ग्रामीण बहुजनतेचा जीवनाचा विसर असतो!

**ग्रामीण जीवनाचा विवेक**

मोठी खेडेगावे थोडी आहेत पण खेडेगावातही लहान व मोठी खेडेगावे असा प्रकार आहे. बडे शेतकरी थोडे आहेत. पण साहित्य व सांस्कृतिक जीवनाकडे त्यांचे लक्ष आहे, असे नाहीच. लक्ष नाही. बौद्धिक प्रयत्न त्यांच्याकडून होत नाहीत. सर्व सत्ता मात्र हातात ठेवतात! सत्तेबरोबर अभ्यास (ग्रामीण जीवनाचा) होत नाही, म्हणून ग्रामीण समाजात प्रबोधन व परिवर्तन दिसतच नाही. ज्या रूढ्या आहेत, त्यात देखील पुष्कळ सुधारणांना वाव आहे. उदा., खेड्यापाड्यांतच घरटी वर्गण्या काढून जत्रा होतात. कुस्त्यांचे फंड हा चांगला प्रकार आहे. पण खेडेगावातूनही तालमी मागे पडत आहेत. तमाशा वर्षातून एकदा करमणूक व मनोरंजनार्थ असतो, पण ह्या सर्वांबरोबर गावातील गुणी व पहिल्या क्रमांकात येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देखील द्यावीत. ग्रामीण कथा, कविता, पोवाडे यांना प्रोत्साहन द्यावे.

ग्रामीण वाङ्मयप्रकार व देशी खेळ उत्तरोत्तर लोप पावत आहेत. 'भजनी मंडळे' असतात, पण अलिकडे भजनातून काहीजण दारू पिऊन अभंग व पदे म्हणतात! ग्रामीण साहित्याने ग्रामीण व्यंग, दोष व उणीवा देखील मांडल्या पाहिजेत. प्रत्येक खेडेगावातील स्थानिक मंडळींनी हे स्वावलंबनाने केले पाहिजे. तरच काही होईल! सर्वच शेतकऱ्यांचे कैवारी शेतकरी स्वतः होते. व खेड्यातच राहात होते, असे नव्हे. काही थोडेच दुर्मिळपणे असू शकतात. कामगारांचे पुढारी व कामगार प्रश्नावर लिहिणारे, बोलणारे प्रत्यक्षतः गिरणीत-कारखान्यात-सर्वसामान्यपणे स्वतः मजूर आणि कामगार होते व असू शकतात असेच नव्हे. 'दीनबंधू' लोखंडे गिरणीत स्टोअर क्लार्क होते, म्हणून कामगार प्रश्नांकडे अनुभवाने त्यांचे लक्ष गेले. फुले-भालेकर यांना शेती व शेतकरी जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव होता. ह्यांनी शेतकरी चळवळीला जन्म दिला. हे तिघे-चौघे व आणखी काही कर्मवीर होते. फक्त लेखकच नव्हते!

अनुक्रमणिका

१६.

## डॉ. आंबेडकर आणि त्यांचे ‘भीमयान’

बुद्धधर्मात महायान व हीनयान असे दोन प्रवाह मागे निर्माण झाले. कोणत्याही ऐतिहासिक धर्मांत एकापेक्षा जास्ती पंथ आहेत, एवढेच नव्हे तर एका पंथात आणखी उपपंथ आहेत. डॉ. आंबेडकरांनी बुद्धधर्मातील कोणताही एकच प्रचलित पंथ न स्वीकारता, फक्त बुद्धीला अभिप्रेत अशा मूळ बुद्धाच्या धर्माचे प्रकटन किंवा आविष्कार केला. तो नवा आहे.

चीन, जपान, ब्रह्मदेश व लंका वगैरे देशात बुद्धधर्म हल्ली जे प्रचलित आहेत, त्यांच्यात्यांच्यावर स्थानिक पूर्वधर्मांचा परिणाम होणे शक्य होते व झालाही आहे. डॉ. बाबासाहेब यांनी कोणाचीही संपूर्ण नक्कल केली नाही; उलटपक्षी, यांनी त्यांच्या प्रज्ञेतून व अनुभवातूनही स्वतःचा नवा प्रवाह निर्माण केला. म्हणून त्यांच्या प्रवाहाला ‘भीमयान’ असे संबोधणे भाग पडते. ही नवसंघटना ठरते.

माझा बुद्धधर्माचा अभ्यास अत्यंत तोकडा आहे. म्हणून माझे विचार बिनचूक असतील, असा दावा मी करीत नाही; अभ्यासकांनी क्षमा करावी. पण हा एक व्यापक अभ्यासाचा विषय होतो.

ज्याला ‘नव बुद्धधर्म’ म्हणून संबोधिले जाते, ते स्वतंत्र बुद्धधर्माचे डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेले नवे स्वरूप किंवा सार्थपणे नवीन प्रकटन ठरते. केवळ नव्याने झाले ते अलीकडील (आंबेडकर-अनुयायी) ‘नवबौद्ध होत’ अशी नवबुद्धाची व्याख्या उथळ व बाह्य स्वरूपाची वाटते. डॉ. आंबेडकर यांच्यापुढे मुख्यतः सर्व दलित समाज होता. किंबहुना त्यांच्यापुढे भारत देश-हिंदुस्थान व विशेषतः हिंदूधर्म, हिंदू समाजव्यवस्था व हिंदूधर्माचे ‘मनुस्मृती’ व इतर धर्मग्रंथ होते. फुले काय किंवा आंबेडकर काय, त्यांची मनोवस्था अशीच होती, असे म्हणण्यास प्रत्यवाद नसावा. फुल्यांच्या पुढे व लोकहितवादी यांच्याही पुढे पेशवाई गेल्यानंतरचा महाराष्ट्र (इंग्रजाने जिंकलेला) होता. आंबेडकरांची धर्मसुधारणा ही स्वातंत्र्य आल्यानंतरची होय. राममोहन रॉय यांच्यापासून ते थेट म. गांधींच्या अखेरपर्यंतचे धर्म व समाजसुधारकांपुढे (Socio-Religious Reformers) देखील हिंदूधर्म व हिंदूलोक होते. ह्यांनी किंवा ज्योतिरावांनी ‘हिंदू’ शब्द वापरून विचार-आचार-प्रपंच केला नाही. फार काय, दयानंद वैदिक संस्कृतीचे फार मोठे उत्थानकर्ते महापंडित झाले, पण त्यांनीही हिंदू शब्द स्वीकारला नाही.

देशात १८९६ साली ठिकठिकाणी (मुंबई-येवले-वाई वगैरे ठिकाणी) हिंदू-मुसलमानात उद्रेक घडले. त्यानंतर लो. टिळकांनी हिंदू विचारांवर भर दिला. यापूर्वी ब्राह्मो समाज-प्रार्थना समाज-परमहंस सभा वगैरे नवयुगसमाजांनी हिंदूधर्मापुरता विचार केला नाही व सर्व धर्मांच्या ऐक्याचे ‘एक राष्ट्रीयवादी’ (देशाभिमानी) हिंदी (-Indian) ही एकच भावना वरील सर्वांच्या आचाराविचारांत होती. सर्व लोक स्वतःला हिंदी मानीत. पुढे भेद पडले. पक्षोपपक्ष वाढत गेले.

अनुक्रमणिका

फुले-आंबेडकर वैदिक धर्मांचे कट्टे दुष्मन झाले. म. फुले हे तर शांकर अद्वैताचे पूर्ण शत्रू होते. फुल्यांचे असे मत होते की, प्रथम मुसलमानांनी व नंतर ख्रिश्चनांनी धर्मांतरे घडवून अस्पृश्यता दूर केली.

**डॉ. आंबेडकरांच्यापूर्वी**

डॉ. आंबेडकरांच्यापूर्वी, राजा राममोहन रॉय यांच्यानंतर भारतात बुद्धधर्मासंबंधी कोणती अवस्था होती? खुद्द राजा राममोहन रॉय हे सर्व धर्मांचे मूलभूत अभ्यासक झाले. ते पंडित व कर्मवीर देखील होते. एकपरी डॉ. आंबेडकर हे, इंग्रजी राज्य आल्यानंतर मिशनऱ्यांच्या आक्रमणातून जे सामाजिक प्रबोधन झाले, त्यातील शेवटचे मोठे पंडित मानावे लागतात. पुढील काळ मागील काळाशी संबंधित असतात. भूत, वर्तमान व भविष्य असे तीन काळ आहेत, तरीही हे तीन काळ पूर्ण सुटे नसतात. ह्या तिघांच्यामुळे तीनही काळांची निर्मिती होते. म्हणजे काळाला ही त्रिविध अंगे असतातच. असा विविध प्रकारे काळ बनतो. हा काळाचा स्वभाव असतो. काळदेखील पालटणारा-बदलणारा-असतो. पण काळाला डॉ. आंबेडकरांच्यासारखे महापुरुष बदलावयास लावतात. काळस्वरूपी यंत्रावर आरूढ होऊन ते काळाला नव्या दिशेप्रत नेतात. 'भीमयान' नवे होय.

राजा राममोहन रॉय हे बुद्धधर्माच्या अभ्यासासाठी तिबेटात गेले. हा प्रवास त्या काळी केवढा अवघड होता? राजा राममोहन रॉय यांनी बुद्धधर्मांचा व पाली भाषेचा अभ्यास केला होता. स्वतः वेदान्तवादी असूनही ते पोथीप्रामाण्यवादी नव्हते, तर बुद्धिप्रामाण्यवादी होते. ब्राह्मो समाजाच्या इतिहासात बुद्धधर्मावर व्यासंग करणारे एका चढीत एक असे अनेक विद्वान गृहस्थ होऊन गेले. मध्ययुगात व तत्पूर्वीच्या काळात फक्त बुद्धाला हिंदूंनी विष्णूचा अवतार मानले. हा समन्वय होता. पण इंग्रजी राज्य आल्यानंतर सर्व धर्मांच्या तौलनिक व समन्वयक अभ्यासाची नवी परंपरा निर्माण झाली. पाली व अर्धमागधीचे अध्ययन विदेशी व स्वदेशी पंडित करू लागले. मँचेस्टर कॉलेज याविषयी प्रसिद्ध होते.

भारतातील एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील विचारवंतांचा बुद्धधर्मांकडे कल गेला होता. उदा. विवेकानंद यांनी बुद्धधर्माची विलक्षण महती गायिलेली आढळते. म. गांधी यांच्याकडूनही बुद्ध-प्रशस्ती मिळते. फार काय, लो. टिळक व त्यांच्या संप्रदायातील लेखनातही बुद्ध-गौरव आहे. आद्य शंकराचार्यांचा गौतमाच्या स्तुतीसंबंधी एक श्लोक सादर करता येतो. पण या ठिकाणी आधारार्थ उतारे घेतल्यास लांबड लागेल, असे वाटते.

**महर्षी शिंदे आणि गौतम बुद्ध**

अस्पृश्यता-निवारणाला इतिहास आहे. म. फुले यांच्यानंतर आणि डॉ. आंबेडकर व गांधी यांच्यापूर्वी भारतीय अस्पृश्यतेच्या विचारावर आचारात्मक संघटितपणे जागृती करणारे पुरुष म्हणजे महर्षी शिंदे हेच प्रमुख नेते मानावे लागतात. धर्मशिक्षणार्थ मँचेस्टर कॉलेजात असताना त्यांना तुलनात्मक धर्म शास्त्राचा व समन्वयात्मक अभ्यास-पद्धतीचा अलभ्य लाभ झाला. शिंदे ज्यावेळी विलायतेस धर्माभ्यासासाठी निघाले तेव्हा सर्वांना नवल वाटले. भारत ही धर्मभूमी आहे, धर्म आणि अध्यात्माची खाण आहे, त्यातील इतर राष्ट्रांना भारत-धर्मभूमी वादातीत आदर्श होती व आहे. अशा स्थितीत धर्मशिक्षणार्थ शिंदे विलायतेस कशासाठी जात आहेत; असा त्यांना प्रश्न पडला!! त्यांनी तेथे धर्मशिक्षण घेतले, व मिशनरी व इतर लोक तेथे समाजकल्याणपर जी सेवाकार्ये

चालवीत होते, त्या संस्थांची त्यांनी पाहणी केली. इंग्रजांच्या स्वतंत्र देशाचे व सार्वभौमत्वाचे दर्शन त्यांना झाले, आपला भारत देश पारतंत्र्यात आहे, याची जाणीव व खंत त्यांना वाटली व ते राष्ट्रीय वृत्तीचे विचार व आचारवंत झाले. या दृष्टीने लो. टिळक त्यांना जवळचे वाटले. फुले-आंबेडकर हे शूद्रातिशूद्रांचे दारिद्र्य, मागासपणा व त्यांच्यावरील गुलामगिरी यामुळे हैराण व बेचैन होते. राष्ट्रीय वृत्तीमुळे शिंदे प्रथम लो. टिळकांच्या प्रभावाखाली गेले व नंतर म. गांधींचे अनुयायी होऊन सत्याग्रहातील लढ्यात तुरुंगवास भोगते झाले. सन १९०५ च्या आधीपासून कर्मवीर शिंदे हे बुद्धधर्माचे अभ्यासक व त्या धर्माची निष्ठा व अभिमान बाळगणारे होते.

बुद्धधर्माने जातिभेद व अस्पृश्यता मानिली नव्हती. त्याज्य समजली. बुद्ध हा पहिला मोठा धर्मसुधारक म्हणून त्याची जयंतीदेखील ते सार्वजनिकपणे पाळीत. बुद्ध आत्मा मानीत नव्हते. हा बुद्धाचा क्रांतिकारक विशेष शिंद्यांच्या भक्तीच्या आड येत नसे. कारण शिंदे सांप्रदायिक बुद्धीचे नव्हते न तशी त्यांच्यात घट्ट व मठ्ठ पक्षीयता नव्हती. अस्पृश्यांच्या उद्धारार्थ अखिल भारतीय पातळीवरून सतत प्रयत्न करणारी शिंदे ही एकच महत्त्वाची व्यक्ती मध्यंतरीच्या (फुले-आंबेडकरांच्या दरम्यानच्या) काळात झाली. बुद्धधर्माचे संशोधक व अभ्यासक धर्मानंद कोसंबी हे महर्षी शिंदे यांचे मित्र होते. भगवान बुद्धांवर दोघांचेही नितांत प्रेम होते. शिंदे यांनी त्यांची पुण्यास व्याख्यानेही घडवून आणली, पण त्यांना व विवेकानंद, राममोहन, गांधी वगैरे वर नमूद केलेल्या बुद्धधर्मप्रेमी पुढाऱ्यांना बुद्धधर्म प्रत्यक्ष स्वीकारून त्यात प्रवेश करण्याची सामाजिक गरज डॉ. आंबेडकरांच्याप्रमाणे वाटली नाही. गांधी हे सर्वधर्मसमानतावादी होते, तर शिंदे हे सर्वधर्मांतर्गत धर्मरहस्यावर प्रेम करून त्याचा प्रचार करणारे होते. गांधी व शिंदे दोघेही आपापल्या परीने अस्पृश्योद्धारक होते. फार काय, शिंदे यांनी अस्पृश्यता-निवारणाचा विषय हिंदी काँग्रेसमध्ये दीर्घ व चिकाटीच्या प्रयत्नाने नेला आणि म. गांधींचे व राष्ट्रीय सभेचे लक्ष ह्या प्रश्नाकडे जास्त वळविले. प्रार्थना समाजी शिंद्यांना डॉ. आंबेडकर यांच्याप्रमाणे अस्पृश्यांच्या धर्मांतराची गरज वाटली नाही. मागे जोतिराव फुले यांनी अस्पृश्यांना ख्रिस्ती धर्मात जाण्याविषयी जे अडथळे आहेत ते स्पष्ट केलेले आढळतात. (पाहा : 'म. फुले समग्र वाङ्मय,' पृ. २५०, ओळ पंधरा) पण त्यांनी स्वतः, मिशनरी व बाबा पदमनजींचा जवळचा व जुना संबंध असूनही बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती मत स्वीकारले नव्हते. गांधींचेही ख्रिस्ती धर्मावर असे प्रेम होते. फार काय, गांधींचे इंग्रजी लेखन बायबलमधील इंग्रजी भाषेच्या धर्तीवर असे, पण फुले व गांधी यांनी मिशनरी मित्रांची निराशा केली. आंबेडकर यांचाही बायबलचा व ख्रिस्ती धर्माचा अभ्यास होताच, पण ते त्यांच्याकडे जोतिबा व गांधी यांच्याएवढेही संबंध आयुष्यात ओढले गेलेले दिसले नाहीत. सर्वच परकीय आणि परदेशीय धर्मांना डावलून बुद्धधर्माचा मार्ग त्यांनी पत्करला. पूर्वी महाराष्ट्रात व इतरत्र बुद्धधर्म सर्वत्र जारी होता. देशभर बुद्धगुहा आहेत.

## कर्मवीर शिंद्यांचे बुद्धधर्म प्रेम व दलितोद्धार

महर्षी शिंदे, राजा राममोहन रॉय यांच्या मालिकेतील ही परंपरा डॉ. आंबेडकरांनी स्वीकारली नाही. फुल्यांच्या नंतर व आंबेडकरांच्या अगोदरचे शिंदे, सन १९०६ पासून बुद्धजयंती दरसाल साजरी करीत. १९३३ साली वाई येथे ब्राह्मो समाजाची स्थापना बुद्धजयंतीच्या दिवशीच झाली. ब्रह्मदेशात भरलेल्या जागतिक बुद्धधर्म परिषदेस ते भारतातील प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. "मी बुद्धिस्ट आहे". असे कलकत्त्याच्या साधारण ब्राह्मो समाजाने भरविलेल्या मेळाव्यात शिंदे म्हणाले. इतर विद्वान व सांप्रदायिक ब्राह्मो समाजीयांना त्यांचे म्हणणे

अनुक्रमणिका

आवडले नाही. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न ह्या त्यांच्या महनीय पुस्तकात बुद्धधर्माचा संशोधकीय अभ्यास व्यक्त झालेला आहेच. भारतीय अस्पृश्यता-निवारणाचा इतिहास सादर करताना त्यांनी बुद्धास पहिले स्थान दिले. बुद्धधर्मावरील त्यांचे इतरही पुष्कळ विचारधन उपलब्ध आहेत. 'बौद्ध धर्म व संघ' हे धर्मानंद कोसंबीकृत पुस्तक त्यांच्या आवडीचे होते. जातककथाही ते धर्मशिक्षणाचा एक भाग मानीत. एवढे सर्व त्यांच्याशी प्रत्यक्ष झालेल्या जवळच्या सहवासातून प्रस्तुत लेखकाला सांगता येते.

ब्राह्मो समाजाचा धर्म ज सर्वधर्म आहे व तो फक्त शुद्ध हिंदुधर्मच नव्हे, तर मग त्यात बुद्धधर्म सामावतोच. असे त्यांचे व्यापक मत होते. येथे त्यांचे आगळेवेगळे स्वरूप समजते. असा आध्यात्मिक व भौतिक पायादेखील शिंदे यांनी आंबेडकरासाठी भरला होता. शिंदे यांनी बांधलेल्या अहिल्याश्रमात डॉ. आंबेडकर पुण्यास प्रथम येत असत; तेव्हा त्यांच्या ह्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'मध्येच उतरत. आंबेडकर यांच्या शिक्षणार्थ आर्थिक साह्य लाभावे म्हणून बडोदे व कोल्हापूर महाराजांकडे त्यांनी शिफारसही केली होती. कर्मवीर शिंदे ह्यांनी केलेली दलितांची सेवा सांगण्यासाठी स्वतंत्र लेख लिहावा लागेल. 'बहिष्कृत भारत' (Untouchable India) ही संज्ञा १९०३ पासून त्यांनीच योजिली व भारतातील निरनिराळ्या प्रांतांमधून दलितांची संख्या केवढी आहे, याचे साधारण आकडे भारतात प्रथम त्यांनीच शोधून उपलब्ध केले. अस्पृश्यतेचा उगम, त्यांच्यातील जातीजमातींची संशोधनीय माहिती त्यांनीच प्रथम जमा केली. डॉ. आंबेडकरापूर्वी बुद्धधर्माचा व्यासंगी अभ्यास करणारे महर्षी शिंदे हे अस्पृश्योद्धाराचे पहिले मोठे पुढारी झाले. 'साऊथबरो कमिशन'पुढे 'अस्पृश्य प्रतिनिधीसाठी राखीव जागा असाव्यात' अशी वैयक्तिक साक्ष दिली व त्यांच्या प्रयत्नाने काही मिळाल्याही. थोडक्यात सांगावयाचे आहे की, शिंदे यांनी भीमयानासाठी सर्व बाजूने जमीन नांगरून ठेवली.

निकृष्ट लोक निकृष्ट धर्म सहसा पाळतात. त्यांना वर आणण्यासाठी कोणता ना कोणता 'सद्धर्म' दलितांना हवा, याची जाणीव शिंदे यांना होती. शिंदे विश्वधर्मी होते. एक धर्म व एकच माणूसजाती, ही त्यांची विचारसरणी होती. या दृष्टीने महर्षी शिंदे ब्राह्मो समाजाच्या विश्वधर्माचे पुरस्कर्ते व प्रचारक होते. सर चंदावरकर यांच्या अध्यक्षत्वाखाली 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस' सन १९०६ साली शिंदे यांनी स्थापिले. म. फुले यांनी महार-मांग वगैरे अतिमागास लोकांसाठी सन १८५२ मध्ये शाळा काढली होती. या शाळेसाठी एका संस्थेचीदेखील योजना केली होती. हे कार्य म. फुले यांनी ज्या जागेवर चालू केले होते, तीच मिळकत पुणे म्युनिसिपालटीकडून शिंद्यांनी ताब्यात मिळविली व तेथेच वसतिगृह व शाळा काढल्या, ह्या मिशनच्या शाळा व शाखा नागपूर, सातारा, मुंबई वगैरे दहा-बारा ठिकाणी चालू झाल्या. 'डिप्रेस्ड क्लासेस' अशी वर्गीय परिभाषा त्यांनी योजिली. आज 'दलित' (Depressed) हीच संज्ञा व परिभाषा वापरात आहे. 'शेड्यूल्ड कास्ट्स' असे जातिवाचक नामाभिधान त्यांनी पत्करले नव्हते. मुंबई कौन्सिलात प्रथम घेतलेले दलितांचे प्रतिनिधी शिंद्यांच्या मिशनमध्येच शिकले. शिंद्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या अगोदरची एक दलितांमधील नवी शिक्षित पिढी तयार केली. डॉ. आंबेडकर यांच्यापूर्वी व महात्मा फुले यांच्यानंतर अखिल भारतीय स्तरावरून शिंदे यांनी दलितांसाठी जे शैक्षणिक, धर्मपर व त्यांच्या राजकीय जागृतीचे कार्य केले; त्यानंतर डॉ. आंबेडकर यांनी पृथक् व स्वतंत्र कार्य केले. पर्वती सत्याग्रहात शिंदे यांनी भाग घेतला होता. त्यापूर्वी राजर्षी शाहू व सयाजीराव आणि भारतातील विविध पक्षांचे धुरीण यांचे लक्ष अस्पृश्यतेच्या भारतीय प्रश्नाकडे ओढण्यासाठी शिंदे यांनी जी हाडाची काडे केली, ती त्यांची तपश्चर्या विसरणे हे अन्यायाचे होते. शिंदे-आंबेडकर यांच्यामध्ये मतभेद होऊन

आंबेडकरांचा मार्ग स्वतंत्र झाला. फुले-आंबेडकर यांच्यामध्ये शिंदे नसते तर पोकळीच राहिली असती. नंतर स्वतः आंबेडकरानी बुद्धधर्माची पुढील नव घटना केली :

**डॉ. आंबेडकरांचे बावीस कलमी भीमयान**

१. मी ब्रह्मा, विष्णु, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

२. राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

३. गौरी-गणपती इत्यादी हिंदूधर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

४. देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.

५. बुद्ध हा विष्णुचा अवतार होय हा खोडसाळ प्रचार होय.

६. मी श्राद्ध-पक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.

७. बुद्धधर्माच्या विरुद्ध विसंगत कोणतेच आचार करणार नाही.

आणखी राहिलेली पंधरा कलमे पुढे दिली आहेत :

महायान व हीनयान यांच्यानंतर अलीकडे भीमयान निर्माण झाले. ह्या सर्व प्रतिज्ञा, बौद्धधर्माची दीक्षा घेताना घेतल्या गेल्या. दिनाकं १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या शुभ दिनी बाबासाहेबांनी बुद्धधर्माचा आपल्या अनुयायांसह नागपूर येथे जाहीरपणे सामुदायिक स्वीकार केला. त्या वेळेचे प्रतिज्ञापत्रक आजही अभ्यासनीय आहे. आठवे कलम क्रांतिकारक वाटेल.

८. कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाच्या हातून करवून घेणार नाही.

९. सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.

१०. मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.

११. भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांगमार्गांचा अवलंब करीन.

१२. भगवंताने सांगितलेल्या दहा पारमिता मी पाळीन.

१३. सर्व प्राणिमात्रांवर दया करीन. त्यांचे लालनपालन करीन.

१४. चोरी करणार नाही.

१५. खोटे बोलणार नाही.

१६. व्यभिचार करणार नाही.

१७. दारू पिणार नाही.

१८. माझ्या जुन्या मनुष्यमात्रांच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्य मात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदूधर्मांचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धर्माचा स्वीकार करतो.

१९. ज्ञान, शील आणि करुणा या बौद्धधर्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन चालवीन.

२०. तोच सद्धर्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

२१. माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.

२२. इतःपर बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो.

अनुक्रमणिका

**भीमयान**

'भीमयान' ज्याला म्हणता येते, त्या आंबेडकरप्रणित धर्माचे स्वरूप व सूत्रे वरीलप्रमाणे आहेत. ह्यात अवतारवाद व विभूतिपूजा नाही. नैतिक मूल्यांवर भर आहे. कोणतेही नवधर्मप्रतिष्ठान बनत असताना त्याची सूत्रे-नियम कायम करावे लागतात. उदा; जोतिरावांनी सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे, यासंबंधी तेहतीस नियम केले होते. डॉ. आंबेडकरांनी बावीस नियम ठरवून 'प्रतिज्ञापत्रक' तयार केले. याची जरुरी असते. बुद्धधर्म स्वीकारल्यानंतर टाकावयाच्या अशा हिंदूधर्मातील त्याज्य बाबी कोणत्या याचा स्पष्ट उल्लेख प्रतिज्ञापत्रकात आहे. आठव्या नियमातील 'कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाच्या हातून करवून घेणार नाही.' हा दंडक जोतिरावांचाही होता. पण तो पुढे अमलात येऊ शकला नाही. कारण ब्राह्मणेतर समाज पूर्ववत सनातनी व परंपरावादीच राहिला व आहेच. ही शोकांतिका झाली! ब्राह्मणेतर चळवळ प्रतिक्रियात्मक होती. नव बुद्धधर्माचे असे होऊ नये! त्यांचे पूर्वधर्मात कालांतराने विलीनत्व घडणार की नव बुद्धधर्म पुढे विकास पावणार?

**धर्मांतराचा ऐतिहासिक प्रश्न**

ह्या देशाच्या इतिहासात मूळ वैदिक धर्मातून उठाव करून वेगळा अलग धर्मपंथ स्थापण्याचे प्रयत्न बुद्धपूर्वकाळ व बुद्धोत्तरकाळापासून आजतागायतच्या भीमयानापर्यंत अनेक झाले. वेदपूर्वकाळी येथे समग्र अंधार नव्हता. प्राकृत संस्कृती व धर्म होतेच. जैन धर्म जुना म्हणून ओळखला जातो. कालांतराने पूर्वधर्म व नवीन पंथ यांचा हिंदूधर्मात समावेशदेखील झाला. परंपरावाद व गतानुगतिकता येथे प्रभावी होती. बुद्धधर्माला क्रांतिकारक म्हणता येते. बाकीच्या धर्मसुधारणापर परिवर्तनवादी चळवळी झाल्या व होतात. बुद्धधर्माचा भागवतधर्मीयांवरही परिणाम झाला. बुद्ध हा पहिला मोठा प्रसिद्ध संत झाला. पुढे मुस्लिम व नंतर ख्रिस्ती अतिक्रमणे आली. या दोन्ही धर्मांनी दलित वस्तीपैकी बराच भाग आत्मसात केला. नाहीतर आजच्यापेक्षाही दलितांची संख्या देशातील प्रत्येक प्रांतात जास्त असती. धर्मांतरामुळे ग्रामबाह्यता जाते व स्पृश्य होता येते. व्यवसायांतर करून स्पृश्यांचे व्यवसाय-धंदे करता येतात. धर्मांतराचे कित्येक सामाजिक व आर्थिक फायदे असू शकतात. त्यामुळे जे त्यांचा धर्म स्वीकारण्याकडे साहजिक कल असतो ते जैन-बुद्ध स्वकीय व येथीलच होते व आहेतही. सांस्कृतिक व राजकीय आक्रमण करणाऱ्यांची गोष्ट वेगळी ठरते. त्यांनी आमिष दाखवून बाटविण्याचा मार्ग स्वीकारला. स्थानिक जैन-बुद्धाप्रमाणे बाहेरील ख्रिस्ती व महंमदी धर्मांना हिंदूत्वात समावेशित करण्यात यश येत नाही. शुद्धीचे प्रयत्न अपुरे पडतात व स्वातंत्र्य आल्यानंतर जेवढे हिंदूकरण व्हावयास पाहिजे होते, तेही घडले नाही. बहुतेक चर्चेस दलित वस्तीच्या नजीक असतात. अव्वल इंग्रजी झाल्यावर ख्रिस्ती आक्रमणाला व प्रचाराला मोठा ऊत आला. राममोहन, दादोबा पांडुरंग, जोतिराव फुले वगैरे अव्वल इंग्रजीतील पहिल्या पिढीपुढे 'धर्मांतर का स्वधर्मसुधारणा?' असा यक्षप्रश्न उभा राहिला. वरील पुढाऱ्यांवर बायबलचा दाट प्रभाव असतानाही त्यांनी स्वधर्मसुधारणेच्या चळवळी चालू केल्या. नवयुग धर्मसमाज स्थापिल्यामुळे धर्मांतरे रोखली गेली. तत्पूर्वी मुसलमानी अमलात संतांनी भागवतधर्मीय वारकरी पंथ वाढवून धर्मांतराची लाट बरीच थोपविली. हिंदूधर्मात वरील सर्व चळवळी होऊनही अस्पृश्यता जारी राहिली. पेशवाईत सामाजिक छळ व विषमता वाढली. ह्याची प्रतिक्रिया म्हणून जोतिबा फुले झाले तरी काम भागले नाही. डॉ. बाबासाहेब यांच्या स्वतंत्र प्रयत्नांची गरज राहिली. धर्मांतराची त्यांना गरज वाटलीच, कारण वरील सर्व इतिहास व चळवळी होऊनही दलितांचा प्रश्न कायम राहिला. हा सुटला असता तर भीमयानाचे नवे प्रयोजन राहिले नसते व

अनुक्रमणिका

भीमयानानेदेखील दलित प्रश्न संपला की काय? असा संभ्रमात टाकणारा प्रश्न पडला नसता. दलितांमध्येही राष्ट्रीय कार्यकर्ते होते व त्यांच्यामध्येही गरीब-श्रीमंत भेद तयार होत आहे.

**डॉ. आंबेडकरांचे मतभेद व उद्दिष्ट**

डॉ. आंबेडकरांच्या तथाकथित धर्मांतरासंबंधीची लोकातील उलटसुलट चर्चा मागेच थांबली. डॉ. आंबेडकर कोणत्याही समकालीन अगर पूर्वकालीन प्रवाहाशी एकरूप झाले नाहीत. त्यांचा मार्क्सवादावरील व्यासंग मोठा होता. रशियाने काही वरिष्ठ भारतीय उच्चभ्रू लोकांकडे त्यांच्या मार्क्सवादी पक्षाचे काम सोपविले, असा दोष रशियन कम्युनिस्टांना त्यांनी दिला. काँग्रेसशी त्यांचे नाते बरोबर नव्हते. जेधे-गाडगीळ हे जोडीने निवडणुकीस उभे राहिले. ह्या जोडीपैकी जेध्यांनादेखील त्यांनी पाठिंबा दिला नाही! जेध्यांचा काँग्रेसप्रवेश बाबासाहेबांना नामंजूर होता, असो.

डॉ. आंबेडकरांचा पिंड धर्मवादी होता. 'Between Scheduled Castes and Communism Amebedkar is the barrier.' असे ते स्वतःविषयी उल्लेख करून म्हणाले, हल्लीचा काळ 'मटेरिआलिस्टिक' व 'सेक्युलर' असूनही त्यांनी बौद्ध होऊन मार्क्सवादाला रोखले. त्यांचे शिक्षण विशेषतः ब्रिटन व अमेरिकेत झाले होते. शिंदे, माटे, सावरकर व गांधी ह्यांच्यापेक्षा वेगळाच प्रश्न आंबेडकर यांच्यापुढे होता आणि वरील सर्वांनाच डावलून त्यांनी 'भीमयान' सिद्ध केले. याचे कारणही त्यांनी स्वतःच दिलेले आहे; ते असे :

"माझ्यासमोर हा प्रश्न आहे, की मी जाण्यापूर्वी माझ्या समाजाला काहीतरी definite द्यावयास पाहिजे. कारण हा समाज आतापर्यंत दलित, पीडित, शोषित राहिलेला आहे. त्यामुळे आता त्यामध्ये जी नवजागृती येत आहे, तीमध्ये एक प्रकारची चीड, आवेश असणे स्वाभाविक आहे आणि अशा प्रकारचा जो समाज असतो तो कम्युनिझमचा भक्ष्य बनतो आणि मला हा माझा-शेड्यूल्ड कास्ट-समाज कम्युनिझमच्या आहारी जावा असे वाटत नाही. त्यामुळे त्याला कुठे ना कुठे तरी divert करणे हे राष्ट्राच्या दृष्टीने मला अवश्य वाटते."

'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' १९४२ साली त्यांनीच स्थापिले असताना पुढे नवीन 'रिपब्लिकन पक्ष' काढला. निरनिराळ्या राजकीय पक्षातील दलित या पक्षाच्या द्वारे एकत्र येतील, दलितेतर-ज्यांना बुद्ध आवडतो-असेही ह्या नव्या पक्षात येतील-असा चक्रव्यूह त्यांनी योजला होता. हा चक्रव्यूह यशस्वी झाल्यास नको असलेल्या जुन्या पद्धती नाहीशा करून पाहिजे त्या नव्या जरूरीच्या बाबी प्रस्थापित करता येईल व ह्याद्वारे भीमयानही परिपुष्ट होईल. पण त्यांना अभिप्रेत असलेला वरील राजकीय ऐक्याचा नवा प्रवाह एकत्र आलाच नाही. रिपब्लिकन पक्ष व भीमयानदेखील, त्यांच्या स्वसमाजापुरते मर्यादित राहिले!

दलिता व गरीब पीडितांना मार्क्स हाच सखा होतो, ह्या त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दलित सुशिक्षित तरी पुढे मार्क्सवादापासून दूर राहणार नाहीत. हा धोका भीमयानालाही पुढे संभवतो. अस्पृश्योद्धार का 'स्वोद्धार' असा प्रश्न उभा राहिला! डॉ. आंबेडकरांना केवळ स्पृश्यांच्याकडून अस्पृश्यांचे नेतृत्व नको होते. शिंदे, गांधी व माटे यांची गरज संपली. धर्मांतराचे वारे वाहू लागले.

**धर्मांतर का पुनरुज्जीवन**?

आंबेडकर कोणता धर्म स्वीकारणार ह्यासंबंधी भारतभर प्रथम कुतूहल निर्माण झाले होते. बुद्धधर्माबद्दल त्यांच्या मनात-सन १९५६ पूर्वीची वीस वर्षे-विचार चालू होते. शेवटी बुद्धधर्मात निश्चितपणे प्रवेश केल्यामुळे फार मोठी खळबळ उडाली! डॉ. आंबेडकरांच्या शोचनीय मृत्यूमुळेही धर्मांतराची लाट निमाली नाही. उलट ठिकठिकाणी उपक्रम चालूच राहिले. बाबासाहेबांच्या भीमयानाचे महत्त्व व प्रभाव यामुळे जाणता येतो.

एक परिणामकारक घटना म्हणून धर्मनिर्णय मंडळाने याचा उल्लेख केलेला आढळतो. 'पुनरुज्जीवन' असा उल्लेख धर्मनिर्णय मंडळाच्या रौप्य महोत्सवी वृत्तान्तात आढळतो. 'वास्तविक भगवान बुद्ध हे भारताचे सुपुत्र असून भारताच्या आचारविचारांवर त्यांनी प्रतिपादिलेल्या धर्मतत्त्वांचा प्राचीन काळीच परिणाम झालेला आहे. तथापि या नव्याने होणाऱ्या बुद्धधर्मप्रवर्तनाचा विशेष हा की, ते एका वेगळ्याच मनोवृत्तीतून आपला मार्ग चोखाळीत आहेत. त्याचा नीट उलगडा (वर उद्धृत केलेल्या बावीस कलमी योजनेप्रमाणे) प्रतिज्ञेवरून होऊ शकतो.' (वृत्तान्त, पृ. १२५-२६).

नागपूर येथे झालेल्या जाहीर दीक्षा समारंभास भिख्खू सद्धतिता उपस्थित होते. त्यांचे भाषण आजही हिंदूंना व नवबुद्धांना चिंतनीय वाटेल. ते म्हणाले,

"...कनव्हर्शन (धर्मांतर) म्हणतात. हे वर्णन तितकेसे आनंददायक नाही. खऱ्या अर्थाने पाहिले तर हे स्वधर्मांतर आहे ...धर्मांतर हा शब्द ज्या रूढ अर्थाने वापरला जातो त्या अर्थाने त्यात आमिष असते आणि परधर्मांत गेल्याची भावना असते ... आपल्या देशाच्या पूर्वीच्या धर्मांत आपण जात आहोत ...धर्मांतर केले नसून त्यांनी स्वधर्म पत्करला असेच म्हणावयास पाहिजे." ('प्रबुद्ध भारत' : बौद्ध दीक्षा विशेषांक, पृ. ३५)

प्रस्तुत लेखकासही वरील कारणामुळे 'धर्मांतर'-कन्व्हर्शन-शब्द अयोग्य होय, असे वाटते. म्हणून ह्या प्रयोगाला 'भीमयान' म्हटले आहे. आमिषयुक्त अंधश्रद्धेचे खुद्द गौतमाला व आंबेडकरांनाही पूर्ण वावडे होते. 'भीमयान' हा नवा अलीकडचा मोठा उठाव आहे.

> *तापाच्छदाच्च निकषात् सुवर्णमिव पण्डिताः।*
> *परीक्ष्य मिक्षवो ग्राह्य मद्वचो न तु गौरवात॥ 'तत्त्वसंग्रह' : ३५८८*

अर्थ : सोन्याची अग्नीत ज्याप्रमाणे पारख करून घेतात तसे माझे बोलणे नीट पारखून घ्या. स्वतः बुद्ध जर त्याचे म्हणणे पारखून घ्या म्हणतो, तर नव बुद्धधर्मप्रवर्तक आंबेडकर यांचेही म्हणणे पारखून घेणे आज व पुढेही जरूरीचे राहील. त्यांच्यानंतर तेवीस वर्षांचा काळ लोटला. हा मागील सर्व तेवीस वर्षांचा काळ स्वातंत्र्यातील आहे.

डॉ. बाबासाहेब यांना स्पृश्यांचा अस्पृश्यांवरील अन्याय अनुभवास आला व ह्या विटलेल्या मनोवृत्तीतून त्यांनी बुद्धधर्ममार्ग स्वीकारला. त्यांचाही नाइलाज होता. हा शेवटचा धक्का देणारा बाण त्यांनी सोडला व त्यांच्या

जीवनाची इतिकर्तव्यता झाली. गौतमचा काळ व उद्देश आणि त्याचे ध्येय वेगळे होते. डॉ. आंबेडकरांची बावीस कलमे तशी बरीच नवी आहेत व संदर्भ अलीकडील आहे. गौतमाच्या धर्माचे त्यांच्यानंतर काय झाले हेही लक्षात घेणे येथे जरूर वाटते. गौतमाचे यज्ञप्रधान कर्मकांडी व पशुहत्याकारक धर्मपद्धतीविरुद्ध बंड होते. हिंसामय यज्ञ पूर्ण मागे पडले. या दृष्टीने बुद्ध विजयी! त्याच्या मतातील स्वीकारणीय भाग पुढे हिंदुधर्माने पत्करून आत्मसात केला. आजचा म्हणजे पुढील प्रच्छन्न शंकराचार्यांचा हिंदूधर्म म्हणजे हिंदू व बुद्धधर्माचा समन्वय आहे. हिंदूधर्माच्या विशाल उदरात, सर्वसंग्राहकतेत आजवरची अनेक बंडे गडप झाली. तसे आंबेडकरांचे बंड-भमीयान-पुढे गडप होणारच नाही, असे ऐतिहासिक अनुभवाने म्हणता येणे फारच कठीण! आंबेडकरांची क्रांती सामाजिक व मानसिक होती, हे मात्र खरे. ब्रह्मदेशातील न्या. थून यांनी देखील आंबेडकरांच्या सामुदायिक दीक्षा-समारंभात साधकबाधक विचार मांडले होते. त्यांनी सहिष्णुता व सहकार्य यांची माहिती सांगितली. आंबेडकरांच्या धर्मांतरासंबंधी अनेक मान्यवरांचे मतभेद होते. 'बुद्धधर्म हा निवृत्तिप्रधान आहे' असे मत माननीय तर्कतीर्थ जोशी यांनी व्यक्त केले आहे. 'आंबेडकर यांचे कार्य संपले' ह्या प्रकारचे त्यांचे विधान बाबासाहेबांना मुळीच आवडले नाही. फुले-प्रवाहाचा इतिहास तर्कतीर्थांनी लिहिला होता. आंबेडकरांचेही चरित्र तर्कतीर्थ लिहिणार होते. पण हे जाहीर केलेले संकल्प दुर्दैवे करून उजेडात येऊ शकले नाहीत. महाराष्ट्र ह्या विचारधनाला मुकला! तरीपण वैदिक 'वैदिक-धर्म विकास' ह्या पुस्तकात व बुद्धधर्मावरील आपले व्याख्यानमालेत वऱ्हाडात त्यांनी गुंफलेली अनेक व्याख्याने उपलब्ध आहेत. बुद्ध संस्कृती व धर्म यांवरील विवेचन नवबुद्धांनाही आभ्यसनीय वाटेल. एवढा प्रपंच दुसऱ्या कोणी हिंदूपंडिताने अलीकडे तरी केला नसावा. डॉ. आंबेडकर यांच्याशी त्यांचा जवळून परिचय होताच व स्वतः बाबासाहेब तर्कतीर्थांची विद्वत्ता जाणीत. दोघांची भूमिका वेगळीच झाली.

परिवर्तनवाद्यानी 'कोणताही धर्म स्वीकारताना तो निरागसपणे स्वीकारला जावा' असे मत मांडले. रौप्य महोत्सवी वृत्तान्तात 'बौद्धधर्माचे पुनरुज्जीवन' हे सहावे प्रकरण मोठे उद्बोधक आहे. बुद्धधर्म ही धर्मशाखा, त्यांचे मते परिवर्तनीय ठरते. यापुढे बुद्धधर्माचे नवबुद्धांनी 'निरागसपणे' अध्ययन व प्रचार करावा. भारतीय आचारविचारात जातिभेदामुळे जे दोष शिरले त्यांचे उच्चाटन करणे सर्वांचे एकसारखे कर्तव्य राहते. जातिभेद दलितांमध्येही असल्याने बाबासाहेबांचे भीमयान महार समाजापुरते मर्यादित राहिले. तरी ह्या समाजाने सार्जनिकपणे भीमयानाचा स्वीकार केला व त्याचा पाठपुरावा चालला आहे, हे कमी महत्त्वाचे नाही. दलित म्हणून म्हणवून घेण्यापेक्षा 'बुद्ध' होणे व संबोधून घेणे चांगले व अधिकाधिक श्रेष्ठ होय. बुद्धधर्माची संख्या जगात मोठी आहे. हा मानवतावादी विश्वधर्म होय. म्हणूनही सर्व जगात बुद्धाला व त्याच्या धर्माला फार मोठे ध्रुव स्थान आहे.

**भीमयानाचे भवितव्य**

भीमयानाचे भवितव्य विशेषतः नवबौद्धांवर अवलंबून आहे; कारण महारेतर विविध जातिजमातींचा मोठा समाज हिंदूच राहिला आहे. हिंदू-दलित व बुद्धदलित असा फरक पडला आहे. धर्मांतराचा प्रयोग व तोडगा असा व्यंग वाटतो.

अनुक्रमणिका

पूर्वाश्रमीचे अस्पृश्य मुसलमानी व ख्रिस्ती धर्मात जात असत. मिशनरींची कलेक्टर वगैरे वरिष्ठ गोऱ्या अधिकाऱ्यापर्यंत ओळखपाळख असल्यामुळे त्यांना, धर्मांतरितांना नोकऱ्याचाकऱ्या मिळवून देण्यात थोडेफार यश येई. पण इंग्रज आता गेले. परंतु असे म्हणतात की, स्वतंत्र भारतात देखील ख्रिस्ती यत्न उलट वाढले आहेत! उलटपक्षी, हरिजन व बौद्धांना सवलती दिल्या जातात. या सवलतींचा फायदा कित्येक धर्मांतरित हरिजन मूळची अस्पृश्य गणलेली जात लावून घेतात! मिशनरींना ही बाब चिंतेची वाटते!! त्यांच्या यासंबंधीच्या प्रतिक्रिया ख्रिस्ती नियतकालिकांमधून उठत असतात!!! धर्मांतरित ख्रिस्त्यांमध्येही दुर्बल घटक आहेत. वरील सर्व परिणाम, सवलतींचा आर्थिक फायदा मिळवावा यासाठी दिसतो. कारण ह्या ख्रिस्त्यांना प्रत्यक्ष बुद्ध व्हावयाचे नसते! अर्थात येथे फक्त भीमयानावर विवेक करावयाचा आहे.

डॉ. आंबेडकर बुद्धधर्माचेही नवे घटनाकार व शिल्पकार आहेत. दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ च्या विजया दशमीनंतर ह्या नव बुद्धधर्मास २२ वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी प्रतिज्ञेत जोतिबांचे कित्येक उद्देश डॉक्टरसाहेबांनी पुन्हा मांडले म्हणूनही ही गुरुशिष्य जोडी ठरली, जोतिबात बुद्धधर्मप्रशस्ती आहे. आद्य शंकराचार्य यांच्यावर व वेदावर घणाघात आहेत. जोतिबा वैदिकेतर व प्राकृत ठरतात. फुले-शिंदे यांनी प्रत्यक्ष बुद्धधर्माची वाट धरली नव्हती. आंबेडकरांचे धर्मांतर ही पुढील पायरी ठरते. मोठ्यातला मोठा धक्का (Shock Treatment) ठरतो. हे हिंदूधर्माला नवे आव्हान झाले. फुले प्रत्यक्ष रूढ हिंदूधर्मात मेले नाहीत. सत्यशोधक होऊन मेले. त्यांनी धर्माचे सार्वजनिक व मानवतावादी स्वरूप प्रकट केले. आंबेडकरांनी त्यापुढचे पाऊल टाकले व जे टाकावयास पाहिजे होते तेच नेमके टाकले. येथेच अपूर्वाई आहे. ह्याने विलक्षण जागृती झाली. नवे पर्व चालू झाले. 'अस्पृश्योद्धार का स्वोद्धार?' ह्या प्रश्नाला नेमके उत्तर मिळाले. पूर्वसुधारकांचे प्रयत्न पायाभूत झाले. त्यावर मंदिर डॉ. आंबेडकरांनी उभारले व कळस केला. आज दलितात जो जिवंतपणा दिसतो; सुशिक्षित, उत्साही तरुण दिसतात; त्याचे श्रेय बाबासाहेबाना आहे. धर्मांतरामुळे खेड्यापाड्यांत दुरावा; वाढला; पण दुसरी गतीच नव्हती व नाही देखील. एवढाच शेवटचा मार्ग होता. शेतकरी व बहुसंख्य ब्राह्मणेतरांना-बहुजनसमाजाला-ह्या धर्मांतराचा उद्देश अद्याप कळला नाही. गौतमाबद्दल त्यांचा अभ्यास व ओळखसुद्धा नाही. काही चांगले व इष्ट घडवून आणण्यासाठी किंमत द्यावी लागते. 'धर्मांतर' यशस्वी होण्यास किंमत द्यावी लागली व लागणार. कारण सवलतींचा प्रश्न उभा राहील. डॉ. आंबेडकरांना सामाजिक व धार्मिक प्रश्न जास्तीत जास्त महत्त्वाचा वाटत होता. त्यांनी तो सोडविला.

डॉ. आंबेडकर यांच्या धर्मपरिवर्तनाचे किंबहुना धर्मक्रांतीचे स्वरूप समजण्यासाठी या लेखात मागे दिलेल्या बावीस मुद्यांचा-अटींचा-आदर्श डोळ्यापुढे ठेवावा लागतो. त्याकडे दृष्टी वळविणे हा येथे उद्देश होता. जोतिबांच्या अनुयायांनी व त्यांना मानणाऱ्यांनी हे बावीस मुद्दे लक्षात घ्यावेत. त्यांना त्यात खरा सत्यशोधक धर्म दिसेल. जोतिबा व आंबेडकर ही जोडगोळी आहे. 'बुद्धधर्म प्रवेश' म्हणजे नेमके काय करावयाचे, कसे वागावयाचे हे बावीस नियमांवरून समजते. हा 'जाहीरनामा' आहे. हा जबाबदारी दाखवितो, दीक्षा देतो. तरी येथील आपला सर्व समाज परंपरावादी स्वभावाचा आहे. 'पहिले पाढे पंधरा' अशी गत होते.

बुद्धधर्माची नवी वाट कोणती व त्या वाटेला 'भीमयान' का म्हणावेसे वाटले? ते स्वतंत्रपणे भीमयान आहे. महायान व हीनयान ह्या पूर्वभेदाचा येथे प्रश्न नाही. बुद्धाचा धर्म पुन्हा चालू परिस्थितीत मुख्यतः दलितांसाठी मांडला आहे. सुशिक्षित पदवीधरांची संख्या त्यांच्यात वाढत आहे. त्यांच्यातील चैतन्य दिसते. पण

अनुक्रमणिका

बाबासाहेबांच्या 'भीमयान' मार्गाने जावयाचे म्हणजे काय करावयाचे? ह्याची स्पष्ट समजूत होणे पुनःपुन्हा अगत्याचे आहे. 'भीमयान' जागते ठेवावे लागेल. यासाठी त्याचा त्रिकालात्मक विचार करणे भाग होते. हिंदु धर्मात इतर अनेक पंथ निघाले, पण बुद्धधर्म हा क्रांतिकारक आहे. बुद्धाने ग्रंथप्रामाण्यापेक्षा बुद्धिप्रामाण्यावर भर दिला. गौतमाच्या धर्मचक्रपरिवर्तनामुळे भारतात उलटसुलट प्रतिक्रिया घडल्या. बौद्धांचा कमी छळ झाला नाही. तर बुद्धधर्म अनेक आशियाई देशात पसरविण्यात बुद्धप्रचारकांना मोठे यश आले. पश्चिमी जगातदेखील बुद्धाचे अवशेष मिळतात. ख्रिस्ती, मुसलमान वगैरे धर्मांवर बुद्धधर्माचा परिणाम दिसून येतो. चीन, जपान, लंका, ब्रह्मदेश वगैरे ठिकाणी तेथील स्थानिक पूर्वधर्म बुद्धधर्माच्या मानाने थिटे होते. म्हणूनही एक उत्कृष्ट हाच धर्म म्हणून निरनिराळ्या अनेक राष्ट्रांनी घेतला. भारताने त्याला तत्त्वतः संपूर्ण टाकले नाही. डॉ. आंबेडकरांच्या द्वारे पुन्हा स्वीकारले. डॉ. आंबेडकर व सदगुरू गाडगेमहाराज यांची गाठ पडली होती. ख्रिस्ती-मुसलमान वगैरे परकीय धर्म न स्वीकारता येथील कोणताही धर्म स्वीकारा, असे त्यांनी स्वच्छ सांगितले. गाडगेबाबा यांचा सल्ला बाबासाहेबांनी मानला. बुद्धधर्माची मातृभूमी, पुण्यभूमी व पवित्रभूमी. हिंदुस्थानच होय. ह्या व्याख्येप्रमाणे बुद्धधर्म हिंदू धर्माची भारतीय शाखा ठरते. हिंदू ठरते. तरी हिंदू धर्माची एक शाखा म्हणून डॉ. आंबेडकर यांनी ती मुळीच स्वीकारली नाही, हे त्यांनी तयार केलेली बावीस कलमी प्रतिज्ञा दाखविते. दुसऱ्या बाजूचे मत बॅ. सावरकर यांचे होते. १९३५-३६ सालात पुण्यास सदाशिव पेठेत महाराष्ट्र मंडळात बॅ. सावरकर यांचे एक व्याख्यान ऐकण्याचा योग आला. तेथे विद्वान व अभ्यासू मंडळी उपस्थित होती. सावरकरांनी विदेशी विद्वानांच्या अनेक ग्रंथांतील बुद्धाची पडती बाजू दर्शविणारे उतारे व्याख्यानातून सादर केले. अध्यक्षस्थानी प्रिं. आर. डी. करमरकर होते. त्यांनी सावरकरांना हे उतारे एकत्र छापून काढावेत, अशी विनंती शेवटी केली. परंतु जैन-बुद्धांना सावरकर हिंदूच मानीत होते. सावरकर यांचा अस्पृश्योद्धार हिंदूधर्महितासाठी व धर्मांतरे रोखण्यासाठी होता, महर्षी शिंदे यांनी रत्नागिरीच्या अस्पृश्योद्धारक कार्याची केलेली स्तुती प्रसिद्ध आहे. पण बॅ. सावरकर व बॅ. आंबेडकर हिंदूसभेच्या विरुद्धच असत.

सांगण्याचे तात्पर्य हे की, बुद्धधर्माचे खंडन व मंडनदेखील सापडते. परंतु डॉ. आंबेडकरांनी सर्व आक्षेपांना उत्तर देऊन विरोधकांवर मात केलेली आढळते; व त्यांनी त्यांची जिद्द सोडली नाही. मरणापूर्वी त्यांनी ह्या धर्मावर लेखन पुरे केले; व भीमयानाला नवा पाया तयार केला. समग्र फुले वाङ्मय प्रसिद्ध झाल्याने फुले-अभ्यासकांची सोय नव्याने झाली. डॉ. आंबेडकर समग्र वाङ्मय उपलब्ध झाल्यावर भीमयानाचा अधिकाधिक अभ्यास करता येईल. परंतु फुले-आंबेडकरांना लोकांनी देव केले; व कित्येक पूजा करतात! चिकित्सा ही पूजेपेक्षा फलदायी होते; म्हणून हा विचारप्रपंच केला. यापुढेही समीक्षा, मीमांसा वारंवार झाली पाहिजे, म्हणून विस्तार आणखी करणे येथे भाग पडते. फुले व आंबेडकर हे दोघेही ब्राह्मणेतरवादी होते, तरी शेवटी बाबासाहेबानी राजकीय ब्राह्मणेतर पक्षातील अनेक त्रुटी व अपुरेपण सांगितले आहे. दोघेही नेमस्त व इंग्रज सरकारशी एकनिष्ठपणे वागले. सामाजिक स्वातंत्र्याचे मूल्य व महत्त्व फुल्यांनी मूलभूत व अग्रेसर मानले. याच कारणामुळे म. फुले यांना मुख्यतः गुरू मानले. ह्यामुळेदेखील खुद्द बहुजनसमाजापेक्षा म. फुले हे सर्व दलितांना जवळचे कलिजे झाले आहेत. आपल्यानंतर एक महाशूद्र येईल व तो ब्राह्मणी धर्मग्रंथांच्या चिंध्याचिंध्या करील व आपल्या समाधीवर फुले उधळील, अशी भविष्यवाणी द्रष्टे फुले यांनी वर्तविलेली त्यांच्या 'गुलामगिरी' व शेवटच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातून सापडू शकते. व आंबेडकर यांच्याद्वारे ती खरीदेखील झाली. पण भीमयानाच्या वर्धमानत्वासाठी आंबेडकर यांच्यानंतर दुसरे आणखी 'बुद्ध' यावेत, म्हणजे 'भीमयान' बळकट होईल. फुले-आंबेडकरांच्या नंतर एका चढीत एक त्यागी पुरुषांची मालिका लागल्याशिवाय

अनुक्रमणिका

दलितप्रश्न इतिहासात पूर्णपणे सामील होणार नाही. पण लोकशाहीत अवतारांची वाट न पाहता भीमयानाचे संवर्धन व विकास व्हावा, हे अधिक ठीक. 'बुद्ध महासभा' कार्य करीत आहेच. बहुजनसमाजाने विशेषतः बुद्धधर्म पूर्णपणे आपला व स्वकीय मानल्याशिवाय भागणार नाही. म. फुले-आंबेडकर यांची इच्छा अपुरीच राहील. बहुजनसमाजावरच हा प्रश्न अवलंबून आहे. कोणत्याही प्रांतातील बहुसंख्यांक समाजाचा दृष्टिकोण नवा झाला पाहिजे.

**सारासार विचार**

भीमयानाचा प्रभाव महाराष्ट्र-नागपूर व मराठवाडा यांमध्येच फक्त राहिला तरी भीमरावांचा भीमयानाचे चौफेर दर्शन घेता येते व घेतले पाहिजे. त्याचे आधुनिक समाजप्रबोधनातील स्थानही जाणावे लागते.

पाश्चात्त्य धर्म व इंग्रजी राज्य-किंबहुना, जित व जेते-यांच्या संयोगातून व वैचारिक संघर्षातून राममोहन रॉय यांच्यापासून नवजागरण किंबहुना नवयुग भारतात आविष्कारित झाले. ह्या धार्मिक-सामाजिक प्रबोधनातून सहिष्णु ब्राह्मोसमाज व जयिष्णु आर्यसमाज निघाला. म. फुले व डॉ. आंबेडकर यांना वेदप्रामाण्यवादी आर्यसमाज मुळीच आवडला नाही. शूद्र कोण होते? या पुस्तकात प्रारंभी डॉ. आंबेडकरांनी आर्यसमाजाच्या वेदाप्रामाण्यविषयक धोरणावर सडकून टीका केली आहे. म. फुले-आंबेडकर असा संयुक्त विचारप्रपंच करावा लागतो; गुरूत शिष्य व शिष्यात गुरू पाहता येतो. दोघेही बुद्धधर्माचे चहाते व ब्राह्मणी धर्माचे कट्टर शत्रू. ब्राह्मणी धर्मात दोघेही राहिले नाहीत. 'ब्रह्म' हा शब्ददेखील फुल्यांना वावडा होता. आर्य म्हणजे ब्राह्मण अशी त्यांची व्याख्या असल्याने दयानंदांच्या सत्काराच्या बाजूचे ते रानड्यांच्याप्रमाणेच होते, तरी त्यांनी लोकहितवादीप्रमाणे आर्यसमाज मानला नाही. लोकहितवादी प्रार्थनासमाजी व आर्यसमाजी एकाच वेळी असत; रानडे दोन्ही एकच समजत. फक्त नावे वेगळी. जोतिबांनी हे दोन्ही समाज पुढील डॉ. आंबेडकरांच्याप्रमाणेच अव्हेरून स्वतःचा स्वतंत्र सत्यशोधक समाज काढला व वरील सर्वच समाजावर त्यांच्यात डॉ. आंबेडकरांच्याप्रमाणे टीका आढळते. दोघेही रूढ हिंदुधर्माच्या विषम स्वरूपावर अनुभवाने विटले गेले व स्वतंत्र वेगळा मार्ग चोखाळिते झाले. 'भीमयान' मागे पडले तर दलित चळवळीतील तेज, ओज व गती नाहीशी होईल!

मागे डॉ. आंबेडकर यांचा सत्यशोधक, ब्राह्मणेतरवादी चळवळीशी संबंध आला. शाहूमहाराज लवकर अकाली वारले. त्यांच्या मते, डॉ. आंबेडकरांना ब्राह्मणेतर पक्षाचे धुरीणत्व द्यावयाचे होते; पण त्यांच्या पश्चात म. फुले यांच्याप्रमाणे शूद्रातिशूद्रांची एकसारखी उन्नती व्हावी असा सक्रीय जिव्हाळा, उत्तरोत्तर आढळणारी कृती वरील ब्राह्मणेतर चळवळीत नंतर झाली; म्हणूनही त्यांना विग्रह घ्यावा लागला. फक्त एकमेव फुल्यांना गुरू मानून ते तेथेच त्यांच्यापर्यंत थांबले. पण फक्त शाहूविषयी पुढील कृतज्ञतेने "शाहूसारखा अस्पृश्यांचा 'सखा' दुसरा झाला नाही". असे स्वच्छपणे म्हणाले; व "म. फुल्यांकडे त्यांच्या सत्यशोधक अनुयायांनी निर्लज्जपणे पाठ केली." असा मुंबईत झालेल्या सोळाव्या सत्यशोधक परिषदेस संदेश पाठविला. सत्यशोधक समाजाने डॉ. आंबेडकराना कधीच अध्यक्ष केले नाही. डॉ. आंबेडकरानी ब्राह्मणेतर पक्षाच्या काळातच स्वतंत्र पक्ष स्थापिला व पूर्ण वेगळे झाले. ब्राह्मणेतर चळवळ काँग्रेसमध्ये गेलेली त्यांना आवडली नाही. जेधे-जवळकरांची मैत्री व पक्ष

त्यांनी पुढे पूर्णपणे सोडला. सत्यशोधक समाज असतानाही नवा व स्वतंत्र भीममार्ग त्याना चोखाळावा लागला. हा विग्रह असा ‘अभ्यसनीय’ आहे.

ह्या गोष्टीस महाराष्ट्रातील जबाबदार विचारवंतांचा बहुतेक विरोधच होता. डॉ. आंबेडकरांचे सामुदायिक धर्मांतर घडल्यानंतर डॉ. भवानीशंकर व सर सी. पी. रामस्वामी यांच्यासारख्या अनेक विद्वानांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या, तरी डॉ. आंबेडकर व त्यांच्या एकनिष्ठ अनुयायांनी त्यांचा मार्ग सोडला नाही. म. गांधीदेखील त्यांना अनुकूल नव्हते. तरी त्यांच्यात बुद्धधर्मावरील विचार आढळतात. सर्वांना हे अटळ झाले. हाच बुद्धाचा एकपरी विजय. बुद्धधर्म जरी अज्ञेयवादी होता तरी विश्वधर्मी महर्षी शिंदे यांनी त्याला आत्मवादीच म्हटले आहे. त्यांच्या मते धर्मांतर न करता बुद्धाची तत्त्वे अमलात आणता येतात.

आद्य शंकराचार्यांनंतर राममोहन आणि त्यांच्यानंतर डॉ. आंबेडकर हे या देशातील महापंडित म्हणून सर्व जगात मान्यता पावले. इतर सर्वांनीच बुद्धधर्मांचा स्वीकार करावा अशी डॉ. आंबेडकर यांची इच्छा होती. ती अपुरी राहिली आहे. खेड्यापाड्यांतील शेतकरी बहुजनसमाजाला बुद्ध व त्याचा धर्म यांविषयी माहिती झाली पाहिजे. शिक्षणातून हे साधले पाहिजे. तरच नवबुद्धांचा द्वेष व छळ थांबेल. हा एक उपाय ठरतो. मराठवाड्यात नवबुद्धांविरुद्ध बंड उठले तेथे हिंदू हरिजनांवर-बौद्धेतरांवर-रोख नव्हता, हे लक्षात घेतले पाहिजे. नवबुद्धांच्या सहिष्णु वृत्तीची, सहकारी वृत्तीचीदेखील जरुरी आहे. एकसारखी हिंदू धर्मग्रंथावर टीका करणे फारसे फायद्याचे नाही व फारच थोड्यांचे बाबासाहेबांप्रमाणे प्रखर ज्ञान असते. टीका करणे हा त्यांचा अधिकार होता व बऱ्याच मोठ्या प्रमाणात तो सर्वमान्य झाला. आता काय दिसते? बौद्धवाडा हे महारवाड्यांना नवे नाव प्राप्त झाले. खेड्यापाड्यांतील सर्व हिंदूजन ह्यांना आपल्यातीलच हिंदू म्हणून मानिनासे झाले! खेड्यापाड्यांतील शेतकऱ्यांना आंबेडकरांची योग्यता व कार्य समजले पाहिजे. उदा. डॉ. आंबेडकरानी भारतात जन्म पावलेला स्वदेशी बुद्धधर्म स्वीकारला, तसेच मुसलमानांप्रमाणे स्वतंत्र मतदारसंघाची हट्टी मागणी धरून न ठेवता, ती पूर्ण मागे घेऊन म. गांधी यांचे प्राण वाचविले. त्यांची देशभक्ती व राष्ट्रप्रेमदेखील व्यक्त झाले. दलितस्थानांची मागणी अव्यवहार्य ठरणारी आहे. ती त्यांनी मागे घेतली. स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात अंतर पडेल व द्वैत वाढेल असा मार्ग कोणताही असो, तो सर्वांनीच सतत त्याज्य मानावा. येथील स्पृश्यास्पृश्यता जन्मप्राप्त जातीवरून ठरते.

‘भीमयान’ देखील इतर जातीय दलितांनी स्वीकारावे. त्यांना डॉ. आंबेडकर मान्य असतात, पण भीमयान मान्य नसते! येथेच शोकांतिका वाटते. रिपब्लिकन पक्षातही सर्व दलित जाती एकवटल्या नाहीत. सत्तेसाठी परवडेल त्या त्या पक्षात दलित मंडळी व पुढारी विभागून जातात. राजकारणाला व सत्तेला धर्मकारणापेक्षा अधिकाधिक महत्त्व चढले आहे व प्रत्यक्ष जीवन सेक्युलरच झाल्याने कोणत्याही धर्माचा प्रत्यक्ष व्यवहारात, समाजात व राजकारणात संबंध कमीकमी होत चालला आहे. धर्म हा वैयक्तिक ठरत आहे. संस्कारधर्म तर गुह्य होता. बुद्धधर्मातही संस्कारधर्म आहेतच व सारे चांगले बुद्धसंस्कारधर्म पाळणे कर्तव्याचे आहे. नवबुद्ध ही केवळ जन्मप्राप्त जात होऊ नये. सर्वधर्मीयांच्या वेगवेगळ्या जन्मजाती झाल्या आहेत व होतात. “कोणत्याही मार्गाने तुम्ही जा, जातिभेदाचा राक्षस आडवा येतो”, हे आंबेडकरांचेच बोल आहेत. भीमयानाचे भवितव्यदेखील ज्याची त्याची जातीयता रोखते. खुद्द दलित चळवळ विशेषतः फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीतूनच प्रथम चालू झाली. सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ बहुजनसमाजाचा आणि शेतकरी-ग्रामीण जनतेचा दलितविषयक जुना

परंपरांवादी दृष्टिकोण बदलू शकली नाही! ही अपात्रता डॉ. आंबेडकरांच्या ध्यानात आल्याशिवाय राहिली नाही. जेथे तेथे जातीयता नडते. सत्यशोधक चळवळदेखील मराठा-मराठेतर जातीयवादाने मागे पडली. बुद्धधर्म काय किंवा सत्यशोधक समाज काय, यांचे मूळ ध्येय जातीयता घालविणे हेच असू शकते. दलितामधील जातिभेद भीमयानाचा शत्रू ठरतो; ज्याला त्याला स्वजातीय मैत्री वगैरे स्वजातीचेच लोक सत्तेवर आणि नोकरशाहीत असावेत असे वाटते. पण स्वजातीचे प्रतिनिधी जातीयतेतून निवडून गेल्यावर स्वतःचेच हित पाहतात आणि डॉ. आंबेडकरांचा व फुल्यांचा व्यापक ध्येयवाद विसरतात. भीमयानाला अशा खूप सामाजिक व राजकीय मर्यादा पडतील. बौद्ध साहित्य हे अखिल दलितांचे साहित्य होणार नाही. एकपरी बुद्ध ही अलग संस्कृती ठरते. विज्ञानात्मक व बुद्धिवादी दृष्टिकोण निर्माण करणे हा फुले-आंबेडकर यांना मानणाऱ्याचा कार्यक्रम झाला पाहिजे.

सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ मागे झाली तशीच आज व पुढे होणार नाही! कारण इंग्रजांचे 'फोडा व झोडा' धोरण तिला प्रत्यक्षाप्रत्यक्ष खतपाणी घालीत होते! पण स्वातंत्र्यातही सत्यशोधक चळवळीवर हल्ली विचारचालन चालते. या दृष्टीने फुले-आंबेडकर यांचा संयुक्त विचार करून बहुजनसमाजाने दलितांच्या उद्धारार्थ भीमयानाला पाठिंबा दिला पाहिजे. बुद्ध सत्यशोधकच होता. हातात हात घालून भीमयानाला उत्कट भवितव्य प्राप्त होण्यास निवडणूकनिरपेक्ष प्रयत्न फुले-आंबेडकरांचे अनुयायी करतील काय? मागे डॉ. आंबेडकरांचे राजकारण स्वतंत्रपणे चालू झाले. म. गांधींची हरिजन चळवळ व हरिजन सेवक संघ व डॉ. आंबेडकर कधीच एक झाले नाहीत. हरिजन शब्ददेखील आंबेडकरांनी नाकारला! शिंदे-माटे-सावरकर-गांधी वगैरे दलितांच्या मित्रांपासून डॉ. आंबेडकर जीनाप्रमाणे वेगळे झाले. आता सर्व लोकांना हे बौद्ध झाल्याचे ठाऊक झालेले आहे. बौद्धवाड्यात गौतम, आंबेडकर, फार तर कबीर व फुले यांच्या प्रतिमा दिसतात. बौद्ध झाल्यामुळे आर्थिक स्थितीत फरक पडला नाही. आर्थिक परिस्थितीवर आधारित सवलती द्याव्यात असा विचार पुष्कळदा पुढे येतो. हा विचार ग्राह्य धरला तर सर्वच पददलितांचे पुढे येणे रोखले जाईल, ह्या अनुभवाने-भीतीने नवबुद्धांच्या सवलती पुन्हा चालू कराव्या लागतात. डॉ. आंबेडकरांनी दहाबारा वर्षांची मुदत घेतली होती; पण सवलती आणखी किती वर्षे ठेवाव्या लागतील हे सांगता येत नाही. आर्थिक कस धरल्यास संधिसाधूंचे फावेल! म्हणून हे खूप काळ अशक्य होय.

धर्मांतराचे फलित तपासले पाहिजे. हे उभय समाजाचे काम आहे. भीमयान ही केवळ प्रतिक्रिया ठरू नये! उलट भीमयानाचा विकास होण्याची जरुरी फार आहे. ब्राह्मणेतर मराठा तत्समांनी गेल्या पाऊणशे वर्षांत बरीच मजल मारली-त्याचप्रमाणे मराठ्यांची व सवर्णियांची बरोबरी पात्रतापूर्ण स्पर्धेने सिद्ध केली पाहिजे. सर्वच हरिजनांना मराठ्यांच्याप्रमाणे खेड्यापाड्यांत जमिनी असणे युक्त आहे. हा प्रश्न आता आर्थिक व राजकीय आहे. भीमयान सर्वच प्रश्न सोडवू शकत नाही. प्रश्न सेक्युलर फार आहेत. मुख्यतः ग्रामीण ठरतात. कोणतेही 'धर्मांतर' हे प्रश्न सोडवू शकणार नाही. भाकरीबरोबर धर्माचे महत्त्व सांगितले गेले व यासाठीच भीमयान सिद्ध झाले. हे टिकविणे व वर्धमान ठेवणे कालांतराने सोपे जाईल, असे नाही. जोतिबांचा तो सत्यशोधक समाज संपला! ब्राह्मो समाज स्वतःस हिंदू समजत नसे. 'ब्राह्म' म्हणून लोकगणनेत उल्लेख ते करतात, प्रार्थना समाज चालू पिढीला जवळजवळ राहिले नाहीत. मागील धर्मसुधारणांना व तत्त्वनिष्ठ नेमस्त धर्मपरिवर्तनवादालादेखील यशस्विता प्राप्त झाली नाही, पण एक गोष्ट खरी की भारतातील जनतेची सामाजिक सुधारणा होणे झाल्यास प्रथम धर्मसुधारणा लागते. राममोहन व रानडे-भांडारकर यांचे हेच मूलभूत

धोरण होते. आजच्यापेक्षा पूर्वीच्या काळी धर्म समाजाशी जास्त निगडित होता. जगावर सर्वत्र आज धर्मयुग नाही. युद्धाला अव्हेरून 'बुद्ध' (अहिंसा) स्वीकारणे जगाला जमत नाही! तरी भीमयानाचे महत्त्व प्रयत्नवादाच्या दृष्टीने बिलकुल कमी नाही. स्वधर्मबुद्धीचा हा मार्ग ठरतो. हा स्वतःची उन्नती करणारा खास प्रयत्न आहे. आंबेडकर धर्मपुरुषच ठरतात.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी 'सर्वधर्मसमभाव' जरूरच आहे. राममोहन रॉय यांनी हिंदू, मुसलमान व ख्रिस्ती या धर्मांचे मुख्यतः ऐक्य पुरस्कारिले, राष्ट्रीय दृष्टीने हे महत्त्वाचे ठरते. ह्याला भवितव्य असेलही. काही बाबी अटळ असतात. भवितव्यता फार दूर असते. डॉ. आंबेडकर यांनी बुद्धधर्माचा मार्ग पत्करला तरी भारतीय घटनेतील निधर्मी धोरणाच्या विरुद्ध ते नव्हते. सरकारने निधर्मीच राहणे भारतात तरी चांगले. बौद्धजनांनी अभ्यास करण्यासारखी डॉ. आंबेडकरांची नवी मते आहेत.

**बाबासाहेबांचे क्रांतिकारक संशोधन**

वेदसाहित्य केवळ ब्राह्मण मंडळींचे नाही. ते सर्व त्रैवर्णिकांनी व शूद्रांनीही निर्माण केलेले असे सार्वजनिक आहे. गायत्री मंत्र अब्राह्मणाने केला. वेद व उपनिषद काळातही अस्पृश्यता नव्हती. मनुस्मृतीकाळात देखील अस्पृश्य समाज म्हणून वेगळा नव्हता. मनुस्मृतीकाळात कोणत्याही जातीच्या माणसाने अपराध केला तर काही काळ समाजातून बहिष्कृत केले जात असे. याला ब्राह्मणदेखील अपवाद नव्हते. वेद व मनुस्मृती यांच्या संबंधाने त्यांचा विरोध होता, तरी त्यांनी वरीलप्रमाणे विधायक बाजूदेखील मांडली.

चंद्रगुप्ताच्या काळाच्या आसपास आजची अस्पृश्यता ही सामाजिक संस्था निर्माण झाली. यावेळी समाजाचे दोन भाग होते. एक शेती करून राहणारा प्रस्थापित समाज; कित्येक आपआपसात सतत भांडून लढणारे व टोळी टोळी करून राहणारे अस्थिर असे भटके लोक; यांपैकी लढाईत पुष्कळ लोक मरत. पुढे कोठेतरी स्थायिक व्हावे व शेतकऱ्यांच्या आश्रयार्थी होऊन राहावे, असा विचार शिल्लक राहिलेल्या टोळीवाल्यात निर्माण झाला. शेतकऱ्यांना मालमत्ता रक्ष करण्यासाठी मजूर पाहिजे होतेच. परंतु ह्या लोकांना (Broken men) ते अपरिचित व परके असल्यामुळे घरात-गावात घेणे इष्ट नाही, म्हणून गावकऱ्यांनी त्यांना वेशीबाहेर जागा दिली. ह्या लोकांचा उद्धार त्यांनीच स्वतःचा स्वतः करावा म्हणूनही भीमयान आंबेडकरांनी चालू केले. महात्मा फुले यांना मानणाऱ्यांना आंबेडकरांचा दृष्टिकोण क्रांतिकारक वाटेल.

**जोतिबा फुले व आंबेडकर यांची मतभिन्नता**

जोतिबा फुले यांची विचारसरणी प्रो. विल्सन व सर विल्यम जीन्स यांच्या ग्रंथावरून आधारित झाली.

देशाभिमानी-राष्ट्रवादी विचारवंतांचा असा आक्षेप असतो की, परकीय राजकर्त्यांनी येथील जनतेत 'फोडा व झोडा' या न्यायाचा अवलंब करून अनेकपरी ह्या देशाचा इतिहास लिहिताना, भेद पाडणाऱ्या सिद्धान्ताचा (theories) युरोपियनांनी अवलंब केला. डॉ. बाबासाहेब यांनी ह्या प्रकारच्या विघटनात्मक प्रयत्नांना चोख उत्तर दिले. आर्य बाहेरून आले. बाहेरून आलेले सर्वच उपरे आहेत, असे पाश्चात्त्य लेखक म्हणत, आर्य हे

अनुक्रमणिका

वंशवाचक नाव आहे; असे सांगणाऱ्या पाश्चात्त्य विद्वानांचे बाबासाहेबांनी खंडन केले. आर्य व दस्यू हे भिन्न वंशांचे आहेत. हा कित्येक युरोपियन ग्रंथकारांनी मांडलेला भेदक सिद्धांत डॉ. आंबेडकरांनी खंडित केला. आर्य हा शब्द गुणवाचक आहे; वंशवाचक नाही. मागे म. जोतिबा फुले यांनी आर्य (ब्राह्मण) व दस्यू (दास) असा विग्रहात्मक प्रपंच केला होता. शूद्रदेखील क्षत्रिय होते, असे डॉ. आंबेडकरानी प्रतिपादिले.

डॉ. आंबेडकर सर्व राष्ट्राचे पुढारी होते, फक्त दलितांचेच नव्हते. त्यांची ग्रंथसंपदा, विचारवैभव व कार्य मोठे आहे. हे राष्ट्राचे विचारधन आहे. विद्वत्ता व पांडित्य यांच्या जोरावर त्यांचे एक गुरू जोतिबा फुले यांचे संशोधन त्यांनी पुष्कळ प्रकारे दुरुस्तदेखील केले. राष्ट्रीय एकात्मतेचे विचारदेखील त्यांच्यात आढळतात. भीमयान व रिपब्लिकन पक्ष ह्या देणग्या सर्वांसाठी आहेत, फक्त दलितांसाठी नव्हेत, ही बाब सर्वांनी लक्षात घ्यावी. भीमयानाचा मार्ग सर्वांसाठी खुला होता व आहे. आंबेडकरांना कोणी निष्कारण मर्यादा घालू नयेत. त्यांच्यापुढे जाण्याचा त्यांच्यानंतर प्रयत्न व्हावा, हेच त्यांचे स्मारक होय. बुद्धधर्मप्रवेश हे त्यांचे अंतिम ध्येय ठरले. पण काळ पुढे जात आहे!

**देशभक्त आंबेडकर**

५ फेब्रुवारी, १९५० रोजी त्यांनी घटना समितीपुढे केलेले भाषण म्हणजे त्यांच्या चरित्रावरील कळस वाटतो. बाबासाहेब म्हणतात,

> *"अनेक शतकानंतर आता आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले आहे. आपल्यात मतभेद असतील, पण आपण सर्वांनी मिळून हे पाहावयास पाहिजे की, इतक्या वर्षांनंतर आणि इतक्या परिश्रमानंतर मिळालेले स्वातंत्र्य हातचे जाऊ नये. म्हणून कोणत्याही कारणाने आपल्यात 'जयचंद' निर्माण होणार नाहीत याची काळजी आपण घ्यावयाला पाहिजे."*

काठमांडू येथे झालेल्या त्यांच्या भाषणात त्यांनी भारतभूमीच्या सांस्कृतिक उच्चतम मूल्यांचे श्रेष्ठत्व प्रखर बुद्धीने प्रतिपादित केले आहे. डॉ. आंबेडकरांच्यामध्ये महत्त्वाकांक्षेबरोबर काळानुरूप परिवर्तनदेखील आढळते. त्यांनी स्वातंत्र्य पाहिले.

फुले काय किंवा आंबेडकर काय, दोघांच्या विचारप्रपंचातून एकात्मतेचे विचार आपणास लाभू शकतात, हा विवेक भीमयानाचा पुढील काळातील आचारप्रपंच करीत असताना लक्षात घेणे जरुरीचे नाही काय? डॉ. आंबेडकर यांच्या ह्या कार्यावर यापुढेही विचारमंथन होणे क्रमप्राप्त आहे.

अनुक्रमणिका

१७.

# बुद्ध व त्याचे बौद्धदर्शन

मनुष्येतर जीव व मनुष्य जीव ह्यात निसर्गतः अत्यंत अंतर आहे. मनुष्य इहपर विचार करू शकतो; मनुष्येतर जिवांना अर्थात तत्त्वज्ञानाची गरज पडत नाही, ह्याशिवाय मनुष्येतर जिवांचे भागू शकते. माणसाला मनुष्येतर जिवापेक्षा खूपच जास्ती बुद्धी निसर्गतः प्राप्त झाली आहे व मनुष्य त्याच्या बुद्धीचा व ज्ञानाचा सतत विकास करू शकतो. मनुष्याच्या भोवती जे विश्व आहे, सृष्टी आहे व भौतिक आणि विज्ञानात्मक जड पदार्थ आहेत त्यांचा तो शोध करू शकतो. भूत, वर्तमान व भविष्य काळाचाही तो विचार करू शकतो. युक्तिपूर्वक बुद्धी योजून, तो विविध तत्त्वज्ञानांचा विचार प्रपंच करू शकतो. असा प्रयत्न तो करीत आल्यामुळे तत्त्वज्ञानाच्या विस्तारक्षम क्षेत्रात अनेक दर्शने निर्माण होत आली आहेत. मनुष्याची बुद्धी ही भेदाभेदात्मक विवेक करू शकते, बुद्धिभेद करू शकते, परस्पर खण्डन, समर्थन, समन्वय वगैरे प्रकारे मनुष्य बुद्धी चालवू शकतो. मनुष्य म्हणजे बुद्धी. या बुद्धीने मनुष्य सारासार विचार, सद्-असद् विवेक करू शकतो. बुद्धीने चालू शकतो, वर्तू शकतो. साहाजिकच मनुष्याच्या या धर्माला (स्वभावाला) 'बुद्धधर्म' हे नाव प्राप्त होणे, अटळ होते. हा स्वाभाविक धर्म होय. नैसर्गिक धर्म होय. ह्यात फॉरेन (Foreign) काही नाही. जे आहे ते सर्व नीतिप्रधान आहे, कर्मकाण्डप्रधान नाही.

### भारतीय दर्शनांची व्यापकता

वैदिक दर्शनांना बहुतेकपणे भारतीय दर्शने समजली जातात व हिंदू धर्म प्रायः वेदावलंबी असल्याने भारतीय दर्शन म्हणजे वैदिक व हिंदू-दर्शने अशी व्याख्या दिली जाते. चार्वाक, बौद्ध व जैन ही दर्शने वेदबाह्य जरी आहेत, तरी ती अवैदिक असूनही भारतीय आहेत. वैदिक धर्माला हिंदू धर्म हे नाव बुद्धोत्तर काळानंतर किंबहुना मुस्लिमांच्या स्वाऱ्या होऊ लागल्यानंतर प्राप्त झाले. परकीय मुस्लीम लोक येथील लोकांना हिंदू संबोधू लागले. शंकराचार्य (आद्य) यांच्या काळापासून पुढे वैदिक धर्माला जे नवे स्वरूप आले, त्यालाच परधर्मी लोक हिंदू धर्म म्हणून संबोधू लागले. यापूर्वीच गौतमाला अवतार मालिकेत स्थान दिले गेले होते. ह्या सर्व दृष्टीने शंकराचार्यानंतरचा नव हिंदू धर्म बुद्धधर्माच्या मागचा म्हणजे नंतरचा ठरतो. गौतमानंतर व महावीरानंतर जे वैदिक धर्मात हिंदूधर्माचे वाङ्मय निर्माण होऊ लागले, त्यावर जैन व बुद्धांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम आढळतो. गीतेच्याही शेवटच्या दहा-अकरा अध्यायावरही परिणाम जास्ती आढळतो. नाथ संप्रदायावरही आढळतो. ह्या काळात एकमेकांची सम्यक् दर्शने एकमेक अभ्यासत असत व जरी जैन, बौद्ध व चार्वाक दर्शने वेदबाह्य होती, तरी ती वरील सर्व काळात अभारतीय समजली जात नव्हती. वेगवेगळ्या दर्शनांच्या अनुयायांत परस्परात सहिष्णुता व उदारता होती. प्रतिपादन, खण्डन व मण्डन चाले. युक्तिवाद व तर्कवाद केला जाई. यामुळे देखील वरील सर्व भारतीय दर्शने समृद्ध होऊन विकास पावली. तत्त्वज्ञानासंबंधी वरील काळात बहुमोल जागृती होती, म्हणूनच परस्परविरोधी मते पुढे आली. तत्त्वचिंतनाचा व पुष्कळ प्रकारे समृद्धीचा तो अभूतपूर्व काळ होता. षड्दर्शनांपैकी बौद्धधर्माचे दर्शन अभ्यासताना बाकीच्या पाचही दर्शनांचा अभ्यास व ज्ञान जरूर आहे. तत्त्वज्ञानदृष्ट्या अन्योन्य संबंधही आहे. परस्परांचा परस्परांवर परिणामही आहे. कर्मकाण्डावर भर दिला असतानाही; तत्त्वचिंतन चालू होते. भारतात तो काळ होता. धर्मापेक्षा तत्त्वचिंतन जास्ती होई. एकाच कुटुंबात वैदिक, जैन व बौद्ध मते पुरस्कारणारी माणसे एकत्र राहात. कारण प्रारंभी वरील सर्व दर्शनांचे अलग अलग धर्म

अनुक्रमणिका

व जन्मजाती झाल्या नव्हत्या. पुढे व हल्ली देखील वरील तिन्ही धर्मांचे वेगळे समाजधर्म व परंपरागत जाती झाल्या आहेत. प्रारंभी मात्र सहिष्णु असा एकसंघ वरील काळ होता. ब्राह्मण (वैदिक) पंडित इतर अवैदिक दर्शनांचा अभ्यास करीत. एवढेच नव्हे तर जैन व बौद्ध होऊन देखील स्वीकारित, धर्मासंबंधीही नवी ग्रंथरचना करीत, उलटपक्षी बौद्ध व जैन श्रमणपंडित ब्राह्मणी धर्माचे ग्रंथ अभ्यासून त्यावर टीकात्मक ग्रंथ लिहीत. पुढील कुमारील भट्टाच्या काळापासून जैन व बुद्धांचे असे ग्रंथ बरेच नष्ट केले गेले. उदा. स्वतः आद्य शंकराचार्यांनी मण्डणमिश्र व त्यांची पत्नी यांच्याबरोबर वाद खेळल्यानंतर जैन ग्रंथ नदीत बुडविल्याचाही उल्लेख मिळतो. म्हणजे जशी पूर्वी उदार सहिष्णु धर्मदृष्टी होती, तशी पुढे जयिष्णु दृष्टीही होती! पुढे मुस्लिम आक्रमकांनी बौद्ध व हिंदूंवरही भंजक आक्रमणे केली, तेवढी हिंसाचारी जयिष्णु वृत्ती मुसलमान येण्यापूर्वी भारतीय समाजात परस्परात नव्हती, असे तुलनेने म्हणता येते. मुस्लिम आक्रमणानंतर जमाना पालटला व कालांतर झाले. ख्रिस्ती मिशनरी व इंग्रजी राज्य आल्यानंतर पुन्हा कालांतर घडले. आधुनिककाळी स्वामी दयानंदांच्या आर्यसमाजाने हिंदू धर्माला जयिष्णु करण्याचा प्रयत्न वैदिक भूमिकेवरूनच केला. यासाठी स्वामीजींनी इतर दर्शनांचे खण्डन केले.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात पाश्चात्त्य दर्शनांची व पौर्वात्य भारतीय दर्शनांची, विशेषतः युरोपीय इंग्रजी राज्य आल्यामुळे उभयतांची गाठ पडली व तौलनिक अभ्यास होऊ लागला. 'शिंदे-आंबेडकर' यांचा हाच नवा काळ होता, म्हणून त्यांनी भारतीय व पाश्चात्त्य उभय तत्त्वज्ञानांचाही अभ्यास केला. दोघांच्या परिश्रमाने बुद्ध धर्माकडे भारतीयांचे व महाराष्ट्रीयांचे लक्ष पुनः वेधले गेले आहे. दलित वाङ्मयसेवकांनी 'शिंदे-आंबेडकर' यांच्याप्रमाणे सर्व धर्माच्या तौलनिक अभ्यासाची व संशोधनाची वरील परंपरा स्वीकृत करून, निदान भर घालण्याचा यथाशक्ती तरी प्रयत्न करावा. कोणत्याही वाङ्मयाला तात्त्विक व तत्त्वचिंतनाचा पाया मिळाल्याशिवाय कोणतेच वाङ्मय स्थैर्य पाहून विकसित होऊ शकत नाही. असे जर न होईल तर दलित साहित्य सीमित राहील; बौद्ध धर्मांची जोड करून देण्यात त्याचा दीर्घ हेतू होता. तो ओळखला जावा.

भारतीय दर्शनात ईश्वरवादी दर्शने व ईश्वर नाकारणारी दर्शने असे दोन भाग पडतात. चार्वाक, जैन व बौद्ध वेद मानीत नसत, म्हणून त्यांना 'नास्तिक' समजले गेले. सांख्य दर्शन हे वेदपूर्व होते. सांख्य दर्शन निरीश्वरवादी असूनही पुढे वेद मान्य केल्यामुळे त्यांची नास्तिकात गणना होत नसे! उदा. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात सांख्यमत पायाभूत मांडिले आहे. तरी गीता वेदबाह्य समजत नाहीत. वेदविरोधी जी दर्शने होती, ती 'नास्तिक' गणली गेली. अलिकडे नास्तिक म्हणजे निरीश्वर आणि आस्तिक म्हणजे 'ईश्वरवादी' असा वेगळाच अर्थ रूढ झालेला आहे; तो पूर्वी तसा नव्हता.

भारतीय दर्शनांचे व तत्त्वज्ञानात्मक संज्ञांचे एकापेक्षा जास्ती अनेक अर्थ होऊ शकतात. कारण परंपरा कैक हजारो वर्षांची आहे व सतत समीक्षा व मीमांसा चालू राहिली. उदा. परलोक (स्वर्ग) नाकारणाऱ्यांनाही नास्तिक समजत व स्वर्ग मानणाऱ्यांना 'आस्तिक' समजत. ह्या अर्थानुसार बौद्ध व जैन दर्शने आस्तिक दर्शने मानावी लागतात, नव्हे मानली गेली. येथील जीवन क्षणिक, अनित्य व अशाश्वत आहे असे सर्वच दर्शने सांगतात. परंतु क्षणभंगुरत्व विसरूनच सर्वसामान्य बहुतेक जैन पंडितांचे असे मत आहे की, जैनधर्म हा वेदपूर्व आहे. जैन व बौद्ध मतांना वेदपूर्व सांख्य तत्त्वज्ञान पायाभूत होते. सांख्य म्हणजे गणक-गणिती तत्त्वज्ञान होय. हे प्रथम जास्तीत जास्त जडवादी, वास्तववादी होते. चार्वाकाचे स्थान मग आगळेवेगळे व पुष्कळपणे स्वतंत्र

होते. चार्वाक संपूर्ण पाखंडी मानला गेला व त्याच्या मतांचा विपर्यास केला गेला. पण त्याच्या दर्शनावरील आक्षेपांचे ढग दूर करण्याचा नवा प्रयत्न हल्ली होत असतो. चार्वाक वेद व स्वर्ग मानीत नाही म्हणून तो सर्वप्रकारे नास्तिक मानिला गेला. जाता-जाता चार्वाक व जोतीराव फुले यांच्यातील साम्य सांगावेसे वाटते. जोतीराव वेद व स्वर्ग दोन्हीही मानत नव्हते. पण 'निर्मीक' मानीत होते. मात्र फुले व बुद्ध ह्या दोघांनाही आर्यांचे वेद व स्वर्ग अमान्य होते. वेद नाकारण्याची पद्धत वेदाएवढीच जुनी ठरते!

वेदपूर्व व संस्कृतपूर्व आर्येतर व द्रविड यांच्या संस्कृत्या व प्राकृत भाषा होत्या. कारण आर्य उत्तरेकडून येण्यापूर्वी भारतात रहिवाशी नव्हते असे नव्हे व असे कोणी समजत नाही. वेद हे अतिप्राचीन लिखित वाङ्मय असल्यामुळे व त्यापूर्वीचे आर्येतरांचे लिखित वाङ्मय उपलब्ध नसल्यामुळे वेदांना आदिग्रंथाचे स्वरूप आले व त्यांचा महिमा वाढविण्यास फार मोठे साधन झाले. खुद्द वेदापूर्वीच्या संस्कृतिविषयी व कित्येक धर्मांचाराविषयी वेदात उल्लेख मिळतील. चारी वेद ईश्वरकृत म्हणून सर्वथैव प्रमाण व निर्वाचित मानण्याचा घट्ट व मट्ठ प्रघात वेदाभिमान्यांनी रूढ केला. ह्या अंधश्रद्धेला बुद्धाने मोठा धक्का दिला व बुद्धिवादाची व धर्मचिकित्सेची वाट मोकळी केली. आजही वेदातील सर्वच्या सर्व ग्राह्य कोणीही मानत नाही. आर्यसमाज फक्त ऋग्वेद मानितो पण त्यातील जातीभेद व जन्मजातवर्णभेद मानीत नाही. सत्य तेवढे घ्याव व असत्य सोडावे हा पवित्रा दयानंद स्वामींनाही घ्यावा लागला. त्यांनी ब्राह्मणे व पुराणे अप्रमाण ठरविली.

'वेद व वैदिक वाङ्मयाला देखील बौद्ध धर्माच्या उद्‌गमाच्या दृष्टीने एकपरी महत्त्व आहे. यज्ञयागादि सकाम कर्मकांडाला वेदांनी जन्म दिला व धर्मांच्या क्षेत्रात पुरोहितांचे वर्चस्व वाढून त्यांनी त्यांच्याकडे धर्मसत्ता घेऊन, स्ववर्णाचे महत्त्व मनस्वी वाढविले. यज्ञात मोठी पशूहिंसा होऊ लागली. यज्ञ वैदिक देव-देवतांना संतुष्ट करण्यासाठी व स्वर्गातील सुख लाभासाठीही केले जात. बुद्धाने मुळावरच घाव घालून स्वर्ग, ईश्वर व ब्रह्म वगैरे वैदिकांच्या कल्पनांवर प्रहार केले व वेदांचे ईश्वरप्रणित प्रामाण्यच झुगारले. ही धर्मक्रांती होती. तत्त्वज्ञानात क्रांती होती. बुद्धाने तत्त्वज्ञानच पालटले.

बुद्धपूर्वकाळापासून भारतीय दर्शनात वेदविरोधी दर्शने व वेदानुकूल दर्शने असे दोन भेद होते. वेदानुकूल दर्शनातही कर्मकाण्ड व अधीष्ठित मीमांसा व ज्ञानकाण्डावर आधारित वेदान्त (उपनिषदे) असे दोन भाग होते. उपनिषदांमध्ये यज्ञयागी कर्मकाण्डावर प्रखर टीका होती, किंबहुना 'वेदान्त' हा कर्मकाण्डविरोधी विचार व्यक्त करणारा होता. पण प्रत्यक्ष बंड करण्याचे श्रेय बुद्ध व त्याच्या धर्माकडे जाते. बुद्धाच्या दर्शनाने कर्मकाण्डी सकाम दर्शने मागे टाकली. पण एवढे म्हणावेसे वाटते की, वेद होते म्हणून वेदान्त (उपनिषदे) होऊ शकली. उपनिषदांनी धर्मसुधारणा विचारात व्यक्त केली होती, ती एकापरी बुद्धांनी धर्मसुधारणेची भारतव्यापी चळवळ उभी करून यज्ञयागांची हिंसाप्रधान प्रथा मागे टाकली. यामुळेही पुरोहितवर्गाचे महत्त्व बरेच कमी झाले. असे करण्यामुळे विरोध वाढला.

**धर्मशुद्धीची पद्धत**

बुद्धाचा मार्ग हा लोकायत मार्ग होता; व वैदिक मार्ग हा परलोकवादी-स्वर्गवादी होता. हल्ली स्वर्गवादी विचारसरणीची पुनः पिछेहाट होत आहे. बुद्धाच्या काळात पुष्कळ म्हणजे तो असतानाच त्याला भारतात अनेक

अनुक्रमणिका

अनुयायी मिळाले व त्यांच्या उपदेशाला पुढे स्वतंत्र दर्शनाचे स्थान भारतीय सहा दर्शनांत देण्यात आले. त्याच्या निधनानंतर वैदिक धर्मियांनी देखील त्याला दशावतारात स्थान दिले. बुद्ध गया हे हिंदुंचेही पवित्र तीर्थक्षेत्र आहे. सर्व जीवमात्राविषयी करुणा व दया हे बुद्धतत्त्व ध्रुव आहे. त्याच्या हयातीत व नंतरही वेदनुयायी लोकांनी वैदिक धर्म सोडून बुद्धांचा उपदेश प्रमाण मानला. आप्तवचन प्रमाण मानण्याची म्हणजे बाबा वाक्यं प्रमाणम्। अशी जी भारतात वैदिक मनोवृत्ती वाढली होती, ती बुद्धाने नाहीशी केली. बुद्धीला प्रमाण मानण्याचा नवा प्रघात बुद्धाने घातला म्हणून जरी बुद्धाला अनेकविध नावे आहेत, तरी 'बुद्ध' हेच नाव (गौतमाला) प्रमुख समजले गेले व 'बुद्धि-प्रमाण मानणारा जो धर्म तो बुद्धधर्म' असे ज्ञान स्पष्ट झाले. खुद्द प्रथम बुद्धाचा उद्देश व उपदेश जास्तीपणे अभ्यासणे हा बुद्धधर्माच्या ज्ञानाचा पाया होऊ शकतो. हिंसामार्गी यज्ञयागी सकाम कर्मकांड मागे हटविण्याच्या चळवळीत जैन तीर्थंकर व शेवटचे चोविसावे तीर्थंकर महावीर यांचाही वाटा आहेच. बुद्धापूर्वी तेवीस बुद्ध झाले, असे सांगण्यात येते. पहिला तीर्थंकर व पहिला बुद्ध यांचा काळ ऋग्वेदापूर्वीचाही असू शकेल. पण वेदाभिमानी येथील परंपरा ऋग्वेदाचा धर्म हा सर्वांत जुना असे मानण्याचा आग्रह धरितात व ऋग्वेदाचा काळ जास्तीत जास्त मागे खेचण्याचा प्रयत्न होत आला आहे व होत असतो. पण एवढे खरे की, ज्ञानप्रधान उपनिषदांनी बुद्धासाठी जमीन नांगरली होती. बुद्धाला मागील सर्व ज्ञान व पूर्वग्रंथ यांचे ज्ञान असणारच; त्याने करून घेतले असले पाहिजे. कारण त्याच्या पूर्वीच्या सर्व वाटा त्याने चोखाळिल्या होत्याच. तो सत्यशोधक होता. त्याने वेदबाह्य होऊन वेदांचे सर्व ईश्वरी प्रामाण्य झुगारले, म्हणजे स्वार्थी विकृती झुगारली. उपनिषदातील सर्वच ज्ञान व नैतिक धर्म त्याने अप्रमाण मानिला नाही. सत्य तेवढे घ्यावे व असत्य तेवढे टाकावे हेच लोकोपयोगी ध्येयधोरण बुद्धाचे होते व त्यानेही स्वतःला ईश्वरी अवतार किंवा सर्वप्रमाण बिनचूक व निर्बाधित माना, असा मिथ्याग्रह धरला नाही. येथेच बुद्धाच्या बुद्धिवादाची मेख आहे.

खरे सत्यशोधक जे असतात ते स्वतःचे 'सर्वप्रामाण्य' निर्मित नाहीत, मनुष्याच्या ज्ञानाच्या बुद्धीच्या मर्यादांची त्यांना जाणीव असते. उदा. बुद्धाएवढी जोतीरावांची जगभर अर्थात ख्याती नाही. तरी पण त्यांचा मार्ग सत्यसंशोधनाचा होता. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते लिहितात :- 'स्त्री-पुरुष, विद्वान व सुज्ञ वाचणारांच्या ध्यानात व्यंगे दिसून येतील त्याविषयी त्यांनी क्षमा करून गुणलेशाचा स्वीकार करावा,' फुले जॅरी स. शो. समाजाचे अग्रेसर संस्थापक होते, तरी त्यांनी व्यक्तिप्रामाण्य, विभूतिप्रामाण्य व त्यांच्याच ग्रंथांचे सर्व प्रामाण्य व स्वतःचे गुरुत्व बुद्धाप्रमाणेच लोकावर लादले नाही. त्याअर्थी तत्त्वतः फुले हे बौद्ध.

बुद्धिवादी विचार हा लोकशाही विचार असतो. बुद्धाने (व फुल्यांनीही) लोकशाहीला मर्यादा घातल्या नाहीत. उलट ज्या गोष्टी त्यांनी नाकारल्या त्या लोकशाही जिवंत राहावी म्हणूनच होत्या. नाकारण्याच्या ज्या बाबी होत्या किंवा त्यांनी ठरविल्या त्याच्यातील उद्देश-रचनात्मकच होता. पुरोहितशाहीची पिळवणूक नाहिशी करावयाची झाल्यास बुद्ध व फुले जोडविचार जरूर आहे.

धर्मसुधारणेचा व धर्म शुद्ध करण्याचा पायंडा बुद्धाने घातला. सुधारणेची एक व्याख्या पुढीलप्रमाणे दिली जाते — Go back to the original. डॉ. आंबेडकर यांनी पुढील विकृती विचारात न घेता मूळ व खुद्द बुद्धाला शरण गेले, म्हणजे त्याच्या धर्माला शरण गेले. महात्मा फुल्यांना एक गुरू केल्यामुळेही त्यांचे महत्त्व व अभ्यास भूमितीश्रेणीने वाढत आहे. डॉ. आंबेडकरांच्यामुळे दलित साहित्याचेही विशेष लक्ष म. फुले यांच्याकडे वेधले आहे. त्याचबरोबर बौद्ध स्वीकार केला नसता, तर दलित साहित्य हे फक्त वेदना, व्यथा मांडणारे विग्रही व

अनुक्रमणिका

विद्रोही साहित्य राहिले असते. बुद्धात विग्रह-विद्रोह आहे, त्याचबरोबर स्वीकारार्ह 'नीतिशास्त्र' व अनेक रचनात्मक व विधायक बाबी आहेत. तत्त्वज्ञान आहे, इतिहास आहे. बुद्ध शासनही आहे. पुढील बुद्ध (जागतिक) परिषदाही आहेत. एक विश्वव्यापी विचार व चळवळ आहे. महात्मा फुल्यात विग्रह-विद्रोह आहे. तरी सार्वजनिक विश्वमानवी दृष्टी आहे, दलितांच्यासंबंधी सक्रीय जिव्हाळा आहे. याच न्यायाने व वरील कारणामुळे म. फुले यांना त्यांनी एक गुरू (मार्गदर्शक) समजले, म्हणजे त्यांच्या पश्चात् झालेल्या सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील मनुष्यसुलभ, काळसुलभ विकृत्या लक्षात न घेता, खुद्द फुले यांचे कार्य व संदेश याकडे लक्ष दिले व विकृत्या सुधाराव्यात, म्हणून त्यांनी वरील चळवळीतील त्यांच्या मित्रांना वेळोवेळी चिकित्सा करून जागे केले. दुर्दैव हे की, त्यांना जाग आली नाही! त्यांनीच सर्व संपविले!

महर्षी शिंदे सुद्धा म्हणत असत की, त्यांना पुढील कित्येक तथाकथित सत्यशोधकांपेक्षा, खुद्द व मूळ म. फुले पसंत पडतात, म्हणून ते त्यांना डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शकाप्रमाणे मानीत असत. हे मी स्वतः ऐकिले आहे व त्यांच्या सहवासातून अनुभविले आहे. थोर महात्म्यांचा अधिकार हा अधिकारी पुरुष मानतातच. सर्वसामान्य माणसे व असामान्य माणसे ह्यात जगात तफावत आहेच.

आरसा दर्शन देतो, म्हणजे आरशात दर्शन घेता येते. पण आरसा वारंवार स्वच्छ करावा लागतो. डॉ. आंबेडकरांनी पुनः बुद्ध धर्म स्वीकारल्यामुळे बुद्ध दर्शनासंबंधी नवी जागृती झाली व बुद्ध व त्याचा धर्म याचा आधुनिक काळी फेरविचार व आचार चालू झाला; व विचारांची आलोचना-प्रत्यालोचना व आदान-प्रदान वगैरे वैचारिक कार्ये पुन्हा चालू झाली. प्रस्तुत लेखकाला हा विषय हाती घेण्याची प्रेरणा 'शिंदे-आंबेडकर' यांच्यापासून प्राप्त झाली. पण मूळ ग्रंथाचे अध्ययन थिटे पडते. काही वाचन व चिंतनातून मार्ग काढावा लागतो. सारासार विचाराचा पुढील परिपाक आहे, एक चर्चा आहे.

### बुद्ध दर्शनाची विशेषता

बुद्धाचे 'दर्शन' म्हणजे केवळ पुस्तकी-ग्रांथिक आधारच नव्हे; बुद्धाला ज्ञानाचा बोधी वृक्षाखाली 'अंतर्यामी' साक्षात्कार झाला. बुद्ध म्हणजे ज्ञानी. वेदानुयायांची परंपरा वचनाधारे व वेदग्रंथाधारे चाले. आजही हिंदू लोकांमध्ये अशा प्रकारचे पारंपरिक विचारवंत व वेदांचा केवळ अहंकार बाळगणारे पुष्कळ होते व आहेत. पण बुद्धाचे तेज, त्याची प्रश्नोत्तर पद्धती व युक्तिवादाने (बुद्धिवादाने) लोकांचे समाधान करण्याचे सामर्थ्य, यामुळे लोक त्यांचे अनुयायी झाले व होतात. तो जितेंद्रिय होता, साधु-विरागी होता, त्याचा त्याग शाब्दिक नव्हता. शुद्ध चित्त, महापुरुषत्व इत्यादि त्याच्या महानतेमुळे प्रत्यक्ष देखील बुद्ध धर्माचे 'बी' रुजले गेले. त्याच्यानंतर त्याच्याएवढा 'महाबुद्ध' अद्याप झाला नाही. त्याची प्रशस्ती, त्याचा गौरव, त्याचा अभ्यास व चिंतन करण्यात पाश्चिमात्य पंडितही धन्यता मानतात, मग आपण भारतीयांनी कृपणपणा का करावा? बुद्धाने भारतभूमी सर्व जगभर गौरवान्वित केली. त्याने स्वतः पुरुषार्थ करून दाखविला व ऐहिक-सामाजिक परंतु वैश्विक धर्माची वाट दाखविली. 'बुद्ध-दर्शन' म्हणजे येथे एखाद्या ठराविक ग्रंथाचे दर्शन नव्हे. ग्रंथ पुढे संस्थापकानंतर तयार होतात.

अनुक्रमणिका

वैदिक व वेदान्ती उपनिषद वाङ्मय रचणारे मंत्रद्रष्टे ऋषी अनेक झाले. म्हणून वैदिक धर्म (व पुढील हिंदू धर्म देखील) एक खांबी नाही, हे खरे. पण जागतिक धर्मेतिहास पहाता बुद्ध, ख्रिस्त व महंमद यांची चरित्रे होऊन गेली, म्हणजे महान व्यक्ती होऊन गेल्या, त्यांच्या पश्चात त्यांच्या उपदेशांचे संग्रह ग्रंथस्वरूपात उपलब्ध झाले. पण अनुयायांचे लक्ष मूळ संस्थापकाकडेच खिळून राहिले व धर्मग्रंथांपेक्षा संस्थापक प्रेरक महापुरुषांना सर्वसामान्य लोक पूजनीय व वंदनीय मानू लागले व मानतात, असे निरक्षरतेच्या पूर्वीच्या काळात असे जास्तीपणे होणे, अटळ झाले.

वास्तविक मूर्तिपूजेची बीजे वेदात, यज्ञात व वेदपूर्वकाळातही आढळतात. मूर्तिपूजा विकास पावली. न लोकः पारमार्थिकः॥ अशी लोकांची व्याख्या केली आहे. पारमार्थिक म्हणजे येथे तात्त्विक होय. बुद्ध हा तत्त्वचिंतकात गणला जातो. परंतु सर्वसामान्यांना 'ज्ञान' (कोणत्याही धर्मात) झेपत नाही. म्हणूनच कर्मकांड व भक्तिकांड प्रत्येक धर्मानुयायात जरुरीचे राहते व आचारः प्रथमो धर्मः। हा अनुभव तयार होतो. महायान पंथामुळे मूळ बुद्ध धर्मात खूप फरकही पडला व भरही पडली. मुख्यतः निरीश्वरवादी बुद्ध हा त्याच्या पश्चात पुजेचे प्रतीक झाले. महावीराचेही असेच झाले. हिंदु धर्मात ही उणीव भासू लागल्यावर राम व कृष्ण यांच्या चरित्रांचे दैवीकरण करण्यात आले; व हिंदू धर्मातही अग्निपूजा व वेदग्रंथपूजेपेक्षा राम-कृष्ण-हरी वगैरे देवतांची पुढे फक्त पुजाच सर्वसामान्यांच्या आटोक्यात राहिली आहे व त्याचे भजन-पूजन व पुढे नामस्मरण होत असते. तत्त्वज्ञानापेक्षा-ज्ञानापेक्षा-पार्थिव पूजा सर्वसामान्य लोकांना कोठेही आवडते, पाहिजे असते. जैन धर्मात पार्श्वनाथ व महावीर यांची पूजा उत्कटतेने केली जाते. बुद्धालाही ज्या नको होत्या त्याच बाबी त्याच्या धर्मात शिरल्या! मूळ धर्म व धर्माचार (प्रत्यक्ष अनुयायांचा) यामध्ये सर्व धर्मांत व सर्व संप्रदायांत तफावत पडली व पडते, असे जागतिक धर्मेतिहास साक्ष देतो. म्हणून बुद्ध व त्याचे तत्त्वज्ञान एवढ्यावर जास्तीतजास्त जोर द्यावा लागतो. पुढील बौद्ध दर्शनही अनेक आहेत. सर्वांचाच प्रस्तुत लेखकाने अभ्यास केलेला आहे, असे मुळीच नाही. पण बुद्ध व त्याचा परिणाम धर्मेतिहासाच्या वाटचालीवरूनही सांगता येतो. उदा. बुध्दाने वेद व इतर ब्राह्मणी धर्मांच्या ग्रंथांचे ईश्वरप्रणितत्त्व व अबाधित्व झिडकारले, म्हणून लोक-जनता त्याला बुद्ध म्हणून संबोधू लागली व त्याच्या उपदेशाला व बुद्धिवादाला आणि जास्तीपणे त्याच्यानंतरच्या मार्गाला बौद्ध धर्म म्हणून संज्ञा प्राप्त झाली. त्याच्या हयातीत बुद्धीने-युक्तिपूर्वक त्याने उत्तरे दिली म्हणून त्याला सिद्धार्थही हेही दुसरे नाव पडले.

**बुद्धाचा परिणाम**

बुद्धाची जी मते आहेत त्यांच्यासारखी काही दृष्टी व मते बुद्धपूर्व दर्शनातूनही आढळतात. व बुद्धोत्तर जो भारतात धर्मविकास झाला व होणार आहे, त्यालाही बुद्धविचार हवा नाही त्या स्वरूपात, तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी दृष्टीतून का होईना स्वीकारावा लागेल. त्याच्या मागे जाता येणार नाही. उदा. स्वामी दयानंद सरस्वती यांनी पुनः 'आर्य' हे नाव धर्मसुधारणेला योजून अग्निपूजा-होमहवनाचा पुरस्कार व प्रचार केला. यज्ञयागांची जागा मूर्तीपूजेने घेतली होती व आहे. यज्ञाला पुरोहित लागतात, तसेच मूर्तीपूजा व तत्सम पार्थिव कर्मकांडाला ब्राह्मण, गुरव व जंगम यासारखे पुरोहित लागतात, पुरोहित ब्राह्मण व अब्राह्मण होते व हल्लीही आहेत! म्हणजे पुरोहित संस्था नष्ट न होता, मूर्तीपूजेने टिकविलीच आहे. होम-अग्निप्रार्थनेसाठी आर्यसमाजातही आर्य पंडित व आर्य उपाध्याय असू शकतात. आर्य समाजाची धर्मसुधारणा बुद्धाएवढी रॅडिकल नसताही, चिपळूणकर-टिळक, रामतीर्थ, विवेकानंद, स्वामी रामकृष्ण परमहंस इत्यादी वेदाभिमान्यांना आवडली नाही. ब्राह्मो समाजाचे पुढारी

केशवचंद्र सेन व महाराष्ट्रातील रानडे व भाण्डारकर यांना त्यांच्या बुद्धिवादातून व युक्तिवादातून आवडली नाही. म्हणजे आर्य समाज सर्व हिंदूंनी पत्करला नाही व पत्कारीत नाहीत, कारण त्यात मूर्तिपूजा नाही. होमहवन व अग्निपूजा आहे तरी तो हिंदूंनी मोठ्या संख्येने पत्करला नाही. ह्यावरून असे सिद्ध होते की, बुद्ध (व जैन) यांच्या चळवळीमुळे बंद पडलेले होमहवन यज्ञ व अग्नितर्पण पुनः आर्य समाजाला रूढ व लोकप्रिय करता आले नाही. आर्य समाजाने अग्नीला फक्त आर्य मंदिरात आणि विवाहादी गृह्यसंस्कारात स्थान कायम राखले आहे. त्याच्या मते अग्निपूजा ही मूर्तिपूजा आहे, असे नव्हे. धर्मनिर्णय मंडळ-तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी वैदिक पंडितांनी सन १९२९ नंतर धर्मांचा फेरविचार केला. विवाहादी गृह्यसंस्कारात 'होम' कायम ठेवला, पण पशुंचे हवनास पुन्हा पाठिंबा दिला नाही. वेदकाळी मूर्तीपूजेपेक्षा अग्निपूजा जास्ती रूढ होती. हल्ली एखादा दुसरा यज्ञ पशुहत्येसह किंवा शाकाहारी करण्याचा प्रयत्न होतही असतो; पुनरुज्जीवन अशक्य आहे. सर्वांनीच बुद्धपूर्व काळात जे पशुसमर्पण होई ते बंद केले, स्वीकारले नाही. वैदिक सनातन्यांच्या मते पशुसमर्पण वेदयुक्त व वेदमान्य व वेदाला मंजूर आहे. दयानंद व आर्य समाजही अलिकडील वैदिक चळवळ, जातिभेद व अस्पृश्यता मानीत नाही म्हणूनही त्याला विरोध होतो व झाला. आर्य समाज वैदिक धर्म सुधारक ठरतो. तरी सनातनी वैदिक व आर्य समाजी वैदिक असा झगडा हिंदू धर्मात चालू झाला व मधून चालू असतो. येथे हा संदर्भ घेण्याचे प्रयोजन हे की-तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी भूमिकेवरूनही आर्य समाजाला बुद्धपूर्व काळातील वैदिक धर्मांकडे नेता येणे अशक्य झाले व होईल. जोतीबा व भीमराव आंबेडकर यांना आर्य समाज नापंसत का झाले हे त्यांनी कारणासहित लिहून ठेविले आहे. जोतीबाला तर आर्य व त्यांचे कल्पित ब्रह्म यांचा मनस्वी तिटकारा होता. बुद्धोत्तर भागवत धर्माला व साधुसंतांनाही बुद्धाच्या मागे जाता आले नाही व येत नाही. शंकराचार्यांना जाता आले नाही. उलट बुद्ध कित्येक बाबतीत स्वीकारावा लागला व विरोधकांना गौरवावा लागला. राजा राममोहनरॉय हे आधुनिक भारताचे एक प्रमुख व आद्य जनक म्हणून नानाविध पंडित व विद्वान मान्य करतात. तरी त्यांनी अग्निपूजा, वैदिक यज्ञयाग, होमहवन व मूर्तिपूजा स्वीकारली नाही. निर्गुण निराकार ब्रह्मच मुख्य मानले व पूजा-अर्चा-अर्पण व नैवेद्य वगैरे भिक्षुकी पूजालाही चाट दिला; अर्धचंद्र दिला. अरविंद घोष, गांधी, टिळक, विनोबा वगैरे गीतेचे विविध भाष्यकार अलिकडे झाले, त्यांनाही बुद्धाच्या मागे वरीलप्रमाणे जाता आले नाही. वेदप्रामाण्य झिडकारणाऱ्या ब्राह्मो समाजाकडून म्हणजे त्यांच्याद्वारे महर्षि शिंदे बुद्ध व त्याचा 'धर्म व संघ' यांचे पुरस्कर्ते झाले. वाचकांच्या पुढे मुद्दा हा ठेवावयाचा आहे की, कोणालाही बुद्धपूर्वकालीन अग्निपूजक, हिंसाप्रधान व सकाम वैदिक कर्मकांडाकडे नेता येत नाही. R. S. S. व हिंदू राष्ट्रवाद्यांच्या मनात हा हेतू कदाचित दडला असावा, पण त्यांनाही मागे जाणे अशक्य होईल. बुद्धांचे यश व तत्त्व-पराक्रम आणि भारतीय धर्मेतिहासातील त्याचे ध्रुवस्थान वरील विवेचनावरून ध्यानी आणून द्यावयाचे आहे. बाबासाहेबांचा बुद्ध धर्माचा नवा व आधुनिक अभ्यास व नवस्वीकार अर्थात बुद्धाच्या दर्शनाला बळकटी आणतो व पुढे नेतो. यापुढे बुद्ध व त्याच्या पुढील व चालू जास्ती विचारात घ्यावा लागतो. हल्ली वैदिक धर्मयुग व वेदांचा काळ नाही. धर्माचा प्राण हा 'नीतीधम्म' आहे, असे बुद्ध व बाबासाहेब सांगतात. समाजरचना बदलून अस्पृश्यता संपूर्ण इतिहासजमा करण्याच्या कामी आजवरच्या कोणत्याही धर्मसुधारकाला यश यावयाचे आहे. यासाठी बुद्ध व बुद्धोत्तर काळात 'बुद्ध व त्याचे दर्शन' याच्या सुपरिणामावरून बाबासाहेबांच्या बुद्ध धर्म स्वीकाराची महती पटते, तशीच बुद्धपूर्व जी अनेक दर्शने भारतात होती, त्यांच्यामध्ये बुद्धाच्या तत्त्वांचा पुरस्कार आढळतो. हे शेवटी थोडक्यात दाखववावयाचे आहे. वास्तविक धर्म व धम्म ह्या बाबी व विचार-आचार-जगात वेदपूर्वकाळी व आर्य भारतात येण्यापूर्वी होत्या. धर्म व धम्म मनुष्य जातीच्या जन्माएवढा पुरातन आहे. धम्म स्वीकार ही दीक्षा आहे, समाजांतर नव्हे. भारत देशातून देशांतर करणे नव्हे. जन्मभूची निष्ठा सोडून निष्ठांतर करणे नव्हे. 'सत्य व

अहिंसा' हे गांधींनी दोन शब्दात 'सर्व-धर्मसार' दिले आहे. हे पूर्वी बुद्धानेही धर्मरहस्य म्हणून व्यक्त केलेले होतेच. काळ, स्थळ व नवी जरुरी यानुसार धर्मांची फेरमांडणी व आखणी होत असते. हिंदूसाठी आर्य समाजाचे संस्थापक दयानंद यांनी वैदिक भूमिका कायम ठेवून केलेली आहे. आर्य समाजाचे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य लक्षणीय आहे. उत्तर हिंदुस्थानात त्याच्या अनेक शाखा आहेत. वारंवार धर्मस्थापना करावी लागते. बाबासाहेबांची गरज स्वतंत्र व वेगळीच होती. तिची पूर्तता बाबासाहेबांनी त्यांच्या 'भीमयानाची' नवी सूत्रे सांगून केलेली आहेच. धर्मचक्र फिरते ठेवावे लागते. त्यांच्यासारखे असामान्य बुद्ध वेळोवेळी प्राप्त होणे अशक्य आहे. व्हावेत अशी इच्छा अर्थात असावी. पण त्यांच्या पश्चात सर्वसामान्यांनीही यथाशक्ती 'धर्मचक्र' गतिमान ठेवणे, हे सर्वांचे कर्तृत्व आहे. ह्यासाठी हा सर्वसामान्यांचा एक प्रयत्न आहे. 'आर्य (उन्नत) सत्ये' सांगताना बुद्धाने 'आर्य' शब्द स्वीकारला होता. त्याच व्यापक अर्थाने दयानंदांनी स्वीकारला.

**बुद्धदर्शनाला इतर दर्शनांचे आधार**

भारतीय दर्शनात चार्वाक, जैन, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा, वेदान्त वगैरे लहानमोठी अनेक दर्शने आहेत. त्यांच्या विवेचनात बुद्धाच्या काही विचारांना आधार मिळतात, हे आधार बुद्ध दर्शनाची महती दाखवितात. अल्पसा तौलनिक अभ्यास पुढे व नंतर शेवटी मांडला आहे.

चार्वाक सर्वांत जास्ती वास्तववादी (रिॲलिस्टीक) झाला. तो संपूर्ण जडवादी ठरतो. बुद्धाचा विज्ञानवादी व बुद्धिवादी दृष्टिकोण बऱ्याच अंशी चार्वाकाला व आधुनिक जडवाद्यांना जवळचा आहे. चैतन्य, आत्मा, स्वर्ग, ईश्वराची भक्ती इत्यादि आध्यात्मिक तत्त्वे व अध्यात्मवाद चार्वाक नाकारतो. वेद व पुरोहितावर श्रद्धा ठेवणे-मरणोत्तर श्राद्ध हे मूर्खपण आहे, असे स्वच्छ सांगतो. पुरोहितांनी त्यांच्या पोटापाण्यासाठी कर्मकांड व वरील सर्व बाबी निर्माण केल्या असे चार्वाकाचे क्रांतिकारक मत आहे. बुद्धाचा माध्यमिक-मध्यम मार्ग होता, तरी चार्वाकाप्रमाणे त्याने वेद, ईश्वर, स्वर्ग, ब्राह्मण पुरोहित वैगेरसंबंधी बंड केले. ह्याबाबतीत तरी चार्वाक व बुद्ध यांच्यात सारखेपणा दिसतो. चार्वाक पूर्ण पाखंडी समजला जातो. अनुमान व एकूण अदृश्य व अतर्कवादी, आत्मवादी धर्म चार्वाकानेच संपूर्ण प्रथम नाकारला. चार्वाक एकटा व स्वतंत्र झाला. बुद्धाचा मार्ग हा मध्यम मार्ग होता. तो सुवर्णमध्य साधतो. एकापरी बुद्धाच्या धर्मापेक्षा जैन धर्मावर चार्वाकाची जास्ती छाया दिसते. दृष्टिगोचर वस्तूंनाच जैन जास्ती मानतात. विश्वासास योग्य मुक्तमहापुरुषांना (तीर्थंकरांना) जैन प्रमाण मानतात. याचप्रमाणे बौद्ध गौतमाला मानतात. चोवीस तीर्थंकरांच्यासंबंधी जास्ती माहिती दिली जाते, तशी मागील तेवीस बुद्धासंबंधी फारसी माहिती उपलब्ध नसावी. चार्वाकाप्रमाणे भौतिकद्रव्ये (पुद्‌गल) जैन मानतात. बुद्ध व जैन दोघेही निरीश्वरवादी आहेत. प्राचीन मूळचे सांख्य-दर्शन देखील निरीश्वरवादी आहे. यामुळे बौद्धांना व जैनांना ह्या अर्थी जवळचे व आधारभूत ठरते. जैन धर्म आत्मा मानतो. कर्म मानतो. बौद्ध व जैन धर्मात पुष्कळ साम्ये दाखविली जातात तरी फरक पुष्कळ आहे. जैन धर्म आचरण्यास फार अवघड असल्यामुळे, तो फारसा वाढला नाही व बुद्ध धर्माप्रमाणे भारताच्या शिवाय इतर बाहेरच्या राष्ट्रात पसरला नाही. पण वैदिक धर्माला दोघांनीही टक्कर दिली. पुष्कळसे साम्य असल्याने अर्वाचीन जैनांनी वास्तविक बुद्ध धर्माचा फार अभ्यास सहानुभूतीने केला पाहिजे. 'जैन-बौद्ध' यांचा उल्लेख पुष्कळपणे एकसमयावच्छेदेकरून केला जातो. सत्य, करुणा व अहिंसा इत्यादि दोघांचीही अनेक तत्त्वे सारखी आहेत व ऐतिहासिक कार्यात समानता आहे. 'थिअरी ऑफ कर्मन्' हा जैन धर्माचा कणा आहे. जैनांनी धर्मांचा सूक्ष्मात सूक्ष्म विचार केला असे

धर्मज्ञ मानतात. चार्वाक, जैन व बौद्ध धर्माचा ब्राह्मणी धर्माकडून मनस्वी छळ झाला. जैन व बौद्ध यांना अनुयायी मिळाले, तसेच चार्वाकाला मिळाले नाहीत. जैन व बौद्ध ह्या दोन चळवळी भारतात झाल्या. येथे मूलभूत तात्त्विक साम्ये दाखववावयाची आहेत. बुद्ध धर्म समजण्यासाठी इतर सर्व भारतीय दर्शनांच्या तौलनिक अभ्यासाची नितांत गरज आहे. असा अभ्यास करूनच बाबासाहेबांनी नंतर बुद्धाचा निश्चय केला. 'मी धर्मांतर करणार!' असे १९३५ नंतर जाहीर केल्यावर कोण गदारोळ उठत होता. ह्या काळात माझ्या वाचनात 'केसरी', 'भाला', 'ज्ञानोदय', 'सुबोधपत्रिका' वगैरे नियतकालिके येत होती. ज्ञानोदयाचे संपादक जे. एफ. एडवर्डस् यांनी ह्या विषयावर अनेक स्फुटे इंग्रजीत लिहिलेली मी वाचत होतो. स्वतंत्रपणे अनेक वर्षे परमविवेक करून शेवटी एकमेव बुद्धाचा मार्ग स्वीकारला व प्रचारिला. बाबासाहेब कोणत्या धर्मात जाणार, ह्यासंबंधी फार कुतुहल होते! निरनिराळे धर्म त्यांना आमंत्रण करीत होते. प्रत्येकजण आपलाच धर्म योग्य समजून बाबासाहेबांना आवाहत बोलावित होते. ह्या काळात मी बराच कळता होतो. शीख, मुसलमान, ख्रिस्ती बोलावित होते. फार काय, प्रार्थना समाज देखील त्यांचा धर्म योग्य आहे, असे म्हणत होते!

बुद्धाच्या पश्चात त्याच्या धर्माच्या वाटचालीत निर्माण झालेल्या जंजालातून त्यांनी जरूर तेवढाच भाग व 'सत्सार' (Essance of truth) बाहेर काढले, बुद्धाने वैदिक धर्माच्या कर्मकाण्डात लोपलेली नैतिक सत्ये पुनः प्रकट केली होतीच. बुद्ध धर्म मूळातच विश्वधर्म होता व आहे. या अर्थाने तो सर्वथैव दलित व दलितेतरांनाही व सर्व जगाला उघडा आहे. कारण दुःख हे प्रत्येक जिवाला संभवते व प्रत्येक जीव दुःखातून सुटला पाहिजे. बाबासाहेबांनी महायान व हीनयान यातून सत्ये घेतली व बुद्धाकडे व त्याच्या धम्माकडे जाण्यासाठी नवे 'भीमयान' तयार केले. भीमयानाच्याद्वारे 'बुद्ध व त्याचा धम्म' याकडे सहज जाता येते. ही नवी सोय व नवे वाहन आहे. नवी घटना व मांडणी आहे.

**ज्ञानदीप**

त्यांच्या अगोदर जोतीबांनी त्यांच्या गुलामगिरी पुस्तकात बौद्ध व शाक्यमुनी यांच्या कार्याचा निर्देश केला होता. ब्राह्मणी मतलबी धर्माने त्यावर कशी हिकमत सिंधुच्याद्वारे मात केली, हे निर्देशिले होते. त्यानंतर महर्षी शिंदे यांनी उदार, सहिष्णु व तौलनिक आणि समन्वयक ब्राह्मो समाजाच्या दृष्टीतून जास्तीतजास्तपणे बुद्ध धर्माकडे पाहिले. पाली भाषेचाही त्यांनी मूळातून अभ्यास केला होता. बुद्धाने बाह्य बाबींचा धर्म (Outward Religion) नाकारून अंतर्यामी असलेल्या स्वावलंबी 'ज्ञानदीपाचा' आधार घेतला, ह्यामुळेच स्वावलंबी उदार विचारवंत बुद्धाकडे वळतात. बुद्धाने शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य (वेदांचे) सोडिले नसते, तर त्याला 'बुद्ध म्हणण्याचे प्रयोजनच नव्हते.' पण बुद्धाने पूर्व-संस्कृती व धर्म यातील चांगले, उत्कट, भव्य व लोककल्याणास पात्र तेवढे सर्व संवर्धिले व प्रचारिले. सत्य तेवढे घ्यावे व असत्य तेवढे वगळावे-टाळावे, असा वरील सर्वांचाच पवित्रा होता. अस्पृश्योद्धारक शिंदे-आंबेडकर यांच्या राजकीय पक्षात, साधनात व माध्यमात फरक पुष्कळ होता, तरी परस्परांचे विचार व कृती दलितोद्धारक क्षेत्रात परस्परपूरक होती, पण बाह्य शरीरे दोन होती, तरी विचारांच्या पिण्डात दोघांत खूपच सोईरसंबंध होता, ऐक्य होते, हेही मी सिद्ध केले आहे ('अस्मितादर्श' दीपावली अंक १९८० पहा) बुद्ध धर्माचे सन १९०३-०४ पासूनचे पूर्वअभ्यासक व संशोधक म्हणूनही शिंदे नवबुद्धांना व एकूण दलितांना समीप आहेत.

अनुक्रमणिका

## बुद्ध व त्याचे दर्शन

बुद्धी-'बुद्ध' म्हणजे कोणी एक जात (CASTE) नव्हे. गौतमाची नवी जात निर्मिणे हा हेतूही मुळीच नव्हता. एका वेदाचे चार वेद झाले व त्यांच्या तीन-चार जाती ब्राह्मणात झाल्या. जोतीबांनी वेद याचा अर्थ 'भेद' असा शिवाजीच्या पोवड्याच्या प्रस्तावनेत केलेला आढळतो. परंपरा हजारो वर्षांची असल्याने ज्ञानभेद निर्माण होणे शक्य झाले. चार्वाक, न्याय, वैशेषिक, मीमांसा वगैरे काही तात्त्विक दर्शनांच्या प्रमाणे समाजात जाती झाल्या नाहीत व बुद्धकाळातही वेदबंदी शूद्रातिशूद्रांना एवढी पुढील काळाप्रमाणे घट्ट झाली नव्हती. कारण धर्म व तत्त्वज्ञान यांच्या रचनेत सर्व वर्ण भाग घेत होते. महावीर व गौतम यांच्या उदाहणांवरून क्षत्रियांचा मोठा भाग होता. बुद्धाने पूर्वशास्त्र व उपलब्ध ग्रंथ यांचा अर्थात मागोवा घेतला असलाच पाहिजे. त्याचा काळ तत्त्वचिंतनाचा होता. त्याच्या तत्त्वज्ञानाचे दर्शन घेणे व त्याच्यासारखे कित्येक विचार-तत्त्वभाग इतर दर्शनांतूनही आढळतात, ते पाहाणे हे एक बुद्धाचे दर्शन (तात्त्विक) होऊ शकते. भारतीय सहा दर्शनांतील साम्य व वैषम्य पाहाणे व शोधणे हा देखील बुद्ध धर्माला पूरक असा अभ्यास आहे. तत्त्वज्ञानात, दर्शनांत उद्‌गम व विकास आहे. स्वतः दर्शनिक बुद्धाने मोठा विकास केला. पण त्याचे स्वरूप जास्ती निश्चित आहे. वैदिक दर्शनातील संज्ञचे व परिभाषेचे अनेक अर्थ होऊ शकतात. कारण मीमांसा व टीका अनेकविध होत आल्या, हा उपक्रम चालूही असतो.

सर्वसामान्यांना पार्थिव दर्शन आटोक्यात वाटते. बुद्ध त्रिशरणात पार्थिव अर्थ नसतो. परंतु लोकात पारमार्थिक (तात्त्विक) व पार्थिव विचार-आचार करणारे असे दोन प्रकारचे लोक असतात. हिनयानापेक्षा महायानांची संख्या फार मोठी आहे, याचे कारण हेच होय. पण दोघेही वेदविरोधक आहेत; चार्वाकापासूनची वेदविरोधकांची परंपरा बुद्ध, जोतीबा फुले, आंबेडकर यांच्या अखेरपर्यंत सतत चालू आहे. म्हणून वेदप्रामाण्यवादी तेवढे हिंदू ही जी टिळकांची व्याख्या होती ती ग्रंथ प्रामाण्य सोडून बॅ. सावरकरांना व्यापक असा राष्ट्रीय हिंदुत्ववाद मांडून विशाल करावी लागली. ह्यात गौतमाचा एकाअर्थी जयच दिसतो. बौद्ध धर्माने अगोदरच आशियाई अनेक राष्ट्रे व्यापून टाकली असल्यामुळे मुस्लिम धर्माच्या आक्रमक व प्रसरणशील पावित्र्याला मर्यादा पडल्या. मुस्लिम आक्रमकांनी मात्र हिंदुस्थानातील बौद्धांचा छळ केला. मुस्लिम धर्म व बौद्ध धर्म ह्यात साधर्म्य फारच कमीतकमी सापडते; कारण मुस्लिम एकेश्वरवाद व ईश्वर शरणागती गौतमाच्या निरीश्वरवादी व इहवादी दृष्टिकोणात बसतच नाही. ख्रिस्त्यांचा 'ट्रिनिटीवाद' तर मुळीच बसत नाही! मात्र येशूवर बुद्ध व त्याच्या धर्माचा फार परिणाम झाला होता व येशुचा आणि बुद्ध धर्माचा संपर्क झाला होता, हे बाबासाहेबांनी लिहिले आहे. बाबासाहेबांचा सर्व धर्मांचा अभ्यास किती विस्तृत होता, याची कल्पना त्यांच्या साहित्यावरून येते. समीक्षा व टीका करण्यापूर्वी समीक्षेचा विषय बाबासाहेब खोलवर अभ्यासत होते. त्यांना शाळा-कॉलेजात संस्कृत घेता आले नाही. शिंद्यांना हायस्कूल व कॉलेजमध्ये संस्कृत चांगले शिकता आले. त्यामुळे विलायतेत मँचेस्टर कॉलेजमध्ये असताना त्यांना पाली भाषेत चटकन प्रगती करता आली व बौद्ध धर्म अभ्यासण्यास त्यांना अडचण पडली नाही. कारण पाली व संस्कृत यामध्ये साधर्म्य आहेच. बाबासाहेबांना मूळ संस्कृत ग्रंथाच्याऐवजी इंग्रजी भाषांतरांच्याद्वारे मागोवा घ्यावा लागला. तरी काही विद्वानांशी त्यांनी चर्चा केल्या होत्या.

अनुक्रमणिका

**बाबासाहेबांचा (बुद्ध धर्माचा) शोध**

ही एक मोठी धर्म-घटना आहे. Who were the Shudras? हा इंग्रजी ग्रंथ लिहिण्याच्या काळात थोडे मागे-आगे बाबासाहेब व रॅडिकल ह्युमॅनिस्ट पक्षाचे प्रवक्ते व प्रचारक आमच्या वाईचे गुरू तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा एकमेकात सहवास झाला. चर्चाही झाली. म्हणजे बाबासाहेब अधिकारी पंडिताशी विचारविनिमय देखील करीत असत. कै. भास्करराव जाधव यांनी देखील ते रामायणाचा शोध व अभ्यास करीत असताना मागे-आगे तर्कतीर्थांच्या सहवासात आले. पण दुर्दैव (आश्चर्य) हे की-भास्करराव व भीमराव दोघेही मुंबई कौन्सिलात एकाच वेळी असताना फारसे एकत्र किंबहुना दोघेही अस्पृश्यता निवारक असूनही सहविचारार्थ एका व्यासपीठावर आलेले उल्लेख मिळणे अवघड वाटते. भास्करराव जोतीबांचे शिष्य व अज्ञेयवादी असूनही महर्षी शिंदे यांच्याप्रमाणे बुद्धाकडे वळले नाहीत. मोठे सत्यशोधक पुढारी संस्कृतज्ञ होते. भास्कररावाशी सदरहू लेखकाचा परिचय होता. आंबेडकरांचा व शिंद्यांचा जसा एक पक्ष झाला नाही, तसा भास्करराव व आंबेडकर यांचाही झाला नाही. राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये दोघेही एकाच वेळी विलायतेत होते. हे सगळे म. फुल्यांचे शिष्यच, एवढेच नव्हे तर म. फुले यांचे कार्य वाढविणारे मोठे पुढारी! राजकारणामुळे, वैयक्तिक दृष्टिकोणाच्या स्वभावामुळे विद्वान माणसे व्हावीत तशी एकसंघ होत नाहीत. आजही हा अनुभव येतो. वरील सर्वांत तफावत आढळते. पण काही साम्य देखील होते. जाधवराव व आंबेडकर यांचे राजकारण प्रायः प्रागतिक होते. शिंदे हे राजकारणातनेमस्त होते. म्हणून जाधवराव व शिंदे यांच्यात फरक. भास्करराव जाधवांपेक्षा विचार-आचाराने 'शिंदे-आंबेडकर' जवळचे ठरतात.

पाणी प्रवेश, मंदिर प्रवेश, बुद्ध धर्मप्रवेश असे संग्रामशील पवित्रे डॉ. आंबेडकरात होते. उलटसुलट मते व्यक्त होत होती. राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये बाबासाहेबांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केल्यापासून ते गांधी-आंबेडकर करार (तह) होईपर्यंत, घणाघाती काळ गेला. गांधींच्या प्रायोपवेशनामुळेही जागृती देशात होत होती.

**सद्‌गुरु गाडगे महाराज व डॉ. आंबेडकर**

साधारणतः खादी कपडे व गांधी टोपी घालून सत्याग्रही होऊन तुरुंगात जाणे म्हणजे साहजिकच 'देशभक्त' पदवी लाभे. हा मार्ग डॉ. आंबेडकरांचा नव्हता. त्यांचे जुने मित्र जेधे जवळकर व त्याचे अनुयायी यानीही सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला होता. शिंदे तर अगोदरपासून राष्ट्रीय वृत्तीचे. ते तुरुंगात गेल्यामुळे साराच ब्राह्मणेतर विचारप्रवाह जवळजवळ सर्वच काँग्रेस व गांधींच्या झेंड्याखाली गेला. मानी व अस्पृश्यांत राष्ट्रवादी-गांधींचे अनुयायी आंबेडकरवादी असे भेदही झाले, राष्ट्रीय पत्रे आंबेडकरांवर टीका करीत होती. सनातनी जे पक्के होते, ते निर्ढाविलेले होते! 'परधर्मात जावयाचे आहे ना! खुशाल जा!' असे म्हणणारेही कित्येक होते! पण आंबेडकर या सर्व बाजू न्याहाळत होते, धर्मांतर कोणत्या धर्मात करावयाचे यासंबंधी सद्‌गुरु गाडगे महाराज यांच्याशीही त्यांनी चर्चा केली होती. गाडगे महाराजांनी सांगितले की-'मुसलमान व ख्रिस्ती धर्मांशिवाय कोणत्याही धर्मात जा.' गाडगे महाराज पूर्वी वऱ्हाडातील सत्यशोधक चळवळीतही होते. म्हणूनच त्यांचे लक्ष शिक्षणाकडे होते. सत्यशोधक जलशांमधूनही त्यांनी जागृती केली होती. म. फुल्यांच्याकडून त्यांनी प्रेरणा

अनुक्रमणिका

घेतली होती. धर्मांतराच्या घोषणेमुळे सर्वत्र गदारोळ उठला होता! हिंदुंपैकी बहुतेक सर्व विचारवंतांना 'धर्मांतराचा' मार्ग आणि तोडगा मान्य नव्हता. बाबासाहेब एकाकी चालले होते.

### 'सर्व धर्मांतर्गत धर्म' सर्व दर्शनांतर्गत धर्म

महर्षी शिंदे यांच्या हयातीच्या आत म्हणजे सन १९४४ पूर्वी बाबासाहेबांच्या कार्याची वरील परिस्थिती होती, कोणत्या धर्मांत जाणार? यासंबंधी पत्ता नव्हता! बाबासाहेब शीख होणार! वगैरे काही धर्मांची नावे जाहीर होतही असत. शिंद्यांच्यावर त्यांच्या सार्वजनिक कार्याच्या निवृत्तीच्या कालविभागात आंबेडकरांचे कार्य व विचार प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम करीत होते. वरील काळात वाईच्या गणपती घाटावर 'धर्मांतर का सर्व धर्म रहस्य (सर्वधर्मांतर्गत धर्म)' ह्या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. कारण हा विषय गाजत होता व बौद्ध धर्मासंबंधी अंतिम निश्चयही कर्मवीर शिंदे असताना बाबासाहेबांचा झाला नव्हता. पण शिंदे सर्वधर्मी (विश्वधर्मी) होते म्हणून सर्वधर्मांतर्गत धर्म हा कोणत्या तरी धर्मात जाण्यापेक्षा चांगला मार्ग आहे, हा साहजिक त्यांचा मुद्दा होता. मात्र ते स्वतः बौद्ध धर्मांकडे अध्यात्मवादी धर्म म्हणूनच पाहात होते. कारण अध्यात्म हे अंतर्यामी असते आणि बुद्धाप्रमाणे अंतःस्फुरणाला शिंदे श्रेष्ठ स्थान देत.

### सर्व दर्शनांतर्गत धर्म

बाबासाहेबांनी स्वीकारलेला बौद्ध धर्म हा भारतातील मुख्य सहा दर्शनांतर्गत आहे व कोणत्याही परकीय परदेशी धर्मापासून अलिप्त आहे. मध्याचार्य वेदानुयायी होते, तरी त्यांनी जैन-बौद्ध दर्शनादि सर्व दर्शनांचा सर्वदर्शनसंग्रहात समावेश करून माहिती दिली आहे. बुद्धदर्शन हे 'सम्यक् दर्शन' असल्यामुळे त्याला अर्थात खण्डन करण्याच्या उद्देशाने का होईना वेदानुकूल सर्व प्रसिद्ध आचार्यांना स्थान द्यावे लागले. यावरूनही बौद्धदर्शनाची महती कळते. बुद्धाच्या अगोदर चार्वाक मत होते, जैन धर्म होता. तरी बौद्ध धर्म स्वतंत्र काढावा लागला. म्हणजे बौद्ध धर्म पूर्वदर्शने बुद्धाला मान्य नव्हती व म्हणून नव्या दर्शनाची गरज होती. कारण 'दुःख' दूर झाले नव्हते. म्हणून दुःखांची मूळ कारणे बुद्धाने प्रथम दिली, दुःखची कारणे असू शकतात. कारणाशिवाय दुःख असू शकत नाही. ही कारणे दूर केल्यास दुःखनिवारण होऊ शकते. बाबासाहेबांच्या पुढे अस्पृश्यतेचे-दलितत्वाचे दुःख खडे होते! दुःखावर इलाज म्हणून 'धर्मांतर' हे असू शकते. पण पूर्वी मुसलमान व ख्रिस्ती धर्माचा मार्ग पुष्कळांनी पत्करिला होता.

बुद्ध सर्व वस्तू स्वाभाविकपणे व कारणाकारणाने निर्माण होतात व त्या सर्व परिवर्तनशील आहेत, असे मानी. अर्थात दुःखाला कारण होणारी, हीच तृष्णा दुःखाला कारण असते. अज्ञानाला कारण होते. ज्ञानाची किंवा जी तृष्णा दुःखाला कारण होत नाही, ती तृष्णा बुद्धाने त्याज्य मानिली नाही. त्याज्य तृष्णा दूर करण्यासाठी विधायक अष्टांग मार्ग त्यांनी सांगितला. सर्वक्षणिक त्याने सांगितले असले, तीर सर्व असत्य तो मानित नव्हता. परिवर्तनशील मानित होता. बुद्धाच्या धर्माचा त्याच्या मागून फार विकास झाला व वेगवेगळी भर पुष्कळ पडत गेली. तिचा विचार येथे करणेचा नाही.

अनुक्रमणिका

## बुद्धाची मूलभूत शिकवण

आठ आर्य सत्ये उन्नत व उत्कृष्ट आहेत, यांच्या पालनामुळे निर्मळ बुद्धी व शांती मिळू शकते. दुःख विनाश होतो. पुनर्जन्म संभवत नाही. ह्या अवस्थेला 'निर्वाण' म्हणता येते. बुद्धाने निर्वाणाची जी स्थिती सांगितली, ती मरणोत्तर किंवा तथाकथित अदृश्य स्वर्गात प्राप्त होणारी नाही. 'याच देही। याचि डोळा।' मिळणारी आहे. यादृष्टीने इहवादी आहे. तृष्णा म्हणजे अविद्या होय. बुद्धाची निर्वाणविषयक जाणीव मोक्ष हा स्वर्गात मिळत नाही. मोक्षकल्पना व बुद्धाचे निर्वाण वेगळेच आहे. ही एक तत्त्वज्ञानातील क्रांती होय.

न्याय व वैशेषिक दर्शने यांच्यामध्ये ईश्वर व मोक्ष यांच्या जाणिवामध्ये साम्य आहे. तरी या दोहोपासून बुद्ध दर्शन स्वतंत्र वेगळे आहे. मूळ साख्य दर्शन ईश्वराचे अस्तित्व मानित नाही. कपिलकृत सांख्य दर्शन संपूर्ण निरीश्वरवादी होते. पण निरीश्वरवादी दर्शन संप्रदायातूनही ईश्वरवादाचा पुढे प्रादुर्भाव झाला. मीमांसा-दर्शने तर वेदवादी व यज्ञवादी होती. वेद, प्रतिकूल दर्शने बहुतेकपणे ईश्वरवादाच्या विरुद्ध होती. सांख्य कपीलमुनी बुद्धाचा गुरु देखील मानितात. मीमांसा दर्शन भौतिक जगत व त्याची सत्ता मानिते. परंतु स्रष्टा, परमात्मा, ईश्वर मानीत नाही. वेदान्ताने सत्, आत्मन्, ब्रह्मन् अशा ज्ञानाच्या जाणिवा विकासास नेल्या. वेदान्ताप्रमाणे 'ईश्वर' कल्पना ही माया (मिथ्या) आहे. वेद प्रथम मौखिक होते, बुद्धाचा उपदेश देखील प्रारंभी मौखिक होता. वेदापेक्षा वेदान्ताला (उपनिषदांना) महत्त्व जास्ती आहे. 'सदाचार' हा बुद्धाच्या शिकवणुकीचा गाभा आहे. युद्धविहीन जग त्याला हवे आहे.

## पंचमहाव्रत-पंचशील

(१) अहिंसा (२) सत्य (३) अस्तेय (४) अपरिग्रह (५) ब्रह्मचर्य ही पंचमहाव्रते बुद्ध, जैन व वेदान्त या दर्शनातून समानपणे आहेत. बौद्ध धर्मात या महाव्रताला पंचशील म्हणतात. ख्रिस्ती धर्मामध्ये पुढे ह्याच पंचशीलचा ह्या नाही त्या भाषेत स्वीकार केला आहे. पंडित जवालहरलाल यांनी 'पंचशील' ही संज्ञा स्वीकारली होती. जैन साधुही पंचशील पाळण्याचा कठीण प्रयत्न करितात. पंचशील-पंचमहाव्रत हा सर्व धर्मांतर्गत धर्म व सर्वां वरील दर्शनांतर्गत धर्म आहे. कोणाही दर्शनाने ह्याला विरोध केलेला नाही. बौद्ध धर्मातील आर्यासत्ये, पंचशील ही एकूण विश्वधर्माची रहस्ये आहेत. उपनिषदाचे (वेदान्ताचे) सारही आहेत.

बौद्ध धर्माच्या काळात म्हणजे बुद्ध काळात जगत्, परलोक, पाप, पुण्य, पुनर्जन्म,मोक्ष व इतर तत्सम विषयावर घोर तर्कवितर्क चालले होते. बुद्धपूर्व भारतात देखील परस्परविरोधी दर्शन निष्पन्न झाली, याचे कारणही वरील सर्व तत्त्वज्ञानपर विषयावर भारतात विचार विकास चालू होता. तत्त्वज्ञान युगाच ह्याला म्हटले पाहिजे. एवढे मोठे युग पुनः आलेले दिसत नाही. अनेक सम्राटांची राज्ये आली व गेली. त्याचे शासन चालूच असते. तो अखेरपर्यंत मार्गदर्शन करणार. त्याच्यावर विचार करणे हे एक आनंद मिळविण्याचे साधनच होय. हीनयान व महायान यांचा मिळून 'बौद्ध धर्म' पुढे तयार झाला. दोन्ही परस्परावलंबी आहेत.

अनुक्रमणिका

**बुद्ध व आंबेडकर**

डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला व दलितांना करावयास लाविला हे लक्षात घेतले पाहिजे. विस्मरण होऊ नये म्हणूनही स्मरण करावे लागते. बाबासाहेबांच्या अध्ययनाची व्याप्ती त्यांचे समग्र वाङ्मय साक्ष देते. आधुनिक अर्थाने बौद्ध (व जैन) हे समाजसुधारक होते म्हणण्यापेक्षा तत्त्वज्ञान व धर्मसुधारक होते. भारतात धर्मांचा व तत्त्वज्ञानांचा संबंध जवळचा व मूलतः असतो, म्हणून धर्म सुधारावाही लागतो. बुद्धाच्या काळात व नंतरही वर्णव्यवस्था व अस्पृश्यताही होती. वर्णक्रम बदलून क्षत्रियांचा पहिला क्रमांक त्याने रूढ करण्याचा प्रयत्न केला. शूद्रातिशूद्रांना बुद्ध संघात व धर्मात प्रत्यक्ष घेण्याची त्यानेच सुरुवात केली. एवढीही सुरुवात दुसऱ्यांनी व जैनांनी केली नव्हती व आजही जैनांचे लक्ष दलित प्रश्नाकडे, अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे आहे, असे म्हणता येत नाही. बाबासाहेबांनी तुलनेने उपलब्ध उत्कृष्ट अशी वाट बौद्ध धर्माचीच एकमेव वाटली. ह्याचीही म्हणजे त्यांनी शेवटी केलेल्या पसंत धर्माचीही कारणे पाहिली पाहिजे. त्यांचा असा दावा नव्हता की, बौद्ध धर्म सर्वथैव निर्दोष आहे. पण त्यांनी बुद्ध व त्याच्या धम्माकडेच जास्ती पाहिले व आपण सर्वांनीही तसेच पाहिल्याशिवाय गती नाही. बाबासाहेबांनी भारतीय दलितांच्या उद्धारार्थ जेवढे पाहिजे तेवढे घेतले, चीन-ब्रह्मदेश वगैरे बौद्ध धर्मीय देशातील बौद्ध धर्माची अवनतावस्थाही त्यांनी दाखविली आहे. बाबासाहेब बौद्ध धर्म चिकित्सक-मीमांसक-समीक्षकही होते. बौद्ध धर्माचे सुधारकही होते.

अलिकडे अनेक मार्क्सवादी विवेकवंत वैदिक धर्म-हिंदू धर्म व बौद्ध धर्म यांची समीक्षा करीत आहेत. पूर्वी ब्राह्मण पंडितांनी बौद्ध धर्मावर सतत हल्ले केले होते. पण मार्क्सवादी अभ्यासकांमुळे पुष्कळ खऱ्या व कठोर बाबी पुढे येत आहेत. यामुळे ब्राह्मणी धर्माचे पितळही उघडे पडत आहे. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचे दर्शन खुद्द बुद्ध गौतमाच्या जीवनातून, संदेशातून व कार्यातून पाहिले व मार्क्सवादातील नैतिक थिटेपण म्हणजे अहिंसेचा अभाव दर्शविला. जेथे अहिंसेचा अभाव मानिला जातो तेथे लोकशाही लोपते. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माशिवाय दुसरा कोणता धर्म निवडावयाचा होता? त्या प्रश्नाला अन्य उत्तर नाही.

बुद्धाचा एवढा मोठा प्रभाव का पडला? व लोक बौद्ध का झाले? धर्म व तत्त्वज्ञानचिंतक व शोधक थोडेच असतात. त्याकाळी तरी बौद्ध धर्म प्रसार पावत असताना दळणवळण व साक्षरता कमीच होती. सर्वसामान्य लोकांनी बुद्धाचे तेज, ओज व कीर्ती पाहून ऐकूनही बौद्ध धर्म स्वीकारला. बुद्धाच्या मरणोत्तर देखील त्याची कीर्तिप्रभा शिल्लक राहिली व त्याच्या धर्माच्या परिषदा भरून बुद्धकार्य व संदेश वाढला.

धर्मग्रंथापेक्षा प्रत्यक्ष धर्मसंस्थापक महात्म्यांचा प्रभाव त्यांच्या हयातीत व नंतरही राहातो व वाढतोही. डॉ. आंबेडकर यांच्याही बाबतीत वरीलप्रमाणे स्थिती आपल्याकडे झाली. त्यांचे ग्रंथ सर्वसामान्यांनी वाचले होते, ऐकिले होते व सर्वांनीच त्यांना पाहिले होते असे नव्हे, पण त्यांच्या महतीचा परिणाम त्यांच्या समक्ष व आज अपरोक्षही दिसू शकतो. धर्मसंस्थापकांच्या मागाहून धर्मग्रंथांची निर्मिती जरुरीनुसार होते. पण बुद्ध, येशू, झरत्रुष्ट वगैरे थोरांना-असामान्यांना प्रत्यक्ष लोक अनुसरतात. वंदनीय व पूजनीय प्रत्यक्ष व्यवहारात समजतात, याचे कारण विद्वतजड पुष्कळपणे अवघड असणाऱ्या धर्मग्रंथापेक्षा प्रत्यक्ष ज्ञानाचा साक्षात्कार झालेले थोर थोर महात्मेच व त्यांचे चरित्र लोकांवर प्रभाव पाडते. असे शाक्यसिंह बौद्ध गौतम याचे उदाहरण जगाच्या

अनुक्रमणिका

धर्मेतिहासात उमटून दिसत आहे. खुद्द बुद्धामुळे वैदिक व वेदान्ती धर्म पुष्कळपणे पालटला. हाही बुद्धाचा उद्देश होता.

### धर्मक्रांती व बुद्ध

बुद्धाला दशावतारात स्थान दिले व ते सर्व हिंदुंना आज मान्य आहे याचे कारण बुद्धाचे असामान्यत्वच होय. त्याला विष्णूचा अवतार मानतात, तसेच त्याचे एक नाव 'जिन' (जितेंद्रिय) देखील आहे. बुद्धानंतर हिंदू व बौद्ध धर्मात एवढी मोठी सरभेसळ झाली व एकमेकांचा एकमेकांवर एवढा मोठा परिणाम झाला की-दोन्ही धर्मांचे भिन्नत्वच भारतात लोप पावले. तसेच जैन व हिंदू यांच्यातही आदान-प्रदान झाले. उदा. जैनांच्या पावित्र्याच्या कल्पनेतून हिंदूंची स्पृश्यास्पृश्यतेची चाल जैनातही रुजली. बौद्धाचा मानीव अस्पृश्यासंबंधी जेवढा उदार दृष्टिकोण होता व आहे तेवढा जिन धर्मियात नव्हता व नाही. 'भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नावर' संशोधन करीत असताना त्यांच्या या ग्रंथात कर्मवीर शिंदे यांनी जैन धर्मालाही अस्पृश्यतेचे संगोपन करण्याच्या कामात जबाबदार धरीले आहे. आजही चीन, जपान, ब्रह्मदेश, लंका वगैरे देशांत भारताएवढा अस्पृश्यतेचा व दलितांचा प्रश्न तीव्र नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्मच का पत्करिला ह्याबाबतची कारणे त्यानी सांगितली आहेत व इतरांनाही ती संशोधून पाहाता येतील. भारतात परिवर्तनवादी व परंपरावादी यांच्यातील झगडा उपनिषदापासून तो आजतागायत चालू आहे. वैदिक व अवैदिक असा संघर्ष होता व आहे. हिंदू धर्मात अनेक तत्त्वज्ञान पंथोपंथ झाले. त्यालाही कारणे होती. बहुतेक पंथ पुरोहितशाहीच्या वर्चस्वामुळे व परमार्थ क्षेत्रात होणाऱ्या कुचंबणेमुळेही निघाले व वाढले. सनातनी व परिवर्तनवादी हा वाद वेदाएवढा जुना आहे. वेदप्रमाण मानणाऱ्या शंकराचार्य, रामानुजाचार्य, निंबार्क व मध्याचार्य यांच्यात तत्त्वज्ञानात्मक पंथभेद झाले. तत्पूर्वी एका वेदाचे चार वेद झाले व पुढील विचारवंत ऋषींना वेदांतील पार्थिव पूजेचे स्वरूप मान्य न झाल्यामुळे उपनिषदे (वेदान्त) निर्माण झाली. बुद्धपूर्वच उपनिषदानी हिंसाप्रधान सकाम यज्ञयागादि कर्मकांडाविरुद्ध बंड केले होते. समतेचा पुरस्कार वेदान्ताने केला होता. हा व चार्वाक व सांख्य निरीश्वरवाद्यांच्या विचारांचा पाया भारतात बुद्धाला होता; कोणत्याही क्रांतीला पूर्वपाया व पार्श्वभूमी थोडीफार असतेच. क्रांति आभाळातून एकदम पडत नाही! बौद्ध-जैनांनी प्रत्यक्ष समाजरचना (आधुनिक अर्थाने) बदलण्याचा प्रयत्न केला, असे म्हणता येत नाही. त्यांच्या काळात आर्थिक प्रश्न फारच अत्यल्प होते. तत्त्वज्ञान म्हणजे जीव, जगत् व जगदीश्वर यांचा संबंध सांगणे व शोधणे होय, पण जैन-बौद्धानी जीवाची व जगताचा विचार वाढविला पण जगदीश्वर नाशाबित केला. ही क्रांति होती. प्राणीमात्रांची जीवविषयक समता सांगितली, म्हणजे अहिंसा हा तत्त्वज्ञानाचा पाया केला.

जैनात श्वेतांबर व पितांबर असे दोन पंथ झाले, बौद्धात हीनयान व महायान असे दोन पंथ झाले. तरी दोघांनीही महावीर व बुद्ध यांना अनुक्रमे पुढे प्रमाण मानले. हिंदू धर्म ह्याआर्थी एकेश्वरी (एक संस्थापकीय) नसल्यामुळे जरी त्याचे तत्त्वज्ञान वृद्धी पावले तरी समाज व त्याचा धर्म ह्या दृष्टीने तो विघटित, विभिन्न व विभाजित राहिला. बौद्ध धर्म सर्व जगात पसरला ही प्रसरण शक्ती हिंदू धर्मात पूर्वीही म्हणजे बुद्धपूर्व व बुद्धोत्तर काळातही दृष्टीस पडली नाही. खुद्द लोकमान्य टिळकांनी त्यांचा आवडता ब्राह्मण धर्म (वैदिक धर्म) गौतमाने सुधारून जगभर पसरविला, ह्याबद्दल बुद्धाचा टिळकांनी गौरवही खुल्या मनाने केलेला आढळतो. ह्याप्रमाणे कोणाही तत्त्वज्ञान चिंतकाला बुद्धाकडे पाठ करिता येत नाही. मग तो तत्त्वचिंतक बुद्धाचा पक्षपाती असो वा विरोधी असो! बुद्ध व

त्याचा धर्म या विषयावर तटस्थ संशोधक डॉ. रा. गो. भांडारकर हे महाराष्ट्रात महत्त्वाचे पंडित ठरतात. परंतु डॉ. भांडारकर एकेश्वरी भक्त झाले.

**विवाद-पराङ्मुखता**

बुद्ध प्रत्यक्ष व समक्ष ज्ञानाला वरिष्ठत्व देई व जे बुद्धिगम्य व बुद्धीच्या पलिकडचे असते, ते नाकारीत असे. बुद्धी म्हणजे मानवी बुद्धी होय. बुद्धाला खालील प्रश्न विचारले जात. (१) आत्मा व शरीर एकच का दोन-भिन्न. (२) आत्मा अमर आहे काय? संसार सान्त का अनंत? नित्य का अनित्य? असले प्रश्न विचारले जात असताना तो मौन धारण करी व ह्यासारख्या अतर्क्य, अनाकलनीय प्रश्नांना तो उत्तर देतच नसे. पूर्वीच्या दर्शनांनी वरील अनाकलनीय व बुद्धाच्या व मानवी ज्ञानाच्या कक्षेबाहेरचे विषय व प्रश्न चर्चिण्यात वेळ दवडिला; व त्यांना शेवटी निश्चित उत्तर मिळाले नाही, म्हणूनही परस्पर विरोधात त्यांनी वेळ घालविला. दुःखाकडून सुखाकडे कसे जावयाचे, ह्याचा मार्ग फक्त दाखविणे, हे बुद्धाचे वरिष्ठ कार्य व हेतू होता. दुःखाची कारणे शरीरातच असताना बाहेरच्या अगम्य बाबीविषयी काथ्याकूट करणे मूर्खपणाचे आहे, हे त्याचे धोरण होते. आपल्याला देखील ज्या प्रश्नांचे उत्तर देता येणे अशक्य आहे व ज्यावर एकापेक्षा अनेक मते पडतात, त्यावर मौन धरण्याचा सराव करिता येणे शक्य आहे. ह्यामुळे वितण्डवादविवाद नाहीसे करिता येतात. वादविवाद टाळता येतात. रोजचे जीवन सुकर होते. मैत्री व परस्पर सहकार्यात अडथळा येत नाही. मेल्यानंतर पुनः जन्म मिळतो काय? तथागताला खुद्द पुनर्जन्म आहे किंवा नाही? वगैरेसारख्या मतभेद होणाऱ्या प्रश्नाला 'अव्याकतानि' म्हणतात. फक्त दुःख नाहीशी करू शकणारी जी आर्य चार सत्ये सांगितली आहेत, त्यांच्याशीच त्याच्या विचारांचा व उपदेशाचा जास्तीतजास्त संबध तो कटाक्षाने राखे. दुःखाची कारणे नाहीशी केल्यावर, आपोआपच सुख प्राप्त होते. सुखाचे तो अस्तित्वच मानित नव्हता, असे मुळीच नव्हे. सुखावस्था प्राप्त होण्यासाठीच दुःखाची कारणे त्यांनी सांगितली व ती दूर केल्यावर दुःख राहातच नाही. चार्वाक सोडून बाकीची दर्शने बुद्धाच्या चार आर्य सत्यावर विवेक करिताना आढळतात. बुद्धाला कोणीच चार्वाक समजत नाही. दुःख-निरोधालाच निर्वाण बुद्ध समजतो. पारलौकिक मोक्ष व मरणोत्तर काल्पनिक स्वर्गीय मोक्ष ह्यापेक्षा 'निर्वाणावस्था' संपूर्ण ऐहिक व इहवादी-ह्या लोकातीलच आहे. ही क्रांती होय. अष्टांगमार्ग म्हणजेच बुद्धाचा प्रतित्यसमत्पादवाद होय. बुद्धाच्या उपदेशाचा व धम्माचा हा सारांश होय. ह्या जगात माणूस दुःखनिवृत्त कसा होईल, हा बुद्धापुढे ऐहिक-इहवादी-व प्रत्यक्ष प्रश्न होता. ह्या जगापासून-समाजापासून-लोकापासून निवृत्त होण्याचा बुद्धाचा मार्ग नव्हता. त्याला निष्कारण निवृत्तीवादी म्हटले जाते. जगाचा प्रत्यक्ष उद्धार व्हावा, माणूस हा उन्नत होऊन त्याच्यातील संभाव्य पाशवी गुण नाहीसे व्हावेत, ही तर जगत्गुरु बुद्धाची शिकवणूक होती व आहे. स्वतः गौतम ज्ञानी झाल्यावर व बुद्ध झाल्यावर आळशी-निष्क्रीय-संन्यासी होऊन स्वस्थ राहिला असे नव्हे, जगाचा त्याला प्राप्त झालेल्या ज्ञानानुसार उद्धार करण्याचे कार्य त्याने आमरण चालविले. बुद्धाचा संदेश-दुःख विरोधाचा-वर्तनात आणणे अर्थात सोपे नाही. अवघड आहे. दर्शनादर्शनातील साम्य व भेद जाणणे, हे देखील येथे सोपे नाही. एक प्रयत्न आहे. उदा. बुद्धाने धर्म संस्थापना केली. चार्वाकदर्शन धर्म संस्थापना करू शकत नाही.

चार्वाक निर्वाण व मोक्ष मानित नाही, असे त्याच्या उपलब्ध शिकवणुकीवरून समजते. मृत्यूलाच चार्वाक मोक्ष समजतो. बुद्ध देहामध्ये निर्वाणपद प्राप्ती करून घेणे शक्य मानितो. दोघेही वैदिक क्रियाकर्म मानित नाहीत. अष्टांगमार्ग व आर्य सत्ये यांच्याद्वारे दुःख निवारण केले असता निर्वाणपद म्हणजे सुख-समाधान शांती मिळू

शकते, असे बुद्ध सांगतो. भारतीय सर्व दर्शनांचा तौलनिक अभ्यास केल्यामुळे बौद्ध धर्माचे ज्ञान वाढू शकते. (सहा) षड्दर्शनाच्या द्वारे विविध तत्त्वज्ञानाचे ज्ञान होऊ शकते. बुद्ध दर्शन व वाङ्मय विपुल व जगातील अनेक भाषांमधून आहे. टीकाकारांची देखील अनेक मते आहेत. बुद्ध झाला नसता तर आद्य शंकराचार्यांचेही प्रयोजन नसते. बुद्धाचे दर्शन हे सम्यक दर्शन आहे. ह्याला लोकायत दर्शन म्हणतात. हे नैराश्यवादी आहे, असे म्हटले जाते, ते खरे नाही. बुद्ध दर्शनाने एक नैतिक व्यवस्था प्रस्थापित केली. जे बुद्धाला मानतात, शरण जातात त्यांनी स्वीकृत सिद्धांतावर नेहमी चिंतन केले पाहिजे. आत्मसंयमाने अनिष्ट वासनांना विरोध केला पाहिजे. योग दर्शनामध्ये यम व नियम सांगितले आहेत. (१) हिंसा करू नये. (२) खोटे बोलू नये. (३) चोरी करू नये. (४) काम वासनेच्या आधीन जाऊ नये. (५) लोभ धरू नये. हे पाच यम आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य-अपरिग्रह हे सर्व यम-नियम बुद्ध दर्शनामध्ये देखील मुख्य आहेत. मनुष्य हा सदाचारी कसा होईल? याचा मार्ग दाखविला आहे. समाजातील माणसे ही चांगली माणसे करण्याच्या कार्यात धर्मच उपयोगी पडतो. सरकाराला हे अशक्य असते. मैत्री, करुणा व मुदिता (प्रसन्नता) बुद्धाने महत्त्वाची गणली आहे. निर्वाण साधनामुळे दुःखविनाश होतो तशी शांती व आनंद आणि समाधानही प्राप्त होते. मनुष्यजन्म दुर्लभ संपत्ती आहे. त्याच्या मते दुःखाचा विनाश म्हणजे सुखांचा निरतिशय लाभ होय. शरीर व आयुष्य तो महत्त्वाचे मानितो.

### ‘किच्छो मनुस्स पटिलाभो’ बुद्ध

‘दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभंगुरः॥’ भागवत धर्मदेखील बुद्धाप्रमाणेच मनुष्यजन्माची अशी योग्यता सांगतो, क्षणिकत्व सांगण्याचा उद्देश मनुष्याला त्याचे अनित्यत्व समजावे व संसार पार्थिव सृष्टी शाश्वत नाही हे उमजावे. मनुष्याला जागे करण्याचा हा मार्ग आहे. मनुष्य मृत्यूला विसरून जगात वागतो! व संसार प्रपंच नित्य समजतो! मनुष्याला नीतिधम्म प्रवृत्त करणे, हे दीर्घायुषी बुद्धाचे ध्येय होते. बुद्धाचा व महावीराचा काळ जवळजवळ सारखाच होता. भारतीय दर्शनातून नैतिक अशा वरील पाच नियमासंबंधी परस्परात एकवाक्यता आहे व ज्यात एकवाक्यता आहे, तो सर्व भारतीय धर्मेतिहासाचा केंद्रीय गाभा ठरतो. जगभर ह्या नैतिक धर्माला कोणत्याच दर्शनांचा विरोध नाही. सृष्ट पदार्थ विनाशी आहेत, म्हणजे परिवर्तनशील आहेत. हा ‘अनित्यवाद’ सर्व दर्शनात आढळतो. ‘बी’ जमिनीत पेरले की त्याचे झाड होते, पण बी नाहीशी होते, पुनः झाडातून फळांच्याद्वारे बिया तयार होतात. पुनः झाडे निर्माण होतात. वर्तमानावर भविष्यकाळ आधारला जातो. पुनः भविष्यकाळ वर्तमान होतो. ह्या प्रकारे जन्म, मृत्यू व पुनर्जन्म याचा परिवर्तनशील प्रवाह चालू राहातो.

बुद्धाच्या उपदेशातून पुढे त्याच्या विचारप्रवाहात चार संप्रदाय म्हणजे विशेष मते निघाली. (१) शून्यवाद, (२) विज्ञानवाद (याला योगाचार देखील म्हणतात) (३) सौत्रांतिक मत, (४) वैभाषिक मत, ही मते व संप्रदाय निघाले म्हणजे बुद्धाच्या मतावर पुढे स्वतंत्र जास्ती विचार काळानुसार विकास झाला. ह्यामुळेही बुद्ध वाङ्मय समृद्ध झाले. दुसऱ्याही भारतीय दर्शनातून अनेक संप्रदाय निघाले. फक्त बौद्ध धर्मातच हीनयान व महायान असे दोन प्रवाह झाले, एवढेच नव्हे तर तर वेद-वेदान्तातही अनेक मते व मतभेद शंकराचार्यांच्या नंतरही झाले. हिंदू धर्म सुधारण्यासाठी एकेश्वरवादावर अधिष्ठित असे ब्राह्मो समाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज अलिकडच्या काळात इंग्रजी राज्य असताना निघाले. ह्यात पुष्कळ साम्ये आहेत, तरी तफावती देखील आहेत. तत्त्वज्ञाने विकासक्षम असतात. ती मुळात उपलब्ध होती. उत्तर हिंदुस्थानात आर्यसमाज आजही कार्यकारी दिसतो. तरी त्यामध्ये शाकाहारी व मांसाहारी असे भेद आहेत. खुद्द दिल्लीत दोनशेच्यावर ‘आर्यसमाज’ आहेत. धर्म

अनुक्रमणिका

तत्त्वज्ञानाच्या वाढत्या विचारानंतर मतभेद होऊन फुटला नाही, असा एकही धर्म नाही, एकही दर्शन नाही की, ज्यावर मतभेद होत नाही किंवा होणार नाही. मीमांसा दर्शनातही पूर्व मीमांसा व उत्तर मीमांसा असे प्रकार झाले. मीमांसा शास्त्रांनी वेदांचे पुढे स्वतःचे प्रामाण्य वाढविले व ईश्वरापेक्षा वेदांना थोर ठरविले. यामुळे कर्मकाण्ड मजबूत झाले. कर्मकाण्ड मजबूत व लोकप्रिय झाल्याने पुरोहित वर्ग तयार झाला, टिकला व वाढला!

**नास्तिकौ वेदनिंदकः**

चार्वाक-बौद्ध-जैन वेदनिंदक म्हटले जातात. पण त्यांच्यातही साम्यापेक्षा भेदांचे आधिक्य झाल्याने ते वेगवेगळे झाले. न्याय व वैशेषिक दर्शनांनी विज्ञानाचा विचार केला होता. तथापि ईश्वर व मोक्ष यांच्यासंबंधी त्यांच्यात साम्य आहे आणि ही दर्शने वेदानुकूल असल्यामुळे बौद्ध दर्शनापासून अर्थात संपूर्ण विभक्त ठरली गेली. योग दर्शनाच्या पहिल्या काळात ईश्वरविषयक कल्पना नव्हती. निरीश्वरवाद असा प्राचीनही आहे. बुद्ध-दर्शन जसे स्वतंत्र आहे, तसे ते सर्व दर्शनांतर्गतही आहे. भारतीय दर्शनांच्या प्राचीन काळात त्यांचे स्वरूप जडवादी व विज्ञानवादी होते. पण पुढे विज्ञानवाद मागे पडला, अध्यात्मवाद वाढला.

**आद्य शंकराचार्यांचा निरीश्वरवाद**

शून्याला अस्तित्व आहे. बुद्धाचा शून्यवाद म्हणजे (Nothingness) नव्हे. शंकराचार्यांच्या परिभाषेत 'शून्य' हे ब्रह्माकार आहे. ब्रह्म निर्विकार, निराकार व निर्गुण आहे. शंकराचार्यांच्या निर्गुणवादात व बुद्धाच्या शून्यवादातील साम्य पुष्कळांनी सांगितले आहे. नेति-नेति! म्हणून शंकराचार्य ज्याला म्हणतात, त्यासंबंधी कोणतेच उत्तर बुद्ध देत नाही व तटस्थपणे मौन राखतो. फरक एवढा आहे की, बुद्ध अनात्मवादी व विज्ञानवादी आहे. गणितशास्त्रात शून्याचे मूल्य व कार्य सांगितले आहे. शून्य म्हणजे 'असत्य' नव्हे. वेदांतात ब्रह्मालाच आत्मा म्हटले आहे, म्हणून ह्याअर्थी बुद्ध ब्रह्म मानित नाही. शून्य म्हणजे 'माया' नव्हे. दुसऱ्या अर्थाने शंकराचार्य ब्रह्माला सगुण (ईश्वर) मानतात व ब्रह्म व परब्रह्म असा फरक सांगतात व ऐक्यही सांगतात. असा समन्वय बुद्धात नाही. पूर्णेश्वरवाद- (Theism) थीईझम् विषयी पश्चिमेत जेम्स मॉर्टिनो व आपल्याकडे राममोहन यांनी आद्य शंकराचार्यांचा मायावाद अमान्य करून, सगुण व उपासनीय निराकार परब्रह्म ईश्वराचा पुरस्कार केला आहे. पण बुद्ध व आंबेडकर ह्या दृष्टीनेही ब्रह्मवादी नाहीत. शंकराचार्य बुद्धाला समीप होतात त्यापेक्षा तितकेच जास्ती दूर जातात. 'प्रच्छन्न-बुद्ध' म्हणजे पूर्णतः बुद्ध नव्हे!

शंकराचार्य व बुद्ध दोघेही संन्यास आश्रमाला महत्त्व देतात. 'आत्म दिपो भव।' हा बुद्धाचा संदेश होता. स्वावलंबनाने ज्याने त्याने आपला उद्धार करून घ्यावा. महायान पंथाने उदारपणे लोकांच्या कक्षात येणारा धर्म स्वीकारला; व जपान, कोरीया, चीन वगैरे देशात सार्वजनिक लोककल्याणार्थ बुद्ध धर्माचा प्रसार केला. तेथील स्थानिक धर्म आपल्या पोटात पचविले.बुद्धाच्या वेळी त्याच्या संदेशानंतर जी धर्माची लहान नदी होती तिला अनेक प्रवाह येऊन मिळाले, व गढुळताही येत गेली. तरी 'बोधीसत्व' हाच आदर्श राहिला. निर्वाणप्राप्ती संसारात राहूनही होऊ शकते. हा विचार नागार्जून काळात पत्करला. शंकराचार्यांनंतर भागत धर्मानेही संन्यास मार्ग असाच अनावश्यक ठरविला. सर्व मनुष्ये 'एकात्माच' आहेत, असे महायान पंथ सांगू लागला. 'नागार्जून'

अनुक्रमणिका

नामक ब्राह्मण पंडित महायान पंथाचा मुख्य प्रवर्तक समजला जातो॥ न संसारस्य निर्वाणात् किञ्यदस्ति विशेषणम्॥ ही नागार्जुनाची उक्ती आहे. बुद्धाला 'पारमार्थिक सत्य' मानून त्याला पुढे अवतार समजण्यात आले व बुद्धाला महायानानी 'अभिताभ बुद्ध' म्हणून संबोधण्यात आले, बुद्धही उपास्य झाला. मात्र ह्या उपासनेचा अर्थ त्याच्या ठायी जे गुण, दया, करुणा, लोकसेवा वगैरे गुण होते, त्यांची उपासना करणे, असा मूलभूत अर्थ आहे. महायान पंथ बुद्धाची गुणोपासना प्रधान मानतो. बुद्ध आदर्श झाला. सर्वसामान्यांना धर्म हवा असतो. पारमार्थिक बुद्धाची सत्ये सर्वसाधारण लोकांना झेपली नाहीत. ह्याचा फायदा बुद्ध विरोधकांनी घेतला. बाहेरचे मुस्लिम आक्रमण बुद्धानुयायाना फार भारी पडले. शिवाय कोणतीही भिक्षुकशाही पतित झाली म्हणजे कुंपणही शेत खाते. प्रच्छन्न शंकराचार्यांनी बुद्ध धर्म सदृष्य (तत्सम) वेदांताची मांडणी करून नंतर मूळचे वैदिक मत पुनरुज्जीवित केले. ही एक युक्ती होती. महायान पंथ व षड् (६) दर्शने आद्य शंकराचार्यांच्या पूर्वीची होती. फार काय नागार्जुनानंतर शंकराचार्य झाले.

**उपसंहार**

महायान (मोठी गाडी) पंथ निघाल्यावर मूळ बुद्ध धर्माला हीनयान (छोटी गाडी-वहान) अशा संज्ञा प्राप्त झाल्या. बुद्धाच्या उपदेशात क्षणिकवाद व शून्यवाद होता. त्याचे तत्त्वज्ञान पुढे एकपरी विकसितही झाले व कमी अधिक प्रमाणात त्याच्या मागे महायान पंथ त्याच्यापासून दूर गेला. निवृत्ती व वैराग्य ह्या प्रवृत्तींना बहुतेक धर्मशास्त्रांनी जास्ती महत्त्व व मान दिला होता. जैना ऐवढी आत्मपीडा बुद्धाने सांगितली नाही. तंत्र, हठ, वगैरे जी साधने होती, त्यांचा पुरस्कार त्याने पुनः केला नाही. वास्तविक बुद्धाचे चरित्र, चारित्र्य व कार्य व कीर्ती ह्यावरूनही परिणामतः त्याचे दर्शन होते. केवळ जगभर असणाऱ्या व उत्खननात सापडणाऱ्या पुतळ्यावरूनच त्याचे दर्शन होते, असे नव्हे. सर्व सामान्यांना निर्गुणत्व (शून्यत्व) झेपत नाही, म्हणून प्रतिमा अस्तित्वात येतात. आद्य शंकराचार्यांनी देखील परा-पूजा व अपरा पूजा असे दोन प्रकार सांगितले आहेत. बुद्ध उपासनेसाठी शिष्य जमा करी, म्हणजे एकमेकाशेजारी आसन घालून विचारविनिमय करी, असा अर्थ व त्याचा प्रघात होता. बुद्धाच्या मूर्ती झाल्यामुळे हिंदू धर्मात मूर्तीपूजा आली व वाढली, असे कित्येक विद्वान लिहितात पण मूर्तीपूजा आदिवासी, व पुढील वैदिक आर्यात व द्राविडातही होती. वेदापेक्षाही ती जुनी असावी. येशू व महमदी धर्मात ह्या नाही त्या प्रकारची प्रतीकपूजा आहेच. न लोकः पारमार्थिकः। तत्त्वज्ञानी धर्म संस्थापक व सर्वसामान्य पुढील अनुयायी ह्यामध्ये प्रत्येक धर्मांत तफावत पडते. बुद्ध व बाबासाहेब याना मूर्तीची व स्वतःची पूजा आवडत नव्हती; नागपूर येथे सामुदायिक धर्मांतर करताना त्यांनी जे बावीस नियम जाहीर केले, त्यावरून हे उघड आहे. पुढेही बुद्ध धर्मातील 'उत्कृष्ट दिव्य व भव्य' तेवढेच त्यांनी जगापुढे ठेविले. व बुद्धाचे 'सम्यक दर्शन' पुनः सर्वांना उपलब्ध केले.

सम्यक् दर्शनसम्पन्नः कर्ममिर्न निबद्धयते।
दर्शनेन विहीनस्तु संसारं प्रतिपद्यते॥
-मनुसंहिता ६/७४

**अनुक्रमणिका**

'दर्शन'—ज्ञान ज्याला म्हणता येते असे भारतीय सहा दर्शनात बुद्ध दर्शन महत्त्वाचे आहे. कारण बाकीच्या पांच दर्शनापेक्षा बुद्ध दर्शनाला जगात पुढे असंख्य अनुयायी मिळाले व आहेत. खुद्द वेदाला (चारी) सम्यक् दर्शनात स्थान नाही. कारण वेदांताला (उपनिषदांना) दर्शन म्हटले गेले. वेद आणि वेदांत ह्यात अंतर खूप आहे!

#### Six Systems of Philosophy

सहा दर्शनांना 'षड्दर्शने' असे म्हणतात. यांचे ज्ञान म्हणजे भारतीय दर्शनातील तत्त्वज्ञानाचे ज्ञान होय. मॅक्समुल्लरच्या ग्रंथात त्याने म्हटले आहे की, दर्शने भिन्नभिन्न असली तरी एखादा दुसरा महत्त्वाचा विचार दुसऱ्याही दर्शनातून आढळतो. सहा दर्शने परस्परावलंबी देखील आहेत; वेगवेगळी बाजू मांडतात. या दृष्टीने बुद्धाचे विचार इतरही दर्शनात आढळतात. असा समन्वय सांगता येतो. शंकराचार्यांच्या मायावादाचे अलिकडे नवे समर्थन करण्यात येते. उदा. ब्रह्म जितके पूर्ण व शाश्वत सत्य आहे, त्याशी तुलना करताना 'माया' ही शाश्वत नाही; तुलनेने अशाश्वत आहे. बुद्ध अदृश्य सत्ता मानित नाही. ब्रह्म मानित नाही. स्वभाव (गुण) हे कारण मानतो. कारणात् कार्यभावः। स्वभावानुसार सृष्टीचक्र फिरते. जडाला-विज्ञानाला देखील स्वभाव असतो. स्वभाव हे कारण व कार्य आहे. एवढा सर्व विचार केल्यावर बाबासाहेबांच्या धर्मांतराला धर्मांतर कसे म्हणावे? हा प्रश्न पडतो. धर्म प्रवेश, धर्मग्रहण, धर्मस्वीकार व अधर्माचा त्याग असेच म्हणावे लागते. बुद्धापासून बुद्धाचे धर्मप्रशासन चालू झाले. ज्यांना प्रत्यक्ष व्यावहारिकपणे बुद्ध व्हावयाचे नव्हते, त्यानाही बुद्ध व्हावे लागले. म्हणजे पुढे कोणालाच बुद्ध वगळता येत नाही. आद्य शंकराचार्यांनाही भारताला व वैदिक धर्माला बुद्ध धर्माच्या मागील काळात (पशुयज्ञ काळात) मागे लोटता आले नाही व बुद्धाएवढीही समता-समानता व परमार्थी (धर्ममार्गांत) समता प्रत्यक्ष स्थापन करिता आली नाही; उलटी विषमता वाढू लागली. आद्य शंकराचार्य धर्मक्रांतीकारक नव्हते. बुद्धामध्ये अर्वाचीन साम्यवादी मार्क्स याचा विचार मिळतो तितका शंकराचार्यांत मिळत नाही. बुद्धामध्ये मार्क्स पाहिला पाहिजे. मार्क्समध्ये बुद्ध पाहून चालणार नाही. शंकराचार्य सर्वच जडवाद हा मिथ्यावाद म्हणतात; व विज्ञानाला अविद्या मानतात. बुद्ध विज्ञान मानतो व अनाकलनीय अतर्क्य अशा ब्रह्माची सत्ता मानित नाही. बुद्ध ब्रह्मवादी नव्हे. बुद्धाची विचारधारा व प्रवाह अलग-वेगळा होता म्हणून तो बुद्धानंतर महायानाच्याहीद्वारे वाहात राहिला नाही.

#### नागार्जून व शंकराचार्य

नागार्जूनाचे माध्यमिक-मत व शंकराचार्य वेदांत यामध्ये जास्ती साम्य दाखविले जाते. नागार्जून व बुद्ध पारमार्थिक सत्याचे म्हणजे शून्याचे नकारात्मक वर्णन करितात. शंकराचार्य देखील ब्रह्माचे वर्णन नकारात्मकपणे शून्य वर्णनासारखेच करितात. बुद्धाला तथागतत्व (निर्वाण) प्राप्त झाल्यानंतर त्याची गती कशी झाली, असे विचारल्यावर त्याने मौनच पाळले. नागार्जून व शंकराचार्य यांच्यात अधिक साम्य वाटते. तरी नागार्जूनाने, बुद्धतत्त्वाशी तत्त्वनिष्ठ राहून धर्मपरिवर्तन केले. बुद्धाचे प्रशासन (सत्ता) मानले. वैदिकांची किंवा त्यांच्या मायावादी अद्वैती ब्रह्माची अंतिम सत्ता मानिली नाही. राम, कृष्ण, शंकर वगैरेना ज्याअर्थी शंकराचार्य देखील ईश्वर (सगुण) मानतात; त्याअर्थी महायानी नागार्जून माध्यमिक-मतवादी मुळीच मानित नाहीत. साम्ये दिसली तरी तत्त्वभूत फरक राहिलाच, व जर तत्त्वात्मक सर्वच साम्य असते, तर महायान पंथ शंकराचार्यांच्या धर्मात विलीन झाला असता. नागार्जूनाचे ध्येय विलिनीकरणाचे नव्हते; समन्वयाचे देखील नव्हते. दोन्ही टोके

सोडून माध्यमिक मत-दृष्टी सर्वसाधारण सर्व देशातील लोकांसाठी नागार्जूनाने प्रस्थापित केली. नागार्जून बुद्धाचा उत्तराधिकारी जसा ठरतो, तसे शंकराचार्य मुळीच ठरत नाहीत. नागार्जूनाचा काळ आद्य शंकराचार्यांच्या पूर्वीचा. मागील तत्त्वज्ञानाचा परिणाम पुढील तत्त्ववेत्त्यावर होऊ शकतो.

**बाबासाहेबांचे धर्मांतर म्हणजे काय?**

श्रुती-स्मृती-पुराणोक्त असा वैदिक-हिंदू धर्म तयार झाला. ही परंपरा वेदानुकूल ठरते. ही परंपरा टाकून, श्रुती-स्मृती-पुराणोक्त यांचे प्रामाण्य सोडून, वेद प्रतिकूल व स्वतंत्र जो बुद्ध धर्म तो बाबासाहेबांनी स्वीकारला, त्याअर्थी बाबासाहेबांचे धर्मांतर सार्थ आहे व त्याचा अर्थ जाणला पाहिजे. जे नव्याने बुद्ध झाले, त्यांनी तर अधिकाधिक जाणला पाहिजे. कारण पूर्वरूढी व लोकाचार सोडले तरी ते सार्वजनिकपणे लोकमान्य असल्यामुळे घरीदारी पुन्हा सर्वशक्तिमान होतात. धर्मचक्र फिरते ठेवावे लागते. डॉ. आंबेडकरांपूर्वी महर्षी शिंदे यानी एकाअर्थी हे चक्र फिरते ठेविले होते.

ज्यांना प्रत्यक्ष बुद्धधर्मियात दाखल व्हावयाचे नाही, पण बुद्ध धर्म तत्त्वतः पटतो-आवडतो, त्यांनी बुद्धाच्या नैतिक संदेशाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करणे ही देखील इष्ट प्रवृत्ती स्वागतार्ह व हितावह सर्वांच्याच आहे. स्पृश्यात व पूर्वास्पृश्यात बुद्धप्रेम वाढल्यास अस्पृश्यता नष्ट होण्याचा दरवाजा खुला होऊ शकेल. दुरावा वाढणार नाही. दलितांमधील ज्या समाजांनी दलित असूनही बुद्ध धर्म स्वीकारला नाही त्यांनीही बुद्ध व त्यांचे दर्शन आत्मसात करावे. जे. म. फुल्यांना मानतात त्यांनीही सत्यशोधक विचाराना बुद्धाचा विचार जोडावा.

**नागार्जून व बुद्ध**

वरील उद्देशाने प्रस्तुत अवघड विषय येथे हाताळला आहे व पुढील शेवट करीत आहे. नागार्जूनाच्या वेळी गृहस्थाश्रमामध्ये राहूनही बुद्ध धर्मसाधना करता येते, असा विचार पुढे त्यांच्याही तर्फे पुढे आला. भागवत धर्माने देखील गृहस्थाश्रमाचे महत्त्व ह्यापुढे उत्तरोत्तर मानले. (१) संवृत्ति सत्य (Empirical) (२) पारमार्थिक सत्य अशी दोन सत्ये (प्रकार) नागार्जुनाने बुद्धाच्या दृष्टीशी निर्भर राहून सांगितली. दोन्ही प्रकारे निर्वाण प्राप्ती होऊ शकते, असा दिलासा त्याने दिला व निर्वाणदेखील अवर्णनीय त्याने ठरविले. ज्याने निर्वाणपद मिळविले तोही तथागत अवर्णनीय मानला. निर्वाण म्हणजे 'अनुभूति' असाही अर्थ नागार्जुनाने जोडला. नागार्जुन वस्तु-जगत् असत्य मानतो. नागार्जुनाचे विचार व आद्य शंकराचार्य यांची वेदातसंबंधी मते एक आहेत असेही कित्येकांनी त्यांचे मत मांडले आहे. ह्यावरून पुढे झालेले आद्य शंकराचार्य प्रच्छन्न नागार्जुनदेखील ठरतात.

> *द्वे सत्ये समुपाश्रित्य बुद्धानां धर्मदेशना।*
> *लोकसंवृत्ति-सत्यं च, सत्यंच परमार्थतः॥*
> *येऽन योर्न विजानन्ति मेदं परम-तात्त्विकम्।*
> *ते कदाऽपिं न जानन्ति गंभीरं बुद्धशासनम्॥*
> -माध्यमिक शास्त्र, अध्याय २४, कारिका ८-६

अनुक्रमणिका

बुद्धाचे दर्शन समजण्यासाठी नागार्जुनाचाही अभ्यास जरूर लागतो. ‘अस्मितादर्श’ (दिपावली अंक १९७९) मध्ये ‘बुद्ध व शंकराचार्य’ ह्यावर अभ्यास मांडला होता, त्याच्याही पुढचे चिंतन ह्या लेखात नम्रपणे वाचकांना सादर केले.

**अनुक्रमणिका**

१८.

## दलित चळवळ : काल, आज आणि उद्या

गौतमाला अस्पृश्यता-निवारणाचा सक्रिय प्रवर्तक मानतात, तरी अस्पृश्यता ही धार्मिक-सामाजिक रूढी कायम राहिलीच व नंतर वाढली देखील. मुसलमान आल्यावर धर्मांतर केल्यामुळे अस्पृश्यता जाऊ शकते व गावातील स्पृश्यांमध्येदेखील व्यवसाय-धंदा करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकते, अशा तऱ्हेचा अनुभव आल्यामुळे पुष्कळ दलितानी व निराश्रितानी मुस्लिम धर्म स्वीकारला. कोणत्याच प्रकारची धर्मांतरे आजवर झाली नसती तर दलितांची भारतात फार मोठी संख्या आजही असती! हिंदूमुस्लिम प्रश्नापेक्षा दलितांचा प्रश्न तत्पूर्वीपासून चालत आला आहे. जुनाट, जटिल व चिवट अशी ही समस्या आहे.

साधुसंतांनी सर्वसामान्य प्राकृत जनांची परमार्थाची भूक भागविली. साधुसंत व स्त्रियांमधील संत यांची नावे दलितांमधील मुलामुलींना ठेवली जात होती व अद्यापही साधुसंतांचा प्रभाव भारतभर दिसतो. आध्यात्मिक समतेचे फार मोठे झालेले हे प्रयत्न नसते, तर अस्पृश्यतेचे दुष्परिणाम फार तीव्र स्वरूपात झाले असते. डॉ. आंबेडकर यांनी संत कबीराला एक गुरू मानले, यामध्येही व्यापक अर्थ सापडतो.

धर्मप्रसाराच्या हेतूने पहिल्या मिशनऱ्यानी अस्पृश्य मानलेल्या लोकांच्याकडे प्रथम लक्ष दिले. दलितांमधील पहिले कार्यकर्तेदेखील मिशनऱ्यांच्या शाळेतून बहुतेकपणे शिकले. फार काय, जोतिबा फुले व त्यांच्या कित्येक मित्रांचे शिक्षण मिशनऱ्यांच्या शाळेतच झाले; असे दिसून येते. पण जोतिबा फुले यांनी स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या पहिल्या शाळा पुढे स्वावलंबनाने काढल्या. पुण्यातील पहिल्या पिढीतील सुशिक्षितांनी व सुधारकांनी त्यांना अधिकाधिक साह्य केले. ही बाब नंतरची. मिशनरी व ख्रिस्त्यांनी केलेल्या मराठी वाङ्मयसेवेचे मूल्यमापन करण्यात आले आहे. पण त्यांनी, धर्मप्रसाराच्या हेतूने का होईना, मागास व अतिमागास लोकांमध्ये केलेल्या शिक्षणप्रसाराचे पहिले महत्त्वदेखील नगण्य नाही. त्याचप्रमाणे प्रत्यक्षाप्रत्यक्ष त्यांनी समाजसुधारणेलादेखील मदत केली होती. आपल्याकडे बाबा पद्मनजी व इतर काही व्यक्ती तसेच ज्ञानोदयाचे संपादक यांनी सामाजिक सुधारणांच्या बाजूने लिहिलेले ज्ञानोदयाच्या मागील अंकांतून आढळते. रेव्ह. परे मिचेल, मिसेस मिचेल व फारा मडम वगैरे तत्कालीन मिशनऱ्यांचे शिक्षणकार्य स्फूर्तिप्रद ठरले. अर्थात ह्या सर्वांच्या धर्मप्रसाराच्या हेतूची तरफदारी करावयाची नाही. जोतिबा फुले यांनी नंतर लहुजी मांग व राणबाऊ मांग यांच्या साह्याने अतिशूद्रांना शिक्षण देणारी पहिली शाळा काढली. हे दोघे-तिथे पहिले दलिता कार्यकर्ते समजावे लागतात. महाराष्ट्रातील दलित चळवळीचा आधुनिक उगम हा मानावा लागतो; व हा काळ सन १८५२-१८५३ च्या सुमाराचा होता. अतिशूद्रांची दुःखे अडचणी व उणिवा जोतिबांच्या पुस्तकांतून पोटतिडकीने व्यक्त झाल्या व त्यांच्या शाळेतील दलित विद्यार्थी मुक्ताबाई हिचा उपलब्ध निबंधही दलित वाङ्मयाची सुरुवात जाणावी लागते. ह्या सर्व पहिल्या मराठीतील अस्पृश्यांच्या कैफियती होत.

पुढे सन १८६७ नंतर केशवचंद्र सेन यांचे मुंबई येथील व्याख्यान ऐकून न्या. मू. रानडे व त्यांचे मित्र यांनी अस्पृश्योद्धारक कार्याकडे विधायकपणे लक्ष दिले. लोकहितवादींचेही तिकडे लक्ष गेल्याचे उल्लेख मिळतात; पण प्रत्यक्ष कृतीच्या दृष्टीने हरिजन लोकांशी जोतिबांचा जवळचा संबंध आलेला दिसतो.

सन १८९२ च्या सुमारास ब्रिटिशांनी महार ह्या शूर समाजास सैन्यात प्रवेश देण्याचे बंद केले. (वास्तविक मराठ्याविरुद्ध लढाया देण्याच्या कामी ब्रिटिशाना महार सैनिकांनी मोलाची मदत केली होती.) तेव्हा सेवानिवृत्त सैनिक गोपाळराव वलंगकर हे महार समाजातील पहिले पुढारी झाले. वलंगकरांनी जोतिबा फुले यांच्यापासून स्फूर्ती घेतली होती. वलंगकरांनी विटाळविध्वंस नामक नियतकालिकही काढले होते. महारांना सैन्यात भरती करण्याचे नाकारल्यामुळे त्यांच्यात पहिली जागृती झाली.

दलितासाठी चळवळ करण्याची सुरुवात स्पृश्य सुधारकानी केली, पण ह्याच सुमारास दलितांमधील कित्येक स्वावलंबी कार्यकर्ते व पुढारी पुढे येऊ लागले; व दलितांचे स्वोद्धारार्थ स्वतंत्र व स्वावलंबी प्रयत्नही चालू झाले. नागपूर-विदर्भाकडील किसान फागू बंदसोडे ह्या दलित पुढाऱ्याने बरीच हालचाल व चळवळ केली. त्यांनी 'सन्मार्गबोधक निराश्रित समाज' सन १९०१ साली स्थापन केला. कै. ग. अ. गवई (उमरावती), श्रीपतराव थोरात, शिवराम जानबा कांबळे वगैरेंची नावेही नमूद करावी लागतात. डॉ. आंबेडकरपूर्व अस्पृश्य चळवळीला असे अस्तित्व होते. सत्यशोधक प्रवाहातील 'दीनबंधू' व प्रार्थनासमाजाचे मुखपत्र 'सुबोधपत्रिका' यांसारख्या नियतकालिकांचा दलितांच्या चळवळीला पाठिंबा होता. अस्पृश्यतेचा प्रश्न अखिल भारतीय असल्याने प्रत्येक प्रांतातील दलितविषयक चळवळीला इतिहास आहे. पण महाराष्ट्राचा इतिहास आपणास जास्त जवळचा म्हणून ज्ञात आहे. प्रा. कै. बापूसाहेब माटे, बॅ. सावरकर, शाहूमहाराज, सयाजीराव गायकवाड, महर्षी शिंदे, भाऊराव पाटील वगैरे दलितोद्धारक महाराष्ट्रात झाले. बंगाल्यात ब्राह्मो समाजात शशिपाद बानर्जी व आर्य समाजापैकी स्वामी श्रद्धानंद, लाला लज्ञपतराय वगैरे झाले. सुशिक्षित स्पृश्य समाजाचा दृष्टिकोण बदलण्यात या सर्वांची कामगिरी निदानपक्षी कारणीभूत झाली, हे मान्य होण्यास प्रत्यवाय नसावा. डॉ. आंबेडकर यांचीही अपेक्षा सवर्णांची जुनी मनोवृत्ती पालटावी अशी होती. जन्मजात उच्च-नीचपणा जो समजला जात होता तो हल्ली शहरी विभागात तरी पुष्कळ प्रमाणात कमी झाला आहे. दलित चळवळीचा मागोवा घेताना (१) आंबेडकरपूर्व काळ, (१) आंबेडकर कालीन काळ, (३) आंबेडकर यांच्या नंतरचा काळ, असे कालखंड समजता येतात.

स्पृश्य समाजापैकी ग्रामीण विभागातील लोकांचे व्हावे इतके प्रत्यक्ष परिवर्तन झालेले नाही, असे स्वच्छ दिसते. दलितातील विचारवंतांनी सर्वसामान्य ग्रामीण दलित समाजाचा विचार केला, तर त्यांनाही रूढीचे प्राबल्य अधिकच ठरते, असा व्यावहारिक अनुभव आल्याशिवाय राहत नाही. सर्वसामान्यांचा कल परंपरेप्रमाणे व रूढीप्रमाणे चालण्याचा असतो. चांगल्या नव्या परंपरा निर्माण होण्याकडे फारच थोड्यांचा कल असतो. रूढीप्रमाणे म्हणजे गतानुगतिकपणे चालणे तुलनेने सोपे असते; विरोध सहन करूनही दलितांचे जीवन सुधारण्याचा प्रयत्न काही थोड्या समाजसुधारकांनी गेल्या शतकात केला. अस्पृश्यता निवारण-दलितांचा उद्धार-हा प्रश्न हाती घेतलेल्या आता शे-दीडशे वर्षांपर्यंत काळ लोटत आला आहे! ह्यापुढे कोणती दिशा असावी?

### परिवर्तनवाद विरुद्ध अपरिवर्तनवाद

समाजप्रबोधनाच्या गतइतिहासाचे परीक्षण केल्यास, त्या काळात जो झगडा होता तो परिवर्तनवादी विरुद्ध अपरिवर्तनवादी असा होता; व हा संघर्ष फक्त हिंदूमध्येच चालू होता. भारतामधील मुसलमान व ख्रिस्ती

अनुक्रमणिका

घटकांमध्ये परिवर्तनवादी चळवळींनी मूळ धरले नाही व अद्यापही फारसा मागमूस नाही! परिवर्तनवाद हा कोठेही धर्मसुधारणेसाठी हवा असतो. कारण परंपरावादी व रूढीवादी सांगत असत की, धर्म व धर्मग्रंथ अपरिवर्तनीय आहेत. ईश्वरकृत आहेत; म्हणून माणसाच्या बुद्धीने त्यात फरक संभवत नाही. ज्या अवतारी पुरुषांनी धर्म व धर्मग्रंथ केले ते अवतार साक्षात् ईश्वर-परमात्मा होते. म्हणून जाती, वर्ण, अस्पृश्यता वगैरे परंपरागत-धर्म व त्यानुसारची समाजरचना ईश्वरी आहे. नैसर्गिक आहे. परिवर्तनाला शास्त्राधार नाही, असा जास्तीत जास्त संख्येने असलेल्या सनातन्यांचा दृढ दावा होता. म्हणून त्या काळातील धर्मसुधारकांना व समाजसुधारकांना परिवर्तनाला अनुकूल असे शास्त्राधार व पूर्वसंस्कृत ग्रंथांतील वचने दाखवावी लागत. उदा. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी पुनर्विवाहांना अनुकूल वचने दाखविली. हा वाद सुधारक-पंडित व सनातनी-पंडित यांच्या दरम्यान चाले. आपल्या महाराष्ट्रात रानडे-भांडारकर वगैरेसारखे सुधारक पंडित समाजसुधारणांना शास्त्राधार दाखवित व नवधर्मपरिवर्तनवाद हा धर्मबाह्य नाही असे प्रतिपादीत. कोणताही (म्हणजे कुठल्याही धर्माचा) ग्रंथ साक्षात् ईश्वरप्रणित किंवा सर्वांशी प्रमाण नाही, हे देखील धर्मसुधारणावादाचे साहजिकच नवे सूत्र झाले. ह्यामुळे मर्यादित व पुरोगामी अर्थाने का होईना, आधुनिक बुद्धिवादाची वाट मोकळी झाली. हे एक यश होय; पण हिच्या आड निदान हिंदूंचा धर्म व धर्मशास्त्रे येत नाहीत. म्हणजे सनातन्यांची तक्रार नाही. इतर धर्मात एवढी मोठी नवधर्मजागृती झाली नाही म्हणून मुसलमान व ख्रिस्तीधर्म हे हिंदूधर्माप्रमाणे तितक्या मोठ्या प्रमाणात कुटुंबनियोजनाला पाठिंबा देताना दिसत नाहीत. धर्मपरिवर्तनाला यश यावयाचे राहिले आहे ते भारतीय ख्रिस्ती व भारतीय मुसलमान धर्मामध्येच होय. समाजप्रबोधन हिंदूपुरते जास्त मर्यादित राहिले; व हिंदूत पूर्वी जास्तीत जास्त सनातनी (अपरिवर्तनवादी) होते. ते म्हणत असत की, त्रयस्थ इंग्रजाने सामाजिक-धार्मिक सुधारणांबाबत कायदे करून आमच्या धर्मात हात घालू नये. आता तर इंग्रज गेला. म्हणून हा प्रश्न संपला! धर्मसुधारणेला शास्त्राधार आहे किंवा नाही, असा वाद उभय पक्षातील मंडळी खेळत असताना, ह्या वादात न पडता व ह्यात वेळ न दवडता, ज्या थोड्या समाजसुधारकांनी प्रत्यक्ष कृतीला हात घातला; त्यापैकी महर्षी अण्णासाहेब शिंदे महत्त्वाचे ठरतात. पांडित्य असूनही केवळ वादासाठी वाद करण्यात त्यांनी मुळीच भूषण मानिले नाही. त्यांच्या पूर्वीचे कृतिवंत सुधारक जोतिराव फुले ह्यांना पांडित्याचा तर लाभच नव्हता! फुले प्राकृत होते.

शिंदे यांनी त्यांच्या काळातील सामाजिक सुधारकांचा बुद्धिवादी पक्ष बडोदे येथील सन १९३५ सालातील साहित्य परिषदेच्या अधिवेशनातील भाषणात उल्लेखिला होता. 'तत्कालीन सुशिक्षित पांढरपेशांचे पुढारी मंडळींनी धर्माचा व श्रद्धेचा भाग वगळून शुद्ध सामाजिक चालीरीती सुधारण्याची वाङ्मयीन चळवळ चालविली' अशा फारच थोड्या बुद्धिवादी अज्ञेयवादी समाजसुधारकांना सामाजिक सुधारणांना धर्मवचनाचे आधार आहेत किंवा नाहीत ह्यासंबंधीची काळजी अर्थात नव्हती.

जोतिबा फुले यांचे प्रयत्न प्राकृत भाषेतून व व्यावहारिक भूमिकेवरून चालू झाले. शूद्रातिशूद्र अशा तळागाळातील जनतेला कोणत्या सुधारणा उत्कटतेने पाहिजेत; ह्यासंबंधीचा त्यांनी जास्त सक्रिय विचार केला. जोतिराव खुशालचेंडू थरातील नव्हते. त्यांनी धर्म व तत्त्वज्ञान ह्यापेक्षा सामाजिक, धार्मिक सुधारणांवर जास्त भर दिला. पुढे अतिशूद्रांसाठी खास विचार व कृती डॉ. आंबेडकर यांनी केली. आंबेडकर हे बौद्ध झाल्यामुळे नंतर फुल्यांप्रमाणे अज्ञेयवादी सुधारकांत मोडत नाहीत. तरी बहुतेक समाजसुधारक हे मूलभूतपणे धर्मसुधारक झाले. आगरकरांचा  अज्ञेयवादी सुधारकवर्ग अत्यल्प होता व अद्याप तो वाढत आहे असे म्हणता

अनुक्रमणिका

येत नाही.बुद्ध हा अज्ञेयवादी होता. तरी तो धर्मवादीच ठरतो. डॉ.आंबेडकरांनी जोतिबाना एक गुरू म्हणून म्हटले तरी आंबेडकरांची सर्वसुधारणा (दलितोद्वार) शेवटी बुद्धधर्माधिष्ठित झाली, म्हणून धर्मवादी झाली. होऊन गेलेल्या समाजप्रबोधकांमधील समाजसुधारणेकडे पाहण्याचे जे वेगवेगळे दृष्टिकोण झाले, त्यांचे स्वरूप वरीलप्रमाणे मांडता येते. महर्षी शिंदे हे राममोहन रानडे यांच्या ज्ञेयवादी धर्मसुधारक प्रवृत्तीचे व प्रवाहातील झाले. शिंदे तत्त्वतः आध्यात्मिक सुधारणावादी ठरतात. म. फुले जास्तीत जास्त 'सेक्युलर' ठरतात. कारण त्यांनी उपासनापंथ काढला नाही.

**अस्पृश्यता : एक सामाजिक सजीव व्यथा**

थोर थोर पुरुषांच्या चरित्रात व कार्यात देशाचा सामाजिक इतिहास सामावतो. फुले-शिंदे-आंबेडकर यांच्या जीवन-चरित्रात व विशेषतः विचारात दलित चळवळीचा व महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीचा इतिहास सामावला आहे. याला राजकीय व आर्थिक आशयदेखील होता व आहे. म्हणून सार्वजनिक परिणामाच्या दृष्टिकोणातून येथे जास्त विवेक करावयाचा आहे. महाराष्ट्र राजकीय दृष्ट्यादेखील कसा पालटला त्याचाही छडा लावावयाचा आहे. म्हणून चरित्रात्मक मामुली तपशीलापेक्षा तात्त्विक व सामाजिक मीमांसेला येथे प्राधान्य दिले आहे. जातीयतेचे-अस्पृश्यतेचे स्वरूप बदलत आले. त्याचप्रमाणे दलित प्रश्नदेखील परिवर्तनीय आहे. म्हणजे त्याचे स्वरूप पालटते. फुल्यांच्या काळात पेशवाईनंतर जे स्वरूप होते ते आज राहिले नाही. फुले-शिंदे-गांधी व डॉ. आंबेडकर असे टप्पे झाले.

शिंदे म्हणजे अस्पृश्यतानिवारण व अस्पृश्यतानिवारण म्हणजे शिंदे, असा अर्थ झाला होता. दलितांची संख्या नगण्य नाही; याची पहिली जाण शिंदे यांनी आपल्या देशाला दिली. जोतिबांचा पहिला प्रयत्न पुण्याबाहेर गेला नाही; व पुण्यात मांग-महार वगैरे लोकांना विद्या शिकविणारी मंडळी जोतिबांनी सन १८५२ साली काढली. कै. वाळवेकर-गोवंडे वगैरेंची जोतिबाना मदत होती हे खरे; पण हा प्रयत्न फारसा मूळ धरू शकला नाही. पुढे मूळचे क्षेत्रवासी माळी, कुणबी, धनगर इ. ब्राह्मणेतर शेतकरी लोकांच्या उद्धारार्थ जोतिबांनी सन १८७३ पासून स. शो. समाज चालू केला. शूद्र (ब्राह्मणेतर) मागास लोकांपुरताच विचार करणे हे ह्या समाजाचे ध्येय होते. अतिशूद्र (दलितादि) अतिमागास लोकांचा समावेश नव्हता; त्यांचा विचार खास दलितांसाठी नव्हता म्हणूनच पुढे सत्यशोधक चळवळीने 'ब्राह्मणेतर चळवळ' हे नाव घेतले ह्याचा अर्थ असा नव्हे की स्वतः जोतिरावानी त्यांचे अतिशूद्रांसबंधीचे विचार पुढे बदलले किंवा सोडले. सांगण्याचा मुद्दा हा की, पुढे रानड्यांची सामाजिक परिषद, व प्रार्थना समाजातील कै. श्री. कळसकर, सीतारामपंत जव्हेरे वगैरे कार्यकर्त्यांनी अस्पृश्यांचा प्रश्न पुन्हा त्यानंतर हाती घेतला. केशवचंद्र सेन, गोखले, सर चंदावरकर, रँ. परांजपे, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद वगैरेंचे लक्ष अस्पृश्यतानिवारणाकडे म. गांधींच्याही अगोदर होते. १९०६ सालापासून सर्वांच्या सहकार्याने अखिल भारतीय पातळीवरून अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न शिंद्यांनी समर्पित बुद्धीने (म्हणजे मिशनरी पद्धतीने) हाती घेतला. दलितामध्ये डॉ. आंबेडकरांच्यापूर्वी जे सर्वसामान्य कार्यकर्ते व पुढारी होते, त्यांच्याशीदेखील संपर्क साधून, त्यांना सामावून घेऊन ह्या प्रश्नाची वाटचाल शिंदे यांनी नव्याने चालू केली. पुढे उपस्थित झालेला महाराष्ट्रातील ब्राह्मण-अब्राह्मणवाद ह्या प्रथमच्या काळात जवळजवळ नव्हता. सत्यशोधक समाजापैकी फारच थोडे शिंद्यांना त्यांच्या वरील कार्यात मदत करणारे होते. मराठा समाजाचे ह्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होते व अद्यापीही आहे. संस्थानिक अनेक होते व झाले, पण सयाजीराव व नंतर शाहूमहाराज

ह्यांनीच ह्या प्रश्नात रस घेतला. डॉ. आंबेडकरांना मदत केली. अस्पृश्यतानिवारण म्हणजे धर्मसुधारणा व एक सद्धर्मपालन अशी शिंद्यांची भूमिका होती. शिंद्यांना पद्धत होती; कृती होती.

म. फुले यांनी वर्ण, जातिव्यवस्था व अस्पृश्यता पूर्ण नाकारली होती. परमेश्वराचे पितृत्व व मनुष्याचे समान बंधुत्व हा विचार म. फुल्यांत सूत्रबद्ध प्रकारे सर्वत्र आढळतो. शिंद्यांची हीच भूमिका होती. मात्र शिंदे जास्त आध्यात्मिक होते. जोतिराव गूढवादात शिरले नाहीत जोतिराव धार्मिकतेपेक्षा जास्त सामाजिक होते.

महार-मराठे-ब्राह्मण एकाच वंशातील आहेत, असा विचार म. फुल्यात आढळतो. देव-देवळे, आडनावे इत्यादींबाबत मराठे व महार यामधील मूलभूत विलक्षण साम्य कर्मवीर शिंदे यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रापुरता विचार केल्यास देखील सर्व जातिजमातीचे व अस्पृश्यांसह सर्व लोक एकाच वंशाचे आहेत. अस्पृश्यतेची चाल निर्माण होऊन ती कायम होण्यास वंशभेद हे मूळ कारण दिसत नाही. आर्य व अनार्य यांचा मागेच मिलाफ होऊन चुकला होता व भारतीय धर्मसंस्कृती अशी समिश्रीत झाली आहे; समन्वयित आहे. तरी प्रत्यक्ष समाज व्यवहारात व विशेषतः गावकीत स्पृश्य गाव वेगळे व अस्पृश्य त्या गावाबाहेर असा नैसर्गिक भेद अद्याप राहिला आहे. म. फुले, शिंदे, गांधी हे सारेच तत्त्वचिंतक व समाजचिंतक झाले, तरी वरीलप्रमाणे होऊन गेलेले समाजप्रबोधन असे थिटे पडले. आज शहरातील लोकांना दलित-प्रश्न फारसा भासत नाही, कारण शहरातून फारच लक्षणीय फरक पडलेला आढळतो. असाच फरक खेड्यापाड्यांत दिसावा व आपला ग्रामीणप्रधान बहुसंख्य समाज एकात्मक व्हावा, हे भारतापुढील मोठे अवघड कार्य आहे. यासाठी होऊन गेलेले समाजप्रबोधन थोडेफार तपासले पाहिजे. समीक्षेने मागोवा घेतला पाहिजे. तटस्थतेने पाहिले पाहिजे.

आगरकर-कर्वे ह्यांसारखे समाजसुधारक केवळ कौटुंबिक आणि वैयक्तिक क्षेत्रापुरते आणि शहरी पांढरपेशापुरते मर्यादित होते, असे म्हटले जाते हे सर्वथा खरे आहे काय? प्रथम विचारात क्रांती करावी लागेल. आगरकरांनी बुद्धिवादी व इहवादी दृष्टीतून सर्व सुधारणांचा पिच्छा पुरविला. ही अपूर्व वैचारिक क्रांती होती. अस्पृश्यता-निवारणाला व जातिभेद-निवारणाला आगरकरानी पाठिंबाच दिला होता. आगरकरांचा परिणाम शिंद्यांवर झाला होताच. पुढे प्रत्यक्ष ही कार्ये अंगावर घेऊन सारा जन्म यासाठी व्यतीत करण्याचे कार्य महर्षी शिंदे यांनी केले. अस्पृश्यता-निवारण ही खेड्यापाड्यांत सर्वच भारतात करणे जरूर असलेली सामाजिक सुधारणा होती व आहे. खेड्यापाड्यांतून सर्व भारतभर अस्पृश्यता पूर्णपणे गेली आहे, असे मुळीच नाही. हा लॉंग-मार्च वाटतो. म्हणून ह्या विषयावर विवेक करावा लागतो. शिंदे यांची दृष्टी लोकांपुढे ठेवावी लागते. शिंदे यांनी प्रचारात्मक व संस्थात्मक असे प्रयत्न एकच वेळी केले. शिंदे यांनी गौतमबुद्ध या कार्यासाठी आपलासा मानला व डॉ.आंबेडकरानी तो पुढे प्रत्यक्ष सामुदायिक दीक्षा घेऊन स्वीकारला. आंबेडकरांनाही पूर्वीचा पाया उपलब्ध होतो. अगदीच कोरी करकरीत पाटी नव्हती. काही वाटचाल पूर्वीच झाली होती.

गरीबीतूनच पुढे यावे लागल्यामुळे गरिबाविषयी जिव्हाळा व घरी भागवतधर्मीय वारकरी परंपरा असल्याने जातिभेदापासून अलिप्त असे मन शिंदे यांना प्राप्त झाले होते. ब्राह्मोसमाजाचे भारतभर प्रचारकार्य करीत असताना त्यांना अस्पृश्यांची दारुण अवस्था प्रत्यक्ष दिसली. ही दूरवस्था दूर करण्यात ज्यांनी सारा वैचारिक व चिंतनक्षम असा जन्म घालविला, असे शिंदे झाले. दलित प्रश्नासंबंधीचे त्यांचे दृष्टिकोण आजही कालबाह्य झालेले नाहीत. उलट, त्यांचे विचार व आचार दलित प्रश्नाचा उलगडा करतात व उपाय देखील सांगतात.

अनुक्रमणिका

अडचणींची मीमांसाही करतात पण जेव्हा कोठेही राजकारण-सत्ताकारण येते, तेव्हा मतभेद अटळ केव्हाही होतात!

### राखीव जागा व वेगळा मतदार संघ

दलित प्रश्नांची वाटचाल होत असताना, राखीव जागा व वेगळा मतदारसंघ असावा की नसावा हा प्रश्न होता. ह्या प्रश्नावर अस्पृश्योद्धाराचे कार्य करणाऱ्यातच मतभेद झाले. राष्ट्रीय वृत्तीचे कर्मवीर शिंदे प्रथमपासूनच जातीयवादापासून अलिप्त राहिले. श्री. कै. सयाजीराव गायकवाड व कर्मवीर शिंदे हे प्रथमपासूनच केवळ मराठा समाजापुरते पाहात नव्हते. बहुजनसमाजातील बहुतेक कार्यकर्ते मराठा समाजाच्या उद्धारार्थ खटपट करीत होते, त्याचवेळी व त्याच काळात कर्मवीर शिंदे यांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य सर्वाधिक महत्त्वाचे मानले. ही बाब मराठा समाजाला अर्थात अमान्य होती. क्षात्रजगद्‌गुरूचे पीठ कर्मवीर शिंद्यांना अमान्य होते व आज ते निर्माल्यवत् आहेच! शाहूमहाराजांच्या चळवळींमुळे मराठा समाजास मुंबई कौन्सिलात सात जागा राखीव मिळाल्या होत्या. जातितत्त्वावर आधारित अशा जागेवर उभे राहून निवडून येण्याचे त्यांनी नाकारले व जनरल सीटवर उभे राहिले. व पराभवदेखील पत्करला! पुन्हा आजन्म निवडणुकांच्या राजकारणात उमेदवार म्हणून कधीच उभे राहिले नाहीत. अस्पृश्य समाजाला मात्र राखीव जागा असाव्यात असे त्यांचे प्रथमपासून मत होते. अस्पृश्यता-निवारणाला खादी, हिंदू-मुसलमान ऐक्य, यापेक्षा पहिल्या क्रमांकाचे स्थान द्यावे, असे म. गांधींना सन १९२४ साली शिंद्यांनी पत्र पाठवून कळविले होते. पुढे १९३२-३३ साली डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मतदारसंघ मागितला, तेव्हा ह्या प्रश्नावर म. गांधींना प्राणांतिक उपवास करावा लागला व ह्या प्रश्नालाच सर्वात अधिक महत्त्व द्यावे लागले! डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य समाजाला बहुसंख्य स्पृश्य समाजापासून दूर घेऊन जात होते, हे शिंद्यांना मुळीच पटले नाही; कारण त्यामुळे स्पृश्यास्पृश्य भेद दृढ होण्याला मदतच झाली असती. अस्पृश्य समाजाच्या राजकारणाला बॅ. जिनांच्या मुस्लिम राजकारणाप्रमाणे अलग स्वरूप येणे राष्ट्रीयदृष्ट्या घातक आहे असे शिंदे यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांचे सवत्यासुभ्याचे, अलगता व पृथक्भाव वाढवणारे राजकारण १९१८-१९ सालापासूनच शिंदे यांना मान्य नव्हते. दलित समाज डॉ. आंबेडकरांच्या मताविषयी सारासारविवेक व समाजसमन्वय करीनासा झाला व ज्या दलित समाजासाठी शिंदे यांनी आजवर कष्ट उपसले, तो दलित समाजही शिंदे यांच्यापासून दूर गेला. पण वैचारिक प्रामाणिकपणा कोणत्याही सबबीवर कधीच शिंदे यांनी सोडला नाही; किंवा दलितांच्या मुक्तीच्या कार्यात खंड पडू दिला नाही. कार्य करीत असताना त्यांना असा अनुभव आला की, समाजप्रबोधन भारतासारख्या खंडप्राय देशात खेड्यापाड्यांतील जनतेपर्यंत पोहोचत नाही. पण १९१७-१८ पासून राजकीय जागृती वाढू लागली. मॉंट्यूग्यूचेम्सफर्ड सुधारणा-कालापासून फुले यांच्या सत्यशोधक समाजास ब्राह्मणेतर राजकीय चळवळीचे व पक्षाचे स्वरूप येऊ लागले. मराठा व तत्सम लोकांसाठी ह्या पक्षाने काही जागा राखीव मिळविल्या. मराठा व तत्सम बहुसंख्य समाजाला राखीव जागा असू नयेत, फक्त अस्पृश्यांना राखीव जागा असाव्यात, असे शिंदे यांनी कटाक्षाने प्रतिपादिले. राष्ट्रीय चळवळ मजबूत होण्यासाठी ब्राह्मण-अब्राह्मण वगैरेसारखे भेद व तंटे नसावेत, असे शिंदे यांनी मत मांडले. जातीय तत्त्वावर राजकीय खेळ खेळले जाऊ नये, लढा द्यावयाचा तो प्रतिगाम्याच्या विरुद्ध द्यावा, असा शिंद्यांनी त्या काळात तत्त्वमूलक पक्ष मांडला. पण जातीयवादी ब्राह्मणेतरांना शिंद्यांचे राष्ट्रीय व एकात्म धोरण त्या काळात मुळीच परवडले नाही. वरिष्ठ वर्गीयांकडून जी समता ब्राह्मणेतर अपेक्षित होते, ती समता दलितांनाही दिली जावी, असे शिंदे त्या काळातच धाडसाने सांगत होते; व आता

स्वातंत्र्यात हाती सत्ता येऊनही शिंद्यांचा विवेक खेड्यापाड्यांतील मराठे लोकांनी अंमलात आणला नाही. म्हणूनही एकात्मवादी शिंदे उत्कटतेने लोकांपुढे मांडावे लागतात. मराठा-तत्समांना आता राखीव जागांची गरज उरली नाही. ग्रामपंचायतीपासून तहत् प्रांतिक मंत्रिमंडळापर्यंत बहुजनसमाज हा राज्यकर्ता झाला आहे पण खेड्यापाड्यांतील हरिजन-दलितांची पाहणी केल्यास ते उपेक्षित दिसतील. पक्षनिरपेक्षपणे हे सर्व मान्य करावे लागते. दळणवळणाच्या साधनापासून जी खेडी आता दूर असतात, त्याच्यात तर फार कमी फरक पडला आहे.

**सत्याग्रही शिंदे विरुद्ध डॉ. आंबेडकर**

राखीव जागा दलितांना असाव्यात हे प्रथमपासूनच शिंदे व आंबेडकर या दोघांनाही मान्य होते. पण पद्धतीविषयी तीव्र मतभेद झाला. इंग्रज सरकारने सन १९१८ नंतर निरनिराळ्या जातिजमातींना प्रतिनिधित्व द्यावे, ह्याचा विचार करण्यासाठी 'साऊथबरो कमिशन' नेमले होते. शिंदे यांची अर्थात साक्ष झाली. त्यांच्या 'डिस्प्रेस्ड-क्लासेस मिशन'तर्फे झालेल्या साक्षीत त्यांनी 'मुंबई कायदेमंडळातील सभासदांनी अस्पृश्यांचा एक प्रतिनिधी निवडावा' असे मत मांडले व एकूण नऊ जागा अस्पृश्यांना द्याव्यात अशी मागणी केली. अस्पृश्यांच्या ज्या संख्या आहेत त्यांनी प्रतिनिधी निवडावेत, अस्पृश्यासाठी वेगळा मतदारसंघ नसावा, असेही त्यांनी म्हटले. शिंदे यांचे त्या काळात असे मत होते की हिंदूस्पृश्यांपासून अस्पृश्यांना कोणत्याही प्रकारे दूर करू नये, पृथक्भाव व अलगपणा आणू नये; आणल्यास अस्पृश्यता वाढेल. डॉ. आंबेडकर यांच्या मते अस्पृश्यांचे प्रतिनिधी स्वतः अस्पृश्यांनीच निवडावेत. अर्थात शिंदे व आंबेडकर यांच्यामध्ये फारच फरक पडून पुढे हे दोन मोठे पुरुष एकमेकांपासून पूर्ण विभक्त झाले. जातवार प्रतिनिधित्वाविरुद्ध त्या काळात देशात बरेच विचारवंत होते. जातवारीमुळे जातिभेद वाढण्यात त्यांना भीती होती. शिंद्यांनी 'डिस्पेस्ड क्लासेस मिशन'तर्फे दिलेल्या वरील साक्षीमुळे डॉ. आंबेडकर-गवई यांसारखे दलित नेते शिंद्यांवर नाराज झाले व दुसऱ्या बाजूने प्रार्थनासमाजाच्या 'सुबोधपत्रिके'नेदेखील शिंद्यांवर पुढील टीका ९ फेब्रुवारी १९१९ च्या अंकात केली. "...फार दिवसांपूर्वी नव्हे... हे (शिंदे) जातवार प्रतिनिधींच्या विरुद्ध होते. आता अंत्यजासाठी काही विवक्षित जागा कायदे काउनसिलात राखून ठेवाव्या अशा प्रकारची त्यांची फ्रँचाईज कमेटीपुढे साक्ष झाल्याचे प्रसिद्ध झाले आहे. हे त्यांचे खाजगी मत असल्याचे समजते..." ह्या प्रकारे स्वार्थत्यागी शिंदे अडकित्त्यातील सुपारी झाले!

पुढे सन १९३०-३१ पासून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदारसंघच मागण्याची सुरुवात केली. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने डॉ. आंबेडकरांचा विचार अयोग्य आहे, असे शिंदे यांनी परखडपणे पुन्हा सांगितले. वेगळा मतदारसंघ अस्पृश्याना दिला तर ते हिंदूपासूनदेखील अलग पडतील अशी साधार भीती महर्षी शिंदे यांनी व्यक्त केली. २५ ऑक्टोबर १९३१ रोजी पुण्यात अस्पृश्यांची फार मोठी परिषद शिंदे यांच्या अध्यक्षत्वाखाली झाली. भारतीय व हिंदू-समाजामध्ये एकात्मकता रहावी म्हणून वेगळा मतदारसंघ नको, असा ठराव ह्या परिषदेत झाला. व फक्त राखीव जागा असल्या म्हणजे झाले असे मान्य करण्यात आले. शिंदे व गांधी यांचा दृष्टिकोण एकात्मवादी होता. डॉ. आंबेडकरांनी तो शेवटी मान्य केला.

डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या सार्वजनिक आयुष्याच्या प्रथमारंभी महार परिषदांची अधिवेशने भरविली. ह्यामुळेही इतर लहान लहान दलित जातीजमातींना डॉ. आंबेडकर हे महार समाजाचे पुढारी आहेत. असे वाटणे

अनुक्रमणिका

साहजिकच झाले. महार-महारेतर भेदभाव नसावा. व सर्व दलितांनी अंतर्गत जातिभेद विसरून एक व्हावे, असे कर्मवीर शिंद्यांना प्रथमपासून वाटे; व वरील स्वतंत्र मतदार संघविरोधी परिषदेत त्यांनी महार व महारेतर भेद मिटविण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारच्या अंतर्गत जातिभेदामुळे दलित हे दलित प्रश्नाचे शत्रू होतात व अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीचे पाऊल पुढे पडत नाही, असे शिंदे वरचेवर म्हणत. डॉ. आंबेडकरांनाही पुढे हाच अनुभव आला व आजही दलितांमधील जातवार विसंघटन व राजकीय पक्षभेद आडवे येतातच. सर्व दलितांसाठी असलेल्या वसतिगृहांतील दलित विद्यार्थी आपसात स्पृश्यतास्पृश्य भेद पाळतात. हे डॉ. आंबेडकरांना समजताच, अशा अंतर्गत भेदांवर त्यांनी 'बहिष्कृत भारत' ह्या त्यांच्या नियतकालिकांमधून टीका केलेली देखील आढळते.

**म. गांधी व आंबेडकर बेबनाव**

शिंदे यांच्या पाच-सहा वर्षांच्या प्रयत्नानंतर कलकत्ता काँग्रेस अधिवेशनात अस्पृश्यता निवारणासंबंधीचा एक ठराव मंजूर करण्याच्या कार्यात म. गांधी व ॲनी बेझंट यांच्यासारखी मदत झाली. हा ठराव म्हणजे एक फक्त राजकीय ठरावच होय, अशी डॉ. आंबेडकरांनी त्यावर १९२८ साली 'बहिष्कृत भारत' मधून टीका केलेली आढळते; कारण गांधी व काँग्रेस यांनी अस्पृश्यता निवारणासंबंधी मध्यंतरी काहीच केले नव्हते. राऊंड टेबल परिषदेत गांधी व आंबेडकर यांच्यात बराच बेबनाव झाला. डॉ. आंबेडकर यांनी मागितलेला 'स्वतंत्र मतदारसंघ' रद्द व्हावा यासाठी म. गांधींना प्राणांतिक उपोषण करावे लागले. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मागे घेतली. ह्यामुळे सारा देश किंबहुना सारे जग डॉ. आंबेडकरांचे ऋणी झाले. गांधी जागतिक पुरूष होते. दलितांसाठी स्पृश्य व अस्पृश्यांमध्ये अंतर वाढेल व पृथक्भाव वाढेल असे काहीही नसावे, असे जे शिंदे यांना वाटत होते, त्या त्यांच्या एकात्म धोरणाचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्राप्त झालेले यश शिंदे यांनी पाहिले. हिंदूमधील ऐक्य टिकावे व दलितांचा प्रश्न सुटावा हा शिंद्यांचा प्रयत्न व बाणा आजही उभय समाजांना उपयोगाचा आहे. इतःपर दलितांच्या प्रश्नांची वाटचाल कोणत्या विधायक मार्गाने व्हावी, यावर प्रकाश पडतो.

मागे वेगळ्या दलितस्थानांची मागणी वगैरे फाळणीवजा फुटीर प्रवृत्तीचे स्वरूपे पुढे दलितांच्या मागण्यांतून उमटू लागली. व जिनांच्या वेगळ्या राजकारणाचे अनुकरण होऊ लागले. हे थोपविणे राष्ट्रीय एकात्मकतेच्या दृष्टीने योग्यच होते. यापुढेही काळजी घेतली पाहिजे; व सहकार्याने प्रश्न सुटले पाहिजेत. सामंजस्यांची वाढती गरज आहे. दलितांचे प्रश्न तर सुटलेच पाहिजेत. पण मार्ग कोणता? खरे उपाय कोणते?

'हरिजन' हे म. गांधी यांनी केलेले नामांतर डॉ. आंबेडकरांना पूर्ण अमान्य वाटले. नामांतर किंवा शब्दांतर हाच उपाय होऊ शकत नाही. हे डॉ. आंबेडकरांच्याही प्रयत्नातील सूत्र होते. हा विचार दृष्टिआड होण्यास कसलाच फायदा नाही. केवळ कोणताही नामांतरवाद हा पुढे शुष्क ठरतो. मूलभूत उपाय हवे लागतातच.

शिंद्यांनादेखील मलमपट्ट्या-बाह्योपचार मुळीच आवडत नव्हते. सर्वांच्या अंतःकरणातूनच जातिभेद व अस्पृश्यता गेली पाहिजे; अस्पृश्यता व जातिभेद या एकाच नाण्यांच्या दोन बाजू आहेत, असे शिंदे म्हणत. कारण स्पृश्य की अस्पृश्य हे जन्मप्राप्त जातीवरून ठरते. जन्मप्राप्त जात हाच स्पृश्यास्पृश्यतेला अद्याप खेड्यापाड्यांत तरी मूलाधार आहे. दलितात समाजजागृती व राजकीय जागृती दिसते. पण शेतकरी व ग्रामीण

अनुक्रमणिका

जनतेत सामाजिक प्रबोधनाचा पूर्ण अभाव आहे. शिंद्यांच्यासारखे राजकारणनिरपेक्ष कार्य करणारे समाजसेवक नव्या काळातही खेड्यापाड्यांत हवे आहेत. हीच वाण आहे. कारण सत्तेच्या मागे धावणे हा चालू काळाचा स्वभाव झाला आहे. स्वातंत्र्य आल्यावर सरकारच दलितांसाठी सर्व काही करीत आहे. लोकांचे प्रयत्न ते कोणते? स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांची चळवळ ह्यात महदंतर पडले आहे. हा प्रश्न राजकीय व आर्थिक होत आहे.

**दलित चळवळ बदलते स्वरूप**

मुख्यतः सेक्युलर बनत आहे. कारण नवबौद्ध हे 'दलित' संज्ञेचा वापर करूनच चळवळ करतात. येथे काही मर्यादित विचार केला आहे.

महर्षी शिंदे यांच्या निमित्ताने दलित चळवळीची आजवरची वाटचाल आपणास शोधता येते. पूर्वी अस्पृश्यांच्या प्रश्नाला प्रारंभी तरी धार्मिक प्रश्नांचे स्वरूप होते. उदाहरणार्थ : दि. १५-१-१९३३ रोजी शिंदे यांच्याच अध्यक्षतेखाली श्री क्षेत्र वाई (जि. सातारा) येथे अस्पृश्यता-निवारक परिषदेचे अधिवेशन झाले. त्याला खुद्द म. गांधी यांनी स्वतः पुढील संदेश पाठविला होता.

"अस्पृश्यांनी मुर्दाड मांस वर्ज्य करण्याची प्रतिज्ञा करावी. मेलेली गुरे ओढून नेणे ही जनसेवा आहे. गोमांस सोडतील व स्नान करतील त्यांना मंदिरप्रवेशाचा अधिकार पाहिजे, परंतु असे न करणाऱ्यांना एकदम बहिष्कृत करू नये. दृढ सवय सोडणे कठीण असते… सर्व हरिजन बंधुभगिनी आत्मोन्नतीसाठी तयार होतील अशी आशा आहे."

तीस-पस्तीस वर्षांपूर्वी मंदिरप्रवेश व तत्सम् वरीलसारखे धार्मिक प्रश्न होते ते तसेच राहिले नाहीत. मंदिर-प्रवेशाप्रित्यर्थ शिंदे-आंबेडकर-साने गुरुजी वगैरेंसारख्या सुधारकांना लढे द्यावे लागले. चालू पिढीत मागील पिढ्यात दलितांचा प्रश्न होता तसा राहिला नाही. तो सेक्युलर-आर्थिक व राजकीय बनला आहे. हल्ली नवेच पर्व चालू आहे. तरी हे मागील सिंहावलोकन सर्वांनाच उपयोगाचे वाटले.

**महर्षि शिंदे-म. गांधी**

अस्पृश्यता-निवारणाला शास्त्राधार आहे किंवा नाही असाही प्रश्न आज मुळीच राहिला नाही. 'वचनात् प्रवृत्तिः' 'वचनात निवृत्तीः' अशी जी मोठ्या प्रमाणात अवस्था होती ती राहिली नाही. पूर्वी मात्र ही गरज म. गांधींसह सर्वांना वाटे. 'मौज' (मुंबई) च्या दि. १०-१-४९, म. गांधीस्मृती खास अंकात तर्कतीर्थ गुरुवर्य जोशी यांनी म. गांधी व विठ्ठल रामजी ह्यांच्यात वरील संबंधाने झालेला संवाद दिला होता. तो आजही उद्‌बोधक आहे : कै. विठ्ठल रामजी शिंदे हे एकदा येरवड्यामध्ये गांधींना वरील सल्ला देण्याकरित मुद्दाम आले होते. विठ्ठल रामजींचा अधिकार समाजसुधारणेच्या बाबतीत किती मोठा होता, हे सांगण्याची गरज नाही. विठ्ठल रामजी आले तेव्हा मी गांधींच्या शेजारी बसलो होतो. दुपारी तीन वाजताचे ऊन गांधींचे अंग तापवीत होते. विचारपूस झाल्यावर विठ्ठलराव शिंद्यांनी गांधींना सवाल टाकला की, 'धर्मशास्त्र व धर्मशास्त्री या दोन्ही गोष्टी या युगात पूर्ण मागे

अनुक्रमणिका

पडल्या आहेत. या ब्राह्मण पंडिताना व पुरोहिताना अस्पृश्यतेसारख्या प्रश्नावर निर्णय देण्याचा काय अधिकार आहे? आपण त्यांना महत्त्व दिल्यामुळे त्यांना नसते महत्त्व चढू लागले आहे.' त्यावर 'माझ्या जीवित-संदेशाची मदार ज्यांच्यावर आहे त्यापैकी ते आहेत', असे गांधी एक क्षणभरही न थांबता एका तडाख्यात म्हणाले. विठ्ठल रामजी पुन्हा म्हणाले की, 'नैतिकतेची भूमिका संपूर्णपणे समर्थ नाही काय?' गांधींनी उत्तर दिले, 'नैतिकता व धार्मिकता एकजीव झाली तरच त्यात पूर्णता येते.' विठ्ठल रामजी म्हणाले, 'धर्मग्रंथावाचून जगण्यास धर्म समर्थ आहे.' त्यावर गांधी म्हणाले, 'पुरोहिता'नी व धर्मग्रंथांनी धर्माला मदतही केली आहे. म्हणून त्यांची मदत मिळत असल्यास आपेल कार्य अधिक लवकर यशस्वी होईल.'

वरील संवाद म. गांधी व विठ्ठल रामजी ह्यांच्या परखड स्वभावावर आणि म. गांधी यांच्या दृष्टिकोणावर प्रकाश टाकतो. नव्या पिढीला ही माहिती नवी वाटेल. वरील वेळी अपरिवर्तनवादी काशीचे पंडित कायदा या दृष्टीनेच, कायदा ग्रंथ म्हणूनच धर्मशास्त्राचा अर्थ करावयास भाग पाडीत होते. "कायदा या दृष्टीने धर्मग्रंथ अस्पृश्यता सांगतात असेच म्हणावे लागेल. परंतु धर्माचे तत्त्वज्ञान अथवा हिंदूधर्माचे मूलसिद्धांत अस्पृश्यतेचे समर्थन करू शकत नाहीत." असे परिवर्तनवादी पंडित तर्कतीर्थ जोशी यांनी मत मांडले आहे. डॉ. आंबेडकरांनी हिंदूधर्माच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानात मूलभूत समता सांगितली आहे, ह्या दृष्टिकोणाकडे विशेष लक्ष दिले नाही. स्मृतिग्रंथातील विषमताच त्यांनी जास्ती लक्षात घेतली. स्मृतिग्रंथ म्हणजे कायदे व प्रत्यक्ष आचार हाच लक्षात घेतला. जोतिबानी देखील मनुस्मृतिप्रणित विषमताच जास्ती पाहिली व झोड उठविली. जोतिबा व भीमराव आंबेडकर ह्यांनी विटून-चिडूनच जास्ती लिहिले. शिंदे व गांधी यांनी विवेकी नेमस्त भूमिका घेतली. आंबेडकर जहाल व कडवी भूमिका घेणारे झाले. म्हणून त्यांच्या विचारात अंतरही खूप पडले.

वास्तविक खेड्यापाड्यांत आज 'एक गाव, एक पाणवठा' नाही. याचे कारण ती परंपरागत चाल, रूढी, वाडवडिलार्जित पद्धत व अनादी काळापासून हरिजन वस्ती व सवर्ण वस्ती, विभक्त राहण्याची वहिवाट, ह्यामुळे नाही. मनुस्मृती वाचून किंवा तिच्यामध्ये स्पृश्यास्पृश्यता नमूद आहे हे जाणून वरील जीवनपद्धती बसविली आहे, हे भान व ज्ञान खेड्यापाड्यांत नसते. म्हणून ग्रंथापेक्षा रूढीच बलवत्तर, कारणीभूत व प्रमाण असते, म्हणून तीच जास्त जबाबदार ठरते. मनुस्मृती वगैरे पूर्वग्रंथ जाणणारे खेड्यापाड्यांत दुर्मिळच असतात. फुले-आंबेडकरानी केवळ ब्राह्मणी धर्माला जबाबदार धरले. म्हणून काळ पुढे गेला तरी त्याने अनुयायित्व सिद्ध करण्यासाठी ब्राह्मणी धर्माला वेठीस धरले जाते! वस्तुस्थितीचे यापुढे ताजे, नवे, सामाजिक निरीक्षण हवे आहे. कारण शिक्षण व दळणवळण वाढत आहे. खेड्यात पूर्वी स्पृश्य मुले व अस्पृश्य मुले शाळेत वेगवेगळी बसविली जात. हा भेद आता नाही. प्रयत्नान्ती जातिभेद स्पृश्यास्पृश्यता जाऊ शकते. उभयतांचा विश्वास व हरएक प्रश्नावर सामंजस्य व सहकार्य पाहिजे. म्हणजे आणखी दृढ प्रयत्नांनी 'एक गाव व एक पाणवठा' होईलच, अशी सक्रीय श्रद्धा वाढली पाहिजे. 'सामर्थ्य आहे चळवळीचे' हे मान्य करावे लागते. अस्पृश्यतेला भवितव्यता नाही; पण केवळ अस्पृश्यता गेली तरी दलित प्रश्न राहील!

### डॉ. आंबेडकरांची महानता

डॉ. आंबेडकरांनी वेगळ्या मतदारसंघाचा हट्ट मागे घेतला. व म. गांधी यांचा जीव वाचविला. हे सर्व झाले याचे कारण त्यांच्यामधील अपूर्व प्रासंगिक सावधानता व सामंजस्य होय. रबर किती ताणावयाचे ह्याचा ते विवेक

अनुक्रमणिका

करीतच होते. स्वातंत्र्य आल्यानंतर त्यांना थोड्याच वर्षांचे आयुष्य लाभले. घटना तयार करण्यात त्यांनी महत्त्वाचा भाग घेतला. शेवटी ज्या धर्माची मायभूमी, पितृभूमी व पवित्रभूमी भारतच आहे, असा धर्मसुधारक गौतमाचा बौद्धधर्म स्वीकारला. निधर्मी घटना करताना यांनी सवलती केवळ दहा वर्षांसाठी मागितल्या, पुन्हा वेगळा मतदारसंघ मागितला नाही. देशाचे अखंडत्वच त्यांना जास्ती मंजूर होते. सत्य व अहिंसा ही बुद्धाची तत्त्वे म. गांधी यांनी ही मुख्य मानली. डॉ. आंबेडकर यांचे म. गांधी यांच्याबरोबर मतभेद झाले, पण म. गांधी यांच्या अहिंसावादी सत्याग्रहाची पद्धत सामाजिक न्याय मिळविण्यासाठी त्यांनी अवलंबिली. उदा. महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदीर, सत्याग्रह वगैरे लढे आंबेडकर लढले.

महर्षि शिंदे यांच्याबरोबर आंबेडकर यांचे मतभेद मागे झाले. पण सन १९२८-२९ सालातील डॉ. आंबेडकर यांच्या 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाची फाईल पाहावयास मिळाली. 'पूर्व बंगल्यातील अस्पृश्य वर्गाच्या उच्च शिक्षणाची प्रगती' हा कर्मवीर गुरुवर्य वि. रा. शिंदे यांचा लेख 'जागृती' (बडोदे) ह्या साप्ताहिकावरून त्यात उद्‌धृत केला होता. तसेच लोकहितवादी यांच्या शतपत्रांपैकी काही पत्रे पुन्हा 'बहिष्कृत भारता'त देण्याचाही उपक्रम त्यांनी केलेला आढळला. म्हणजे दलितेतरांपैकी ज्यानी अस्पृश्यासाठी कार्य केले. विचार मांडले, अशा थोर माणसाबद्दल आंबेडकरांच्या मनात पूज्य भाव होताच. कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या संबंधाने आंबेडकरांनी विशेष आदर व्यक्त केला आहे.

लोकशाहीवादी डॉ. आंबेडकरांनी फक्त अस्पृश्यासंबंधी किंवा एकूण दलित प्रश्नांसंबंधीच लिहिले व कार्य केले असे नव्हे. दलित साहित्य म्हणून अखिल साहित्यात त्यांना वेगळी भिंत तयार करावयाची नव्हती. हिंदूधर्माची सुधारणा करण्यासाठीच त्यांनी पहिला मोठा भारतीय समाजसुधारक जो बुद्ध त्याला अनुसरले व समाज-प्रबोधनार्थ विद्वत्ता उपयोगात आणली, म्हणून अर्थात बुद्ध व आंबेडकर हे सर्व भारतीयांच्यासाठी झाले, हा विवेक दृष्टीआड होता कामा नये. सर्वांनीच दूरवर व्यापक विचार व विधायक आचार केला पाहिजे.

डॉ. आंबेडकर यांच्यानंतर वेगवेगळा काळ येत जाईल. केवळ त्यांची पार्थिव पूजा अपुरी ठरेल. त्यांची गुणोपासना मात्र सर्वांनाच उपयोगी पडेल. मात्र दलित प्रबोधनाला व चळवळीला त्यांच्याएवढा स्वावलंबी झुंजार नेता मागे मिळाला नव्हता व अद्यापही नाही. त्यांचे समाजप्रबोधनातील असामान्य मार्गदर्शी स्थान अभ्यसनीय आहे.

अनुक्रमणिका

## १९.

## ‘दलितत्व’ व दलित साहित्याची नवी दिशा

आधुनिक दलित साहित्याचे प्रेरक म. फुले ठरतात. परंतु डॉ. आंबेडकरांच्यापासून प्रेरणा घेऊन जे साहित्य नव्याने निर्माण झाले त्याला ‘दलित साहित्य’ म्हटले जाते. बाबासाहेबांनी अस्पृश्य मानलेल्यांना स्वतंत्र अस्मिता दिली. एवढेच नव्हे, तर स्वतंत्र राजकारणही दिले. त्यांच्यापासून किंबहुना त्यांच्यामुळेच दलितांचे राजकारण देशभर स्वावलंबनाने चालू झाले. ह्यामुळेच दलित साहित्याला वेग आला. तत्पूर्वी धार्मिक व सामाजिक विचारांना व चळवळींना प्राधान्य होते. असा क्रम लागणे साहजिक असते. सामाजिक प्रबोधन हेच कोठेही पायाभूत असू शकते.

डॉ. आंबेडकरांनी ‘रिपब्लिकन पक्ष’ ही एक महत्त्वाची राजकीय वाट दाखविली होती. हा मार्ग कितपत यशस्वी झाला किंवा नाही, हा येथे विषय नाही. दलितत्व होते व आहे व असेल तोपर्यंत दलित साहित्याचे अस्तित्व राहणार! दलितत्वच नसेल तर मग वेगळ्या दलित साहित्याची गरजच नसणार! कोणतेही साहित्य स्वतः दलित नसते किंवा नव्या काळात ते अस्पृश्यही मानले जात नाही. म्हणजे आजकाल दलितेतरांपैकी बरेच त्याची दखल घेत आहेत, स्वागत करीत आहेत, त्याच्या रचनेत भाग घेत आहेत.

### परंपरा जुनीच

डॉ. आंबेडकरांच्यापूर्वी दलित चळवळ होती व दलित साहित्यही निर्मित होत होते. उदा., किसन फगू वगैरे लेखक, पत्रकर्ते देखील झाले. त्यांची दखल फार थोडे घेत होते. किंबहुना ते दलित समाजातही अप्रसिद्ध व एकपरी उपेक्षित होते! जोतिरावांच्या काळात होऊन गेलेले त्यांचे मित्र बाबा वलंगकर यांचा काळ तर अगोदरचा ठरतो. वलंगकर हे पहिले दलित समाजातील लेखक झाले. डॉ. आंबेडकरांच्या पूर्वी दलितांची व दलित साहित्याची दखल प्रथम म. जोतिराव व नंतर कर्मवीर शिंदे यांनी घेतली.

चोखामेळा हे संत दलितांमध्ये जन्मले त्यांच्या विचारांची दखल तुकारामादी संतांनी घेतली. ‘चोखामेळा संत जिवाची सोईरे॥’ असे खुद्द तुकोबा म्हणतात. संत तुकोबाही कर्मवीर शिंद्यांच्याप्रमाणे प्रत्यक्ष अस्पृश्यता निवारक होते, असे म्हणावयाचे नाही. पण मराठी संतांना चोखामेळा यांचा जीवात्मा वेगळा नाही, असे सुचवायचे होते. पारमार्थिक दृष्ट्या हे सर्व संत एकाच जातीचे (of one caste) होते. चोखामेळा यांनी त्यांच्या वेदना, दुःख आणि अनुभवास येणाऱ्या जाणीवा व्यक्त केल्या होत्या. त्यांना मराठीतील श्रेष्ठ व प्रसिद्ध संतांचा विरोध नव्हता. चोखामेळा व तत्सम साधुसंतांचे उद्‌गार हे दलित साहित्यच ठरते. दलितत्वाचा उगम प्रथम दलितेतरातील धर्मसुधारकांना आला. बुद्ध हा ह्यापैकी सर्वांत मोठा व अगोदरचा प्रमुख धर्मसुधारक होय. त्याने विषम वर्णजातीव्यवस्थेला बुद्धधर्म स्थापून धक्का दिला. त्याचे यासंबंधीचे विचार हे दलित साहित्याच्या प्राथमिक उद्‌गमास कारणीभूत झाले व त्याच्यापासूनच डॉ. आंबेडकर यांनी स्फूर्ती घेतली. अस्पृश्यतेवर उपाय म्हणजे बुद्धधर्माचा सार्वजनिक स्वीकार होय, असे त्यांनी सक्रीय मानले. ह्यामुळे नव बौद्ध साहित्याचा जन्म झाला.

**द्विविध विकास**

अर्वाचीन काळी फुले-शिंदे, सयाजीराव, शाहू महाराज, माटे-सावरकर, म. गांधी वगैरे जे अनेक अस्पृश्योद्धारक झाले, त्यांनी त्यांच्या वाङ्मयातून दलित प्रश्नाची उत्पत्ती व उपाय ह्यांसंबंधी ऊहापोह केला आहे. दलितानी दलितासाठी लिहिलेले व दलितेतरानी दलित प्रश्नांवर लिहिलेले असे जे वाङ्मय आहे, ते दलित साहित्यातच गणावे लागेल. कारण वरील सर्व कर्त्यापुरुषांनी त्यांचे अनुभव शब्दांकित केले आहेत. उदा., 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' नामक कर्मवीर शिंदे यांचा ग्रंथ दलित प्रश्नावरील एक अधिकारी प्रयत्न ठरतो. श्रीपादराव माटे यांचा 'अस्पृष्टांचा प्रश्न' हाही ग्रंथ सन १९३३ सालच्या सुमाराचा होय. खुद्द शिंदे यांनी ह्याचा चांगुलपणा नमूद केलेला आढळतो. दलितेतर अस्पृश्योद्धारकांनी निर्माण केलेले साहित्य हे सर्व वैचारिक वाङ्मय आहे. विचार महत्त्वाचा गणावा लागतो. ह्या (दलित) साहित्याला दलित नामाभिधान प्राप्त झाल्यावर वैचारिक साहित्य विपुलपणे निर्माण झाले आहे. असे म्हणणे अवघड वाटते. डॉ. आंबेडकर यांनी दलितोद्धारार्थ ललित म्हणजे कथा, कादंबऱ्या, काव्य वगैरेंचा अवलंब केला नव्हता. वैचारिक साहित्य आजकाल कमी वाचले जाते. तरी त्यांच्यात वैचारिक जागृती करण्याचे कमी सामर्थ्य असते असे नव्हे. डॉ. आंबेडकरांचे ग्रंथ (इंग्रजी व मराठी) भाषणे, लेख वगैरे सशक्त वाङ्मयापैकी आहेत व डॉ. आंबेडकरांना मराठी साहित्य संमेलनाचे कधीच कोणी अध्यक्ष केले नव्हते. तरी आंबेडकर थोर साहित्यिक ठरतात.

अलीकडील काळात प्रा. गंगाधर पानतावणे, (औरंगाबाद) यांचा क्रमांक असा बराच पुढचा मानावा लागतो. 'अस्मितादर्श' नामक वैचारिक नियतकालिक ते कैक वर्षे चालवित आहेत. अशा प्रकारचे उपक्रम फारच थोडे आहेत. हे सर्व टिकले पाहिजेत व वाढले पाहिजेत. नामदेव ढसाळ हे उत्कृष्ट कादंबरी कथाकार आहेत. विचारप्रधान साहित्यापेक्षा ललित साहित्य वाढत आहे. सर्व वाङ्मय वर्तमान आहे.

मराठी साहित्यात दलित साहित्याचे दालन उघडले गेले आहे, ही बाब स्वागतार्ह आहे. मराठी साहित्याचा विकास समाजातील उपेक्षित थरापर्यंत खाली होत आहे. हे मराठीचे परमभाग्य होय.

दलितात अनेक पक्ष आहेत व असतील, हे साहजिकच आहे. राजकीय मतभेद व पक्षोपक्षीयांची विविध प्रतिबिंबे दलित साहित्यात उमटणारच! शिवाय (नव) बौद्ध साहित्य वेगळेच, ह्याचा अधिकाधिक परिपोष होण्यावर डॉ. आंबेडकरांचा बुद्धधर्म प्रवेशाचा विजय अवलंबून राहील, हे मुख्यतः प्रभावी ठरले पाहिजे.

दलितत्व (दासप्रथा) व पिळवणूक राहील तोपर्यंत दलित साहित्याचे वेगळेपण राहील. दलितांचा प्रश्न हा दलित दलितेतरानी मिळून गोडीगुलाबीने व सहकार्याने सोडविण्याचे आहे. ह्या दृष्टीने राममोहन रॉय, केशवचंद्र सेन वगैरे स्पृश्य मानलेल्या विचारवंतांपासून सुरुवात झाली आहे. आपल्याकडे रानडे-भांडारकर, गोखले, सर चंदावरकर वगैरे नेमस्तांनी देखील ह्या विषयावर मते व विचार व्यक्त केले आहेत. त्यांची ओळख दलित साहित्यसेवकानी करून घेतली पाहिजे. म्हणजे डॉ. आंबेडकर यांच्यापूर्वी ह्या विषयाची मशागत कशी झाली व प्रारंभ कसा झाला, हे समजू शकेल. सुरुवात जाणणे, उद्‌बोधक कोणासही वाटेल.

अनुक्रमणिका

सांगण्याचे तात्पर्य हे की, दलित साहित्य हे दलित व दलितेत्तर विचारवंताकडून चालू झाले व चालू आहे. दलितेतरात आजही ह्या विषयाचे अभ्यासक आहेत. दलित साहित्य आपलेच आहे, असे मानून त्याचा अभिमान बाळगणारे श्री. गं. बा. सरदार यांच्यासारखे व इतर तत्सम विवेकवंत आहेत व पुष्कळजण प्रत्यक्ष कार्यकर्तेही आहेत. ह्यांची संख्या वाढली पाहिजे. वाङ्मयीन चळवळीबरोबर उभयतांची कृतीदेखील हवी. उभयतांच्या सहकार्याने हा प्रश्न सोपा होईल.

**व्याख्या**

दलित साहित्याचा असा द्विविध वाहत आलेला प्रवाह पाहिल्यानंतर त्याची व्याख्या करणे सोपे होते. विषमतेचे निर्मुलन करून न्याय, समता, सत्य प्रस्थापित करणे ह्यासाठी दलित साहित्य संभवते. सर्वांगीण विषमतेचा विनाश घडवून समता प्रस्थापिणे, ही त्या साहित्याची व्याख्या होऊ शकते. जगात कोठेही अन्याय असतो, तेथे अशा प्रकारचे साहित्य निर्माण होऊ लागते. गुलामगिरी, दासप्रथा, पक्षपात, उपेक्षा वगैरे अन्याय जगभर कोठेही असू शकतो. तेथे उपेक्षितांच्या साहित्याची गरज पडते. "Tell him that he is a slave he will revolt" असे डॉ. आंबेडकरानी अस्पृश्य मानलल्या लोकांना सांगितले; व त्यांची संघटना बांधली. 'जे लिहिले/बोलले जाते ते साहित्य,' अशी साहित्याची सहज व्याख्या साहित्य सम्राट केळकर यांनी केली होती. डॉ. आंबेडकर जे बोलले व जे त्यांनी सर्व काही लिहिले ते आंबेडकरी-साहित्य फक्त दलितांचाच विषय केवळ घेणारे नव्हते. हा त्यांचा मुख्य उद्देश होता, हे खरे पण देशाच्या संदर्भात अनेक विषय त्यांनी अभ्यासपूर्ण मांडले. पूर्वी त्यांचे गुरू जोतीबा फुले यांनी शुद्रांच्या (म्हणजे ब्राह्मणेतर बहुजनसमाजाच्या) प्रश्नांवर अतिशूद्रांच्या प्रश्नापेक्षा जास्त विचार-आचार-प्रपंच केला होता. डॉ. आंबेडकर स्वतःच अस्पृश्य मानले गेलेल्यामध्ये जन्म पावले, म्हणून त्यांना नैसर्गिकपणे अस्पृश्यांच्या प्रश्नांकडेच अधिकाधिक लक्ष द्यावे लागले. पण एवढीच त्यांची मर्यादा नव्हती, हे दलितांमधील नवलेखक व कवीने जाणावे. डॉ. आंबेडकरांचा अभिमान धरणे, समाजशास्त्रज्ञ, धर्मशास्त्राचे व राज्यशास्त्राचे अभ्यासू पंडित, इतिहाससंशोधक व विशेषतः अर्थशास्त्रज्ञ त्या दृष्टीने आंबेडकरांची गुणोपासना व्हावी. त्यांचे इंग्रजीवरील प्रभुत्व वगैरे कितीतरी गुणांचे समुदाय त्यांच्या ठायी होते ते दलितांनीच नव्हे तर सर्वांनी आदर्श म्हणून यथाशक्ती अंगी बाणण्याचा प्रयत्न करावा. दलित, साहित्याचे मुख्य आधुनिक पहिले मोठे प्रेरक म्हणून आंबेडकरांना मानणाऱ्यांनी फक्त 'ललित व दलित' एवढीच कक्षा धरू नये. दलितत्वाच्या व दिलत साहित्याच्या मर्यादा केवळ अस्पृश्य जातीजमातीपुरत्याच राहिल्या तर आज ना उद्या दलित प्रश्न संपल्यावर दलित साहित्य हा शब्दप्रयोग देखील राहाणार नाही. उदा., काळ पालटत आहे; फुल्यांच्यावेळी व स्वातंत्र्यपूर्व काळात ब्राह्मणेतरांचा प्रश्न गाजत होता, तो आता नाही. कारण फुले व त्यांच्या प्रवाहाने मांडलेल्या बऱ्याच प्रश्नांची सोडवणूक झाली आहे; व कित्येक बोथट झाले आहेत. त्यांना धार आणूनही ते धारदार व तीव्र होणार नाहीत. ह्याचप्रमाणे दलित म्हणून घेणाऱ्यांचा प्रश्न त्यांच्या विद्यमान साहित्याची वरीलप्रमाणेच गती होईल! कारण दलितत्व हा काही गुण (भूषण नव्हे) नव्हे. म्हणून तो टिकवून सतत वर्धमान करण्याजोगा आहे! म्हणून व्याख्येला आतापासूनच मर्यादा घालून ठेवण्यात हशील नाही. ह्याचा अर्थ असा नव्हे की विद्यमान दलित साहित्याचे काहीच प्रयोजन नव्हते व नाही. आंबेडकर हे मात्र 'एकसूरी' नव्हते; हे मात्र लक्षात आणून देणे भाग आहे. ते अधिक जगले असते तर तत्त्वनिष्ठ राहून त्यांनी अनेक परिवर्तने मांडली असती. आजच्या जीवनात जे प्रश्न बहुसंख्य गरीबांच्यापुढे आहेत, ते सर्वांना सारखेच आहेत.

अनुक्रमणिका

**निग्रो प्रश्न व दलितांचा प्रश्न यांचे विभिन्नत्व**

दलितातून अनेक कवी, पत्रकार, साहित्यसेवक पुढे येत आहेत. त्यांना नाराज करण्यासाठी हा विषयप्रपंच हाती घेतलेला नाही. दलितांच्या विद्यमान साहित्याचे स्वागत करणे व त्यांचा परामर्ष घेणे, हे सर्वच पुरोगाम्यांचे कर्तव्य राहाते. वेगळी दलित साहित्य संमेलने व बौद्धसाहित्य संमेलने भरली तरी त्यात मराठी भाषेच्या अभिमान्यांना मुळीच वाईट वाटता कामा नये. कारण ही सर्व संमेलने जागृती व अस्मितादर्शक ठरतात.

दलित साहित्याच्या प्रेरणाबाबत ह्यापढे सांगावयाचे आहे : जोतिरावांनी 'गुलामगिरी' पुस्तकात विशेषतः इंग्रजी प्रस्तावनेत निग्रो लोकांची गुलामगिरी व परिस्थिती येथील शूद्रातिशूद्रांची धार्मिक-सामाजिक (Socio Raligious) यांच्यासंबंधी ऊहापोह मध्यंतरी केला आहे. सदर पुस्तक १८७३ साली त्यांनी अमेरिकेतील निग्रो लोकांना मुक्त करणाऱ्यांना अर्पण केले आहे. ही घटना बोलकी आजही आहे. ह्या पुस्तकाचे महत्त्व ह्या अर्पणपत्रिकेने अर्थात वाढले आहे. पण ह्या पुस्तकातील आतील भाग पाहिला किंवा तदनंतरची त्यांची पुस्तके पाहिली तर त्यांची प्रेरणाही फक्त निग्रो विमोचक घटनेतूनच निर्माण झाली होती; असे मानता येत नाही. पुढे त्यांनी निग्रोप्रश्नच अभिप्रेत धरून एकसारखा सतत विवेकप्रपंच केला नाही. त्यांच्या प्रेरणा त्यांना अनेक बाजूने मिळाल्या तथापि त्या जास्तीत जास्त स्वानुभवातून व सभोवतालच्या सामाजिक, धार्मिक परिस्थितीतून प्राप्त झाल्या व त्याची होणारी धार्मिक पिळवणूकही मांडली. तथापि ह्यांची म्हणजे शुद्रांची (व अतिशूद्रांची) दुरवस्था अमेरिकेतील अतिशूद्रांपेक्षा भयंकर आहे, असाही त्यांनी त्यांच्या इंग्रजी प्रस्तावनेत अभिप्राय व्यक्त केलेला आढळतो. त्यांच्या काळात जी स्थिती हीन-दीन शूद्रातिशूद्रांची होती ती त्या काळानुसार फुले फारसे चुकले, असे आज म्हणता येत नाही. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न व पाश्चात्त्य निग्रोंचा प्रश्न यांची संसारी (तुलना) शिंदे-आंबेडकरांनी केलेली आढळली नाही.

निग्रो हे गुलाम होते व यद्यपि आफ्रिका-अमेरिकेत असतीलही पण ते कधीच अस्पृश्य नव्हते व आजही नाहीत. भारतीय अस्पृश्यतेच्या बाबतीत असे म्हणता येते की, अस्पृश्यावरील बहिष्कार हा जन्मजात व पिढ्यान्‌पिढ्यांचा असतो. वर्ण व वंशदृष्ट्या काळे निग्रो व पांढरे युरोपियन रंगाने व वंशाने पूर्ण विभिन्न आहेत. तरी त्यांना कधीच अस्पृश्य समजून परंपरेने ग्रामबाह्य केले नव्हते. निग्रोंचा स्पर्श हा अपवित्र व धर्मबाह्य मानला जात नाही.

भारतीय अस्पृश्य व स्पृश्य यांच्यात आजतरी रंगभेद व वर्णभेद नाही. निग्रोंची विक्री केली जाई तशी अस्पृश्यांची केली जात नसे. दोघांच्यावर असलेल्या गुलामगिरीत असे भेद व तफावती सांगता येतील. म्हणून निग्रोप्रश्न व अस्पृश्यांचा भारतीय प्रश्न यातील मूलभूत फरक जाणून सारासार विचार केला पाहिजे.

आपल्याकडे म. फुले-शिंदे-गांधी वगैरे स्पृश्य समाजसुधारकांनी अस्पृश्यता जावी म्हणून प्राणपणाने प्रयत्न केले. त्याचप्रमाणे निग्रोमुक्तीसाठी शुभ्र रंगाच्या युरोपियन व अमेरिकन समाजसुधारकांनी अतिशय प्रयत्न केले व काहीनी प्राणही गमविले. ह्यांची जिद्द दलितांच्या उद्धारासाठी व उन्नतीसाठी आजही जरूर आहे. निग्रो व विमोचक जे झाले, त्यांच्यापासूनच म. फुले यांनी जास्त प्रेरणा घेतल्या हे अधिक खरे. जरूर तो छळ सोसण्याचे सामर्थ्य फुले यांच्यात निर्माण झाले. वरील परदेशी व स्वदेशी धर्मसुधारकांची चरित्र दलित प्रश्नांची

अनुक्रमणिका

सोडवणूक करण्यासाठी दलिताना व खुद्द इतरांनाही उपयोगी पडतील. दलित साहित्याने ह्या दृष्टीने प्रयत्न जरूर करावा. मिशनऱ्यानी मात्र धर्मप्रसारासाठी निग्रोत आणि भारतीय अस्पृश्यात कार्य केले.

भारतीय दलितांचा प्रश्न भारतीय परंपरा, संस्कृती, धर्म व समाजशास्त्र, इतिहास आणि प्रत्यक्ष उद्याची व आजची स्थिती ह्या संदर्भात जास्त हाताळावा लागेल. विशेषतः भारतीय ग्रामीण विभागात स्पृश्यास्पृश्य भेदावरून जे अत्याचार अस्पृश्य समाजावर ग्रामीण लोकांकडून होतात, त्याची कारणे चालू राजकीय व आर्थिक परिस्थितीच्या संदर्भातून पाहणे नव्याने जरूर झाले आहे. शेतकरी व ग्रामीण बहुजनसमाजाची व तेथील स्त्रीसमाजाची मने कशी पालटतील व ती परंपरागत अंधश्रद्धा, मने विवेकी, उदार व सहिष्णु कशी होतील हा येथे ज्वलंत 'प्रश्न' आहे. दुसऱ्या बाजूने असे म्हणणे आता प्राप्त आहे की, दलितांनी व दलितत्वाचा हीनगंड न बाळगता गुणांची उपासना करून व स्वावलंबनाने उत्कर्ष साधून स्पृश्य समाजाच्याही पुढे व सर्व क्षेत्रात गेले पाहिजे. सरकारी सवलती व काहींना मिळणाऱ्या नोकऱ्या व मंत्रीपदे ह्यामुळेच केवळ हा त्यांचा सार्वजनिक प्रश्न सुटणार नाही. दलितत्वाचा विनाश कसा व कोणकोणत्या प्रकारे घडविता येईल हा प्रश्न आता नवा आहे; दिशा नवी हवी आहे.

### फुले-लोकहितवादींचा आदर्श

लोकहितवादी प्रार्थनासमाजी व आर्यसमाजी होते. त्यांना स्वजातीच, अहंकार नव्हता. उलट त्यांनी स्वसमाजाचे दोषाविष्करण तीव्रपणे व निर्भीडपणे केले. त्यांची 'शतपत्रे' हेच त्यांचे समाजप्रबोधनाला कारणीभूत झालेले साहित्य होय. 'शतपत्रां'पासून ज्यांना ती मुख्यतः उद्देशून लिहिली, त्या ब्राह्मण समाजाने खूप बोध घेतला. आता हा बुद्धिप्रधान समाज किती पालटला आहे, हे अभ्यासणे जरूर आहे. जोतिरावांना त्यांच्या शूद्रातिशूद्रांवरील मानसिक दास्य नष्ट करावयाचे होते, म्हणून त्यांची गुलामगिरी नाहीशी करण्याच्या दृष्टीने त्यांच्या लेखणीच्याद्वारे संघर्ष पेटविला पण पुढे 'शेतकऱ्यांचा असूड' ह्या पुस्तकात आत्मपरीक्षणान्ती निरीक्षणपूर्वक शूद्रातिशूद्रांचे दोष त्यांनी सांगितले आहेत, ह्यापैकी पुष्कळ दोष शूद्रातिशूद्रांत व बहुजन शेतकऱ्यांत आहेत. ज्या प्रमाणात शेतकरी व जोतिबांचा शूद्रातिशूद्र महाजन समाज पालटावा तेवढ्या प्रमाणात तो पालटला नाही, म्हणून 'फुले व आंबेडकरांच्या' जनतेला आत्मपरीक्षणाची अत्यंत गरज आहे. दलित साहित्याने अंतर्मुख या पुढे झाले पाहिजे. बौद्ध साहित्यानेही झाले पाहिजे. ग्रामीण साहित्यानेही झाले पाहिजे. फक्त ब्राह्मण व ब्राह्मणी धर्मग्रंथांवरच सतत मारा करून, यापुढे फारसा कार्यभाग उरकणार नाही. ज्यांनी त्यांनी आपआपले दोष-उणीवा जाणून त्या दूर करण्याचा प्रयत्न स्वावलंबनाने केला पाहिजे. ब्राह्मणेतर ही एकच जात नव्हती, त्याचप्रमाणे 'दलित' म्हणजे कोणी एकच जात किंवा समाज नाही. अंतर्गत विविधता व परस्परविरोध फार आहे. त्यातच नव्या राजकीय पक्षोपक्षांची भर पडली आहे, यामुळे सामर्थ्य विभागले जाते.

### नाकारार्ह भाग व स्वीकारार्ह भाग

कबीर-फुले हे सर्व जातीधर्मातील वर्णजातीभेद, कर्मविपाक, विभूती व मूर्तीपूजा, ग्रथाचे सर्व प्रामाण्य म्हणजे ईश्वरकृत धर्मग्रंथ मानणे इत्यादी बाबी फुले-आंबेडकर नाकारतात. साहजिकच दलित साहित्यावरील सर्व बाबी विरुद्ध लढा देते, द्यावाच लागतो ईश्वराचा उपयोग गुलामगिरी दृढ करण्यासाठी व पुरोहिताच्या

अनुक्रमणिका

स्वार्थासाठी होत असतो. म्हणूनही ईश्वर नाकारावा लागतो. नाकारणाऱ्या ज्या बाबी डॉ. आंबेडकर व गौतम बुद्ध यांनी ठरविल्या होत्या, त्या पुनः स्वीकारता येणार नाहीत. 'नकार' हा देखील महत्त्वाचा असतो. पण ह्याबरोबरच गौतम व आंबेडकर यांनी नैतिक सर्व परंपरागत तत्त्वे व शाश्वत धर्म स्वीकारार्ह म्हणजे आचरणास योग्य व कल्याणप्रद मानला आहे, हे विसरता कामा नये. जगात सत्य व असत्य दोन्हीही असते. म्हणून व्यक्ती, ग्रंथ, धर्म यातील (व कोणत्याही पुस्तकातील) फक्त सत्यच घ्यावे, ह्यासाठी म. फुले यांनी सत्यशोधक मार्ग दाखविला आहे. ह्या धोरणानुसार यापुढे संशोधन वाढविले पाहिजे. दलित साहित्याने व ग्रामीण साहित्याने सहकार्याने प्रयत्न करावेत.

## बुद्ध-कबीर-फुले

बुद्धाचा काळ इसवीसनापूर्वीचा होता. कबीराचा मध्ययुगाचा होता व म. फुले यांचा काळ अर्वाचीन होता. परंतु तो काळ ब्रिटिशांच्या साम्राज्याच्या वेळेचा होता. आता स्वातंत्र्य येऊन तीस वष होऊन गेली, तरी अस्पृश्यांचा-दलितांचा-प्रश्न वाढावा व त्यावर विस्तृत विवेचनाची जरुरी लागावी, हे स्वतंत्र भारताचे दुर्दैव होय. दलित साहित्याने हे दुर्दैव दूर केले पाहिजे, हेच त्यांचे तूर्त मुख्य ध्येय असावे. स्त्रिया, आदिवासी वगैरे या देशात अनेक दलित देखील आहेत.

बुद्ध हा संघर्ष (युद्ध) नसावा हे शिकवितो. कबीर हिंदुमुस्लिम ऐक्याचे महान प्रतिक होय. बुद्ध-पोटाळ (स्वार्थी-लोभी) पुरोहितशाहीविरुद्ध लढा करण्यास शिकवितात. ह्या बाबतीत ह्या तिघांत मोठे ऐक्य आहे.

पण ह्यापुढे जाऊन नम्रपणे असे सांगणे भाग आहे की, ज्यांना पुरोहित, बुवा, जोतिषी-जोशी यांची जरुरी पडते व ह्या सर्व लोकांच्यामागे जे धर्मभोळे लागतात, ते त्यांच्याही पेक्षा जास्त दोषी आहेत. यांच्याकडूनच बुद्ध-कबीर-फुले-आंबेडकर यांचा पराभव होत आहे. ह्यावर उपाय कोणता? हा प्रश्न मुख्य आहे. बुद्ध-कबीर-आंबेडकर-फुले वगैरे पुरोगाम्यांचा पराभव त्यांच्याच समाजाकडून अनुयायांकडून होत असतो व ह्यापुढे होण्याचा अधिकाधिक संभव आहे; म्हणून जागृतीसाठी लिहावे लागते.

## नामांतरे

हिंदू धर्मातील विषमता व पक्षपात हा दूर करण्यासाठी, आंबेडकरानी बुद्ध सार्वजनिकपणे त्यांच्या अनुयायांना घेऊन स्वीकारला. पण बुद्धधर्माप्रमाणे वर्तन नवबुद्धाकडून झाले नाही. तर धर्ममार्तंडांना व सनातन्यांना जबाबदार कसे काय धरण्यात येणार? हा दुसरा प्रश्न आहे. बुद्ध धर्म हे केवळ पूर्वीच्या महार समाजाचे नामांतर व नवे नाव ठरू नये. परिवर्तनाला परंपरा मिळते. क्रांतीला प्रतिक्रांती खाऊन टाकते व पचविते. लोक सर्वसाधारणपणे पुनः पूर्वधर्म स्वीकारतात. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास पूर्वी महार व इतर अस्पृश्य समाज व दुसरी स्पृश्य जनताही बुद्ध होती. जास्तीत जास्त बुद्ध गुहा, लेणी महाराष्ट्रातच अधिकाधिक आहेत. पण ही सारी चळवळ पुनः इतिहासजमा झाली व लोक पुनः पूर्ववत आद्य शंकराचार्यांच्या सनातन वैदिक ब्राह्मणी धर्मात गेले. आता असेच पुनः बुद्धधर्मप्रवेश हे केवळ नामांतर ठरू नये. कोणत्याही प्रकारच्या नामांतरामुळे मूलभूत फरक पडत नाही. म. फुल्यांच्याही सत्यशोधक समाजाची त्यांच्याच लोकांकडून विपरीत

गत झाली. आत्मपरीक्षणानंतर अनेक प्रश्न सोडविणे भाग झाल्यास दुसऱ्यांना जबाबदार धरूनच व त्यांच्या नावे खडे फोडूनच उपयोग नाही. हे आता दलित समाजास व मधल्या बहुजनसमाजास कळाले पाहिजे. आत्मदोषी आविष्कारणावर भर अधिकाधिक दिला गेला पाहिजे. परंपरागत चालत आलेले सामाजिक दोष घालविणे क्रमप्राप्त आहे. शेवटी दलित साहित्याला जर नवे वळण लागेल तर दलित चळवळीलाही नवी दिशा सापडेल.

फुल्यांना जे मानतात व आंबेडकर यांना जे चाहतात त्या सर्वांनी एकात्मक होऊन पुढील वाटचाल स्वावलंबनाने केली पाहिजे. सर्वच महाराष्ट्रीय व भारतीय समाजाचे सामाजिक-धार्मिक परीक्षण केले तर धर्मग्रंथांतील विषमता व ती ठिकाणे मंत्र व श्लोक-कोणीच वाचलेली नसतात. ज्या रुढ्या व परंपरा असतात, त्यात सुधारणा करावयाची झाल्यास सर्व ब्राह्मणेतर-दलितासह-समाजाने स्वतःच प्रयत्नपूर्वक क्रांती केली पाहिजे. धर्मक्रांतीचे शत्रू आपले आपणच होतो व आहोत. दलित साहित्य लेखकांनी लेखणीचे टोक दुसऱ्यांच्या डोळ्यात घुसविण्यापेक्षा स्वतःच्या सुधारणेचा विवेक यापुढे जास्त करावा. यासाठी नियतकालिके धर्म, समाज यांच्या सुधारणार्थ, स्वावलंबी संस्थादेखील दलित म्हणविणाऱ्यांनी चालविल्या पाहिजेत. साहित्य म्हणजे फक्त कागदावर पांढऱ्याचे काळे करणे नव्हे. साहित्यात अनेक प्रकारची सर्वांगीण साहित्ये (साधने) असू शकतात.

अनुक्रमणिका

२०.

# कायदेनिष्णात डॉ. आंबेडकर आणि 'देशाचे दुष्मन' खटला

डॉ. आंबेडकर यांच्या चरित्राला, कार्याला व विचारांना अनेक पैलू आहेत. त्यांपैकी न्यायालयाच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकर यांच्या बुद्धिमत्तेने जे विक्रम केले ते सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. कायद्याच्या ज्ञानात तर विस्मयकारक भर घालणारे आहेतच. डॉ. आंबेडकर यांनी गुदरलेल्या कैफियती, कोर्टातील भाषणे, जजमेंटस् आजही वकिली करणारांना मार्गदर्शक आहेत. डॉ. आंबेडकर यांच्यावर आजही संपूर्णतः लिहून पूर्ण झाले, असे नव्हे. हा एक पुढेही चालू राहणार 'प्रोसेस' आहे. उदा., सर्वांत गाजलेला 'देशाचे दुष्मन' या पुस्तकावरील जिंकलेला अभूतपूर्व खटला सर्वांत महत्त्वाचा ठरतो. सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळ ही क्रियाप्रतिक्रिया स्वरूपात पुढे येत गेली. उदा., लो. टिळक यांचे दुर्दैवी निधन झाल्यावर त्यांचे पुणे म्युनिसिपालटीने एक स्मारक म्हणून रे मार्केट (आत म. फुले मार्केट) समोर एक पुतळा नगरपालिकेच्या खर्चाने बसविला. नेमस्त पक्षातील ब्राह्मणेतर पक्ष हे दोन्ही त्यावळी मवाळ होते. त्यांचे आपसात साहचर्य पुष्कळसे असे. टिळक व रानडे-गोखले यांच्या पक्षात द्वंद्व असे. टिळक व राजर्षी शाहू यांच्या पक्षात तर तीव्र मतभेद होऊन गेले होते. मतभेदाचे पडसाद त्यांच्या पश्चात् उमटत होते.

### क्रियाप्रतिक्रिया स्वरूप

लो. टिळकांचा पुतळा नगरपालिकेच्या खर्चाने उभारल्यावर त्यालाही प्रतिक्रिया अपेक्षित होती. ब्राह्मणेतरांचे तरुण पुढारी व पुणे म्युनिसिपल सभासद कै. केशवराव जेधे यांनी म. फुले यांचा पुतळा पुणे म्युनिसिपालटीने उभारावा, असा ठराव आणिला. सर्व जगात लढा असतो तो सनातन व सुधारक यांच्यामध्ये चालतो. सनातनी ब्राह्मण व सनातनी अब्राह्मण यांचे साहचर्य व्यवहारात सुरू होते, दलित वर्गातही सनातनी व सुधारक होते, असू शकतात. उदा., बिगर महार दलित इतर सर्व समाजाने, डॉ. आंबेडकरांच्या सार्वजनिक धर्मांतरास-बौद्ध दीक्षेस-पाठिंबा दिला नाही, याचे एक मूळ कारण त्यांना सुधारणावादी धर्मापेक्षा सनातनी दलितांना हिंदू धर्मात राहणे आवडले व आवडते. ब्राह्मणेतर सनातनी सभासदांचा फुले पुतळ्यास विरोध शक्य झाला. याचे एक कारण 'केसरी' कंपूने त्या काळास ब्राह्मणेतर चळवळीस विरोध करण्यासाठी ब्राह्मणेतरातील काही मंडळी जवळ केली होती. व राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली 'संग्राम' नामक मराठी वृत्तपत्र चालविण्यास मोठे साह्य दिले. "भागवत धर्माचा पुरस्कार करून सत्यशोधकांच्या पाखंडी व्रताचे खंडण करणे" हा सनातनी 'संग्राम' साप्ताहिकाचा बाणा त्यांच्या अंकावर छापला जाई. श्री. ग. म. नलावडे, पुणे हे संपादक होते. पण प्रत्यक्ष त्यात लिहिणारे दुसरे पुणेकर होते. 'मजूर' नामक सत्यशोधकांचे साप्ताहिक कै. रामचंद्र नारायण लाड हे चालवित. हा काळ १९२५ ते १९२८ अखेरपर्यंतचा होता. पुणेरी वृत्तपत्रसृष्टीतील ही दोन पत्रे आपसात झुंजली. 'संग्राम' म. फुले यांच्यावर तुटून पडे, तर 'मजूर'मध्ये दिनकरराव जवळकर टिळकांवर तीक्ष्ण हल्ला करीत. ही दोन्ही साप्ताहिके मला त्या काळात वाचावयास मिळत. व्यंगचित्रे देखील दोघेही छापत. 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक कै. लाड 'मजूरकर्ते' यांनी त्यांच्या मुद्रणालयात छापले. जवळकर हे या अत्यंत तिखट पुस्तकाचे लेखक होते. हे पुस्तक सर्वत्र गाजले.

अनुक्रमणिका

**खटले-खोकले**

सत्यशोधक चळवळीच्या म. फुले व पुढील कालखंडात भटकी संबंधाच्या दक्षिणेचे दावे त्यावेळच्या इंग्रजी राज्यातील कोर्टातून चालत. इतरही प्रांतात असे काही दावे झाले. पण मुंबई इलाख्यात त्यावेळी म. फुले व शाहू महाराज यांच्या काळात सत्यशोधकांनी अनेक दावे जिंकले व पुढे जोशी बिल पास झाले. समाज सुधारणा विषयक कोणताही कायदा पाठिंबा देण्यासाठी पास झाला की, तत्संबंधीची चळवळ निमाली जाई! आज सर्वच मराठी व तत्समांना ब्राह्मण पुरोहित अत्यंत गरजेचा वाटतो. कालाय तस्मै नमः॥ पण जेधे-जवळकर कालखंडात सत्यशोधकी वाङ्मयावर ब्राह्मणी पक्षाकडून अनेक दावे अब्रुनुकसानीच्या सबबीवर भरले गेले. ४/९/२५ रोजी जेधे केशवराव यांनी मांडलेला म. फुले पुतळ्याचा ठराव सनातनी ब्राह्मणेतर सभासदांच्या विरोधामुळे नापास झाला. 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक म. फुले यांच्या चरित्रांची माहिती देण्यासाठी लिहिले गेले. लोकमान्य टिळक यांची अप्रतिष्ठा करणे हा जेधे-जवळकर-ठाकरे वगैरे तत्समांचा पवित्रा होता. तर "संग्राम"कर्ते श्री. म. ग. नलावडे वगैरे तत्समांना हाती धरून केसरी पक्ष म. फुले यांची बदनामी करत होता. आजही 'मजूर', "संग्राम" पत्रांच्या फाईली मिळाल्यास कोणासही या दुर्दैवी वादाचे क्रियाप्रतिक्रियात्मक स्वरूप समजून येईल. दोन्हीही पत्रे मी वाचीत असे. त्यामुळे वादाचे स्वरूप पूर्ण आठवते. त्यावेळच्या मुंबई इलाख्यातील अनेक जिल्ह्यात पुण्यातील वादाचे पडसाद पडले. पुण्यातील लो. टिळकांच्या पुतळ्याचे संरक्षण व्हावे म्हणून सभोवती पोलीस बंदोबस्त ठेवला गेला. हा पुतळा १९४२ साली बसविला गेला.

१९२५ च्या ऑक्टोबरला कै. श्रीधरपंत टिळक यांनी छत्रपती मेळाव्याच्या पद्यावलीमुळे आपल्या वडिलांची बदनामी झाली म्हणून सिटी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांच्या न्यायालयात फिर्याद केली. फ्लेमिंग साहेबांनी जवळकर-लाड यांना प्रत्येकी पाचशे रुपये दंड व तो न दिल्यास पाच महिने साधी कैद अशी शिक्षा फर्मावली. सत्यशोधक चळवळ थोपविण्यासाठी पहिल्यापासून सत्यशोधकावर कायद्याचा आश्रय घेऊन खरे-खोटे खटले खोकले करण्याचा मार्ग ब्राह्मणांनी स्वीकारला होता अशी माहिती जुनी कागदपत्रे पाहिल्यावर दिसले.

ह्या काळातीलच नव्हे तर मागील महाराष्ट्रातील सामाजिक वादाचे स्वरूप क्रियाप्रतिक्रियारूपी होते. ब्राह्मणेतरांनी म. फुले यांचा पुतळा बसवावा म्हणून केशवराव जेधे, म्यु. सभासद यांच्यामार्फत पुणे म्युनिसिपालटीत ठराव मांडला. 'संग्राम' नामक केळकर-केसरी यांच्या प्रोत्साहनाने निघणाऱ्या साप्ताहिकात गोखले, न. वि. गाडगीळ, ह. मो. जोशी, हे लिहीत असत व 'मजूर' पत्रात जवळकर यांच्याप्रमाणे बापट नामक गृहस्थही लिहीत होते. या काळात प्रबोधनकार ठाकरे यांचे वास्तव्य पुणे येथेच होते व ते पुस्तके व वृत्तपत्र याद्वारे जवळकरांच्याप्रमाणे तिखट लिहीत. यामुळे दोहोपक्षी वाद रंगला व आंबेडकरांनी त्या काळात जो खटला जिंकला त्या वेळचा हा सर्व काळ व पार्श्वभूमी आजही कोणासही लक्षात घ्यावी लागते.

म. फुले यांचे चरित्र व कार्य समजावे म्हणून जवळकरांनी 'देशाचे दुष्मन' पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. हे पुस्तक फारच खळबळजनक ठरले. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे पुतणे कृष्ण महादेव यांनी सिटी मॅजिस्ट्रेट फ्लेमिंग यांच्या कोर्टात त्यांच्या घराण्याची बदनामी होत आहे म्हणून दावा गुदरला. फ्लेमिंगसाहेबांनी १५ सप्टेंबर १९२६ रोजी वरील दाव्याचा निकाल दिला. लेखक जवळकर, मुद्रक लाड यांना प्रत्येकी एक वर्ष साधी कैद व अडीचशे रुपये दंड, न भरल्यास, दोन महिने कैद अशी शिक्षा ठोठावली. प्रस्तावनाकार जेधे-बागडे

अनुक्रमणिका

यांनाही कोर्टात दोषी ठरविले. फ्लेमिंगसाहेबांनी चिपळूणकरांच्या वरील वंशजांच्या भावना दुखविल्या गेल्या. असे मत दिले व त्यांचे निकटचे नातेदेखील मान्य केले. पुण्याचे ब्राह्मणेतर पुढारी मोठ्या अडचणीत सापडले. गजेंद्रमोक्ष केला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच, हे विसरले गेले. याउलट जोतिराव यांची बदनामी करणारे बाबुराव फुले यांच्यावर जोतिरावांच्या चुलतभावाचा नातू गजानन फुले यांनी गुदरलेल्या फिर्यादीच्या निकालात गजाननराव फुले हे निकटचे नातेवाईक नाहीत, असे मत दिले. फ्लेमिंगसाहेबांची ही विसंगती आजही मोठी मनोरंजक वाटेल. आश्चर्य हे होते की, युरोपियन न्यायाधीश फ्लेमिंग यांच्याशी आंबेडकर लढले. डॉ. आंबेडकर संघर्षशील असत.

## डॉ. आंबेडकर यांची बुद्धिमत्ता

वरील फ्लेमिंगसाहेबांची विसंगती चाणाक्ष कायदेपंडित आंबेडकरांनी नेमकी हेरली. सेशन कोर्टात अपील करण्यात आल्यावर डॉ. आंबेडकर यांनी जेधे, जवळकरांच्या पक्षाचे वकिलपत्र घेऊन केस चालविली. वरचे सेशन जज्ज जे. डी. लॉरेन्स यांनी कृष्ण महादेव चिपळूणकर हे विष्णुशास्त्री यांचे निकटचे नातेवाईक नाहीत, असा निर्वाळा दिला. सर्व आरोपी दोषमुक्त ठरविले. जवळकर लेखसंग्रहाचे संपादक श्री. य. दि. फडके यांनी यांच्या विस्तृत व विवेचक प्रस्तावनेत सर्व घडलेला खटल्याचा इतिहास दिला आहे. आता ही (एक जुनी) सत्यकथा (story) आहे. शोकांतिकेची सुखांतिका आंबेडकरानीच घडविली. संदर्भापुरती माहिती येथे त्यांच्या प्रस्तावनेतूनच चालू नवीन पिढीसाठी थोडक्यात दिली आहे. शिळ्या कढीला उत आणण्याचा उद्देश येथे नाही. बाबासाहेबांचा 'विजयी मराठा'कर्ते यांनी अनुल्लेख केला! या संबंधी कै. अ. वि. चित्रे यांचे २९/१०/२६ चे मूळ पत्र पुढे दिले आहे. 'सुबोधपत्रिका' आंबेडकरांच्या वाचनात असे. कै. चित्रे यांना अटळपणे बाजू मांडावी लागली.

## सुबोधपत्रिका व डॉ. आंबेडकर

मुंबईत प्रार्थना समाजाचे मुखपत्र 'सुबोधपत्रिका' नियमित निघत असे. या पत्रिकेत डॉ. आंबेडकर याच्या संबंधाने अनेक तटस्थ स्फुटे वगैरे प्रसिद्ध झाली होती. 'सुबोधपत्रिके'चे संपादक कै. द्वारकानाथ गोविंद वैद्य हे होते. त्यांनी इतर ठिकाणी आंबेडकरांना उद्देशून 'आमचे मित्र', म्हणून उल्लेख केलेला आढळला. दि. ७ नोव्हेंबर, १९२६ रोजीच्या 'सुबोधपत्रिके'त कै. चित्रे यांचे पत्र व त्यावर स्फुट आलेले मी जसेच्या तसे पुढे देत आहे. वाचकांनी ते वाचावे म्हणजे 'देशाचे दुष्मन' पुस्तकप्रकरणी डॉ. आंबेडकर यांनी ऐन वेळी बजावलेली कामगिरी लक्षात येईल. देशाच्या दुष्मन खटल्यात आंबेडकरांनी केलेला 'बचाव' वगैरे व न्यायाधीशांचे जज्ममेंट, ही साधने वाचकांना उपलब्ध होतील तर आंबेडकरांचा कायद्यातील अधिकार लक्षात येण्यास मोठे साह्य होईल. हा खटला आंबेडकरानी जिंकला. तो सार्वजनिक व सामाजिक संघर्षाचा होता. त्यांच्या ध्येयधोरणाची ही सर्व माहिती म्हणजे त्यांच्या अष्टपैलू चरित्राचा एक अप्रसिद्ध भाग आहे. मूळ जज्ममेंट मिळवून जर ह्याच विषयावर प्रकाश टाकण्याचा कोणी प्रयत्न केल्यास दुधात साखर पडेल. ह्या खटल्याचा निकाल झाल्यावर 'टाईम्स ऑफ इंडिया', मुंबई मध्ये स्फुट आले होते. एवढे मला आता आठवते. इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांनी आंबेडकरांचा नामनिर्देशही केला नाही, हे आज आश्चर्याचे वाटेल. सत्यशोधकांचे मवाळ अध्यक्ष ना. भास्करराव

अनुक्रमणिका

जाधव हेही तटस्थ राहिले! व खुद्द 'दीनमित्र' कर्ते पाटील मुकुंदराव यांनी जहाल जवळकरी लिखाणाला पाठिंबा दिला नाही.

**देशाचे दुष्मन डॉ. आंबेडकर**

आज दुसरीकडे रा. रा. अ. वि. चित्रे ह्यांचे जे पत्र आम्ही छापिले आहे, ते आमच्या हातात येईतो डॉ. आंबेडकरांच्या व देशाचे दुष्मनसंबंधी खटल्याअखेरच्या निकालाचा काही संबंध असल्याचे आम्हास काहीच माहीत नव्हते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी न्यायाधीशापुढे केलेल्या भाषणाचा कसा परिणाम झाला, ह्यांविषयी आम्हास काहीच लिहिता आले नाही. त्यांनी ह्या खटल्यात आरोपीच्या वतीने जे भाषण केले त्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करितो. बॅरिस्टर आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख तारात का झाला नाही याविषयी निरनिराळ्या कल्पना करून वाढलेल्या असंतोषामध्ये भर घालण्याची आमची इच्छा नाही. बाकी एवढे मात्र आम्हास आज वाटत आहे की, रा. बागडे वगैरेंचे अभिनंदन करण्यासाठी ज्या ज्या वेळी ज्या ज्या ठिकाणी सभा भरतील त्या त्या वेळी डॉ. आंबेडकरांच्या न्यायाधीशापुढील भाषणाचा गौरवयुक्त उल्लेख होणे अत्यंत अगत्याचे आहे. आमचे ब्राह्मणेतर मित्र हे कर्तव्य करण्यास माघार घेणार नाहीत, अशी आशा आहे.

**पत्रव्यवहार**

श्रीयुत संपादक, 'सुबोधपत्रिका' यांस—
सा. न. वि. वि. खालील चार ओळीस आपल्या सन्मान्य पत्रात जागा द्याल अशी आशा आहे.
"देशाचे दुष्मन" ह्या खटल्याच्या निकालात पुण्याच्या सेशन्स कोर्टाने आरोपींना दोषमुक्त केले. ह्या गोष्टीबद्दल आपण 'सुबोधपत्रिके'च्या मागील अंकात आनंद व्यक्त केलात हे आपल्या निःपक्षपातीपणाला साजेसेच झाले. ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळीच्या दृष्टीने हा खटला अतिशय महत्त्वाचा होता. बेजबाबदार लेखकांच्या लेखांचा आणि माथेफिरु तरुणांच्या अत्याचाराचा ब्राह्मणेतर चळवळीशी कायदेशीर संबंध लावण्यासाठी सध्या करण्यात येत असलेल्या प्रयत्नांपैकीच हा एक प्रयत्न होता आणि हा प्रयत्न अयशस्वी झाल्याबद्दल कोणाही दुराग्रहविरहित व्यक्तीला आनंद वाटल्यावाचून राहाणार नाही. कायद्याच्या दृष्टीनेही हा खटला अतिशय महत्त्वाचा होता. मृत व्यक्तीची निंदा केल्यास अब्रूनुकसानीचा आरोप सिद्ध होऊ शकेल की काय ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचा निर्णय लावावयाचा होता. आणि ह्या प्रश्नाचे उत्तर नास्तिपक्षीच दिले पाहिजे ही गोष्ट, डॉ. आंबेडकरांनी आरोपीतर्फे केलेल्या भाषणात सिद्ध केली.

सदरहू खटल्यांत ब्राह्मणेतर पक्षाला हाणून पाडण्याचा पुण्यातील ब्राह्मण पुढाऱ्यांचा डाव बॅरिस्टर आंबेडकर यांच्या बुद्धिकौशल्यामुळे बहुतांशी फसला हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही. असे असतानाही सदरहू खटल्याची हकीकत प्रसिद्ध करणाऱ्या सर्व इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रात बॅरिस्टर आंबेडकरांचा नामनिर्देशही करण्यात आलेला नाही, याचे आश्चर्य वाटते. पुण्याच्या ब्राह्मणी गलबल्यांत गडबडलेले 'टाइम्स', 'क्रॉनिकल', 'इंडियन डेलीमेलचे रिपोर्टर बॅरिस्टर आंबेडकरांचे नाव देण्यास धजले नाहीत असे म्हणता येईल. पण असोसिएटेड प्रेसच्या रिपोर्टरानेही बॅरिस्टर आंबेडकरांचे नाव का गाळावे हे समजत नाही. निःपक्षपातीपणाचे धोरण ठेवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. सदरहू खटल्याचा निकाल ऐकून ब्राह्मणी संपादक गांगरून गेले यात नवल

अनुक्रमणिका

नाही. खालच्या कोर्टाच्या निकालावरच संपादकीय स्फुट लिहून (विजयी मराठ्यांच्या मते) ‘सैतानी आनंद’ व्यक्त करणाऱ्या ‘ज्ञानप्रकाशा’च्या उतावळ्या संपादकाची अपिलाचा निकाल वाचून त्रेधाच उडाली असेल. त्याच्या धसकलेल्या लेखणीला बॅरिस्टर आंबेडकरांचे नाव घेण्याचे धैर्य झाले नाही यात नवल नाही. प्रतिपक्षाच्या विजयी पुढाऱ्याचे किंवा त्यांच्या साहाय्यकाचे योग्य प्रसंगीही गौरव करण्याइतका मनाचा मोठेपणा ‘केसरी’करांनी दाखविल्याची उदाहरणे फारशी सापडणार नाहीत. जहाल व मवाळ ब्राह्मणी वर्तमानपत्रांनी बॅरिस्टर आंबेडकरांचे नाव देण्याचे टाळले याला काहीतरी कारण देता येईल. पण ‘विजयी मराठा’, ‘नवयुग’ वगैरे ब्राह्मणेतर पत्रांनीही ह्या बाबतीत त्यांचेच अनुकरण का करावे हे कळत नाही. वास्तविक पाहाता ब्राह्मणेतर पक्षाची अब्रू आज बॅरिस्टर आंबेडकरांमुळे बचावली आहे. अशा वेळी ‘विजयी मराठ्या’ने आपल्या विजयी महारबंधूंचे अभिनंदन करणे अवश्य होते. हा ब्राह्मणेतर संपादकांचा विसराळूपणा की कृतघ्नता? की एक विद्वान अस्पृश्य बंधूंचा मोठेपणा मान्य करण्यास तयार नसलेली मत्सरबुद्धि?

आपला,
अ. वि. चित्रे

मुंबई, २९-१०-२६

वरील सर्व लढा बहुतांशी ‘राजकीय’ होता. आज यातून काय बोध निघतो?

**उपसंहार (एक भाष्य)**

‘सुबोधपत्रिका’ या नियतकालिकातील वरील सर्व मजकूर प्राप्त झाल्यामुळे हा लेख साकार होऊ शकला. ‘देशाचे दुष्मन’ पुस्तकाचा वऱ्हाड, नागपूरपर्यंत प्रसार झाला. पुणेरी पत्रे या पुस्तकाला ‘चोपडे’ म्हणत. जवळकर समग्र वाङ्मयात हे पुस्तक आता उपलब्ध आहे. चिपळूणकर, टिळक व त्यांचे सनातनी अनुयायी यांना या पुस्तकाचे कधीच कौतुक वाटणार नाही. पण जोतीबांच्या ‘गुलामगिरी’ पुस्तकानंतर एवढा मोठा जबरदस्त आघात या पुस्तकाने केला. आघात करणारी जी पुस्तके असतात, त्यातील शब्द ना शब्द सर्वथैव समर्थनीय व पंडित शास्त्री यांना आवडणारा असा असणे शक्य नसते. डॉ. गॉगल यांच्या वाचनातून हे पुस्तक कसे अद्याप सुटले? म. जोतीरावांच्या ‘गुलामगिरी’ पुस्तकावरच त्यांचा डोळा आहे.

‘विजयी मराठ्या’सारख्या पत्रातून आंबेडकरांचा नामोल्लेख आला नाही. म्हणूनच कै. ल. वि. चित्रे यांनी पत्र प्रसिद्ध केले. यानंतर ‘विजयी मराठ्या’त यासंबंधाने काही मजकूर आला होता व योग्य तो अपेक्षित खुलासा त्याने केला की नाही, हे त्याचे पुढील अंक त्यावेळचे पाहाण्यास मिळाले तरच सांगता येईल. कै. चित्रे याचे २९-१०-१९२६ चे पत्र आजही बोलके आहे. ‘सुबोधपत्रिके’चे धोरण तटस्थ होते. म्हणूनही कै. चित्रे यांचे पत्र छापले गेले व त्याला पाठिंबाही दिला गेला.

डॉ. आंबेडकरानी ब्राह्मणेतर चळवळीकरिता येईल तितकी मदत केली. असे करीताना त्यांना ब्राह्मणेतर पुढारी व पत्रे यांचा कित्येक वेळा कटु अनुभव आला. सत्यशोधक समाज व त्यांची पुढील ब्राह्मणेतर पक्षीय चळवळ शूद्रांसाठी-म्हणजे ब्राह्मणेतरांसाठी फक्त व प्रायः होती. शूद्र व अतिशूद्र दोघेही अब्राह्मण पण शूद्र हे अस्पृश्य व

अनुक्रमणिका

अतिमागास नव्हते. अनटचेबल-डिप्रेस्ड-व ब्राह्मणेतर विद्येत (त्यावेळी) मागासलेले यामधील फरक, बाबासाहेबांच्या 'साउथ बरो कमिशन'ने पुढील मेमोरॅंडममध्ये लिहिलेला आढळतो. तो चिंतनीय आहे.

कित्येक सत्यशोधक व ब्राह्मणेतरपक्षीय पुढारी अस्पृश्यांच्या उद्धाराला पाठिंबा देणारे होते. विरोध करणारे नव्हते. पण सर्वत्र जास्तीत जास्त अब्राह्मण, सर्वसाधारण बहुजनसमाज, प्रत्यक्ष सनातनी-परंपरावादी-रूढ व वाडवडिलार्जित वृत्तीने चालणारा होता, व आताही आहे. यामुळे खेड्यापाड्यांत अजूनही मनातून व पक्ष व्यवहारातून दलित प्रश्नासंबंधी क्रांतिकारक बदल झालेला नाही. खुद्द महाड सत्याग्रह प्रसंगी व अन्य अनेक वेळी बाबासाहेबांना जो त्यांना अनुभव आला, तो त्यांनी इतरत्र नमूद केलेला आढळतो. मराठा बहुजनसमाजाच्या ब्राह्मणेतर चळवळीत दलितोद्धाराच प्रत्यक्ष कार्यक्रम व खास असा उपक्रम व उपाययोजना नव्हती. व निवडणुकीतून सनातनी अब्राह्मणांची मते जातील, म्हणूनही त्यांनी हा सर्व कार्यभाग अध्याहृत ठेवला, अजूनही मराठा-तत्सम यांची मने व मते पालटावी तितकी पालटून पुरोगामी झाली नाहीत. त्यांनी त्यांच्यावरील सनातनी ब्राह्मण धर्मांचा पगडा आजही दूर केला नाही. उलट वाढत आहे. मि. मि. मिशनची चळवळ व प्रयत्न देशभर चालू होता, हे खरे पण ग्रामीण जनतेची मने पालटण्याच्या कामी तिला अपूर्ण यश आले. बाबासाहेबात ह्यासंबंधीची मीमांसा आलेली आहेच. सत्यशोधकाची चळवळ व ब्राह्मणेतर राजकीय पक्ष असताना बाबासाहेबांनी पुढे 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापून वेगळा विचार-आचार स्वतंत्रपणे व स्वावलंबनाने केला. याची काही कारणे कै. चित्रे यांच्या पत्रात सापडतात.

राममोहन ते रानडे यांच्या प्रवाहापासून तात्त्विक ऐक्य होते, तरी म. फुले यांनी पृथक्‌पणा पत्करून वेगळा 'सत्य शोधक समाज' ब्राह्मणेतरांच्या खास उन्नतीसाठी काढला. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर यांनी म. फुले-शाहू हा प्रवाह उपलब्ध असताना 'स्वतंत्र मजूर पक्ष' काढला. ह्या पृथक्‌पणाचे या दोन ऐतिहासिक घटनेत साम्य दिसतात.सत्यशोधक समाज असताना व म. फुले यांना एक गुरू मानूनही बाबासाहेबांनी बुद्धधर्माचा (मूळ)-मार्ग का धरिला याची कारणे अभ्यासणे जरूर आहे. राजकीय ब्राह्मणेतर पक्षही नेमस्तपक्षाने त्याकाळच्या पूर्वीपासूनचे चालू असलेले सहकार्य सोडून वेगळा पुढे का आला? यालाही सामाजिक कारणे व तफावत कारणीभूत झाली. वेगळी होण्याची कारणे प्रत्यक्ष जेथे संपतात तेथे पुनः वेगळे झालेले समाज विभाग व नेते एक होतात. उदा., राष्ट्रीय चळवळीच्या काळात 'मजूर' पक्ष संबंधित जेधे-जवळकर व संग्राम संबंधित न. वि. गाडगीळ व तत्सम एक झाले! डॉ. आंबेडकर आजन्म स्वतंत्र राहिले. त्याना राहाणे अटळ झाले.

**आंबेडकरांची एक आठवण**

कै. मोरे यांनी सन १९४८ साली 'देशाचे दुष्मन' पुस्तकाचे अपील डॉ. आंबेडकरांनी चालविले. यासंबंधी आठवण सांगितली, कुशाग्र बुद्धिमत्ता व वादकौशल्य यामुळे ब्राह्मणेतर पुढारी दिपून गेले. डॉ. आंबेडकरांचा छपन्नावा वाढदिवस होता. हा अहिल्याश्रमात साजरा झाला. मोरे म्हणाले, 'वकीलपत्र घेण्यास मुंबईचे कोणीही वकील तयार नव्हते.' सत्यशोधकांना 'राक्षस' समजत! डॉ. आंबेडकर यांनी मुंबई विधान सभेत फ्लेमिंग साहेबांच्या पक्षपातीपणाविरुद्ध प्रश्न विचारला; व फ्लेमिंगकडून निदान खुलासा तरी मागवावा अशी मागणी केली.

अनुक्रमणिका

**स्वतंत्र वृत्तपत्र सृष्टीचा जन्म**

डॉ. बाबासाहेबांना ब्राह्मणेतर वृत्तपत्रसृष्टी चालू असताना वेगळा स्वतंत्र मजूर पक्ष तर काढावा लागलाच एवढेच नव्हे, तर स्वतंत्र वृत्तपत्रसृष्टी स्वावलंबनाने पुढे चालू करावी लागली. स्वोद्धारार्थ असे करावे लागले. याला कारणे होती. हा विभक्तपणा व हे स्वावलंबन पत्करिले नसते तर त्यांच्या समाजाचा आजचा 'स्वोद्धार' झाला नसता. असे करण्यास राजर्षी शाहू यांचा पाठिंबा पूर्वीच होता. त्यांना ठाऊक होते की, 'मूकनायक' पत्र जे काम करू शकेल ते त्यांचीच 'विजयी मराठा' तत्सम पत्रे करू शकणार नाहीत. म्हणूनही पहिल्या आंबेडकरांच्या पत्रास राजर्षींनी देणगी दिली. राजर्षी द्रष्टे ठरले. 'स्वोद्धार व उद्धार' या दोन पवित्र्यात 'विग्रह' घडला. असे होणे अटळ होते. म. फुले-शाहू-शिंदे यांची नावे दलित प्रश्नांच्या सोडवणुकीत महत्त्वाची आहेत, शिंदे व जेधे यांनी पर्वती सत्याग्रहात भाग घेतला होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांची कामगिरी महत्त्वाची झाली. जवळकरांनी नाशिक येथे डॉ. आंबेडकरांनी काळाराम मंदिर सत्याग्रह चालू केला तेव्हा प्रकृती नादुरुस्त असतानाही त्यात भाग घेतला. काही अशी उदाहरणे ब्राह्मणेतर चळवळीत होती. पण ह्यांच्यामुळे दलित प्रश्नांच्या बाबतीत सर्व अब्राह्मण समाज पालटला असे आज म्हणता येत नाही. समरसतेचा प्रश्न आजही आहेच. ब्राह्मणेतर चळवळ इतिहासजमा झाली. पण दलित चळवळ व साहित्य सजीव आहे.

डॉ. आंबेडकर यांच्यामुळे जेधे-जवळकर-बागडे-लाड देशाचे दुष्मन खटल्यात निर्दोष सुटले. हे 'दीनमित्र'कर्ते मुकुंदराव पाटील यांना देखील यापूर्वी पत्र पाठवून कळविले होते. डॉ. आंबेडकरांचे ब्राह्मणेतर चळवळीला प्राप्त झालेले योगदान आणि तिच्या गुणदोषांची मीमांसा हा त्यांचा एक पैलू होता.

जेधे-जवळकर आदिकरून पुढाऱ्यांना येरवडा तुरुंगात नेले; तेव्हा कर्मवीर शिंदे यांनी येरवड्याला जाऊन त्यांची भेट घेतली असा उल्लेख आढळतो. 'तटस्थता' हा शिंद्यांच्या स्वभावाचा स्थायी भाग असे व ते सन १९२३ नंतर निवृत्त झाले. 'अध्यात्म' हा त्यांचा प्रमुख पाया असे. तरी सर्व ब्राह्मणेतर पुढारी त्यांचे मित्र व चहाते होते. उत्तर आयुष्यात त्यांच्या सभा संमेलनाला शिंदे जात व प्रसंगी त्यांना सल्लामसलत देत. ब्राह्मणादी समाजाकडून जो न्याय तुम्ही मागता आहात त्याप्रमाणे तसाच समान न्याय दलितांना तुम्ही द्या, असे त्यांना सांगत पण त्यावेळी व आताही त्यांचे कोण ऐकतो?

मुंबई कायदे कौन्सिलात ब्राह्मणेतर पक्ष महत्त्वाचा होता. त्यावेळेस बरीच वर्षे आंबेडकर मुंबई कौन्सिलात होते. या पक्षाशी सहकार्य करून कित्येक कामे बाबासाहेबांनी केली, पण महार वतन बिलाचे वेळी ब्राह्मणेतर आमदारांनी त्यांना पाठिंबा दिला नाही! मुंबई कायदे कौन्सिलमधील डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कामासंबंधी अद्याप स्वतंत्र प्रकारे संशोधनीय सोपपत्तिक असे कोणी सविस्तर लिहिले नाही. 'स्वतंत्र मजूर पक्ष' वेगळा चालू झाला तरी ब्राह्मणेतर चळवळीविषयी आंबेडकरांची आस्था शूद्र कोण होते? या पुस्तकाच्या प्रस्तावनेत व्यक्त झाली. बुद्ध तर अवैदिक म्हणजे अब्राह्मणी धर्माचा प्रवर्तक होता. त्याला बाबासाहेबांनी शिरोधार्य समजले. सुधारणेचा एक अर्थ असा होतो की, मूळाकडे-तत्त्वांच्याकडे परत जाणे. सत्यशोधक समाजाच्या तात्त्विक संवर्धनाच्या कामी ब्राह्मणेतरांनी बाबासाहेबांचा जेवढा लाभ उठवावयास पाहिजे तेवढा मुळीच उठविला नाही. एकही सत्यशोधक समाज अधिवेशनाला त्यांनी बाबासाहेबांना अध्यक्ष म्हणून बोलाविले नाही. आमंत्रित केले असते तर म. फुले यांना एक गुरू मानणारे डॉ. बाबासाहेब खात्रीने उपस्थित राहून त्यांनी विद्वत्ताप्रचुर असे

मार्गदर्शनपर भाषण केले असते. काळ आता बराच पुढे चालत आला आहे.संदर्भ काही टिकतातच. आता डॉ. आंबेडकर सर्वांनाच अभ्यासनीय ठरले आहेत. ‘देशाचे दुष्मन’ पुस्तकाच्या खटल्यात डॉ. आंबेडकरांच्या विक्रमी बुद्धिमत्तेने ब्राह्मणेतर पुढारी निर्दोष सुटले याची माहिती सर्वांच्याच चालू पिढीला व्हावी यासाठी केलेला विचार विस्तार येथे नम्रपणे संपवितो.

अनुक्रमणिका

## २१.

# पुढारी व विवेकवंत

विचार व विवेक सर्वांच्या गरजेचा विषय आहे. मनुष्याला सत्यासत्य शोधता येते. मनुष्यात निर्माण होणारा प्रत्येक विचार हा बरावाईट असू शकतो. विचार व विवेक यात असा फरक आहे की, विवेक म्हणजे शाश्वत (सत्य) व अशाश्वत (असत्य) यांच्यासंबंधी बुद्धी वापरून व तपासून जो विचार केला जातो, तो विवेक होय. प्रत्येक विचार हा विवेक नसतो. श्री समर्थ रामदासांनी 'विवेक' म्हणजे काय? हे पारमार्थिकदृष्ट्या सांगितले आहे. व्यवहारातदेखील खऱ्याखोट्यांचा निवाडा करून विवेक करण्याची गरज असते. विवेकी माणूसच जास्ती पुढे येतो, विजयी होऊ शकतो. धंदा, उद्योग, व्यवसाय यात विवेक हा पाहिजेच. माणसाला सद् व असद् विचार प्राप्त होऊ शकतात. सद्सद्विवेकबुद्धी वापरण्याची दररोजच्या प्रपंचात व संसारात जरूरी असते. केवळ बुद्धीत विचार आला व तो कार्यवाहीत आणून टाकला; तर त्याचे बरे-वाईट परिणाम होऊ शकतात. म्हणून मनात येणारा विचार खरा आहे किंवा घातक आहे, या संबंधीचा शोधक असा सारासारविवेक माणसास जरूरीचा आहे. मग तो मनुष्य पुढारी असो अगर विवेकवंत असो, दोघांनाही त्यांचे विचार तपासणीची नेहमी गरज असते. त्या प्रक्रियेला आत्मपरीक्षणदेखील म्हणता येईल. 'चाळणा उदंड करावी' असे समर्थ यासाठीच सांगतात, आपली मते, आपला पक्ष वगैरे जे आपले सर्व आवडते काही असते, ते खरे का खोटे, हे शोधणे, मनुष्यमात्रास उपयोगी होते व तो भावनेच्या आहारी जात नाही. सावध असतो. सावधानतेचे विवरण व महत्त्व रामदासामध्ये देखील चांगले मिळते, बुद्धी ही सावध असण्याची नितांत गरज असते.

हल्ली पुढारी व विवेकवंत असे दोन वर्ग आढळतात, म्हणूनही ते मानले जातात. ही फाळणी व विभागणी इष्ट नाही. पुढाऱ्यालाही विवेक पाहिजे. अविवेकी पुढारी असला व तो अनुयायांनी मानला, तर तोटा दोघांचाही होतो. अविवेकी पुढाऱ्यांचे पुढारीपण खड्ड्यात जाते व तो संपतो. पुढारी कसा असावा व कसा नसावा, याचाही विचार विवेकाने केला पाहिजे. गुरू करताना पारखून घ्यावा लागतो. नाही तर बुवाबाजीचे दुष्परिणाम भोगावे लागतात. त्याचप्रमाणे पुढारी-प्रतिनिधी-निवडताना नीट विचाराने स्वीकारला व त्याला विवेकाने मते दिली तर देशाचा फायदाच होईल. 'विवेक' याची सोपी व्यवहार्य व्याख्यादेखील दिली जाणे शक्य होते. उदा., विवेक म्हणजे हिशेबी विचार. बेहिशेबी विचार म्हणजे अविवेक होय. विवेक बुद्धीने करावयाचा असतो. मनात बरे-वाईट विचार येऊ शकतात. ते खरे किंवा खोटे, हे पाहून संसार-प्रपंचात चालले पाहिजे, भावना तपासल्या पाहिजेत. विवेकान्ती जो भाव तो बाधक होत नाही. 'विवेके आकळावा श्रीपती' असेही साधुसंत सांगतात. शाश्वत (खरे) अशाश्वत (खोटे, मिथ्या-परिवर्तनीय) असा परमार्थिक, साधनमार्गातील विवेक, मनोबोध व दासबोध यात आढळतो. तो कोणत्याही संप्रदायातील साधकाला उपयुक्त होणारा खास आहे. श्रेष्ठ साधुसंतांची शिकवण जागतिक असते. मनुष्य जीवाला विवेकी करू शकतो, तो साधू तोच संत (खरा) होय. संतांचे हे कार्य असते.

राजकारणात (व कोणत्याही जीवनाच्या अंगोपांगात) विवेक हवा असतोच. पुढाऱ्यांना विवेक जसा जरूरीचा असू शकतो, तसा त्यांच्यात दिसून येत नाही. म्हणून एकपरी विवेकवंत व पुढारी असा पृथक् विचार होत असतो. म्हणजे हे दोन्ही भिन्नभिन्न मानिले जातात.

अनुक्रमणिका

विवेकामुळे विवेकवंत संबोधिला जातो. सर्वच विचारवंतांचे विचार हे सर्वमान्य होण्यास पात्र असतातच असे नव्हे. विचारवंतांचे विचार विवेकावर अधिष्ठित झाले तर ते टिकावू ठरतात. नाहीतर थोड्याच कालावधीत कालबाह्य होऊ शकतात म्हणून विचारवंतांनीही त्यांचा विचारपक्ष व स्वीकारलेली मते-तत्त्वज्ञान-तपासावे. कोणताही पक्ष खरा किंवा खोटी, हे ठरविण्यासाठी प्रथम विवेक केला पाहिजे. म्हणजे दूरदृष्टी येते व पक्षांतर करावे लागत नाही! विवेकान्ती पक्ष ठामपणे स्वीकारला जात नाही, म्हणून पुढाऱ्यांना पक्षांतराची गरज भासते व वारंवार स्वार्थासाठी पक्षान्तर करणे, हे हास्यास्पद ठरते! राजकारणातील पुढारी हे वारांगनेसारखे वाटतात म्हणून पुढाऱ्यांना (आजकाल) विवेक पाहिजे. पुढारी विवेकी द्रष्टे हवेत. पुढाऱ्यांना वाचन अभ्यास-मनन-चिंतन-सत्यान्वेषण जरूर आहेच. उथळ पुढारी काही कामाचे नाहीत. कार्यकर्त्याने त्याचे कार्य (Mission) विचारान्ती-विवेकान्ती निवडले पाहिजे व त्यासाठी एकविधता पाळली पाहिजे. समर्पित होऊन व वाहून घेऊन कार्य करणारे कर्मवीरत्व मिळवितात.

**विवेकी नेतृत्व**

विवेकवंत व विचारवंत प्रत्यक्ष राजकारणापासून लांब राहिलेले आढळतात व पुढारी राजकारणाचा खेळ खेळतात; हे आजकालचे दृश्य दिसते. पण काँग्रेस स्थापन झाल्यावर व तत्पूर्वी जे पुढारी होते ते मनमोहन राय, रानडे, गोखले, विवेकानंद, टिळक वगैरे अनेक अभ्यासू-व्यासंगशील असे विवेकवंत होते. राजकारण हा अभ्यासाचा शास्त्रीय विषय आहे. केवळ 'लेकूराच्या गोष्टी' नव्हेत. जे राजकारणात पडतात व पुढारी म्हणवितात किंवा ज्याला पुढारी म्हटले जाते, त्यांना विवेकी विचार हा हवाच असतो. विवेकवंत व पुढारी यांच्यामध्ये अंतर पडू नये. पुढारी जर विवेकी असतील व त्यांचा राजकारण या विषयावर अधिकार असेल तर उत्तमच, दुधात साखर पडल्यासारखे होईल व विचारवंतांनी केवळ अभ्यासिकेत व व्यासपीठापुरतेच राहू नये. राजकारणात पडावे, म्हणजे राजकारण प्रगल्भ होईल. उदा. तर्कतीर्थ यांचे जे महत्त्व आहे, ते स्वतः पंडित-विवेकवंत असूनही राजकारण त्यांनी वर्ज्य मानले नाही. पंडित व विद्वान हा दूरचा सोवळा असा अर्थ त्यांच्या बाबतीत होत नाही. यशवंतराव विवेकवंत अभ्यासू नेते होते, म्हणून ते उमटून दिसले व आजही दिसतात. त्यांचे वाचन, मनन, पूर्वतयारी उपेक्षणीय नव्हती म्हणून विचारवंतांत, साहित्यप्रेमीत त्यांना स्थान प्राप्त झाले होते. यापूर्वीचे महर्षी शिंदे यांचे नेतृत्व विवेकसंपन्न होते. अशी उदाहरणे थोडी सापडतात. पण ती वाढावीत, वाढली पाहिजेत. 'अभ्यासने प्रकट व्हावे' नाहीतर गुप्तच असावे, देखावा करू नये, हे अधिक बरे.

निवडून जाणारे प्रतिनिधी जर अभ्यासू विवेकी असतील तर ते अधिक जबाबदार असू शकतात. खुर्चीत बसणाऱ्यानी व बसू इच्छिणाऱ्यानी स्वतःची पात्रता अजमावी, हे बरे नव्हे काय?

निष्क्रिय विद्वान कामाचा नसेल तर तो व्यर्थ होय, असे मागे तुकोबा म्हणाले व महर्षी शिंदे देखील सांगत असत. कर्मवीराला विद्वत्तेची जोड असल्यास उत्तमच. कर्मवीर भाऊराव पाटील याच्यात शैक्षणिक शहाणपण होते, म्हणून ते 'शिक्षण महर्षी' ठरले. शिक्षण व शहाणपण हातात हात घालून कसे पुढे जाईल, हा आजचा प्रश्न आहे.

सत्ताधारी व विरोधी प्रतिनिधी विवेकाने समजुतीने वागतील तर संसदामधून जो 'गोंधळ' होत असतो तो होणार नाही.

अनुक्रमणिका

निवडणूक ही पैशाच्या (व सत्तेच्या) जोरावर जिंकली जात असल्यामुळे विवेकवंत, विद्वान व तत्सम मंडळी निवडणुकीच्या राजकारणापासून दूर राहातात पण ही अवस्था पालटली गेली पाहिजे गरीब पण सुपात्र हाही निवडून आणला पाहिजे, पण आजकाल हे अवघड आहे.

पुढारी कार्यकर्ते विवेकसंपन्न विचारवंत असे लाभले तर पुष्कळपणे राजकारण सुधारेल. पदवीधर कायदेनिष्णात निवडून जातील तर चांगले कायदे होतील. स्थानिक स्वराज्य संस्था सुधारतील. अर्थशास्त्राचे अभ्यासकांची सहकारी चळवळीत वाढ होईल तर त्याही दर्जेदार होतील. 'भ्रष्टाचार' हा विवेक नव्हे; अविचारच गणिला पाहिजे; निदान सुशिक्षितांनी तरी गुन्हेगारी करू नये. पदवीधर भ्रष्टाचारी असू शकतात, असा अनुभव प्राप्त होणे हे शिक्षणक्रमाचे दुर्दैव होय. प्रथम शिक्षणाचे वाढते क्षेत्र कसे भ्रष्टाचारापासून मुक्त-लांब-राहील हा प्रश्न सुटला पाहिजे. शिक्षण म्हणजे तिसरा डोळा. शिक्षणाने डोळसपणा वाढविला पाहिजे.

साहित्य व शिक्षणाचा प्रसार वाढत आहे हे खरे, पण यांचा केवळ धंदा होता कामा नये. धंदा-बाजार झाल्यास दर्जा खालावतो म्हणून कोणीही असो पुढारी असो, कार्यकर्ता असो अगर विचारवंत असो त्याला विवेकाची जोड ही असावीच लागते. राजकारणात उत्तरोत्तर धर्मांधता आडवी येत आहे. पण मूलतः धर्म म्हणजे दुसरेतिसरे काही नसून विवेक करणारे व शिकविणारे शास्त्र होय. धर्म व राजकारण जर 'अफू' होईल, तर सर्वच राष्ट्र संपेल व अविवेकाचा अंमल येईल. धर्म, भाव, श्रद्धा परमार्थ-संसार, साहित्य, संशोधन वगैरे कोणत्याही जीवनाच्या अगोपांगात विवेकाचे महत्त्व आहे. मनुष्य म्हणजे बुद्धी व बुद्धीनेच विवेक करता येतो. बुद्धीमान माणूस जास्ती विवेक करू शकतो. पुढाऱ्यांनाही बुद्धीमत्ता-शहाणपण-पाहिजेच. मते सुधारण्यासाठी मती ही निकोप करणे जरूरीचे आहे. ज्यांना नेत्र (विचाराचा डोळा) असतो ते चांगले पुढारी व कार्यकर्ते होऊ शकतात. उत्तम नेते होऊ शकतात. कित्येकांत नैसर्गिकपणे नेतृत्वाचे गुण असतात. असे शिवाजीत होते.

**सयाजीराव : शाहूंचे उदाहरण**

संस्थानी कारभार नीट व्हावा, म्हणून सयाजीराव व शाहू यांनी खालसा मुलुखातून लायक व पदवीधर माणसे बोलावून, त्यांना कारभारी केले. साहित्याला व विद्वत्तेला उत्तेजन दिले. ब्राह्मणेतर पक्ष निघाल्यावर पदवीधर वकीलमंडळी कायदे कौन्सिलमध्ये निवडून जाण्यासाठी त्यांना राजर्षी शाहू यांनी शोधून पुढे आणिले. त्या काळात चांगले इंग्रजी यावे लागत असे. आज उठला सुटला तो पुढारी होतो. निवडणूक ही उत्तरोत्तर फार खर्चाची होत आहे व मतदारांत पैसे घेऊन मते देण्याची प्रवृत्ती वाढत असल्याने निवडणुकांचा बाजार झाला. तुलनेने काही संस्थाने देखील पूर्वी आदर्श वाटत याचे कारण चांगले प्रधान निवडले जात. प्रतिनिधींच्या लायकीवर कायदे कौन्सिलातील कामांचा दर्जा अवलंबून असतो. संसदपटू पुढारी, 'आमदार, नामदार, खासदार' फारच थोडे!

**पुरोहित व पुढारी**

अनुक्रमणिका

पुरोहित हा धर्मकृत्यांमध्ये मार्गदर्शन करतो, साह्य करतो. यज्ञकाळात पुरोहिताना महत्त्व होते. पुढे मूर्तीपूजा सर्वत्र प्रचारात आल्यावरही पुरोहिताची गरज राहिली. जनता निरक्षर होती त्यावेळी पुरोहित व पूजाअर्चा सांगणारा वर्ग जरूर होता. पण आता साक्षरता व शिक्षण वाढल्यावरही जोशी-जंगम यांची गरज लागते हे नवलाचे आहे. स्वावलंबन वाढले नाही. बहुतेकांना भिक्षुक हा (वकील) जरूर लागतो व दक्षिणा (फी) देखील आजकाल वाढली आहे व लोक देतात! आश्चर्य आहे. रूढीप्रिय व परंपरावादी समाजात हे सर्व टिकते व वाढते. परिवर्तन हा आपल्या समाजाचा धर्म (स्वभाव) नाही. 'स्वभावाः दुरतिक्रमः।' व्यक्तीचा व समाजाचा स्वभाव बदलत नाही. व्यक्ती-व्यक्तींचा समाज बनतो व व्यक्ती त्यांचा धर्म-स्वभाव-बदलून दाखविण्यासाठी धैर्य करतील तर समाज बदलेल. परिवर्तन कार्यवाहीत आणले आहे, अशी उदाहरणे लोकांना मार्गदर्शक होतात. पण उत्तरोत्तर हे सर्व चांगले लोपत आहे. संस्कृततज्ज्ञ पुरोहित दुर्मिळ झाले. समाजातील चालीरिती-वहिवाटी व रूढी यांच्या मर्यादा सुधारकांनाही पडल्या. जास्तीत जास्त लोक घरी दारी जसे वागतात तसे व्यक्तीला वागावे लागते. स्त्रियांचाही प्रभाव पुरुष समाजावर पडतो व रूढीबद्ध समाज वर्षानुवर्षे परंपरेने वागत जातो. हे सोपेही असते व पुरोहित भिक्षुक धर्मशास्त्राधारे रूढीना मान्यता देतात. पुरोहित परिवर्तनीय विचार करीत नाहीत. मग यजमान मंडळीत विवेक उत्पन्न झाला नाही तर नवल नाही! देवाधर्मांच्या नावावर जगणारे फक्त ब्राह्मण-भटभिक्षुकच-असतात असे नव्हे. देवऋषी, मांत्रिक-जादूटोणा करणारे ब्राह्मणेतर देखील पुष्कळ असतात. हे खेड्यापाड्यातील बाया बापड्यांना जास्ती फसवितात. पुढारी देखील नाना जातीधर्माचे असतात व प्रत्येक जातीत व धर्मात पुरोहित असतात, त्याप्रमाणे पुढारीदेखील असतात. हे पुरोहित व पुढारी विवेकी व सदाचारी लाभतील तर जनतेचा फायदाच होईल; धर्मकारण, राजकारण अशुद्ध व भ्रष्ट होणार नाही. सर्व क्षेत्रात परिस्थिती गंभीर आहे. आज खेड्यापाड्यांत 'स्त्री जीवन' निर्भय नाही.

### अनुयायी व विवेक

पुरोहित-धर्ममार्तंड-पाद्री व मुल्लामौलवी वगैरे त्यांच्या धर्मानुयायांत धर्मांधता निर्माण करतात. धर्मज्ञान न वाढविता धर्मांतील लोकांना अज्ञानच जास्ती शिकवितात. म्हणून धर्मांधता वाढतच आहे व धर्म हे राजकीय क्षेत्रात लुडबूड करतात, आडवे येतात. परमेश्वराप्रत अनुयायांना नेण्याऐवजी यादवीला प्रवृत्त करतात व धर्म ही अफू होते. वास्तविक धर्म हा मूलतः अमृत असतो. धर्म घटना करतो म्हणजे धारणा करतो. पण हल्ली सर्वच धर्मविघटन करताना आढळतात, दुर्दैव आहे. अशा अवस्थेत धर्मानुयायांनी स्वतःच विवेक केला तर त्यांची दिशाभूल होणार नाही. अनुयायी म्हणजे केवळ अंधानुकरण नव्हे. अनुयायांना स्वावलंबी विचार पाहिजेच, हे सांगावयाचे आहे. राजकारणी पुढारी जर अनुयायांनी पारखले तर त्यांची राजकीय फसवणूक होणार नाही. जिकडे स्वार्थ तिकडे पुढारी पक्षांतरे करून जातात. पक्षनिष्ठ व तत्त्वनिष्ठ पुढारी दुर्मिळ झाले आहेत. पक्षांतरे ही राजकीय धर्मांतरे असतात. धर्म म्हणजे येथे स्वभाव. विरोधी राहण्याचा, लोकशाहीत त्यागी धर्म (स्वभाव) असतो. सत्तेसाठी-खुर्चीसाठी-सत्ताधरी पक्षात पुढारी जातात. पक्षांतराचा कायदा हा मोडला जातो. सत्ताधारी पक्षातून सत्ताविहीन पक्षात म्हणजे विरोधी पक्षात जाणारे फारच थोडे. ख्रिस्ती व मुसलमानातील धर्ममार्तंड हिंदू धर्मांतील दुर्बलांच्या दुर्बलपणाचा फायदा घेऊन धर्मांतरे घडवितात. हा त्यांचा गुप्त अगर उघड व्यवसाय असतो. हिंदू धर्मांतील भिक्षुक, पंडित, शास्त्री, धर्माचार्य फक्त दक्षिणा घेतात. हिंदू धर्माची कोणा इतरांना दीक्षा देत नाहीत. किंवा शुद्धी-हिंदूकरण-फारसे करीत नाहीत. याचा फायदा इतर धर्मियांना मिळतो. हिंदूंनी याचा विचार करावा. सर्वच धर्मातील अनुयायांनी 'धर्मविवेक' करावा. प्रत्येक धर्मात जो पारमार्थिक-आध्यात्मिक-

भाग आहे, त्याचा लोप होत आहे व धर्मपुरोहित-हरएक धर्मातील-कर्मकांडच वाढवित आहेत. कारण कर्मकांडावरच त्यांना जगता येते. ज्ञानकांडावर जगता येत नाही. कारण ज्ञान झाल्यावर पुरोहित मध्यस्थाची गरज लागणार नाही. भक्तांचे स्वावलंबन वाढले तर पुरोहितांची गरज लागणार नाही. धर्मगुरूंच्या मध्यस्थीशिवाय भक्त परमेश्वरप्राप्तीचा मार्ग चोखाळू शकतील काय? जोपर्यंत स्वावलंबी विवेक नसतो, तोपर्यंत धर्मकारणात व राजकारणात अनुयायांची फसवणूक होणारच. राजकीय व धार्मिक बुवाशाही-बाबागीरी-ही चालूच राहणार! धार्मिक बाबतीत आजकाल विवेकाची फारच गरज आहे. सर्वच धर्म रस्त्यावर येत आहेत. विवेक म्हणजे हिशेबी विचार, गणिती विचार. परमविचारांनी विवेक साकार होतो. सर्वच ऐतिहासिक धर्म परंपरेने जाती (CASTES) झाल्यामुळे जातीभेदात भरच पडली व राजकारणात वेगवेगळे धर्म, त्यांची स्वतंत्र राज्ये मागू लागले आहेत. या विभक्तपणाला भाषावारीचाही पाठिंबा मिळत आहे. उदा. मुसलमान धर्म व त्यांची भाषा 'उर्दू'; ही अलग मानली जाते. हिंदू हे संस्कृताचा अभिमान धरतात व ही व्यवहारात नसलेली संस्कृत भाषा राष्ट्रभाषा व्हावी, असेही धर्ममार्तंड प्रतिपादितात. पुढारीपणे हे अशा प्रकारे धर्मगुरूंच्याकडे जाऊ लागल्यामुळे देशाच्या एकतेस धोका प्राप्त होण्याची वेळ आली आहे. पुरोहित व पुढारी जर सारासारविवेक करतील तर धर्मांधतेतून राजकारणात आडवे येणारे पुष्कळ प्रश्न मिटतील. धर्माचा धर्मपुढाऱ्यांकडून दुरुपयोग जास्ती होत असल्यामुळे ह्या सर्वांवर तोडगा म्हणून 'निधर्मीवाद' पुढे आला आहे, नव्हे आणावा लागतो. कारण 'धर्म' हे मूलतः अमृत असते, पण त्याला अफूचे स्वरूप येते. अशा वेळी विवेक फार जरूरीचा आहे. 'धम्म'-नीती-हवीच असते.

**पुढारी लोकांची दहशत!**

पुढारी शब्द ग्रामीण भागात जास्ती रूढ आहे. जो तो पुढारी होत आहे. प्रत्येक खेड्यात दोन तरी पार्ट्या-राजकीय-असतात व गावाची शक्ती विभागली जाते. मतभेद खेळण्यातच वेळ जातो. विकास बाजूला राहतो. खेड्यापाड्यांत विवेकवताचा अल्पसंख्यही वर्ग नसतो. जेथे ज्या खेड्यात विचारी माणसे असतात, तेथे गावातल्या पार्ट्या मिटविल्यादेखील जातात. अशी माणसे विचारी होती, म्हणून गावगाडा मागे हजारो वर्षे चालला. 'Country life is sweet' ही ग्रामीण जीवनाची व्याख्या आता पूर्ववत करणे मुष्कील झाले आहे. ग्रामीण पुढारी गावात दहशत निर्माण करीत असतात. सरंजामशाहीचा व सरदारशाहीचा, वतने गेली तरी पीळ आहेच. फक्त सुंभच जळाले. पुढारी राजकारणात आपली वतनदारी निर्माण करू लागले आहेत. जणु काही पुढारी आजकालचे नवे सरदारच होऊन बसतात. निवडणुकातून व एरव्ही देखील यांची दहशत असते. खेड्यात अल्पसंख्याकांना व दलितांना मोकळी व निर्भय वागणूक करीता येत नाही. 'बघून घेईन' असा दम पुढारी देतात. खेड्यात सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य नसते, म्हणूनही शिक्षित व मध्यमवर्गीय लोक खेड्यात राहणे टाळतात. या प्रकारामुळे खेडी मागे पडतात. वैचारिक विकास होत नाही. निवडणुकीच्या राजकारणाचे दुष्परिणाम वाढते आहेत. पूर्वी हे सर्व नव्हते तरी सूज्ञ समजूतदार पुढाऱ्यांचे लोक ऐकत.

मागे राजकीय असंतोष निर्माण करण्यासाठी कायदेभंगी चळवळ झाली. पण तिच्यानंतर कायद्याच्या राज्याची, अधिकारी सत्तावंतांची व पोलीसांची जनतेवरील चांगली छाप व भय मावळत गेले. भूमिगतांची चळवळ पुढे आली व पुढाऱ्यांचे सरकार प्रतिराज्य बनले. यामुळे देखील पुढारी लोकांचे प्राबल्य महती वाढून एकपरी खेड्यापाड्यांतील स्वातंत्र्य नष्ट होते व खरी लोकशाही लोपते. पुढारी मंडळी ज्यात त्यात हस्तक्षेप करतात.

अनुक्रमणिका

शिक्षण-सहकार, पंचायत राज्य वगैरेमध्ये पुढारीलोक सेवकवर्गावर, कर्मचाऱ्यांवर वजन खर्च करतात. एकूण शासनयंत्रणेला पुढारी मंडळींना सांभाळावे लागते. शासनयंत्रणेचे स्वावलंबन व स्वयंनिर्णय लोपतो. हल्ली सरदारशाहीच्या ऐवजी पुढारीशाहीचे राज्य असते व हे पुढारी बहुतेकपणे सत्ताधारी पक्षाकडील असतात. विरोधी पक्षातील पुढारी नगण्य असतात. या देशात एकपक्षीय हुकूमशाही निर्माण झाली याचे कारण सत्ताधाऱ्यांनी दहशतीच्या जोरावर विरोधी पक्षच वाढू दिले नाहीत, त्यांच्या वाढीला 'खो' घातला; पक्षांतरे घडविली. सत्ताधारी पक्षातील पुढाऱ्यांची सत्ता-संपत्ती, 'मान-पान-ठाण' वर्धमान राहात असल्याने विरोधी पक्षांना कार्यकर्ते व पुढारी मिळेनासे झाले. विरोधी राहावयाचे झाल्यास त्याग पाहिजे व आजकालच्या दुर्मिळतेच्या व महागाईच्या दिवसात त्याग व स्वयंसेवा परवडत नाही. म्हणून पुढाऱ्यांत सत्ताधारी पक्षातील पुढारीच फार असतात व लोकही त्यांना मानतात. कारण दरबारातील कामे व्हावी लागतात. सत्तेशिवाय शहाणपण नसते व सत्तेवरच्या पुढाऱ्यांनाच लोक विचारतात!

**विवेकवंत नेते**

काँग्रेस स्थापनेच्यावेळी व पुढेही जे देशाचे पुढारी होते, ते नेमस्त होते. तरी विद्वान, व्यासंगी व त्यागी होते. दादाभाई नौरोजी, रानडे, भाण्डारकर वगैरेंची नावे उपलब्ध आहेत. जवाहरलाल, लोकमान्य टिळक, चित्तरंजनदास, ॲनी बेझंट वगैरे विद्वान होते. यांना व तत्सम इतर अनेकांना विवेकवंत व त्याबरोबर पुढारी देखील म्हणता येते, यांनी देशाची सेवा केली. आज देशाचा उपयोग स्वार्थासाठी केला जात आहे व पुढाऱ्यांचा-प्रतिनिधींचा-अभ्यास, व्यासंग व दूरदृष्टी कमी पडत आहे. राजकारण, अर्थकारण वगैरे विषयांवर अधिकार असलेली माणसे पुढाऱ्यात प्रांतिक स्थरावर व केन्द्रातही एकाचढीत एक कमी आहेत. देशाजवळ सुपात्र माणसे अधिकाधिक हवी असतात. देश फार मोठा आहे. स्वातंत्र्यातील प्रश्न जास्ती बिकट उत्तरोत्तर होत आहेत. ज्यांना 'विवेकवंत' म्हणता येते, असे थोडेच आढळतात व जे आहेत ते शहरी विभागात राहणारे बहुधा आहेत. पुढाऱ्यात सत्तेसाठी रस्सीखेच आढळते. तितकी विवेकवंतांत आढळत नाही. विवेकवंत सत्तेच्या राजकारणापासून दूर राहतात. पुढारी, कार्यकर्ते अभ्यासाला चिंतनाला फारसे स्थान देत नसलेले आढळतात. विद्वान, साहित्यिक, पत्रकार वगैरे मंडळी पैशाने विकत घेता येतात; असाही नवा अनुभव तयार होत आहे. मतिविक्रय सर्वांत वाईट. पण बुद्धी मती-गहाण ठेवणारे वाढत आहेत. स्पष्टवक्ते, निर्भिड व मतस्वातंत्र्याचे चहाते वाढले पाहिजेत. वैचारिक साहित्य विचार वाढविते. समाजाला नवा विचार देणे हेही कार्य असते. मतदारांचे शिक्षण करून लोकशाहीची उंची वाढविणारे 'लोकशिक्षक' आज हवे आहेत. निवडणुकीला उभे राहून नाहक खर्च करणारे विवेकवंत आढळत नाहीत. ग्रामीण भागातील पुढारी व कार्यकर्ते 'भाऊबंदकी' ह्या घरच्यादारच्या दोषामुळे भांडत असतात. निवडणुकीत अमाप खर्च करीत असतात, विवेकाचा अभाव दिसतो. तर्कतीर्थ, विठ्ठलराव गाडगीळ, वसंत साठे, डांगे, टिळक वगैरे विवेकवंतांत पक्षभेद आहेतच, ते आपआपसात भांडत स्वसमाजाचे नुकसान करीत नाहीत. पक्षभेद विसरून विधायक कार्यासाठी एका व्यासपीठावर येतात. एकाच घरात नाना पक्षाचे लोक राहू शकतात. इतरेजनांतील पुढारी माणसे एकमेकांचा सूड उगवीत असतात! विवेकवंताकडून शहाणपण शिकत नाहीत! विवेक-सारासार विचार यांची वाढ पुढाऱ्यात व कार्यकर्त्यांत होईल तर 'पुढारी' शब्दाला विधायक चांगला अर्थ प्राप्त होईल, व्हावा म्हणूनच ही चिकित्सा येथे व्यक्त केली आहे.

अनुक्रमणिका

**सारासारविवेक**

सर्वच पुढारी अपात्र असतात, अविवेकी असतात असे प्रतिपादण्याचा येथे उद्देश नाही. पुढारी ह्या संज्ञेला 'टर्म ऑफ रिप्रोच' असा उलटा अर्थ प्राप्त होत आहे, हा होऊ नये. पुढारी (व पुरोहित देखील) महत्त्वाचे असतात. गव्हाबरोबर किडे येथे रगडावयाचे नाहीत. ज्या ज्या वेळी समाजाला, राष्ट्राला सुपात्र पुढारी मिळतात तेव्हा राष्ट्र पुढे येते. फसवणूक करणारे पुढारी, पुरोहित असले म्हणजे राजकारण व धर्म दोन्हीही अधिपतित होतात.

विवेकवंत म्हणजे शहाणे, विद्वान व जबाबदार नागरीक असा अर्थ होतो. परंतु विवेकवंतांनी केवळ ज्ञानी असून यापुढे चालणार नाही, त्यांनी क्रियावंत असावे. शुष्कपणे क्रियाहीन असू नये. क्रियावान तोच पंडित. समाजापासून व राजकारणापासून दूर राहू नये. तुसडेपणा समाजाला फायद्याचा नसतो! तटस्थ विवेकवंत जास्ती अलग पडतो. विवेकवंतांची संख्या वाढली पाहिजे, पुढाऱ्यांच्या संख्येपेक्षा विवेकवंत फारच थोडे आहेत व खरे विवेकवंत उत्तरोत्तर दुर्मिळ होत आहेत. पांढरी गांधी टोपी, नेहरू सदरा परिधान करण्याच्या प्रथेमुळे पुढारी उमटून दिसतात! दृश्य होतात. विवेकवंत समाजाच्या व पुढाऱ्यांच्याही नजरेपासून अज्ञात असतात. ही उपेक्षा होय. पुढारी म्हणजे ज्याने त्यांचे उखळ पांढरे करून घेतले आहे, अशी मंडळी असा अर्थ होऊ नये.

केवळ मध्यमवर्गातूनच विवेकवंत आढळतात. शेतकरी वर्ग, कामगार वर्ग वगैरे श्रमिकांतूनही विवेकवंत पुढे यावेत, त्यांनी सर्वांनी, श्रमिकांनी आपआपली सुखदुःखे साहित्यातून मांडावीत. भाषण, संवाद, परिसंवाद व लेखन ही विवेक प्रगट करण्याची साधने आहेत. ती वरील सर्वांच्या कह्यात, कक्षेत यावीत, असावीत. गरीबालादेखील लोकशाहीत पुढारी-प्रतिनिधी-होता यावे पण होता येत नाही. हे खरे! पुढारीपणाची व विवेकवंतपणाची मिराशी व वंशपरंपरागत (जातवर्णवादी स्वरूप व अवस्था) असू नये. कारण लोकशाही ही सर्वांना संधी देणारी पद्धती आहे, जे खरे पुढारीपण मिळवू इच्छितात व जे खरे विवेकवंत असू शकतात ते भूषणावह ठरतात. पुढारी निराळे व विवेकवंत निराळे वेगळे असा येथे पृथक् विचार करण्याचे पडले. ते पडू नये, दरी दोघात नसावी कारण मनुष्यमात्राला 'विवेक' जरूरीचा असतो. नित्यानित्यविचार करणे, यालाही परमार्थात विवेक म्हणतात. पण सर्वप्रकारच्या जीवनाच्या अंगोपांगात विवेकी विचाराची सर्वांना गरज असतेच. पुढाऱ्यांनी विवेकवंतांचा सल्ला घ्यावा. कै. यशवंतरावांची ही प्रथा होती, पण त्यांच्यासारखे पुढारीदेखील दिसत नाहीत.

पुढारी होण्याचे 'ध्येय' आपल्या मुला-बाळांना, सग्यासोयऱ्यांना सुबत्ता व गडगंज श्रीमंती आणून देण्याचा मार्ग असा अर्थ होऊ नये. राजकारण करून पुढारी चटकन् त्यांची 'गरीबी' हटवतात. पण सर्वसाधारण लोकांची गरीबी वाढतच आहे. पुढारी (पुरोहित, उपाध्याय) म्हणजे एक दलाल, मध्यस्थ, एजंट असा अर्थ होणे, हा हानीकारक मार्ग होय. पुढारी हा शब्द (परिभाषा) राजकारणातील आहे. पुरोहित, उपाध्याय, भिक्कू व भिक्षूक, पोप, पाद्री व मुल्ला-मौलवी हे धार्मिक 'पुढारी' होत. नेत्याने, पुढारी म्हणविणाऱ्यांनी स्वतःचे चारित्र्य चांगले ठेवून लोकहित साधून दिले पाहिजे. पुढाऱ्याने अनुयायासाठी जीवन समर्पिले पाहिजे. केवळ स्वतःसाठी, परिवारासाठी जगात कामा नये. पुढारी म्हणजे स्वतः पुढारलेला व लोकांना पुढे नेणारा, असा वास्तविक अर्थ आहे. मूल्यर्थ हा होय. विवेकवंतालादेखील सामाजिक बांधिलकी असलीच पाहिजे. तथापि ग्रामीण भागातील जे प्रतिनिधी होतात त्यांच्यावर जबाबदारी मोठी असते. ज्यांना 'पुढारी' म्हणून संबोधिले जाते व जे पुढारपण करतात, त्यांनी स्वतः त्यांचे कर्तव्य व जबाबदारी जाणावी हे बरे नव्हे काय? कार्यकर्ता पुढारी होतो. नेतृत्व

अनुक्रमणिका

(लहान-मोठे) उदयास येते. नेतृत्व समाजातूनच पुढे येते व ते समाजाला पुढे नेते. ज्याच्या मागे लोक असतात, ज्याच्या शब्दाला मान असतो, वजन असते अशांना निवडणुकीतून महत्त्व येते. अनुयायांच्या संख्येवर पुढारीपणाचे मापन होते. विवेकवंत विविध पक्षांत असतात. पक्षातीत राहून निःपक्षपातपणे विवेक करणारे विवेकवंत फारच दुर्मिळ असतात. लोकसंग्रह करण्याचा आजकाल प्रयत्न करताना आढळत नाहीत. ते एकाकी असतात. त्यांच्या विचारांचा परिणाम मात्र लोकांवर होऊ शकतो. विचारांना सामर्थ्य असते. संतांना कोणी पुढारी म्हणून संबोधित नव्हते, तरी त्यांच्यामुळे जनसमाज पालटला. दूरदर्शी विचार ज्यांना असतात, प्राप्त होतात ते जास्ती प्रभावी ठरतात. अभ्यास-मनन-चिंतनाच्याद्वारे प्रश्नांचे चालू स्वरूप व पुढील परिणाम यांचे भविष्यकालीन स्वरूप विचारवंत व्यक्त करू शकतात. अलीकडील काळात मानवेंद्रनाथ रॉय यांचे उदाहरण सांगता येते. शास्त्रीय व व्यवस्थित मांडलेले विचार लोक वाचतात व ऐकतात. वाचकवर्ग प्राप्त होणे जरूर असते. वाचकांच्या प्रतिक्रिया देखील लक्षात घ्याव्या लागतात. विचार शक्तिमान होऊ शकतात व ते नेतृत्व देखील करू शकतात. उदा., मा. जोतीराव फुले यांच्या 'गुलामगिरी' पुस्तकावर फार मोठी उपहासप्रधान टीका झाली व होऊ शकते. या प्रमुख पुस्तकाचे स्वरूप कसे असो वा नसो, त्यातील विचारामुळे सत्यशोधक समाज व पुढे सत्यशोधक चळवळ होऊन गेली. आजही महत्त्वाचे म्हणून 'गुलामगिरी' पुस्तक विद्वानांना देखील मानावे लागते. नाईलाज त्यांचा होतो. प्रभावी क्रांतिकारक पुस्तके जगाच्या वाङ्मयात फार निपजत नाहीत. म. फुले हे विवेकवंत व पुढारी देखील होते. त्यांना अनुयायी होते व असू शकतात. कित्येक विवेकवंत त्यांच्या पुस्तकांतच राहातात व त्यांचा रहिवास पुस्तकाच्या कपाटातच असतो. कालबाह्य होणारी पुस्तके व विचार यांची संख्या मुबलक असते, परंतु मार्क्सच्या मॅनिफेस्टोला आजही महत्त्व आहे, या सर्वांना पुढेही वैचारिक मूल्य राहील. माणसात पिळणारे व मिळून घेणारे असे दोन प्रकार राहतील तोपर्यंत तरी, मार्क्स व म. फुले मार्गदर्शक राहातील म्हणजे नेतृत्व करतील.

**युगकर्ता**

पुढारी हे स्वतः पुढारलेले असावेत. अगोदर विचार-विवेक व नंतर त्यांची कार्यवाही असा क्रम असतो. सर्वच मोठमोठ्या धर्माचे संस्थापक हे नेते होते, पुढारी होते म्हणून त्यांच्यामुळे निदान धर्मावर विचारांची समृद्धी उपलब्ध झाली. मोठमोठे धर्मसंस्थापक हे नवयुगप्रवर्तकच होते. युगकर्ता म्हणजे शककर्ता होय. नव्या कालगणनेला यांच्यामुळे सुरूवात झाली. महान सम्राटांची साम्राज्ये गेली, पण मोठमोठ्या युगकर्त्या धर्मसंस्थापकांचे धर्म हयात आहेत.

युगकर्ता हा विवेकवंत, पुढारी, नेता व कर्मवीर देखील असावा लागतो, असतोच. 'नवे युग निर्माण करू' म्हणून ते बळेच मुद्दाम तयार करता येत नाही, द्रष्टेपण लागते. प्रॉफेट कोणास म्हणावे व संबोधिले जाते यासंबंधीचे कसेस (Tests) आहेत. संदेष्टे जे सर्व झाले ते पुढारी नेतेच म्हणावे लागतात. केवळ राजकारणातील पुढारी हेच फक्त नेते नव्हते. श्रेष्ठ साधुसंत देखील नेते, पुढारी झाले व होत असतात. या सर्वांमुळे समाजाचे नैतिक परिवर्तन घडते, असा इतिहास आहे. स्वातंत्र्यसैनिकच देशभक्त होते असेच केवळ नव्हते. जे तुरुंगात गेले नाहीत, अशा अनेक नामवंतांनी देशाला पुढे आणण्यासाठी प्रयत्न केले होते. कोणत्याही प्रश्नाची चिकित्सा करताना एकच बाजू पाहाण्याची प्रथा पूर्ण सत्यवादी ठरत नाही. होऊन गेलेल्या थोरामोठ्यांच्या शताब्द्या साजऱ्या होतात हे कृतज्ञतेला धरून आहे. पण नेत्यांचा व पुढाऱ्यांचा फक्त शताब्दीवर्षात शासन, वृत्तपत्रे व

अनुक्रमणिका

नेत्यांची अनुयायी मण्डळी प्रामुख्याने त्यांच्या विचारावर व कार्यांवर प्रपंच करतात, मग पुढे सर्वच विसरले जाते!

काही पुढारी गावाचे, तालुक्याचे व कित्येक पुढे प्रांतिक असू शकतात. मागेपुढे अखिल भारतीय पुढारी थोडे झाले व असू शकतात. जागतिक नेते व विश्वमानव त्यातूनही फारच कमी निपजतात. सर्व राष्ट्रांचे नेतृत्व करून जगात शांती निर्माण करणारे महत्त्वाचेच होत. आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या काळात जागतिक मुत्सद्दी व नेते अत्यंत महत्त्वाचे ठरतात. चांगले पुढारी, जागतिक नेते प्राप्त होणे ही एकपरी भाग्याचीच बाब जाणावी लागते. नियतकालिकांना देखील पुढारी म्हणावे लागते. कारण नेतृत्व, (वचारिक) करतात.

